

This PDF you are browsing now is a digitized copy of rare books and manuscripts from the Jnanayogi Dr. Shrikant Jichkar Knowledge Resource Center Library located in Kavikulaguru Kalidas Sanskrit University Ramtek, Maharashtra.

KKSU University (1997- Present) in Ramtek, Maharashtra is an institution dedicated to the advanced learning of Sanskrit.
The University Collection is offered freely to the Community of Scholars with the intent to promote Sanskrit Learning.

Website
https://kksu.co.in/

Digitization was executed by NMM

https://www.namami.gov.in/

Sincerely,

Prof. Shrinivasa Varkhedi
Hon'ble Vice-Chancellor

Dr. Deepak Kapade
Librarian

Digital Uploaded by eGangotri Digital Preservation Trust, New Delhi
https://egangotri.wordpress.com/

कविकुलबुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक

हस्तलिखित संग्रह

दाखल क्र. M2385(2) विषय भागवतकथा

नाव श्रीमद्भागवतार्णे दर्शित प्रथम स्कंध

लेखक/लिपीकार महर्षी व्यास

पृठ — काळ ..... पूर्ण/अपूर्ण

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ह्यांना नमस्कार करून जयास[1] ह्म० ग्रंथास प्रारंभ करावा. (सूत स्वतः त्यांस नमस्कार करून प्रारंभ करितात, व लोकांनींही तसेंच करावें असा उपदेश करितात.) ॥ ४ ॥ ऋषिहो, आपण मला फार चांगला प्रश्न केला; कारण, तो प्रश्न कृष्णचरित सांगण्याविषयीं असल्यामुळें लोकांचें कल्याण करणारा आहे: - कल्याण ह्मणजे हें कीं, - कृष्णचरित ऐकल्यापासून अंतःकरणाला समाधान वाटतें. ॥ ५ ॥ - आतां माझ्या मतानें उत्तम ठरलेला सिद्धांत सांगतों ऐका, - ज्या धर्माच्या योगानें श्रीकृष्णाचे ठिकाणीं निष्कपट (निष्काम) व निश्चल भक्ति उत्पन्न होईल तोच पुरुषांचा उत्तम धर्म होय. कारण, ती श्रीकृष्णभक्तिच अंतःकरण प्रसन्न होण्याचें साधन आहे. ॥ ६ ॥ - ऋषिहो, तुह्मांला कदाचित् असें वाटेल कीं, 'वेदांमध्यें धर्मापासून ज्ञान होतें ह्मणून सांगितलें आहे व मी तर धर्मापासून भक्ति झाली पाहिजे असें सांगतों, तेव्हां दोघांच्या सांगण्यामध्यें विरोध आला.' हे **मुनयः**, **भवद्भिः** (तुह्मीं) **अहं** (मीं) **साधु** (चांगल्या प्रकारें) **लोकमंगलं** (लोकांचें कल्याण करणारें असें) **पृष्टः** (विचारिलेला) **यत्** (ज्या अर्थी) **कृष्णसंप्रश्नः** (कृष्णचरिताविषयीं प्रश्न) **कृतः** (केला), **येन** (ज्यानें) **आत्मा** (अंतःकरण) **सुप्रसीदति** (समाधान पावतें).॥५॥ **यतः** (ज्याच्या योगानें) **अधोक्षजे** (ईश्वराच्या ठिकाणीं) **अहैतुकी** (निष्काम) **अप्रतिहता** (निर्विघ्न), **यया** (जिच्या योगानें) **आत्मा संप्रसीदति**, [**एतादृशी**] (अशी) **भक्तिः** [**भवति**] (होते), **सः** (तो) **वै** (च) **पुंसां परः** (श्रेष्ठ) **धर्मः**. ॥ ६ ॥ **भगवति** (भगवंताच्या) **वासुदेवे प्रयोजितः** (योजिलेला) **भक्तियोगः**

मुनयः साधु पृष्टो ऽहं भवद्भिर्लोकमंगलम् ॥ यत्कृतः कृष्णसंप्रश्नो येना ऽऽत्मा सुप्रसीदति ॥ ५ ॥ स वै पुंसां परो धर्मो यतो भक्तिरधोक्षजे ॥ अहैतुक्यप्रतिहता यया ऽऽत्मा संप्रसीदति ॥ ६ ॥ वासुदेवे भगवति भक्तियोगः प्रयोजितः ॥ जनयत्याशु वैराग्यं ज्ञानं यत्तदहैतुकम् ॥ ७ ॥ धर्मः स्वनुष्ठितः पुंसां विष्वक्सेनकथासु यः ॥ नोत्पादयेद्यदि रतिं श्रम एव हि केवलम् ॥८॥

आशु (लवकर) **वैराग्यं जनयति** (उत्पन्न करितो); **तत्, यत् अहैतुकं** (शुष्क तर्काना अगोचर) **ज्ञानं** [**तत् जनयाति**]. ॥ ७ ॥ **पुंसां यः धर्मः स्वनुष्ठितः** (चांगल्या रीतीनें आचरण केलेला) **विष्वक्सेनकथासु** (परमात्म्याच्या कथांविषयीं) **यदि** (जर) **रतिं** (प्रीति) **न उत्पादयेत्** (न उत्पन्न करील), [**सः**] **केवलं श्रमः एव.** ॥ ८ ॥

तर असें नाहीं. धर्मापासून ज्ञान होतें हें वेदांत सांगितलेलें खरेंच आहे पण तें एकदम होत नाहीं तर, परंपरेनें होतें. ह्मणजे - प्रथम त्या कृष्ण परमात्म्याचे ठिकाणीं भक्ति उद्भवते; तिच्यामुळें लवकरच वैराग्य होतें; आणि मग त्या वैराग्यापासून उपनिषदांत सांगितलेलें तत्त्वज्ञान होतें. - तें ज्ञान कोणतें ह्मणाल तर - त्याबद्दल नुसते तर्क करतां येत नाहींत. (एखादा पुरुष मोठा तर्ककुशल असला तरी त्याला त्याच्या तर्कशक्तीच्या साहाय्यानें त्या ज्ञानाचा अनुभव मिळणार नाहीं. भक्तिमार्गानें जेव्हां अंतःकरणांत वैराग्य उत्पन्न होईल तेव्हांच तें ज्ञान होतें. एतावता, वेदवाक्यांत व माझ्या सांगण्यांत विरोध नाहीं.) ॥ ७ ॥ आपण धर्माचरण ह्मणून एखादें कर्म केलें, पण त्यापासून जर परमा-

---

१ **जयत्यनेन संसारं इति जयः** । ज्याच्या वाचनानें पुरुष संसारास जिंकतो (त्यापासून सुटतो) तो ग्रंथ. २ मागील अध्यायांत ९ व्या श्लोकांत केलेल्या प्रश्नाचें उत्तर.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

त्म्याच्या कथांविषयीं प्रीति उत्पन्न झाली नाहीं, तर तें कर्म - धर्माचरण नव्हेच, तर - केवल श्रमच समजावें. ॥ ८ ॥ - ऋषिहो, कोणी कोणी असेंही ह्मणतात कीं, ' धर्माचें फल अर्थ, अर्थाचें फल काम, कामापासून इंद्रियांस संतोष, इंद्रियें संतुष्ट झालीं असतां पुन्हां धर्म, अशी परंपरा नेहमीं चालवयाची ' पण तसें तुह्मीं समजूं नये. कारण - मोक्ष-प्राप्ति हें ज्या धर्माचरणाचें मुख्य फल, त्याचें क्षुद्र अर्थप्राप्ति हेंच फल, असें ह्मणणें योग्य नाहीं. तसेंच अर्थाचा मुख्य उपयोग त्याच्या साहाय्यानें धर्म घडावा हाच; उपभोग्य वस्तु मिळाव्या हा नव्हे. ॥ ९ ॥ उपभोग्यवस्तुप्राप्तीचें फल केवळ जीवन (शरीरधारण) हेंच होय; इंद्रियें संतुष्ट व्हावीं हें नव्हे. जीवनाचा उपयोग तरी तत्त्वज्ञानाची इच्छा **आपवर्ग्यस्य** (ज्याचें पर्यवसान मोक्ष आहे अशा) **धर्मस्य अर्थाय** (फलाकरितां) **अर्थः** (धन) **न उपकल्पते** (योग्य होत नाहीं). **धर्मैकांतस्य** (धर्म हेंच ज्याचें मुख्य फल अशा) **अर्थस्य लाभाय कामः नहि स्मृतः** (सांगितला). ॥ ९ ॥ **यावता** (जितक्यानें) **जीवेत** (शरीर धारण होईल) [**तस्य**] **कामस्य लाभः इंद्रियप्रीतिः** (इंद्रियांना संतुष्ट करणें) **न** [**युज्यते**] (योग्य आहे), **जीवस्य तत्त्वजिज्ञासा** (तत्व जाणण्याची इच्छा) **अर्थः** (उपयोग) **इह** (लोकांमध्यें) **यः च कर्मभिः** (यज्ञादि कर्मांच्या योगानें) **सः न.** ॥ १० ॥ **यत् अद्वयं** (अपरोक्ष) **ज्ञानं**

धर्मस्य ह्यापवर्ग्यस्य नार्थो ऽर्थायोपकल्पते ॥ नार्थस्य धर्मैकांतस्य कामो लाभाय हि स्मृतः ॥ ९ ॥
कामस्य नेंद्रियप्रीतिर्लाभो जीवेत यावता ॥ जीवस्य तत्त्वजिज्ञासा नार्थो यश्चेह कर्मभिः ॥ १० ॥
वदन्ति तत्तत्त्वविदस्तत्त्वं यज्ज्ञानमद्वयम् ॥ ब्रह्मेति परमात्मेति भगवानिति शब्द्यते ॥ ११ ॥
तच्छ्रद्दधाना मुनयो ज्ञानवैराग्ययुक्तया ॥ पश्यन्त्यात्मनि चात्मानं भक्त्या श्रुतगृहीतया ॥ १२ ॥

तत्त्वविदः (तत्ववेत्ते) **तत् तत्त्वं वदन्ति** (ह्मणतात); **ब्रह्मा इति, परमात्मा इति, भगवान् इति** (असें) **शब्द्यते** (ह्मटलें जातें). ॥११॥ **तत् श्रद्दधानाः** (विश्वाससंपन्न) **मुनयः ज्ञानवैराग्ययुक्तया** (ज्ञान व वैराग्य यांनीं युक्त) **श्रुतगृहीतया** (ह्मणजे वेदांतादि श्रवणानें प्राप्त झालेल्या) **भक्त्या** (भक्तीनें) **आत्मनि** (अंतःकरणांत) **आत्मानं** (आत्मस्वरूपातें) **पश्यन्ति** (पाहतात) ॥ १२ ॥ हाच खरा. ' पुष्कळ यज्ञादि कर्मे करावीं व त्यापासून स्वर्ग मिळावा हाच काय तो जीवनाचा उपयोग ' हें ह्मणणें खरें नव्हे. ॥ १० ॥ - तत्त्व ह्मणजे काय तें ऐका. - तत्त्ववेत्ते पुरुष एका अपरोक्ष (प्रत्यक्ष) ज्ञानालाच तत्त्व ह्मणतात, आणि त्यालाच कोणी ब्रह्म, कोणी परमात्मा व कोणी भगवान् असें ह्मटलें आहे. ॥ ११ ॥ त्या तत्त्वस्वरूपाचें दर्शन दृढविश्वाससंपन्न मुनींना मात्र घडतें, आणि तेंही अंतःकरणांतच. - त्यांनाच कां दिसतें, सर्वांना कां दिसत नाहीं ? तर त्यांच्याजवळ एक मोठें साधन असतें : तें हें कीं, - ज्ञान, वैराग्य आणि पुष्कळ शास्त्रवाचन या साधनांनीं युक्त अशी भक्ति. ॥१२॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तेव्हां, हे ऋषिश्रेष्ठहो, पुरुषानें, वर्ण आणि आश्रम यांच्या विभागाप्रमाणें (जसें जसें ज्याज्या वर्णाला व आश्रमाला सांगितलें आहे तसें तसें) धर्माचरण केलें असतां, त्याचें उत्तम फल मिळणें ह्म० हरीचा संतोष होणें हेंच होय. ॥१३॥ ह्मणून, नित्य एकाग्र अंतःकरणानें त्या भक्तरक्षक प्रभूचे गुण श्रवण करावे; त्याचेंच कीर्तन करावें; त्याचेंच ध्यान करावें व पूजनही त्याचेंच करावें. ॥१४॥ कर्म केल्यापासून अंतःकरणांतील अहंकाररूपी ग्रंथि दृढ होतो. - तो तर मोठा घातक आहे. ह्मणून त्याचें मूळ(कर्म)च तोडून टाकिलें पाहिजे. कर्माचा नाश करण्यास साधन एक परमेश्वराचें ध्यानच आहे; दुसरें कांहीं नाहीं. - विद्वान् पुरुष, ईश्वराचें ध्यान ह्या खड्गाच्या साहाय्यानें, कर्माचा क्षय करितात. असें ज्या परमेश्वराचें माहात्म्य,

अतः (ह्मणून) **द्विजश्रेष्ठाः** (ऋषींमध्यें श्रेष्ठहो), **पुम्भिः** (पुरुषांनीं) **वर्णाश्रमविभागशः** (वर्ण आणि आश्रम यांच्या विभागाप्रमाणें) **स्वनुष्ठितस्य** (चांगल्या रीतीनें आचरण केलेल्या) **धर्मस्य संसिद्धिः** (उत्तम फल) **हरितोषणं** (ईश्वराचें आराधन). ॥ १३ ॥ **तस्मात्** (ह्मणून) **एकेन** (एकाग्र) **मनसा सात्वतां** (भक्तांचा) **पतिः** (रक्षक) **भगवान् नित्यदा** (नित्य) **श्रोतव्यः** (श्रवण करण्यास योग्य असा) **च कीर्तितव्यः** (कीर्त्तन करण्यास योग्य) **ध्येयः पूज्यः** (पूजन करण्यास योग्य) **च.** ॥ १४ ॥ **कोविदाः**(विद्वान् लोक) **यदनुध्यासिना** (ज्याच्या ध्यानरूपी खड्गानें) **युक्ताः** [संतः] (युक्त होत्साते) **ग्रंथिनिबन्धनं कर्म** (अहंकाराला उत्पन्न करणारें जें कर्म त्याला) **छिन्दन्ति** (तोडून टाकितात); **तस्य कथारतिं** (कथांच्या ठिकाणीं प्रीतीतें) **कः** (कोण) **न कुर्यात्** (करणार नाहीं).

अतः पुम्भिर्द्विजश्रेष्ठा वर्णाश्रमविभागशः ॥ स्वनुष्ठितस्य धर्मस्य संसिद्धिर्हरितोषणम् ॥ १३ ॥ तस्मादेकेन मनसा भगवान्सात्वता पतिः ॥ श्रोतव्यः कीर्तितव्यश्च ध्येयः पूज्यश्च नित्यदा ॥ १४ ॥ यदनुध्यासिना युक्ताः कर्म ग्रंथिनिबन्धनम् ॥ छिन्दन्ति कोविदास्तस्य को न कुर्यात्कथारतिम् ॥१५॥ शुश्रूषोः श्रद्दधानस्य वासुदेवकथारुचिः ॥ स्यान्महत्सेवया विप्राः पुण्यतीर्थनिषेवणात्॥१६॥ शृण्वतां स्वकथां कृष्णः पुण्यश्रवणकीर्तनः ॥ हृद्यन्तस्थो ह्यभद्राणि विधुनोति सुहृत्सताम् ॥ १७ ॥

॥ १५ ॥ **हे विप्राः** (ऋषिहो), **शुश्रूषोः** (सेवेंत तत्पर अशा पुरुषाची) **श्रद्दधानस्य वासुदेवकथारुचिः पुण्यतीर्थनिषेवणात्** (पुण्यकारक तीर्थाच्या सेवेनें) **महत्सेवया** (साधूंच्या सेवेनें) **स्यात्.** ॥ १६ ॥ **हि** (कारण), **पुण्यश्रवणकीर्तनः** (पुण्यदायक - कथांचें - श्रवण व कीर्तन आहे ज्याच्या, असा). **सतां** (साधूंचा) **सुहृत्** (हितकर्ता) **कृष्णः स्वकथां शृण्वतां** (ऐकणारांच्या) **हृदि** (अंतःकरणांत) **अन्तस्थः** (हृदयांत वास करणारा) [**सन्**] **अभद्राणि** (पापांना) **विधुनोति** (नाहींशीं करितो). ॥ १७ ॥

त्याच्या कथांवर कोणता पुरुष प्रीति करणार नाहीं बरें ? ॥ १५ ॥ ऋषिहो, प्रथम पुण्यतीर्थांची सेवा करावी; तीपासून साधूंची सेवा घडत जाईल; तिच्या योगानें सहजच धर्माविषयीं श्रद्धा उत्पन्न होईल; श्रद्धा उत्पन्न झाली ह्मणजे पुढें भगवत्कथा ऐकण्याची इच्छा होईल व इच्छा झाली असतां तीविषयीं रुचीही लागेल. - तो मार्ग स्वीकारल्यावर क्रमानें सर्व गोष्टी सिद्ध होतील. - ॥ १६ ॥ भगवंताचे गुण श्रवण केले व वर्णिले कीं पुण्य लागतें. नित्य कथा श्रवण करीत गेलें असतां, तो साधूंचा हितकर्ता

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

भगवान् श्रोत्यांच्या हृदयांत प्रकट होऊन अपायकारक कामादि वासनांचा नाश करितो. ॥ १७ ॥ अशा नित्य भगवद्भक्तांच्या सेवेनें अंतःकरणांतील कामादि वासनारूप पापें बहुतेक नष्ट झालीं असतां त्या पुण्यकीर्ति भगवंताचे ठिकाणीं अचल भक्ति उत्पन्न होते. ॥ १८ ॥ नंतर रजोगुण, तमोगुण आणि त्यांपासून उत्पन्न होणारे जे कामक्रोधादि विकार ह्यांच्यायोगें चित्तास कांहींएक विकृति न होतां तें सत्व गुणाचे ठिकाणीं स्थिर होत्सातें समाधान पावतें. ॥ १९ ॥ अशा रीतीनें भगवद्भक्तीच्या योगानें अंतःकरण प्रसन्न

नित्यं भागवतसेवया अभद्रेषु (कामादि वासनारूपी पापें) **नष्टप्रायेषु [सत्सु]** (बहुतेक नाहींशीं झालीं असतां) **उत्तमश्लोके** (पुण्यकारक कीर्ति आहे ज्याची, अशा) **भगवति नैष्ठिकी** (अचल) **भक्तिः भवति** (होते). ॥ १८ ॥ **तदा रजः, तमः, कामलोभादयः भावाः** (धर्म) **च एतैः** (ह्यांच्या योगानें) **अनाविद्धं** (विकृति न पावलेलें) **चेतः** (अंतःकरण) **सत्वे स्थितं** (स्थिर झालेलें) **प्रसीदति** (समाधान पावतें). ॥ १९ ॥ **एवं** (अशा रीतीनें) **प्रसन्नमनसः** (प्रसन्न झालें आहे मन ज्यानें, अशा पुरुषाला) **मुक्तसंगस्य** (सुटली आहे आसक्ति ज्याची, अशा पुरुषाला) **भगवद्भक्तियोगतः** (ईश्वराच्या भक्तीच्या योगानें) **भगवत्तत्त्वविज्ञानं** (भगवत्तत्त्वाचें ज्ञान) **जायते** (होतें). ॥ २० ॥ **आत्मनि** (अंतःकरणांत) **ईश्वरे दृष्टे** (ईश्वराचें साक्षाद्दर्शन झालें

नष्टप्रायेष्वभद्रेषु नित्यं भागवतसेवया ॥ भगवत्युत्तमश्लोके भक्तिर्भवति नैष्ठिकी ॥ १८ ॥ तदा रजस्तमो भावाः कामलोभादयश्च ये ॥ चेत एतैरनाविद्धं स्थितं सत्त्वे प्रसीदति ॥१९॥ एवं प्रसन्नमनसो भगवद्भक्तियोगतः ॥ भगवत्तत्त्वविज्ञानं मुक्तसङ्गस्य जायते ॥२०॥ भिद्यते हृदयग्रन्थिश्छिद्यन्ते सर्वसंशयाः ॥ क्षीयन्ते चास्य कर्माणि दृष्ट एवाऽऽत्मनीश्वरे ॥ २१ ॥ अतो वै कवयो नित्यं भक्तिं परमया मुदा ॥ वासुदेवे भगवति कुर्वन्त्यात्मप्रसादनीम् ॥ २२ ॥ सत्त्वं रजस्तम इति प्रकृतेर्गुणास्तैर्युक्तः परः पुरुष एक इहास्य धत्ते ॥ स्थित्यादये हरिविरिञ्चिहरेति संज्ञाः श्रेयांसि तत्र खलु सत्त्वतनोर्नृणां स्युः ॥ २३ ॥

असतां) **एव अस्य हृदयग्रंथिः** (अहंकाररूपी ग्रंथि) **भिद्यते** (उकलतो), **सर्वसंशयाः छिद्यंते** (तुटतात) **कर्माणि क्षीयंते** (क्षय पावतात). ॥ २१ ॥ **अतः** (ह्मणून), **कवयः** (विद्वान् लोक) **नित्यं परमया मुदा** (हर्षानें) **भगवति वासुदेवे आत्मप्रसादनीं भक्तिं** (अंतःकरण शुद्ध करणाऱ्या भक्तीतें) **कुर्वंति** (करितात) **वै.** ॥ २२ ॥ **सत्वं रजः तमः इति प्रकृतेः गुणाः [स्युः]; तैः युक्तः एकः परः पुरुषः इह अस्य** (जगाच्या) **स्थित्यादये** (पालनादि ह्म० पालन उत्पत्ति आणि संहार करण्याकरितां) **हरिविरिंचिहराः इति** (विष्णु ब्रह्मदेव आणि शंकर अशा) **संज्ञाः** (नांवांतें) **धत्ते** (धारण करतो) **तत्र** (त्या ह्म० तीन मूर्तीमध्यें) **नृणां** (पुरुषांचीं) **श्रेयांसि** (कल्याणें) **खलु** (निश्चयें करून) **सत्वतनोः** (सात्विक आहे मूर्ति ज्याची त्यापासून ह्म० कृष्णापासून) **स्युः.** ॥ २३ ॥

झाल्यावर त्या पुरुषाची सर्व ठिकाणची आसक्ति सुटते व मग त्याला भगवत्तत्त्वाचें ज्ञान होतें. ॥ २० ॥ स्वस्वरूपभूत ईश्वराचें साक्षाद्दर्शन झालें असतां त्या पुरुषाचा अहंकाररूपी ग्रंथि सुटतो, सर्व संशय नाहींसे होतात, व त्याच्या कर्मांचा क्षय होतो. ॥ २१ ॥ ह्मणून बुद्धिमान् पुरुष नेहमीं मोठ्या हर्षानें वासुदेव जो परमात्मा त्याची भक्ति करितात. त्या भक्तीच्या योगेंकरून अंतःकरण शुद्ध होतें. ॥ २२ ॥ सत्व, रज आणि तम हे प्रकृतीचे गुण आहेत. तो पुरुषोतम परमात्मा वस्तुतः एक असतां ह्या

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

जगाचें पालन, उत्पत्ति आणि संहार व्हावा ह्यासाठीं अनुक्रमें पूर्वोक्त तीन गुणांच्या योगानें, विष्णु, ब्रह्मदेव आणि शंकर अशा संज्ञा धारण करितो. - पण त्या तीनही मूर्तीमध्यें भगवान् कृष्ण - सात्विकमूर्ति होय; व त्यापासूनच पुरुषांना शुभफलें प्राप्त होतात. ॥ २३ ॥ ज्याप्रमाणें धूम, प्रकाशरहित काष्ठापेक्षां, वेदोक्त कर्मानुष्ठानाच्या प्रारंभास अधिक उपयोगी असल्यामुळें श्रेष्ठ होय. व अग्नि तर कर्मानुष्ठानाचें मुख्य साधन असतो, ह्मणून त्याची योग्यता धूमापेक्षांही अधिक असते - त्याप्रमाणें रजोगुण मायोपाधीच्या ज्ञानाचें साधन असल्यामुळें तमोगुणापेक्षां ब्रह्मज्ञानास अधिक उपयोगी आहे. व त्या दोहोंपेक्षांही सत्वगुण ब्रह्मसाक्षात्काराला अत्युपयोगी, अर्थात सर्वांत श्रेष्ठ होय. ह्या क्रमाप्रमाणें शंकर तमोगुणोपाधि, ब्रह्मा रजोगुणोपाधि व विष्णु सत्वगुणोपाधि असल्यामुळें ते उत्तरोत्तर (शंकरापेक्षां ब्रह्मदेव व ब्रह्मदेवापेक्षां विष्णु). श्रेष्ठ आहेत असें समजावें.

पार्थिवात् (जड अशा) **दारुणः** (लांकडापेक्षां) **धूमः, तस्मात्** (त्यापेक्षां) **त्रयीमयः** (तीनही ह्म० वेदोक्त कर्मांचा प्रवर्तक) **अग्निः, तमसः** (तमोगुणापेक्षां) **रजः तस्मात् यत् सत्वं [तत्] ब्रह्मदर्शनम्. ॥२४॥ अथ अग्रे** (पूर्वी) **मुनयः भगवंतं विशुद्धं सत्त्वं** (शुद्धसत्त्वमूर्ति अशा) **अधोक्षजं भेजिरे** (भक्ति करिते झाले). **इह** (या संसारांत) **ये तान् अनु** (त्यांचें अनुकरण करितात), **[ते] क्षेमाय** (कल्याणाला) **कल्पंते** (योग्य होतात). ॥ २५ ॥ **अथ मुमुक्षवः** (मोक्षाची इच्छा करणारे) **घोररूपान्** (भयंकर स्वरूपी अशांना) **भूतपतीन् हित्वा** (सोडून म्ह० त्याग करून) **अनसूयवः** (निंदा न करणारे असे) **[संतः] शांताः नारायणकलाः** (नारायणाच्या स्वरूपाला) **भजंति** (भजतात). ॥ २६ ॥ **श्रियैश्वर्यप्रजेप्सवः** (द्रव्य ऐश्वर्य व संतति यांची इच्छा करणारे) **समशीलाः** (समस्वभावांचे असे) **रजस्तमःप्रकृतयः** (रजोगुण व तमोगुण ज्यांच्या स्वभावांत - विशेष - आहेत असे) **पितृभूतप्रजेशादीन्** (पितर भूत प्रजापति इत्यादिकांस) **भजंति वै.** ॥ २७ ॥

पार्थिवाद्दारुणो धूमस्तस्मादग्निस्त्रयीमयः ॥ तमसस्तु रजस्तस्मात्सत्त्वं यद्ब्रह्मदर्शनम् ॥ २४ ॥
भेजिरे मुनयो ऽथाग्रे भगवन्तमधोक्षजम् ॥ सत्त्वं विशुद्धं क्षेमाय कल्पन्ते ये ऽनु तानिह ॥२५॥
मुमुक्षवो घोररूपान्हित्वा भूतपतीनथ ॥ नारायणकलाः शान्ता भजन्ति ह्यनसूयवः ॥ २६ ॥
रजस्तमःप्रकृतयः समशीला भजन्ति वै ॥ पितृभूतप्रजेशादीन् श्रियैश्वर्यप्रजेप्सवः ॥ २७ ॥

॥ २४ ॥ ईश्वराचें स्वरूप इंद्रियांना कळण्याजोगें नाहीं. पूर्वीचे मुनि षड्गुणैश्वर्यसंपन्न व शुद्धसत्त्वमूर्ति अशा परमेश्वरावर भक्ति ठेवीत असत. या संसारामध्यें, जे त्यांचें अनुकरण करतील (परमेश्वराचे ठिकाणीं भक्ति ठेवतील), त्यांचें कल्याण होईल. ॥२५॥ मुमुक्षु लोक, भयंकर स्वरूपें धरणारे जे भूतपति, पितर, पिशाच इत्यादि, त्यांचा त्याग करून शांत अशा नारायणाच्या स्वरूपांचेंच भजन करितात. तरी पण ते कधींही भूतादिकांची निंदा अथवा त्यांवर दोषारोप करीत नाहींत. ॥२६॥ - भूतपतींना भजणारे लोक कोणते, तेंही सांगतों ऐका :- ज्या लोकांच्या स्वभावामध्यें रजोगुणाचें अथवा तमोगुणाचें आधिक्य असतें, तेच पितर, भूत, आणि प्रजापति इत्यादिकांची आराधना करितात. - कारण,

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

त्या देवतांचा आणि भजणारांचा स्वभाव सारखा असतो; - दोघेही रजोगुणी किंवा तमोगुणी. तेव्हां समान स्वभावांच्या व्यक्तींचा प्रेमभाव होतो हें योग्यच आहे, - वरें त्या उपास-
कांना फलप्राप्तीची इच्छाही क्षुद्रच असते : ती ही कीं, - द्रव्य (पैका), ऐश्वर्य (हत्ती, घोडे वगैरे) व प्रजा एवढेंच काय तें त्यांपासून मागावयाचें. ॥ २७ ॥ सर्व
वेदांचा प्रतिपाद्य विषय वासुदेवच आहे. - ह्यावर कोणी शंका घेतील कीं, वेदांमध्यें ' यज्ञ करावे ' असें सांगितलें आहे, तेव्हां ते वेद विष्णुपर कसे? तर ह्या
आक्षेपाचें उत्तर सांगतों ऐका : - ते यज्ञ मुळीं त्या वासुदेवाच्या प्राप्तीकरितांच होत; - अर्थात वेद जरी यज्ञप्रतिपादक आहेत तरी वासुदेवपरच झाले. - सर्व योगशास्त्रेंही भगव-
त्परच आहेत. कारण, त्यांत सांगितलेल्या आसनप्राणायामादि क्रिया भगवत्प्राप्तीचें साधनच आहेत. ॥ २८ ॥ ज्ञानशास्त्रेंही वासुदेवप्रतिपादकच आहेत. कारण, त्या शास्त्रांत

वेदाः वासुदेवपराः (ईश्वराचें प्रतिपादन करणारे), मखाः (यज्ञ) वासुदेवपराः, योगाः वासुदेवपराः, क्रियाः (कर्मे) वासुदेवपराः [संति]. ॥ २८ ॥ ज्ञानं वासुदेवपरं, तपः (ज्ञान)
वासुदेवपरं, धर्मः (धर्मशास्त्र) वासुदेवपरः, गतिः (स्वर्गादि फलप्राप्ति) वासुदेवपरा [अस्ति]. ॥ २९ ॥ अगुणः (निर्गुण) विभुः (व्यापक) सः एव असौ भगवान् गुणमय्या (त्रिगु-
णरूपी अशा) सदसद्रूपया (कार्यकारणात्मक अशा) आत्ममायया अग्रे इदं (हें म्हणजे जग) ससर्ज (निर्माण करिता झाला). ॥ ३० ॥ विज्ञानेन विजृंभितः (युक्त होत्साता) [सः] तया

वासुदेवपरा वेदा वासुदेवपरा मखाः ॥ वासुदेवपरा योगा वासुदेवपराः क्रियाः ॥२८॥ वासुदेवपरं ज्ञानं वासुदेवपरं तपः ॥ वासुदेवपरो धर्मो वासुदेवपरा
गतिः ॥२९॥ स एवेदं ससर्जाग्रे भगवानात्ममायया ॥ सदसद्रूपया चासौ गुणमय्याऽगुणो विभुः ॥ ३० ॥ तया विलसितेष्वेषु गुणेषु गुणवानिव ॥
अन्तः प्रविष्ट आभाति विज्ञानेन विजृम्भितः ॥३१॥ यथा ह्यवहितो वह्निर्दारुष्वेव स्वयोनिषु ॥ नानेव भाति विश्वात्मा भूतेषु च तथा पुमान् ॥ ३२ ॥

विलसितेषु (उत्पन्न झालेल्या) एषु गुणेषु अंतः प्रविष्टः (आंत प्रवेश केलेला) गुणवान् इव (अभिमानी अशासारखा) आभाति (भासतो). ॥ ३१ ॥ यथा (जसा) एकः वन्हिः (अग्नि)
स्वयोनिषु (आपणांला प्रकट करणारीं अशा) दारुषु एव अवहितः (प्रविष्ट झालेला) नाना इव (अनेक प्रकारचा) भाति (भासतो); तथा (त्याप्रमाणें) विश्वात्मा पुमान् (पुरुष) भूतेषु
(प्राणिमात्रांच्या ठिकाणीं) [भाति]. ॥ ३२ ॥

प्राप्त करून घेण्यास सांगितलेलें ज्ञानही वासुदेवपरच आहे. धर्मशास्त्रें त्याच परमेश्वराचें प्रतिपादन करितात. कारण, त्या धर्मशास्त्रांनीं सांगितलेल्या कर्माची स्वर्गादि गति ब्रह्मा-
नंदाचा एक अंश होय. ॥ २९॥ - पूर्वोक्त सर्व वस्तु ईश्वररूप व ईश्वरपर आहेत, असें ह्मणण्यास कारण हें कीं, - हा षड्गुणैश्वर्यसंपन्न परमेश्वर स्वतः निर्गुण आहे, पण ह्यानेंच
कार्यकारणात्मक अशा आपल्या त्रिगुणरूप मायेच्या योगानें प्रथम हें जग निर्माण केलें. ॥३०॥ तो त्या मायेच्या योगानें उत्पन्न झालेल्या ह्या पदार्थांचे ठिकाणीं प्रविष्ट झाला आहे
व स्वतः अपरोक्षज्ञानरूपी असतांही, ' हे पदार्थ माझ्या अधीन आहेत ' असा अभिमानी असावा असा भासतो, पण वस्तुतः निरभिमान आहे. ॥ ३१ ॥ जसा अग्नि स्वतः
सर्वत्र एकरूपच असूनही, त्याला प्रकट करणारीं जीं काष्ठादिक साधनें, त्यांचे ठिकाणीं प्रविष्ट झाला असतां, त्यांचेप्रमाणेंच भासूं लागतो. ह्म० तें काष्ठ लांबट असलें तर अग्निही

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

लांब दिसतो, काष्ठ वर्तुल असलें तर अग्निही वर्तुल दिसतो, तसा विश्वरूपी परमेश्वर भूतांचे ठिकाणीं प्रविष्ट झाला असतां नानाप्रकारचाच भासतो. ॥३२॥ सूक्ष्म भूतें, इंद्रियें आणि मन हीं त्रिगुणांचीं कार्यें आहेत. परमेश्वर त्यांच्या योगानें स्वतःच हीं भूतें निर्माण करितो व त्यांमध्यें प्रवेश करून त्या भूतांच्या गुणांचा उपभोग घेतो. ॥ ३३ ॥ तोच जगत्कर्ता परमेश्वर, देवांमध्यें - इंद्र, ब्रह्मा, शंकर इत्यादि, - तिर्यग्जातींमध्यें - मत्स्य, कच्छ, वराहादि - व मनुष्यांमध्यें - रामकृष्णादि - अवतार घेतो, व सत्व गुणाच्या योगानें

असौ (हा) **भूतसूक्ष्मेन्द्रियात्मभिः** (सूक्ष्मभूतें इंद्रियें आणि मन यांहीं करून) **गुणमयैः भावैः** (त्रिगुणांच्या कार्यांनीं) **स्वनिर्मितेषु** (स्वतःच निर्माण केलेल्या) **भूतेषु** (भूतांमध्यें) **निर्विष्टः** (प्रवेश केलेला) **तद्गुणान्** (त्यांच्या ह्म० भूतांच्या गुणांस) **भुंक्ते** (भोगितो). ॥ ३३ ॥ **देवतिर्यङ्नरादिषु** (देव, पशुपक्षी व मनुष्यें इत्यादिकांमध्यें) **लीलावतारानुरतः** (लीलेनें घेतलेल्या अवतारांचे ठिकाणीं अनुरक्त असा) **लोकभावनः** (जगत्कर्त्ता) **एषः** (हा) **सत्त्वेन** (सत्वगुणानें) **लोकान्** (लोकांना) **भावयति** (पालन करितो) **वै.** ॥ ३४ ॥ **आदौ** (प्रथम) **भगवान्*** **लोकसिसृक्षया** (लोक

असौ गुणमयैर्भावैर्भूतसूक्ष्मेंद्रियात्मभिः ॥ स्वनिर्मितेषु निर्विष्टो भुंक्ते भूतेषु तद्गुणान् ॥ ३३ ॥ भावयत्येष सत्त्वेन लोकान्वै
लोकभावनः ॥ लीलावतारानुरतो देवतिर्यङ्नरादिषु ॥ ३४ ॥ इति श्रीभा० महा० प्रथमस्कंधे द्वितीयो ऽध्यायः ॥ २ ॥
सूत उवाच । जगृहे पौरुषं रूपं भगवान्महदादिभिः ॥ संभूतं षोडशकलमादौ लोकसिसृक्षया ॥ १ ॥

ह्म० चतुर्दशभुवनें उत्पन्न करण्याच्या इच्छेनें) **महदादिभिः** (महत्तत्त्वादिकें करून म्हणजे महत्तत्त्व, अहंकार व सूक्ष्मभूतें यांचे योगानें) **संभूतं** (उत्पन्नझालेल्या) **षोडशकलं** (सोळा अंशांनीं युक्त अशा) **पौरुषं रूपं** (पुरुषस्वरूपाला) **जगृहे** (धारण करिता झाला).॥ १ ॥

लोकांचें रक्षण करितो. ॥ ३४ ॥

इति श्रीमद्भागवतार्थदर्शने प्रथमस्कंधे द्वितीयो ऽध्यायः ॥ २ ॥

प्रथम त्या भगवंतानें चतुर्दशभुवनात्मक लोक उत्पन्न करावे ह्या इच्छेनें महत्तत्व, अहंकार आणि पांच सूक्ष्मभूतें ह्याच्या योगानें उत्पन्न झालेलें, सोळा अंशांनीं युक्त, असें पुरुष-

---

* उत्पातिं प्रलयं चैव भूतानामागतिं गतिम् ॥ वेत्ति विद्यामविद्यांच स वाच्यो भगवानिति ॥

अर्थ :– स्थावरजंगमात्मक सर्व जगाची उत्पत्ति व प्रलय कसे होतात, जग आलें कोठून, जाणार कोठें, ज्ञान व अविद्या ह्यांचीं स्वरूपें कशीं आहेत, हें ज्याला समजतें त्यालाच भगवान् असें ह्मणावें. किंवा भगवान् ह्मणजे षड्गुणैश्वर्यसंपन्न. कारण, ऐश्वर्यस्य समग्रस्य धर्मस्य [वीर्यस्य] यशसः श्रियः ॥ ज्ञानवैराग्ययोश्चैव षण्णां भगमितीरणा ॥

अर्थः— सर्व प्रकारचें ऐश्वर्य, धर्म अथवा वीर्य, कीर्ति, द्रव्य, ज्ञान, वैराग्य, ह्या सहांना ' भग ' असें ह्मणतात. तीं ज्यास आहेत तो भगवान्.

१ अतल, वितल, सुतल, तलातल, रसातल, महातल, पातल, भूः, भुवः, स्वः, महः, जनः, तपः, सत्यं. हीं चवदा भुवनें. २ पांच ज्ञानेंद्रियें (श्रोत्र, त्वक्, चक्षुः, जिव्हा, घ्राण); पांच कर्मेंद्रियें (वाक् पाणि, पाद, पायु, उपस्थ); मन; पंचमहाभूतें (पृथ्वी, उदक, तेज, वायु, आकाश) ह्या सोळा कला.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

स्वरूप धारण केलें. (हा पहिला अवतार.) ॥ १ ॥ हा पुरुषावतार धारण करण्यापूर्वी तो परमेश्वर, पूर्व कल्पांतील सृष्टीचा लय झाल्यावर सर्वत्र एकच प्रलयसमुद्र झाला असतां, त्या उदकामध्यें विश्रांतीसाठीं योगनिद्रा घेत होता. व त्या वेळीं त्याच्या नाभिकमलापासून, सर्व प्रजापतींमध्यें श्रेष्ठ जो ब्रह्मदेव, तो उत्पन्न झाला. ॥ २ ॥ त्या भगवत्स्वरूपाच्या अवयवरचनेवर ह्या सर्व चतुर्दशभुवनात्मक लोकाचा विस्तार कल्पिला आहे. तें परमेश्वराचें अतिशुद्धसत्वात्मक स्वरूप होय. ॥ ३ ॥ तें स्वरूप योगी पुरुषांना त्यांच्या विशाल ज्ञानदृष्टीच्या साहाय्यानें दिसतें. त्या स्वरूपाचा आकार असा आहे कीं, त्याला हजारों चरण, मांड्या, बाहु, आणि मुखें असल्यामुळें तें

अंभसि (उदकामध्यें) **शयानस्य** (विश्रांति घेणाऱ्या) **योगनिद्रां** (समाधिरूप निद्रेला) **वितन्वतः** (घेणाऱ्या) **यस्य** (ज्याच्या) **नाभिह्रदांबुजात्** (नाभिरूपी डोहांतील कमलापासून) **विश्वसृजां पतिः** (प्रजापतींमध्यें श्रेष्ठ असा) **ब्रह्मा आसीत्** (होता झाला). ॥ २ ॥ **यस्य अवयवसंस्थानैः** (अवयवांच्या रचनेवरून) **लोकविस्तरः** (चौदा भुवनात्मक लोकांचा विस्तार) **कल्पितः, तत् वै विशुद्धं ऊर्जितं** (अतिशय) **सत्वं** (सत्वगुणात्मक) **भगवतः रूपम्.** ॥ ३ ॥ **अदः** (तें) **सहस्रपादोरुभुजाननाद्भुतं** (हजारों चरण, मांड्या, बाहु आणि मुखें यांनीं अलौकिक दिसणाऱ्या) **सहस्रमूर्धश्रवणाक्षिनासिकं** (हजारों मस्तकें, कान, डोळे व नासिका आहेत ज्याला अशा) **सहस्रमौल्यंबरकुंडलोल्लसत्** (हजारों किरीट, वस्त्रें व कुंडलें यांनीं तेजस्वी दिसणाऱ्या

यस्यांभसि शयानस्य योगनिद्रां वितन्वतः ॥ नाभिह्रदाम्बुजादासीद्ब्रह्मा विश्वसृजां पतिः ॥ २ ॥ यस्यावयवसंस्थानैः कल्पितो
लोकविस्तरः ॥ तद्वै भगवतो रूपं विशुद्धं सत्त्वमूर्जितम् ॥ ३ ॥ पश्यन्त्यदो रूपमदभ्रचक्षुषा । सहस्रपादोरुभुजाननाद्भुतम् ॥
सहस्रमूर्धश्रवणाक्षिनासिकम् । सहस्रमौल्यम्बरकुण्डलोल्लसत् ॥ ४ ॥ एतन्नानावतारााणां निधानं बीजमव्ययम् ॥ यस्यांशांशेन
सृज्यन्ते देवतिर्यङ्नरादयः ॥ ५ ॥ स एव प्रथमं देवः कौमारं सर्गमास्थितः ॥ चचार दुश्चरं ब्रह्मा ब्रह्मचर्यमखण्डितम् ॥ ६ ॥

रूपं अदभ्रचक्षुषा (विशाल ज्ञानदृष्टीनें) **पश्यंति** (पाहतात). ॥ ४ ॥ **एतत् नानावतारााणां निधानं** (लय होण्याचें स्थान) **बीजं,** (उद्भवस्थान) **अव्ययं** (विकाराला न पावणारें) [अस्ति]; **यस्य अंशांशेन** (अंशाच्या अंशानें) **देवतिर्यङ्नरादयः सृज्यंते** (उत्पन्न केले जातात). ॥ ५ ॥ **सः एव देवः प्रथमं कौमारं सर्गं आस्थितः** (कौमारनामक सृष्टीचा आश्रय केलेला असा) **ब्रह्मा** (ब्राह्मण) [**सन्**] **अखंडितं** (कडकडीत) **दुश्चरं** (आचरण करण्यास कठीण अशा) **ब्रह्मचर्यं चचार** (आचरण करिता झाला). ॥ ६ ॥

फार अलौकिक भासतें; तसेंच, त्या स्वरूपाला हजारों मस्तकें, कर्ण, डोळे व नासिका आहेत; आणि त्यावर हजारों किरीट, कुंडलें व वस्त्रें असल्यामुळें तें अतिशय तेजस्वी दिसतें. (हें विराट्स्वरूप होय.) ॥ ४ ॥ - परमेश्वराचे अवतार पुष्कळ झाले, पण हें सांगितलेलें पौरुषरूप त्या अवतारांप्रमाणें कांहीं दिवस राहून पुनः अंतर्धान पावणारें नव्हे. तर - इतर अनेक अवतार ह्या स्वरूपामध्यें अंतर्धान पावतात व ह्यापासूनच उत्पन्नही होतात. इतकें असूनही हें स्वरूप अव्यय आहे ह्मणजे ह्यांत फेरफार कांहींएक होत नाहीं. याच स्वरूपाच्या अंशाच्या अंशापासून देव, पशुपक्षी, व मनुष्यें इत्यादिकांची उत्पत्ति होते. ॥ ५ ॥ त्याच परमेश्वरानें पुढें कौमारनामक सृष्टीमध्यें सनत्कुमाररूपी ब्राह्मण होऊन

१ लौकिकनिद्रा नव्हे, ह्या निद्रेंत स्वस्वरूपाशीं कोणत्याहीप्रकारें वियोग नसतो म्ह० समाधि.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

कडकडीत नैष्ठिक[1] ब्रह्मचर्यव्रत आचरण केलें. ॥ ६ ॥ यज्ञपतिरूपी त्या परमेश्वरानें, ह्या जगाच्या उत्पत्तीसाठीं रसातलांत गेलेल्या पृथ्वीस वर आणण्याकरितां, दुसरें एक वराहरूप धारण केलें. ॥ ७ ॥ आणखी त्या परमेश्वरानें आर्ष[2] नामक सृष्टीमध्यें तिसरें एक नारदरूप धारण करून (पंचरात्रागमनामक) वैष्णवतंत्र मार्ग सांगितला. त्या तंत्रांत सांगितलेलीं कर्मेंच मोक्षप्राप्तीस कारण होतात. ॥ ८ ॥ परमेश्वरानें त्याच आर्षसृष्टीमध्यें धर्मऋषीची पत्नी जी कला तिच्या संततींत चवथा एक नरनारायण-

यज्ञेशः (यज्ञपति) **यस्य** (ह्याच्या ह्म० जगाच्या) **भवाय** (उत्पत्तीकरितां) **रसातलगतां** (रसातलाला गेलेल्या) **महीं** (पृथ्वीला) **उद्धरिष्यन्** (वर काढणारा) **द्वितीयं** (दुसऱ्या) **तु सौकरं वपुः** (वराहरूपातें) **उपादत्त** (धारण करिता झाला) ॥ ७ ॥ **च सः तृतीयं** (तिसरें) **ऋषिसर्गे देवर्षित्वं** (ऋषिसृष्टींतील नारदरूपातें) **उपेत्य** (धारण करून) **सात्वतं तंत्रं** (वैष्णव तंत्रातें ह्म० पंचरात्रागमाला) **आचष्ट** (सांगता झाला); **यतः कर्मणां** (कर्मांचा) **नैष्कर्म्यम्** (मोक्ष). ॥८॥ **तुर्ये** (चवथ्यांत ह्म० अवतारांत) **धर्मकलासर्गे** (धर्म ऋषीची पत्नी जी कला तिच्या संततींत) **नर-नारायणौ ऋषी भूत्वा** (होऊन) **आत्मोपशमोपेतं** (अंतःकरणाच्या शांतीनें युक्त अशा) **दुश्चरं** (दुर्घट) **तपः अकरोत्** (करिता झाला). ॥ ९ ॥ **पंचमः** (पांचवा) **कपिलः नाम सिद्धेशः**

द्वितीयं तु भवायास्य रसातलगतां महीम् ॥ उद्धरिष्यन्नुपादत्त यज्ञेशः सौकरं वपुः ॥ ७ ॥ तृतीयमृषिसर्गे च देवर्षित्वमुपेत्य सः ॥ तंत्रं सात्त्वतमाचष्ट नैष्कर्म्यं कर्मणां यतः ॥ ८ ॥ तुर्ये धर्मकलासर्गे नरनारायणावृषी ॥ भूत्वा ऽऽत्मोपशमोपेतमकरोद्दुश्चरं तपः ॥ ९ ॥ पंचमः कपिलो नाम सिद्धेशः कालविप्लुतम् ॥ प्रोवाचाऽऽसुरये सांख्यं तत्वग्रामविनिर्णयम् ॥ १० ॥ षष्ठमत्रेरपत्यत्वं वृतः प्राप्तो ऽनसूयया ॥ आन्वीक्षिकीमलर्काय प्रऱ्हादादिभ्य ऊचिवान् ॥ ११ ॥

(सिद्ध पुरुषांत श्रेष्ठ असा) **आसुरये** (आसुरि नांवाच्या ब्राह्मणास) **कालविप्लुतं** (कालगतीनें नष्ट झालेलें अशा) **सांख्यं** (सांख्य शास्त्राप्रत) **तत्त्वग्रामविनिर्णयं** (तत्वांच्या समुदायाचा निर्णय सांगणारें अशा) **प्रोवाच** (सांगता झाला). ॥ १० ॥ **षष्ठं** (सहाव्या) **अनसूयया** (अनुसूयेनें) **वृतः** (प्रार्थिलेला) **अत्रेः** (अत्रिऋषीच्या) **अपत्यत्वं** (पुत्रत्वाप्रत) **प्राप्तः** (प्राप्त झालेला) **[सन्] अलर्काय** (अलर्कऋषीला) **प्रऱ्हादादिभ्यः** (प्रऱ्हादादिकांना) **आन्वीक्षिकीं** (आत्मविद्येतें) **ऊचिवान्** (सांगता झाला). ॥ ११ ॥

नामक अवतार धारण केला, व अंतःकरण शांत ठेवून अशी तपश्चर्या केली कीं, तशी दुसऱ्या कोणाला करतांच येऊं नये. ॥ ९ ॥ तत्त्वसमुदायाचा निर्णय सांगणारें सांख्यशास्त्र कालगतीनें नष्ट झालें होतें. त्याच्या उज्जीवनार्थ परमेश्वरानें महासिद्ध कपिल नामक पांचवा अवतार घेतला, व सांख्य शास्त्राचा आसुरि नामक ब्राह्मणाला उपदेश केला. ॥ १० ॥ त्या देवानें सहाव्या अवतारांत अनसूयेच्या[3] प्रार्थनेवरून अत्रीचा दत्तात्रेयनामक पुत्र होऊन, अलर्काला, तसेंच प्रऱ्हाद, हैहय, यदु, इत्यादिकांना आत्म-

---

१ ज्या ब्रह्मचाऱ्यास गृहस्थाश्रम करावयाचा नसतो, त्यास ' नैष्ठिकब्रह्मचारी ' ह्मणतात. २ ऋषींची सृष्टि. ज्या सृष्टींत नारदादि ऋषि उत्पन्न झाले ती. अलीकडे मराठी भाषेंत ' आर्ष ' शब्दाचा अर्थ विचारशून्य ' असा झाला आहे, पण तो अर्थ येथें समजूं नये. ३ अनुसूयेनें असा वर मागितला होता कीं, देवा, तुझ्यासारखा मला पुत्र पाहिजे. तेव्हां, परमेश्वरासारखा दुसरा कोणीच नाहीं, ह्मणून त्यालाच अवतार घेणें भाग पडलें.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ज्ञानाचा उपदेश केला. ॥ ११ ॥ भगवंताचा सातवा अवतार यज्ञ नांवाचा होय. तो (अवतार) रुचिनामक ऋषीची भार्या जी आकूति तिच्या उदरीं झाला. त्या यज्ञानेंच स्वतः इंद्र होऊन, याम नामक देवगणांसह, स्वायंभुव मन्वंतराचें पालन केलें. ॥ १२ ॥ तो परमेश्वर, आठव्या (ऋषभ) अवतारांत, विवेकी पुरुषांस परमहंसमार्ग दाखविण्याच्या उद्देशानें नाभिराजापासून त्याच्या मेरुदेवी नामक पत्नीच्या उदरीं अवतीर्ण झाला. त्यानें दाखविलेला परमहंसमार्ग सर्व आश्रमांस मान्य आहे. ॥ १३ ॥ ऋषींच्या

ततः (नंतर) **सप्तमे** (सातव्या अवतारांत) **रुचेः** (रुचिनामक ऋषीच्या) **आकूत्यां** (आकूतिनामक भार्येच्या ठिकाणीं) **यज्ञः अभ्यजायत** (झाला); **सः यामाद्यैः सुरगणैः** (याम आदिकरून देवगणांसहवर्तमान) **स्वायंभुवांतरं** (स्वायंभुव मन्वन्तरातें) **अपात्** (पालन करिता झाला). ॥ १२ ॥ **अष्टमे** (आठव्या म्ह० ऋषभ अवतारांत) **धीराणां** (विवेकी पुरुषांस) **सर्वाश्रमनमस्कृतं** (सर्व आश्रमांनीं वंद्य अशा) **वर्त्म** (मार्गातें) **दर्शयन्** (दाखविणारा) **उरुक्रमः** (पुष्कळ लोक ज्याच्या प्राप्तीकरितां यत्न करितात, असा) **नाभेः** (नाभिराजापासून) **मेरुदेव्यां** (मेरुदेवीनामक पत्नीच्या उदरीं) **जातः** (झालेला) ॥ १३ ॥ **हे विप्राः, ऋषिभिः** (ऋषींनीं) **याचितः** (प्रार्थिलेला) **[सन्] नवमं** (नव्वा) **पार्थिवं वपुः** (पृथूच्या शरीराला ह्म० पृथुअवतार) **भेजे** (धारण करिता झाला);

ततः सप्तम आकूत्यां रुचेर्यज्ञो ऽभ्यजायत ॥ स यामाद्यैः सुरगणैरपात्स्वायंभुवांतरम् ॥ १२ ॥
अष्टमे मेरुदेव्यां तु नाभेर्जात उरुक्रमः ॥ दर्शयन्वर्त्म धीराणां सर्वाश्रमनमस्कृतम् ॥ १३ ॥
ऋषिभिर्याचितो भेजे नवमं पार्थिवं वपुः ॥ दुग्धेमामोषधीर्विप्रास्तेनायं स उशत्तमः ॥ १४ ॥
रूपं स जगृहे मात्स्यं चाक्षुषोदधिसंप्लवे ॥ नाव्यारोप्य महीमय्यामपाद्वैवस्वतं मनुम् ॥ १५ ॥

इमां (हिला ह्म० ह्या पृथ्वीपासून) **औषधीः दुग्ध [अदुग्ध]** (मिळविता झाला); **तेन** (यामुळें) **सः अयं उशत्तमः** (अतिशय प्रिय असा).॥१४॥**सः चाक्षुषोदधिसंप्लवे** (चाक्षुषनामक मन्वंतरांत, सर्व समुद्र एकेठिकाणीं मिळाले असतां) **मात्स्यं** (मत्स्याच्या, अशा) **रूपं** (रूपाप्रत ह्म० अवतार) **जगृहे** (धरिता झाला); **महीमय्यां** (पृथ्वीरूप अशा) **नावि** (नौकेंत) **वैवस्वतं मनुं** (मनूला) **आरोप्य** (बसवून) **अपात्** (रक्षण करिता झाला). ॥ १५॥

प्रार्थनेवरून भगवंतांनीं नववा पृथुराजाचा अवतार धारण करून पृथ्वीपासून नानाप्रकारच्या ओषधि व अन्नें मिळविलीं. व ह्याच कारणावरून हा पृथु अवतार उत्तम ह्मणून प्रसिद्ध आहे. ॥ १४ ॥ दहाव्या अवतारीं चाक्षुषनामक मन्वंतरामध्यें सर्व समुद्र एके ठिकाणीं मिळून सर्वत्र उदकमय झालें असतां (सत्यव्रताला माया दाखविण्यासाठीं केलेल्या

१ वेनराजाचे पाठीमागें राज्यास कोणी अधिकारी नव्हता. तेव्हां पृथ्वीवर दुष्ट लोकांपासून उपद्रव होताल, ह्या भीतीनें ऋषींनी ईश्वराची प्रार्थना केली कीं, आह्मांला कोणी तरी राजा दे.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

प्रलयांत), परमेश्वरानें मत्स्यावतार धारण केला व वैवस्वतमनूला पृथ्वीरूप नौकेंत बसवून त्याचें रक्षण केलें. ॥ १५ ॥ पूर्वी देव व दैत्य मंदरपर्वताचा मंथा (रवी) करून (अमृत-
प्राप्तिकरितां) समुद्रमंथन करीत असतां, तो पर्वत खालीं न जावा एवढ्यासाठीं ईश्वरानें स्वतः कांसवाचें स्वरूप धारण करून त्या पर्वताला पाठीवर धरिलें. हा एक अकरावा
अवतारप्रसंग होय. ॥ १६ ॥ पुढें बारावा धन्वंतरि नामक अवतार झाला. देवानें तेरावा एक मोहिनी नामक अवतार घेऊन दैत्यांना मोहित करून देवांना अमृत पाजिलें. ॥ १७ ॥
ईश्वरानें चवदावा नारसिंह अवतार धारण केला, व जसा एखादा बुरूड लव्हाळा चिरतो तशा रीतीनें आपल्या नखांनीं हिरण्यकशिपूच्या वक्षःस्थळाचें विदारण केलें. कारण, तो

एकादशे (अकराव्यांत) **सुरासुराणां** (देवदैत्य) **उदधिं** (समुद्राप्रत) **मथ्नतां** (मंथन करणारे अशा) **[सतां]** (असणारे) **विभुः** (परमेश्वर) **कमठरूपेण** (कांसवाचे रूपानें) **मन्दराचलं** (मंदर
पर्वताला) **पृष्ठे** (पाठीवर) **दध्रे** (धरिता झाला). ॥ १६ ॥ **द्वादशमं** (बारावे) **धान्वंतरं** (धन्वतरिनामक) **च त्रयोदशमं** (तेरावे) **मोहिन्या स्त्रिया** (मोहिनीनामक स्त्रीकडून) **अन्यान्** (दुस-
ऱ्यांना ह्मणजे दैत्यांना) **मोहयन्** (मोहित करणारा) **सुरान्** (देवांना) **[अमृतं] अपाययत्** (पाजिता झाला). ॥ १७ ॥ **चतुर्दशं** (चवदाव्या) **नारसिंहं बिभ्रत्** (धारण करणारा) **यथा** (जसा)
कटकृत् (बुरूड) **एरकां** (लव्हाळ्याला), **[तथा]** (तसा) **ऊर्जितं** (उन्मत्त अशा) **दैत्येंद्रं** (दैत्यश्रेष्ठाला ह्मणजे हिरण्यकशिपूला) **करजैः** (नखांनीं) **वक्षसि** (वक्षस्थळीं) **ददार** (फाडिता झाला).

सुरासुराणामुदधिं मथ्नतां मंदराचलम् ॥ दध्रे कमठरूपेण पृष्ठ एकादशे विभुः ॥ १६ ॥ धान्वंतरं द्वादशमं त्रयोदशममेवच ॥
अपाययत्सुरानन्यान्मोहिन्या मोहयन् स्त्रिया ॥ १७ ॥ चतुर्दशं नारसिंहं बिभ्रद्दैत्येंद्रमूर्जितम् ॥ ददार करजैर्वक्षस्येरकां कटकृद्यथा
॥ १८ ॥ पंचदशं वामनकं कृत्वा ऽगादध्वरं बलेः ॥ पदत्रयं याचमानः प्रत्यादित्सुस्त्रिविष्टपम् ॥ १९ ॥ अवतारे षोडशमे
पश्यन्ब्रह्मद्रुहो नृपान् ॥ निःसप्तकृत्वः कुपितो निःक्षत्रामकरोन्महीम् ॥ २० ॥

॥ १८ ॥ **पादत्रयं** (तीन पावलांना) **याचमानः** (मागणारा) **त्रिविष्टपं** (त्रैलोक्याला) **प्रत्यादित्सुः** (हिरावून घेऊं इच्छिणारा) **पंचदशं** (पंधराव्या) **वामनकं** (वामननांवाच्या ह्म० लहानश)
कृत्वा (करून) **बलेः अध्वरं** (यज्ञाला) **अगात्** (गेला). ॥ १९ ॥ **षोडशमे** (सोळाव्या) **अवतारे ब्रह्मद्रुहः** (ब्राह्मणांचा द्वेष करणाऱ्या) **नृपान्** (राजांना) **पश्यन्** (पाहणारा) **कुपितः**
(रागावलेला) **महीं** (पृथ्वीला) **त्रिःसप्तकृत्वः** (तीन गुणिजे सात ह्मणजे एकवीस वेळां) **निःक्षत्रां** (क्षत्रियरहित अशीतें) **अकरोत्** (करिता झाला). ॥ २० ॥

दैत्य फार उन्मत्त झाला होता. ॥ १८ ॥ पंधरावा अवतार वामन. बलि नांवाचा एक दैत्य त्रैलोक्याधिपति झाला होता. त्यापाशीं तीन पावलें भूमि मागावी व त्यापासून त्रैलोक्य
हिरावून घ्यावें, अशा बुद्धीनें परमेश्वर हें लहानसें स्वरूप धारण करून त्या बलिराजाच्या यज्ञास गेला; - व त्यानें तो कार्यभाग उरकला. - ॥ १९ ॥ (पुढें कांहीं दिवसांनीं)
पृथ्वीवर राजे ब्राह्मणांचा द्वेष करूं लागले असें पाहून ईश्वरानें परशुराम नामक सोळावा अवतार धारण केला, व क्रुद्ध होऊन एकवीसवेळां पृथ्वी निःक्षत्रिय केली. ॥ २० ॥

---

१ ज्या वेळेस प्रलय झाला त्या वेळेस नौकेंत बसलेल्या मनुष्याकडे वैवस्वत मनूचा अधिकार नव्हता, तर तो केवल सत्यव्रतनांवाचा राजा होता, पण पुढें तोच वैवस्वत मनु झाला हें सुचविण्याकरितां त्याला वैवस्वत-
मनु असें ह्मटलें. २ ईश्वरानें समुद्र मंथनप्रसंगीं धन्वंतरी नामक अवतार घेऊन समुद्रांतून अमृत वर आणिलें.


CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

नंतर सतरावे प्रसंगीं ईश्वरानें पराशर ऋषीपासून सत्यवतीचे उदरीं व्यासनामक अवतार धारण केला, व पृथ्वीवर लोक अल्पबुद्धि आहेत, त्यांना सर्व वेद शिकतां येणार नाहींत असें पाहून वेदरूपी वृक्षाच्या लहान लहान शाखा केल्या. ॥ २१ ॥ आणखी अठरावे वेळीं ईश्वरानें देवाचें कार्य (रावणास मारून ज्याचे त्याचे अधिकार ज्याला त्याला देणें) करण्याकरितां मनुष्यरूप (रामचंद्रावतार) धारण करून समुद्रावर सेतु बांधिला, व असेच दुसरेही पराक्रम केले. ॥ २२ ॥ भगवंताचा एकोणिसावा व विसावा असे दोन अवतार यादवकुलांत झाले : एक (पूर्णपरब्रह्म) श्रीकृष्ण व दुसरा बलराम. त्यानें या दोन अवतारांत पुष्कळ दुष्टांचा संहार करून पृथ्वीचा भार कमी केला. ॥ २३ ॥ पुढें कलियुगांत देवांचा द्वेष करणाऱ्या लोकांचा नाश करण्याकरितां कीकट (गयाप्रांत) नामक देशामध्यें जैनकुलांत बुद्ध नांवाचा अवतार होईल. ॥ २४ ॥ पुढें कलियुगाचे समाप्तिकाळीं राजे बहुधा चोरांप्रमाणें (प्रजेचा छल करून तिजपासून द्रव्य काढणारे) झाले असतां, जगाचें रक्षण करणारा ईश्वर स्वतः विष्णुयशानांवाच्या ब्राह्मणाचे

ततः सप्तदशे (सतराव्यांत) **सत्यवत्यां** (सत्यवतीचे ठिकाणीं ह्म० उदरीं) **पराशरात्** (पराशर ऋषींपासून) **जातः** (झालेला) **[सन्] पुंसः** (लोकांना) **अल्पमेधसः** (ज्यांना बुद्धि थोडी, अशांतें) **दृष्ट्वा** (पाहून), **वेदतरोः** (वेदरूपी वृक्षाच्या) **शाखाः** (भागांना फांद्यांना ह्म० शाखा) **चक्रे** (करिता झाला). ॥ २१ ॥ **अतः** (ह्याहून) **परं** (पुढें) **सुरकार्यचिकीर्षया** (देवांचें कार्य करण्याच्या इच्छेनें) **नरदेवत्वं** (मनुष्यांत श्रेष्ठ रूपाला) **आपन्नः** (पावलेला) **समुद्रनिग्रहादीनि** (समुद्राला सेतु बांधणें वगैरे) **वीर्याणि** (पराक्रमांना) **चक्रे**. ॥ २२ ॥ **भगवान् एकोनविंशे** (एकोणिसाव्यांत) **विंशतिमे** (विसाव्यांत) **वृष्णिषु** (यादवांत) **रामकृष्णौ इति जन्मनी प्राप्य** (पावून), **भुवः** (पृथ्वीच्या) **भरं** (भाराला) **अहरत्** (दूर करिता झाला). ॥ २३ ॥ **ततः कलौ संप्रवृत्ते** (प्रारंभ झालेल्या) **[सति] सुरद्विषां** (देवांशीं वैर करणारांच्या म्हणजे दैत्यांच्या) **संमोहाय** (मोहासाठीं ह्म० नाशासाठीं) **जिनसुतः नाम्ना** (नांवानें) **बुद्धो कीकटेषु** (कीकट देशांत) **भविष्यति** (होईल) ॥ २४ ॥ **अथ असौ जगत्पतिः** (जगाचा रक्षणकर्त्ता) **युगसंध्यायां** (युगाच्या समाप्तीच्या वेळीं) **राजसु दस्युप्रायेषु** (बहुतेक चोर अशा) **[सत्सु] विष्णुयशसः नाम्ना कल्किः जनिता** ॥ २५ ॥

ततः सप्तदशे जातः सत्यवत्यां पराशरात् ॥ चक्रे वेदतरोः शाखा दृष्ट्वा पुंसोऽल्पमेधसः ॥ २१॥
नरदेवत्वमापन्नः सुरकार्यचिकीर्षया ॥ समुद्रनिग्रहादीनि चक्रे वीर्याण्यतः परम् ॥ २२ ॥
एकोनविंशे विंशतिमे वृष्णिषु प्राप्य जन्मनी ॥ रामकृष्णाविति भुवो भगवानहरद्भरम् ॥ २३ ॥
ततः कलौ संप्रवृत्ते संमोहाय सुरद्विषाम् ॥ बुद्धो नाम्ना जिनसुतः कीकटेषु भविष्यति ॥ २४ ॥
अथासौ युगसंध्यायां दस्युप्रायेषु राजसु ॥ जनिता विष्णुयशसो नाम्ना कल्किर्जगत्पतिः ॥ २५ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection



पुराणग्रंथ व शास्त्रग्रंथ लिहिले; परंतु त्या ग्रंथरचनेच्या योगानें त्यांच्या मनाला आनंद अथवा समाधान वाटलें नाहीं. पुढें
चित्ताला समाधान वाटत नाहीं ' ही गोष्ट व्यासांनीं नारदाला सांगितली. त्यावर नारदमुनींनीं व्यासांना चित्त प्रसन्न होण्याचा
णनानें ओतप्रोत भरलेला असा एखादा ग्रंथ कर.' ह्या नारदाच्या उपदेशाप्रमाणें व्यासांनीं ' श्रीमद्भागवत ' ग्रंथ रचण्यास प्रारंभ
यांत विघ्नें न यावीं ह्मणून, त्या ग्रंथामध्येंच प्रतिपादन करण्याची जी देवता तिचें स्मरण हेंच मंगलाचरण करितात :-)
ान करितों. (२) तो परमेश्वर भूत, भविष्य व वर्तमान ह्या तीनही काळीं निर्विकार ह्मणजे जन्ममरणादिरहित आहे; (३) कारण, त्याचे (परमेश्वराचे)
जे सत्व, रज आणि तम ह्यांचीं कार्यें अनुक्रमें देवता, इंद्रियें आणि पंचमहाभूतें (पृथ्वी, उदक, तेज, वायु आणि आकाश) हीं वस्तुतः खोटीं

(शिष्यांसह आह्मीं.) **परं** (परमेश्वराला.) **धीमहि** (ध्यातों ह्मणजे ध्यान करितों.). (२) [**कथंभूतं परं?**] **सत्यं** (तिन्ही काळीं निर्विकार अशा.). (३) [**कुतः?**] **यत्र**
) **त्रिसर्गः** (तीन गुणांचें कार्य.) **अमृषा** (खोटें नाहीं ह्मणजे सत्य.). (४) [**अत्र दृष्टान्तः**] **तेजोवारिमृदां** (तेज, उदक आणि मृत्तिका यांचा.) **यथा** (जसा) **विनिमयः** (एकमेकांचा

जन्माद्यस्य यतो ऽन्वयादितरतश्चार्थेष्वभिज्ञः स्वराट् । तेने ब्रह्म हृदा य आदिकवये मुह्यंति यत्सूरयः ॥
तेजोवारिमृदां यथा विनिमयो यत्र त्रिसर्गो ऽमृषा । धाम्ना स्वेन सदा निरस्तकुहकं सत्यं परं धीमहि ॥ १ ॥

एकमेकांवर अवभास.). (५) [**पुनः कीदृशं ?**] **स्वेन** (आपल्या.) **धाम्ना** (चैतन्यरूपी तेजानें.) **सदा** (नेहमीं.) **निरस्तकुहकम्** (दूर केलें कपट ह्मणजे माया ज्यानें अशा.).

असतांही, त्याच्या सत्यतेमुळें, खरीं आहेत अशीं अनुभवास येतात. (४) ह्याला दृष्टांत :- तेज, उदक आणि मृत्तिका ह्यांचा एकमेकांच्या ठिकाणीं झालेला भास आश्रयभूत पदार्थांच्या खरेपणामुळें जसा खरा वाटतो, ह्मणजे तेजाच्या ठिकाणीं पाणी भासणें, उदाहरण मृगजळ, वास्तविक पाहूं गेलें असतां सूर्याचे किरण खरे, पाणी कांहीं खरें नव्हे, असें असतांही पाणीच खरें असा भास होतो, ह्यास कारण सूर्यकिरणांची सत्यता; आणि पाण्यावर कांचेचा भास होतो व कांचेच्या तुकड्यावर पाण्याचा अथवा अग्नीचा भास होतो : हे सर्व भासलेले पदार्थ खरे नसतांही, त्यांच्या आश्रयभूत पदार्थांच्या, ह्मणजे सूर्यकिरण, पाणी आणि कांच ह्यांच्या, खरेपणामुळें सत्य भासूं लागतात : तशीच देवता, इंद्रियें आणि भूतें ही सृष्टि खरी नसतांही परमेश्वराच्या सत्यत्वामुळें आपणांस सत्य अशी भासते. (एतावता, परमात्मा सत्य आहे, हें सिद्ध होय.) - (५) परमेश्वराच्या ठिकाणीं त्रिसर्गाचा भास होण्याला कारण माया इत्यादि उपाधि असतील, तर नाहींत :- त्यानें आपल्या चैतन्यरूपी तेजानेंच मायारूपी कपट दूर केलें आहे (त्याचे ठिकाणीं माया

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ही उपाधि नाहीं). (६) तसेंच, ह्या सर्व जगाची उत्पत्ति, स्थिति आणि प्रलय त्या परमेश्वरापासूनच अन्वयव्यतिरेकांनीं होतात : ह्मणजे जगद्रूपी कार्यामध्यें परमेश्वराची सत्ता असल्यामुळें जगाची सत्ता भासते, हा परमेश्वराचा जगामध्यें अन्वय : पण जगाचा परमेश्वराचे ठिकाणीं व्यतिरेक आहे ह्म० जग हें परमेश्वराचे ठिकाणीं वस्तुतः नाहीं, कल्पित आहे : - उदाहरण : जसें सोनें हें कारण व दागिना हें कार्य : सोन्याचा दागिन्यांत अन्वय आहे, ह्मणजे सोन्यापासून दागिना झाला आणि एखाद्या दागिन्याला सोनें ह्मटलें तरी चालेल : पण दागिन्याचा सोन्यांत व्यतिरेक आहे ह्मणजे दागिना सोन्यांत वास्तविक नाहीं, कल्पित आहे (ह्या दृष्टांताप्रमाणें अन्वयव्यतिरेकानें परमेश्वरापासून जगाची उत्पत्ति, स्थिति आणि लय होतात). - तर मग जगाला कारण जें प्रधान (माया) तेंच परमेश्वर कीं काय, तर नव्हे :- (७) परमेश्वर ज्ञानी आहे, - मायेसारिखा जड नव्हे. तर मग जीवच परमेश्वर असेल, कारण, तोही ज्ञानी आहे. तर तेंही नव्हे :- (८) परमेश्वर स्वतःसिद्धज्ञानस्वरूपी आहे; - जीवाचें स्वरूप अविद्येनें आच्छादिलें आहे. तर मग ब्रह्मदेवच परमेश्वर असेल

(६) [**पुनः कीदृशम् ?**] **यतः** (ज्यापासून) **अस्य** (ह्याचें ह्मणजे जगाचें) **जन्मादि** (उत्पत्ति आदिकरून ह्मणजे उत्पत्ति, स्थिति आणि लय); **अर्थेषु** (आकाशादि कार्यामध्यें) **अन्वयात्** [illegible], **इतरतः** (दुसऱ्यानें ह्मणजे व्यतिरेकानें) **च** (आणि) [**तं. पुनः कथंभूतम् ?**] (७) **अभिज्ञः** (ज्ञानी) (८) **स्वराट्** (स्वयंप्रकाश ह्मणजे स्वतःसिद्धज्ञानरूप) (९) **यः** (जो) **यत्** [illegible] **सूरयः** (विद्वान् लोक) **मुह्यन्ति** (मोह पावतात), [**तत्**] **ब्रह्म** (वेदाप्रत) **आदिकवये** (पहिल्या विद्वानाला म्हणजे ब्रह्मदेवाला) **हृदा** (मनानें) तेनें (शिकविता झाला) [illegible]

[illegible] गुरु परमेश्वर आहे; कारण, - (९) ज्या वेदांविषयीं मोठमोठ्या विद्वानांस देखील मोह पडतो, ते वेद परमेश्वरानें ब्रह्मदेवाला मनानेंच शिकविले ह्म० [illegible] केल्यामुळें ब्रह्मदेवाला वेद समजले. (मंगलाचरणाच्या श्लोकामध्यें ग्रंथांतील प्रतिपाद्य विषयाचें दिग्दर्शन करावयाचें, असा ग्रंथकारांचा सामान्य [illegible] गायत्रीमंत्रांतील अर्थ गुंफला आहे : अशा उपक्रमावरून, व्यासांनीं केवळ ब्रह्मविद्येच्या प्रतिपादनासाठीं हा ग्रंथ केला, हें व्यक्त होतें.) ॥१॥ [illegible] प्रवृत्ति, जर त्या ग्रंथामध्यें कांहीं चांगलेपणा असेल, तरच होते. तेव्हां तसे लोकोत्तर गुण ह्या भागवतांत आहेत, असें सिद्ध करण्या- [illegible] ह्या तीन कांडांचें प्रतिपादन करणारीं जीं सर्व शास्त्रें त्यांपेक्षां हें भागवत श्रेष्ठ आहे असें सांगून व्यास लोकांची भागवत ऐकण्याविषयीं

॥ १ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

...ा एकलेल्या ह्या सुंदर भागवत ग्रंथांत मत्सररहित अशा साधूंचा उत्तम धर्म सांगितला आहे. - ह्यांत सांगितलेल्या धर्मास उत्तम ...तात म्ह० ह्मणजे अत्यंत निष्काम आहे. - इतर ग्रंथांत सांगितलेले धर्म सकाम असल्यामुळें त्यांचीं फळेंही अल्पकाळपर्यंतच टिकणारीं अस- ...सतात म्ह० क्षुद्र स्वर्गादि फलांची कामना नसली तरी निदान मोक्षप्राप्तीची तरी असतेच; पण ह्या भागवतांत सकाम धर्म मुळींच ...॥ हे ...आराधना करणें हाच अत्यंत निष्काम धर्म निरूपिला आहे. - एतावता, सकाम कर्मकांडापेक्षां भागवत श्रेष्ठ, हें सिद्ध होय. आतां, ह्याला ...त्कारण सांगतोः - (३) हा ग्रंथ वास्तव ह्मणजे परमार्थरूप वस्तूचें (जीवेश्वरांच्या ऐक्याचें) ज्ञान करून देतो. - त्या ज्ञानापासून मोठा लाभ होतो

...निकृते (महामुनींनीं ह्म० नारायणांनीं केलेल्या.) **श्रीमद्भागवते निर्मत्सराणां** (मत्सररहित) **सतां** (साधूंचा) **परमः** (उत्तम) **धर्मः निरूप्यते** (सांगितला जातो). (२) **...ज्झितकैतवः** (अगदीं दूर झुगारलें कपट ह्म० कामना ज्यांतील असा ह्म० निष्काम). (३) **अत्र वास्तवं** (परमार्थरूप) **वस्तु वेद्यम्** (जाणण्याजोगें). (४) [**कथंभूतं वस्तु?**]

धर्मः प्रोज्झितकैतवो ऽत्र परमो निर्मत्सराणां सताम् । वेद्यं वास्तवमत्र वस्तु शिवदं तापत्रयोन्मूलनम् ।
श्रीमद्भागवते महामुनिकृते किं वा परैरीश्वरः । सद्यो हृद्यवरुध्यते ऽत्र कृतिभिः शुश्रूषुभिस्तत्क्षणात् ॥ २ ॥

...(तीं) ...ासमुनि)

"हे ...द (आनंद देणारें.) **तापत्रयोन्मूलनम्** (त्रिविध तापांचा नाश करणारें). (५) **परैः** (इतर शास्त्रांनीं) **ईश्वरः हृदि** (अंतःकरणांत.) **सद्यः** (तत्काल.) **अवरुध्यते** (स्थिर केला जातो.) **किंवा** (काय) ? (६) **अत्र शुश्रूषुभिः** (ऐकूं इच्छिणाऱ्या) **कृतिभिः** (पुण्यवान् पुरुषांनीं) **तत्क्षणात्.** ॥ २ ॥

तो हा कीं - (४) तें ज्ञान खरा ह्मणजे निर्मल आनंद देणारें आणि अधिभौतिक, अध्यात्मिक व अधिदैविक अशा त्रिविध तापांचा नाश करणारें आहे : – एतावता, ज्ञानकांडा- पेक्षांही हें श्रेष्ठ होय. तसेंच, हें उपासनाकांडापेक्षांही श्रेष्ठ आहे; कारण, - (५) इतर शास्त्रांनीं किंवा इतर शास्त्रांत सांगितलेल्या साधनांनीं परमेश्वर हृदयांत तत्काल स्थिर केला जातो काय? - नाहीं, फार आयासानें व पुष्कळ वेळानें त्याची प्राप्ति होते; - (६) आणि हें (भागवत) ऐकण्याची नुसती इच्छा करणारांच्या मनामध्येंदेखील परमेश्वर तत्काल स्थिर होतो :- तेव्हां उपासनाकांडापेक्षांही हें (भागवत) उत्तम ठरलें. मग, क्वचित् अशी शंका येईल कीं, सर्व लोक हेंच कां ऐकत नाहींत. तर, अहो! - ऐकण्याची इच्छा होण्यास तरी पुण्यवान् अधिकारी लागतो; - पुण्यावांचून ऐकण्याची इच्छा होत नाहीं. - (एतावता, हें भागवत सर्व शास्त्रांपेक्षां श्रेष्ठ होय.) ॥ २ ॥

---

१ येथें 'महामुनि' शब्दानें श्रीविष्णूंचें ग्रहण केलें पाहिजे; कारण, प्रथम हें भागवत श्रीविष्णूंनीं संक्षेपांत केलें. (द्वि. स्कं. अ. ९ श्लो. ३०–३६ पहा) प्रस्तुत ग्रंथ हा, श्रीविष्णुकृत संक्षिप्त भागवताचा व्यासांनीं केलेला विस्तार होय. २ ज्यापासून कोणत्याही प्रकारचें फल मिळविण्याबद्दल इच्छा नाहीं, त्यास निष्काम असें ह्मणतात. ३ ज्यापासून फलप्राप्तीची इच्छा आहे तो. ४ पंचमहाभूतांपासून होणारा ताप : उदाहरण – धरणीकंप, समुद्रानें आपली मर्यादा सोडून येणें, अग्नीपासून नाश, शत्रुपीडा इत्यादि. ५ शरीरास रोग, मनाला काळजी. ६ अतिवृष्टि, अनावृष्टि, महामारी इत्यादि.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

(आतां, भागवत सर्व शास्त्रांपेक्षां श्रेष्ठ आहे ह्मणूनच केवळ ह्याचा आदर करावा असें नाहीं, तर वेदशास्त्रांचें हें फलच आहे ह्मणून परम आदरानें ह्याचें सेवन करावें असें सांगतात :–) (१) अहो चतुर रसिक हो ! वेदरूपी कल्पवृक्षाचें फल जें भागवत त्याचें, मोक्षपर्यंत व मुक्तावस्थेमध्येंदेखील, तुह्मीं वारंवार प्राशन करा. - तुह्मीं ह्मणाल ' श्रीनारायणांनीं भागवत केलें असें पूर्वी सांगितलेंच आहे त्यावरून हें भागवतरूपी फल वैकुंठांत होतें असें सिद्ध आहे, तेव्हां तेथून भूतलावर पडलें तें फुटलें असेल ह्मणजे त्यांत फेरफार झाले असतील. ' तर तसें झालें नाहीं. - (२) लौकिक वृक्षाचें फल जसें एखाद्या राघूनें तोडून तोंडांत धरून भूमीवर आणावें तसें हें भागवतरूपी फल श्रीशुकाचार्यांनीं पृथ्वीतलावर आणिलें. (प्रथम नारदांनीं वैकुंठांतून आणून—व्यास ह्मणतात—मला दिलें, मग मीं माझा पुत्र जो शुक त्याला दिलें; त्यानें पृथ्वीवर प्रसृत केलें. एतावता, शिष्य, त्यांचे शिष्य, त्यांचे शिष्यांचे शिष्य ह्या परंपरेनें हें पृथ्वीवर आलें आहे; उंच प्रदेशांतून खालीं आल्यामुळें फुटलें ह्म० ह्यांत फेरफार झाला नाहीं.) - आतां क्वचित् आंबटकडूपणाबद्दल शंका

(१) **अहो भावुकाः** (चतुर) **रसिकाः** (रसिकजनहो), **निगमकल्पतरोः** (वेदरूपी कल्पवृक्षाचें) **फलं भागवतं आलयं** (लयापर्यंत ह्मणजे मोक्षपर्यंत) **मुहुः** (वारंवार) **पिबत** (प्राशन करा). (२) [**कथंभूतं फलम्?**] **शुकमुखात्** (शुकाच्या म्हणजे पोपटाच्या किंवा शुकाचार्यांच्या मुखांतून) **भुवि** (पृथ्वीवर) **गलितम्** (प्राप्त झालेल्या). (३) [**पुनः कथंभूतम्**] **अमृतद्रवसंयुतम्** (अमृतासारख्या रसानें युक्त अशा). (४) [**पुनः कीदृशं?**] **रसं** (केवळ रसमय). ॥३॥ ***अनिमिषक्षेत्रे** (विष्णूचें क्षेत्र अशा) **नैमिशे** (नैमिशारण्यांत) **शौनकादयः ऋषयः स्वर्गायलोकाय**

निगमकल्पतरोर्गलितं फलं शुकमुखादमृतद्रवसंयुतम् ॥ पिबत भागवतं रसमालयं मुहुरहो रसिका भुवि भावुकाः ॥ ३ ॥
नैमिशे ऽनिमिषक्षेत्रे ऋषयः शौनकादयः ॥ सत्रं स्वर्गायलोकाय सहस्रसममासत ॥ ४ ॥

र्गायः विष्णुः तस्य लोकाय– स्वर्गात ज्याचें गायन करितात, त्या विष्णूचा लोक प्राप्त व्हावा ह्यासाठीं) **सहस्रसमं** (सहस्र वर्षेपर्यंत) **सत्रं** (बहुत दिवस चालणाऱ्या यज्ञाला) करिते झाले). ॥ ४ ॥

ोजन नाहीं; कारण, शुकानें अंगिकारिलेलें फल कधींही वाईट असत नाहीं, हा सामान्य नियम एक; व शिवाय, आह्मी निश्चयानें सांगतों कीं, - (३) हें रूपी रसानें भरलेलें आहे. - कदाचित् अशी शंका येईल कीं, फलांतील साल बी टाकून देऊन त्यांतला रस पितात, असें असतां तुह्मीं तर सांगतां फळ मुळीं रसरूपीच आहे (ह्यांत टाकण्यासारखा भाग कांहींच नाहीं, सर्वच ग्राह्य आहे. फल ह्मणण्याचें कारण इतकेंच कीं, जर नुसता कीं लागणार नाहीं, जिरून जाईल, किंवा वाईट होईल : एतावता, ह्या भागवतांत सर्व भाग श्रवणार्ह आहेत. तेव्हां, रसिक हो, हें ंच मंगलाचरण, ग्रंथ करण्याचा उद्देश व त्यांतील विषय आणि भागवत ऐकण्याविषयीं लोकांना उपदेश, हे विषय प्रतिपादन केले.

॥ २ ॥

नाहींत ते; देवांच्या डोळ्यांना पापण्या नाहींत. ह्या ठिकाणीं देव ह्म० विष्णु.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

क्षेत्रच होय. त्यामध्यें शौनकादिकऋषि, आपणांस वैकुंठ लोक प्राप्त व्हावा ह्या इच्छेनें, एक सहस्र वर्षेपर्यंत सत्र कर-
एकदां प्रातःकालचे नित्यनैमित्तिक होम आटोपल्यावर सूताचा सत्कार करून, तो बसला असतां, त्याला पुढें लिहिल्याप्रमाणें
सूतास प्रश्न करण्यापूर्वी त्या प्रश्नांचीं उत्तरें देण्याविषयीं सूताच्या आंगीं असलेली योग्यता दाखविण्याकरितां त्याला ह्मणतात :–)

समिद्द्व्यानें अग्नींत हवन केलें ज्यांनीं असे) **मुनयः तु एकदा आसीनं** (बसलेल्या) **सत्कृतं** (ज्याचा सत्कार केला असा) **सूतं** (सूताला) **आदरात्** (आदरानें) ॥ हे **अनघ** (हे निष्पाप), **त्वया** (तूं) **खलु** (निश्चयानें) **सेतिहासानि** (इतिहाससहित अशीं) **पुराणानि उत** (आणि) **यानि** (जीं) **धर्मशास्त्राणि**

त एकदा तु मुनयः प्रातर्हुतहुताग्नयः ॥ सत्कृतं सूतमासीनं पप्रच्छुरिदमादरात् ॥ ५ ॥ ऋषय ऊचुः ॥
त्वया खलु पुराणानि सेतिहासानि चानघ ॥ आख्यातान्यप्यधीतानि धर्मशास्त्राणि यान्युत ॥ ६ ॥
यानि वेद विदां श्रेष्ठो भगवान्बादरायणः ॥ अन्ये च मुनयः सूत परावरविदो विदुः ॥ ७ ॥

] (तीं) **अधीतानि** (ज्यांचें अध्ययन केलें अशीं) **आख्यातानि** (ज्यांचें व्याख्यान केलें अशीं), **च अपि** (देखील). ॥ ६ ॥ हे **सूत, विदां** (विद्वानांत) **श्रेष्ठः भगवान् बादरायणः** व्यासमुनि) **यानि वेद** (जाणतो), **परावरविदः** (भगवंताचीं सगुण निर्गुण स्वरूपें जाणणारे) **अन्ये** (दुसरे) **मुनयः च** [**यानि**] **विदुः** (जाणतात),

"हे पुण्यपुरुषा (सूता)! तूं भारतादि इतिहासांसह पुराणांचें आणि धर्मशास्त्रांचें अध्ययन केलें आहेस; - नुसतें अध्ययन केलेंस एवढेंच नव्हे, तर - त्यांचें व्याख्यानदेखील केलें आहेस. ॥ ६ ॥ तसेंच, विद्वच्छ्रेष्ठ भगवान् व्यास जीं शास्त्रें आणि पुराणें जाणतात, व भगवंताचीं सगुण निर्गुण स्वरूपें जाणणारे इतर मुनि जीं शास्त्रें जाणतात; ॥ ७ ॥

---

१ नैमिश– नेमि ह्म० चाकाची घांव श ह्म० शीर्ण झाली (उकलली) ज्या ठिकाणीं तें नैमिश. ह्याबद्दल वायुपुराणांत अशी कथा आहे :— पूर्वी ऋषि 'तपश्चर्येस उत्तम स्थान कोणतें ?' असें विचारण्याकरितां ब्रह्मदेवाकडे गेले होते. तेव्हां ब्रह्मदेवानें एक मनोमय चक्र निर्माण केलें, परमेश्वरास नमस्कार करून तें चक्र सोडून दिलें, आणि ऋषींना सांगितलें कीं, ज्या ठिकाणीं ह्या चक्राची गति कुंठित होईल तो देश तप करण्यास उत्तम असें समजा. हें ब्रह्मदेवाचें भाषण ऐकून, चक्राची गति कुंठित होते कोठें, तें पाहण्याकरितां ऋषिही त्या चक्रामागून चालले. पुढें ह्या अरण्यांत आल्याबरोबर त्या चक्राची गति कुंठित झाली. त्यावरून ह्या अरण्याला नैमिशारण्य असें नांव पडलें ('मनोमय चक्र व त्याची गति कुंठित होणें' ह्यांचा भाव असा असावा कीं, ब्रह्मदेव मनामध्यें 'ह्यांना तपश्चर्येस जागा कोणती योग्य मिळेल' असा विचार करीत असतां त्याच्या मनाला ही जागा रमणीय वाटली). नैमिष असाही पाठ आहे; त्यास प्रमाण वाराहपुराणांत गौरमुख नामक मुनि आणि भगवान् यांचा संवाद आहे: भगवान् ह्मणतात, हे गौरमुख ऋषे ज्या कारणास्तव मी ह्या अरण्यांत दैत्यांच्या बलाचा संहार निमिषमात्रांत (ह्म० डोळ्याचें पातें लवण्यास जितका वेळ लागतो तितक्या अवकाशांत) केला, त्यावरून हें अरण्य 'नैमिष' नांवानें प्रख्यात होईल. २ पुष्कळ यजमान मिळून अनुष्ठान करण्याचा एक यज्ञ.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तीं सर्व, व्यासांच्या आणि त्या मुनींच्या अनुग्रहानें रहस्यांसुद्धां तुला अवगत आहेत. - रहस्य समजण्यास कारण हें कीं - भक्तिमान् शिष्याला गुरु गुप्त अर्थदेखील सांगतात. (तुझें त्या ऋषींच्या ठिकाणीं खरें प्रेम असल्यामुळें त्यांनीं गूढ अर्थसुद्धां तुला सांगितले आहेत.) ॥ ८ ॥ हे आयुष्मन्, त्यात्या ग्रंथांमध्यें मनुष्यांच्या कल्याणाचा सुलभ उपाय तुझ्या मतानें जो निश्चित ठरला असेल, तो आह्मांला सांगावास. ॥ ९ ॥ - तूं ह्मणशील ' मी जसा पुष्कळ शास्त्रें व पुराणें ऐकून कल्याणोपायाचा निश्चय केला तसा इतर तुमच्या-सारख्या लोकांनींही करावा.' तर बा, तसें करण्याचें लोकांमध्यें सामर्थ्य नाहीं :- हे साधो सूता, ह्या कलियुगामध्यें लोक प्रायशः अल्पायुषी आहेत. - तेव्हां

हे **सौम्य** (हे साधो), **त्वं** (तूं.) **तत्** (तें) **सर्वं तत्त्वतः** (खऱ्या रूपानें म्हणजे रहस्यासुद्धां) **तदनुग्रहात्** (त्यांच्या म्हणजे व्यासांच्या व मुनींच्या कृपेनें) **वेत्थ** (जाणतोस.); **स्निग्धस्य** (भक्तिमान् अशा) **शिष्यस्य गुरवो गुह्यं अपि ब्रूयुः** (सांगतात.). ॥ ८ ॥ **हे आयुष्मन्** (हे चिरंजीव.), **भवता** (आपण.) **तत्रतत्र** (त्यात्या ग्रंथांमध्यें.) **अंजसा** (सहज रीतीनें) **पुंसां** (मनुष्यांचें.) **एकांततः** (वास्तविक, अव्यभिचारी.) **श्रेयः** (कल्याण.) **यत् विनिश्चितं** (निश्चयानें ठरविलेलें) **तत् नः** (आम्हांला.) **शंसितुं** (सांगण्यास.) **अर्हसि** (योग्य आहेस.). ॥ ९ ॥ **हे सभ्य** (हे साधो), **अस्मिन्** (ह्या) **कलौ युगे** (कलियुगांत.) **जनाः** (लोक.) **प्रायेण** (प्रायशः.) **अल्पायुषः** (अल्पायुषी.) **मंदाः** (आळशी.) **सुमंदमतयः** (फार मंद बुद्धीचे.) **मंदभाग्याः**

वेत्थ त्वं सौम्य तत्सर्वं तत्त्वतस्तदनुग्रहात् ॥ ब्रूयुः स्निग्धस्य शिष्यस्य गुरवो गुह्यमप्युत ॥ ८ ॥ तत्रतत्राञ्जसा
ऽऽयुष्मन्भवता यद्विनिश्चितम् ॥ पुंसामेकान्ततः श्रेयस्तन्नः शंसितुमर्हसि ॥ ९ ॥ प्रायेणाल्पायुषः सभ्य कलाव-
स्मिन्युगे जनाः ॥ मन्दाः सुमन्दमतयो मन्दभाग्या ह्युपद्रुताः॥१०॥भूरीणि भूरिकर्माणि श्रोतव्यानि विभागशः ॥
अतः साधो ऽत्र यत्सारं समुद्धृत्य मनीषया ॥ ब्रूहि नः श्रद्दधानानां येनाऽऽत्मा संप्रसीदति ॥ ११ ॥

...यांनीं प्राप्तलेले.) ॥ १० ॥ **श्रोतव्यानि** (श्रवण करण्यास योग्य.) **विभागशः** (विभागेंकरून.) **भूरीणि** (पुष्कळ.) **भूरिकर्माणि** (पुष्कळ कर्मानुष्ठान ज्यांमध्यें
हे साधो, अत्र यत् सारं [तत्] मनीषया (बुद्धीनें.) **समुद्धृत्य** (काढून.) **श्रद्दधानानां** (विश्वास ठेवणाऱ्या.) **नः ब्रूहि** (सांग); **येन** (ज्यानें.)
...प्रसन्न होतें.). ॥ ११ ॥

...ण्यास त्यांना वेळ नसतो. आतां, थोडें आयुष्य असतांही जर उद्योगी असतील तर त्यांना हिताहित समजेल, पण ते तसेही ॥ ३ ॥
...चित् बुद्धिमान् असले तर थोडक्या वेळांत, आळशी असले तरी देखील, पुष्कळ शास्त्रांच्या साहाय्यानें कल्याणमार्ग
...य मंद बुद्धीचे आहेत; त्यांतही आणखी त्यांचीं भाग्यें मंद आहेत ह्मणजे शुभ कार्यांत विघ्नें फार यावयाचीं;
...ता, ह्या कामाविषयीं ते असमर्थ आहेत.) ॥ १० ॥ - बरें पुष्कळ शास्त्रश्रवणापासून फलसिद्धि आहे असेंही नाहीं. -

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

करण्यास सांगितलें आहे. तेव्हां, हे साधो सूता, तूं आपल्या बुद्धीनें त्यांतील सार काढून आह्मांला सांग. आमचा तुझ्या
र्त्रींच्या योगानें आमच्या अंतःकरणांला प्रसन्नता वाटेल. ॥ ११ ॥ (ऋषि दुसरा प्रश्न करितातः–) सूता, आह्मी जें विचारणार
क्तांचा पालक भगवान् जो श्रीकृष्ण, त्यानें वसुदेवाची भार्या जी देवकी तिच्या उदरीं अवतार घेतला, त्याचें कारण काय?
स आह्मी फार उत्सुक आहों, आह्मांला सांग. सामान्यतः त्या परमेश्वराचा अवतार प्राणिमात्रांच्या पालनाकरितां आणि समृद्धी-

ते (तुझें) **भद्रं** (कल्याण). **सात्वतां** (भक्तांचा) **पतिः** (पालक) **वसुदेवस्य** (वसुदेवाच्या) **देवक्यां** (देवकीच्या ठायीं ह्म० उदरीं) **भगवान् यस्य चिकीर्षया**
(आवरला). ॥ १२ ॥ **हे अंग** (हे बा), **शुश्रूषमाणानां** (श्रवण करण्यास उत्सुक अशा) **नः तत् अनुवर्णितुं** (सांगण्यास) **अर्हसि, यस्य** (ज्याचा) **अवतारः भूतानां**
(पालनाकरितां) **भवाय** (समृद्धीकरितां) **अस्ति** (असतो). ॥ १३ ॥ **संसृतिं** (संसाराप्रत) **आपन्नः** (प्राप्त झालेला) **विवशः** (पराधीन) **यन्नाम** (ज्याच्या नांवाला)

सूत जानासि भद्रं ते भगवान्सात्वतां पतिः ॥ देवक्यां वसुदेवस्य जातो यस्य चिकीर्षया ॥ १२ ॥
तन्नः शुश्रूषमाणानामर्हस्यंगानुवर्णितुम् ॥ यस्यावतारो भूतानां क्षेमाय च भवाय च ॥ १३ ॥
आपन्नः संसृतिं घोरां यन्नाम विवशो गृणन् ॥ ततः सद्यो विमुच्येत यद्बिभेति स्वयं भयम् ॥ १४ ॥
यत्पादसंश्रयाः सूत मुनयः प्रशमायनाः ॥ सद्यः पुनंत्युपस्पृष्टाः स्वर्धुन्यापो ऽनुसेवया ॥ १५ ॥

गृणन् (उच्चारणारा) **सद्यः** (तत्काल) **ततः** (त्या म्ह० संसारापासून) **विमुच्येत** (मुक्त व्हावा); **स्वयं** (स्वतः) **भयं यत्** (ज्यापासून) **बिभेति** (भय पावतें). ॥ १४ ॥
हे सूत, यत्पादसश्रयाः (ज्याच्या चरणांचा आश्रय करणारे) **प्रशमायनाः** (शांति हें ज्यांचें निवासस्थान असे म्ह० शांत) **मुनयः उपस्पृष्टाः** (ज्यांना स्पर्श केला असे) **सद्यः पुनंति** (पवित्र करितात); **स्वर्धुन्यापः** (गंगेचें उदक) **तु** (तर) **अनुसेवया** (सेवापरंपरेनें). ॥ १५ ॥

साठीं असतो. - त्यांपैकीं ह्या अवतारांत काय कर्तव्य होतें? - ॥ १३ ॥ - प्रभु श्रीकृष्णाचा प्रभाव कसा आहे पहा :- संसारांत पडलेल्या पुरुषानें अगदीं परस्वाधीन अवस्थेमध्येंही त्या परमेश्वराचें नाम ग्रहण केलें तर, तो संसृतीपासून मुक्त होतो. - कारण, परमेश्वराच्या नामाचें माहात्म्यच असें आहे कीं, - स्वतः भीति देखील त्या नामापासून भय पावते. ॥ १४ ॥ सूता ! त्या परमेश्वराच्या चरणाचाच आश्रय करणारे शांत मुनि आपला आश्रय धरणाऱ्या लोकांना तत्काल पवित्र करितात. आणि तसेंच, गंगेचें उदक देखील आपल्या आश्रित जनांना पवित्र करितें, परंतु त्याची फार दिवस सेवा करावी लागते. - अर्थात गंगेपेक्षांही भगवच्चरणाश्रित साधूंची योग्यता अधिक

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आहे. - ॥१५॥ मोठमोठे पुण्यश्लोक (पवित्र कीर्तिमान्) पुरुष ईश्वराच्या चरित्रांचो स्तुति करितात. त्या भगवंताची कोर्ति (कथा) संसारसंबंधी दोष दूर घालवित्ये. ज्याच्या मनांत, आपलें चित्त शुद्ध व्हावें, अशी इच्छा असेल, तो कोणता बरें पुरुष ती कीर्ति श्रवण करणार नाहीं? ॥ १६ ॥ सूता, परमेश्वर लीलामात्रानें ब्रह्मा रुद्र इत्यादि स्वरूपें धारण करितो; त्यानें तसे अवतार घेऊन केलेलीं जीं उत्तम चरित्रें नारदादि मोठमोठे साधु गात असतात, तीं तूं आह्मांला सांग. आमचा तुझ्या सांगण्यावर विश्वास आहे. ॥ १७॥ हे बुद्धिमन् सूता, तसेंच परमेश्वर आपल्या मायारूप शक्तीच्या योगानें यथेच्छ नानाप्रकारच्या क्रीडा करितो. त्या क्रीडाप्रसंगीं त्यानें इतर जे मत्स्य, कूर्म, राम, इत्यादि अवतार घेतले,

शुद्धिकामः (पापापासून मुक्त होऊं इच्छिणारा) **कः** (कोण) **वा पुरुषः तस्य** (त्याचे म्ह० परमेश्वराचे) **पुण्यश्लोकेड्यकर्मणः** (सुकीर्तिमान् पुरुषांनीं ज्याच्या पराक्रमाची प्रशंसा केली आहे अशा) **भगवतः** (भगवंताच्या) **कलिमलापहं** (कलिदोषांचा नाश करणाऱ्या) **यशः** (कीर्तीला) **न** (नाहीं) **शृणुयात्** (श्रवण करील)? ॥ १६ ॥ **लीलया** (लीलेनें) **कलाः** (रूपांना) **दधतः** (धारण करणाऱ्या) **तस्य सूरिभिः** (साधूंनीं) **परिगीतानि** (गायन केलेल्या) **उदाराणि** (मोठाल्या म्ह० उत्तम) **कर्माणि** (चरित्रें) **श्रद्धधानानां** (विश्वास ठेवणाऱ्या) **नः ब्रूहि.** ॥ १७ ॥ हे **धीमन्** (हे बुद्धिमान् पुरुषा), **अथ** (आणखी) **आत्ममायया** (आपल्या मायेनें) **स्वैरं** (यथेच्छ) **लीलाः** (क्रीडा) **विदधतः** (करणाऱ्या) **ईश्वरस्य** (ऐश्वर्यवान् अशा) **हरेः** (कृष्णाच्या)

को वा भगवतस्तस्य पुण्यश्लोकेड्यकर्मणः ॥ शुद्धिकामो न शृणुयाद्यशः कलिमलापहम् ॥ १६ ॥ तस्य कर्माण्युदाराणि
परिगीतानि सूरिभिः ॥ ब्रूहि नः श्रद्दधानानां लीलया दधतः कलाः ॥ १७ ॥ अथाख्याहि हरेर्धीमन्नवतारकथाः शुभाः ॥
लीला विदधतः स्वैरमीश्वरस्याऽऽत्ममायया ॥ १८ ॥ वयं तु न वितृप्याम उत्तमश्लोकविक्रमे ॥ यच्छृण्वतां रसज्ञानां स्वादु
स्वादु पदे पदे ॥ १९ ॥ कृतवान्किल वीर्याणि सह रामेण केशवः ॥ अतिमर्त्यानि भगवान्गूढः कपटमानुषः ॥ २० ॥

...तारकथाः आख्याहि (सांग). ॥ १८ ॥ **उत्तमश्लोकविक्रमे** (ज्याचें उत्तम यश अशा परमेश्वराच्या गुणांचे ठायीं) **वयं** (आह्मीं) **तु न वितृप्यामः** (तृप्त होतों); **...** ऐकणाऱ्या) **रसज्ञानां** (रसिकांस) **पदेपदे** (क्षणोक्षणीं) **स्वादुस्वादु** (अधिक अधिक रुचिकर). ॥ १९ ॥ **गूढः** (गुप्त) **कपटमानुषः** (कपटानें मनुष्यरूप धारण **...ण सह** (बलरामासह) **अतिमर्त्यानि** (मनुष्यांकडून न होणारे) **वीर्याणि** (पराक्रम) **कृतवान्** (ज्यानें केले असा) **किल** (खचित). ॥ २० ॥

...रासह...ण. ॥१८॥ सूता, परमात्म्याचे गुण श्रवण केल्याबरोबर श्रोत्यांचें अज्ञान दूर होतें. ते पुष्कळ ऐकिले तरी आह्मांला तृप्ति वाटत नाहीं. - तुह्मा ...एकच प्रकारचा गोड पदार्थ प्रतिदिनीं मिळाला ह्मणजे वीट येतो, त्याप्रमाणेंच आह्मांलाही कृष्णकथा ऐकण्याचा कंटाळा आला असेल ...ीं; कारण, - तें कृष्णचरित ऐकणाऱ्या रसिक श्रोत्यांस क्षणोक्षणीं अधिकाधिक रुचि लागत जाते. ॥ १९ ॥ त्या भगवतांचें स्वरूप ...य; त्यानें ह्या भूतलावर कपटानें (मायेच्या योगें) मनुष्यरूप धारण करून बलरामासह, मनुष्यांना कधींही करितां

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ते आह्मांला सांग. - ॥२०॥ - सूता, कदाचित् तुला शंका येईल कीं, 'आह्मीं ब्राह्मण आहों ह्मणून यांजन, अध्यापन
रत्नें ऐकण्यास अवकाश नसेल.' तर तसें नाहीं, आह्मांला दुसरें कांहीं काम नाहीं. कारण, - कलियुगास प्रारंभ झाला
ह्या विष्णुक्षेत्र नैमिषारण्यामध्यें पुष्कळ दिवस सत्र करण्याच्या उद्देशानें बसलों आहों; - तेव्हां, आह्मांला इतर व्यासंग कांहींएक
यास पुष्कळ वेळ आहे. ॥ २१ ॥ - सूता, तूं आह्मांला फार योग्य वेळेवर भेटलास. कारण कीं, - हा संसार पुरुषांचें सत्त्व हरण

माज्ञाय (जाणून) **अस्मिन्** (ह्या) **वैष्णवे** (विष्णूच्या) **क्षेत्रे** (क्षेत्रांत) **दीर्घसत्रेण** (पुष्कळ दिवस सत्र करण्याच्या उद्देशानें) **आसीनाः** (बसलेले), **थायां** (कथेमध्यें ह्म० कथा ऐकण्याला) **सक्षणाः** (ज्यांस अवकाश आहे असे) [**स्मः**] (आहों). ॥ २१ ॥ **धात्रा** (परमेश्वरानें) **पुंसां** (पुरुषांचें) **सत्त्वहरं**
वं (सागराला) [**इव**] **दुस्तरं** (तरून जाण्यास कठिण अशा) **कलिं** (कलीला) **निस्तितीर्षताम्** (तरून जाण्यास इच्छिणाऱ्या) **नः कर्णधारः** (नावाड्या) **इव** (सारिखा)

मागतमाज्ञाय क्षेत्रे ऽस्मिन्वैष्णवे वयम् ॥ आसीना दीर्घसत्रेण कथायां सक्षणा हरेः ॥ २१ ॥ त्वं नः संदर्शितो धात्रा दुस्तरं निस्तितीर्षताम् ॥ कलिं सत्त्वहरं पुंसां कर्णधार इवार्णवम् ॥ २२ ॥ ब्रूहि योगेश्वरे कृष्णे ब्रह्मण्ये धर्मवर्मणि ॥ स्वां काष्ठामधुनोपेते धर्मः कं शरणं गतः ॥ २३ ॥ इति श्रीभा० म० प्र० स्कं० नैमिषेयोपाख्याने प्रथमो ऽध्यायः ॥ १ ॥ व्यास उवाच । इति संप्रश्नसंहृष्टो विप्राणां रौमहर्षणिः प्रतिपूज्य वचस्तेषां प्रवक्तुमुपचक्रमे ॥ १ ॥

त्वं (तूं) **संदर्शितः** (दाखविलेला). ॥ २२ ॥ **योगेश्वरे** (पूर्ण योगी) **धर्मवर्मणि** (धर्मरक्षक) **ब्रह्मण्ये** (ब्राह्मणांचा कैवारी) **कृष्णे** (कृष्ण) **अधुना** (आतां) **स्वां** (आपल्या) **काष्ठां** (स्थानाला) **उपेते** [**सति**] (गेला असतां) **धर्मः कं** (कोणाला) **शरणं गतः** (गेला) **ब्रूहि**. ॥ २३ ॥ **व्यासः उवाच** । (व्यास म्हणतात) :— **इति** (याप्रमाणें) **संप्रश्नसंहृष्टः** (उत्तम प्रश्नांनीं संतुष्ट झालेला) **रौमहर्षणिः** (रोमहर्षणाचा पुत्र ह्म० सूत) **तेषां** (त्या) **विप्राणां** (ऋषींच्या) **वचः** (भाषणांतें ह्म० भाषणांचें) **प्रतिपूज्य** (अभिनंदन करून) **प्रवक्तुं** (उत्तर देण्यास) **उपचक्रमे** (आरंभ करिता झाला). ॥ १ ॥

करणारा आहे. ह्यांतून तरून जाणें परम दुर्घट होय. आह्मी तर हा तरून जावा असें इच्छितों. समुद्रांत पडलेल्या पुरुषाला जसा अवचित नावाडी भेटावा त्याप्रमाणें परमेश्वरानें आह्मांला तुझी भेट करून दिली. ॥ २२ ॥ - सूता, दुसरीही एक गोष्ट तुला विचारावयाची आहे :- आह्मांला सांग कीं, धर्मरक्षक श्रीकृष्ण परमात्मा निजधामास गेला असतां, धर्म, स्वतांचें रक्षण करून घेण्यासाठीं, कोणाला शरण गेला?" ॥ २३ ॥ **॥ इति श्रीमद्भागवतार्थदर्शने प्रथमस्कंधे प्रथमो ऽध्यायः ॥ १ ॥**

व्यास ह्मणतात :— पूर्वी सांगितल्याप्रमाणें ऋषींनीं केलेले प्रश्न ऐकल्याबरोबर रोमहर्षणाच्या पुत्राला (उग्रश्रवानामक सूताला) आनंद वाटला. नंतर त्यानें ऋषींच्या प्रश्नांचें

१ स्वतः उपाध्यायपणा स्वीकारून दुसऱ्याकडून कर्मानुष्ठानें करविणें. २ विद्यार्थ्यांस वेदशास्त्र शिकविणें.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अभिनंदन करून उत्तर देण्यास आरंभ केला. ॥ १ ॥ (ऋषींच्या प्रश्नांचें उत्तर देण्यापूर्वी सूत आपल्या गुरूंचें स्मरण करितात, व त्यांचें माहात्म्य थोडक्यांत सांगतात :-) श्रीशुकाचार्य इतके पूर्ण योगी व कृतकृत्य होते कीं, त्यांचा व्रतबंध देखील झाला नव्हता, - पण तो करून घेण्याकरितां पित्याकडे गेले नाहींत, - तर कर्ममार्ग सोडून सर्वसंगपरित्याग करून - उत्तर दिशेस - जाऊं लागले. तेव्हां व्यासांना भय पडलें कीं, आतां, आपल्याला पुत्राचा विरह होणार! व त्यानें जाऊं नये ह्मणून व्यासांनीं लागलीच श्रीशुकमुनींना ' पुत्रा (बाळा)! ' अशी हांक मारिली. त्या वेळीं, शुक सर्वांतर्यामी असल्यामुळें, वृक्षांनीं व्यासांच्या हांकेला उत्तर दिलें (श्रीशुकांनीं " आपण प्राणिमात्रांच्या अंतःकरणांत वास करीत आहोंत ' शुक माझा पुत्र, तो आज माझ्यापासून दूर झाला ' ह्या मोहजालांत व्यासांनीं पडूं नये " एवढें दर्शविण्याकरितां त्यांच्या हांकेला

सूतः उवाच :- अनुपेतं (व्रतबंध न झालेल्या) **अपेतकृत्यं** (कर्माचा त्याग केलेला) **प्रव्रजंतं** (सर्वसंगपरित्याग करून जाणाऱ्या) **यं** (ज्याला) **विरहकातरः** (वियोगाला भ्यालेला) **द्वैपायनः** (व्यास) **पुत्रा** (हे बाळा) **इति** (अशी) **आजुहाव** (हांक मारिता झाला), **तन्मयतया** (त्याचेंच स्वरूप असल्यामुळें) **तरवः** (वृक्ष) **अभिनेदुः** (उत्तर देते झाले); **सर्वभूतहृदयं** (सर्व प्राणिमात्रांच्या हृदयांत योगबलानें प्रवेश करणाऱ्या) **तं** (त्या) **मुनिं** (मुनीला) **आनतः** (नम्र) **अस्मि** (आहें). ॥ २ ॥ **यः** (जो) **अंधं** (घोर) **तमः** (अंधकाराला म्ह० संसाररूप) **अतिति-**

सूत उवाच । यं प्रव्रजन्तमनुपेतमपेतकृत्यम् । द्वैपायनो विरहकातर आजुहाव ॥ पुत्रेति तन्मयतया तरवो ऽभिनेदुः । तं सर्वभूतहृदयं
निमानतो ऽस्मि ॥ २ ॥ यः स्वानुभावमखिलश्रुतिसारमेकमध्यात्मदीपमतितितीर्षतां तमोऽधम् ॥ संसारिणां करुणया ऽऽह पुराणगुह्यम्
सूनुमुपयामि गुरुं मुनीनाम् ॥३॥ नारायणं नमस्कृत्य नरं चैव नरोत्तमम् ॥ देवीं सरस्वतीं व्यासं ततो जयमुदीरयेत् ॥ ४ ॥

छिण्णाऱ्या) संसारिणां (संसारी लोकांच्या) **करुणया** (दयेनें) **अध्यात्मदीपं** (आत्मविद्येचें प्रकाशक) **स्वानुभावं** (ज्याचा विलक्षण प्रभाव आहे अशा) **अखिलश्रुति-**
गह्यं (पुराणांत गुह्य असलेलें) **आह** (सांगता झाला), **तं मुनीनां गुरुं व्याससूनुं** (व्यासपुत्राला) **उपयामि** (शरण जातों). ॥ ३ ॥ **नारायणं, नरोत्तमं**
स्वतीं देवीं, व्यासं च नमस्कृत्य (नमस्कार करून) **ततः** (नंतर) **जयं** (ग्रंथातें) **उदीरयेत्** (आरंभ करावा). ॥ ४ ॥

शुकाचार्यांना मी नमस्कार करितों. ॥ २ ॥ - श्रीशुकाचार्यांनीं लोकांवर पुष्कळ कृपा केल्या आहेत. त्यांतील ठळक उदाहरण हें कीं,-
घोर अंधकारांतून सुटावें अशी इच्छा उत्पन्न होते त्यांना अज्ञानांधकारापासून सुटण्याचा उपाय शुकाचार्यांनीं भागवतांत सांगितला आहे.
व वेदांतशास्त्राचें प्रकाशक आहे. श्रीशुक त्या गुह्य पुराणाचे (भागवताचे) कर्ते आणि ऋषींचे गुरु आहेत.
३ ॥ - ग्रंथारंभीं सर्वांचें कर्तव्य असें आहे कीं, - नारायण, सर्व पुरुषांमध्यें श्रेष्ठ पुरुष नर, सरस्वती देवी, व व्यास

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

घरीं 'कल्कि' या नांवानें जन्मास येईल. ॥ २५ ॥ सूत ह्मणतात :— ब्राह्मणहो, जसें एखाद्या प्रचंड (ज्याचें पाणी कधींही किंचित् देखील कमी होत नाहीं.) अशा सरोवरांतून हजारों लहान लहान कालवे निघूं शकतात, तसे ह्या शुद्धसत्त्वगुणपूर्ण ईश्वरापासून असंख्य अवतार होतात. ते असे :— ॥ २६ ॥ ऋषि (वसिष्ठासारखे ब्रह्मर्षि, नारदासारखे देवर्षि, विश्वामित्रासारखे राजर्षि), मनु (स्वायंभुवप्रभृति), देव (ब्रह्मदेवादि), त्या मनूंचे महाप्रभावशाली पुत्र, व प्रजापति, ह्या सर्व त्या परमेश्वराच्याच कला होत. ॥ २७ ॥ हे पूर्वश्लोकांत सांगितलेल्यापैकीं (कांहीं) परब्रह्माचे अंश आहेत, कांहीं त्याच्याच विभूति आहेत. पण कृष्ण परमात्मा तर पूर्णब्रह्मस्वरूपच होय. इंद्राचे शत्रु जे दैत्य

हे **द्विजाः**, **यथा अविदासिनः** (ज्याचें पाणी कधीं कमी होत नाहीं ह्मा० प्रचंड, अशा) **सरसः** (सरोवरापासून) [**सकाशात्**] (पासून) **सहस्रशः** (हजारों) **कुल्याः** (पाट) **स्युः** (होतात); [**एवं**] **सत्त्वनिधेः** (सत्त्वगुणाचा समुद्र, अशा) **हरेः** (विष्णूचे) **असंख्येयाः** (न मोजतां येणारे) **अवताराः**. ॥ २६ ॥ **ऋषयः मनवः देवाः महौजसः** (महाप्रभावशाली असे) **मनुपुत्राः तथा सप्रजापतयः सर्वे हरेः एव कलाः** ॥२७॥ **एते** (हे) **पुंसः अंशकलाः** (अंश आणि विभूति) **कृष्णः तु स्वयं भगवान्** [**एते**] **इंद्रारिव्याकुलं** (इंद्राच्या शत्रूंनीं म्ह० दैत्यांनीं

अवतारा ह्यसंख्येया हरेः सत्वनिधेर्द्विजाः ॥ यथा ऽविदासिनः कुल्याः सरसः स्युः सहस्रशः ॥ २६ ॥
ऋषयो मनवो देवा मनुपुत्रा महौजसः ॥ कलाः सर्वे हरेरेव सप्रजापतयस्तथा ॥ २७ ॥ एते
चांशकलाः पुंसः कृष्णस्तु भगवान्स्वयम् ॥ इंद्रारिव्याकुलं लोकं मृडयंति युगे युगे ॥ २८ ॥ जन्म गुह्यं
भगवतो य एतत्प्रयतो नरः ॥ सायंप्रातर्गृणन्भक्त्या दुःखग्रामाद्विमुच्यते ॥ २९ ॥ एतद्रूपं भगवतो
ह्यरूपस्य चिदात्मनः ॥ मायागुणैर्विरचितं महदादिभिरात्मनि ॥ ३० ॥

पीडिलेल्या) **लोकं युगे युगे मृडयंति** (सुखी करितात). ॥ २८ ॥ **यः नरः प्रयतः** (शुद्ध) **सायंप्रातः** (संध्याकाळीं व सकाळीं) **एतत् भगवतो गुह्यं जन्म भक्त्या गृणन्** (पठण करणारा) **दुःखग्रामात्** (दुःखसमूहरूपी संसारापासून) **विमुच्यते** (सुटतो). ॥ २९ ॥ **हि** (कारण) **एतत् अरूपस्य** (रूपरहित अशा) **चिदात्मनः** (चैतन्यस्वरूपी अशाचें) **रूपं भगवतो मायागुणैः महदादिभिः आत्मनि** (आत्म्याच्या ठिकाणीं) **विरचितं**. ॥३०॥

त्यांनीं लोकांना उपद्रव दिला असतां युगायुगाचेठिकाणीं हे पूर्वोक्त परमेश्वरांश अवतार, दैत्यांचा संहार करून लोकांना सुखी करितात. ॥ २८ ॥ - जो पुरुष शुद्ध होऊन नित्य सकाळीं व संध्याकाळीं हें भगवंताचें चरित्र भक्तिपूर्वक पठण करितो; तो सर्वदुःखरूपी संसारापासून मुक्त होतो. ॥ २९ ॥ - कारण, संसारापासून सुटणें ह्मणजे स्थूल व सूक्ष्म ह्या दोन्ही देहांच्या संबंधांतून सुटणें होय. अज्ञानानें जडलेला तो संबंध ज्ञान झालें असतां सुटतो. (हें प्रतिपादन ३४ व्या श्लोकापर्यंत आहे.) - जीवाचें हें स्थूल शरीर,

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

परमेश्वराच्या शक्तिरूपी मायेचे जे गुण महत्तत्त्व अहंकार इत्यादि तेवीस तत्वें, त्यांच्या योगानें परमात्म्याचे ठिकाणीं कल्पिलेलें आहे; वस्तुतः तो जीव रूपरहित व चैतन्यैकस्वरूप आहे. ॥ ३० ॥ - हें स्थूल शरीर परमात्मस्वरूपावर कसें कल्पिलेलें आहे त्यास उदाहरणः- ज्याप्रमाणें आपण असें ह्मणतों कीं 'आकाशांत अभ्र आलें आहे' ह्म० वस्तुतः अभ्रें वायूचे आवरणावर असतां आपण त्यांना आकाशावर आरोपितों, अथवा फुलांतील बारीक रज किंवा दुसरे कांहीं सुवासिक किंवा दुर्गंधयुक्त पदार्थ वायूमधून आले असतां आपण 'वारा सुगंध अथवा दुर्गंध सुटला आहे' असें ह्मणून सुगन्धित्व अथवा दुर्गंधित्व हे गुण वायूवर आरोपितों; वस्तुतः गन्ध हा धर्म पृथ्वीचा आहे, वायूचा नाहीं; असें असतां जसा आपण त्या गुणाचा आरोप वायूवर करितों, तद्वत् अज्ञानी लोक, परमेश्वर स्वतः द्रष्टा असतांना, त्याच्यावर दृश्यत्वादिधर्मयुक्त जें (जड) शरीर त्याचा आरोप करितात. ॥ ३१ ॥ - एका स्थूल शरीराचाच नव्हे, तर - ह्याहून निराळ्या एका देहाचाही परमेश्वरस्वरूपावर आरोप करितात. तो अव्यक्त ह्म० लिंग देह होय. त्या शरीराची रचना

यतः नभसि (आकाशांत) **मेघौघः** (अभ्रसमूह) **वा पार्थिवः** (पृथ्वीसंबंधी असा) **रेणुः अनिले** (वायूवर) **एवं द्रष्टरि** (द्रष्ट्यावर ह्म० साक्षीवर) **अबुद्धिभिः दृश्यत्वं आरोपितं** (आरोपण केले). ॥३१॥ **अतः परं** (ह्यापेक्षां निराळें) **यत्** (जें) **अदृष्टाश्रुतवस्तुत्वात्** (न पाहिलेलें व न ऐकिलेलें तत्त्व असल्यामुळें) **अव्यूढगुणव्यूहितं** (परिणाम न पावलेल्या गुणांनीं रचिलेलें) **अव्यक्तं** (लिंगशरीर)

यथा नभसि मेघौघो रेणुर्वा पार्थिवो ऽनिले ॥ एवं द्रष्टरि दृश्यत्वमारोपितमबुद्धिभिः ॥ ३१ ॥ अतः परं यदव्यक्तमव्यूढगुणव्यूहितम् ॥ अदृष्टाश्रुतवस्तुत्वात्स जीवो यत्पुनर्भवः ॥३२॥ यत्रेमे सदसद्रूपे प्रतिषिद्धे स्वसंविदा ॥ अविद्यया ऽऽत्मनि कृते इति तद्ब्रह्म दर्शनम् ॥३३॥

[तत् आरोपितं] यत् [यस्मात्] (ज्या लिंगदेहापासून) **सः जीवः पुनर्भवः** (पुनर्जन्म). ॥ ३२ ॥ **यत्र इमे अविद्यया आत्मनि कृते सदसद्रूपे स्वसंविदा** (स्वरूपज्ञानानें) **प्रतिषिद्धे** (नष्ट झालेलीं) **इति तत् दर्शनं** (केवळ ज्ञानस्वरूप) **ब्रह्म.** ॥ ३३ ॥

हस्तपादादिक अवयवांच्या रूपानें परिणाम न पावलेल्या साधनांनीं केली आहे. कारण, - जर त्या शरीराला हातपाय इत्यादि अवयव असते तर तें आपल्याला दिसलें असतें; किंवा निदान, जसें आपल्याला स्वर्गांतील देवांची ऐकून माहिती आहे-कीं इन्द्र ह्म० त्याच्या शरीराला सहस्र डोळे आहेत; गजानन ह्मणजे त्याला एक हत्तीसारखें मुख आहे, चार हात आहेत इत्यादि-तसें तें शरीर ऐकून तरी माहीत असतें. पण - तें दिसतही नाहीं, व त्याबद्दल ऐकूनही कांहीं माहिती नाहीं. - बरें असें असूनही तें लिंगशरीर नाहींच असेंही ह्मणतां येत नाहीं; - कारण, त्या जीवाला पुनर्जन्म झाल्याची आपल्याला प्रतीति येते. - ह्यास प्रमाण पूर्व जन्मींचे संस्कार अथवा स्मृति अनुभवास येते, हें होय. - ह्मणून सूक्ष्मशरीर जीवाबरोबर नेहमीं असतें हें सिद्धच आहे. - ॥ ३२ ॥ ज्या वेळेस अज्ञानानें आत्म्याचे ठिकाणीं कल्पिलेलीं हीं दोन स्थूल आणि सूक्ष्म शरीरें, स्वरूपाचें यथार्थ ज्ञान झाल्यानें, नष्ट होतील, तेव्हां तो जीवच ज्ञानरूप ब्रह्म होय. ॥ ३३ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

संसाररूपानें क्रीडा करणारी ही परमेश्वराची मायाच जेव्हां ज्ञानरूपानें परिणाम पावेल (ज्ञानरूप होईल), तेव्हां जीव कृतकृत्य होत्साता ब्रह्मत्वाप्रत पावतो, असें मानितात. (अभिप्राय एवढाच कीं, जितका वेळ पर्यंत ती परमेश्वरशक्ति माया अज्ञानरूपानें क्रीडा करीत आहे, तोंपर्यंत विराम पावत नाहीं; आणि तीच ज्ञानस्वरूपानें परिणाम पावली ह्मणजे, जसा अग्नि सर्व काष्ठें जाळिल्यावर आपोआप विझतो त्याप्रमाणें, ती माया, स्थूल व सूक्ष्म दोनही शरीरांचा नाश करून स्वतःही नष्ट होते. मग जीव ब्रह्मस्वरूपच आहे.) ॥३४॥ परमेश्वर सर्वांचा अंतर्यामी, स्वतः कोणतेंही कार्य न करणारा, व जन्मरहित आहे. त्याचीं वेदांमध्यें गुह्य रीतीनें वर्णन केलेलीं जीं जन्में व कर्में, त्यांचें अशा प्रकारें कवि वर्णन करीत

यदि एषा देवी वैशारदी (सर्वज्ञ ह्म० ईश्वर त्याची जी ती) **माया मतिः उपरता** (परिणाम पावलेली), **तदा संपन्नः** (स्वस्वरूपाला पोंहोंचलेला) **एव स्वे महिम्नि** (परमात्मस्वरूपीं) **महीयते** (शोभतो) [**इति**] **विदुः**. ॥३४॥ **कवयः हृत्पतेः** (अंतर्यामी जो त्याचीं) **अकर्तुः** (अकर्त्ता जो त्याचीं) **च अजनस्य** (जन्मरहित जो त्याचीं) **एवं वेदगुह्यानि** (वेदामध्यें गुह्य रीतीनें वर्णन केलेलीं) **जन्मानि कर्माणि च वर्णयंति** (वर्णन करितात) **स्म**. ॥३५॥ **अमोघलीलः** (व्यर्थ नाहीं क्रीडा ज्याची, असा) **सः इदं विश्वं सृजति** (उत्पन्न करितो), **अवति** (पालन करितो), **अत्ति** (संहार करितो); [**परं**] **अस्मिन् न सज्जते** (सक्त होत नाहीं); **षड्गुणेशः** (सहा इंद्रियांचा नियंता) **भूतेषु** (प्राणिमात्रांच्या ठिकाणीं) **अन्तर्हितः** (आंत राहिलेला) [**सन्**] **षाड्वर्गिकं** (सहा इंद्रियांचे जे विषय [**परं**] **अस्मिन् न सज्जते** (सक्त होत नाहीं); **षड्गुणेशः** (सहा इंद्रियांचा नियंता) **भूतेषु** (प्राणिमात्रांच्या ठिकाणीं) **अन्तर्हितः** (आंत राहिलेला) [**सन्**] **षाड्वर्गिकं** (सहा इंद्रियांचे जे विषय

यद्येषोपरता देवी माया वैशारदी मतिः ॥ सम्पन्न एवेति विदुर्महिम्नि स्वे महीयते ॥ ३४ ॥ एवं जन्मानि कर्माणि ह्यकर्तुरजनस्य च ॥ वर्णयन्ति स्म कवयो वेदगुह्यानि हृत्पतेः ॥ ३५ ॥ स वा इदं विश्वममोघलीलः सृजत्यवत्यत्ति न सज्जते ऽस्मिन् ॥ भूतेषु चान्तर्हित आत्मतन्त्रः षाड्वर्गिकं जिघ्रति षड्गुणेशः ॥ ३६ ॥ न चास्य कश्चिन्निपुणेन धातुरवैति जन्तुः कुमनीष ऊतीः ॥ नामानि रूपाणि मनोवचोभिः सन्तन्वतो नटचर्यामिवाज्ञः ॥ ३७ ॥

त्यांत) **जिघ्रति** (असक्त राहून उपभोग घेतो); [**परं**] **आत्मतंत्रः**. ॥ ३६ ॥ **अज्ञः** (अज्ञानी मनुष्य) **नटचर्यां** (बहुरुप्याच्या सोंगाला) **इव कुमनीषः** (कुबुद्धि पुरुष) **कश्चित् जन्तुः मनोवचोभिः** (मनानें व वेदवाणीनें) **नामानि रूपाणि च सन्तन्वतः** (विस्तृत करणाऱ्या ह्मणजे धारण करणाऱ्या) **धातुः** (ईश्वराच्या) **अस्य ऊतीः** (लीलांस) **निपुणेन** (तर्कानें) **न अवैति** (जाणत नाहीं). ॥ ३७ ॥

आले. ॥ ३९ ॥ तो ईश्वर ह्या जगाची उत्पत्ति पालन व नाश करितो; पण त्याचे ठिकाणीं कधींही सक्त होत नाहीं. - त्याचा सृष्टि करण्यामध्यें कांहींएक उद्देश नसतो; - तर त्याची क्रीडा कधींही व्यर्थ होत नाहीं (त्या क्रीडेपासून ह्या जगाची उत्पत्ति इत्यादि होतात). आणखी तोच ईश्वर, जग उत्पन्न केल्यावर, स्वतः सहा इंद्रियांचा प्रेरक होऊन प्राणिमात्रांच्या शरीरांमध्यें वास करून त्यात्या इंद्रियांचे जे सहा विषय त्यांचा, त्यांवर आसक्ति न ठेवितां, उपभोग घेतो. - जीवही उपभोग घेतो पण तो आसक्त होतो. ह्मणूनच ईश्वर स्वतंत्र आहे व जीव परतंत्र आहे. - ॥३६॥ जसें लहान मुलगा बहुरुप्याच्या कृती (सोंगें) जाणूं शकत नाहीं, तसें कुत्सित बुद्धीचा (परमेश्वराची भक्ति न करणारा) कोणीही

१ पांच ज्ञानेंद्रियें व मन. २ शब्द स्पर्श रूप रस गंध व मनन.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

प्राणी, त्याच्या (ईश्वराच्या) लीला कशा कशा आहेत तें केवळ तर्कानें जाणूं शकणार नाहीं. कारण, त्या परमेश्वराची शक्ति अशी आहे कीं, तो आपल्या मनानें पाहिजे तशीं रूपें धारण करूं शकतो, व वेदवचनाच्या योगानें नामेंही पुष्कळ धारण करूं शकतो. - तेव्हां त्याच्या लीला समजाव्या कशा? - ॥ ३७ ॥ आतां जो पुरुष परमेश्वराच्या चरणकमल-संबंधी गंधाचें, निष्कपटभावानें निरंतर अनुकूल वर्तन ठेवून, भजन करील (परमेश्वराची सेवा करील), तो मात्र त्या अनंतशक्ति चक्रपाणि परमेश्वराचे गुण जाणण्यास समर्थ होईल, दुसरा कोणीही होणार नाहीं. ॥३८॥ ऋषिहो, आपण सर्वज्ञ व कृतार्थ आहां; कारण, सर्व लोकांचा अधिपति जो श्रीकृष्ण त्याचे ठिकाणीं अशी निश्चित मनोभावना ठेवितां. एकवार **यः अमायया** (निष्कपट भावानें) **संततया** (निरंतर अशा) **अनुवृत्त्या** (अनुकूल वर्तनानें) **तत्पादसरोजगन्धं** (त्याच्या चरणकमलसंबंधी गन्धातें) **भजेत; सः परस्य धातुः दुरन्तवीर्यस्य** (अनन्तशक्ति अशा) **रथाङ्गपाणेः** (चक्रपाणि जो त्याच्या) **पदवीं** (गुणातें) **वेद.** ॥ ३८ ॥ **अथ इह भगवन्तः धन्याः, यत् अखिललोकनाथे** (सर्व लोकांचा अधिपति अशा) **वासुदेवे इत्थं** (याप्रकारें) **सर्वात्मकं आत्मभावं** (मनोवृत्तीतें) **कुर्वंति; यत्र** (ज्या भावाचे ठिकाणीं) **भूयः** (पुन्हां) **उग्रः** (भयंकर) **परिवर्त्तः** (ह्मणजे जन्ममरणरूपी भोंवरा) **न.** ॥ ३९ ॥

स वेद धातुः पदवीं परस्य दुरन्तवीर्यस्य रथाङ्गपाणेः ॥ यो ऽमायया सन्ततया ऽनुवृत्त्या
भजेत तत्पादसरोजगन्धम् ॥ ३८ ॥ अथेह धन्या भगवन्त इत्थं यद्वासुदेवे ऽखिललोकनाथे ॥
कुर्वन्ति सर्वात्मकमात्मभावं न यत्र भूयः परिवर्त उग्रः ॥ ३९ ॥ इदं भागवतं नाम पुराणं
ब्रह्मसम्मितम् ॥ उत्तमश्लोकचरितं चकार भगवानृषिः ॥ ४० ॥ निःश्रेयसाय लोकस्य धन्यं
स्वस्त्ययनं महत् ॥ तदिदं ग्राहयामास सुतमात्मवतां वरम् ॥ ४१ ॥

भगवान् ऋषिः उत्तमश्लोकचरितं इदं ब्रह्मसंमितं (सर्व वेदांच्या योग्यतेचें असें) **भागवतं नाम पुराणं चकार.** ॥४०॥ **लोकानां निःश्रेयसाय** (कल्याणाकरितां) **धन्यं** (कृतकृत्य करणारें) **महत् स्वस्त्ययनं** (लोकांच्या कल्याणाचा मार्ग दाखविणारें), **तत् इदं आत्मवतां** (ब्रह्मज्ञानी पुरुषांमध्यें) **वरं** (श्रेष्ठ अशा) **सुतं** (पुत्राला) **ग्राहयामास** (घेववितां झाला ह्मणजे शिकवितां झाला). ॥ ४१ ॥ तद्रूप चित्तवृत्ति बनली कीं, जीव जन्ममरणरूपी भोंवऱ्यांतून सुटतो. ॥ ३९ ॥ - आतां हें भागवत कोणीं व कशाकरितां केलें, कोणाला सांगितलें व मी कसें शिकलों, तें सांगतों, ऐका:- हें भगवद्गुणवर्णनानें भरलेलें भागवतनामक पुराण त्रिकालज्ञानी जे ऋषि व्यास त्यांनीं केलें. ह्या भागवताची योग्यता वेदांच्या योग्यतेसारखीच आहे. ॥ ४० ॥ हा ग्रंथ रचण्यामध्यें व्यासांचा उद्देश, सर्व लोकांचें कल्याण व्हावें, एवढाच होता. -तो कसा सिद्धीस गेला आहे, पहा:- भागवत हें स्वस्त्ययन ह्म० सर्वांना कल्याणाचा मार्ग दाखविणारें व सर्वांस कृतकृत्य करणारें आहे. तें हें (भागवत) व्यासांनीं आपल्या पुत्राला (शुकाचार्यांना) शिकविलें; - कारण, त्या शुकाचा अधिकारच मोठा होता:- सर्व

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ब्रह्मज्ञानी पुरुषांत तो श्रेष्ठ होता. ॥४१॥ - भागवताची योग्यता वेदांबरोबर आहे ह्मणून सांगितलें, त्याचें कारण हें कीं, - ह्या भागवतांत सर्व वेद व इतिहास ह्यांचें तत्व सांगितलें आहे. त्या शुकाचार्यांनीं हें राजाधिराज जो परीक्षित् त्याला ऐकविलें. ॥४२॥ - ऋषिहो, आपल्याला शंका येईल कीं,- राजा राज्यकारभारांत व्यग्र असावयाचा. त्याला हें ऐकण्यास वेळ सांपडला कसा ? तर ऐका - तो परीक्षित् प्रायोपवेशनामक व्रताचा संकल्प करून भागीरथीचे तीरीं बसला होता; व त्याच्या भोंवतीं महान् महान् ऋषीही बसले होते. ऋषिहो, मी त्या समुदायांत बसलों होतों. ते महातेजस्वी मुनि श्रीशुकाचार्य त्या ठिकाणीं भागवत सांगत असतां त्यांच्याच अनुग्रहानें मला हें अवगत झालें. आतां मी माझ्या अध्ययनाच्या **सर्ववेदेतिहासानां सारंसारं समुद्धृतं** (काढलेलें म्ह० सांगितलेलें). **सः तु महाराजं परीक्षितं संश्रावयामास** (ऐकविता झाला). ॥ ४२ ॥ [**कथंभूतं परीक्षितं**] **प्रायोपविष्टं** (प्रायोपवेशनामक व्रताचा संकल्प करून बसलेला अशा) **गंगायां परमर्षिभिः परीतं** (ज्याच्या सभोंवार ह्मणजे समीप आहेत अशा). **हे विप्राः, तत्र कीर्तयतः भूरितेजसः** (महातेजस्वी मुनिश्रेष्ठ ह्मणजे शुकाचार्य सांगत असतां) **विप्रर्षेः तत्र निविष्टः** (बसलेला) **अहं तदनुग्रहात् अध्यागमं** (जाणता झालों). ॥ ४३ ॥ **सः अहं यथाधीतं** (अध्ययनाच्या अनुरोधानें) **यथामति वः** (तुम्हांला)

सर्ववेदेतिहासानां सारं सारं समुद्धृतम् ॥ स तु संश्रवयामास महाराजं परीक्षितम् ॥ ४२ ॥
प्रायोपविष्टं गंगायां परीतं परमर्षिभिः ॥ तत्र कीर्तयतो विप्रा विप्रर्षेर्भूरितेजसः ॥ ४३ ॥
अहं चाध्यागमं तत्र निविष्टस्तदनुग्रहात् ॥ सो ऽहं वः श्रावयिष्यामि यथाऽधीतं यथामति ॥४४॥
कृष्णे स्वधामोपगते धर्मज्ञानादिभिः सह ॥ कलौ नष्टदृशामेष पुराणार्को ऽधुनोदितः ॥ ४५ ॥

॥ इति श्रीमद्भागवतार्थदर्शने प्रथमस्कंधे तृतीयोऽध्यायः ॥ ३ ॥

कथयिष्यामि (सांगेन). ॥ ४४ ॥ **कृष्णे धर्मज्ञानादिभिः सह** (धर्म ज्ञान इत्यादि सहित) **स्वधामोपगते** [सति] (निजधामाला गेला असतां) **नष्टदृशां** (नष्ट झाली आहे दृष्टि म्हणजे ज्ञान ज्यांची अशा लोकांस) **अधुना कलौ एषः पुराणार्कः** (पुराणरूपी सूर्य) **उदितः** (उगवलेला आहे). ॥ ४५ ॥ **इति श्रीद्भागवतान्वये तृतीयो ऽध्यायः ॥ ३ ॥**

अनुरोधानें व माझ्या बुद्धीला कळलें आहे तसें तें (भागवत) आपल्याला निवेदन करितों. ॥ ४३ ॥ ४४ ॥ कृष्णपरमात्मा निजधामास गेले, तेव्हां त्यांच्याबरोबर धर्म व ज्ञान ह्यांनीं सुद्धां पृथ्वीवरून प्रयाण केलें. मग सर्व लोकांच्या दृष्टि नष्ट झाल्या. सांप्रत कलियुगामध्यें त्यांना पुनः प्रकाश (ज्ञान) देण्याकरितां, हा पुराणरूपी (भागवत) सूर्य उगवला आहे. ॥ ४५ ॥

॥ इति श्रीमद्भागवतार्थदर्शने प्रथमस्कंधे तृतीयो ऽध्यायः ॥ ३ ॥

---

१ आजपासून मरण येईपर्यंत कांहीं खाणार नाहीं असा संकल्प करून बसणें.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

व्यास ह्मणतात :– ऋषींचें तें यज्ञकर्म पुष्कळ दिवस चालावयाचें होतें. त्यांमध्यें शौनकनामक ऋषींनीं, सूतानें 'भागवत सांगतों' असें ह्मटल्यावरून, त्याची स्तुति करून बोलण्यास प्रारंभ केला. - पुष्कळ ऋषि बसले असतां शौनकच बोलूं लागले ह्याचें कारण त्यांकडे तीन प्रकारांनीं बोलण्याचा अधिकार होता : पहा, - (१) ते वयानें वृद्ध होते; (२ रें), ते त्या ऋषिसमुदायांत मुख्य होते; व शिवाय (३ रें) ते ऋग्वेदी होते. ॥ १ ॥ सूता, तूं महाभाग्यशाली व उत्तम वक्ता आहेस. ह्मणून श्रीशुकाचार्यांनीं जी पवित्र भागवतकथा सांगतली ती आह्मांला निवेदन कर. ॥ २ ॥ ही कथा कोणते युगांत व कोणते ठिकाणीं उत्पन्न झाली, तसेंच ही करण्याचा हेतु कोणता, आणि भगवान् व्यास

व्यासः उवाच– (ह्मणाला) **दीर्घसत्रिणां** (पुष्कळ दिवस सत्र करणाऱ्या) **मुनीनां मध्ये वृद्धः कुलपतिः** (ऋषिसमुदायांत मुख्य) **बव्हृचः** (ऋग्वेदी) **शौनकः इति ब्रुवाणं** (ह्मणणाऱ्या) **सूतं** (सूताप्रत ह्मणजे सूताची) **संस्तूय** (स्तुति करून) **अब्रवीत्** (बोलला). ॥ १ ॥ **शौनकः उवाच– हे सूत महाभाग वदतां** (वक्त्यांमध्यें) **वर** (हे श्रेष्ठ) **सूत, नः पुण्यां भागवतीं कथां वद; यत्** [**यां कथां**] (ज्या कथेतें) **भगवान् शुकः आह** (सांगता झाला). ॥ २ ॥ **इयं कस्मिन् युगे वा कस्मिन् स्थाने** (कोणत्या ठिकाणीं) **केन हेतुना** (कोणत्या हेतूनें) **प्रवृत्ता** (उत्पन्न झाली),

व्यास उवाच । इति ब्रुवाणं संस्तूय मुनीनां दीर्घसत्रिणाम् ॥ वृद्धः कुलपतिः सूतं बव्हृचः शौनको ऽब्रवीत् ॥ १ ॥
शौनक उवाच । सूत सूत महाभाग वद नो वदता वर ॥ कथां भागवतीं पुण्यां यदाह भगवान् शुकः ॥ २ ॥
कस्मिन्युगे प्रवृत्तेयं स्थाने वा केन हेतुना ॥ कुतः संचोदितः कृष्णः कृतवान्संहितां मुनिः ॥ ३ ॥ तस्य पुत्रो महायोगी
समदृङ् निर्विकल्पकः ॥ एकान्तमतिरुन्निद्रो गूढो मूढ इवेयते ॥ ४ ॥

कुतः (कोणाकडून) **संचोदितः** (प्रेरणा केलेला) **मुनिः कृष्णः** (व्यास) **संहितां** (कथेतें) **कृतवान्** (करिता झाला)? ॥ ३ ॥ **तस्य** (त्याचा) **पुत्रः महायोगी समदृक्** (ब्रह्ममय दृष्टि आहे ज्याची, असा) **निर्विकल्पकः** (नाहींसा झाला आहे भेदभाव ज्याचा असा) **एकांतमतिः** (सर्वत्र एक ब्रह्म असा ज्याच्या बुद्धीचा निश्चय झाला असा) **उन्निद्रः** (जागृत ह्मणजे मायारूपी निद्रेपासून नेहमीं जागा) **गूढः** (गुप्त ह्मणजे अप्रसिद्ध) **मूढः** (अज्ञानी) **इव ईयते** (भासतो). ॥ ४ ॥

मुनींनीं जी ही कथा लिहिली ती कोणाच्या सांगण्यावरून ? ॥ ३ ॥ आणखी - तूं सांगतोस कीं, श्रीशुकाचार्यांनीं परीक्षित् राजाला ही कथा सांगितली; पण ही गोष्ट तर अशक्य दिसते; कारण, - त्या व्यासांचे पुत्र जे श्रीशुकाचार्य त्यांची दृष्टि तर ब्रह्ममय झालेली, त्यांचे मनांत भेदबुद्धि नाहींच; सर्व एकच आहे अशी त्यांची मति दृढ झाली आहे; कारण, ते जागृत ह्म० अज्ञानरहित आहेत. हें त्यांचें खरें स्वरूप कोणालाच समजत नाहीं, तर लोकांना 'हा जड (वेडा) आहे' असें वाटतें. ॥ ४ ॥

१ कोणतीही सूचना करण्याचा, व कोणाही आला असतां त्याचें आदरातिथ्य, आणि कुशलप्रश्न वगैरे करण्याचा अधिकार समुदायामध्यें वयोवृद्ध मनुष्याकडे असतो; वृद्ध पुष्कळ असले तर त्या गणांत जो वृद्ध मुख्य असेल त्याकडे सर्व अधिकार असतो; मुख्यही पुष्कळ असले तर ते अधिकार ऋग्वेद्याकडे असतात; शौनकाचे ठिकाणीं ते सर्व गुण होते.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

- शुकाचार्यांच्या मनांत भेदबुद्धि नाहीं, ह्याबद्दल दृष्टांताकरितां एक गोष्ट सांगतों : - शुकाचार्य सर्वसंगपरित्याग करून दिगंबर (नग्न) होत्साते निघून गेले; - कांहीं वेळानें व्यासही त्या आपल्या पुत्राच्या पाठीमागून त्याला परतविण्याकरितां जाऊं लागले. - पुढें शुक व पाठीमागें कांहीं अंतरावर व्यास असे चालले होते. जातां जातां वाटेंत एक तलाव लागला. त्या तलावांत अप्सरा नग्न होऊन जलक्रीडा करीत होत्या. - तेथें शुक प्रथम पोंचले; पण अप्सरांनीं आपली जलक्रीडा निर्भीडपणें चालूं दिली होती. शुक पुढें चालते झाले. पाठीमागून व्यास तेथें पोंचले. ते कांहीं नग्न नव्हते. व्यासांना पाहातांच अप्सरा लाजल्या व त्यांनीं आपलीं वस्त्रें परिधान केलीं. तेव्हां व्यासांना ह्या गोष्टीचें अश्चर्य वाटलें व त्यांनीं अप्सरांना प्रश्न केला - कीं, 'शुक येथून नग्न गेला, त्याला पाहून तुम्हीं लाजलां नाहीं व मी वृद्ध येथें वस्त्रें परिधान करून आलों असतांही तुम्हांला लाज वाटली, ह्याचें

अनग्नं (नव्हे जो नग्न, अशा) **अपि आत्मजं** (पुत्राच्या) **अनुयातं** (मागून जाणाऱ्या) **ऋषिं दृष्ट्वा देव्यः** (अप्सरा) **ह्रिया** (लज्जेनें) **परिदधुः** (वस्त्रें परिधान करित्या झाल्या); **सुतस्य [ह्रिया] न. तत् चित्रं** (आश्चर्यातें) **वीक्ष्य** (पाहून) **मुनौ पृच्छति** (मुनीनें ह्मणजे व्यासानें विचारिलें असतां) **जगदुः** (सांगत्या झाल्या). **तव स्त्रीपुंभिदा** (स्त्री व पुरुष हा भेद ह्म० भेददृष्टि) **अस्ति, विविक्तदृष्टेः** (पावन दृष्टि आहे ज्याची अशा) **सुतस्य** (पुत्राला) **तु न.** ॥ ५ ॥ **कुरुजांगलान्** (कुरु व जांगल नामक देशांना) **संप्राप्तः** (प्राप्त झालेला म्हणजे गेलेला) **उन्मत्त-**

दृष्ट्वा ऽनुयातमृषिमात्मजमप्यनग्नं देव्यो ह्रिया परिदधुर्न सुतस्य चित्रम् ॥ तद्वीक्ष्य पृच्छति मुनौ जगदुस्तवास्ति
स्त्रीपुंभिदा न तु सुतस्य विविक्तदृष्टेः ॥ ५ ॥ कथमालक्षितः पौरैः संप्राप्तः कुरुजाङ्गलान् ॥ उन्मत्तमूकजडवद्विचरन्गज-
साह्वये ॥ ६ ॥ कथं वा पांडवेयस्य राजर्षेर्मुनिना सह ॥ संवादः समभूत्तात यत्रैषा सात्वती श्रुतिः ॥ ७ ॥

मूकजडवत् (उन्मत्त मुक्या किंवा वेड्यासारिखा) **गजसाह्वये** (हस्तिनापुरांत) **विचरन्** (फिरणारा म्हणजे जाणारा) **पौरैः** (लोकांकडून) **कथं आलक्षितः** (ओळखिला गेला) ? ॥ ६ ॥ हे **तात, पांडवेयस्य** (पांडव वंशांत जन्मलेला अशा) **राजर्षेः मुनिना सह संवादः कथं समभूत्** (झाला); **यत्र एषा सात्वती** (भागवतरूपी) **श्रुतिः** (संहिता म्ह० ग्रंथ) ? ॥ ७ ॥

कारण काय?' त्यावर अप्सरांनीं व्यासांना लाजण्याचें कारण सांगितलें : - "मुनिवरा, तुमच्या मनांत 'ही स्त्री आणि हा पुरुष' असा भेद आहे; पण तुमच्या पुत्राची दृष्टि पवित्र आहे, त्याला स्त्री पुरुष ही भेदबुद्धि मुळींच नाहीं." असो. ॥ ५ ॥ शुकाचार्य प्रथम कुरु व जांगलनांवाच्या देशांत प्राप्त झाले, आणि पुढें हस्तिनापुरांत गेले. पण सूता! तेथील लोकांनीं त्यांना ओळखिलें कसें! - शंका यावयास कारण हें कीं - ते स्वतः उन्मत्तासारखे, मुक्याप्रमाणें अथवा जसा एखादा वेडा असतो तसे फिरत असत. (अर्थात, ते मोठे ज्ञानी आहेत, असें समजण्याला मार्ग नव्हता; मग ही गोष्ट घडली कशी?) ॥ ६ ॥ सूता! पांडवांच्या वंशांतील राजार्षि जो परीक्षित्, त्याचा आणि शुकमुनींचा संवाद कसा झाला? - विचारावयाचें कारण एवढेंच कीं - त्या संवादामुळें ही भागवतरूपी संहिता निर्माण झाली. ॥ ७ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

- शिवाय, हें भागवत सगळें सांगावयाला पुष्कळ वेळ पाहिजे व शुकमुनि तर एके ठिकाणीं पुष्कळ वेळ कधींही रहात नसत: - त्या महाभाग्यशाली पुरुषाचा असा नियम असे कीं, गृहस्थाश्रम्यांच्या घरीं गेल्यावर, गाईची धार काढण्यास जितका वेळ लागतो, तेवढा वेळपर्यंत उभें रहावयाचें, अधिक वेळ कधींही राहावयाचें नाहीं; व तें देखील केवळ भिक्षेच्या उद्देशानेंच नव्हे; तर आपल्या आगमनानें त्याचें गृह पवित्र व्हावें ह्यासाठीं. तेव्हां, एवढें मोठें भागवत सांगणें त्यांच्याकडून कसें घडलें? ॥ ८ ॥ सूता, अभिमन्युचा पुत्र परीक्षित् उत्तम भगवद्भक्त होता, असें ह्मणतात. त्याचें जन्म फार अद्भुत रीतीनें झालें; तें जन्मवृत्त व त्याचें चरित्र आह्मांला सांग. ॥ ९॥ पांडववंशाची

हि सः महाभागः गृहमेधिनां (गृहस्थाश्रम्यांच्या) **गृहेषु तदाश्रमं** (त्यांच्या गृहांला) **तीर्थीकुर्वन्** (पवित्र करणारा) **गोदोहनमात्रं** (गाईच्या दोहनाला जितका वेळ लागतो तितकाच वेळपर्यंत) **अवेक्षते** (ह्मणजे वाट पाहात उभा राहतो). ॥ ८ ॥ **सूत, अभिमन्युसुतं भागवतोत्तमं प्राहुः** (ह्मणतात); **तस्य महाश्चर्यं** (फार आश्चर्यकारक) **जन्म कर्माणि च नः गृणीहि** (सांग). ॥ ९ ॥ **पांडूनां मानवर्धनः** (कीर्ति वाढविणारा) **सः सम्राट्** (राजा) **कस्य वा हेतोः अधिराट्श्रियं** (सार्वभौम राजलक्ष्मीला लक्ष्मीचा) **अनादृत्य** (अनादर करून) **गङ्गायां**

स गोदोहनमात्रं हि गृहेषु गृहमेधिनाम् ॥ अवेक्षते महाभागस्तीर्थीकुर्वंस्तदाश्रमम् ॥ ८ ॥
अभिमन्युसुतं सूत प्राहुर्भागवतोत्तमम् ॥ तस्य जन्म महाश्चर्यं कर्माणि च गृणीहि नः ॥ ९ ॥
स सम्राट् कस्य वा हेतोः पांडूनां मानवर्धनः ॥ प्रायोपविष्टो गंगायामनादृत्याधिराट्श्रियम् ॥१०॥
नमन्ति यत्पादनिकेतमात्मनः शिवाय हानीय धनानि शत्रवः ॥ कथं स वीरः श्रियमंग
दुस्त्यजां युवैषतोत्सृष्टुमहो सहासुभिः ॥ ११ ॥

प्रायोपविष्टः (प्रायोपवेश करून बसलेला). ॥ १० ॥ **शत्रवः आत्मनः** (आपल्या) **शिवाय** (कल्याणासाठीं) **धनानि आनीय** (आणून) **यत्पादनिकेतं** (ज्याच्या पायांच्या आधाराला ह्मणजे सिंहासनाला) **नमन्ति** (नमन करितात); **अंग,** (हे सूता) **युवा** (तरुण) **सः वीरः दुस्त्यजां** (सोडण्यास कठीण—अशक्य—अशा) **श्रियं असुभिः सह** (प्राणांसहित) **उत्सृष्टुं** (सोडण्यास) **कथं वा ऐषत** (इच्छिता झाला)? **अहो!** ॥ ११ ॥

कीर्ति वाढविणारा तो परीक्षित्, स्वतः सार्वभौम राजा असतां, सर्व राज्यश्रीचा अनादर करून, गंगेच्या तीरीं प्रायोपवेश व्रत स्वीकारून बसला, ह्याचें कारण काय? ॥ १० ॥ ज्याच्या सिंहासनापुढें शत्रु आपलें कल्याण व्हावें ह्या हेतूनें पुष्कळ द्रव्यें आणून ठेवून नमन करीत असत, त्या महापराक्रमी परीक्षित्राजानें सार्वभौम राज्यलक्ष्मीचा त्याग केला कसा? - पुष्कळ दिवस उपभोग घेतल्यावर वृद्धपणीं ती सोडून दिली असती तर असो; पण तशी कांहीं गोष्ट याचे ठिकाणीं नव्हती, तर - हा तरुण होता. अशा स्थितींत राज्यलक्ष्मी सोडणें सर्वथा अशक्य, मग त्यानें सोडली कां? - तूं तर ह्मणतोस कीं, तो प्रायोपवेश करून बसला होता. तर - त्याच्यावर असें कोणतें संकट आलें होतें कीं

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ज्यामुळें तो जीवावर उदार झाला! ॥११॥ भगवद्भक्त शरीरधारण करितात, त्याचें मुख्य कारण त्यांचा स्वार्थ साधावा हें नव्हे; तर त्या शरीरापासून लोकांस सुख व्हावें, त्यांचा उत्तरोत्तर उत्कर्ष व्हावा आणि त्यांना ऐश्वर्यप्राप्ति व्हावी, हें होय. असें असतां, ह्या महाभगवद्भक्त परीक्षितानें, ज्या शरीराच्या आश्रयावर कोट्यवधि लोकांस सुख-प्राप्ति व्हावयाची, त्या शरीराची, विरक्त होऊन, अनवस्था कां केली! लोकांच्या जीविकेचा स्वतां विच्छेद करणें चांगलें नव्हे. ॥ १२ ॥ सूता, ज्या कांहीं गोष्टी आम्ही आतां विचारिल्या त्या सर्व आम्हांला सांग - तें सांगण्याची योग्यता तुझे आंगीं आहे, कारण - तूं वक्तृत्वकलेमध्यें पारंगत आहेस, हें मीं जाणतों. आतां, एक वेदांचें

ये जनाः उत्तमश्लोकपरायणाः [ते] लोकस्य शिवाय भवाय (समृद्धीकरितां) **भूतये** (ऐश्वर्याकरितां) **जीवंति** (राहतात ह्मणजे शरीर धारण करितात), **आत्मार्थं** (स्वार्थाकरितां) **न, असौ** (हा) **निर्विद्य** (विरक्त होऊन) **पराश्रयं** (दुसऱ्या ह्मणजे लोकांस आश्रय देणाऱ्या) **कलेवरं** (शरीराला) **कुतः** (कां) **मुमोच** (सोडिता झाला). ॥ १२ ॥ **यत् किंचन इह** (येथें) **पृष्टः तत् सर्वं नः समाचक्ष्व** (सांग). **छांदसात्** (वेदाहून) **अन्यत्र** (इतर विषयांत) **वाचां** (वक्तृत्वाच्या) **विषये त्वां स्नातं** (प्रवीण अशा) **मन्ये** (समजतों). ॥ १३ ॥

शिवाय लोकस्य भवाय भूतये य उत्तमश्लोकपरायणा जनाः ॥ जीवन्ति नाऽऽत्मार्थमसौ पराश्रयं मुमोच निर्विद्य कुतः कलेवरम् ॥ १२ ॥ तत्सर्वं नः समाचक्ष्व पृष्टो यदिह किंचन ॥ मन्ये त्वां विषये वाचां स्नातमन्यत्र छान्दसात् ॥ १३ ॥ सूत उवाच । द्वापरे समनुप्राप्ते तृतीये युगपर्यये ॥ जातः पराशराद्योगी वासव्यां कलया हरेः ॥ १४ ॥ स कदाचित्सरस्वत्या उपस्पृश्य जलं शुचि ॥ विविक्त एक आसीन उदिते रविमण्डले ॥१५॥ परावरज्ञः स ऋषिः कालेनाव्यक्तरंहसा ॥ युगधर्मव्यतिकरं प्राप्तं भुवि युगे युगे ॥१६॥

तृतीये युगपर्यये (युगांच्या चौकडींत) **द्वापरे समनुप्राप्ते पराशरात् वासव्यां** (वसूच्या कन्येच्या ठिकाणीं) **हरेः कलया** (विष्णूच्या अंशानें) **योगी जातः** (उत्पन्न झालेला). ॥ १४ ॥ **सः कदाचित्** (एके वेळीं) **सरस्वत्याः शुचि जलं उपस्पृश्य** (स्नानादि कर्मे करून) **रविमण्डले उदिते** (सूर्यमंडल उदय पावलें असतां म्ह० सूर्योदय झाल्यावर) **विविक्ते** (एकांतांत) **एकः आसीनः** (बसलेला). ॥ १५ ॥ **परावरज्ञः** (भूत भविष्य जाणणारा) **अमोघदृक्** (ज्याची विचारदृष्टि व्यर्थ न होणारी असा) **सः मुनिः ऋषिः अव्यक्तरंहसा** (व्यक्त न झाली आहे ह्म० प्रत्यक्ष ज्ञान तुला नाहीं; - कारण तूं ब्राह्मण, क्षत्रिय अथवा वैश्य ह्या तीनही वर्णांतील नसल्यामुळें तुला वेदपठनाचा अधिकारच नाहीं; तेव्हां तुझा निरुपाय आहे. - बाकी इतर सर्व विषयांत तूं प्रवीण आहेस. ॥१३॥ सूत ह्मणालेः– युगांच्या तिसऱ्या चौकडींतील द्वापर युगामध्यें, पराशरऋषीपासून, उपरिचरनामक वसूची कन्या जी सत्यवती, तिच्या उदरीं योगी व्यासांचें जन्म झालें. हा एक विष्णूचा अंशावतारच होय. ॥ १४ ॥ ते व्यास एके दिवशीं - बदरिकाश्रमीं - सरस्वतीच्या शुद्धोदकांत संध्यादिक नित्य कर्मे आटोपून सूर्योदय झाल्यावर एकांतामध्यें बसले होते. ॥ १५ ॥ (येथें आगोदर थोडा पूर्व वृत्तांत सांगणें अगत्याचें आहे, तो सांगतोंः–) त्या मुनींना तीन्ही काळीं घडणाऱ्या

१ कृत, त्रेता, द्वापार आणि कलि हीं चार युगें एकामागून एक नेहमीं चालावयाचीं, हीं चार युगें संपलीं ह्मणजे एक चौकडी झाली; मग पुनः दुसऱ्या चौकडींतील कृत युगास प्रारंभ. ६

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

गोष्टी कळत असत. त्यांना आपल्या ज्ञानदृष्टीच्या योगें असें दिसून आलें कीं, कृत, त्रेता, द्वापर आणि कलि ह्या प्रत्येक युगांतील धर्माचरणाचे मार्ग निराळे असतांही पृथ्वीवर युगायुगाचे ठायीं उत्तरोत्तर धर्मसंकर होत चालला आहे; यास कारण ही कालगति; अनादि काल नेहमीं चालत असल्यामुळें व त्याची गति कोणाच्याही लक्षांत न आल्यामुळें धर्माचरणांत झालेले फेरफारही कोणाच्या ध्यानांत येत नाहींत; पण फार दिवसांच्या पाठीमागील धर्माचा, व सध्यां चालत आलेल्या धर्माचा मेळ पाहूं गेलें असतां, त्यांत व्यतिकर झालासा दिसतो; ॥ १६ ॥ तसेंच त्या कालगतीमुळें पंचभूतांचीं कार्यें जीं शरीरादिक, त्यांच्याही शक्ति उत्तरोत्तर क्षीण होत चालल्या; शक्ति गेल्यामुळें सर्व प्राणी धैर्यशून्य झाले; त्यांच्या बुद्धि मंद झाल्या; व कोणाच्या मनांत धर्माविषयीं भक्ति राहिली नाहीं; सर्वांच्या आयुष्याचें मानही उत्तरोत्तर कमी होत गेलें; ॥ १७ ॥ आणि पुरुष

लक्षांत न आली आहे गति ज्याची अशा) **कालेन युगधर्मव्यतिकरं** (युगांतील धर्मसंकारातें) **प्राप्तं** (झालेल्या) **वीक्ष्य** (पाहून), **भुवि** (पृथ्वीवर) **युगे युगे च भौतिकानां** (पंच भूतांच्या) **भावानां** (कार्याचा ह्म० शरीरादिकांचा) **तत्कृतं** (त्यानें म्ह० कालानें केलेल्या) **शक्तिव्हासं** (शक्तीच्या क्षीणतेला) **जनान् च अश्रद्दधानान्** (धर्मावर भक्ति न ठेवणाऱ्यांतें) **निःसत्वान्** (धैर्यशून्य अशांतें) **दुर्मेधा न्** (मंदबुद्धि अशांस) **व्हासितायुषः** (क्षीण झाली आहे आयुष्यमर्यादा ज्यांची, अशांस) **दुर्भगान्** (मंदभाग्य अशांस) **वीक्ष्य दिव्येन चक्षुषा सर्ववर्णाश्रमाणां यत् हितं [तत्] दध्यौ** (विचार करूं लागला).

भौतिकानां च भावानां शक्तिव्हासं च तत्कृतम्॥ अश्रद्दधानान्निःसत्त्वान्दुर्मेधान् व्हसितायुषः ॥ १७॥ दुर्भगांश्च जनान्वीक्ष्य मुनिर्दिव्येन चक्षुषा ॥ सर्ववर्णाश्रमाणां यद्दध्यौ हितममोघदृक् ॥ १८ ॥ चातुर्होत्रं कर्म शुद्धं प्रजानां वीक्ष्य वैदिकम् ॥ व्यदधाद्यज्ञसन्तत्यै वेदमेकं चतुर्विधम् ॥१९॥ ऋग्यजुःसामाथर्वाख्या वेदाश्चत्वार उद्धृताः ॥ इतिहासपुराणं च पंचमो वेद उच्यते ॥ २० ॥ तत्रर्ग्वेदधरः पैलः सामगो जैमिनिः कविः ॥ वैशम्पायन एवैको निष्णातो यजुषामुत ॥ २१ ॥

॥१६॥१७॥१८॥ **चातुर्होत्रं** (चातुर्होत्र नांवाच्या) **वैदिकं कर्म प्रजानां शुद्धं** (अंतःकरण शुद्ध करणाऱ्या) **वीक्ष्य यज्ञसंतत्यै** (यज्ञ निरंतर चालण्याकरितां) **एकं वेदं चतुर्विधं व्यदधत्** (करिता झाला). ॥१९॥ **ऋग्यजुःसामाथर्वाख्याः चत्वारः वेदाः उद्धृताः** (पृथक् केले), **इतिहासपुराणं च पंचमः वेदः उच्यते** (ह्मटला जातो). ॥ २० ॥ **तत्र ऋग्वेदधरः** (ऋग्वेद धारण करणारा) **पैलः सामगः** (साम वेद गायन करणारा) **कविः जैमिनिः, उत** (आणि) **यजुषां** (यजुर्वेदाचा ह्म० यजुर्वेदांत) **निष्णातः एकः वैशंपायनः एव.** ॥ २१ ॥

मंदभाग्य झाले. तेव्हां आतां यांना हिताचा मार्ग कोणता दाखवावा असा विचार व्यास करूं लागले. व पुढें लिहिल्याप्रमाणें त्यांनीं तो शोधून काढला; - कारण त्यांचें सामर्थ्यच तसें होतें; - त्यांची विचारदृष्टि कधीं व्यर्थ होत नसे. (ज्या गोष्टीचा विचार करूं लागतील, तीबद्दल त्यांना कांहींतरी युक्ति सुचतच असे.) ॥ १८ ॥ वेदांतील चातुर्होत्र कर्म हें लोकांच्या अंतःकरणशुद्धीस उत्तम साधन आहे, असें पाहून, यज्ञही निरंतर चालावे एवढ्याकरितां, व्यासांनीं, वेद मूळचा एक असतां, त्याचे चार भाग केले. ॥ १९ ॥ ते चार भाग ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद, अथर्ववेद हे होत. व इतिहास आणि अठरा पुराणें मिळून पांचवा वेद. ॥ २० ॥ त्यामध्यें ऋग्वेद धारण करणारा पैलनामक ऋषि

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

होऊन गेला. विद्वान् जैमिनिनामक एक ऋषि सामगायन करणारा झाला. व यजुर्वेदांत निष्णात असा एक वैशंपायन नांवाचा ऋषि झाला. ॥ २१ ॥ सुमंतु नामक उग्र ऋषि अथर्वांगिरस नामक चतुर्थ वेदामध्यें निपुण होऊन गेला. आणि माझा पिता रोमहर्षण, इतिहास व पुराणें ह्यांचा पूर्ण ज्ञानी असे. ॥ २२ ॥ त्या पैलादि ऋषींनीं आपल्या ऋग्वेदादिक वेदांचे अनेक विभाग केले, व आपल्या निरनिराळ्या शिष्यांस अध्ययन करावयास दिले. त्यांनीं त्यांचे तसेच भाग पाडून आपल्या शिष्यांस दिले; व त्या शिष्यांनींही तसेंच करून आपल्या शिष्यांस शिकविले; या रीतीनें त्या वेदाच्या शाखा झाल्या. ॥ २३ ॥ - पूर्वी लोक बुद्धिमान् असल्यामुळें

दारुणः (उग्र) मुनिः सुमंतुः अथर्वांगिरसां[1] [निष्णातः] आसीत्, मे पिता रोमहर्षणः इतिहासपुराणानां [निष्णातः].॥ २२ ॥ ते एते ऋषयः स्वं स्वं (आपापल्या) वेदं अनेकधा (पुष्कळ प्रकारांनीं) व्यस्यन् (विभागिते झाले); ते वेदाः शिष्यैः प्रशिष्यैः (शिष्यांच्या शिष्यांनीं) तच्छिष्यैः (यांच्या ह्मणजे शिष्यांच्या शिष्यांच्या शिष्यांनीं) शाखिनः (शाखायुक्त असे) अभवन् (झाले). ॥ २३ ॥ ते एव वेदाः दुर्मेधैः (निर्बुद्ध अशा) पुरुषैः यथा (ज्या रीतिनें) धार्यंते; (धारण केले जातात) एवं (अशा रीतीनें) कृपणवत्सलः (दीनांचा कनवाळू)

अथर्वाङ्गिरसामासीत्सुमन्तुर्दारुणो मुनिः ॥ इतिहासपुराणानां पिता मे रोमहर्षणः ॥ २२ ॥ त एत ऋषयो वेदं
स्वं स्वं व्यस्यन्ननेकधा ॥ शिष्यैः प्रशिष्यैस्तच्छिष्यैर्वेदास्ते शाखिनो ऽभवन् ॥ २३ ॥ त एव वेदा दुर्मेधैर्धार्यन्ते
पुरुषैर्यथा ॥ एवं चकार भगवान्व्यासः कृपणवत्सलः ॥ २४ ॥ स्त्रीशूद्रद्विजबन्धूनां त्रयी न श्रुतिगोचरा ॥
कर्मश्रेयसि मूढानां श्रेय एवं भवेदिह ॥ इति भारतमाख्यानं कृपया मुनिना कृतम् ॥ २५ ॥ एवं प्रवृत्तस्य
सदा भूतानां श्रेयसि द्विजाः ॥ सर्वात्मकेनापि यदा नातुष्यद्धृदयं ततः ॥ २६ ॥

भगवान् व्यासः चकार. ॥ २४ ॥ स्त्रीशूद्रद्विजबन्धूनां (स्त्रिया, शूद्र, व त्रैवर्णिकांतले अधम अशांना) त्रयी (वेदत्रयी) न श्रुतिगोचरा (जिचें श्रवण पठण करण्यास अधिकार नाहीं, अशी) मूढानां कर्मश्रेयसि (कर्मकाण्डरूपी कल्याणमार्गाविषयीं अनधिकारी अशांचें) इह श्रेयः (कल्याण) एवं भवेत्, इति (ह्मणून) मुनिना भारतं आख्यानं कृपया कृतम्. ॥ २५ ॥ [हे] द्विजाः, एवं सदा सर्वात्मकेन (सर्वतोपरी) अपि भूतानां (प्राणिमात्रांच्या) श्रेयसि प्रवृत्तस्य (झटणाऱ्याचें) यदा हृदयं न अतुष्यत् (संतुष्ट झालें); ततः, ॥ २६ ॥

त्यांना समग्र वेद शिकतां येत असे, आतांच्या निर्बुद्ध लोकांना तो शिकतां येणार नाहीं, हें मनांत आणून, - अर्वाचीन निर्बुद्ध लोकांना तो शिकतां यावा एवढ्याकरितां, दयाळु व्यासमुनींनीं वेदाचे विभाग करून ठेविले. ॥ २४ ॥ स्त्रिया, शूद्र व ब्राह्मणाधम ह्या तीन प्रकारच्या लोकांना वेदपठनाचा अधिकार नाहीं, अर्थात यज्ञादि अनुष्ठानाच्यायोगें आपलें कल्याण करून घेतां येणार नाहीं. त्या अज्ञानी लोकांचें कल्याण व्हावें, ह्या हेतूनें व्यासांनीं कृपा करून भारतरूपी आख्यान रचिलें. ॥ २५ ॥ या पूर्वोक्त प्रकारांनीं

---

१ अथर्व वेदांत जारण मारण असल्यामुळें तो वेद भयंकर आहे. शांत मनुष्याला त्याचें धारण करितां आलें नसतें. ह्मणून, उग्र असा सुमंतुऋषिच त्या वेदाच्या पठणास योग्य अधिकारी होता.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

प्राणिमात्रांचें कल्याण करण्यासाठीं सर्वतोपरी झटत असतांही, व्यासांचे अंतःकरणास संतोष होईना; तेव्हां, ॥ २६ ॥ त्यांचें मन उदास झालें. अशा स्थितींत ते प्रस्तुत प्रसंगी सरस्वती नदीच्या शुद्ध तीरावर बसून राहिले होते. अंतःकरण प्रसन्न न होण्यास कारण काय असावें, ह्याबद्दल तर्क करितां करितां ते धर्मज्ञानी मुनि एकांतांत आपल्याशींच बोलूं लागले : तें भाषण येणें प्रमाणें :– ॥२७॥ मी, - गुरूंनीं अथवा वेदांनीं - जसजशीं व्रतें आचरण करण्यास सांगितलीं आहेत त्यांप्रमाणें पाळून वेद, गुरु व अग्नि यांची निष्कपटपणें पूजा केली; त्यांच्या आज्ञाही तशाच प्रकारें मान्य केल्या; ॥ २८ ॥ आणि भारताच्या मिषानें वेदांचा अर्थ लोकांस दाखवून दिला. उद्देश एवढाच कीं, त्या ग्रन्था(भारता)च्या

नातिप्रसीददृदयः (अति प्रसन्न नाहीं अंतःकरण ज्याचें, असा) **सरस्वत्याः शुचौ** (शुद्ध अशा) **तटे वितर्कयन्** (विचार करणारा) **विविक्तस्थः** (एकांतांत बसलेला) **धर्मवित्** (धर्मवेत्ता) **इदं** (अशा प्रकारें) **प्रोवाच** (बोलता झाला). ॥ २७ ॥ **हि धृतव्रतेन** (व्रतें धारण करणाऱ्या) **मया** (मजकडून) **छंदांसि** (वेद) **गुरवः अग्नयः निर्व्यलीकेन** (निष्कपटपणें) **मानिताः** (पूजिलेले) **अनुशासनं** (आज्ञा) **च गृहीतं** (धारण केलें). ॥ २८ ॥ **भारतव्यपदेशेन** (भारताच्या मिषानें) **आम्नायार्थः** (वेदांचा अर्थ) **दर्शितः** (दाखविला); **यत्र स्त्रीशूद्रादिभिरपि धर्मादि**

नातिप्रसीदद्धृदयः सरस्वत्यास्तटे शुचौ ॥ वितर्कयन्विविक्तस्थ इदं प्रोवाच धर्मवित् ॥ २७ ॥ धृतव्रतेन हि मया छन्दांसि गुरवो ऽग्नयः ॥ मानिता निर्व्यलीकेन गृहीतं चानुशासनम् ॥ २८ ॥ भारतव्यपदेशेन ह्याम्नायार्थश्च दर्शितः ॥ दृश्यते यत्र धर्मादि स्त्रीशूद्रादिभिरप्युत ॥२९॥ अथापि बत मे दैह्यो ह्यात्मा चैवाऽऽत्मना विभुः ॥ असम्पन्न इवा ऽऽभाति ब्रह्मवर्च-स्यसत्तमः ॥ ३० ॥ किंवा भागवता धर्मा न प्रायेण निरूपिताः ॥ प्रियाः परमहंसानां त एव ह्यच्युतप्रियाः ॥ ३१ ॥

(धर्म आदिकरून) **दृश्यते** (पाहिलें जातें). ॥ २९ ॥ **अथापि** (असें असतांही) **बत** (खेदार्थी अव्यय) **ब्रह्मवर्चस्यसत्तमः** (ब्रह्मतेजानें युक्त अशा साधूंमध्यें श्रेष्ठ असा) **मे दैह्यः** (देहसंबंधी आत्मा ह्म० जीवात्मा) **विभुः** (व्यापक, पूर्ण) **आत्मा आत्मना** (स्वस्वरूपाशीं) **असंपन्नः** (ऐक्य न पावलेला) **इव आभाति.** ॥ ३० ॥ **किंवा परमहंसानां** (निष्काम भक्ति करणाऱ्या साधूंना) **प्रियाः भागवताः धर्माः प्रायेण** (मुख्यत्वेंकरून) **न निरूपिताः** (प्रतिपादन केलेले); **हि ते एव अच्युताप्रियाः** (ईश्वरास प्रिय असे). ॥ ३१ ॥

साह्यानें स्त्री व शूद्र इत्यादिकांनाही (वेदाचा ज्यांना अधिकार नाहीं अशांना) धर्मज्ञान करून घेतां यावें. ॥ २९ ॥ असें असतांही (मी लोकांस धर्ममार्ग दाखवितों असें असूनही), ब्रह्मतेजानें पूर्ण अशा साधूंमध्यें श्रेष्ठ जो माझा जीव तो वास्तविक परिपूर्ण असून ' स्वस्वरूपाशीं ऐक्य पावला नाहीं ' असा भासतो! ॥ ३० ॥ आतां, भागवत धर्म परमहंसांना प्रिय असतात, व तेच धर्म परमेश्वरासही प्रिय आहेत, ही गोष्ट खरी आहे. असें असतां, मुख्यत्वेंकरून त्यांचें प्रतिपादन करणारा ग्रंथ

१ निष्काम भगवद्भक्ति करणारे विरक्त जन.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

मी केला नाहीं; ह्मणून माझें अंतःकरण प्रसन्न होत नाहीं कीं काय? ॥ ३१ ॥ ते व्यास, स्वतांला 'कृत्यकृत्य झालों नाहीं' असें मानून, अशाप्रकारें खेद करीत असतां, पूर्वी वर्णन केलेल्या त्यांच्या आश्रमामध्यें नारदमुनि प्राप्त झाले. ॥ ३२ ॥ नारद आले असें कळल्याबरोबर, व्यास त्यांना मान देण्याकरितां एकदम उभे राहिले, व त्यांनीं देवांसही पूज्य अशा नारदाची यथाविधि पूजा केली. ॥ ३३ ॥

॥ इति श्रीमद्भागवतार्थदर्शने प्रथमस्कंधे चतुर्थो ऽध्यायः ॥ ४ ॥

एवं आत्मानं खिलं (अकृतार्थ अशातें) **मन्यमानस्य** (मानणाऱ्या) **खिद्यतः** (खेद करणाऱ्या) **तस्य कृष्णस्य** (व्यासाच्या) **प्राक्** (पूर्वी) **उदाहृतं** (सांगितलेल्या) **आश्रमं नारदः अभ्यगात्** (प्राप्त झाला). ॥ ३२ ॥ **मुनिः सुरपूजितं** (देवांना पूज्य अशा) **तं नारदं आगतं अभिज्ञाय** (जाणून) **सहसा** (एकदम) **प्रत्युत्थाय** (उभें राहून) **विधिवत्** (यथाविधि) **पूजयामास** (पूजा करिता झाला). ॥ ३३ ॥ ॥ **इति श्रीभागवतान्वये चतुर्थो ऽध्यायः** ॥ ४ ॥ **सूतः उवाच – । अथ बृहच्छ्रवाः** (ज्याची कीर्ति विपुल आहे, असा) **वीणापाणिः** (वीणा आहे हातांत ज्याच्या असा) **सुखं** (स्वस्थ) **आसीनः** (बसलेला) **देवर्षिः उपासीनं** (जवळ बसलेल्या) **तं विप्रर्षिं** (ब्राह्मणऋषीला म्ह० व्यासाला) **स्मयन्** (किंचित् हांसणारा) **इव प्राह.** ॥ १ ॥

तस्यैवं खिलमात्मानं मन्यमानस्य खिद्यतः ॥ कृष्णस्य नारदो ऽभ्यागादाश्रमं प्रागुदाहृतम् ॥ ३२ ॥ तमभिज्ञाय सहसा प्रत्युत्थायाऽऽगतं मुनिः ॥ पूजयामास विधिवन्नारदं सुरपूजितम् ॥ ३३ ॥ इति श्रीभा० महा० प्रथमस्कन्धे चतुर्थो ऽध्यायः ॥ ४ ॥ सूत उवाच । अथ तं सुखमासीन उपासीनं बृहच्छ्रवाः ॥ देवर्षिः प्राह विप्रर्षिं वीणापाणिः स्मयन्निव ॥ १ ॥ नारद उवाच । पाराशर्य महाभाग भवतः कच्चिदात्मना ॥ परितुष्यति शारीर आत्मा मानस एव वा ॥ २ ॥ जिज्ञासितं सुसम्पन्नमपि ते महदद्भुतम् ॥ कृतवान्भारतं यस्त्वं सर्वार्थपरिबृंहितम् ॥ ३ ॥

नारदः उवाच – हे महाभाग (हे महाभाग्यवान् पुरुषा) **पाराशर्य** (हे पराशरपुत्रा), **भवतः** (आपला ह्म० तुझा) **शारीरः** (शरीराभिमानी) **आत्मा आत्मना** (शरीराच्या योगानें) **परितुष्यति कच्चित्, वा मानसः** (मनोभिमानी) **[आत्मा आत्मना परितुष्यति कच्चित्]? ॥ २ ॥ ते** (तुझें) **जिज्ञासितं** (जाणण्यास इष्ट) **अपि सुसंपन्नं** (उत्तमप्रकारें जागिलेलें); **यः त्वं सर्वार्थपरिबृंहितं** (सकल पुरुषार्थांनीं परिपूर्ण असें) **कृतवान्** (ज्यानें केलें, असा). ॥ ३ ॥

सूत ह्मणतात :– नंतर सुकीर्तिमान् देवर्षि नारदमुनि स्वस्थ बसले; त्यांच्या हातामध्यें ब्रह्मवीणा होती; जवळच व्यासही बसले होते. त्यावेळीं नारदांनीं हास्यपूर्वक व्यासांशीं बोलण्यास प्रारंभ केला. ॥ १ ॥ नारद ह्मणतात :– हे पराशरपुत्रा (व्यासा)! तूं महाभाग्यशाली आहेस. तुझा शरीराभिमानी आत्मा त्या शरीराच्या योगानें संतुष्ट होतो किंवा नाहीं? तसाच मनोभिमानी आत्मा मनाच्या योगानें संतुष्ट होतो कीं नाहीं? ॥ २ ॥ पुरुषानें ज्या ज्या कांहीं धर्मादि गोष्टी जाणावयाच्या, त्या सर्व तुला अवगत आहेत;

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

कारण, तूं धर्म, अर्थ, काम, मोक्ष, ह्या चारी पुरुषार्थांनीं पूर्ण, व सर्वांस आश्चर्यचकित करणारें असें महाभारत रचिलेंस. ॥ ३ ॥ जें परब्रह्म सनातन (नित्य), त्याबद्दल पूर्ण विचार केला आहेस. - केवळ विचार करीत बसलास असेंही नाहीं; तर - त्याची तुला प्राप्ति (ज्ञान)ही झाली आहे. तूं इच्छेस येईल तें करण्यास समर्थ आहेस; असें असूनही 'आपण कृतकृत्य झालों नाहीं' असें मानून शोक करितोस ह्याचें कारण काय ? ॥ ४ ॥ व्यास ह्मणतात :- नारदा, ज्या ज्या गोष्टी (धर्मज्ञानादि) मला अनुकूल आहेत असें तुह्मीं ह्मटलें, त्या सर्व निश्चयानें मला अनुकूल आहेत (मला पुरुषार्थज्ञान आहे; मी भारत केलें; मला ब्रह्मज्ञान आहे); परंतु माझ्या शारीर व मानस ह्या दोन्ही आत्म्यांस समाधान

यत् सनातनं (नित्य) **ब्रह्म तत् जिज्ञासितं** (विचार केलेलें) **च अधीतं** (प्राप्त झालेलें); **अथापि, प्रभो, अकृतार्थः इव आत्मानं शोचसि** (शोक करितोस). ॥ ४ ॥ **व्यासः उवाच** — **त्वदुक्तं** (तूं सांगितलेलें) **इदं सर्वं मे अस्ति एव** (आहे); **तथापि मे आत्मा न परितुष्यते. तन्मूलं** (त्यांचें कारण) **अव्यक्तं अगाधबोधं** (अपरिमित आहे ज्ञान ज्याचें अशातें) **आत्मभवात्मभूतं** (परमेश्वरापासून उत्पन्न झालेल्या ब्रह्मदेवाच्या देहापासून झालेल्या) **त्वा** (तुला) **पृच्छामहे** (विचारितों). ॥ ५ ॥ **सः भवान् समस्तगुह्यं वेद** (जाणतोस) **वै. यत्** (कारण)

जिज्ञासितमधीतं च ब्रह्म यत्तत्सनातनम् ॥ अथापि शोचस्याऽऽत्मानमकृतार्थ इव प्रभो ॥ ४ ॥ व्यास उवाच ।
अस्त्येव मे सर्वमिदं त्वयोक्तं तथापि नाऽऽत्मा परितुष्यते मे ॥ तन्मूलमव्यक्तमगाधबोधं पृच्छामहे त्वात्मभवात्मभूतम् ॥ ५ ॥
स वै भवान्वेद समस्तगुह्यमुपासितो यत्पुरुषः पुराणः ॥ परावरेशो मनसैव विश्वं सृजत्यवत्यत्ति गुणैरसङ्गः ॥ ६ ॥
त्वं पर्यटन्नर्क इव त्रिलोकीमन्तश्चरो वायुरिवा ऽऽत्मसाक्षी ॥ परावरे ब्रह्मणि धर्मतो व्रतैः स्नातस्य मे न्यूनमलं विचक्ष्व ॥ ७ ॥

परावरेशः (कार्यकारणांचें नियमन करणारा) **गुणैः असङ्गः** [**यः**] **मनसैव** (मनानेंच) **विश्वं सृजति** (उत्पन्न करितो), **अवति** (पालन करितो) **अत्ति** (लय करितो), [**सः**] **पुराणः** (अनादि) **पुरुषः उपासितः** (उपासना केलेला). ॥ ६ ॥ **अर्कः** (सूर्य) **इव त्रिलोकीं** (त्रैलोक्याप्रत) **पर्यटन्** (फिरणारा) **वायुः इव अन्तश्चरः** (शरीरांत संचार करणारा) **आत्मसाक्षी** (बुद्धिवृत्ति ओळखिणारा) **त्वं परावरे** (परब्रह्मध्यानाविषयीं व वेदाध्ययनांत) **ब्रह्मणि धर्मतः** (योगाभ्यासानें) **व्रतैः स्नातस्य** (निष्पाप अशा) **मे अलं** (अत्यंत) **न्यूनं विचक्ष्व** (शोधून काढ). ॥ ७ ॥

वाटत नाहीं. बरें त्याचें कारण काय असावें, हेंही मला स्पष्ट समजत नाहीं. तेव्हां तुह्मांला तेंच (समाधान न वाटण्याचें कारण) विचारितों. तुह्मांला त्याचें उत्तर देण्याचें सामर्थ्य आहे. कारण, परमात्म्यापासून उत्पन्न झालेला जो ब्रह्मदेव त्याचे आपण पुत्र आहां. आणि ह्मणूनच आपलें ज्ञान अपरिमित आहे. ॥ ५ ॥ तुह्मांला सर्व गुह्य गोष्टींचें ज्ञान आहे; कारण, तुह्मीं, कार्यकारणांचें नियमन करणारा व स्वतः गुणांशीं संग न ठेवतां केवळ संकल्पानेंच जगाची उत्पत्ति, स्थिति, लय करणारा जो अनादि परब्रह्मरूप परमेश्वर त्याची उपासना केली आहे. ॥ ६ ॥ नारदा, तुह्मीं सूर्याप्रमाणें नेहमीं त्रैलोक्यांत पर्यटन करीत असल्यामुळें, सर्व गोष्टी प्रत्यक्ष अवलोकन करीत आहां, व वायूप्रमाणें प्राणि

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

मात्रांच्या शरीरांत संचार करितां; तसेंच सर्वांच्या बुद्धिवृत्तीही आपण ओळखतां; तेव्हां माझ्यामध्यें मनाला संतोष न वाटण्यासारखें न्यून काय आहे, तें शोधून काढा. - माझी स्थिति व योग्यता आपण जाणतच आहां - मी परब्रह्मध्यानाविषयीं योगाभ्यासाच्या साह्यानें पूर्ण आहें; व यथाशास्त्र कर्माचरण करीत असल्यामुळें अवर ब्रह्म जें वेद त्यामध्येंही निष्णात आहें. ॥ ७॥ नारद ह्मणतात :- मला तुझ्या ह्या सर्वप्रकारच्या ज्ञानामध्यें एकच कमीपणा दिसत आहे; आणि त्यामुळेंच परमेश्वर संतुष्ट होत नाहीं व तेंच समाधान न होण्यास कारण आहे. - तें न्यून एवढेंच कीं - तूं परमेश्वराच्या निर्मल कीर्तीचें वर्णन अद्यापि केलें नाहींस (प्रसंगानुसार कोठें कोठें थोडेसें जरी केलें असलें तरी

नारदः उवाच — तत् दर्शनं (ज्ञान) **खिलं** (न्यून) **मन्ये, येन एव असौ न तुष्येत** (संतुष्ट होत नाहीं); **भवता** (तुझ्या कडून) **भगवतः अमलं यशः अनुदितप्रायं** (न वर्णिलेल्या). ॥ ८ ॥ हे **मुनिवर्य** (हे मुनिश्रेष्ठा), **यथा धर्मादयः अर्थाः अनुकीर्तिताः, तथा वासुदेवस्य महिमा** (माहात्म्य) **नहि अनुवर्णितः.** ॥ ९ ॥ **चित्रपदं** (सुन्दर पदांनीं युक्त) **यत् वचः** (वाक्य) **कर्हिचित् जगत्पवित्रं** (जगताला पवित्र करणारें) **हरेः यशः न प्रगृणीत** (वर्णन करीत नाहीं); **तत् वायसं** (कावळ्यांचें असें) **तीर्थं उशंति** (समजतात), **यत्र मानसाः** (मानस सरोवरांत राह-

नारद उवाच । भवता ऽनुदितप्रायं यशो भगवतो ऽमलम् ॥ येनैवासौ न तुष्येत मन्ये तदर्शनं खिलम् ॥८॥ यथा धर्मादयश्चार्था मुनिवर्यानुकीर्तिताः ॥ न तथा वासुदेवस्य महिमा ह्यनुवर्णितः॥९॥ न यद्वचश्चित्रपदं हरेर्यशो जगत्पवित्रं प्रगृणीत कर्हिचित् ॥ तद्वायसं तीर्थमुशन्ति मानसा न यत्र हंसा निरमन्त्युशिक्क्षयाः ॥ १० ॥ तद्वाग्विसर्गो जनताघविप्लवो यस्मिन्प्रतिश्लो कमबद्धवत्यपि ॥ नामान्यनन्तस्य यशोऽङ्कितानि यच्छृण्वन्ति गायन्ति गृणन्ति साधवः ॥११॥

णारे ह्मणजे सत्वगुणप्रधान मनांत राहणारे) **उशिक्क्षयाः** (उत्तम ठिकाण ह्मणजे ब्रह्म हेंच राहण्याचें स्थान आहे ज्यांचें असे) **हंसाः** (हंस ह्मणजे परमहंस) **न निरमन्ति** (रममाण होत नाहींत). ॥१०॥ **तद्वाग्विसर्गः** (वाणीचा प्रयोग) **जनताघविप्लवः** (जनसमुदाच्या पापाचा नाश करणारा) [**अस्ति**], **अबद्धवति अपि** (अपशब्दांनीं युक्त असला तरी) **यस्मिन् प्रतिश्लोकं** (प्रत्येक श्लोकांत) **अनंतस्य यशोऽङ्कितानि** (यशाच्या वर्णनानें युक्त) **नामानि यत् साधवः शृण्वन्ति गृणन्ति गायंति च.** ॥ ११ ॥

त्याकरितांच विशेष ग्रंथ केलेला नाहींस.) ॥ ८ ॥ हे ऋषिश्रेष्ठा, तूं जसें धर्मादिक पुरुषार्थांचें विशेषेंकरून वर्णन केलें आहेस, तसेंच वर्णन परमेश्वराच्या माहात्म्याचें केलें नाहींस. ॥ ९ ॥ एखादें वाक्य अथवा पद्य, चांगल्या सुंदर शब्दांनीं रचिलेलें आहे; पण जर त्यांमध्यें जगास पवित्र करणारें परमेश्वराचें चरित्र वर्णन केलेलें नसेल तर तें कावळ्याचें (कावळ्यासारखे जे विषयी पुरुष त्यांचें) क्रीडेचें स्थान असें समजलें जातें. कारण, उत्तम ठिकाणीं राहणारे (ब्रह्माचे ठिकाणीं रममाण होणारे) व मानससरोवरामध्यें (सत्वगुणप्रधान मनामध्यें) फिरणारे हंस (परमहंस) तसल्या ठिकाणीं रममाण होत नाहींत (तसलें वाक्य त्यांना रुचत नाहीं). ॥ १० ॥ ग्रंथ असंबद्ध कां असेना ह्म०

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

त्याच्यांत उत्तम पदयोजना नसेना, कांहीं चिंता नाहीं; जर त्यांतील प्रत्येक श्लोकामध्यें परमेश्वराचें यशोवर्णन आणि त्याचेंच नामग्रहण असेल तर तो ग्रंथ लोकांचे, पापाचा नाश करण्यास साधन होतो. - कारण, त्या परमेश्वराच्या यशाचें माहात्म्यच तसें आहे, साधु पुरुष त्याचें नेहमीं श्रवण, गायन व कीर्तन करीत असतात. ॥ ११ ॥ सर्वक्रियारहित व मायोपाधि दूर करणारें जें आत्मज्ञान तेंही कृष्णभक्तिरहित असेल तर पूर्णपणें शोभत नाहीं (उत्तम प्रकारें ब्रह्मसाक्षात्कारास कारण होत नाहीं). तेव्हां मूळचींच सर्वकाळीं (आचरण करतानां व फलप्राप्ति झाल्यावर) दुःखरूप जीं काम्य कर्में व निष्काम कर्में हीं दोन्ही कर्में ईश्वरार्पित जर नसतील तर कोठून शोभतील ? (जेथें ज्ञान **नैष्कर्म्यं** (क्रियारहित असें) **निरंजनं** (मायोपाधि दूर करणारें) **ज्ञानं अपि अच्युतभाववर्जितं** (ईश्वरभक्तिरहित असें) **अलं न शोभते, अश्वत्** (सर्वकाळ) **अभद्रं** (दुःखरूप) **ईश्वरे न अर्पितं कर्म यदपि अकारणं** (निष्काम) **[कर्म तत्] कुतः पुनः [शोभेत].** ॥ १२ ॥ **अथो महाभाग, भवान् अमोघदृक् शुचिश्रवाः** (निर्मल यश आहे ज्याचें असा) **सत्यरतः** (सत्यावर प्रीति करणारा) **धृतव्रतः** (व्रतें धारण केलेला) **[अस्ति], अखिलबन्धमुक्तये** (सर्व म्हणजे संसाररूपी बन्धनापासून मुक्त होण्यासाठीं) **उरुक्रमस्य तत् विचेष्टितं** (नानाप्रकारच्या लीलांतें)

नैष्कर्म्यमप्यच्युतभाववर्जितं न शोभते ज्ञानमलं निरञ्जनम् ॥ कुतः पुनः शश्वदभद्रमीश्वरे न चार्पितं
कर्म यदप्यकारणम् ॥ १२ ॥ अथो महाभाग भवानमोघदृक् शुचिश्रवाः सत्यरतो धृतव्रतः ॥
उरुक्रमस्याखिलबन्धमुक्तये समाधिना ऽनुस्मर तद्विचेष्टितम् ॥ १३ ॥ ततो ऽन्यथा किञ्चन यद्विवक्षतः
पृथग्दृशस्तत्कृतरूपनामभिः ॥ न कुत्रचित्कापि च दुःस्थिता मतिर्लभेत वाताहतनौरिवास्पदम् ॥१४॥

समाधिना (एकाग्र चित्तानें) **अनुस्मर** (स्मरण करून वर्णन कर). ॥ १३ ॥ **पृथग्दृशः** (निराळ्या गोष्टींकडे दृष्टि आहे ज्याची, अशा) **अन्यथा** (निराळ्या प्रकारानें) **यत् किंचन विवक्षतः** (वर्णन करूं इच्छिणाऱ्या) **तत्कृतरूपनामभिः** (त्या वर्णनानें स्फुरण पावणाऱ्या रूपनामादि विषयांनीं) **दुःस्थिता** (अस्थिर झालेली) **मतिः वाताहतनौः इव** (वादळांत सांपडलेल्या नौकेप्रमाणें) **कुत्रचित्** (कोणत्याही काळीं) **क्वापि** (कोणत्याही विषयांत) **च आस्पदं** (स्थान म्हणजे आश्रय) **न लभेत** (पावणार नाहीं). ॥ १४ ॥

देखील पूर्ण उपयोगी नाहीं तेथें ह्या कर्माचा कितीसा उपयोग होणार आहे ? मुळींच नाहीं). ॥ १२ ॥ हे महाभाग्यवंता, तुझ्या दृष्टीला खरें खोटें समजण्याची शक्ति आहे; तुझें यश निमल आहे; तूं नेहमीं सत्य भाषणाविषयीं तत्पर असतोस, व आजपर्यंत पुष्कळ प्रकारचीं व्रतें धारण केलीं आहेस (एतावता तुझ्याजवळ सर्व साधनें सिद्ध आहेत). ह्मणून सर्व प्राण्यांची संसारापासून मुक्ति व्हावी एवढ्याकरितां, एकाग्र अंतःकरणानें परमेश्वराच्या त्या प्रसिद्ध नानाप्रकारच्या लीलेचें स्मरण करून वर्णन कर. ॥ १३ ॥ तूं ज्ञान संपन्न आहेस, तरी तुझी दृष्टि अद्यापि कृष्णचरित्रवर्णनाहून निराळ्या गोष्टींकडे लागलेली आहे. तेव्हां, त्या ईश्वराच्या चरित्राचें वर्णन न करितां दुसरें कांहीतरी वर्णन

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

करूं लागलास तर, तूं जे जे नामरूपादि विषय वर्णन करूं लागशील, त्यात्या विषयांच्या योगानें तुझ्या अस्थिर झालेल्या बुद्धीला कोणत्याही काळीं व कोठेंही समाधान वाटणार नाहीं. यास दृष्टांत :– समुद्रांत वादळामध्यें सांपडलेली नौका : ती जशी वाटेल तिकडे भटकुं लागते, तिला कोठेंही स्थिर आश्रय मिळत नाहीं, त्याप्रमाणें तुझ्या बुद्धीची स्थिति होईल. ॥ १४ ॥ तूं लोककल्याणार्थ पुष्कळ ग्रंथ केलेस, व जागोजागीं धर्मादिकांचें प्रतिपादनही केलेंस; पण तें लोकांच्या हितास कारण न होतां उलट विरुद्ध झालें आहे; ह्मणून अर्थातच त्या करण्यापासून तुला पुण्य न लागतां पापच घडलें. कसें तें पहा पुरुष अगोदर स्वभावतःच विषयाचे ठिकाणीं रत असतात; त्यांना ' काम्यकर्माच्या आचरणापासून धर्म घडतो; ' असें तूं त्या त्या ग्रंथांत सांगितलें आहेस. वस्तुतः काम्यकर्में तर निंद्य आहेत. पण तुझ्या वाक्यावर लोकांचा विश्वास असल्या कारणानें

स्वभावरक्तस्य (स्वभावतःच विषयाचे ठिकाणीं आसक्त असणाऱ्या) **धर्मकृते** (धर्माचरणाबद्दल) **जुगुप्सितं** (निंद्य अशा ह्म० कर्ममार्गाला) **अनुशासतः** (सांगणाऱ्या) **महान् व्यतिक्रमः** (अन्याय) [**अभूत्**]; **यद्वाक्यतः** (ज्याच्या वाक्यापासून) **धर्मः इति स्थितः** (मानणारा) **इतरः जनः** (प्राकृत जन) **तस्य निवारणं न मन्यते.** ॥ १५ ॥ **विचक्षणः** (निपुण) **अनंतपारस्य** (ज्याला

जुगुप्सितं धर्मकृते ऽनुशासतः स्वभावरक्तस्य महान्व्यतिक्रमः ॥ यद्वाक्यतो धर्म इतीतरः स्थितो
न मन्यते तस्य निवारणं जनः ॥ १५ ॥ विचक्षणो ऽस्यार्हति वेदितुं विभोरनन्तपारस्य
निवृत्तितः सुखम् ॥ प्रवर्तमानस्य गुणैरनात्मनस्ततो भवान्दर्शय चेष्टितं विभोः ॥ १६ ॥

अंत व पार नाहीं अशा) **अस्य विभोः सुखं** (निर्विकल्पसुखात्मकस्वरूप) **निवृत्तितः** (निवृत्ति मार्गानें) **वेदितुं** (जाणण्याला) **न अर्हति** (योग्य होत नाहीं); **ततः हे विभो, भवान् अनात्मनः** (देहादिकांचा अभिमान धरणाऱ्या) **गुणैः प्रवर्तमानस्य** (प्रवृत्ति मार्गात सक्त झलेल्या) [**जनस्य**] **विभोः** (ईश्वराचें) **चेष्टितं दर्शय** (दाखिव). ॥ १६ ॥

काम्यकर्में करणें व व्रतोपवासादि आचरण हेच धर्म असा लोकांचा ग्रह निश्चित झाल्यामुळें, मोक्षप्राप्तीस साधन जो निवृत्तिमार्ग तो मुख्य धर्म असें कोणीही मानीत नाहीं; तर वेदांतमार्ग ह्मणजे आंधळे, पांगळे, बाया बापड्या यांचा धर्म, सशक्तांचा नव्हे, असें लोक मानूं लागले. तेव्हां हा तुझ्याकडून मोठा अपराधच घडला. ॥ १५ ॥ आतां निवृत्तिमार्ग हा उत्तम धर्म खरा; परंतु त्या मार्गाच्या आचरणानें व्यापक परमेश्वराचें स्वरूप समजणें ह्मणजे एखाद्याच निपुण ज्ञानी पुरुषाला साधतें; तें अज्ञानी लोकांस साधणार नाहीं. कारण, त्या परमेश्वराला अंत अथवा पार नाहीं. तेव्हां हे समर्था व्यासा, सत्वादिगुणांच्या योगानें प्रवृत्तिमार्गांतच आसक्त झालेल्या, व शरीर, स्त्री, पुत्र इत्यादिकांचे ठिकाणीं अनुक्रमें मी व माझें असा

---

१ सर्वसंगपरित्याग करून केवल निरपेक्षबुद्धीनें भगवद्भक्ति करणें.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अभिमान ठेवणाऱ्या पुरुषांना तें परमेश्वराचें चरित्र दाखवून दे. ॥ १६ ॥ एखादा पुरुष आपला धर्म टाकून परमेश्वराच्या चरणकमलांचें भजन करूं लागला, व पूर्ण दशेस येण्यापूर्वीच जरी कांहीं कारणामुळें मरण पावला, तरी देखील धर्मत्याग केला ह्या पापाबद्दल त्याचें अकल्याण होईल कीं काय? कधीं नाहीं. - नीच योनींत जरी प्रारब्धवशात् उत्पन्न झाला तरी तो पूर्ण व्हावयाचाच. - मग परमेश्वराचें भजन न करितां केवल स्वधर्माचरण करणाऱ्यांना तरी कोणतासा मोठा लाभ होतो? ॥ १७ ॥ जें सुख ब्रह्मदेवापर्यंत उत्तम योनींत व वृक्षादि नीच योनींत फिरणाऱ्या जीवांना प्राप्त होत नाहीं, तें मिळविण्याकरितां निपुण पुरुषानें यत्न करावा. - विषय सुखाबद्दल यत्न नको. - कारण,

स्वधर्मं त्यक्त्वा (टाकून) **हरेः चरणांबुजं** (चरणकमलांतें) **भजन्, अथ ततो अपक्वः यदि** (जरी) **पतेत्** (मरण पावेल); **यत्र क्व वा** (कोणत्याही नीच योनींत) **अमुष्य** (ह्याचें) **अभद्रं अभूत् किं ? अभजतां** (भजन न करणाऱ्यांना) **स्वधर्मतः कोवा अर्थः आप्तः ? ॥ १७ ॥ यत् उपरि** (उत्तम योनींत) **अधः** (नीच योनींत) **भ्रमतां** (फिरणाऱ्यांना) **न लभ्यते तस्य, एव हेतोः कोविदः** (निपुण पुरुष) **प्रयतेत** (यत्न करावा); **तत् सुखं गभीररंहसा** (गंभीर वेगवान् अशा) **कालेन सर्वत्र दुःखवत् अन्यथा** (दुसऱ्या ह्म० प्राचीन कर्मापासून)

त्यक्त्वा स्वधर्मं चरणाम्बुजं हरेर्भजन्नपक्वोऽथपतेत्ततो यदि ॥ यत्र क्व वा भद्रमभूदमुष्य
किं कोवार्थ आप्तो भजतां स्वधर्मतः ॥ १७ ॥ तस्यैव हेतोः प्रयतेत कोविदो न लभ्यते
यद्भ्रमतामुपर्यधः ॥ तल्लभ्यते दुःखवदन्यतः सुखं कालेन सर्वत्र गभीररंहसा ॥ १८ ॥
न वै जनो जातु कथञ्चनाव्रजेन्मुकुन्दसेव्यन्यवदङ्गसंसृतिम् ॥ स्मरन्मुकुन्दाङ्घ्युपगूहनं
पुनर्विहातुमिच्छेन्नरसग्रहो यतः ॥ १९ ॥

लभ्यते. ॥ १८ ॥ हे अंग, मुकुन्दसेवी जनः अन्यवत् कथञ्चन जातु (केव्हांही) **संसृतिं** (संसारचक्रांत) **नवै आव्रजेत्** (जाईल); **मुकुंदांघ्र्युपगूहनं** (परमेश्वरचरणाच्या आलिंगनाला) **स्मरन् पुनः विहातुं** (सोडण्याला) **न इच्छेत्, यतः रसग्रहः. ॥१९॥**

प्राचीनकर्मानुसार यत्नावांचून जशीं दुःखें आपोआप प्राप्त होतात, त्याप्रमाणें गंभीर वेगवान् या कालाच्या योगानें विषयसुखेंही प्राप्त होतात. ॥ १८ ॥ व्यासा, परमेश्वराचें आराधन करणारा प्राणी, तो नीच योनींत कां असेना, कर्ममार्गी लोकांसारखा संसारचक्रांत कधींही पडावयाचा नाहीं, कारण, सामान्यतः लोकांचा स्वभाव असा आहे कीं, - एखाद्या विषयाची गोडी लागली ह्मणजे तोच विषय सर्वदा घेऊन बसतात. त्याप्रमाणें - परमेश्वरचरणाच्या आलिंगनाची पुरुषाला थोडी गोडी एकवार समजली ह्मणजे तें सोडा-

१ जातिपरत्वें आचरण करण्यास सांगितलेले धर्म.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

वेंसें वाटत नाहीं. ॥ १९ ॥ हें सर्व जगत् परमेश्वररूपच आहे, पण तो ईश्वर जगाहून निराळा आहे. कारण त्या परमेश्वरापासूनच जगाची उत्पत्ति, स्थिति, व लय होतात. व्यासा, ही गोष्ट तुला मी सांगितली पाहिजे असें नाहीं, तर तें सर्व तूं जाणतच आहेस. पण मी उगीच दिग्दर्शन केलें. ॥ २० ॥ शिवाय, हे अमोघदृष्टे, तूं स्वतः 'मी परमेश्वराचा अंशभूत असल्यामुळें जन्मरहित असून पण जगाच्या कल्याणाकरितां ह्या स्थितींत उत्पन्न झालों आहे' असें समज. आणि जगाच्या कल्याणाकरितां सर्वशक्तिमान् परमे-

हि इदं विश्वं भगवान् इव इतरः; यतः (ज्या परमेश्वरापासून) **जगत्स्थाननिरोधसंभवाः** (जगाची स्थिति लय आणि उत्पत्ति होतात), **तत् हि स्वयं एव भगवान् वेद. तथापि भवतः प्रादेशमात्रं** (वीतभर म्ह० थोडेंसें) **प्रदर्शितम्. ॥२०॥ हे अमोघदृक्, त्वं आत्मना** (स्वतां) **आत्मानं अजं** (जन्मरहित अशातें) **जगतः शिवाय परस्य पुंसः परमात्मनः कलां प्रजातं** (उत्पन्न झालेल्याला) **अवेहि** (जाण); **तत् महानुभावाभ्युदयः** (सर्वशक्तिमान् परमेश्वराचें चरित्र) **अधिगण्यताम्** (वर्णन केलें जावो). ॥ २१ ॥ **यत् उत्तमश्लोकगुणानुवर्णनं** (उत्तम कीर्ति

इदं हि विश्वं भगवानिवेतरो यतो जगत्स्थाननिरोधसम्भवाः ॥ तद्धि स्वयं वेद भवांस्तथा
ऽपि वै प्रादेशमात्रं भवतः प्रदर्शितम् ॥ २० ॥ त्वमात्मनाऽऽत्मानमवेह्यमोघदृक् परस्य पुंसः
परमात्मनः कलाम् ॥ अजं प्रजातं जगतः शिवाय तन्महानुभावाभ्युदयो ऽधिगण्यताम्
॥ २१ ॥ इदं हि पुंसस्तपसः श्रुतस्य वा स्विष्टस्य सूक्तस्य च बुद्धिदत्तयोः ॥ अविप्लुतो
ऽर्थः कविभिर्निरूपितो यदुत्तमश्लोकगुणानुवर्णनम् ॥ २२ ॥

आहे ज्याची, अशा ईश्वराच्या गुणांचें वर्णन) **हि इदं पुंसः** (पुरुषाच्या) **तपसः श्रुतस्य** (श्रवणाचें) **वा स्विष्टस्य** (भावानें केलेल्या) **सूक्तस्य** (अध्ययनाचें) **च बुद्धिदत्तयोः** (ज्ञान व दान यांचें) **अविच्युतः** (नित्य) **अर्थः** (फल) **कविभिः** (विद्वानांनीं) **निरूपितः. ॥ २२ ॥**

श्वराच्या चरित्राचें वर्णन कर. ॥ २१ ॥ पूर्वीच्या विद्वान् लोकांनीं असें प्रतिपादन केलें आहे कीं, पुरुषानें पुष्कळ तप केलें, शास्त्रांचें श्रवण केलें, यज्ञयागादिक क्रिया केल्या, अध्ययन केलें, ज्ञान संपादन केलें, व पुष्कळ दानेंही केलीं, पण त्या सर्वांचें कधींही नष्ट न होणारें फल झटलें ह्मणजे उत्तमश्लोक परमेश्वराचें गुणवर्णन

१ कारण असें शास्त्र आहे कीं, (आचार्यवान् पुरुषो वेद) ज्याला गुरु आहे त्यालाच समजतें. ह्मणजे स्वतः कितीं जरी बुद्धिमान् असला तरी गुरूशिवाय तथ्य मर्म कळत नाहीं. ह्या श्रुतीस यथार्थ करण्याकरितां मीं सांगितलें. २ मोघ ह्म० व्यर्थ. अमोघ म्ह० व्यर्थ न होणारी. ज्याची दृष्टी कधींही व्यर्थ होत नाहीं असा. तूं विचार करूं लागलास ह्म० तुला सर्व यथार्थ समजतें.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

करणें, हेंच होय. ॥ २२ ॥ - भगवद्भजनाची गोडी एकवार कळली ह्मणजे त्याला तें सोडावें असें वाटत नाहीं. ह्याला उदाहरण स्वतः मींच आहें, पहा - व्यासा, मी मागील कल्पांतील पूर्वजन्मांत वेदवेत्त्या मुनींच्या एका दासीच्या उदरीं जन्मास आलों होतों. धर्माप्रमाणें ते मुनि पर्जन्यकालीं एके ठिकाणीं राहत असत. माझे आईनें मी लहान असतांही त्यांची सेवा करण्याकडे माझी योजना केली होती. ॥ २३ ॥ त्या ऋषींची दृष्टि जरी सर्वत्र सारखी होती ह्म० हा आवडता आणि हा नावडता असा भेद त्यांच्या मनांत नव्हता; तथापि ते माझ्यावर कृपा करूं लागले. कारण, त्यांची प्रीति बसवून घेण्यासारखे गुण माझे ठिकाणीं पुष्कळ होते. ते असे कीं, मी लहान होतों तथापि लहान मुलांच्या ठिकाणीं

हे मुने, अहं पुरा (मागील कल्पांत) **अतीतभवे** (पूर्व जन्मांत) **वेदवादिनां** (वेदवेत्त्यांच्या) **कस्याश्चन दास्याः** (एका दासीपासून) **अभवं** (जन्मलों); **प्रावृषि** (पर्जन्यकाळीं) **निर्विविक्षतां** (एके ठिकाणीं राहण्यास इच्छिणाऱ्या) **योगिनां शुश्रूषणे**(सेवेमध्यें) **बालकः एव निरूपितः** (योजिलेला होतों). ॥ २३ ॥ **ते मुनयः यद्यपि तुल्यदर्शनाः** (समदृष्टि ठेवणारे), [**तथापि**] **अपेताखिलचापले** (गेलें आहे चांचल्य ज्यापासून अशा) **अर्भके** (बालकावर) **दांते** (इंद्रियें स्वाधीन ठेवणाऱ्या) **अधृतक्रीडनके** (खेळण्याचीं साधनें टाकिलीं आहेत ज्यानें, अशा) **अनुवर्तिनि**

अहं पुरा ऽतीतभवे ऽभवं मुने दास्यास्तु कस्याश्चन वेदवादिनाम् ॥ निरूपितो बालक एव योगिनां शुश्रूषणे प्रावृषि निर्विविक्षताम् ॥ २३ ॥ ते मय्यपेताखिलचापले ऽर्भके दान्ते ऽधृतक्रीडनके ऽनुवर्तिनि ॥ चक्रुः कृपां यद्यपि तुल्यदर्शनाः शुश्रूषमाणे मुनयो ऽल्पभाषिणि ॥ २४ ॥ उच्छिष्टलेपाननुमोदितो द्विजैः सकृत्स्म भुञ्जे तदपास्त-किल्बिषः ॥ एवं प्रवृत्तस्य विशुद्धचेतसस्तद्धर्म एवा ऽऽत्मरुचिः प्रजायते ॥ २५ ॥

(अनुकूल असणाऱ्या) **शुश्रूषमाणे** (सेवा करणाऱ्या) **अल्पभाषिणि** (मित भाषण करणाऱ्या) **मयि** (मजवर) **कृपां चक्रुः**. ॥ २४ ॥ **द्विजैः** (ब्राह्मणांनीं) **अनुमोदितः** (अनुमोदन दिलेला) **उच्छिष्टलेपान्** (उच्छिष्ट पात्रांत राहिलेल्या अन्नाला) **सकृत्** (एकवार) **भुंजे स्म** (खात असें); **तदपास्तकिल्बिषः** (त्या भोजनानें निष्पाप असा) [**अभवं**], **एवं प्रवृत्तस्य विशुद्धचेतसः** (शुद्ध झालें अंतःकरण ज्याचें असा) **तद्धर्मे** (त्यांच्या धर्मांत) **एव आत्मरुचिः** (मनाची प्रीति) **प्रजायते** [**स्म**]. ॥ २५ ॥

जें चांचल्य असतें तें माझे ठिकाणीं नव्हते, मी शांत स्वभावाचा होतों; माझीं इंद्रियें स्वाधीन होतीं; बाळलेणीं व खेळणीं मला कधींही आवडत नसत; नेहमीं ऋषींस अनुकूळ वाटेल अशाच रीतीनें त्यांची सेवा मी करीत असें व भाषणही कामापुरतेंच करित असें. ॥ २४ ॥ त्या ब्राह्मणांच्याच अनुमोदनानें मी त्यांच्या उच्छिष्ट पात्रांतील अन्न इत्यादि एकवार भोजन करीत असे, तेणेंकरून सर्व पापें नष्ट झालीं, व अशाच रीतीनें क्रम चालला असतां माझें अंतःकरण शुद्ध होऊन - ' ज्याचें अन्न खावें त्याप्रमाणें बुद्धि होते - ' ह्या न्यायानें त्या साधूंच्या धर्माविषयीं मला गोडी लागली. ॥ २५ ॥

---

१ कोणत्याही गांवांत कायम राहुं नये; पण चातुर्मास्यांत मात्र एके ठिकाणींच रहावें.

CC-0.In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

त्या ठिकाणीं ऋषि नेहमीं कृष्णकथांचें गायन व कीर्तन करीत असत. तेव्हां मी त्यांच्याच अनुग्रहानें त्या मनोहर कथा प्रतिदिनीं ऐकत असें. नंतर स्वतःसिद्ध भक्तिपुरस्सर त्या कथा वेळोवेळीं ऐकत गेल्यामुळें व स्वाभाविकच कृष्णाचें यश सर्वप्रिय असल्यामुळें, त्या भगवंताच्या ठिकाणीं माझी प्रीति जडूं लागली. ॥२६॥ व्यासा, पूर्वी सांगितल्याप्रमाणें परमेश्वराचे ठिकाणीं प्रीति जडली असतां माझी बुद्धीही परमेश्वररूपाचे ठिकाणीं निश्चल राहूं लागली. त्या बुद्धीच्या साह्यानेंच 'मी परब्रह्मस्वरूपी आहें; व स्थूल सूक्ष्म अशीं हीं दोन शरीरें माझे ठिकाणीं अविद्येच्या योगानें केवळ कल्पित आहेत, वास्तविक नाहींत.' असें मला समजूं लागलें. ॥ २७ ॥ पूर्वी सांगितल्याप्रमाणें चातुर्मास्यांमध्यें त्रिकाल ते थोर मुनि **तत्र प्रगायतां** (गायन करणारांच्या) **अनुग्रहेण** (कृपेनें) **मनोहराः कृष्णकथाः अन्वहं** (प्रतिदिवशीं) **अशृणवं** (ऐकत असें). [**हे**] **अंग, अनुपदं** (वेळोवेळीं) **मे श्रद्धया ताः विशृण्वतः** (श्रवण करणाऱ्या) **मम प्रियश्रवसि** (प्रिय आहे कीर्ति ज्याची अशा ह्म० भगवंताचे ठिकाणीं) **रुचिः अभवत्. ॥२६॥ हे महामुने, तदा तस्मिन् लब्धरुचेः** (जडली आहे प्रीति ज्याची अशा) **मम प्रियश्रवसि अस्खलिता** (निश्चल) **मतिः [अभूत्]; यया अहं एतत् सदसत्** (स्थूल व सूक्ष्म यांतें) **स्वमायया परे ब्रह्मणि मयि कल्पितं पश्ये** (पाहतों – समजतों). **॥२७॥ इत्थं** (याप्रमाणें) **शरत्प्रावृषिकौ ऋतू** (शरद् आणि वर्षा ह्या दोन ऋतूंप्रत ह्म० चातुर्मास्यांत) **अनुसवं** (त्रिकाल) **महात्मभिः मुनिभिः संकीर्त्यमानं हरेः अमलं यशः विशृण्वतः मे आत्मरजस्तमोपहा**

तत्रान्वहं कृष्णकथाः प्रगायतामनुग्रहेणाशृणवं मनोहराः ॥ ताः श्रद्धया मे ऽनुपदं विशृण्वतः प्रियश्रवस्यंग ममाभवद्रुचिः ॥ २६ ॥ तस्मिंस्तदा लब्धरुचेर्महामुने प्रियश्रवस्यस्खलिता मतिर्मम ॥ यया ऽहमेतत्सदसत्स्वमायया पश्ये मयि ब्रह्मणि कल्पितं परे ॥ २७ ॥ इत्थं शरत्प्रावृषिकावृतू हरेर्विशृण्वतो मे ऽनुसवं यशो ऽमलम्। सङ्कीर्त्यमानं मुनिभिर्महात्मभिर्भक्तिः प्रवृत्ताऽऽत्मरजस्तमोपहा ॥ २८ ॥ तस्यैवं मे ऽनुरक्तस्य प्रश्रितस्य हतैनसः ॥ श्रद्दधानस्य बालस्य दान्तस्यानुचरस्य च ॥ २९ ॥ ज्ञानं गुह्यतमं यत्तत्साक्षाद्भगवतोदितम् ॥ अन्ववोचन्गमिष्यन्तः कृपया दीनवत्सलाः ॥ ३० ॥

(अंतःकरणांतील रजोगुण व तमोगुण यांचा नाश करणारी) **भक्तिः प्रवृत्ता** (उत्पन्न झाली). ॥ २८ ॥ **एवं तस्य अनुरक्तस्य** (भक्तिमान् अशा) **प्रश्रितस्य** (नम्र अशा) **हतैनसः** (निष्पाप अशा) **श्रद्दधानस्य** (विश्वास ठेवणाऱ्या) **बालस्य दांतस्य** (इंद्रियांचें नियमन करणाऱ्या) **अनुचरस्य** (सेवा करणारा अशा) ॥ २९ ॥ **दीनवत्सलाः गमिष्यंतः** [**ते मुनयः**], **यत् साक्षात् भगवता उदितं** (सांगितलेलें) **गुह्यतमं** (अत्यंत गुह्य) **ज्ञानं, तत् कृपया अन्ववोचन्** (उपदेश करिते झाले); ॥ ३० ॥

परमेश्वराच्या निर्मल कीर्तीचें कीर्तन करीत असत व मी ऐकत असें. असें नेहमीं चाललें असतां परमेश्वराचे ठिकाणीं माझी दृढ भक्ति उत्पन्न झाली. व तिच्या योगानेंच माझे अंतःकरणांतील रजोगुण व तमोगुण ह्या दोहोंचाही नाश झाला. ॥ २८ ॥ मी बाल असतांही पुढें सांगितलेले गुण माझे ठिकाणीं होते. - ते हे कीं, - परमेश्वराचे ठिकाणीं दृढ भक्ति, नम्रता, शुद्धत्व, गुरु–वेदांतवाक्यांवर विश्वास, इंद्रियनिग्रह, व गुरुसेवा. (आणि हे गुण असल्यामुळेंच मी उपदेशास पात्र झालों होतों). दीनावर दया

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

दिली. ॥ ३९ ॥ व्यासा, तूं शास्त्रविचार फार केलेला आहेस खरा, पण विद्वान् पुरुषांची अधिक ज्ञानप्राप्तीची इच्छा, भगवच्चरित्राचें पूर्ण ज्ञान झाल्यावरच समाप्त होते, अगोदर होत नाहीं, म्हणून त्या व्यापक परमेश्वराच्याच यशाचें वर्णन कर. - असें करण्यास दुसरें कारण हें कीं, - हजारों दुःखांनीं वारंवार गांजलेले जे लोक त्यांच्या दुःखाच्या शांतीला या शिवाय दुसरा उपायच नाहीं असें म्हणतात." ॥ ४० ॥ ॥ इति श्रीमद्भागवतार्थदर्शने प्रथमस्कंधे पंचमो ऽध्यायः ॥ ५ ॥

सूत शौनकादिक ऋषींस सांगतातः— सत्यवतीपुत्र जे व्यास त्यांनीं नारदानें स्वमुखानेंच सांगितलेलें त्याचें पूर्वजन्म व त्यांतील कर्में सर्व श्रवण केलीं आणि, पुनः नारदास प्रश्न केला.

हे **अदभ्रश्रुत** (फार आहे शास्त्रावलोकन ज्यानें अशा म्हणजे हे व्यासा), **त्वं अपि येन विदां** (विद्वानांचें) **बुभुत्सितं** (ज्ञानप्राप्तीची इच्छा) **समाप्यते** (समाप्त होते), [**तत्**] **विभोः** (ईश्वराच्या) **विश्रुतं** (यशातें) **प्रख्याहि** (वर्णन कर); **यत् दुःखैः मुहुः** (वारंवार) **अर्दितात्मनां** (गांजलेल्या) **क्लेशनिर्वाणं** (दुःखाच्या शांतीतें) **अन्यथा** (दुसऱ्या रीतीनें) **न उशंति** (इच्छितात म्ह० मानितात). ॥ ४० ॥ **इति श्रीभागवतान्वये प्रथमस्कंधे पञ्चमो ऽध्यायः** ॥ ५ ॥ **सूतः उवाच**— हे **ब्रह्मन्**, **भगवान् सत्यवतीसुतः** (सत्यवतीचा पुत्र) **व्यासः एवं देवर्षेः जन्म कर्म च निशम्य** (ऐकून) **भूयः** (पुनः) **तं पप्रच्छ**— ॥ १ ॥ **व्यासः उवाच**— **तव विज्ञानादेष्टृभिः** (ज्ञानाचा उपदेश करणाऱ्या) **भिक्षुभिः विप्रवसिते** [**सति**] (दूर गमन केलें

त्वमप्यदभ्रश्रुत विश्रुतं विभोः समाप्यते येन विदां बुभुत्सितम् ॥ प्रख्याहि दुःखैर्मुहुरर्दितात्मनां यत्क्लेशनिर्वाणमुशन्ति नान्यथा॥४०॥इति श्रीभा०म०व्यासनारदसंवादे पञ्चमो ऽध्यायः॥५॥सूत उवाच।एवं निशम्य भगवान्देवर्षेर्जन्म कर्म च॥भूयः पप्रच्छ तं ब्रह्मन्व्यासः सत्यवतीसुतः ॥१॥व्यास उवाच। भिक्षुभिर्विप्रवसिते विज्ञानादेष्टृभिस्तव॥वर्तमानो वयस्याद्ये ततः किमकरोद्भवान्॥२॥स्वायंभुव कया वृत्त्या वर्तितं ते परं वयः॥कथं चेदमुदस्राक्षीः काले प्राप्ते कलेवरम्॥३॥प्राक्कल्पविषयामेतां स्मृतिं ते सुरसत्तम॥नह्येष व्यवधात्काल एष सर्वनिराकृतिः॥४॥

असतां) **आद्ये वयसि** (लहान वयांत) **वर्तमानः** (असणारा) **भवान् ततः किं अकरोत्?** ॥ २॥ **हे स्वायंभुव** (हे ब्रह्मपुत्रा), **ते परं वयः** (पुढील आयुष्य) **कया वृत्त्या** (रीतीनें) **वर्तितं** (घालविलें) **च काले प्राप्ते** (मृत्युकाल आला असतां) **इदं कलेवरं** (देहातें) **कथं उदस्राक्षीः** (टाकिलेंस). ॥३॥ **हे सुरसत्तम**, **एषः कालः सर्वनिराकृतिः** (सर्वांचा नाश होतो ज्यापासून असा) [**आस्ति**], **एषः ते प्राक्कल्पविषयां** (पूर्वीच्या कल्पासंबंधी) **एतां स्मृतिं नहि व्यवधात्** (व्यवधान करिता झाला). ॥४॥

॥ १ ॥ व्यास म्हणाले :— नारदा, तुम्हांस ज्ञानोपदेश करणारे ते ऋषि दूर देशास निघून गेले त्यावेळीं तुमचें वय फार लहान होतें. तेव्हां तुम्ही पुढें आचरण कसें ठेविलें होतें? व तुम्ही पुढें काय केलें? ॥ २ हे ब्रह्मपुत्रा, तुम्हीं आपलें पुढील आयुष्य कोणत्या रीतीनें घालविलें? व मृत्युकाल आला असतां ह्या शरीराचा त्याग कसा केला? ॥ ३ ॥ नारदा, तुम्हीं देवांपेक्षां देखील श्रेष्ठ आहां. सर्वांचा नाश करणें हा कालाचा धर्म आहे, (पुष्कळ कालपर्यंत कोणतीही गोष्ट किंवा कोणत्याही गोष्टीची स्मृति राहत नाहीं) असें असतां तुम्हांला तर पाठीमागील कल्पांतील देखील स्मृति आहे; - ह्या स्मृतीचा लोप झाला नाहीं हें कसें? - ॥ ४ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

नारद ह्मणतातः—व्यासा, मला ज्ञानमार्ग दाखवून देणारे ऋषि दूर देशास गेले त्यावेळेस मी कुमारावस्थेंत होतों. व पुढें सांगितल्याप्रमाणें मी आचरण करीत असें. (आयुष्य काल घालविला.) ॥ ५ ॥ माझ्या आईला मी एकुलता एक पुत्र असल्यामुळें व मला दुसरा कोणाचा आश्रय नसल्यामुळें ती माझ्यावर फारच ममता करीत असे. - आतां ऐहिक सर्व गोष्टी नश्वर असल्यामुळें त्यांच्यावर प्रेम ठेवूं नये ही गोष्ट खरी, पण ती कोणाला? ज्ञानी असेल त्याला. स्त्रिया स्वभावतः अज्ञानी असतात; त्याप्रमाणें - माझी आईही अज्ञानी होती व त्यांतही ती दुसऱ्याची दासी होती. मग तिला ती गोष्ट कळणार कशी? ॥ ६ ॥ माझी आई निरंतर माझें योग[1] क्षेम चालवावें असें

नारदः उवाच—मम विज्ञानादेवृभिः भिक्षुभिः विप्रवासिते [सति] आद्ये वयसि वर्तमानः [अहं] ततः एतत् अकारषम् (करिता झालों). ॥ ५ ॥ **मे जननी एकात्मजा मूढा** (अज्ञानी) **योषित्** (स्त्री) **किंकरी** (दासी) **अनन्यगतौ मयि** (ज्याला दुसऱ्याचा आश्रय नाहीं अशा मजवर) **आत्मजे स्नेहानुबंधनं चक्रे.** ॥ ६ ॥ **सा मम योगक्षेमं इच्छती, यथा दारुमयी** (लांकडाची) **योषा** (बाहुली), **[तथा] अस्वतन्त्रा कल्पा** (समर्थ) **न आसीत्; हि लोकः ईशस्य** (धन्याच्या) **वशे.** ॥ ७ ॥ **दिग्देशकालाव्युत्पन्नः** (दिशा देश काल यांविषयीं अज्ञानी

नारद उवाच । भिक्षुभिर्विप्रवसिते विज्ञानादेष्टृभिर्मम ॥ वर्तमानो वयस्याद्ये तत एतदकारषम् ॥ ५ ॥ एकात्मजा मे जननी योषिन्मूढा च किङ्करी ॥ मय्यात्मजे ऽनन्यगतौ चक्रे स्नेहानुबन्धनम् ॥ ६ ॥सा ऽस्वतन्त्रा न कल्पाऽऽसीद्योगक्षेमं ममेच्छती ॥ ईशस्य हि वशे लोको योषा दारुमयी यथा ॥ ७ ॥ अहं च तद्ब्रह्मकुल ऊषिवांस्तदवेक्षया ॥ दिग्देशकालाव्युत्पन्नो बालकः पञ्चहायनः ॥ ८ ॥ एकदा निर्गतां गेहाद्दुहन्तीं निशि गा पथि ॥ सर्पो ऽदशत्पदा स्पृष्टः कृपणां कालचोदितः ॥ ९ ॥

असा) **पंचहायनः** (पांच वर्षांचा) **बालकः अहं च तदवेक्षया** (त्या कालाच्या ह्मणजे मातेच्या अन्तकालाच्या मार्गप्रतीक्षेनें) **तद्ब्रह्मकुले ऊषिवान्** (राहिलों होतों). ॥ ८ ॥ **एकदा कालचोदितः** (कालानें प्रेरणा केलेला) **पथि** (मार्गांत) **पदा** (पायानें) **स्पृष्टः** (स्पर्श केलेला) **सर्पः कृपणां** (अनाथ अशा) **गेहात्** (घरांतून) **निर्गतां** (बाहेर गेलेली) **निशि** (रात्रीं) **गां** (गाईला) **दुहन्तीं** (दोहन करणारी अशा) **अदशत्** (चावला). ॥ ९ ॥

इच्छीत असे. परंतु ती परतंत्र असल्यामुळें तसें करण्यास समर्थ नव्हती; कारण, सर्व लोक आपल्या धन्याच्या आधीन असतात व जशी एखादी लांकडाची कळसूत्री बाहुली नाचविणारा नाचवील त्याप्रमाणें नाचते, स्वतंत्रेनें कांहींएक करूं शकत नाहीं; त्याप्रमाणें तीही कांहीं करूं शकत नसे. ॥ ७ ॥ मीही लहान असल्यामुळें मला दिशा, देश, काल, ह्यांचें कांहीं ज्ञान नव्हतें. ह्मणून मी मातेच्या अंतकालाची वाट पहात त्याच ब्राह्मणांचे घरीं राहिलों होतों. ॥८॥ एके वेळीं अनाथ अशी ती माझी माता रात्रीं गाईचें दूध काढ-

---

१ योग ह्म० ज्या वस्तु आपल्या जवळ नव्हतील त्यांची प्राप्ति व क्षेम म्ह० आपल्या जवळ असलेल्या वस्तु सुरक्षित ठेवणें.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ण्याकरितां घराबाहेर गेली असतां सर्पानें तिला दंश केला. कारण त्या सर्पास मार्गामध्यें तिचा पाय लागला होता. वस्तुतः त्याला कालानेंच पाठविला ही गोष्ट खरी; स्पर्श होणें हें निमित्त मात्र. ॥ ९ ॥ मातेचें देहावसन झालें हा त्या भक्तवत्सल परमेश्वराचा आपल्यावर मोठा अनुग्रह झाला असें मानून मी त्यावेळेस उत्तर दिशेकडे चालता झालों. ॥ १० ॥ जातां जातां वाटेमध्यें मला पुष्कळ देश लागले, कांहीं नगरें, गुरांचे वाडे, खेडींपाडीं, वगैरे लागलीं; त्यांचेंही उल्लंघन करून गेलों. ॥ ११ ॥ पुढें कांहीं पर्वत लागले; त्यांच्यावर चित्रविचित्र गेरू वगैरे धातु होते. कांहीं कांहीं पर्वतावरील वृक्षांच्या खांद्या तेथील हत्तींनीं मोडलेल्या दिसत होत्या. कोठें कोठें उत्तम उदकानें पूर्ण अशीं सरोवरें लागलीं;

तदा अहं तत् भक्तानां शं (कल्याणातें) **अभीप्सतः** (इच्छिणाऱ्या) **ईशस्य** (ईश्वराचा) **अनुग्रहं मन्यमानः [सन्] उत्तरां दिशं प्रातिष्ठम्** (जाता झालों). ॥ १० ॥ **अहं एकः एव तत्र स्फीतान्** (समृद्ध अशा) **जनपदान्** (देशांस), **पुरग्रामव्रजाकरान्** (नगरें, गांव, गुरांचे वाडे, रत्नांच्या खाणी, यांस), **च खेटखर्वटवाटीः** (खेडींपाडीं वाड्या यांस), **वनानि उपवनानि च** (बगीचांस), **इभभग्नभुजद्रुमान्** (हत्तींनीं मोडिलेल्या वृक्षांच्या फांद्या आहेत जेथें अशांस). **चित्रधातुविचित्राद्रीन्**, (नानाप्रकारच्या धातूंनीं शोभणाऱ्या पर्वतांस), **शिवजलान्** (उत्तम पाणी आहे ज्यांत अशा), **जलाशयान्** (सरोवरांस), **सुरसेविताः** (देवांनीं उपभोग घेतलेला आहे ज्यांचा अशा) **चित्रस्वनैः** (चमत्कारिक शब्द आहेत ज्यांचे अशा) **पत्ररथैः**

तदा तदहमीशस्य भक्तानां शमभीप्सतः ॥ अनुग्रहं मन्यमानः प्रातिष्ठं दिशमुत्तराम् ॥ १० ॥ स्फीताञ्जनपदांस्तत्र पुरग्रामव्रजाकरान् ॥ खेटखर्वटवाटीश्च वनान्युपवनानि च ॥ ११ ॥ चित्रधातुविचित्राद्रीनिभभग्नभुजद्रुमान् ॥ जलाशयाञ्छिवजलान्नलिनीः सुरसेविताः ॥ १२ ॥ चित्रस्वनैः पत्ररथैर्विभ्रमद्भ्रमरश्रियः ॥ नलवेणुशरस्तम्बकुशकीचकगव्हरम् ॥ १३ ॥ एक एवातियातोऽहमद्राक्षं विपिनं महत् ॥ घोरं प्रतिभयाकारं व्यालोलूकशिवाऽजिरम् ॥ १४ ॥

(पक्ष्यांनीं) **विभ्रमद्भ्रमरश्रियः** (उडणाऱ्या भ्रमरांनीं सुशोभित अशा) **नलिनीः** (कमलिनींस) **अतियातः** (अतिक्रम करून गेलेला). **प्रतिभयाकारं** (भयस्वरूपी अशा) **व्यालोलूकशिवाजिरं** (सर्प घुबडें व भालू यांचे क्रीडास्थान अशा) **महत् नलवेणुशरस्तंबकुशकीचकगव्हरम्** (देवनळ, वेळू, दर्भाचीं खुंटें, दर्भ, व कींचक - वारा आंत आल्यामुळें वाजणारे वेळू - यांच्या योगानें निबिड झालेल्या) **विपिनं** (अरण्यातें) **अद्राक्षं** (पाहता झालों). ॥ ११ ॥ १२ ॥ १३ ॥ १४ ॥

त्यांमध्यें पुष्कळ कमलिनीही होत्या; व त्यांच्या उपभोगाकरितां देवगणही येत असत; ॥ १२ ॥ तसेंच त्या कमलिनींमध्यें भ्रमर बसले होते. ते त्याच अरण्यांतील पक्ष्यांचा चमत्कारिक शब्द ऐकून भिऊन अमळसे उडून पुनः दुसऱ्या कमलावर बसत. त्यामुळें त्या कमलिनींस फार शोभा आली होती. ॥ १३ ॥ असे नानाप्रकारचे चमत्कार पहात पहात एकटाच जात असतां मला पुढें एक अरण्य लागलें; त्यामध्यें देवनळ, वेळू, दर्भांचीं खुंटें, दर्भ, व कींचक पुष्कळ असल्यामुळें त्यांतून जावयास वाट सांपडण्यास फार कठीण

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

पडे. व तें अरण्य सर्प, घुबडें व भालू यांचें केवळ माहेरघर असल्यामुळें भयंकर किंबहुना भयस्वरूपीच दिसे. ॥ १४ ॥ फार लांब चालत असल्यामुळें माझीं सर्व इंद्रियें व शरीर थकून गेलें होतें. मला क्षुधा व तृषा अतिशय लागली होती. पुढें एक नदी लागली; तिच्या डोहामध्यें मी स्नान केलें व आचमन करून उदक प्राशन केल्यावर जरा माझे श्रम परिहार पावले. ॥ १५ ॥ त्या अरण्यांत मनुष्यांचें येणें जाणें मुळींच नव्हतें. अशा एकांत ठिकाणीं मी एका पिंपळाच्या झाडाखालीं बसलों व शास्त्रांत सांगितलेल्या ध्यान करण्याच्या रीतीस अनुसरून हृदयस्थ जो परमेश्वर त्याचें मनाच्या योगानें चिंतन करूं लागलों. ॥ १६ ॥ भक्तियुक्त अंतःकरणानें परमेश्वराच्या चरणकमलाचें ध्यान करीत असतां परमेश्वरदर्शनाच्या

परिश्रांतेंद्रियात्मा (इंद्रियें व शरीर थकून गेलें आहे ज्याचें असा) **तृट्परीतः** (तृषेनें व्याप्त असा) **बुभुक्षितः अहं नद्याः** (नदीच्या) **ह्रदे** (डोहामध्यें) **स्नात्वा** (स्नान करून) **उपस्पृष्टः** (आचमन केलेला) **पीत्वा** (पिऊन) **गतश्रमः** (श्रम परिहार पावलेला असा) **[अभवम्]**. ॥१५॥ **तस्मिन् निर्मनुजे** (निर्जन ह्मणजे एकांत अशा) **अरण्ये पिप्पलोपस्थे** (पिंपळाच्या झाडाखालीं) **आश्रितः** (आश्रय केलेला) **[अहं] यथाश्रुतं** (शास्त्रांत सांगितल्या रीतीनें) **आत्मस्थं** (हृदयस्थ अशा) **आत्मानं** (परमेश्वराला) **आत्मना** (मनानें) **अचिन्तयम्** (चिंतन करूं लागलों). ॥ १६ ॥ **भावनिर्जितचेतसा** (भक्तीनें वश केलेल्या अंतःकरणानें) **चरणांभोजं** (चरणकमलातें) **ध्यायतः** (ध्यान करणाऱ्या) **औत्कंठ्याश्रुकलाक्षस्य** (उत्कंठेनें अश्रुधारा डोळ्यांवाटे चालल्या आहेत

परिश्रान्तेन्द्रियात्मा ऽहं तृट्परीतो बुभुक्षितः ॥ स्नात्वा पीत्वा ऱ्हदे नद्या उपस्पृष्टो गतश्रमः ॥ १५ ॥ तस्मिन्निर्मनुजे ऽरण्ये पिप्पलोपस्थ आश्रितः ॥ आत्मनाऽऽत्मानमात्मस्थं यथाश्रुतमचिन्तयम् ॥ १६ ॥ ध्यायतश्चरणाम्भोजं भावनिर्जितचेतसा ॥ औत्कण्ठ्याश्रुकलाक्षस्य हृद्यासीन्मे शनैर्हरिः ॥ १७ ॥ प्रेमातिभरनिर्भिन्नपुलकाङ्गो ऽतिनिर्वृतः ॥ आनन्दसम्प्लवे लीनो नापश्यमुभयं मुने ॥ १८ ॥ रूपं भगवतो यत्तन्मनःकान्तं शुचापहम् ॥ अपश्यन्सहसोत्तस्थे वैक्लव्याद्दुर्मना इव ॥ १९ ॥

ज्याच्या अशा) **मे हृदि** (हृदयांत) **हरिः शनैः** (हळूहळू) **आसीत्** (प्रकट झाला). ॥ १७ ॥ **हे मुने, प्रेमातिभरनिर्भिन्नपुलकांगः** (प्रेमाच्या मोठ्या भरानें अंगावर रोमांच उभे ज्याच्या असा) **अतिनिर्वृतः** (फार आनंदित झालेला) **आनंदसंप्लवे** (आनंदाच्या पूरांत) **लीनः** (गढलेला) **[अहं] उभयं** (स्वपराला मी व मद्व्यतिरिक्त दुसरें अशा भेदभाववाला) **न अपश्यम्** (पाहता झालों). ॥ १८॥ **यत् मनःकान्तं** (मनाला प्रिय वाटणारें) **शुचापहं** (शोकाचा नाश करणारें) **भगवतः रूपं [दृष्टं], तत् अपश्यन्** (न पाहणारा) **दुर्मनाः इव** (वेड्यासारिखा) **सहसा वैक्लव्यात्** (खेदानें) **उत्तस्थे** (दचकून उठलों). ॥ १९॥

उत्कंठेनें माझ्या डोळ्यांतून अश्रुधारा चाललल्या होत्या. अशा वेळीं तो भगवान् हळू हळू माझ्या हृदयांत प्रकट झाला. ॥ १७ ॥ दर्शन झाल्याबरोबर प्रेमाच्या भरानें सर्व आंगावर रोमांच उभे राहिले. मी अतिशय आनंदित झालों - व आनंदाच्या पूरामध्यें इतका गढून गेलों कीं, - माझ्या मनांतील स्वपर(मी व दुसरा)भाव नाहींसा झाला; सर्वच एक असें वाटूं लागलें. ॥ १८ ॥ - एकवार तें स्वरूप दिसलें व लागलेंच गुप्त झालें तेव्हां - तें मनाला प्रिय वाटलेलें व पापाचा नाश करणारें भगवंताचें स्वरूप

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

मनांत दिसत नाहींसें झाल्याबरोबर मी त्या खेदानें वेड्यासारखा होऊन एकाएकीं दचकून उठलों. ॥ १९ ॥ त्या रूपाचें पुनः दर्शन व्हावें असें वाटत होतेंच; म्हणून पहिल्या-प्रमाणेंच एकाग्र अंतःकरण करून हृदयांत ध्यान करूं लागलों; पण पुनः दर्शन होईना; दर्शनाविषयीं तृप्ति झाली नाहीं म्हणून मी अगदीं आतुर झालों. ॥ २० ॥ अशा रीतीनें त्या निर्जन अरण्यामध्यें परमेश्वराच्या दर्शनाकरितां माझा यत्न चालला होता. तेव्हां वाणीला अगोचर ह्म० इंद्रियांचा विषय न होणारा जो परमेश्वर, त्यानें माझा खेद दूर करण्या-

तत् अहं भूयः (पुन्हां) **दिदृक्षुः** (पाहण्यास उत्सुक असा) **मनः प्रणिधाय** (स्थिर करून) **हृदि वीक्षमाणः** (ध्यान करणारा) **अपि न अपश्यं; अवितृप्तः** (तृप्त न झालेला) **आतुरः इव** [**अभवम्**]. ॥ २० ॥ **एवं** (याप्रमाणें) **विजने** (एकांतांत) **यतंतं** (यत्न करणारा अशा) **मां गिरां** (वाणीला) **अगोचरः** [**ईश्वरः**] **गम्भीरश्लक्ष्णया** (गंभीर आणि मधुर अशा) **वाचा शुचः** (शोकांतें) **प्रशमयन् इव** (अगदीं दूर करणारा) **आह** (बोलला).—॥ २१ ॥ **हंत** (बा) **भवान्** (तूं) **इह अस्मिन्** (ह्या) **जन्मनि** (जन्मांत) **मां** (मला) **द्रष्टुम् न अर्हति** (योग्य नाहीं) **अविपक्वकषायाणां** (दग्ध झाले नाहींत कषाय म्हणजे कामादि मल ज्यांचे अशा) **कुयोगिनां** (अपूर्ण योग्यांना) **अहं दुर्दर्शः** (दुर्घट दर्शन आहे ज्याचें असा) [**अस्मि**].॥२२॥

दिदृक्षुस्तदहं भूयः प्रणिधाय मनो हृदि ॥ वीक्षमाणोऽपि नापश्यमवितृप्त इवातुरः ॥ २० ॥
एवं यतन्तं विजने मामाहागोचरो गिराम् ॥ गम्भीरश्लक्ष्णया वाचा शुचः प्रशमयन्निव ॥ २१ ॥
हन्तास्मिन् जन्मनि भवान्न मा द्रष्टुमिहार्हति ॥ अविपक्वकषायाणां दुर्दर्शोऽहं कुयोगिनाम्॥२२॥
सकृद्यदर्शितं रूपमेतत्कामाय ते ऽनघ ॥ मत्कामः शनकैः साधुः सर्वान्मुञ्चति हृच्छयान् ॥२३॥
सत्सेवया ऽदीर्घया ते जाता मयि दृढा मतिः॥हित्वा ऽवद्यमिमं लोकं गन्ता मज्जनतामसि॥२४॥

हे अनघ, यत् रूपं सकृत् दर्शितं, एतत् ते कामाय (प्रीतीकरितां) **मत्कामः** (मजवर प्रीति ठेवणारा) **साधुः सर्वान् हृच्छयान्** (विषयांना) **शनकैः** (हळूहळू) **मुंचति** (टाकितो). ॥ २३ ॥ **अदीर्घया** (थोड्या दिवसांच्या) **सत्सेवया** (साधूंच्या सेवेनें) **ते मयि दृढा मतिः जाता, अवद्यं** (निंद्य अशा) **इमं** (ह्या) **लोकं** (शरीराला) **हित्वा** (सोडून) **मज्जनतां** (माझ्या सेवकपदाला) **गंता** (जाणारा) **असि.** ॥ २४ ॥

करितां गंभीर आणि मधुर अशा (आकाश) वाणीनें मला सांगितलें कीं, ॥ २१ ॥ " बा नारदा, ह्या जन्मामध्यें माझें पुनः दर्शन व्हावयास तूं योग्य नाहींस; कारण, ज्या योग्यांचे कामादि मल पूर्ण दग्ध झाले नाहींत त्यांस माझें दर्शन होणें दुर्घट आहे. ॥२२॥ हे निष्काम नारदा, जें एकवार मीं आपलें दर्शन तुला दिलें आहे, त्यामुळें तुझी माझ्या स्वरूपावर प्रीति उत्पन्न होईलच. माझ्या ठिकाणीं एकवार ज्याची प्रीति बसली तो पुरुष हळू हळू सर्व विषयांचा त्याग करितो. ॥ २३ ॥ तुला सत्संगति जरी थोडेच दिवस घडली,

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तरी तिच्या योगानें माझे ठिकाणीं तुझी बुद्धि दृढ जडली आहे. आतां तूं ह्या निंद्य शरीराचा त्याग करशील व पुढल्या जन्मीं माझा पार्षद होशील. ॥ २४ ॥ नारदा, तुझी बुद्धि जी एकवार माझेच ठिकाणीं दृढ जडली, ती पुढें कधींही ढळणार नाहीं; व तसेंच ह्या जगाची उत्पत्ति होवो अथवा लय होवो माझ्या अनुग्रहानें तुझी स्मृति मिळून कधींही नाहींशी होणार नाहीं. " ॥ २५ ॥ पूर्वी सांगितल्याप्रमाणें त्या महाभूतरूपी परमेश्वरानें आकाशवाणीनें मला सांगून बोलणें पुरें केलें. तो परमेश्वर सर्व शक्तिमान् आहे, तो सर्व प्राणिमात्रांच्या हृदयाकाशांत वास करितो, तथापि त्याचें स्वरूप जाणणें फार कठिण आहे. आपण ब्रह्मदेवासारख्यांना मोठे ह्मणतों, पण त्यांपेक्षां तो परमेश्वर मोठा आहे. त्यानें **मयि** (माझ्या ठिकाणीं) **निबद्धा** (जडलेली) **इयं मतिः कर्हिचित्** (कधींही) **न विपद्येत** (ढळणार नाहीं) **प्रजासर्गनिरोधे अपि** (जगाची उत्पत्ति किंवा लय झाला असतांही) **मदनुग्रहात्** (माझ्या कृपेकरून) **स्मृतिः न विपद्येत.** ॥ २५ ॥ **नभोलिंगं** (हृदयाकाशांत मूर्ति आहे ज्याची असें) **अलिंगं** (जाणतां येत नाहीं असें) **ईश्वरं** (सर्वांचें नियमन करणारें) **तत् महद्भूतं एतावत्** (इतकें) **उक्त्वा** (बोलून) **उपरराम** (थांबलें); **अहं च अनुकम्पितः** (दया केलेला) [**सन्**] **महतां महीयसे तस्मै शीर्ष्णा अवनामं** (वंदनातें) **विदधे** (करिता झालों). ॥२६॥ **हतत्रपः** (निर्लज्ज)

मतिर्मयि निबद्धेयं न विपद्येत कर्हिचित् ॥ प्रजासर्गनिरोधे ऽपि स्मृतिश्च मदनुग्रहात् ॥ २५ ॥ एतावदुक्त्वोपरराम तन्महद्भूतं नभोलिङ्गमलिङ्गमीश्वरम् ॥ अहं च तस्मै महतां महीयसे शीर्ष्णा ऽवनामं विदधे ऽनुकम्पितः ॥ २६ ॥ नामान्यनन्तस्य हतत्रपः पठन्गुह्यानि भद्राणि कृतानि च स्मरन् ॥ गां पर्यटंस्तुष्टमना गतस्पृहः कालं प्रतीक्षन्विमदो विमत्सरः ॥ २७ ॥ एवं कृष्णमते-र्ब्रह्मन्नसक्तस्यामलात्मनः ॥ कालः प्रादुरभूत्काले तडित्सौदामनी यथा ॥ २८ ॥

[**सन्**] **अनंतस्य गुह्यानि नामानि पठन् कृतानि भद्राणि** (उपकारांतें) **च स्मरन् तुष्टमनाः गतस्पृहः गां** (पृथ्वीवर) **पर्यटन् विमदः** (गर्वरहित असा) **विमत्सरः कालं** (मृत्यूतें) **प्रतीक्षन्** (वाट पाहणारा) [**जातः**]. ॥ २७ ॥ **हे ब्रह्मन्, एवं असक्तस्य अमलात्मनः** (निर्मल अंतःकरणाच्या) **कृष्णमतेः** (कृष्णाकडे बुद्धि आहे ज्याची अशाचा) **काले** (नियमित वेळीं) **कालः** (मृत्यु), **यथा सौदामिनी** (सुदामा ह्मणजे मेघ, त्यापासून होणारी) **तडित्** (वीज), [**तथा**] **प्रादुरभूत्** (अकस्मात् प्राप्त झाला). ॥ २८ ॥

माझ्यावर दया केली ह्मणून मीं मस्तकेंकरून त्यास वंदन केलें. ॥ २६ ॥ - नंतर माझी स्थिति अशी झाली कीं, - मी ईश्वराच्या गुह्यगुह्य नामांचें पठण करीत व त्यानें केलेल्या उपकारांचें स्मरण करीत करीत निर्लज्ज होत्साता पृथ्वीवर फिरत असें. - फिरण्यामध्यें कांहीं मिळण्याचा वगैरे हेतु नव्हता; कारण - माझें अंतःकरण नेहमीं संतुष्ट असे; व कोणत्याही गोष्टीची मला इच्छाही नव्हती. गर्व व मत्सर हे दोन्ही माझे ठिकाणीं नव्हते. फक्त, मृत्यु केव्हां येतो आहे, अशी मी वाट पाहत होतों. ॥२७॥ हे व्यासा, पूर्वी सांगितल्याप्रमाणें कोठेंही सक्त न होतां निर्मल अंतःकरणानें कृष्णाकडे बुद्धि ठेवून माझें वर्तन चाललें असतां, जशी वीज एकाएकीं उत्पन्न होते, तसा ईश्वरानें नेमलेल्या वेळेस अकस्मात् मृत्यु-

१ ह्याच अध्यायांतील चवथ्या श्लोकाचें हें उत्तर.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

काल प्राप्त झाला. ॥ २८ ॥ परमेश्वर मला, - पूर्वी वचन दिल्याप्रमाणें - आपल्या त्या शुद्ध सत्वरूपी पार्षदरूपाप्रत प्राप्त होण्याकरितां नेत असतां माझ्या प्रारब्ध कर्माची समाप्ति झाल्याबरोबर हा पंचभूतांपासून उत्पन्न झालेला देह पतन पावला. ॥ २९ ॥ त्या कल्पाच्या समाप्तिकालीं ह्या सर्व जगाचा संहार करून समुद्राच्या उदकांत श्रीनारायण योगनिद्रा घेत होते; त्या वेळेस ब्रह्मदेवही शयन करण्याची इच्छा करीत असतां त्याच्या श्वासाबरोबर मी त्याचे उदरांत गेलों. ॥ ३० ॥ एक सहस्रयुग परिमाणाचा काल गेल्यावर ब्रह्मदेव जागृत होऊन पुनः सृष्टि करण्याची इच्छा करीत असतां त्याच्या इंद्रियांपासून मरीचिप्रभृति ऋषि व मी हे उत्पन्न झालों. ॥ ३१ ॥ माझ्यावर महाविष्णूचा

मयि तां शुद्धां भागवतीं तनुं प्रयुज्यमाने [सति] (नेत असतां) **आरब्धकर्मनिर्वाणः** (प्रारब्ध कर्म समाप्त झालें आहे ज्याचें असा) **पांचभौतिकः** (पंचभूतांपासून उत्पन्न झालेला—देह) **न्यपतत्** (पतन पावला). ॥ २९ ॥ **कल्पांते इदं** (ह्या त्रैलोक्यातें—त्रैलोक्याचा) **आदाय** (संहार करून) **उदन्वतः** (समुद्राच्या) **अंभसि** (उदकांत) **शयाने अहं शिशयिषोः** (शयन करण्यास इच्छिणाऱ्या) **विभोः** (ब्रह्मदेवाच्या) **अनुप्राणं** (श्वासाबरोबर) **अंतः** (आंत—उदरांत) **विविशे** (प्रविष्ट झालों). ॥ ३० ॥ **सहस्रयुगपर्यंते** (सहस्रयुग—परिमाणाचा काल—गेल्यानंतर) **उत्थाय** (जागें होऊन) **इदं सिसृक्षतः** (सृष्टि करण्याची इच्छा करणाऱ्या) **प्राणेभ्यः** (इंद्रियांपासून) **अहं मरीचिमिश्राः ऋषयः च जज्ञिरे** (उत्पन्न झाले). ॥ ३१ ॥ **महाविष्णोः अनुग्रहात्**

प्रयुज्यमाने मयि तां शुद्धां भागवतीं तनुम्॥आरब्धकर्मनिर्वाणो न्यपतत्पाञ्चभौतिकः॥२९॥कल्पान्त इदमादाय शयाने ऽम्भस्युदन्वतः ॥
शिशयिषोरनुप्राणं विविशे ऽन्तरहं विभोः॥३०॥सहस्रयुगपर्यन्त उत्थायेदं सिसृक्षतः॥मरीचिमिश्रा ऋषयः प्राणेभ्यो ऽहं च जज्ञिरे ॥३१॥
अन्तर्बहिश्च लोकांस्त्रीन्पर्येम्यस्कंदितव्रतः ॥ अनुग्रहान्महाविष्णोरविघातगतिः क्वचित् ॥ ३२ ॥ देवदत्तामिमांवीणां स्वरब्रह्मविभूषिताम् ॥
मूर्छयित्वा हरिकथां गायमानश्चराम्यहम्॥३३॥प्रगायतः स्ववीर्याणि तीर्थपादः प्रियश्रवाः ॥आहूत इव मे शीघ्रं दर्शनं याति चेतसि॥३४॥

क्वचित् अविघातगतिः (अकुंठित आहे गति ज्याची असा) **अस्कंदितव्रतः** (अखंडित ब्रह्मचर्यव्रत धारण करणारा) **त्रीन् लोकान् अंतः बहिश्च पर्येमि** (पर्यटन करितों) ॥ ३२ ॥ **अहं देवदत्तां** (देवानें दिलेल्या) **स्वरब्रह्मविभूषितां** (नादब्रह्मानें शोभणाऱ्या) **इमां वीणां** (वीणेतें) **मूर्छयित्वा** (वाजवून) **हरिकथां गायमानः चरामि** (फिरतों). ॥ ३३ ॥ **स्ववीर्याणि प्रगायतः मे चेतसि तीर्थपादः** (तीर्थें आहेत चरणाचे ठायीं ज्याच्या असा) **प्रियश्रवाः** (प्रिय आहे यश ज्याचें असा) **आहूतः इव** (बोलाविल्यासारिखा) **शीघ्रं** (सत्वर) **दर्शनं याति** (दृष्टीस पडतो). ॥३४॥

अनुग्रह असल्यामुळें आतां ह्या जन्मांत मला कोठेंही जाण्यास प्रतिबंध नाहीं. तेव्हां मी अखंडित ब्रह्मचर्य व्रत धारण करून त्रैलोक्यामध्यें पर्यटन करीत असतों. ॥ ३२ ॥ फिरतांना एकीकडे ही देवानेंच दिलेली नादब्रह्माच्या योगानें अत्यंत शोभणारी वीणा वाजवीत परमेश्वराच्या कथांचें गायन करितों. ॥ ३३ ॥ त्याचीं चरित्रें मी गायन करितों ह्मणून परमेश्वर अंतःकरणामध्यें, जसें आपण एखाद्याला हांक मारिली ह्मणजे तो येऊन आपल्याला भेटतो, त्याप्रमाणें मला लवकर दर्शन देतो. त्या परमे-

१ ह्याच अध्यायांत २४ श्लोकांत.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

श्वराच्या चरणीं सर्व तीर्थें वास करितात व त्याचें यश - ब्रह्मदेवासारख्यांस देखील - प्रिय आहे. ॥ ३४ ॥ व्यासा, नेहमीं विषयोपभोगाच्या इच्छेनें ज्यांचीं अंतःकरणें पीडित झालीं आहेत अशा पुरुषांना संसाररूपी समुद्र तरून जाण्यास हें ईश्वराचें गुणवर्णन करणें एवढीच काय ती नौका शास्त्रज्ञपुरुषांनीं पाहून ठेविली आहे, - दुसरें साधन नाहीं. - ॥ ३५ ॥ काम, क्रोध, लोभ ह्या शत्रूंनीं जर्जर केलेलें अंतःकरण जसें मुकुंदाच्या सेवेनें लवकर शांत होतें; तसें यम, नियम वगैरे योगानें खात्रीनें शांत होत नाहीं. ॥ ३६ ॥ हे पुण्यपुरुषा, जें जें तूं मला विचारिलेंस तें तें, माझें गुप्त पूर्वजन्म, त्यांतील आचरणक्रम, व तुझ्या अंतःकरणास समाधान वाटण्यास उपाय, हें सर्व मीं तुला सांगितलें."

हि मात्रास्पर्शेच्छया (विषयोपभोगाच्या इच्छेनें) **मुहुः** (नेहमीं) **आतुरचित्तानां** (पीडित झालीं आहेत अंतःकरणें ज्यांचीं अशांना) **एतत् हरिचर्यानुवर्णनं भवसिंधुप्लवः** (संसाररूपी समुद्र तरण्यास नौका) **दृष्टः.** ॥ ३५ ॥ **मुहुः कामलोभहतः** (काम व लोभ यांनीं जर्जर झालेला) **आत्मा** (अंतःकरण), **यद्वत् मुकुंदसेवया, तथा यमादिभिः योगपथैः** (यम नियम इत्यादि योगमार्गांच्या योगानें) **अञ्जा** (साक्षात्) **न शाम्यति** (शांत होत नाहीं). ॥ ३६ ॥ **हे अनघ** (हे निष्पाप ह्मा० व्यासा), **यत् त्वया अहं पृष्टः तत् इदं मे रहस्यं** (गुप्त) **जन्म कर्म च**

एतद्ध्यातुरचित्तानां मात्रास्पर्शेच्छया मुहुः ॥ भवसिन्धुप्लवो दृष्टो हरिचर्याऽनुवर्णनम् ॥ ३५ ॥ यमादिभिर्योगपथैः कामलोभहतो मुहुः ॥ मुकुन्दसेवया यद्वत्तथाऽऽत्मा ऽञ्जा न शाम्यति ॥ ३६ ॥ सर्वं तदिदमाख्यातं यत्पृष्टो ऽहं त्वया ऽनघ ॥ जन्म कर्म रहस्यं मे भवतश्चाऽऽत्मतोषणम् ॥ ३७ ॥ सूत उवाच । एवं सम्भाष्य भगवान्नारदो वासवीसुतम् ॥ आमन्त्र्य वीणां रणयन्ययौ यादृच्छिको मुनिः ॥ ३८ ॥ अहो देवर्षिर्धन्यो ऽयं यत्कीर्तिं शार्ङ्गधन्वनः ॥ गायन्माद्यन्निदं तन्त्र्या रमयत्यातुरं जगत् ॥ ३९ ॥

इति श्री० म० प्र० स्कन्धे व्यासनारदसंवादे षष्ठो ऽध्यायः ॥ ६ ॥

भवतः (तुझें) **आत्मतोषणं** (अंतःकरणास समाधान देणारें) **सर्वं आख्यातं.** ॥ ३७ ॥ **सूतः उवाच— एवं भगवान् याद्दच्छिकः** (स्वतःचा कांहींएक उद्देश नाहीं ज्याचा असा) **मुनिः नारदः वासवीसुतं** (वासवीच्या पुत्राला ह्मा० व्यासाला) **संभाष्य** (उपदेश करून) **आमंत्र्य** (निरोप घेऊन) **वीणां रणयन् ययौ.** ॥ ३८ ॥ **अहो अयं देवर्षिः धन्यः, यत् माद्यन्** (हर्ष पावणारा) **शार्ङ्गधन्वनः** (शार्ङ्ग धनुष्य धारण करणाऱ्या म्ह० ईश्वराच्या) **कीर्तिं गायन् तन्त्र्या** (वीणेनें) **आतुरं** (दुःखी अशा) **इदं जगत् रमयति.** ॥ ३९ ॥ ॥ **इति षष्ठो ऽध्यायः** ॥ ६ ॥

॥ ३७ ॥ सूत ह्मणतात :— ते भगवान् नारद मुनि व्यासांना पूर्वी सांगितल्याप्रमाणें उपदेश करून त्यांचा निरोप घेऊन आपली वीणा वाजवीत बदरिकाश्रमांतून निघून गेले. ॥ ३८ ॥ ऋषिहो, हे नारदमुनि धन्य आहेत; कारण, हे स्वतः आनंदित होत्साते त्या शार्ङ्ग धनुष्य धारण करणाऱ्या परमेश्वराच्या कीर्तीचें गायन करितात व गायनाच्या योगानें आणि वीणेच्या योगानें ह्या दुःखी जनाला रमवितात. ॥ ३९ ॥

॥ इति श्रीमद्भागवतार्थदर्शने प्रथमस्कंधे षष्ठो ऽध्यायः ॥ ६ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

शौनक ह्मणतातः– सूता, नारदाच्या मनांतील अभिप्राय व्यासांनीं ऐकला होताच; तेव्हां नारद निघून गेल्यावर त्या ज्ञानी व समर्थ व्यासांनीं काय केलें ? ॥ १ ॥ सूत ह्मणतातः– जिची देवता ब्रह्मदेव आहे, त्या सरस्वती नदीच्या पश्चिम तीरावर शम्याप्रास नांवाचा एक आश्रम आहे. ती जागा ऋषींस सत्र इत्यादि करण्यास उपयुक्त आहे. ॥ २ ॥ तो व्यासांचा आश्रम. त्याच्या सभोंवतीं बोरींचें वन आहे. त्या ठिकाणीं व्यासांनीं आपल्या आसनावर बसून आचमन करून मन स्थिर केलें. - व नारदानें पूर्वी सांगितल्याप्रमाणें ते समाधिपूर्वक ध्यान करूं लागले. - ॥ ३ ॥ भक्तियोगानें अंतःकरण शुद्ध व उत्तम रीतीनें स्थिर झाल्यावर त्यांनीं त्यामध्यें (अंतःकरणांत), प्रथम पुरुषास (ईश्वरास)

शौनकः उवाच—[हे] सूत, **नारदे निर्गते [सति]** (नारद निघून गेले असतां) **विभुः** (ज्ञानी) **बादरायणः भगवान् तदभिप्रेतं** (त्याच्या—नारदाच्या—अभिप्रायातें) **श्रुतवान्** (ज्यानें ऐकिलें, असा) **[सन्]** **ततः किं अकरोत् ?** ॥ १ ॥ **सूतः उवाच**— **ब्रह्मनद्यां सरस्वत्यां** (जिची देवता ब्रह्मदेव आहे अशा सरस्वती नदीवर) **पश्चिमे तटे ऋषीणां सत्रवर्धनः** (सत्र वाढविण्यास उपयुक्त असा) **शम्याप्रासः इति प्रोक्तः** (म्हटलेला—या नांवाचा) **आश्रमः [आस्ते]**. ॥ २ ॥ **तस्मिन् बदरीषंडमंडिते** (बोरींच्या ह्म० वृक्षांच्या समूहानें शोभणाऱ्या) **स्वे आश्रमे आसीनः** (बसलेला), **व्यासः अपः उपस्पृश्य** (आचमन करून) **स्वयं मनः प्रणिदध्यौ** (मनाला स्थिर करिता झाला म्ह० ध्यान करिता झाला). ॥ ३ ॥ **भार्क्तियोगेन अमले** (शुद्ध अशा) **सम्यक् प्रणिहिते** (उत्तम

शौनक उवाच। निर्गते नारदे सूत भगवान्बादरायणः॥श्रुतवांस्तदभिप्रेतं ततः किमकरोद्विभुः॥१॥सूत उवाच। ब्रह्मनद्यां सरस्वत्यामाश्रमः पश्चिमे तटे॥शम्याप्रास इति प्रोक्त ऋषीणां सत्रवर्धनः॥२॥तस्मिन्स्व आश्रमे व्यासो बदरीषण्डमण्डिते॥आसीनो ऽप उपस्पृश्य प्रणिदध्यौ मनः स्वयम्॥३॥भक्तियोगेन मनसि सम्यक् प्रणिहिते ऽमले॥अपश्यत्पुरुषं पूर्वं मायां च तदुपाश्रयाम्॥४॥यया सम्मोहितो जीव आत्मानं त्रिगुणात्मकम्॥परो ऽपि मनुते ऽनर्थं तत्कृतं चाभिपद्यते॥५॥अनर्थोपशमं साक्षाद्भक्तियोगमधोक्षजे॥लोकस्याजानतो विद्वांश्चक्रे सात्वतसंहिताम्॥६॥

रीतीनें स्थिर केलेल्या अशा) **मनसि पूर्वं पुरुषं** (प्रथम पुरुषास ह्म० ईश्वरास) **तदुपाश्रयां** (त्याच्या आश्रयानें राहणाऱ्या) **मायां च अपश्यत्** (पाहता झाला) ॥४॥ **जीवः परः अपि** (त्रिगुणांहून वेगळा असतांही) **यया** (जिच्या योगानें) **संमोहितः [सन्] आत्मानं त्रिगुणात्मकं मनुते** (मानितो), **तत्कृतं** (त्यानें ह्म० त्रिगुणांच्या अभिमानानें केलेल्या) **अभिपद्यते** (प्राप्त होतो), ॥५॥ **च अनर्थोपशमं** (अनर्थांची शांति करणाऱ्या) **अधोक्षजे साक्षात् भक्तियोगं [अपश्यत्]; विद्वान् अजानतः** (अज्ञानी अशा) **लोकस्य [अर्थे] सात्वतसंहितां चक्रे** (करिता झाला). ॥ ६ ॥

अवलोकन केलें; नंतर त्या पुरुषाच्या आश्रयानें राहणारी जी माया तिचें दर्शन घेतलें. ॥ ४ ॥ जीव स्वतः तीन्ही गुणांहून वेगळा असतांही त्या मायेच्या योगानें मोहित झाल्यामुळें 'सत्व रज व तम या त्रिगुणांचेंच कार्य मी आहें (त्यांपासून मी झालों आहें)' असें आपणांस मानितो; आणि त्या अभिमानामुळें त्याला मोठे अनर्थ प्राप्त होतात. (ही गोष्ट व्यासांनीं आपल्या समाधिस्थितींत अवलोकन केली.) ॥ ५ ॥ - आणखी त्यांनीं ध्यानामध्यें - त्या पूर्वोक्त अनर्थांची शांति होण्यास उपायही - शोधून काढिला, तो हा कीं, - ईश्वराचे ठिकाणीं साक्षात् भक्ति करणें. एवढ्या सर्व गोष्टी ध्यानांत आणून व्यासांनीं अज्ञानी लोकांच्या उपयोगाकरितां (त्यांनीं त्या अनर्थांतून मुक्त व्हावें एवढ्याकरितां)

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

भागवतनामक ग्रंथ केला.॥६॥ती भागवत संहिता श्रवण केली असतां, पुरुषोत्तम जो श्रीकृष्ण परमात्मा त्याचे ठिकाणीं पुरुषाची भक्ति उत्पन्न होते. त्या भक्तीच्या योगानें पुरुषाचा शोक, मोह आणि भय हीं सर्व नष्ट होतात. ॥ ७ ॥ व्यास मोठे मननशील होते त्यांनीं ही भागवतसंहिता (ग्रंथरचना) करून तिचा सुयुक्तिक अनुक्रम लावून शोधिली, व आपला पुत्र शुक निवृत्तिमार्गाचे ठिकाणीं रत असल्यामुळें भागवत संहिता शिकण्यास अधिकारी आहे असें पाहून, ती त्याला शिकविली. ॥ ८ ॥ शौनक ह्मणतात :– सूता, ते

यस्यां श्रूयमाणायां (श्रवण केली जात असतां) **परमपूरुषे कृष्णे पुंसः** (पुरुषाची) **शोकमोहभयापहा** (शोक, मोह व भय नष्ट करणारी) **भक्तिः उत्पद्यते** (उत्पन्न होते). ॥ ७ ॥ **सः मुनिः भागवतीं संहितां कृत्वा** (करून) **अनुक्रम्य** (अनुक्रम लावून—शोधून) **च आत्मजं** (पुत्राला) **निवृत्तिनिरतं** (निवृत्तिमार्गांत रत झालेल्या) **शुकं अध्यापयामास** (शिकविता झाला). ॥ ८ ॥ **शौनकः उवाच— निवृत्तिनिरतः सर्वत्र** (सर्व गोष्टींविषयीं) **उपेक्षकः** (उदासीन असा) **आत्मारामः** (स्वस्वरूपाचे ठिकाणीं रममाण असा) **सः मुनिः एतां बृहतीं संहितां**

यस्यां वै श्रूयमाणायां कृष्णे परमपूरुषे ॥ भक्तिरुत्पद्यते पुंसः शोकमोहभयापहा ॥ ७ ॥ स संहितां भागवतीं
कृत्वा ऽनुक्रम्य चात्मजम् ॥ शुकमध्यापयामास निवृत्तिनिरतं मुनिः ॥ ८ ॥ शौनक उवाच । स वै निवृत्ति-
निरतः सर्वत्रोपेक्षको मुनिः ॥ कस्य वा बृहतीमेतामात्मारामः समभ्यसत् ॥ ९ ॥सूत उवाच । आत्मारामाश्च
मुनयो निर्ग्रंथा अप्युरुक्रमे ॥ कुर्वंत्यहैतुकीं भक्तिमित्थंभूतगुणो हरिः ॥ १० ॥

कस्य वा (हेतोः) (कोणत्या उद्देशानें) **समभ्यसत्** (अभ्यास करिता झाला). ॥ ९ ॥ **सूतः उवाच– आत्मारामाः निर्ग्रंथाः** (क्रोध, अहंकार इत्यादि ग्रन्थि ज्यांच्या अंतःकरणांतून गेले असे) **अपि मुनयः उरुक्रमे (उरुभिः क्रम्यते, तस्मिन्—** पुष्कळ लोक ज्याच्या प्राप्तीचा यत्न करितात अशा परमेश्वराचे ठिकाणीं) **अहैतुकीं भक्तिं** (निष्काम भक्तीतें) **कुर्वंति, हरिः इत्थंभूतगुणः** (अशा प्रकारचे गुण आहेत ज्याचे असा) **[अस्ति]**. ॥ १० ॥

मुनि शुकाचार्य मोक्षमार्गाचे ठिकाणीं अत्यंत रत असून सर्व गोष्टीविषयीं उदासीन व स्वस्वरूपाचे ठिकाणींच रममाण असत, असें असतां त्यांनीं ह्या मोठ्या भागवत संहितेचा अभ्यास केला, ह्याचा उद्देश काय ? ॥ ९ ॥ सूत ह्मणतातः–ऋषिहो, ज्यांच्या आनंदाला दुसरें साहित्य लागत नाहीं, क्रोध, अहंकार, ममता इत्यादि ग्रंथि (विकार) ज्यांचे अंतःकरणांतून नाहींसे झाले असतात, ते मुनि देखील त्या उरुक्रम परमेश्वराचे ठिकाणीं निष्काम भक्ति करितात. असे त्या हरीचे गुण मोठे अद्भुत आहेत. ॥ १० ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

पूर्वीच्या श्लोकांत सांगितल्याप्रमाणें हरीचे गुण अद्भुत असल्यामुळें त्या गुणांनींच शुकाचार्यांच्या बुद्धीला आपलेकडे वळवून घेतलें. तेव्हां त्या व्यासपुत्र सर्वज्ञ शुकाचार्यांनीं हें भागवतरूपी मोठें आख्यान पठन केलें. शुकाचार्यांना स्वभावतः विष्णूचे भक्त पुरुष प्रिय असत. ॥ ११ ॥ आतां परीक्षित् राजाचें जन्म कसें झालें, त्यानें कर्में कोणतीं कोणतीं केलीं, व त्याचा शेवट कसा झाला, तसेंच पांडवही महाप्रस्थानाला कोणत्या प्रकारानें गेले; ह्या सर्व गोष्टींचें वर्णन कृष्णकथांचा उदय होईल अशा प्रकारें करितों. **हरेः गुणाक्षिप्तमतिः** (गुणांनीं ओढून घेतली आहे मति ज्याची, असा) **नित्यं विष्णुजनप्रियः** (विष्णुभक्त आहेत प्रिय ज्याला, असा) **भगवान् बादरायणिः* महत् आख्यानं अध्यगात्** (पठण करिता झाला). ॥ ११ ॥ **अथ परीक्षितः राजर्षेः जन्म-कर्म विलायनं** (जन्म कर्में व अंत ह्म० मोक्ष यांतें) **पांडुपुत्राणां संस्थां** (महाप्रस्थानातें) **च कृष्णकथोदयं [यथा स्यात् तथा] वक्ष्ये** (सांगेन). ॥ १२ ॥ **अथो यदा मृधे** (युद्धांत) **कौरवसृंजयानां** (कौरव व सृंजय ह्म० पांडव यांचे) **वीरेषु वीरगतिं गतेषु [सत्सु]** (स्वर्गास गेले असतां) **धृतराष्ट्रपुत्रे वृकोदराविद्धगदाभि-**

हरेर्गुणाक्षिप्तमतिर्भगवान्बादरायणिः ॥ अध्यगान्महदाख्यानं नित्यं विष्णुजनप्रियः ॥ ११ ॥
परीक्षितो ऽथ राजर्षेर्जन्म कर्म विलायनम् ॥ संस्थां च पाण्डुपुत्राणां वक्ष्ये कृष्णकथोदयम् ॥ १२ ॥
यदा मृधे कौरवसृञ्जयानां वीरेष्वथो वीरगतिं गतेषु ॥ वृकोदराविद्धगदाभिमर्शभग्नोरुदण्डे
धृतराष्ट्रपुत्रे ॥ १३ ॥ भर्तुः प्रियं द्रौणिरिति स्म पश्यन् कृष्णासुतानां स्वपतां शिरांसि ॥
उपाहरद्विप्रियमेव तस्य तज्जुगुप्सितं कर्म विगर्हयंति ॥ १४ ॥

मर्शभग्नोरुदंडे (भीमानें मारलेल्या गदेच्या आघातानें मोडली मांडी ज्याची असा असतां), ॥ १३ ॥ **द्रौणिः** (अश्वत्थामा) **भर्तुः** (स्वामीचें) **प्रियं इति पश्यन्; यत् स्वपतां** (निजलेल्या) **कृष्णासुतानां** (द्रौपदीच्या पुत्रांच्या) **शिरांसि उपाहरत्** (तोडिता झाला) **स्म.[वस्तुतः] तस्य विप्रियमेव तत्, जुगुप्सितं** (दुष्ट अशा) **कर्म विगर्हयंति** (निंदा करितात). ॥ १४ ॥

॥ १२ ॥ आतां ज्या वेळेस कौरव व सृंजय यांच्या मध्यें युद्ध होऊन उभय पक्षांतील प्रायशः सर्व योद्धे स्वर्गाला गेले व प्रत्यक्ष राजा दुर्योधनही भीमसेनानें मारलेल्या गदेच्या आघातानें मांडी मोडून (रणांत जीवंत) पडला होता. ॥ १३ ॥ त्या वेळीं अश्वत्थाम्यानें आपला भर्ता ह्म० अन्नदाता जो दुर्योधन त्याला प्रिय वाटावें ह्मणून निद्रेंत असलेल्या द्रौपदीच्या पुत्रांचा शिरच्छेद केला; परंतु वस्तुतः - द्रौपदीच्या लहानलहान मुलांचा नाश केला - ही गोष्ट दुर्योधनास प्रिय नव्हती; व सर्व लोकही त्या दुष्ट कर्माची

* **बदरीणां समूहो बादरं, बादरं अयनं यस्य सः बादरायणः, तस्य अपत्यं पुमान् बादरायणिः** । व्यासांना बादरायण हें नांव होतें. कारण, त्यांचें अयन ह्म० आश्रम बादरांत ह्म० बोरींच्या वनांत होता. त्यांचे पुत्र बादरायणि शुक. १ पांडवांचा सेनापति धृष्टद्युम्न सृंजयवंशज होता.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

निंदाच करितात. ॥ १४ ॥ पुढें आपल्या लहान बाळांचा वध झाला ही गोष्ट त्यांच्या आईच्या (द्रौपदीच्या) कानीं पडतांच ती अतिशय संतप्त होऊन शोक करूं लागली. तिच्या डोळ्यांवाटे शोकाश्रूंच्या धारा चालल्या. अशा वेळीं अर्जुनानें द्रौपदीचें सांत्वन करण्याकरितां पुढें सांगितल्याप्रमाणें प्रतिज्ञा केली. ॥ १५ ॥ अर्जुन ह्मणालाः—"द्रौपदी, मी ह्या माझ्या गांडीव धनुष्यापासून सुटलेल्या बाणांनीं त्या आततायी व ब्राह्मणाधम अश्वत्थाम्याचा शिरच्छेद करून तें मस्तक येथें घेऊन येईन, त्या शिरावर बसवून तुला

तदा माता शिशूनां (लहान) **सुतानां निधनं** (वधातें) **निशम्य** (ऐकून) **घोरं परितप्यमाना** (संतप्त होणारी) **बाष्पकलाकुलाक्षी** (अश्रुधारांनीं आकुल झाले आहेत डोळे जिचे अशी) **अरुदत्** (रडली—शोक केला). **तां सांत्वयन् किरीटमाली** (अर्जुन) **आह**—॥ १५ ॥ **'हे भद्रे यत् आततायिनः ब्रह्मबंधोः** (ब्राह्मणाधम अशाच्या) **शिरः गांडीवमुक्तैः** (गांडीव धनुष्यापासून सुटलेल्या) **विशिखैः** (बाणांनीं) **उपाहरे** (आणीन); **यत् आक्रम्य** (वर बसून) **दग्धपुत्रा [त्वं] स्नास्यसि, तदा ते शुचः** (शोकातें) **प्रमृजामि** (दूर करीन).' ॥ १६ ॥

माता शिशूनां निधनं सुतानां निशम्य घोरं परितप्यमाना ॥ तदा ऽरुदद्बाष्पकलाकुलाक्षी तां सांत्वयन्नाह
किरीटमाली ॥ १५ ॥ तदा शुचस्ते प्रमृजामि भद्रे यद्ब्रह्मबन्धोः शिर आततायिनः ॥ गाण्डीवमुक्तैर्विशिखैरुपा-
हरे त्वाक्रम्य यत्स्नास्यसि दग्धपुत्रा ॥ १६ ॥ इति प्रियां वल्गुविचित्रजल्पैः स सान्त्वयित्वा ऽच्युतमित्रसूतः ॥
अभ्याद्रवद्दंशित उग्रधन्वा कपिध्वजो गुरुपुत्रं रथेन ॥ १७ ॥

अच्युतमित्रसूतः (अच्युत म्हणजे कृष्ण हाच मित्र व सारथी आहे ज्याचा, असा) **सः प्रियां इति वल्गुविचित्रजल्पैः** (मंजुल व विचित्र भाषणांनीं) **सांत्वयित्वा** (सांत्वन करून) **दंशितः** (कवच घातलेला) **उग्रधन्वा** (उग्र धनुष्य हातांत घेतलें ज्यानें असा) **कपिध्वजः** (मारुति आहे ध्वजावर ज्याच्या, असा) **रथेन गुरुपुत्रं अभ्याद्रवत्** (आंगावर चालून गेला). ॥ १७ ॥

पुत्रमरणनिमित्त स्नान घालीन आणि नंतर तुझे शोकाश्रु दूर करीन." ॥१६॥ श्रीकृष्णपरमात्मा अर्जुनाचा मित्र असून त्याचा सारथीही होता. - त्याच्या बळावर - अर्जुन, आपली प्रिया जी द्रौपदी तिचें पूर्वी सांगितल्याप्रमाणें मंजुल व विचित्र भाषणांनीं सांत्वन करून, कवच घालून, हस्तांत तें भयंकर गांडीव धनुष्य घेऊन, रथांत बसून, अश्वत्थाम्याच्या आंगावर चालून गेला. अर्जुनाच्या रथावरील ध्वजावर मारुति बसलेला असे. ॥ १७ ॥

---

१ अग्निदो गरदश्चैव शस्त्रपाणिर्धनापहः ॥ क्षेत्रदारहरश्चैव षडेते ह्याततायिनः ॥ १ ॥

१ आग लावणारा, २ विष घालणारा, ३ शस्त्र हातांत घेणारा (वध करण्याकरितां आंगावर चालून आलेला,) ४ द्रव्याचा अपहार करणारा, ५ जमीन (उत्पन्न) हरण करणारा, व ६ स्त्री हरण करणारा हे सहा आततायी होत. (ह्यांचा वध केला असतां दोष नाहीं.)

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

बालहत्या करणारा तो अश्वत्थामा, अर्जुन आपल्या आंगावर चालून येतो असें पाहिल्यावर भयभीत होत्साता, आपल्यानें दूर जाववेल तेवढें जाऊन प्राणरक्षण करावें, एवढ्याकरितां रथांत बसून पृथ्वीवर पळूं लागला. - सूत ह्मणतात :— त्याच्या पळण्यावरून सहज एक गोष्ट आठवली - अश्वत्थाम्याप्रमाणें शंकराच्या भयानें पूर्वी एकदां सूर्य पळाला होता. ॥ १८ ॥ किती झाला तरी ब्राह्मणाचा पुत्रच तो—क्षत्रियासारखा दीर्घविचारी रणकंटक नव्हे.—जेव्हां त्याला असें वाटलें कीं, आतां आपलें रक्षण करणारा कोणी नाहीं, धांवतांना घोडेही

कुमारहा (बालहत्या करणारा अश्वत्थामा) **सः तं आपतंतं दूरात् विलक्ष्य** (पाहून) **प्राणपरीप्सुः** (प्राण वांचविण्यास इच्छिणारा) **उद्विग्नमनाः** [**सन्**] **रथेन उर्व्यां** (पृथ्वीवर) **यावद्गमं** (जितकें दूर जाववेल तितकें), **यथा रुद्रभयात्** (शंकराच्या भीतीनें) **अर्कः** (सूर्य), [**तथा**] **पराद्रवत्** (पळाला). ॥ १८ ॥ **द्विजात्मजः** (ब्राह्मणाचा पुत्र) **यदा श्रांतवाजिनं** (थकले घोडे ज्याचे अशा) **आत्मानं अशरणं** (ज्याचें रक्षण करणारा कोणी नाहीं, अशा) **ऐक्षत** (पाहता झाला), [**तदा**] **ब्रह्मशिरः अस्त्रं** (ब्रह्मास्त्रातें) **आत्मत्राणं** (आपलें संरक्षण करणाऱ्या) **मेने**

तमापतन्तं स विलक्ष्य दूरात्कुमारहोद्विग्नमना रथेन ॥ पराद्रवत्प्राणपरीप्सुरुर्व्यां यावद्गमं रुद्रभयाद्यथा ऽर्कः ॥ १८ ॥ यदा ऽश्रणमात्मानमैक्षत श्रान्तवाजिनम् ॥ अस्त्रं ब्रह्मशिरो मेन आत्मत्राणं द्विजात्मजः ॥ १९ ॥ अथोपस्पृश्य सलिलं सन्दधे तत्समाहितः ॥ अजानन्नुपसंहारं प्राणकृच्छ्र उपस्थिते ॥ २० ॥ ततः प्रादुष्कृतं तेजः प्रचण्डं सर्वतोदिशम् ॥ प्राणापदमभिप्रेक्ष्य विष्णुं जिष्णुरुवाच ह ॥ २१ ॥

(विचार करिता झाला). ॥ १९ ॥ **अथ समाहितः** (ध्यान केलेला) [**सन्**] **सलिलं उपस्पृश्य** (आचमन करून) **प्राणकृच्छ्रे उपस्थिते** (प्राणांवर संकट आलें असतां) **उपसंहारं अजानन् अपि** (न जाणणारा असूनही) **तत्** (त्या अस्त्रातें) **संदधे** (जोडता झाला). ॥ २० ॥ **ततः सर्वतोदिशं प्रचंडं तेजः प्रादुष्कृतं** (प्रकट झालेलें). **जिष्णुः** (अर्जुन) **प्राणापदं** (प्राणांवरील संकटास) **अभिप्रेक्ष्य** (पाहून) **विष्णुं उवाच ह** (बोलला) :— ॥ २१ ॥

थकले; तेव्हां निर्वाणीं स्वसंरक्षणार्थ ब्रह्मास्त्र सोडावें असा त्यानें विचार केला. ॥ १९ ॥ तो बेत निश्चित झाल्यावर अश्वत्थाम्यानें अस्त्रदेवतेचें ध्यान करून व उदकाचें आचमन करून तें ब्रह्मास्त्र पांडवांवर सोडिलें. आतां तें अस्त्र आवरून घ्यावें कसें, ह्याचें ज्ञान त्याला नव्हतें; तरी पण प्राणांवर संकट गुदरल्यावर त्याला तसें करणें अगत्याचें वाटलें. ॥ २० ॥ नंतर त्या अस्त्रापासून दाही दिशांकडे एक भयंकर तेज प्रकट झालें. तें प्राणांवर आलेलें संकट अर्जुनानें पाहिल्याबरोबर तो श्रीकृष्णास ह्मणूं लागला कीं, ॥ २१ ॥

१ वामन पुराणांत अशी कथा आहे कीं, विद्युन्माली नांवाचा एक राक्षस होता. त्यानें शंकराची आराधना करून त्यापासून एक सुवर्णाचें विमान प्राप्त करून घेतलें. व सूर्याच्या पाठीमागून त्या विमानांत बसून तो फिरत असे. जेथें सूर्याचा प्रकाश नाहीं तेथें हा जात असे; ह्मणून त्या विमानाच्या प्रकाशामुळें रात्र नाहींशी झाली. हें जेव्हां सूर्याला समजलें तेव्हां त्यानें रागावून आपल्या तेजानें तें सुवर्णविमान तप्त करून वितळवून खालीं पाडलें. तेव्हां आपण आपल्या भक्ताला (विद्युन्मालीला) दिलेलें विमान सूर्यानें वितळविलें असें शंकरानीं पाहिल्याबरोबर रागावून डोळे लाल केले. तेव्हां सूर्याला भय वाटून तो पळूं लागला; पण शंकराच्या क्रूर दृष्टीनें दग्ध होत्साता पोळून तो श्रीवाराणसी क्षेत्रांत पतन पावला व लोलार्क नांवानें प्रसिद्ध झाला.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

"देवा, कृष्णा, तूं षड्गुणैश्वर्यसंपन्न आहेस, व भक्तांचीं भयें दूर करणाराही तूंच आहेस. तसेंच संसाराच्या योगानें पुरुष दग्ध होऊं लागले असतां त्या संसाराचा नाश करून प्राण्यांना सोडविणारा(मोक्षदाता)ही तूंच एक आहेस. ॥ २२ ॥ - मोक्ष देण्याची शक्ति तुझ्या ठिकाणीं असण्याचें कारण हें कीं - तूं साक्षात् ईश्वर सर्वशक्तिमान् आहेस. मायेपासून निराळा सर्वांचें आदिकरण पुरुष ह्मणतात तो तूंच. - बरें सर्वांस कारण असूनही पुनः तुला कोणत्याही प्रकारचा विकार नाहीं तर- तूं चैतन्याचे योगानें मायेला दूर ठेवून स्वतः अद्वितीय आत्मस्वरूपाचे ठिकाणीं स्थित आहेस. ॥ २३ ॥ ज्या जीवांचीं अंतःकरणें मायेनें गुंग झालीं असतात, त्यांना तूंच धर्म, अर्थ, काम ह्या त्रिविध पुरुषार्थाची प्राप्ति करून देऊन त्यांचें कल्याण करितोस. ॥ २४ ॥ तसाच हल्लीं तूं हा कृष्णरूपी अवतार पृथ्वीचा भार हरण करण्याकरितां घेतला आहेस. - आतां भूभार हरण करणें हें काम तूं संकल्पमात्रानें करूं

'कृष्ण कृष्ण महाभाग भक्तानां अभयंकर, त्वं एकः दह्यमानानां संसृतेः (संसाराचा) अपवर्गः (नाश करणारा) असि. ॥२२॥ त्वं साक्षात् ईश्वरः प्रकृतेः परः पुरुषः आद्यः मायां व्युदस्य (दूर करून) चिच्छक्त्या (ज्ञानशक्तीनें) कैवल्ये आत्मनि (निर्विकार अशा आत्मस्वरूपाचे ठिकाणीं) स्थितः [असि]. ॥ २३ ॥ सः एव [त्वं] मायामोहितचेतसः जीवलोकस्य स्वेन (आपल्या) वीर्येण (प्रभावानें) धर्मादिलक्षणं श्रेयः (धर्म अर्थ व काम हीं लक्षणें ज्याचीं अशा कल्याणातें) विधत्से. ॥ २४ ॥ तथाच ते अयं अवतारः भुवः भारजिहीर्षया

अर्जुन उवाच।कृष्ण कृष्ण महाभाग भक्तानामभयङ्कर॥त्वमेको दह्यमानानामपवर्गोऽसि संसृतेः॥२२॥त्वमाद्यः पुरुषः साक्षादीश्वरः प्रकृतेः परः॥
मायां व्युदस्य चिच्छक्त्या कैवल्ये स्थित आत्मनि॥२३॥स एव जीवलोकस्य मायामोहितचेतसः॥विधत्से स्वेन वीर्येण श्रेयो धर्मादिलक्षणम्॥२४॥
तथाऽयं चावतारस्ते भुवो भारजिहीर्षया॥स्वानां चानन्यभावानामनुध्यानाय चासकृत्॥२५॥किमिदं स्वित्कुतो वेति देव देवं न वेद्म्यहम्॥सर्वतो-
मुखमायाति तेजः परमदारुणम्॥२६॥श्रीभगवानुवाच।वेत्थेदं द्रोणपुत्रस्य ब्राह्ममस्त्रं प्रदर्शितम्॥नैवासौ वेद संहारं प्राणबाध उपस्थिते॥२७॥

(भार हरण करण्याच्या इच्छेनें) अनन्यभावानां (अनन्यभावानें शरण आलेल्या) स्वानां (भक्तांच्या) असकृत् (वारंवार) अनुध्यानाय (ध्यानाकरितां) च. ॥ २५ ॥ हे देव देव, सर्वतोमुखं (सर्व दिशांकडून) परमदारुणं (महाभयंकर) तेजः आयाति (येतें); इदं किंस्वित् (कायबरें), कुतः (कोठून) वा? इति अहं न वेद्मि (मी जाणत नाहीं).' ॥ २६ ॥ श्रीभगवान् उवाच—'द्रोणपुत्रस्य ब्राह्मं अस्त्रं प्राणबाधे उपस्थिते (प्राणांवर संकट गुदरलें असतां) प्रदर्शितं [अस्ति] (दाखविलें म्ह० सोडिलें आहे). असौ संहारं नैव वेद [इति त्वं] वेत्थ (जाणतोस). ॥२७॥

शकला असतास खरा. अवतार धरण्याचेंच कांहीं तुला कारण नव्हतें; परंतु अवतार धरण्यामध्यें दुसराही एक उद्देश आहे तो हा कीं - अनन्य भावानें तुझी भक्ति करणाऱ्या जीवांस ह्या स्वरूपाचें वारंवार ध्यान करितां यावें ह्मणूनच तूं कृष्णस्वरूप धारण केलेंस. ॥ २५ ॥ कृष्णा, तूं ब्रह्मदेवासारख्यांनाही ज्ञान देणारा आहेस. हें सर्व दिशांकडून महाभयंकर तेज येत आहे, हें काय असावें, कोणीकडून आलें असावें, हें मला समजत नाहीं." ॥२६॥ श्रीकृष्ण ह्मणतातः— "अर्जुना, हें द्रोणाचार्यांच्या पुत्राचें (अश्वत्थाम्याचें) ब्रह्मास्त्र होय. त्यानें आपल्या प्राणांवर संकट गुदरलें असें पाहून हें सोडिलें आहे. आतां ह्या अस्त्राला आवरून घ्यावें कसें तें अश्वत्थाम्याला अवगत नाहीं, ही गोष्ट तुला माहीत

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आहे. ॥ २७ ॥ ह्या अस्त्राची शक्ति क्षीण करणारें दुसरें कोणतेंही अस्त्र नाहीं. करितां अर्जुना, तुलाही ब्रह्मास्त्राचें ज्ञान आहेच, तेव्हां तूंच (ब्रह्मास्त्र) तूं सोड, आणि हें प्रचंड अश्वत्थाम्यानें सोडलेल्या ब्रह्मास्त्राचें तेज नाहींसें करून टाक." ॥२८॥ सूत ह्मणतातः– शत्रूंचा नाश करणाऱ्या त्या अर्जुनानें, श्रीकृष्णानें सांगितलेला उपदेश ऐकून लागलेंच आचमन करून त्यास प्रदक्षिणा केली व त्या ब्रह्मास्त्रावर ब्रह्मास्त्रांचेंच संधान केलें. ॥ २९ ॥ नंतर दोघांच्याही ब्रह्मास्त्रांची बाणांच्या आधारानें असलेलीं तीं तेजें एके ठिकाणीं मिळालीं; व जसे अग्नि व प्रलयकालचे सूर्य वाढतात तशीं पृथ्वी, स्वर्ग, आकाश ह्या तिन्ही लोकांस व्याप्त करून तीं वाढूं लागलीं. ॥ ३० ॥ पुढें त्या अस्त्रांच्या

अन्यतमं किंचित् (यापेक्षां दुसरें कोणतेंही) **अस्य प्रत्यवकर्शनं** (शक्ति क्षीण करणारें) **अस्त्रं नहि, अस्त्रज्ञः** [**त्वं**] **अस्त्रतेजसा उन्नद्धं** (प्रचंड अशा) **अस्त्रतेजः जहि** (नाहींसें कर). ॥ २८ ॥ **सूतः उवाच—परवीरहा** शत्रु हेच वीर, त्यांचा नाश करणारा) **फाल्गुनः** (अर्जुन) **भगवता** (ईश्वरानें) **प्रोक्तं श्रुत्वा अपः स्पृष्ट्वा तं परिक्रम्य** (त्याला प्रदक्षिणा करून) **ब्राह्माय** (ब्रह्मास्त्राकरितां) **ब्राह्मं** (ब्रह्मास्त्राला) **संदधे** (जोडिता झाला).॥ २९ ॥ **उभयोः** (दोघांच्या) **शरसंवृते** (बाणांच्या आधारानें राहिलेली) **तेजसी अन्योन्यं** (परस्परांस) **संहत्य** (मिळून) **रोदसी** (पृथ्वी व स्वर्ग यांस) **खं** (अंतरिक्षाला) **च आवृत्य** (व्यापून) **अर्कवन्हिवत्** (प्रलयकालच्या सूर्याग्निप्रमाणें) **ववृधाते** (वाढूं लागलीं). ॥ ३० ॥ **दह्यमानाः** (तप्त होणाऱ्या)

न ह्यस्यान्यतमं किञ्चिदस्त्रं प्रत्यवकर्शनम्॥जह्यस्त्रतेज उन्नद्धमस्त्रज्ञो ह्यस्त्रतेजसा॥२८॥सूत उवाच॥श्रुत्वा भगवता प्रोक्तं फाल्गुनः परवीरहा॥स्पृष्ट्वा ऽपस्तं परिक्रम्य ब्राह्मं ब्राह्माय सन्दधे॥२९॥संहत्यान्योऽन्यमुभयोस्तेजसी शरसंवृते॥आवृत्य रोदसी खं च ववृधाते ऽर्कवह्निवत् ॥३०॥दृष्ट्वा ऽस्त्रतेजस्तु तयोस्त्रीँल्लोकान्प्रदहन्महत्॥दह्यमानाः प्रजाः सर्वाः सांवर्तकममंसत॥३१॥प्रजोपप्लवमालक्ष्य लोकव्यतिकरं च तम्॥ मतं च वासुदेवस्य संजहारार्जुनोद्वयम्॥३२॥तत आसाद्य तरसा दारुणं गौतमीसुतम्॥बबन्धामर्षताम्राक्षः पशुं रशनया यथा ॥ ३३ ॥

सर्वाः प्रजाः तु त्रीन् लोकान् प्रदहत् (जाळणारें) **महत् तयोः** (त्या दोन्हींचें - बाणांचें) **अस्त्रतेजः दृष्ट्वा सांवर्तकं** (प्रलयकालच्या अग्नीस) **असंमत** (समजल्या - त्यांना वाटूं लागलें). ॥३१॥ **अर्जुनः प्रजोपप्लवं च** (जनांच्या उपद्रवाला), **तं लोकव्यतिकरं** (लोकांचा नाश करणाऱ्याला) **वासुदेवस्य मतं च आलक्ष्य** (जाणून) **द्वयं** (दोहोंस) **संजहार** (आटोपून घेता झाला). ॥ ३२ ॥ **ततः अमर्षताम्राक्षः** (रागानें लाल झाले आहेत डोळे ज्याचे असा) [**अर्जुनः**] **दारुणं गौतमीसुतं तरसा** (वेगानें) **आसाद्य** (गांठून), **यथा रशनया** (दोरीनें) **पशुं,** [**तथा**] **बबन्ध** (बांधिता झाला). ॥ ३३ ॥

योगानें तीनही लोकांस ताप होऊं लागला. सर्व प्रजांसही ताप झाला. व जेव्हां लोकांनीं तें प्रचंड दोन्ही बाणांचें अस्त्रतेज पाहिलें तेव्हां त्यांस प्रलयकालच आला कीं काय असें वाटूं लागलें. ॥ ३१ ॥ प्रजांस फार उपद्रव होत आहे; व लोकांचा फार नाश झाला ही गोष्ट अर्जुनाच्या लक्ष्यांत आली. मग त्यानें कृष्णाचें मत घेऊन दोन्ही अस्त्रें आटोपून घेतलीं. ॥ ३२ ॥ अर्जुनाचे डोळे रागानें लाल झाले होते. नंतर त्यानें त्या भयंकर अश्वत्थाम्याच्या आंगावर वेगानें धांवत जाऊन त्याला गांठिलें; आणि

CC-0. In Public Domain.Kâvikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

जसें एखाद्या यज्ञपशूला दोरीनें बांधावें त्याप्रमाणें त्याला बांधिलें. ॥ ३३ ॥ अर्जुनाचा बेत आपल्या शत्रूला (अश्वत्थाम्याला) दोरीनें बांधून शिबिरास (गोटांत) न्यावें असा होता; तो त्या कमलनयन श्रीकृष्णास दिसून आला व त्यानें जरासें रागावल्यासारखें करून अर्जुनास ह्मटलें कीं, ॥३४॥ " अर्जुना, ह्या अश्वत्थाम्याचें तूं रक्षण करावें ही गोष्ट योग्य नाहीं. कारण हा ब्राह्मणाधम आहे. तेव्हां ह्याचा वध कर - ब्राह्मणाधम कसा तो पहा कीं - ह्या अश्वत्थाम्यानेंच, निरपराधी बालकें रात्रीं निजलीं असतां, त्यांचा वध केला.॥३५॥ आतां तीं बालकें जरी त्याचीं शत्रु होतीं तरी तीं निजलीं असतां त्यांचा वध करणें हा धर्म नव्हे. धर्मज्ञानी पुरुष आपला शत्रु (१) मद्यप्राशनानें मत्त झाला असतां, (२) तो बेसावध

अंबुजेक्षणः (कमलासारखे नेत्र आहेत ज्याचे, असा) **भगवान् रिपुं रज्ज्वा** (दोरीनें) **बध्वा** (बांधून) **शिबिराय** (शिबिरास – गोटांत) **बलात् निनीषंतं** (नेण्यास इच्छिणाऱ्या) **अर्जुनं [दृष्ट्वा] प्रकुपितः [इव] प्राह–** ॥३४॥ **' हे पार्थ, एनं** (ह्याला) **त्रातुं** (रक्षण करण्यास) **मा अर्हसि** (योग्य नाहींस); **इमं ब्रह्मबंधुं** (ब्राह्मणाधमास) **जहि** (मार); **यः असौ निशि** (रात्रीं) **सुप्तान्** (निजलेल्या) **अनागसः** (निरपराधी अशा) **बालकान् अवधीत्** (मारिता झाला). ॥ ३५॥ **धर्मवित् मत्तं प्रमत्तं उन्मत्तं** (पिशाचादिकांनीं धरलेल्यास) **सुप्तं बालं स्त्रियं**

शिबिराय निनीषन्तं रज्ज्वा बध्वा रिपुं बलात् ॥ प्राहार्जुनं प्रकुपितो भगवानम्बुजेक्षणः ॥ ३४ ॥ मैनं पार्थार्हसि त्रातुं ब्रह्मबन्धुमिमं जहि ॥ यो ऽसावनागसः सुप्तानवधीन्निशि बालकान् ॥३५॥ मत्तं प्रमत्तमुन्मत्तं सुप्तं बालं स्त्रियं जडम् ॥ प्रपन्नं विरथं भीतं न रिपुं हन्ति धर्मवित् ॥ ३६ ॥ स्वप्राणान्यः परप्राणैः प्रपुष्णात्यघृणः खलः ॥ तद्वधस्तस्य हि श्रेयो यद्दोषाद्यात्यधः पुमान् ॥३७॥ प्रतिश्रुतं च भवता पाञ्चाल्यै शृण्वतो मम ॥ आहरिष्ये शिरस्तस्य यस्ते मानिनि पुत्रहा ॥३८॥

जडं प्रपन्नं (शरणागतास) **विरथं** (रथ मोडला ज्याचा असा) **भीतं रिपुं न हंति.** ॥ ३६ ॥ **अघृणः** (निर्दय) **यः खलः स्वप्राणान् परप्राणैः प्रपुष्णाति** (रक्षण करितो); **हि तद्वधः** (त्याचा वध) **तस्य श्रेयः, यद्दोषात्** (ज्याच्या दोषानें) **पुमान् अधः याति.** ॥ ३७ ॥ **हे मानिनि, यः ते पुत्रहा** (पुत्रास मारणारा) **तस्य शिरः आहरिष्ये [इति] भवता** (आपण) **मम श्रृ-**

असतां, (३) ग्रहपिशाचादिकांनीं धरला गेला असतां, (४) निद्रित असतां,(५)बाल्यावस्थेंत असेल तर, (६) स्त्रीच शत्रु असेल तर, (७) स्वरक्षणाविषयीं कोणत्याही प्रकारचा उद्योग करीत नसेल तर,(८)शरण आला असेल तर, (९) शत्रूचा रथ मोडला असेल तर, (१०) तो भयभीत झाला असेल तर, त्याचा वध करीत नाहींत. ॥३६॥ जो निर्दय पुरुष लोकांचे प्राण घेऊन आपलें रक्षण करितो; त्याचा वध होणें हें एक त्याचें कल्याणच आहे. कारण, तें त्याला प्रायश्चित्तच होय. - दोष करून त्याबद्दल प्रायश्चित्त किंवा दंड भोगला नाहीं तर - त्या दोषानें तो पुरुष नीच योनीस जातो. ॥ ३७ ॥ आणखी अर्जुना, मी ऐकत असतांना (माझे समक्ष) तूं द्रौपदीजवळ प्रतिज्ञाही केली आहेस कीं, ' हे मानिनि

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

द्रौपदी, ज्यानें तुझे पुत्र मारिले त्याचें शिर घेऊन येईन.' ॥ ३८॥ - अर्जुना, वीरा, ह्या अश्वत्थाम्याचे वधास तीन कारणें आहेत :- एक तर ह्यानें आपल्याच बंधूंचा नाश केला आहे म्हणून हा पापी होय; व दुसरें हा आततायी आहे; व तिसरें ह्यानें आपल्या स्वामीच्या (दुर्योधनाच्या) वंशाचा उच्छेद करून त्याचेंच अप्रिय केलें आहे व आपल्या कुलाला कलंक लावला. तेव्हां ह्याचा वध कर." ॥३९॥ सूत म्हणतातः— पूर्वोक्त प्रकारांनीं कृष्णानें सर्व प्रकारें विचार करून अर्जुनास धर्म सांगितला. पण जरी अश्वत्थाम्यानें प्रत्यक्ष आपले पुत्र मारिले तथापि तो गुरूचा (द्रोणाचा) पुत्र असल्याकारणानें त्याचा वध करणें ही गोष्ट मोठ्या मनाच्या अर्जुनास रुचली नाहीं. ॥ ४० ॥ नंतर, अर्जुन आपला मित्र

एवतः [सतः] (मी ऐकत असतांना) **पांचाल्यै** (द्रौपदीला) **प्रतिश्रुतम्** (वचन दिलेलें). ॥ ३८ ॥ **हे वीर, तत् असौ पापः आततायी आत्मबंधुहा कुलपांसनः** (कुलाला कलंक लावणारा) **वध्यतां** (मारावा); **[अयं] भर्तुः विप्रियं कृतवान्.'** ॥ ३९ ॥ **सूतः उवाच—एवं परीक्षिता** (विचार करणाऱ्या) **कृष्णेन धर्म चोदितः** (बोध केला ज्याला असा) **महान् पार्थः, यद्यपि आत्महनं, [तथापि] गुरुसुतं हन्तुं नैच्छत्.** ॥ ४० ॥ **अथ गोविंदप्रियसारथिः** (गोविंद हा मित्र व सारथि ज्याचा असा, अर्जुन) **स्वशिबिरं उपेत्य** (जवळ

तदसौ वध्यतां पाप आतताय्यात्मबन्धुहा ॥ भर्तुश्च विप्रियं वीर कृतवान्कुलपांसनः ॥ ३९ ॥ सूत उवाच ।
एवं परीक्षिता धर्म पार्थः कृष्णेन चोदितः ॥ नैच्छद्धन्तुं गुरुसुतं यद्यप्यात्महनं महान् ॥ ४० ॥ अथोपेत्य
स्वशिबिरं गोविन्दप्रियसारथिः ॥ न्यवेदयत्तं प्रियायै शोचन्त्या आत्मजान् हतान् ॥ ४१ ॥ तथाहृतं पशुवत्पा-
शबद्धमवाङ्मुखं कर्मजुगुप्सितेन ॥ निरीक्ष्य कृष्णा ऽपकृतं गुरोः सुतं वामस्वभावा कृपया ननाम च ॥ ४२ ॥

येऊन) **हतान् आत्मजान्** (पुत्रांस) **शोचन्त्यै** (शोक करणारी अशा) **प्रियायै तं न्यवेदयत्** (कळविता झाला). ॥ ४१ ॥ **वामस्वभावा** (उत्तम स्वभाव आहे जिचा, अशी) **कृष्णा** (द्रौपदी) **तथा पशुवत् पाशबद्धं आहृतं कर्मजुगुप्सितेन** (कर्माच्या दोषानें) **अवाङ्मुखं** (खालीं तोंड घातलेल्या) **अपकृतं** (ज्याचा अपकार केला आहे, अशा) **गुरोः सुतं कृपया निरीक्ष्य** (पाहून)

आणि सारथि जो कृष्ण परमात्मा त्याचे बरोबर आपले शिबिरांत आला. त्या वेळीं द्रौपदी आपल्या मृतपुत्रांबद्दल शोक करीत होती. तिच्याकडे जाऊन अर्जुनानें 'अश्वत्थाम्याला धरून आणला' ही गोष्ट तिला कळविली. ॥ ४१ ॥ द्रौपदीचा स्वभाव सरळ असे. अश्वत्थाम्याला यज्ञपशूसारखें दोरीनें बांधिलें होतें. व त्यानें आपल्या हातून निंद्यकर्म (निजलेल्या बालकांचा वध) घडल्यामुळें त्या दोषास्तव लाजून खालीं तोंड घातलें होतें. त्यानें किती जरी अपराध केले होते तरी तो गुरूचा मुलगा.

१ पांडवांच्या मुलांचा जरी त्यानें वध केला तरी दुर्योधन व पांडव एकच वंशांतील असल्यामुळें त्याचाही वंशाचा उच्छेद झाला.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

त्याला अर्जुनानें केलेला अपकार पाहून द्रौपदीला दया आली. लागलाच तिनें अश्वत्थाम्यास नमस्कार केला. ॥ ४२ ॥ अर्जुनानें त्याला बांधून आणिलें ही गोष्ट त्या सुशील द्रौपदीला सहन झाली नाहीं. ती लागलीच ह्मणाली कीं, "याला सोडा, सोडा. हा ब्राह्मण आपला गुरु ही गोष्ट प्रसिद्ध आहे." ॥४३॥ द्रौपदी अर्जुनास ह्मणाली :– "आपण गुप्तमंत्रांसुद्धां धनुर्विद्या व विसर्ग[1] आणि उपसंहार[2]सह अस्त्रसमुदाय ज्यांच्या अनुग्रहानें शिकलां, ॥ ४४ ॥ ते सर्वसमर्थ द्रोणाचार्य मृत्यु पावले तरी देखील पुत्ररूपानें सध्यां

ननाम (नमस्कार करिती झाली). ॥ ४२ ॥ **अस्य बंधनानयनं** (बांधून आणणें) **च असहन्ती** (न सहन करणारी) **सती उवाच – 'मुच्यतां** (सोडावा) **मुच्यतां ! एषः ब्राह्मणः नितरां गुरुः [अस्ति]'** ॥ ४३ ॥ **'सरहस्यः** (गुप्त - मंत्रां-सहित) **धनुर्वेदः सविसर्गोपसंयमः** (अस्त्रें सोडणें व आटोपणें यांसहित) **अस्त्रग्रामः च** (अस्त्रसमुदाय) **भवता यदनुग्रहात्** (ज्याच्या कृपेनें) **शिक्षितः;** ॥ ४४ ॥ **सः एषः भगवान् द्रोणः प्रजारूपेण** (पुत्ररूपानें) **वर्तते** (आहे), **यस्य आत्मनः अर्धं** (शरीराचा अर्धा भाग) **पत्नी कृपी आस्ते; [यतः] वीरसूः**

उवाच चासहन्त्यस्य बन्धनानयनं सती ॥ मुच्यतां मुच्यतामेष ब्राह्मणो नितरां गुरुः ॥ ४३ ॥
सरहस्यो धनुर्वेदः सविसर्गोपसंयमः ॥ अस्त्रग्रामश्च भवता शिक्षितो यदनुग्रहात् ॥ ४४ ॥
स एष भगवान्द्रोणः प्रजारूपेण वर्तते ॥ यस्यात्मनोऽर्धं पत्न्यास्ते नान्वगाद्वीरसूः कृपी॥४५॥
तद्धर्मज्ञ महाभाग भवद्भिर्गौरवं कुलम् ॥ वृजिनं नार्हति प्राप्तुं पूज्यं वन्द्यमभीक्ष्णशः ॥ ४६ ॥
मा रोदीदस्य जननी गौतमी पतिदेवता ॥ यथाऽहं मृतवत्सार्ता रोदिम्यश्रुमुखी मुहुः ॥ ४७ ॥

(वीरपुत्र प्रसवणारी अशी) [ततः] न अन्वगात् (सहगमन करिती झाली). ॥ ४५ ॥ **तत्, हे धर्मज्ञ महाभाग, अभीक्ष्णशः** (नित्य) **वन्द्यं पूज्यं गौरवं** (गुरूचें जें तें) **कुलं भवद्भिः वृजिनं** (दुःखातें) **प्राप्तुं न अर्हति.** ॥ ४६ ॥ **यथा मृतवत्सा** (मेले आहेत पुत्र जिचे अशी) **आर्ता** (दुःखी) **अश्रुमुखी अहं मुहुः** (वारंवार) **रोदिमि** (रडत्यें); **[तथा] अस्य जननी पतिदेवता** (पतिव्रता) **गौतमी मा रोदीत्** (न रडो). ॥ ४७ ॥

पृथ्वीवर आहेतच. त्यांचा शरीराचा अर्धा भाग जी त्यांची पत्नी कृपी ती अद्याप जीवंत आहे. तिला वीर पुत्र असल्यामुळें ती द्रोणाचार्यांबरोबर सती गेली नाहीं. ॥ ४५ ॥ तेव्हां अर्जुना, तुह्मीं धर्मज्ञ आहां, भाग्यशाली आहां, तुमच्या हातून गुरुकुलाची नित्य पूजा घडावी, त्यास तुह्मीं नित्य वंदन करावें, अशा त्या कुलाला दुःख देणें योग्य नाहीं. ॥ ४६ ॥ जसें मी माझे पुत्र मेल्यामुळें दुःखित होत्साती वारंवार रोदन करित्यें, माझे मुखावरून सारख्या अश्रुधारा चालतात, तसें रडण्याचा प्रसंग ह्या अश्वत्थाम्याची माता

---

१ अस्त्र सोडण्याचा प्रकार. २ अस्त्र आटोपून घेण्याचा प्रकार. ३ पत्नी शरीराचा अर्धा भाग अशी श्रुति आहे.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

जी पतिव्रता गौतमी तिच्यावर न यावा. ॥ ४७ ॥ क्षत्रियांनीं ब्राह्मणाचा अपमान न करण्याविषयीं इंद्रियनिग्रह न करितां त्यांच्या कुलास क्रोध आणिला तर तें क्रुद्ध झालेलें ब्रह्मकुल क्रोध आणणाऱ्या क्षत्रियकुलास अति शोकांत बुडवितें व शेवटीं सपरिवार त्या क्षत्रिय कुलाचा तत्काल नाश करितें." ॥ ४८ ॥ ऋषिहो, धर्मराजानें द्रौपदीच्या भाषणास अनुमोदन दिलें (मला द्रौपदीचें म्हणणें मान्य आहे असें सांगितलें); - कारण, त्या भाषणांत तसेच गुण होते. - तें भाषण निष्कपट असून धर्म, न्याय, दया, साम्य आणि प्रौढी ह्या गुणांनीं पूर्ण होतें. ॥ ४९ ॥ तेथें जी इतर मंडळी बसली होती - नकुल, सहदेव, सात्यकि, अर्जुन, देवकीपुत्र भगवान् श्रीकृष्ण इत्यादि पुरुष, व आणखी त्या शिबिरांतील स्त्रिया—त्या सर्वांचा ह्या म्हणण्यास रुकार पडला. ॥५०॥ ह्या मंडळींत एक भीमसेनाला मात्र -, 'अश्वत्थाम्यास सोडून देणें' ही गोष्ट पसंत नव्हती, म्हणून- तो

अकृतात्मभिः (इंद्रियनिग्रह न केलेल्या) यैः राजन्यैः (क्षत्रियांनीं) ब्रह्मकुलं कोपितं, [तत् ब्रह्मकुलं] सानुबन्धं (सपरिवार अशा) शुचार्पितं (शोकानें व्याप्त अशा) तत्कुलं आशु (सत्वर) प्रदहति (जाळून टाकितें).' ॥ ४८ ॥ सूतः उवाच—हे द्विजाः धर्मसुतः राजा राज्ञ्याः (द्रौपदीच्या) धर्म्यं न्याय्यं सकरुणं निर्व्यलीकं (निष्कपट अशा) समं (साम्ययुक्त अशा) महत् (प्रौढ अशा) वचः प्रत्यनंदत् (अनुमोदन देता झाला). ॥ ४९ ॥ ये च अन्ये नकुलः सहदेवः च युयुधानः (सात्यकि) धनंजयः भग-

यैः कोपितं ब्रह्मकुलं राजन्यैरकृतात्मभिः ॥ तत्कुलं प्रदहत्याशु सानुबन्धं शुचार्पितम् ॥ ४८ ॥ सूत उवाच। धर्म्यं न्याय्यं सकरुणं निर्व्यलीकं समं महत् ॥ राजा धर्मसुतो राज्ञ्याः प्रत्यनन्दद्वचो द्विजाः ॥ ४९ ॥ नकुलः सहदेवश्च युयुधानो धनञ्जयः ॥ भगवान्देवकीपुत्रो ये चान्ये याश्च योषितः ॥ ५० ॥ तत्राहामर्षितो भीमस्तस्य श्रेयान्वधः स्मृतः ॥ न भर्तुर्नात्मनश्चार्थे यो ऽहन् सुप्तान् शिशून्वृथा ॥ ५१ ॥ निशम्य भीमगदितं द्रौपद्याश्च चतुर्भुजः ॥ आलोक्य वदनं सख्युरिदमाह हसन्निव ॥ ५२ ॥

वान् देवकीपुत्रः याः च योषितः (स्त्रिया). ॥ ५० ॥ तत्र अमर्षितः (रागावलेला) भीमः आह—'तस्य वधः श्रेयान् (उत्तम) स्मृतः, यः सुप्तान् शिशून् वृथा अहन् (मारिता झाला); न भर्तुः अर्थे, न आत्मनः च [अर्थे]. ॥ ५१ ॥ चतुर्भुजः (कृष्ण) भीमगदितं (भीमाच्या बोलण्याला) द्रौपद्याश्च [गदितं] निशम्य (ऐकून) सख्युः (मित्राच्या म्ह० अर्जुनाच्या) वदनं

रागावून म्हणूं लागला कीं 'अश्वत्थाम्याचा वध करणें, ही गोष्ट उत्तम आहे. कारण, त्यानें निजलेल्या लहान लहान बाळांचा व्यर्थ कीं हो वध केला! त्यामध्यें ह्याचें अथवा याचा प्रभु जो दुर्योधन त्याचेंही कांहींएक हित नव्हतें.' ॥ ५१ ॥ त्या चतुर्भुज कृष्ण परमात्म्यानें, भीमाचेंही बोलणें ऐकिलें व द्रौपदीचेंही ऐकिलें; तसेंच अर्जुनानेंही दोघांचें बोलणें ऐकलें होतें. व आतां कोणाचें बोलणें मानावें: द्रौपदी व इतर सर्व मंडळी एकीकडे, त्यांचें म्हणणें 'अश्वत्थाम्यास सोडावा' हे ऐकावें: किंवा भीमाचें म्हणणें 'अश्वत्थाम्याचा वध करावा' हें एकावें: असा त्याला संशय आला होता. हें अर्जुनाचें अंतरगत कृष्णांनीं जाणिलें व त्याचे तोंडाकडे पाहून हंसत हंसत बोलण्यास प्रारंभ केला – ॥५२॥

१ भीम तर अश्वत्थाम्याला मारावयाला तयार झाला व द्रौपदी भीमाचें निवारण करायला तयार झाली. अशा वेळीं दोघांचेंही निवारण करण्याकरितां देवाला चार हस्त प्रकट करणें भाग पडलें.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

कृष्ण म्हणालेः—" अर्जुना, ब्राह्मणाला मारूं नये असाही धर्म मीच सांगितला आहे. बरें, एखादा पुरुष महाविद्वान् आहे पण जर तो आततायी असेल तर त्याच्या वधापासून ब्रह्महत्येचा दोष नाहीं, असेंही मीच सांगितलें आहे. तेव्हां त्या माझ्या दोन्ही आज्ञांचें पालन कर. ॥ ९३ ॥ अर्जुना, द्रौपदीचें सांत्वन करिते वेळीं जी तूं प्रतिज्ञा केली आहेस ती खरी कर. व तसें करतांना भीमाला, द्रौपदीला व मला प्रिय होईल असेंच कर."।९४॥ सूत म्हणतात :— ऋषिहो, पुढें अर्जुनानें श्रीकृष्णाच्या मनांतील अभिप्राय जाणला व त्या ब्राह्मणाच्या (अश्वत्थाम्याच्या) मस्तकांतील मणि त्याच्या केसांसह काढून घेतला. ॥ ९९ ॥ अश्वत्थाम्याला पूर्वी दोरीनें बांधला होता ती दोरी सोडिली, अगोदरच बालह-

आलोक्य (पाहून) हसन् इव इदं आह.—॥ ५२ ॥ श्रीभगवान् उवाच— 'आततायी वधार्हणः (वध करण्यास योग्य असा), ब्रह्मबंधुः न हंतव्यः, मयैव आम्नातं (सांगितलेल्या) उभयं अनु-
शासनं (आज्ञेतें) परिपाहि (पालन कर). ॥ ५३ ॥ यत् प्रियां सांत्वयता (सांत्वन करणाऱ्या) [त्वया] प्रतिश्रुतं (प्रतिज्ञा केलेलें) तत् सत्यं कुरु (कर) च, भीमसेनस्य पांचाल्याः मह्यं
(मला) प्रियं एव.' ॥ ५४ ॥ सूतः उवाच— अथ अर्जुनः सहसा हरेः हार्दं (मनांतील अभिप्रायातें) आज्ञाय (जाणून) असिना (तलवारीनें) द्विजस्य मूर्धन्यं (मस्तकांत असलेल्या)

श्रीभगवानुवाच । ब्रह्मबन्धुर्न हन्तव्य आततायी वधार्हणः ॥ मयैवोभयमाम्नातं परिपाह्यनुशासनम् ॥ ५३ ॥ कुरु प्रतिश्रुतं सत्यं
यत्त्वत्सान्त्वयता प्रियाम् ॥ प्रियं च भीमसेनस्य पाञ्चाल्या मह्यमेव च ॥ ५४ ॥ सूत उवाच । अर्जुनः सहसा ऽऽज्ञाय हरेर्हार्द-
मथासिना ॥ मणिं जहार मूर्धन्यं द्विजस्य सहमूर्धजम् ॥ ५५ ॥ विमुच्य रशनाबद्धं बालहत्याहतप्रभम् ॥ तेजसा मणिना हीनं
शिबिरान्निरयापयत् ॥ ५६ ॥ वपनं द्रविणादानं स्थानान्निर्यापणं तथा ॥ एष हि ब्रह्मबन्धूनां वधो नान्यो ऽस्ति दैहिकः ॥ ५७ ॥

सहमूर्धजं (केशांसहित अशा) मणिं जहार (काढून घेता झाला). ॥ ५५ ॥ रशनाबद्धं (दोरीनें बांधिलेल्यास) विमुच्य (सोडून) बालहत्याहतप्रभं (बालहत्येनें कमी झालें आहे तेज ज्याचें अशा)
तेजसा मणिना हीनं [तं] शिबिरात् निरयापयत् (हांकलून देता झाला). ॥ ५६ ॥ वपनं (क्षौर करणें) द्रविणादानं (द्रव्य दंड करणें) तथा स्थानात् निर्यापणं (घालवून देणें) एषः
ब्रह्मबंधूनां वधः; हि अन्यः दैहिकः (देहसंबंधी ह्मः वध) नास्ति. ॥ ५७ ॥

त्या केल्यामुळें त्याचें तेज कमी झालें होतें; त्यांत आणखी अर्जुनानें मणि काढून घेतला. मग सर्वच तेज नाहींसें झालें. अशा त्या अश्वत्थाम्याला शिबिरांतून अर्जुनानें घालवून दिलें. ॥ ९६ ॥ - आतां ह्या कृत्यापासून भीम, द्रौपदी व कृष्ण ह्या सर्वांचें प्रिय कसें संपादिलें तें पहाः— ब्राह्मणांचा वध करणें म्हणजे त्यांचा शिरच्छेद करणें, किंवा त्यासार-
खाच दुसरा कांहीं उपाय करून जीव घेणें, हाच केला पाहिजे असें नाहीं, तर :— क्षौर करणें, द्रव्यदंड घेणें, बाहेर घालवून लावणें (एकंदरींत अपमान करणें) हे त्यांचे वधच

१ हें एक कोडेंच होतें म्हणजे अश्वत्थाम्याला मारावा तेव्हां भीमाला बरें वाटणार, पण द्रौपदीला वाईट वाटेल; न मारावा तर द्रौपदीला बरें वाटणार, पण भीमाला वाईट वाटेल; दोघांचीही प्रिय गोष्ट होईल तेव्हां कृष्णाला बरें वाटणार; कोणालाच वाईट वाटून उपयोगीं नाहीं, अशी तर गोष्ट केली पाहिजे.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

होत. - अर्जुनानें अश्वत्थाम्याचा प्रत्यक्ष वध केला नाहीं खरा; व त्याच्या मस्तकांतून मणि काढून त्याचा अपमान केला म्हणून त्याचा वध केला हेंही खरें. ह्याप्रमाणें करून अर्जुनानें सर्वांचें प्रिय संपादिलें. - ॥ ९७ ॥ द्रौपदीसह सर्व पांडव पुत्रशोकामुळें फार व्यग्र होते, पण पुढें त्यांनीं शोक एकीकडे ठेविला, व रणामध्यें मरण पावलेल्या आपल्या बंधूंचें दहनादिक और्ध्वदेहिक कर्म केलें. ॥ ९८ ॥ **इति सप्तमो ऽध्यायः ॥ ७ ॥** सूत म्हणतातः— नंतर ते पांडव कृष्णासहवर्तमान, आपल्या स्त्रियांस बरोबर घेऊन, स्ववंशजांस गंगेमध्यें तिलांजली देण्याकरितां निघाले. कारण त्यांचे (पांडवांचे) युद्धांत मरण पावलेले आप्त 'आपल्यास उदक मिळावें' असें इच्छित होते. ॥ १ ॥ - त्या **कृष्णया सह** (द्रौपदीसह) **पुत्रशोकातुराः सर्वे पांडवाः मृतानां स्वानां** (आपल्या बंधूंच्या) **निर्हरणादिकं** (दहनादि) **यत् कृत्यं, [तत्] चक्रुः** (करिते झाले). ॥ ५८ ॥ **॥ इति श्रीभागवतान्वये प्रथमस्कंधे सप्तमो ऽध्यायः ॥ ७ ॥** **सूतः उवाच- अथ सकृष्णाः** (कृष्णासहवर्तमान) **ते संपरेतानां** (मेलेल्यांस) **उदकं इच्छतां** (इच्छिणाऱ्या) **स्वानां गङ्गायां [उदकं] दातुं स्त्रियः पुरस्कृत्य** (स्त्रियांस पुढें करून) **ययुः** (गेले). ॥ १ ॥ **ते सर्वे उदकं निनीय** (पोंचवून - देऊन) **च भृशं** (फार) **विलप्य** (शोक

पुत्रशोकातुराः सर्वे पाण्डवाः सह कृष्णया ॥ स्वानां मृतानां यत्कृत्यं चक्रुर्निर्हरणादिकम् ॥ ५८ ॥ इति श्रीभा० म०पु० प्र०स्कं० द्रौणिग्रहणं नाम सप्तमो ऽध्यायः॥७॥ सूत उवाच । अथ ते सम्परेतानां स्वानामुदकमिच्छताम् ॥ दातुं सकृष्णा गङ्गायां पुरस्कृत्य ययुः स्त्रियः ॥ १ ॥ ते निनीयोदकं सर्वे विलप्य च भृशं पुनः ॥आप्लुता हरिपादाब्जरजःपूतसरिज्जले ॥ २ ॥ तत्रासीनं कुरुपतिं धृतराष्ट्रं सहानुजम् ॥ गान्धारीं पुत्रशोकार्तां पृथां कृष्णां च माधवः ॥ ३ ॥ सान्त्वयामास मुनिभिर्हतबन्धूञ्छुचार्पितान् ॥ भूतेषु कालस्य गतिं दर्शयन्नप्रतिक्रियाम् ॥ ४ ॥

करून) **पुनः हरिपादाब्जरजःपूतसरिज्जले** (हरीच्या चरणकमलाच्या धूलीनें पवित्र झालेल्या - गंगा - नदीच्या उदकांत) **आप्लुताः** (स्नान केलेले). ॥ २ ॥ **मुनिभिः [सहितः] माधवः तत्र आसीनं** (बसलेल्या) **धृतराष्ट्रं सहानुजं** (बंधूंसह अशा) **कुरुपतिं** (धर्मराजास) **पुत्रशोकार्तां गान्धारीं पृथां कृष्णां च हतबन्धून् शुचा** (शोकानें) **अर्पितान् [सर्वान्] भूतेषु** (प्राणिमात्रांचे ठिकाणीं) **कालस्य अप्रतिक्रियां** (अपरिहार्य अशा) **गतिं दर्शयन्** (दाखविणारा) **सांत्वयामास** (सांत्वन करिता झाला). ॥ ३ ॥ ४ ॥

सर्व गंगेवर गेलेल्या मंडळींनीं एकवार प्रथम स्नान केलें, - आपल्या मृत वंशजांना तिलांजलि दिला, व त्यांच्या मरणाबद्दल अतिशय विलाप केला, नंतर श्रीकृष्णाच्या चरणधूलीनें पवित्र झालेल्या त्या गंगोदकामध्यें पुन्हां स्नान केलें. ॥ २ ॥ त्या गंगेच्या तीरीं धर्मराज बंधूंसहवर्तमान बसले होते, धृतराष्ट्रही होता, पुत्रशोकामुळें दुःखित झालेल्या गांधारी, कुंती, आणि द्रौपदी, ह्याही बसल्या होत्या. सर्व मंडळी आपल्या बंधूंच्या वधामुळें शोकग्रस्त झाली होती. तेव्हां कृष्णानें स्वतः व ऋषिसमुदायाकडूनही त्यांचें सांत्वन केलें. त्यांनीं सांगितलें कीं, पहा, प्राणिमात्राचे ठिकाणीं ही कालाची गति अशी अपरिहार्य आहे म्हणजे ज्या कालीं जी गोष्ट व्हावयाची ती कधींही चुकणें नाहीं; म्हणून आतां

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

झालेल्या गोष्टीबद्दल शोक करूं नका. ॥ ३ ॥ ४ ॥ - श्रीकृष्णांनीं पांडवांकडे येऊन केलेल्या चरित्राचें या दोन श्लोकांत थोडक्यांत वर्णन केलें आहे :- (१) धर्मराजाच्या मनांत कोणाविषयींही शत्रुबुद्धि नव्हती; असें असतांही दुर्योधन, शकुनि वगैरे कपटी मंडळींनीं मिळून त्याचें राज्य हरण केलें होतें, तें त्याला कृष्णानें मिळवून दिलें. (२) पृथ्वीवर दुष्ट राजे पुष्कळ झाले होते. दुःशासनानें द्रौपदीचे केश ग्रहण केले, - त्याप्रमाणें इतर राजांनीं पुष्कळ दुष्ट गोष्टी केल्या होत्या, - त्यामुळें त्यांचीं आयुष्यें क्षीण झालीं होतींच पण निमित्तमात्र होऊन त्यांचा वध करविला; (३) तसेंच धर्मराजाकडून यथाशास्त्र उत्तम साधनांनीं युक्त असे तीन अश्वमेध करविले; आणि इंद्राप्रमाणें त्याची निर्मल व लोकांस पवित्र करणारी कीर्ति दाहीं दिशांचे ठिकाणीं प्रसृत केली. ॥ ५ ॥ ६ ॥ सूत ह्मणतातः— ब्रह्मनिष्ठ ऋषिहो, - कृष्णानें द्वारकेस जाते **कितवैः** (कपटी अशांनीं) **हृतं** (हरण केलेलें) **अजातशत्रोः** (न झाला आहे शत्रु ज्याला अशा – धर्मराजाचें) **स्वराज्यं साधयित्वा, कचस्पर्शक्षतायुषः** (केश धरल्यानें क्षीण झालीं आहेत आयुष्यें ज्यांचीं अशा) **असतः** (दुष्ट अशा) **राज्ञः घातयित्वा,** ॥ ५ ॥ **तं त्रिभिः उत्तमकल्पकैः** (उत्तम साधनांनीं युक्त अशा) **अश्वमेधैः याजयित्वा** (यज्ञ करवून) **शतमन्योः** (इन्द्राच्या) **इव पावनं** (पवित्र करणाऱ्या) **तद्यशः दिक्षु अतनोत्** (प्रसृत करिता झाला). ॥ ६॥ **[हे] ब्रह्मन्, द्वैपायनादिभिः पूजितैः विप्रैः प्रतिपूजितः शैनेयोद्धवसंयुतः** (सात्यकि, उद्धव यांसह) **पांडुपुत्रान्**

साधयित्वाऽजातशत्रोः स्वराज्यं कितवैर्हृतम् ॥ घातयित्वाऽसतो राज्ञः कचस्पर्शक्षतायुषः ॥ ५ ॥ याजयित्वाऽश्वमेधैस्तं त्रिभिरुत्तमकल्पकैः तद्यशः पावनं दिक्षु शतमन्योरिवातनोत् ॥६॥ आमन्त्र्य पाण्डुपुत्रांश्च शैनेयोद्धवसंयुतः ॥ द्वैपायनादिभिर्विप्रैः पूजितैः प्रतिपूजितः ॥ ७ ॥ गन्तुं कृतमतिर्ब्रह्मन्द्वारकां रथमास्थितः ॥ उपलेभेऽभिधावन्तीमुत्तरां भयविह्वलाम् ॥ ८ ॥ पाहि पाहि महायोगिन् देव देव जगत्पते ॥ नान्यं त्वदभयं पश्ये यत्र मृत्युः परस्परम् ॥ ९ ॥ अभिद्रवति मामीश शरस्तप्तायसो विभो ॥ कामं दहतु मां नाथ मा मे गर्भो निपात्यताम् ॥ १० ॥

आमन्त्र्य (निरोप घेऊन), **द्वारकां गन्तुं कृतमतिः** (विचार केला ज्यानें, असा) **रथं आस्थितः भयाविह्वलां अभिधावंतीं** (आपल्याकडे धांवत येणाऱ्या) **उत्तरां उपलेभे** (पाहता झाला). ॥ ७॥८॥ **उत्तरा उवाच—हे महायोगिन् देव देव जगत्पते, पाहि** (रक्षण कर) **पाहि; त्वत् अन्यं** (तुझ्या व्यतिरिक्त अशा) **अभयं न पश्ये, यत्र परस्परं मृत्युः.** ॥ ९ ॥ **[हे] विभो ईश, तप्तायसः** वेळीं - व्यासप्रभृति ब्राह्मणांचें पूजन केलें. त्यावेळीं त्या ब्राह्मणांनींही कृष्णाची पूजा, स्तुति इत्यादि केली. नंतर कृष्ण पांडवांचा निरोप घेऊन सात्यकि व उद्धव यांसह द्वारकेस जाण्याच्या उद्देशानें रथांत जाऊन बसले. इतक्यांत उत्तरा भयानें व्याकुल होउन आपलेकडेच धांवत येत आहे, असें कृष्णाच्या दृष्टीस पडलें. ॥ ७ ॥ ८ ॥ उत्तरा आल्याबरोबर ह्मणूं लागली कीं " कृष्णा, तूं महान् योगी आहेस. देवांनाही तूंच ज्ञान देतोस. जगाचें रक्षणही तूंच करतोस. ह्मणून माझें रक्षण कर. ह्या लोकांत सर्वांना परस्परांपासून भीति आहेच; ह्मणून तुझ्याशिवाय दुसरें निर्भय स्थान मला दिसत नाहीं. ॥ ९ ॥ कृष्णा, तूं व्यापक असून तुझ्या इच्छेस येईल तें करण्यास समर्थ आहेस.

१ विराट राजाची मुलगी, अभिमन्यूची पत्नी, परीक्षित् राजाची माता.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

- सध्यां मला भय एवढेंच आहे कीं, - हा बाण माझे अंगावर येत आहे; ह्याचें शल्य तापलेलें आहे. ह्या बाणानें माझें शरीर दग्ध झालें तरी चिंता नाहीं; - मला स्वतां साठीं भीति वाटत नाहीं, - पण माझ्या गर्भास दुःख होऊं नये. " ॥ १० ॥ सूत ह्मणतातः—भक्तांविषयीं कृपाळु श्रीकृष्णपरमात्मा उत्तरेचें भाषण ऐकिल्यावर मनांत समजला कीं, - अर्जुनानें पराभव केल्यामुळें अश्वत्थाम्याला क्रोध येऊन - त्यानें पृथ्वी निष्पांडवी करण्याकरितां हें ब्रह्मास्त्र सोडिलें आहे. ॥ ११ ॥ शौनक ऋषीहो, उत्तरेच्या आंगावर एक बाण आल्यामुळें ती कृष्णाकडे आली - त्याच वेळीं तापून लाल झालेले पांच बाण पांचही पांडवांच्या आंगावर गेले. ते बाण आपल्यासमोर येत आहेत असें

(तापलेलें आहे अग्र ज्याचें असा) [अयं] शरः (बाण) मां अभिद्रवति (आंगावर येत आहे); [हे] नाथ, मां कामं (यथेच्छ) दहतु (जाळो), मे गर्भः मा निपात्यतां (पाडला न जावो ह्म० दुखावला जाऊं नये).' ॥ १० ॥ सूतः उवाच—भक्तवत्सलः भगवान् तस्याः (तिच्या) वचः उपधार्य (ऐकून) इदं अपांडवं कर्तुं द्रौणेः अस्त्रं अबुद्ध्यत (समजला). ॥ ११ ॥ हे मुनिश्रेष्ठ, अथ तर्ह्येव (त्याच वेळेस) पांडवाः दीप्तान् पंच सायकान् (बाणांस) आत्मनः अभिमुखान् आलक्ष्य (पाहून) अस्त्राणि उपाददुः (घेते झाले). ॥ १२ ॥

सूत उवाच । उपधार्य वचस्तस्या भगवान्भक्तवत्सलः ॥ अपाण्डवमिदं कर्तुं द्रौणेरस्त्रमबुद्ध्यत ॥११॥ तर्ह्येवाथ मुनिश्रेष्ठ पाण्डवाः पञ्च सायकान् ॥ आत्मनो ऽभिमुखान्दीप्तानालक्ष्यास्त्राण्युपाददुः ॥ १२ ॥ व्यसनं वीक्ष्य तत्तेषामनन्यविषयात्मनाम् ॥ सुदर्शनेन स्वास्त्रेण स्वानां रक्षां व्यधाद्विभुः ॥ १३ ॥ अन्तस्थः सर्वभूतानामात्मा योगेश्वरो हरिः ॥ स्वमायया ऽऽवृणोद्गर्भं वैराट्याः कुरुतन्तवे ॥१४॥ यद्यप्यस्त्रं ब्रह्मशिरस्त्वमोघं चाप्रतिक्रियम् ॥ वैष्णवं तेज आसाद्य समशाम्यद्भृगूद्वह ॥ १५ ॥

विभुः अनन्यविषयात्मनां (केवळ आपलेच ठिकाणीं निष्ठा आहे ज्यांची, अशा) तेषां तत् व्यसनं (संकटातें) वीक्ष्य (पाहून) स्वास्त्रेण सुदर्शनेन स्वानां (आपल्या - पांडवांचें) रक्षां व्यधात् (करिता झाला).॥१३॥ सर्वभूतानां आत्मा योगेश्वरः हरिः स्वमायया अंतस्थः (आंत प्रवेश केलेला) [सन्] वैराट्याः (विराटाच्या मुलीच्या - उत्तरेच्या) गर्भं कुरुतन्तवे (कुरु वंशाच्या संतानार्थ - उच्छेद न व्हावा ह्मणून) आवृणोत् (आवरण करिता झाला). ॥ १४॥ हे भृगूद्वह, यद्यपि ब्रह्मशिरः अस्त्रं अमोघं (व्यर्थ न होणारें) अप्रतिक्रियं (दुसऱ्याकडून शक्ति कमी न होणारें), पाहिल्याबरोबर त्यांच्या निवारणाकरितां पांडवांनींही अस्त्रें उचललीं. ॥ १२ ॥ श्रीकृष्णानें पाहिलें कीं, पांडवांची आपले ठिकाणींच एक दृढ निष्ठा आहे, व त्यांच्यावर हें एक संकट आलें आहे, आणि ह्याचें निवारण दुसऱ्या कोणत्याही अस्त्रानें व्हावयाचें नाहीं. मग त्या व्यापक परमेश्वरानें आपलें सुदर्शन चक्र सोडून पांडवांचें रक्षण केलें. ॥ १३ ॥ श्रीकृष्ण प्राणिमात्रांचा आत्मा व महायोगी असल्यामुळें - त्याला कोणतीही गोष्ट करणें अशक्य नाहीं. उत्तरा शरण आली होतीच, - मग त्यानें आपल्या मायाशक्तीच्या योगानें उत्तरेच्या उदरांत प्रवेश केला, व कुरुवंशाचा छेद न व्हावा ह्मणून तिच्या गर्भाचें आवरण केलें. ॥ १४ ॥ अहो भृगुकुलोत्पन्न शौनक

१ बाणाच्या अग्राला शल्य ह्मणतात.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ऋषीहो, तें ब्रह्मास्त्र कधींही व्यर्थ व्हावयाचें नाहीं ही गोष्ट खरी, व त्याची शक्ति कमी करणारें दुसरें कोणतेंही अस्त्र नाहीं हेंही खरें, तथापि विष्णूच्या तेजाचा व त्याचा संयोग झाल्याबरोबर तें शांत झालें. ॥ १५ ॥ - ऋषीहो - ब्रह्मास्त्राचें निवारण करणारें कोणतेंही अस्त्र नसतांना त्याचें शमन झालें कसें - ह्याबद्दल आश्चर्य मानूं नका; कारण, परमेश्वर मुळीं सर्व प्रकारच्या आश्चर्यांचा निधीच आहे. तो जन्मरहित असून मायादेवीच्या योगानें ह्या जगाची उत्पत्ति, स्थिति आणि लय करूं शकतो. ॥ १६ ॥ त्या ब्रह्मास्त्रतेजापासून पांडवांची सुटका झाली, व श्रीकृष्ण द्वारकेस जावयास निघाले, त्या वेळीं आपले पांच पुत्र व द्रौपही यांसह साध्वी कुंतीनें कृष्णाशीं भाषण केलें. ॥ १७ ॥

[तथापि] वैष्णवं तेजः आसाद्य (मिळाल्यावर) **[तत्] समशाम्यत्** (शांत झालें). ॥१५॥ **सर्वाश्चर्यमये** (सर्व आश्चर्यांनीं पूर्ण अशा) **अच्युते एतत् आश्चर्यं मा मंस्थाः** (मानूं नकोस); **हि** (कारण) **यः अजः इदं** (ह्या जगतातें) **मायया देव्या सृजति** (उत्पन्न करितो), **अवति** (रक्षण करितो), **हंति.** ॥ १६॥ **ब्रह्मतेजोविनिर्मुक्तैः** (ब्रह्मास्त्राच्या तेजापासून सुटका झालेल्या) **आत्मजैः** (पुत्रांसह), **कृष्णया च सह** (द्रौपदीसह) **सती पृथा** (कुंती) **प्रयाणाभिमुखं कृष्णं इदं आह.**—॥ १७ ॥ **कुन्ती उवाच**– **'अज्ञा अहं आद्यं पुरुषं प्रकृतेः परं सर्वभूतानां अन्तः बहिः**

मा मंस्था ह्येतदाश्चर्यं सर्वाश्चर्यमये ऽच्युते ॥ य इदं मायया देव्या सृजत्यवति हन्त्यजः ॥ १६ ॥
ब्रह्मतेजोविनिर्मुक्तैरात्मजैः सह कृष्णया ॥ प्रयाणाभिमुखं कृष्णमिदमाह पृथा सती ॥१७॥ कुन्त्युवाच ।
नमस्ये पुरुषं त्वा ऽऽद्यमीश्वरं प्रकृतेः परम् ॥ अलक्ष्यं सर्वभूतानामन्तर्बहिरवस्थितम् ॥ १८ ॥
मायाजवनिकाच्छन्नमज्ञा ऽधोक्षजमव्ययम् ॥ न लक्ष्यसे मूढदृशा नटो नाट्यधरो यथा ॥ १९ ॥

अवस्थितं (राहिलेल्या) **अलक्ष्यं** (अदृश्य अशा) **ईश्वरं मायाजवनिकाछन्नं** (मायारूपी पडद्यानें आच्छादिलेल्या अशा) **अधोक्षजं अव्ययं त्वां** (तुला) **नमस्ये** (नमस्कार करितें) **यथा नाट्यधरः** (बहुरूपी) **नटः मूढदृशा** (अजाणत्याच्यानें), **[तथा] त्वं न लक्ष्यसे** (ओळखिला जात नाहींस). ॥ १८ ॥ १९ ॥

कुंती ह्मणाली :– " श्रीकृष्णा, मी अज्ञानी आहें, भक्तियोग मला समजत नाहीं, ह्मणून मी तुला केवल नमस्कार करितें. - तूं वयानें व नात्यानें मजपेक्षां लहान आहेस खरा, असें असूनही मी तुला नमस्कार करितें याचें कारण इतकेंच कीं, तुझें खरें स्वरूप मी ओळखतें. - तूं सर्वांस आदिकारण व प्रकृतीचा चालक आहेस. तसेंच सर्व प्राणिमात्रांचा अंतःस्थ तूंच आहेस; त्यांचें बाह्य स्वरूप तूंच व्याप्त करितोस; इतकें असूनही तूं त्यांस अदृश्य आहेस. हे सर्वशक्तिमान् देवा, तूं मायारूपी पडद्यानें आच्छादिलेला आहेस व तुझ्या स्वरूपाची परिमिति नाहीं, ह्मणूनच तें जाणण्यास इंद्रियें समर्थ नाहींत, बहुरूपी पाहिजेत तशीं नाना प्रकारचीं सोंगें घेतो, परंतु जसें एखाद्या अजाण मुलाला त्या नटाचें

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

स्वरूप ओळखितां येत नाहीं, तसें अज्ञानदृष्टीच्या पुरुषांस तुझें स्वरूप कळत नाहीं. ॥ १८ ॥ १९ ॥ अज्ञानी पुरुषांना तूं दिसत नाहींस येवढेंच नव्हे तर परमहंस, निर्मलांतःकरण जे मुनि त्यांनाही तुझें स्वरूप कळत नाहीं. निरनिराळीं रूपें धारण करण्याचा तुझा उद्देश हाच कीं, त्या परमहंस मुनींसारख्या अधिकाऱ्यांकडून भक्तियोगाचें आचरण घडावें. तेव्हां तुझें स्वरूप आह्मां स्त्रियांस कसें बरें समजावें? ॥२०॥ हे कृष्णा, हे वसुदेवपुत्रा, तूं देवकीला आनंद देणारा नंदगोपाचा पुत्र आहेस. हे गोविंदा, तुला माझे नमस्कार असोत. ॥ २१॥ - तुझ्या स्वरूपांत कमलाचें साहश्य आणि कमलाचे ठिकाणीं प्रेम फार दिसून येतें. कृष्णा, तुझ्या - नाभीपासून कमल (ब्रह्मदेवाचें उत्पत्तिस्थान) उत्पन्न झालें; **परमहंसानां अमलात्मनां** (निर्मल अंतःकरण ज्यांचें अशा) **मुनीनां तथा [न लक्ष्यसे, तेषां] भक्तियोगविधानार्थं** (भक्तियोगाचें आचरण हा उद्देश ज्याचा, अशा) **[त्वां] स्त्रियः [वयं] कथं पश्येम** (कसें जाणूं) ? ॥ २० ॥ **कृष्णाय वासुदेवाय** (वसुदेवाच्या पुत्राला) **देवकीनंदनाय** (देवकीला आनंद देणाऱ्याला) **नंदगोपकुमाराय** (नंद नामक गवळ्याच्या पुत्रास) **गोविंदाय नमो नमः**. ॥ २१ ॥ **पंकजनाभाय** (कमल आहे नाभीच्या ठायीं ज्याच्या अशा) **नमः, पंकजमालिने** (कमलाच्या माळा आहेत ज्यास अशा) **नमः, पंकजनेत्राय** (कमलासारखे नेत्र आहेत ज्याचे अशा) **नमः, पंकजांघ्रये** (कमलासारिखे चरण आहेत ज्याचे अशा) **ते नमः**. ॥ २२ ॥ **[हे] हृषीकेश** (हे इंद्रियनियंत्या), **खलेन** (दुष्ट अशा) **कंसेन अतिचिरं** (फार दिवस) **रुद्धा**

तथा परमहंसानां मुनीनाममलात्मनाम् ॥ भक्तियोगविधानार्थं कथं पश्येम हि स्त्रियः ॥ २० ॥ कृष्णाय वासुदेवाय देवकीनन्दनाय च ॥
नन्दगोपकुमाराय गोविन्दाय नमो नमः ॥२१॥ नमः पङ्कजनाभाय नमः पङ्कजमालिने ॥ नमः पङ्कजनेत्राय नमस्ते पङ्कजांघ्रये ॥२२॥
यथा हृषीकेश खलेन देवकी कंसेन रुद्धा ऽतिचिरं शुचा ऽर्पिता ॥ विमोचिता ऽहं च सहात्मजा विभो त्वयैव नाथेन मुहुर्विपद्गणात् ॥२३॥
विषान्महाग्नेः पुरुषाददर्शनादसत्सभाया वनवासकृच्छ्रतः ॥ मृधे मृधे ऽनेकमहारथास्त्रतो द्रौण्यस्त्रतश्चास्म हरे ऽभिरक्षिताः ॥ २४ ॥

(प्रतिबंधांत ठेवलेली) **शुचा अर्पिता** (शोकानें व्याकुळ अशी) **देवकी यथा विमोचिता** (सोडविलेली), **[तथा हे] विभो, नाथेन त्वयैव सहात्मजा** (पुत्रांसह अशी) **अहं विपद्गणात्** (संकटसमुदायापासून) **मुहुः** (वारंवार) **[विमोचिता]**. ॥ २३ ॥ **[हे] हरे, विषात्** (विषापासून), **महाग्नेः** (मोठ्या अग्नीपासून), **पुरुषाददर्शनात्** (दुष्ट - राक्षसांच्या प्रसंगापासून). **असत्सभायाः** (दुष्टांच्या सभेतून) **वनवासकृच्छ्रतः** (वनवासांतील दुःखांतून), **मृधे मृधे** (प्रत्येक युद्धांत), **अनेकमहारथास्त्रतः** (पुष्कळ महारथ्यांच्या अस्त्रापासून), तुला माझा नमस्कार असो; तसेंच, तूं कमलांच्या माला कंठामध्यें धारण करितोस : तुला नमस्कार असो; देवा, तुझे नेत्र कमलपुष्पासारखे आहेत : तुला नमस्कार असो. तसेंच, ईश्वरा, तुझे चरणही कमलाप्रमाणें आहेत : तुला नमस्कार असो. ॥ २२ ॥ हे इंद्रियनियंत्या ईश्वरा, देवकीला त्या दुष्ट कंसानें फार दिवस प्रतिबंधांत ठेविलें होतें, ह्मणून ती अतिशय शोकाकुल असे. तिला त्या बंधांतून तूं सोडविलेंस. तसेंच, हे व्यापका, तूंच आमचें रक्षण करीत असतोस. तूंच मला माझ्या पुत्रांसह वारंवार संकटसमुदायांपासून सोडविलेंस. ॥२३॥ कृष्णा, भीमाला कौरवांनीं विष घातलें, त्यावेळीं तूंच त्याचें रक्षण केलेंस. लाक्षागृहांत आह्मीं जळत होतों त्या वेळेसही - त्या मोठ्या आगीपासून तूंच आह्मांस सोडविलेंस.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

हिडिंब, बक इत्यादिक दुष्ट राक्षसांच्या आमच्याशीं गांठीं पडल्या त्यावेळेसही आमचें रक्षण करणारा तूंच होतास. त्या दुष्ट कौरवांच्या सभेंतून आणि वनवासांतील अनेक दुःखांतूनही तूंच आह्मांस सोडविलेंस. प्रत्येक युद्धांत भीष्मद्रोणासारख्या पुष्कळ महारथ्यांच्या अस्त्रांपासून व सध्यां ह्या अश्वत्थाम्याच्या ब्रह्मास्त्रापासून, देवा! तूंच आमचें रक्षण केलेंस. ॥ २४ ॥ कृष्णा, तूं सर्व जगाचा गुरु आहेस, - आमचें तुझ्यापाशीं मागणें एवढेंच आहे कीं, - ठिकठिकाणीं नेहमीं आमच्यावर संकटें येत असावीं; कारण, त्या संकटांमध्यें आह्मांला तुझें दर्शन घडतें - तुझ्या दर्शनाचें माहात्म्यच असें आहे कीं, - त्या पुढें विपत्ति ह्मणजे - कांहींच नव्हत. कारण तुझें दर्शन ज्याला झालें त्या प्राण्याला पुनः संसाराचें दर्शन होत नाहीं, - ही मोठी विपत्ति त्याला सोसावी लागत नाहीं; ह्मणून आह्मी तुझें नेहमीं दर्शन मिळण्याकरितां आमच्यावर विपत्ति याव्यात, असें मागणें मागून

द्रौण्यस्त्रतश्च (अश्वत्थाम्याच्या ब्रह्मास्त्रापासून) **अभिरक्षिताः आस्म.** ॥ २४ ॥ **[हे] जगद्गुरो, तत्र तत्र** (ठिकठिकाणीं) **नः शश्वत्** (नेहमीं) **विपदः संतु** (असोत - येवोत); **यत्** (कारण), **अपुनर्भवदर्शनं** (संसाराचें दर्शन न देणारें) **भवतः** (आपलें) **दर्शनं स्यात्.** ॥ २५ ॥ **जन्मैश्वर्यश्रुतश्रीभिः** (उत्तम कुलांत - जन्म, ऐश्वर्य, विद्या व संपत्ति यांच्या योगानें) **एधमानमदः** (वृद्धिगत होत आहे गर्व ज्याचा असा) **पुमान् अकिंचनगोचरं** (ऐश्वर्यरहित अशा लोकांस प्राप्त होणाऱ्या) **त्वा अभिधातुं** (नाम ग्रहण करण्यास) **न एव अर्हति** (योग्य होत नाहीं). ॥ २६ ॥

विपदः सन्तु नः शश्वत्तत्र तत्र जगद्गुरो ॥ भवतो दर्शनं यत्स्यादपुनर्भवदर्शनम् ॥२५॥ जन्मैश्वर्यश्रुतश्रीभिरेधमानमदः पुमान् ॥
नैवार्हत्यभिधातुं वै त्वामकिंचनगोचरम् ॥ २६ ॥ नमो ऽकिञ्चनवित्ताय निवृत्तगुणवृत्तये ॥ आत्मारामाय शान्ताय कैवल्यपतये
नमः ॥ २७ ॥ मन्ये त्वां कालमीशानमनादिनिधनं विभुम् ॥ समं चरन्तं सर्वत्र भूतानां यन्मिथः कलिः ॥ २८ ॥

अकिंचनवित्ताय (निष्किञ्चन ह्मा० भक्त हेंच आहे द्रव्य ज्याचें अशा) **नमः, निवृत्तगुणवृत्तये** (धर्मार्थकाम हे विषय निवृत्त झाले आहेत ज्यापासून अशा) **आत्मारामाय** (स्वस्वरूपाचे ठिकाणीं रममाण असणाऱ्या अशा) **शान्ताय कैवल्यपतये** (मोक्ष देण्यास समर्थ अशास) **नमः.** ॥ २७ ॥ **त्वां कालं ईशानं** (सर्वांचें नियमन करणाऱ्या अशा) **अनादिनिधनं** (आदि अंत रहित अशा)

घेतों. ॥ २५ ॥ पुरुषाला उत्तम कुलांत जन्म, विद्या आणि संपत्ति एवढ्या गोष्टी अनुकूल असल्या ह्मणजे उत्तरोत्तर त्याचा गर्व वृद्धिगत होत जातो. व मग तो पुरुष तुझें नाम-ग्रहण करण्यासदेखील प्रवृत्त होत नाहीं. निष्किंचन (ऐश्वर्यरहित जे लोक) त्यांना तुझें स्वरूप प्रिय आहे - तेच तुझें नाम ग्रहण करितात. ह्मणून तीच स्थिति आह्मांला असावी. - ॥२६॥ देवा, निष्किंचन ह्मा० ज्यांजवळ किंचित् देखील द्रव्य नाहीं असे भक्त हेंच तुझें द्रव्य होय. धर्म, अर्थ, काम हे विषय तुझ्या स्वरूपाचे ठिकाणीं मुळींच नाहींत, तूं स्वस्वरूपाचे ठिकाणीं रममाण असून शांत व मोक्ष देणारा आहेस. ॥ २७ ॥ कृष्णा, तूं कालस्वरूपी आहेस, असें मला वाटतें; कारण तूं सर्वांचा चालक आहेस व तुला आदि अथवा अंत नाहीं; तूं व्यापक आहेस व सर्वठिकाणीं सारख्या रीतीनें संचार करितोस. ह्मास प्रमाण एवढेंच कीं, तूं निमित्तमात्र असल्यामुळें भूतांचे परस्पर कलह होतात - पण

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

त्यापासून तुझ्या स्वरूपांत फेरफार कांहींएक होत नाहीं. - ॥ २८ ॥ जरी लोकांची बुद्धि तुझ्याविषयीं विषम होते कीं, - तूं कित्येकांवर अनुग्रह करितोस व कित्येकांना शासन करितोस तथापि - हे ईश्वरा, तूं मनुष्यांचें अनुकरण करूं लागलास ह्मणजे तुझ्या मनांत काय कर्तव्य असतें तें कोणालाही समजत नाहीं. तुला कोणी प्रिय नाहीं व कोणी अप्रिय नाहीं. ॥ २९ ॥ देवा, तूं परमात्मा स्वतः जन्मरहित असतां, वराहप्रभृति तिर्यग्योनींत, रामासारख्या मनुष्ययोनींत, वामनासारख्या ऋषींमध्यें, व मत्स्य, कच्छ इत्यादि जलचरांत, जीं जन्में धारण केलींस आणि वस्तुतः कर्मरहित असतांही त्या त्या अवतारांत निरनिराळीं जीं कर्में केलींस, तीं त्या त्या स्थितीचीं पूर्ण अनुकरणें होतीं. ॥ ३० ॥

विभुं सर्वत्र समं (सारख्या रीतीनें) **चरन्तं** (संचार करणाऱ्यास) **मन्ये** (मानितें); **यत् भूतानां मिथः** (परस्पर) **कलिः** (कलह). ॥ २८ ॥ **हे भगवन्, कश्चित् नृणां** (मनुष्यांचें) **विडंबनं** (अनुकरणातें) **ईहमानस्य** (करूं लागणाऱ्या) **तव** (तुझें) **चिकीर्षितं** (मनांतील कर्तव्यातें) **न वेद** (जाणत नाहीं); **यस्य कश्चित् दयितः** (प्रिय) **नास्ति, कर्हिचित्** (कधींही) **द्वेष्यः च** (द्वेष करण्यास योग्य असा) **[नास्ति]; यस्मिन् नृणां विषमा मतिः.** ॥ २९ ॥ **हे विश्वात्मन् अजस्य अकर्तुः आत्मनः [यत्] तिर्यङ्नृषिषु** (तिर्यक्, मनुष्य व ऋषि

न वेद कश्चिद्भगवंश्चिकीर्षितं तवेहमानस्य नृणां विडम्बनम् ॥ न यस्य कश्चिद्दयितोऽस्ति कर्हिचिद् द्वेष्यश्च यस्मिन्विषमा मतिर्नृणाम् ॥२९॥
जन्म कर्म च विश्वात्मन्नजस्याकर्तुरात्मनः ॥ तिर्यङ्नृषिषु यादस्सु तदत्यन्तविडम्बनम् ॥३०॥ गोप्याददे त्वयि कृतागसि दाम तावत् ।
या ते दशाऽश्रुकलिलाञ्जनसम्भ्रमाक्षम् ॥ वक्त्रं निनीय भयभावनया स्थितस्य । सा मां विमोहयति भीरपि यद्बिभेति ॥ ३१ ॥

योनींत), **यादस्सु** (जलचर योनींत) **जन्म कर्म च तत् अत्यंतविडंबनं.** ॥ ३० ॥ **[यावत्] कृतागसि त्वयि** (तूं अपराध केला असतां) **गोपी दाम** (दाव्यातें) **आददे** (घेती झाली) **तावत् अश्रुकलिलांजनसंभ्रमाक्षं** (अश्रूंनीं मिश्रित काजळ ज्यामध्यें आहे असें व्याकुळ झालेले नेत्र ज्या मुखावर आहेत असें) **वक्त्रं भयभावनया निनीय** (खालीं घालून), **स्थितस्य, [वस्तुतः] यत् [यस्मात्]** (ज्यापासून) **भीः** (भीति) **अपि बिभेति** (भय पावते), **[एतादृशस्य] ते या दशा, सा मां विमोहयति** (मोह उत्पन्न करिते). ॥ ३१ ॥

देवा, - तूं मनुष्यरूप धारण करून जें त्या अवताराप्रमाणें आचरण करितोस तें अतिशय आश्चर्यकारक असतें. पहा - तूं लहानपणीं गोकुळांत असतां एकवार अपराध केलास (दुधाचें भांडें फोडलेंस), तेव्हां यशोदा तुला शिक्षा करावी या हेतूनें हातांत दावें घेऊन बांधण्याकरितां आली. त्यावेळीं तुझ्या डोळ्यांत काजळ होतें, व त्यांत अश्रूही आले होते, ह्मणून तें अश्रुजल काळें झालें होतें. ते डोळे अगदीं व्याकुळ दिसत होते. तूं तोंड खालीं घातलें होतेंस, ' व मला आतां आई मारील ' अशा भयाच्या भावनेनें उभा राहिला होतास. - वस्तुतः तुला भय कोठचें? - कारण स्वस्तः भीतिदेखील तुला भिणार! त्या वेळेची तुझी ती मनुष्याच्याच भावाचें अनुकरण करण्याची अवस्था (तें स्वरूप)

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

मला अद्यापि मोह उत्पन्न करित्ये. ॥ ३१ ॥ कित्येक लोक असें ह्मणतात कीं, मलयपर्वताची प्रसिद्धि करण्याकरितां जसा चंदन त्यावर उत्पन्न होतो, तसा परमात्मा स्वतः जन्मरहित असतां आपला प्रिय भक्त जो सुकीर्तिमान् धर्मराजा, त्याची व यदुराजाची कीर्ति वाढवावी एवढ्याचकरितां त्या यदूच्या वंशांत उत्पन्न झाला. ॥ ३२ ॥ दुसरे कितीएक लोक असें ह्मणतात कीं, वसुदेव–देवकी या दोघांनीं - पूर्वजन्मांत 'तूं आमचा पुत्र हो' असा वर - मागून घेतला होता. तो पूर्ण करण्याकरितां, व देवांचा द्वेष करणारे जे दुष्ट, त्यांचा वध करून जगाचें कल्याण करण्याकरितां, तूं स्वतः जन्मरहित असतांही वसुदेवाची भार्या जी देवकी तिचेठिकाणीं उत्पन्न झालास. ॥ ३३ ॥ आणखी

केचित् (कित्येक लोक) **प्रियस्य पुण्यश्लोकस्य कीर्तये यदोः अन्ववाये** (वंशांत) **मलयस्य [अन्ववाये, कीर्तये वा] चंदनं इव अजं जातं आहुः** (ह्मणतात). ॥ ३२ ॥ **अजः याचितः** (मागून घेतलेला) **त्वं सुरद्विषां** (देवांचा द्वेष करणाऱ्यांच्या) **वधाय अस्य** (याच्या – जगाच्या) **क्षेमाय च वसुदेवस्य देवक्यां अभ्यगात्** (गेला ह्मणजे उत्पन्न झाला) **अपरे** (दुसरे कित्येक) **[इति आहुः]**. ॥ ३३ ॥ **हि, आत्मभुवा** (ब्रह्मदेवाकडून) **अर्थितः** (प्रार्थना केलेला) **उदधौ** (समुद्रांत) **नावः इव भूरिभारेण** (अतिशय भारानें) **सीदंत्याः** (कष्टी झालेल्या - दबलेल्या)

केचिदाहुरजं जातं पुण्यश्लोकस्य कीर्तये ॥ यदोः प्रियस्यान्ववाये मलयस्येव चन्दनम् ॥३२॥ अपरे वसुदेवस्य देवक्यां याचितोऽभ्यगात् ॥ अजस्त्वमस्य क्षेमाय वधाय च सुरद्विषाम् ॥ ३३ ॥ भारावतरणायान्ये भुवो नाव इवोदधौ ॥ सीदन्त्या भूरिभारेण जातो ह्यात्मभुवार्थितः ॥ ३४ ॥ भवेऽस्मिन् क्लिश्यमानानामविद्याकामकर्मभिः ॥ श्रवणस्मरणार्हाणि करिष्यन्निति केचन ॥ ३५ ॥ शृण्वन्ति गायन्ति गृणन्त्यभीक्ष्णशः स्मरन्ति नन्दन्ति तवेहितं जनाः ॥ त एव पश्यन्त्यचिरेण तावकं भवप्रवाहोपरमं पदाम्बुजम् ॥ ३६ ॥

भुवः भारावतरणाय (भार उतरण्याकरितां) **जातः [इति] अन्ये [आहुः]**. ॥ ३४ ॥ **अविद्याकामकर्मभिः अस्मिन्** (या) **भवे** (संसारांत) **क्लिश्यमानानां** (क्लेश पावणाऱ्यांच्या) **श्रवणस्मरणार्हाणि** (श्रवण व ध्यान करण्यास योग्य अशा) **[कर्माणि] करिष्यन् [परमेश्वरः जातः] इति केचन [आहुः]**. ॥ ३५ ॥ **[ये] जनाः तव ईहितं** (चरित्रातें) **अभीक्ष्णशः** (वारंवार) **शृण्वंति, गायन्ति, गृणंति,** (कीर्तन करितात) **स्मरंति, नंदंति च, ते एव भवप्रवाहोपरमं** (संसारप्रवाहाचा उपरम करणाऱ्या) **तावकं** (तुझ्या) **पदांबुजं अचिरेण**

कित्येक लोक असें ह्मणतात कीं, जशी समुद्रांत नौका अतिशय भारानें दबते, त्याप्रमाणें पृथ्वीही अतिशय भारानें पीडित झाली असतां, 'तिचा भार उतरण्यासाठीं अवतार ध्यावा' ह्मणून ब्रह्मदेवानें ईश्वराची प्रार्थना केली; व त्याकरितां परमेश्वरानें अवतार घेतला. ॥ ३४ ॥ कोणी कोणी असें ह्मणतात कीं, - पुष्कळ लोकांस स्वस्वरूपाची ओळख नसते;- ते अज्ञानामुळें देहादिकांवरच अहंममताभिमान ठेवून तदनुसार काम्य कर्में आचरण करितात, त्यामुळें ह्या संसारांत क्लेश पावतात. त्यांना श्रवण व ध्यान करण्यास उपयोगीं पडण्यासारखीं चरित्रें आणि नामें करून ठेवावीं, एवढ्याकरितां परमेश्वरानें अवतार घेतला. ॥ ३५ ॥ देवा, जे पुरुष तुझ्या चरित्राचें वारंवार

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

श्रवण, गायन, कीर्तन व स्मरण करितात, आणि तसाच त्याचा आदर करितात; त्याच पुरुषांना संसारसागरांतून पार पाडणाऱ्या तुझ्या चरणकमलाचें दर्शन लवकर होतें. ॥३६॥ हे प्रभो, आजपर्यंत तूं आमच्या इच्छा परिपूर्ण केल्यास. सर्व राजांस आह्मी पीडा दिल्यामुळें त्यांच्याशीं आमचा द्वेषभावच उत्पन्न झाला आहे, ह्मणून आह्मांला तुझ्या चरणकमलाशिवाय दुसरा आधार कोणाचा नाहीं. आह्मीं तुझे मित्र व सेवक आहों. असें असतां तूं आज आह्मांला सोडून जाणार. ॥ ३७ ॥ कृष्णा, - तूं ह्मणशील कीं, तुझे बंधु यादव व पुत्र पांडव आहेत, मग असें दीन भाषण कां करित्येस? तर ऐक - जसें सर्वेंद्रियात्मक देह आहे, पण त्यांत त्याचा चालक जीव नाहीं, तर त्याचा कांहीं उपयोग नाहीं,

(लवकर) **पश्यंति.** ॥ ३६ ॥ हे **स्वकृतेहित** (स्वजनांच्या पूर्ण केल्या आहेत इच्छा ज्यानें अशा) **प्रभो, राजसु योजितांहसां** (दिलें आहे दुःख ज्यांनीं अशा) **येषां भवतः** (आपल्या) **पदाम्बुजात् अन्यत् परायणं** (आश्रयस्थान) **न, [तान्] सुहृदः** (मित्रांतें) **अनुजीविनः** (सेवकांतें) **नः अपि स्वित् अद्य** (आज) **त्वं जिहाससि** (सोडून जातोस). ॥३७॥ **यर्हि,** (जर) **हृषीकाणां** (इंद्रियांच्या) **ईशितुः इव** (चालकासारिखें) **भवतः अदर्शनं, [तर्हि] यदुभिः सह** (यादवांसहवर्त्तमान) **पांडवाः वयं** (आह्मी) **नामरूपाभ्यां** (कीर्ति व ऐश्वर्यासह) **के**

अप्यद्य नस्त्वं स्वकृतेहित प्रभो जिहाससि स्वित्सुहृदो ऽनुजीविनः ॥ येषां न चान्यद्भवतः पदाम्बुजात्परायणं राजसु योजितांहसाम् ॥ ३७ ॥ के वयं नामरूपाभ्यां यदुभिः सह पाण्डवाः ॥ भवतो ऽदर्शनं यर्हि हृषीकाणामिवेशितुः ॥३८॥ नेयं शोभिष्यते तत्र यथेदानीं गदाधर ॥ त्वत्पदैरंकिता भाति स्वलक्षणविलक्षितैः॥३९॥इमे जनपदाः स्वृद्धाः सुपक्वौषधिवीरुधः॥ वनाद्रिनद्युदन्वन्तो ह्येधन्ते तव वीक्षितैः॥४०॥

(कोण ह्म० अगदीं तुच्छ असे). ॥ ३८ ॥ हे **गदाधर, यथा** (जशी) **इदानीं स्वलक्षणविलक्षितैः** (आपल्या ह्म० असाधारण लक्षणांनीं शोभणाऱ्या अशा) **त्वत्पदैः** (तुझ्या पावलांनीं) **अंकिता** (युक्त अशी) **इयं** (ही ह्म० पृथ्वी) **भाति, तत्र इयं न शोभिष्यते.** ॥ ३९ ॥ **इमे** (हे) **जनपदाः** (देश) **स्वृद्धाः** (चांगले समृद्ध) **सुपक्वौषधिवीरुधः** (चांगल्या पक्व ओषधि वेली यांनीं शोभ-

त्याप्रमाणें जर तुझें दर्शन नसेल, तर यादवांस व तसेंच आह्मां पांडवांस कीर्ति कोठची आणि ऐश्वर्यही कोठचें? तुझें दर्शन आहे तोंपर्यंत पांडवांना कीर्ति व ऐश्वर्य आहे; तें दर्शन नाहींसें झालें ह्मणजे कांहीं नाहीं. ॥ ३८ ॥ कृष्णा, या हस्तिनापुरांतील भूमीला तूं येथें आहेस तोंपर्यंत फार शोभा आहे. कारण, तिच्यावर वज्र, अंकुश, ध्वज, कमल इत्यादि चिन्हांनीं शोभायमान अशीं तुझीं पावलें जिकडे तिकडे उमटलेलीं दिसतात. तूं गेल्यावर तीं चिन्हें नाहींशीं होतील, व ही भूमी जशी आतां शोभत आहे तशी शोभणार नाहीं. ॥ ३९ ॥ हे देश, तशीं हीं वनें, पर्वत, नद्या व समुद्र हीं सध्यां चांगल्या प्रकारें समृद्ध आहेत व पक्व ओषधि आणि वेली यांनीं सुशोभित

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

होत्सातीं उत्कर्ष पावत आहेत; पण त्यांच्या उत्कर्षास कारण तरी तुझें अवलोकनच. ॥ ४० ॥ कृष्णा, ह्या सर्व जगाचा नियंता तूंच आहेस. विश्वाचा आत्मा तूंच. जग हें तुझेंच स्वरूप होय. आतां देवा, एवढें कर कीं, पांडव व यादव या स्वकीय मंडळीवर माझा दृढ स्नेहपाश आहे तो तोडून टाक. ॥ ४१ ॥ हे मधुपते, जशी गंगा, मध्यें कितीही अडथळे आले तरी त्यांस न जुमानतां, आपला प्रवाह समुद्रांत नेऊन सोडिते, त्याप्रमाणें माझ्या बुद्धीनें दुसऱ्या कोणत्याही विषयांकडे लक्ष न देतां वारंवार तुझ्याबरच प्रीति ठेवावी. ॥ ४२ ॥ हे श्रीकृष्णा, हे अर्जुनाच्या मित्रा, हे यादवश्रेष्ठा, हे गोविंदा, हे योगेश्वरा, हे षड्गुणैश्वर्यसंपन्न प्रभो, तूं पृथ्वीला उपद्रव णारे असे) [संतः] **वनाद्रिनद्युदन्वंतः** (वनें, पर्वत, नद्या व समुद्र हीं) **तव वीक्षितैः** (अवलोकनेंकरून) **एधंते** (वाढतात). ॥ ४० ॥ **अथ हे विश्वेश विश्वात्मन् विश्वमूर्ते, स्वकेषु** (स्वकीय मंडळीवर) **पांडुषु वृष्णिषु मे इमं दृढं स्नेहपाशं छिंधि** (तोडून टाक.) ॥ ४१ ॥ **हे मधुपते, गंगा उदन्वति** (समुद्रांत) **ओघं इव मे अनन्यविषया** (दुसऱ्या विषयांकडे न जाणारी अशी) **मतिः अद्धा** (सम्यक्-उत्तम प्रकारें) **त्वयि असकृत्** (वारंवार) **रतिं उद्वहतात्** (वाहो - ठेवा). ॥ ४२ ॥ **हे श्रीकृष्ण कृष्णसख** (हे अर्जुनाच्या मित्रा) **वृष्ण्यृषभ** (हे यादवश्रेष्ठा)

अथ विश्वेश विश्वात्मन् विश्वमूर्ते स्वकेषु मे ॥ स्नेहपाशमिमं छिन्धि दृढं पाण्डुषु वृष्णिषु ॥ ४१ ॥ त्वयि मे ऽनन्यविषया मतिर्मधुपते ऽसकृत् ॥ रतिमुद्वहतादद्धा गंगेवौघमुदन्वति ॥ ४२ ॥ श्रीकृष्ण कृष्णसख वृष्ण्यृषभावनिध्रुग्राजन्यवंशदह-नानपवर्गवीर्य ॥ गोविंद गोद्विजसुरार्तिहरावतार योगेश्वराखिलगुरो भगवन्नमस्ते ॥ ४३ ॥ सूत उवाच । पृथयेत्थं कलपदैः परिणूताखिलोदयः ॥ मन्दं जहास वैकुण्ठो मोहयन्निव मायया ॥ ४४ ॥ तां बाढमित्युपामन्त्र्य प्रविश्य गजसाह्वयम् ॥ स्त्रियश्च स्वपुरं यास्यन्प्रेम्णा राज्ञा निवारितः ॥ ४५ ॥

अवनिध्रुग्राजन्यवंशदहन (पृथ्वीला उपद्रव देणाऱ्या राजांचे वंश दग्ध करून टाकणाऱ्या) **अनपवर्गवीर्य** (क्षीण न होणारी शक्ति ज्याची अशा) **गोविंद गोद्विजसुरार्तिहरावतार** (गाई, ब्राह्मण व देव यांची पीडा दूर करण्याकरितां अवतार धारण करणाऱ्या) **योगेश्वर अखिलगुरो** (सर्वांचा गुरु अशा) **भगवन्, ते नमः.** ' ॥ ४३ ॥ **सूतः उवाच— इत्थं पृथया कलपदैः** (मधुर भाषणांनीं) **परिणूताखिलोदयः** (स्तुति केली आहे सर्व महिम्याची ज्याच्या, असा) **वैकुंठः मायया मोहयान् इव मंदं** (किंचित्) **जहास** (हास्य करिता झाला). ॥ ४४ ॥ **बाढं** (ठीक आहे) **इति** देणाऱ्या राजांचे वंश दग्ध करून टाकितोस. तुझी शक्ति कधींही क्षीण होत नाहीं. तूं गाई व ब्राह्मण ह्यांच्या पीडा हरण करण्याकरितां अवतार धारण करतोस, व सर्वांचा गुरु आहेस. हे परमेश्वरा तुला नमस्कार असो. " ॥ ४३ ॥ सूत ह्मणतात :— ऋषीहो, पूर्वी सांगितल्याप्रमाणें कुंतीनें मंजुळ वाणीनें त्या वैकुंठवासी परमेश्वराच्या सर्व महिम्याची स्तुति केली असतां - त्या सर्व मंडळीस - जणूं आपल्या मायेनें मोहित करण्याकरितांच त्यानें (कृष्णानें) किंचित् हास्य केलें. ॥४४॥ - मागें ४१–४२ श्लोकांत कुंतीनें जें मागितलेलें तें सर्व - 'बाढं' ह्म० - 'ठीक आहे (मिळेल)' असें ह्मणून पुढें कृष्ण हस्तिनापुरांत शिरले; व तेथें सुभद्रा, द्रौपदी वगैरे स्त्रियांस विचारून तसाच कुंतीचा निरोप घेऊन आपल्या

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

द्वारकानगरीस जावयाच्या तयारींत होते. परंतु धर्मराजानें प्रेमभावानें त्यांस राहवून घेतलें. ॥ ४५ ॥ गोत्रजांची हत्या घडल्यामुळें धर्मराजाला फार शोक झाला होता. - कृष्णपरमात्म्याचे मनांत असें होतें कीं, सध्यां भीष्म शरपंजरीं पडले आहेत. आतां लवकरच उत्तरायणाला प्रारंभ झाल्याबरोबर त्यांचें निर्याण (परलोकगमन) होणार, तेव्हां त्यांच्या निर्याणप्रसंगाचे उत्सवाकरितां सर्वांनीं कुरुक्षेत्रांत जावें, व तेथें भीष्माकडून धर्मास उपदेश करवून त्याचा शोक दूर करावा. - हा ईश्वराचा उद्देश ऋषींना देखील कळला नव्हता; ह्मणूनच त्या व्यासप्रभृति मुनींनीं धर्मराजाला इतिहास सांगितले व शोक न करण्याविषयीं पुष्कळ उपदेश केले. पण धर्मराजाचे मनांत त्यांचा बोध ठसेना. - स्वतः कृष्णानें देखील उपदेश केला पण त्याचा देखील उपयोग झाला नाहीं. - कृष्ण धर्माचें समाधान करण्यास समर्थ नव्हता असें नव्हे, तर - त्याचीं चरित्रेंच मोठीं आश्चर्यकारक आहेत. - जसें कौरवपांण्डवांच्या युद्धाचे पूर्वी दोघांचें सख्य करावें ह्या बाह्य उद्देशानें कृष्ण कौरवांकडे गेला : सर्वांच्या बुद्धीचा चालकच तो, त्याला सख्य करविणें ही गोष्ट अशक्य नव्हती, [उक्त्वा] गजसाह्वयं (हस्तिनापुरांत) प्रविश्य तां स्त्रियश्च उपामंत्र्य (निरोप घेऊन) स्वपुरं यास्यन् राज्ञा प्रेम्णा (प्रेमभावानें) निवारितः. ॥ ४५ ॥ शुचा अर्पितः [सः] ईश्वरेहाज्ञैः (ईश्वराची इच्छा न समजणाऱ्या, अशा) व्यासाद्यैः अद्भुतकर्मणा कृष्णेन इतिहासैः प्रबोधितोपि (बोध केलेला असतांहि) न अबुद्ध्यत (उमजला नाहीं).

व्यासाद्यैरीश्वरेहाज्ञैः कृष्णेनाद्भुतकर्मणा ॥ प्रबोधितो ऽपीतिहासैर्नाबुद्ध्यत शुचा ऽर्पितः ॥४६॥ आह राजा धर्मसुतश्चिन्तयन्सुहृदां वधम्॥ प्राकृतेनात्मना विप्राः स्नेहमोहवशं गतः ॥४७॥ अहो मे पश्यताज्ञानं हृदि रूढं दुरात्मनः ॥ पारक्यस्यैव देहस्य बह्व्यो मे ऽक्षौहिणीर्हताः ॥ ४८ ॥ बालद्विजसुहृन्मित्रपितृभ्रातृगुरुद्रुहः ॥ न मे स्यान्निरयान्मोक्षो ह्यपि वर्षायुतायुतैः ॥ ४९ ॥

॥ ४६ ॥ हे विप्राः, धर्मसुतः राजा सुहृदां वधं चिंतयन् प्राकृतेन (विवेकरहित अशा) आत्मना (चित्तानें) स्नेहमोहवशं गतः [सन्] आहः— ॥ ४७॥ "अहो, दुरात्मनः मे हृदि रूढं अज्ञानं पश्यत. मे पारक्यस्य (दुसऱ्याचा ह्मणजे कुत्रीं कोल्हीं इत्यादिकांचा भक्ष्य अशा) देहस्यैव बह्व्यः (पुष्कळ) अक्षौहिणीः हताः. ॥ ४८ ॥ बालद्विजसुहृन्मित्रपितृभ्रातृगुरुद्रुहः

पण त्याचे मनांत भूभार हरण करावयाचा होता, ह्मणून शेवटीं युद्धाचाच निश्चय करून आला : तसेंच त्याच्या मनांत भीष्माकडून धर्मास उपदेश करवावयाचा होता, ह्मणून त्यानें लोकरीतीप्रमाणें स्वतां उपदेश करूनही तो त्याचे मनांत ठसूं दिला नाहीं. - ॥ ४६ ॥ ऋषिहो, धर्मराजाच्या मनांत 'आपण ज्ञातीचा वध केला' ही गोष्ट नेहमीं घोळत होती. त्यामुळें त्याच्या चित्ताला कांहीं विचार सुचेना. - तो स्नेह आणि मोह यांच्या अधीन झाला होता, व ह्मणत असे कीं, ॥ ४७ ॥ "अहो! मी दुष्ट आहें! माझ्या अंतःकरणांत कसें अज्ञान उत्पन्न झालें पहा, कीं कोल्हे, कुत्रीं इत्यादिकांचा भक्ष्य जो देह त्याच्याकरितां मी पुष्कळ अक्षौहिणी[1] सैन्याचा वध केला! ॥ ४८ ॥ मी बालहत्या केल्या, तसेंच ब्राह्मण, गोत्रज मित्र, पितृव्य, बंधु आणि गुरु ह्या सर्वांचा द्रोह (वध) केला. आतां कोट्यवधि वर्षांनींदेखील माझी नर-

१ एका अक्षौहिणीमध्यें २१,८७० हत्ती, २१,८७० रथ, ६५,६१० घोडे, १,०९,३५० पायदळ, मिळून एकंदर २,१८,७०० लढाऊ लोक असतात.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

कापासून सुटका होणार नाहीं ! ॥ ४९ ॥ ' राजानें प्रजांच्या पालनाकारितां धर्मयुद्ध करून त्यांत शत्रूचा वध केला असतां, त्याला हत्येचें पाप नाहीं, ' ह्या शिक्षारूप वचनानें मला बोध होत नाहीं. ॥ ५० ॥ - युद्धांत पुरुषाचा वध केला असतां त्यापासून दोष नाहीं, ही गोष्ट गृहीत धरली तरी - ह्यापासून दुसरा एक दोष उत्पन्न झाला आहे : तो स्त्रीहत्या हा होय. प्रत्यक्ष स्त्रियांचा जरी शिरच्छेद केला नाहीं, तरी त्यांच्या पालनकर्त्या पतिपुत्रादिकांचा वध केल्यामुळें त्यांचा वध केल्याप्रमाणेंच आहे. आणि गृहस्थाश्रमविहित कर्में करून स्त्रीवधापासून मुक्त होणें मला शक्य वाटत नाहीं. ॥ ५१ ॥ आतां, अश्वमेध करावा ह्मणजे सर्व पापें नाहींशीं होतात असें शास्त्र आहे; पण मला

(बाल, ब्राह्मण, गोत्रज, मित्र, पितृव्य, बंधु आणि गुरु ह्यांचा द्रोह – वध करणाऱ्या अशा) **मे वर्षायुतायुतैरपि** (वर्षांच्या दहा हजारांनीं गुणिलेल्या दहा हजारांनीं ह्म० अनंत कोटींनींदेखील) **निरयात्** (नरकापासून) **मोक्षः न स्यात्.** ॥ ४९ ॥ **'प्रजाभर्तुः** (प्रजेचें पालन करणाऱ्या) **राज्ञः धर्मयुद्धे द्विषां वधः न एनः** (पाप) **' इति शासनं** (शिक्षारूप) **वचः तु मे बोधाय न कल्पते.** ॥ ५० ॥ **यः असौ मद्धतबंधूनां** (माझ्याकडून वध झाला आहे ज्यांच्या पालकांचा अशा) **स्त्रीणां इह द्रोहः उत्थितः** (झाला); **तं गृहमेधीयैः** (गृहस्थाश्रमविहित अशा) **कर्मभिः व्यपोहितुं**

नैनो राज्ञः प्रजाभर्तुर्धर्मयुद्धे वधो द्विषाम् ॥ इति मे न तु बोधाय कल्पते शासनं वचः ॥ ५० ॥
स्त्रीणां मद्धतबन्धूनां द्रोहो यो ऽसाविहोत्थितः ॥ कर्मभिर्गृहमेधीयैर्नाहं कल्पो व्यपोहितुम्
॥ ५१ ॥ यथा पंकेन पंकाम्भः सुरया वा सुराकृतम् ॥ भूतहत्यां तथैवैकां न यज्ञैर्मार्ष्टुमर्हति
॥ ५२ ॥ इति श्रीभा० म०प्र०युधिष्ठिरानुतापोनामाष्टमो ऽध्यायः ॥ ८ ॥ सूत उवाच । इति भीतः
प्रजाद्रोहात्सर्वधर्मविवित्सया ॥ ततो विनशनं प्रागाद्यत्र देवव्रतो ऽपतत् ॥ १ ॥

(दूर करण्यास) **अहं न कल्पः** (समर्थ). ॥ ५१ ॥ **यथा पंकेन** (चिखलानें) **पंकांभः;** (गढूळ पाणी), **सुरया** (मद्यानें) **सुराकृतं** (मद्य प्राशनानें केलेलें पाप) **वा मार्ष्टुं** (प्रक्षाळन करण्यास) **न अर्हति, तथैव एकां भूतहत्यां यज्ञैः [मार्ष्टुं न अर्हति].**" ॥ ५२ ॥ **इति श्रीभागवतान्वये प्रथमस्कंधे अष्टमो ऽध्यायः ॥ ८ ॥ सूतः उवाच— [धर्मः], इति प्रजाद्रोहात् भीतः [सन्] ततः सर्वधर्मविवित्सया** (सर्व धर्म जाणण्याच्या इच्छेनें) **विनशनं** (कुरुक्षेत्राप्रत) **प्रागात्** (चालला); **यत्र देवव्रतः** (भीष्म) **अपतत्.** ॥ १ ॥

वाटतें - जसें एखाद्या वस्त्राला अथवा शरीराला गढूळ पाण्यानें लागलेला मळ, चिखलानें तें धुतलें असतां, जावयाचा नाहीं, - उलट जास्तीच लागेल, - अथवा मद्यप्राशनानें घडलेलें पाप, अधिक मद्यप्राशन केलें असतां, नष्ट होत नाहीं, त्याप्रमाणें अज्ञानानें घडलेलें हें भूतहत्येचें पाप यज्ञाचरणानें नाहींसें होणार नाहीं; - कारण त्यांत (यज्ञांत) आपण समजून उमजून हत्या करितों. " - ॥ ५२ ॥ **इति अष्टमो ऽध्यायः ॥ ८ ॥** सूत ह्मणतातः– पूर्वी सांगितल्याप्रमाणें धर्मराजाला, आपण प्रजांची हत्या केली, असें

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

वाटत होतें. ह्मणून तो भयभीत होत्साता, सर्व धर्म समजून ध्यावे ह्मणजे पुढें आपल्या हातून प्रजांचा द्रोह घडणार नाहीं, ह्या उद्देशानें कुरुक्षेत्रांत ज्या ठिकाणीं भीष्म शरपंजरीं पडले होते, तेथें जावयास निघाला. ॥ १ ॥ धर्मराजाच्या मागून भीम, अर्जुन आदिकरून त्याचे सर्व बंधु आपापल्या सुवर्णभूषणांनीं शृंगारिलेल्या रथांत बसून चालले. त्यांच्या रथांस उत्तम अश्व जोडले असून त्यांच्या मागून व्यासधौम्यप्रभृति ब्राह्मणही निघाले. ॥ २ ॥ हे शौनकप्रभृति ऋषिहो, श्रीकृष्णपरमात्मादेखील अर्जुनासहवर्तमान आपल्या रथांत बसून धर्मराजाच्या मागून चालले. - धर्मराज पुढें व ही सर्व मंडळी मागें. त्या वेळच्या स्वारीचा थाट काय वर्णावा ! - जसा कुबेर आपल्या गुह्यकगणांच्या

तदा ते सर्वे भ्रातरः सदश्वैः (उत्तम अश्व— जोडिले—आहेत ज्यांना, अशा) **स्वर्णभूषितैः रथैः तथा व्यासधौम्यादयः विप्राः अन्वगच्छन्. ॥ २ ॥ हे विप्रर्षे, सधनंजयः** (अर्जुनासहवर्तमान असा) **भगवानपि रथेन [अन्वगच्छत्]; सः नृपः गुह्यकैः** (गुह्यकगणांच्या योगानें) **कुबेरः इव तैः व्यरोचत** (शोभता झाला). ॥ ३ ॥ **सानुगाः** (परिवारासह असे) **पाण्डवाः चक्रिणा सह** (श्रीकृष्णासहवर्तमान) **दिवः** (स्वर्गापासून) **च्युतं** (पतन पावलेल्या) **अमरमिव** (देवाप्रमाणें) **भूमौ निपतितं भीष्मं दृष्ट्वा प्रणेमुः**

तदा ते भ्रातरः सर्वे सदश्वैः स्वर्णभूषितैः ॥ अन्वगच्छन्रथैर्विप्रा व्यासधौम्यादयस्तथा ॥ २ ॥
भगवानपि विप्रर्षे रथेन सधनञ्जयः ॥ स तैर्व्यरोचत नृपः कुबेर इव गुह्यकैः ॥ ३ ॥
दृष्ट्वा निपतितं भूमौ दिवश्च्युतमिवामरम् ॥ प्रणेमुः पाण्डवा भीष्मं सानुगाः सह चक्रिणा ॥४॥
तत्र ब्रह्मर्षयः सर्वे देवर्षयश्च सत्तम ॥ राजर्षयश्च तत्रासन्द्रष्टुं भरतपुंगवम् ॥ ५ ॥
पर्वतो नारदो धौम्यो भगवान् बादरायणः ॥ बृहदश्वो भरद्वाजः सशिष्यो रेणुकासुतः ॥ ६ ॥

(नमस्कार करिते झाले). ॥ ४॥ **हे सत्तम, ब्रह्मर्षयः, देवर्षयः, राजर्षयः च सर्वे भरतपुंगवं** (भरत कुलांत श्रेष्ठ अशातें) **द्रष्टुं तत्र आसन्** (आले होते). ॥ ५ ॥ **पर्वतः, नारदः, धौम्यः, भगवान् बादरायणः, बृहदश्वः, भरद्वाजः, सशिष्यः रेणुकासुतः** (रेणुकेचा पुत्र परशुराम), ॥ ६ ॥

योगानें शोभतो, त्याप्रमाणें धर्मराजाही ह्या मंडळीच्या योगें शोभत होता. ॥ ३ ॥ भीष्म त्या ठिकाणीं शरशय्येवर पडले होते. - पांडव, त्यांच्या परिवाराची सर्व मंडळी व कृष्ण, ह्या सर्वांनीं भीष्माचार्यांस अवलोकन करून नमस्कार केला. त्यांना, भीष्म हा कोणीतरी स्वर्गांतून च्युत होऊन पृथ्वीवर आलेला देव असावा असा भास झाला. ॥ ४ ॥ हे मुनिश्रेष्ठा, त्या समुदायांत ब्रह्मर्षि, देवर्षि, राजर्षि असे सर्व लोक त्या भरतकुलश्रेष्ठ भीष्माचार्यांच्या दर्शनास आले होते. ॥ ५ ॥ पर्वतऋषि, नारद, धौम्य, भगवान् व्यास, बृहदश्व, भरद्वाज, शिष्यांसहवर्तमान रेणुकापुत्र परशुराम, ॥ ६ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

वसिष्ठ, इन्द्रप्रमद, त्रित, गृत्समद, असित, कक्षीवान्, गौतम, अत्रि, कौशिक, सुदर्शन,॥७॥ब्रह्मनिष्ठ ऋषे शुकाचार्यप्रभृति मोठे पुण्यशील मुनि, तसेंच दुसरे कश्यप, अंगिरा इत्यादि ऋषीही आपआपल्या शिष्यांसहवर्तमान तेथें आले होते. ॥ ८ ॥ भीष्म मोठे धर्मज्ञानी व देशकालविभाग जाणणारे होते (प्रत्येक स्थितींत मनुष्यानें कोणत्या रीतीनें वागावें, हे सर्व त्यांस माहीत होतें). त्यांनीं, हें सर्व महाभाग्यशाली थोर पुरुष येथें आले आहेत, असें पाहून सर्वांची पूजा केली. - त्यांना उठण्याची शक्ति नव्हती, हें खरें, तरी, ते देशकालज्ञानी होते व सर्व अवस्थांतील धर्म त्यांना माहीत होते ह्मणून पूर्वी सांगितलें आहेच, ह्मणून त्यांनीं कोणाची मनानेंच व कोणाशीं सत्काराचीं भाषणें बोलून त्या रूपानें,

वसिष्ठः, इंद्रप्रमदः, त्रितः, गृत्समदः, असितः, कक्षीवान्, गौतमः, अत्रिः, कौशिकः सुदर्शनः, ॥ ७ ॥ हे **ब्रह्मन्, अमलाः** (निष्पाप असे) **ब्रह्मरातादयः** (शुक आदिकरून ऋषि) **अन्ये मुनयः शिष्यैः उपेताः** (युक्त व्होत्साते) **कश्यपांगिरसादयः च आजग्मुः** (आले). ॥ ८ ॥ **धर्मज्ञः देशकालविभागवित्** (देशकालविभाग जाणणारा) **वसूत्तमः** (भीष्म) **तान् महाभागान् समेतान्** (आलेल्यांस) **उपलभ्य** (पाहून किंवा जाणून) **पूजयामास.** ॥ ९ ॥ **तत्प्रभावज्ञः** (त्याचा - कृष्णाचा - प्रभाव जाणणारा) **जगदीश्वरं हृदिस्थं मायया उपात्तविग्रहं**

वसिष्ठ इन्द्रप्रमदस्त्रितो गृत्समदो ऽसितः ॥ कक्षीवान् गौतमो ऽत्रिश्च कौशिको ऽथ सुदर्शनः ॥ ७ ॥
अन्ये च मुनयो ब्रह्मन् ब्रह्मरातादयो ऽमलाः ॥ शिष्यैरुपेता आजग्मुः कश्यपाऽऽङ्गिरसादयः ॥ ८ ॥
तान्समेतान्महाभागानुपलभ्य वसूत्तमः ॥ पूजयामास धर्मज्ञो देशकालविभागवित् ॥ ९ ॥ कृष्णं च
तत्प्रभावज्ञ आसीनं जगदीश्वरम् ॥ हृदिस्थं पूजयामास माययोपात्तविग्रहम् ॥ १० ॥ पाण्डुपुत्रानुपासी-
नान्प्रश्रयप्रेमसंगतान् ॥ अभ्याचष्टानुरागास्रैरन्धीभूतेन चक्षुषा ॥ ११ ॥ अहो कष्टमहो ऽन्याय्यं यद्यूयं
धर्मनन्दनाः ॥ जीवितुं नार्हथ क्लिष्टं विप्रधर्माऽच्युताश्रयाः ॥ १२ ॥

(धारण केलें शरीर ज्यानें अशा) **आसीनं** (बसलेल्या) **कृष्णं च पूजयामास.** ॥ १० ॥ **प्रश्रयप्रेमसंगतान्** (नम्रता व स्नेह यांनीं युक्त अशा) **उपासीनान्** (जवळ बसलेल्या) **पांडुपुत्रान् अनुरागास्रैः** (प्रीतीच्या - आनंदाच्या - अश्रूंनीं) **अंधीभूतेन** (अंध झालेल्या) **चक्षुषा [उपलक्षितः सन्] अभ्याचष्ट** (बोलता झाला).-॥११॥"**[अहो] धर्मनंदनाः, यत् यूयं विप्रधर्माच्युताश्रयाः** पूजा केली. - ॥ ९ ॥ त्या समुदायांत श्रीकृष्णही बसले होते; त्यांचेंही भीष्मांनीं पूजन केलें. भीष्माचार्य श्रीकृष्णाचा पूर्ण प्रभाव जाणत होते कीं, हा साक्षात् सर्वांतर्यामी जगाचा नियामक ईश्वर असून मायेनें हें स्वरूप धारण करून राहिला आहे. ॥ १० ॥ - नंतर भीष्मांनीं पांडवांकडे दृष्टि फिरविली, तों त्यांना दिसून आलें कीं, - पांडव नम्रतेनें आणि स्नेहानें युक्त होत्साते आपल्या भेटीला येऊन जवळ बसले आहेत. हें पाहिल्याबरोबर भीष्माचार्यांचे डोळे प्रेमाश्रूंनीं भरून आले; त्यांना पुढें कांहीं दिसेना. अशा स्थितींतच त्यांनीं पांडवांशीं बोलण्यास प्रारंभ केला :— ॥ ११ ॥ "पांडवहो, तुम्हीं तर धर्मसंस्थापक आहां. तुम्हांला ब्राह्मण, धर्म व साक्षात् श्रीकृष्ण परमात्मा अशा मोठमो-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ठ्यांचा आश्रय असतांना - आयुष्याचे दिवस दुःखकारक कां वाटावे ? - दुःख करणें तुह्मांला योग्य नाहीं. खेद मानणें ही केवढी वाईट गोष्ट ! केवढा अन्याय ! ॥ १२ ॥ - तुह्मांपेक्षां तुमच्या आईवर तर मोठाच प्रसंग ओढवला होता : - तुमचा पिता पांडुराजा अतिरथी (अतिशय पराक्रमी) होता; तो मरण पावला, तेव्हां तुमच्या मातेचें (कुंतीचें) - दैन्य काय सांगावें ! - तुह्मीं लहान लहान बाळें होतां; तुमच्याकरितां त्या बापडीला वारंवार अनेक संकटें सोसावीं लागलीं ! ॥ १३ ॥ तुमच्या मनाला वाईट वाटण्यासारख्या गोष्टी घडून आल्या खऱ्या, पण हा सर्व काळाचा खेळ आहे, असें मला वाटतें. - कालाचें माहात्म्यच मोठें आहे :— जशीं आकाशांतील अभ्रें वायूच्या अधीन असतात व तो नेईल तिकडे जातात, त्याप्रमाणें हे सर्व लोकपाल त्या कालाच्या अधीन आहेत. ॥ १४ ॥ प्रत्यक्ष धर्मराजासारखा पुण्यवान् राजा, तसेंच भीमसेनासारखा - नवनागसहस्रबली -

(ब्राह्मण, धर्म व कृष्ण यांचा आश्रय ज्यांना असे) **तत् क्लिष्टं** (दुःखानें) **जीवितुं नार्हथ** (योग्य नाहीं). **अहो कष्टं, अहो अन्याय्यं.** ॥ १२ ॥ **अतिरथे पांडौ संस्थिते** [**सति**] (मरण पावला असतां) **वधूः तोकवती** (अपत्यांनीं युक्त अशी) **बालप्रजा** (लहान आहेत मुलें जिचीं अशी) **पृथा युष्मत्कृते** (तुमच्यासाठीं) **मुहुः बहून् क्लेशान् प्राप्ता.** ॥ १३ ॥ **भवतां** (तुमचें) **यत् अप्रियं,** [**तत्**] **सर्वं कालकृतं मन्ये** (मी समजतों); **वायोः** [**वशे**] **घनावलिः** (अभ्रांचा समुदाय) **इव, सपालः** (लोकपालांसह असा) **लोकः यद्वशे** [**अस्ति**]. ॥ १४ ॥

संस्थिते ऽतिरथे पाण्डौ पृथा बालप्रजा वधूः ॥ युष्मत्कृते बहून् क्लेशान्प्राप्ता तोकवती मुहुः ॥१३॥ सर्वं कालकृतं मन्ये भवतां च यदप्रियम् ॥ सपालो यद्वशे लोको वायोरिव घनावलिः ॥ १४ ॥ यत्र धर्मसुतो राजा गदापाणिर्वृकोदरः ॥ कृष्णो ऽस्त्री गाण्डिवं चापं सुहृत्कृष्णस्ततो विपत् ॥ १५ ॥ न ह्यस्य कर्हिचिद्राजन्पुमान्वेद विधित्सितम् ॥ यद्विजिज्ञासया युक्ता मुह्यन्ति कवयो ऽपि हि ॥ १६ ॥ तस्मादिदं दैवतन्त्रं व्यवस्य भरतर्षभ ॥ तस्यानुविहितो ऽनाथा नाथ पाहि प्रजाः प्रभो ॥ १७ ॥

यत्र राजा धर्मसुतः, गदापाणिः वृकोदरः, कृष्णः अस्त्री (अस्त्रनिपुण असा), **चापं** (धनुष्य) **गाण्डिवं, सुहृत् कृष्णः, ततः विपत् ! !** ॥१५॥ **हे राजन्, पुमान् अस्य** (यांचें ह्म० कृष्णाचें) **विधित्सितं** (कर्तव्य) **कर्हिचित्** (कधींही) **न वेद; हि, कवयः** (विद्वान् लोक) **अपि यद्विजिज्ञासया** (जें जाणण्याच्या इच्छेनें) **युक्ताः** [**सन्तः**] **मुह्यन्ति** (मोह पावतात). ॥ १६ ॥ **तस्मात्, हे भरतर्षभ, इदं दैवतन्त्रं** (ईश्वराच्या अधीन, अशातें) **व्यवस्य** (पूर्णपणें समजून), **हे नाथ प्रभो, तस्य अनुविहितः** (सांगण्याप्रमाणें वागलेला) **अनाथाः प्रजाः पाहि.** ॥ १७ ॥

पुरुष हस्तांत गदा घेऊन उभा, अर्जुनासारखा अस्त्रनिपुण पुरुष आपल्या प्रसिद्ध गांडिवनामक धनुष्यासह तयार, प्रत्यक्ष श्रीकृष्णपरमात्मा तुमचा सर्वांचा जिवलग मित्र, असें असून (राजा पुण्यवान्, शरीरबल, अस्त्रविद्या, उत्तम शस्त्रें, देवच साक्षात् मित्र, इतकें अनुकूल असतां) तुह्मांला संकटें येतात याला ह्मणावें तरी काय!! ॥ १५ ॥ (भीष्म कृष्णाकडे बोट दाखवून ह्मणतातः—) धर्मराजा, ह्या कृष्णाच्या मनांत काय कर्तव्य आहे, हें कोणाला कधीं समजत नाहीं. मोठमोठे विद्वान्, ह्याच्या मनांतील कर्तव्याकर्तव्य गोष्टी कळाव्या, अशी इच्छा करितात, पण ते देखील मोह पावतात (त्यांना त्या समजत नाहींत). ॥ १६ ॥ धर्मा, तूं भरतकुलांत श्रेष्ठ आहेस; पूर्वी

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

सांगितलेल्या गोष्टींवरून, सुखप्राप्ति अथवा दुःखप्राप्ति ह्या सर्व गोष्टी ईश्वराधीन आहेत, असें पूर्णपणें समज, व ईश्वरानें सांगितलेल्या धर्माप्रमाणें आचरण करून त्याची सेवा करीत जा. तूं राजकुलांत उत्पन्न झाला आहेस; तुझ्या आंगांत सामर्थ्यही आहेच; तेव्हां ह्या आपल्या अनाथ प्रजांचें रक्षण करीत जा. ॥ १७ ॥ हा श्रीकृष्ण साक्षात् परमेश्वर आहे; कारण, सर्वांचा आदिपुरुष ह्मणतात तो हाच व सर्व जीवांचा आश्रय जो नारायण तोही हाच होय. - लोकांना ह्याचें सत्य स्वरूप समजत नाहीं. कारण - हा सर्व लोकांना आपल्या मायेच्या योगानें मोहित करून, आपलें ऐश्वर्य प्रगट न करितां, यादवांमध्यें संचार करीत आहे. ॥ १८ ॥ धर्मा, ह्या परमेश्वराची करणी फार गूढ आहे. ती एक भगवान् शंकराला, देवर्षि नारदाला, अथवा साक्षात् सर्वज्ञ कपिलाचार्याना मात्र अवगत आहे. ॥ १९ ॥ धर्मा, ह्या कृष्णाला तूं आपला मामेभाऊ समजतोस, ह्यावर तुझें खरें प्रेम

एषः वै साक्षात् भगवान् आद्यः पुमान् नारायणः मायया लोकं मोहयन् (मोहित करणारा) **गूढः** (गुप्त) **वृष्णिषु** (यादवांमध्यें) **चरति** (वागतो). ॥ १८ ॥ **हे नृप, भगवान् शिवः, देवर्षिः नारदः, साक्षात् भगवान् कपिलः गुह्यतमं** (अत्यंत गुह्य अशा) **अस्य अनुभावं** (करणीला) **वेद.** ॥ १९ ॥ **यं मातुलेयं** (मामेभावाला) **प्रियं मित्रं सुहृत्तमं** (खरा अत्यंत

एष वै भगवान्साक्षादाद्यो नारायणः पुमान् ॥ मोहयन्मायया लोकं गूढश्चरति वृष्णिषु ॥ १८ ॥
अस्यानुभावं भगवान्वेद गुह्यतमं शिवः ॥ देवर्षिर्नारदः साक्षाद्भगवान्कपिलो नृप ॥ १९ ॥
यं मन्यसे मातुलेयं प्रियं मित्रं सुहृत्तमम् ॥ अकरोः सचिवं दूतं सौहृदादथ सारथिम् ॥ २० ॥
सर्वात्मनः समदृशो ह्यद्वयस्यानहंकृतेः ॥ तत्कृतं मतिवैषम्यं निरवद्यस्य न क्वचित् ॥ २१ ॥

स्नेही) **मन्यसे, अथ सौहृदात्** (प्रेमास्तव) **सचिवं दूतं सारथिं अकरोः;** ॥ २० ॥ **सर्वात्मनः समदृशः** (सम दृष्टि ज्याची अशा) **अद्वयस्य** (ज्याच्या ठिकाणीं द्वैतभाव नाहीं, अशा)

आहे, व हा आपल्यावर खरी प्रीति करणारा आणि प्रत्युपकारांची अपेक्षा न धरितां निरपेक्ष बुद्धीनें उपकार करणारा आहे, असें समजतोस. असें समजूनच विश्वासानें तूं ह्याला गूढ मसलती विचारल्यास, कौरवांकडे संधि (तह) करण्याकरितां दूत करून पाठविलेंस आणि, युद्धप्रसंगीं अर्जुनाचा सारथीही केलेंस. ॥ २० ॥ तूं जरी अशीं अयोग्य कामें सांगितलींस, तथापि, त्या कामांबद्दल ह्या परमेश्वराच्या बुद्धीला वैषम्य मुळींच नाहीं (मला अयोग्य कामें सांगितलीं, अशाबद्दल ह्याच्या मनांत किंचित् देखील वाईट वाटलें नाहीं); - कारण, वैषम्य उत्पन्न होण्याचें स्थल कोणतें, तर जेथें मी मोठा व अमुक काम माझ्या योग्य नाहीं असा भाव असेल तें. - हा कृष्ण सर्वांचा आत्मा व सर्वत्र सारखी दृष्टि ठेवणारा होय, ह्मणून ह्याचे मनांत द्वैतभाव मुळींच नसतो. हा दोषशून्य आणि अहंकाररहित असल्यामुळें ह्याला, अमुक उच्च व अमका नीच, असा भाव मुळींच नाहीं, - मग

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

वैषम्य उद्भवणार कोठून? - ॥ २१ ॥ तरी, राजा, ह्या परमेश्वराची, त्याचे ठिकाणीं निश्चयानें भक्ति करणाऱ्या पुरुषांवर कृपा असते. ह्याला उदाहरण माझेंच पहा कीं, माझ्या प्राणोत्क्रमणसमयीं प्रत्यक्ष श्रीकृष्णानें मला दर्शन दिलें. ॥ २२ ॥ जो योगी पुरुष त्या परमेश्वराच्या ठिकाणीं भक्तीनें आपलें मन लावून, वाणीनें त्याच्या नामाचें कीर्तन करीत असतां, देहत्याग करितो, तो सर्व कर्मबन्धनांपासून मुक्त होतो. ॥ २३ ॥ (भीष्म श्रीकृष्णाचें स्वरूप वर्णन करून थोडीशी प्रार्थना करितातः—) हाच भगवान्

निरवद्यस्य (दोषशून्य अशा) **निरहंकृतेः** (अहंकाररहित अशा) **तत्कृतं मतिवैषम्यं** (बुद्धीला विषमता ह्मणे 'हा बरा हा वाईट' असें तारतम्य) **क्वचित् न.** ॥२१॥ **तथापि हे भूप, एकांतभक्तेषु** (निश्चयानें भक्ति करणाऱ्यांवर) **अनुकम्पितं** (कृपेतें) **पश्य** (पहा); **यत् असून्** (प्राणांस) **त्यजतः** (टाकणाऱ्या) **मे साक्षात् कृष्णः दर्शनं आगतः.** ॥ २२ ॥ **यस्मिन् मनः भक्त्या आवेश्य** (लावून), **वाचा यन्नाम कीर्तयन् कलेवरं** (देहाला) **त्यजन् योगी कामकर्मभिः** (बंधक कर्मांनीं) **मुच्यते** (सोडिला जातो). ॥ २३ ॥ **सः देवदेवः प्रसन्नहासारुणलोचनोल्ल-**

तथा ऽप्येकान्तभक्तेषु पश्य भूपानुकम्पितम् ॥ यन्मे ऽसूंस्त्यजतः साक्षात्कृष्णो दर्शनमागतः ॥ २२ ॥
भक्त्या ऽऽवेश्य मनो यस्मिन्वाचा यन्नाम कीर्तयन् ॥ त्यजन्कलेवरं योगी मुच्यते कामकर्मभिः
॥ २३ ॥ स देवदेवो भगवान्प्रतीक्षतां कलेवरं यावदिदं हिनोम्यहम् ॥ प्रसन्नहासारुणलोचनोल्लस-
न्मुखाम्बुजो ध्यानपथश्चतुर्भुजः ॥ २४ ॥ सूत उवाच । युधिष्ठिरस्तदाकर्ण्य शयानं शरपञ्जरे ॥
अपृच्छद्विविधान् धर्मानृषीणामनुशृण्वताम् ॥ २५ ॥

सन्मुखाम्बुजः (प्रसन्न हास्य आणि किंचित् रक्तवर्ण नेत्र ह्यांनीं शोभतें मुखकमल ज्याचें असा) **ध्यानपथः** (ध्यानाचा विषय) **चतुर्भुजः भगवान्, यावत् अहं इदं कलेवरं हिनोमि** (टाकतों), **[तावत्] प्रतीक्षताम्** (वाट पाहो). ॥ २४ ॥ **सूतः उवाच—युधिष्ठिरः तत् आकर्ण्य शरपञ्जरे शयानं [भीष्मं] ऋषीणां अनुशृण्वतां** (ऐकणारे असा) **[सतां] विविधान् धर्मान् अपृच्छत्** (विचारिता झाला). ॥ २५ ॥

इन्द्रादि देवांनाही देवपदवी देणारा आहे. त्याच्या मुखकमलाला प्रसन्न हास्याच्या व आरक्त नेत्रांच्या योगानें फारच शोभा आली आहे. सर्व लोकांना ध्यान करण्याचा विषय काय तो हाच. तेव्हां ह्या चतुर्भुज परमेश्वरानें, मी देहत्याग करीं तोंपर्यंत, माझ्या अग्रभागीं, मला त्या मूर्तीचें ध्यान करतां यावें ह्मणून, कृपा करून उभें रहावें, - अशी माझी प्रार्थना आहे. - " ॥ २४ ॥ सूत ह्मणतात :— हें भीष्मांनीं केलेलें भाषण धर्मराजानें ऐकून घेतलें, व ते (भीष्माचार्य) शरपंजरांतच पडलेले असतां त्यांना नानाप्रकारचे

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

धमविषयक प्रश्न विचारिले. त्यावेळेस ऋषिही त्या ठिकाणीं तो संवाद ऐकावयास बसले होते. ॥२५॥ ते प्रश्न ऐकिल्यावर सामान्यतः मनुष्यजातीला योग्य धर्म कोणते, प्रत्येक वर्णाच्या व आश्रमाच्या भेदाप्रमाणें धर्म कसे आहेत, विरक्तांचे धर्म कोणते, संसारी पुरुषांचे धर्म कोणते, ॥ २६ ॥ तसेंच दानधर्म, राजधर्म, मोक्षधर्म (शमदमादि), स्त्रियांचे धर्म, भगवंताला संतुष्ट करणारे धर्म, हे सर्व भीष्माचार्यांनीही संक्षेपानें व विस्तरानें धर्माला सांगितले. ॥ २७ ॥ शौनक ऋषे, भीष्म खरे तत्त्ववेत्ते होते. त्यांनीं नानाप्रकारच्या आख्यानांत आणि इतिहासांत जसे धर्म, अर्थ, मोक्ष, व त्यांचे उपाय सांगितले आहेत, त्याप्रमाणें धर्मराजाला ते सर्व सांगितले. ॥२८॥ मरणकाल योग्यांच्या स्वाधीन असतो. उत्त-

सः पुरुषस्वभावविहितान् (मनुष्यजातीला योग्य, अशा) **यथावर्ण** (चारही – ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र – वर्णास अनुकूल) **यथाश्रमं** (ब्रह्मचारी, गृहस्थ, वानप्रस्थ संन्यासी ह्या चारी - आश्रमांस योग्य) **वैराग्यरागोपाधिभ्यां** (विरक्तता आणि संसारावर प्रेम - ह्या दोन वेगवेगळ्या - उपाधीवरून). **आम्नातोभयलक्षणान्** (ज्याचीं दोन प्रकारांचीं लक्षणें सांगितलीं आहित, अशा). ॥ २६ ॥ **विभागशः समासव्यासयोगतः** (संक्षेप आणि विस्तार ह्या दोहोंच्या योगानें) **दानधर्मान्, राजधर्मान्, मोक्षधर्मान्, स्त्रीधर्मान्, भगवद्धर्मान्** [**वर्णयामास**]. ॥ २७ ॥ हे मुने, **तत्त्ववित्** (तत्व जाणणारा) **सः यथा नानाख्यानेतिहासेषु** (अनेक प्रकारांचीं आख्यानें व इतिहास ह्यांमध्यें) [**सन्ति तथा**] **सहोपायान् धर्मार्थकाममोक्षान् वर्णयामास.** ॥ २८ ॥

पुरुषस्वभावविहितान्यथावर्णं यथाश्रमम् ॥ वैराग्यरागोपाधिभ्यामाम्नातोभयलक्षणान् ॥ २६ ॥ दानधर्मान् राजधर्मान् मोक्षधर्मान्विभागशः ॥ स्त्रीधर्मान् भगवद्धर्मान् समासव्यासयोगतः ॥२७॥ धर्मार्थकाममोक्षांश्च सहोपायान्यथा मुने ॥ नानाख्यानेतिहासेषु वर्णयामास तत्त्ववित् ॥ २८ ॥ धर्मं प्रवदतस्तस्य स कालः प्रत्युपस्थितः यो योगिनश्छन्दमृत्योर्वाञ्छितस्तूत्तरायणः ॥ २९ ॥ तदोपसंहृत्य गिरः सहस्रणीर्विमुक्तसंगं मन आदिपूरुषे ॥ कृष्णे लसत्पीतपटे चतुर्भुजे पुरः स्थिते ऽमीलितदृग्व्यधारयत् ॥ ३० ॥

छंदमृत्योः (स्वाधीन आहे मृत्यु ज्याच्या, अशा) **योगिनः यः वाञ्छितः सः उत्तरायणः कालः, तस्य धर्मं प्रवदतः** (सांगणाऱ्या) [**सतः**] **प्रत्युपस्थितः** (जवळ येऊन पोंचलेला). ॥ २९ ॥ **अमीलितदृक्** (नाहीं मिटले डोळे ज्यानें, असा) **सहस्रणीः** (**– सहस्राणि नयति सः**— सहस्रावधि – योद्धयांना– वागविणारा) **सः तदा गिरः** (भाषणांना) **उपसंहृत्य** (आटोपून - बंद करून) **विमुक्तसंगं** (सोडिला - विषयांचा - संग ज्यानें अशा) **मनः लसत्पीतपटे** (शोभत आहे पिवळें वस्त्र ज्याचें अशा) **चतुर्भुजे पुरः** (पुढें) **स्थिते** (उभा राहिलेल्या) **आदिपूरुषे कृष्णे व्यधार-**

रायणकाल देहावसानास योग्य होय. भीष्माचार्य धर्मव्याख्यान करीत असतां तो काल प्राप्त झाला. ॥२९॥ भीष्माचार्य युद्धामध्यें आपल्या पक्षांच्या सहस्रावधि योद्धयांचें रक्षण करीत; ह्मणून त्यांना 'सहस्रणी' असें नांव होतें. उत्तरायण लागलें. असें समजल्यावर त्यांनीं आपलें बोलणें बंद्र केलें. त्या वेळीं, आदिपुरुष चतुर्भुज पीतांबरधारी श्रीकृष्ण भगवान् अग्रभागीं उभे होतेच : तेव्हां भीष्मांनीं आपलें मन सर्व विषयांपासून पराङ्मुख करून त्या कृष्णाचे ठिकाणीं लाविलें, व तसेंच नेत्रही न मिटतां त्या कृष्णमूर्तीकडेसच लाविले. ॥३०॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

हींच शुद्ध धारणा परमेश्वराचे ठिकाणीं लावल्यामुळें त्यांचीं सर्व पापें नष्ट झालीं; युद्धांत शस्त्रें लागल्यामुळें शरीरास व्रण झाले होते, पण त्या कृष्णाच्या कृपादृष्टीनें ती व्यथा सर्व दूर झाली; इंद्रियवृत्तींचें नानाप्रकारचें भ्रमण बंद झालें; तेव्हां देहत्यागाच्या वेळीं त्यांनीं श्रीकृष्णाची स्तुति केली ती येणेंप्रमाणें :— ॥ ३१ ॥ भीष्माचार्य ह्मणालेः— "नाना प्रकारच्या धर्मादि उपायांनीं निष्काम झालेली माझी मनोधारणा - मी - त्या यादवश्रेष्ठ भगवंताचे ठिकाणीं ठेविली. - तो श्रीकृष्ण असा आहे कीं, - त्याच्यापेक्षां अधिक महत्त्व

यत् (लाविता झाला). ॥ ३० ॥ **विशुद्धया धारणया हताशुभः** (नाहींशीं झालीं पापें ज्याचीं अशा) **तदीक्षया एव** (त्याच्याकडे पाहाण्यानेंच) **आशु गतायुधव्यथः** (गेली आयुधांची व्यथा - युद्धांत शस्त्रें लागल्यामुळें झालेलें दुःख - ज्याची असा) **निवृत्तसर्वेन्द्रियवृत्तिविभ्रमः** (आवरून घेतलें सर्व इंद्रियांच्या वृत्तींचें अनेक प्रकारांचें भ्रमण ज्यानें, असा) **जन्यं** (जन्मास येणाराला ह्म० देहाला) **विसृजन्** (सोडणारा) **जनार्दनं तुष्टाव** (स्तुति करूं लागला) — ॥ ३१ ॥ " **इति** (ह्या म्ह० अनेक धर्मादि उपायांनीं) **वितृष्णा** (निरिच्छ, निष्काम) **मतिः सात्त्वतपुंगवे** (यादवांत श्रेष्ठ, अशा) **भगवति विभूम्नि** (सर्वांत मोठा, अशा) **उपकल्पिता** (लाविलेली) **स्वसुखं उपगते** (पोंचलेल्या ह्म० निमग्न अशा), **यत्** (ज्या म्ह० प्रकृतीपासून) **भवप्रवाहः**, (संसाररूपी

विशुद्धया धारणया हताशुभस्तदीक्षयैवाशु गतायुधव्यथः ॥ निवृत्तसर्वेन्द्रियवृत्तिविभ्रमस्तुष्टाव जन्यं विसृजन् जनार्दनम् ॥ ३१ ॥ भीष्म उवाच । इति मतिरुपकल्पिता वितृष्णा भगवति सात्वतपुंगवे विभूम्नि ॥ स्वसुखमुपगते क्वचिद्विहर्तुं प्रकृतिमुपेयुषि यद्भवप्रवाहः ॥ ३२ ॥ त्रिभुवनकमनं तमालवर्णं रविकरगौरवरांबरं दधाने ॥ वपुरलककुलावृताननाब्जं विजयसखे रतिरस्तु मे ऽनवद्या ॥ ३३ ॥

प्रवाह, [**तां**] **प्रकृतिं क्वचित्** (कधीं कधीं) **विहर्तुं** (विहार करण्यासाठीं) **उपेयुषि** (स्वीकारणाऱ्या), ॥ ३२ ॥ **त्रिभुवनकमनं** (त्रैलोक्यांत सुंदर) **तमालवर्णं रविकरगौरवरांबरं** (सूर्याच्या किरणांप्रमाणें ह्म० तेजस्वी गौरवर्ण उत्तम वस्त्र आहे ज्यावर अशा) **अलककुलावृताननाब्जं** (केशांच्या समुदायानें वेढिलें मुखकमल ज्याचें, अशा) **वपुः** (शरीराला) **दधाने** (धारण करणाऱ्या) **विजयसखे** (अर्जुनाच्या मित्रावर ह्म० कृष्णावर) **मे अनवद्या** (नाहीं दोष जींत अशी ह्म० निर्दोष, निष्कपट) **रतिः** (प्रीति) **अस्तु** (असो ह्म० जडो). ॥ ३३ ॥

कोणाच्याही ठिकाणीं नाहीं. आणखी तो स्वस्वरूपभूत परमानंदामध्यें नित्य निमग्न आहे, पण, जीमुळें हा संसारप्रवाह चालला आहे त्या मायेला कधीं कधीं विहार करण्याकरितां स्वीकारितो. ॥ ३२ ॥ (भीष्म कृष्णावतारींच्या ईश्वरस्वरूपाचें वर्णन करितातः—) - त्या अर्जुनाच्या मित्रानें (कृष्णानें) असें शरीर धारण केलें आहे कीं, त्याच्या सौंदर्याला त्रैलोक्यांतही तुलना नाहीं; त्या शरीराचा वर्ण तमालपुष्पाप्रमाणें (निळा) आहे. त्यानें आपल्या शरीरावर सूर्यकिरणांप्रमाणें तेजस्वी वस्त्रें धारण केलीं आहेत; व त्याचें

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

मुखकमल कुरळ केशपंक्तीच्या योगानें वेष्टून गेलें आहे : अशा त्या कृष्णस्वरूपावर माझी निर्मल प्रीति जडो. ॥ ३३ ॥ युद्धामध्यें (श्रीकृष्ण अर्जुनाचें सारथ्य करीत असतां) घोड्यांच्या - खुरांच्या आघातानें जमिनीवरून - धूळ उडून कृष्याच्या केशांवर बसत असे, व मुखांवर घर्मबिंदूंची पंक्ति आली असून, तीवरून ते मळलेले कुरुळ केश लोळले असतां ती ओळ वरचेवर मोडून जात असे, त्यामुळें कृष्णाच्या मुखाला शोभा दिसत असे; इकडे, माझ्या तीक्ष्ण बाणांनीं त्याची त्वचा छिन्न भिन्न होत असे, आणि कवचही तुटत असेः अशा त्या कृष्णाचे ठिकाणीं माझें मन लागो. ॥ ३४ ॥ जो कृष्ण आपल्या मित्राचें भाषण ऐकून तत्काळ आपल्या व शत्रूंच्या (दोन्ही) सैन्यांच्या मध्यभागीं रथ

युधि (युद्धांत) **तुरगरजोविधूम्रविष्वक्कचलुलितश्रमवार्यलंकृतास्ये** (घोड्यांच्या खुरांनीं उडालेल्या धुळीनें फार मळलेल्या व भुरभुर उडत असलेल्या केशांनीं मोडून गेलेली जी श्रमानें उत्पन्न झालेल्या घामाची पंक्ति, तिनें सुन्दर दिसतें मुख ज्याचें, अशा) **श्रमवार्यलंकृतास्ये मम निशितशरैः** (तीक्ष्ण बाणांनीं) **विभिद्यमानत्वचि** (पुष्कळ फाटून जात आहे त्वचा ज्याची, अशा) **विलसत्कवचे** (तुटतें कवच ज्याचें अशा) **कृष्णे आत्मा** (मन) **अस्तु.** ॥ ३४ ॥ **सखिवचः** (मित्राच्या भाषणाला) **निशम्य** (ऐकून) **सपदि** (तत्काल) **निजपरयोः** (आपल्या पक्षाच्या आणि शत्रूकडच्या) **बलयोः मध्ये** (सैन्यांमध्यें) **रथं निवेश्य** (स्थापून) **स्थितवति** (उभा असलेल्या) **परसैनिकायुः** (शत्रूकडील योद्ध्यांच्या आयुष्याला) **अक्ष्णा** (नेत्राच्या योगानें) **हृतवति** (हरण केलें

युधि तुरगरजोविधूम्रविष्वक्कचलुलितश्रमवार्यलंकृतास्ये ॥ मम निशितशरैर्विभिद्यमानत्वचि विलसत्कवचे
ऽस्तु कृष्ण आत्मा ॥ ३४ ॥ सपदि सखिवचो निशम्य मध्ये निजपरयोर्बलयो रथं निवेश्य ॥
स्थितवति परसैनिकायुरक्ष्णा हृतवति पार्थसखे रतिर्ममास्तु ॥ ३५ ॥ व्यवहितपृतनामुखं निरीक्ष्य
स्वजनवधाद्दि मुखस्य दोषबुद्ध्या ॥ कुमतिमहरदात्मविद्यया यश्चरणरतिः परमस्य तस्य मे ऽस्तु ॥३६॥

ज्यानें अशा) **पार्थसखे मम रतिः अस्तु.** ॥३५॥ **व्यवहितपृतनामुखं** (दूर असलेल्या सैन्याच्या मुखाला म्हणजे पुढेंच असलेल्या भीष्मादिकांना) **निरीक्ष्य स्वजनवधात्** (स्वकीय जनांच्या वधापासून) **दोषबुद्ध्या** (—दोषः इति बुद्धिः, तया–'हा दोष होय' अशा बुद्धीनें) **विमुखस्य** (फिरविलें तोंड ज्यानें म्हणजे ज्यानें युद्ध करणें नाकारिलें अशा) [**अर्जुनस्य**] **कुमतिं** (वृथाभिमानाला) **यः आत्मविद्यया** (गीतारूपी - आत्मज्ञानाच्या योगानें) **अहरत्** (दूर करिता झाला), **परमस्य तस्य चरणरतिः मे अस्तु.** ॥ ३६ ॥

स्थापन करून उभा राहिला, व ज्यानें आपल्या दृष्टिपातानें शत्रूंच्या सैन्यांतील योद्धचांचें आयुष्य हरण केलें, त्या अर्जुनाच्या मित्रावर (कृष्णावर) माझी प्रीति बसो. ॥ ३५ ॥ अर्जुनानें दुरूनच सैन्याचें मुख (पुढेंच असणारे भीष्मद्रोणादिक) अवलोकन केल्याबरोबर, आपल्या आप्तांचा वध करणें दोषास्पद होय, अशा बुद्धीनें - युद्धास - माघार घेतली. त्यावेळेस त्याला (अर्जुनाला) आत्मज्ञानाचा उपदेश (भगवद्गीतारूप) करून ज्या श्रीकृष्णपरमात्म्यानें त्याचा वृथाभिमान (मीच वध करतों, हा) नाहींसा

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

केला, त्या परमेश्वराच्या चरणीं माझी प्रीति जडो. ॥ ३६ ॥ - कृष्णानें स्वतां प्रतिज्ञा केली होती कीं 'अशस्त्र एव अहं साहाय्यमात्रं करिष्यामि ह्मणजे मी हातांत शस्त्र धारण न करितां युक्तिसाहाय्य मात्र करीन' पण, 'कृष्णाकडून शस्त्र धरवीन.' अशी - माझी प्रतिज्ञा खरी करण्याकरितां त्यानें आपली प्रतिज्ञा मोडली, रथांतून उडी टाकली, हातांत चक्र घेतलें, व चालण्याच्या आवेशानें पृथ्वीला थरथर कांपवीत इतक्या गर्दीनें चालून आला कीं, आंगावरील उत्तरीय वस्त्र गळून पडलें तें उचलून घेण्यास देखील त्याला अवसर झाला नाहीं व जसा सिंह हत्तीच्या आंगावर चालून जातो त्याप्रमाणें, त्यानें मजवर चाल केली. ॥ ३७ ॥ त्यावेळेस माझ्या हातात शस्त्र होतें. माझ्या तीक्ष्ण बाणां-

स्वनिगमं (आपल्या प्रतिज्ञेला) **अपहाय** (टाकून ह्म० मोडून) **मत्प्रतिज्ञां ऋतं** (खरी) **अधिकर्तुं** (अधिक करण्याकरितां) **रथस्थः अवप्लुतः** (खालीं उतरलेला) **धृतरथचरणः** (धरिलें आहे चक्र ज्यानें, असा) **गतोत्तरीयः** (गळून पडलें आहे उत्तरीय वस्त्र ज्याचें असा) **चलद्गुः** (कंपायमान झाली आहे पृथ्वी ज्यापासून असा), **इभं** (हत्तीला) **हंतुं हरिः** (सिंह) **इव, अभ्ययात्** (आंगावर चालून आला). ॥ ३७ ॥ **आततायिनः** (मारण्यास तयार झालेल्या) **मे शितविशिखहतः** (तीक्ष्ण बाणांनीं प्रहार केला ज्यावर असा) **विशीर्णदंशः** (विदीर्ण झालें आहे कवच ज्याचें असा) **क्षतजपरिप्लुतः** (रक्तानें भर

स्वनिगममपहाय मत्प्रतिज्ञामृतमधिकर्तुमवप्लुतो रथस्थः ॥ धृतरथचरणो ऽभ्ययाच्चलद्गुर्हरिरिव हन्तुमिभं गतोत्तरीयः ॥ ३७ ॥
शितविशिखहतो विशीर्णदंशः क्षतजपरिप्लुत आततायिनो मे ॥ प्रसभमभिससार मद्वधार्थं स भवतु मे भगवान् गतिर्मुकुन्दः ॥३८॥
विजयरथकुटुम्ब आत्ततोत्रे धृतहयरश्मिनि तच्छ्रियेक्षणीये ॥ भगवति रतिरस्तु मे मुमूर्षोर्यमिह निरीक्ष्य हता गताः सरूपम् ॥३९॥

लेला) **मद्वधार्थं प्रसभं** (बलानें) **अभिससार** (चालून आला); **सः भगवान् मुकुंदः मे गतिः भवतु.** ॥ ३८ ॥ **विजयरथकुटुंबे** (अर्जुनाचा रथ हा कुटुंब आहे ज्याचें अशा) **आत्ततोत्रे** (हातांत चाबूक घेतला आहे ज्यानें अशा) **धृतहयरश्मिनि** (धरिले आहेत घोड्यांचे लगाम ज्यानें अशा) **तच्छ्रिया** (त्या सारथ्याच्या शोभेनें) **ईक्षणीये** (शोभायमान) **भगवति मुमूर्षोः** (मरणोन्मुख झालेल्या अशा)

नीं त्याच्या आंगावर प्रहार लागले होते, त्याचें कवच विदीर्ण झालें होतें, रक्तानें सर्व आंग भरून गेलें होतें अशा स्थितींत, अर्जुन 'नको नको' ('तूं स्वतः मारूं नको तुझी शस्त्र न धरण्याबद्दल प्रतिज्ञा आहे' असें) ह्मणत असतांही, जो माझ्या वधाकरितां धांवून आला, तो मोक्षदाता भगवान् माझी गति होवो. ॥ ३८ ॥ अर्जुनाचा रथ ह्मणजे कृष्णाचें कुटुंब[1] होता. त्यानें (कृष्णानें) हातांत चाबूक व घोड्यांचे लगाम घेतले होते. - मूळचा तो सुंदरच, पण त्यांत - ह्या शोभेनें विशेष प्रेक्षणीय वाटत होता. त्या कृष्णाच्या स्वरूपावर, मरणोन्मुख झालेला जो मी त्या माझी प्रीति जडो. त्या ईश्वराचें दर्शन घडल्यामुळें भारती युद्धांत मरण पावलेल्या सर्व लोकांना त्याच्या सारखें रूप प्राप्त

१ कुटुंब ह्म० (अकृत्यशतैरपि रक्षणीयम्) आचरण करण्यास अयोग्य अशा शेंकडो गोष्टी करणें जरी भाग पडलें तरी तितक्या करूनही ज्याचें रक्षण करणें अवश्य असतें तें.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

झालें. ॥ ३९ ॥ गोपी कृष्णाच्या सन्मानाकरितां पुष्कळ प्रकारचे शृंगारभाव करीतः– त्यांनीं कृष्णाला संतुष्ट करण्याकरितां चालावें, त्याच्याकडे पाहून गालांत हांसावें, त्याच्याकडे प्रेमपूर्वक अवलोकन करावें इत्यादि. व त्यांचें ते सत्काराचे प्रकार पाहून कृष्णही, आपण संतुष्ट झालों, असें दाखवून त्यांना मान देत असे; त्यामुळें गोपी अतिशय गर्वानें अंध झाल्या होत्या. त्या श्रीकृष्णाचा मार्गें सांगितल्याप्रमाणें पुष्कळ सन्मान व त्याच्या चरित्रांचें वारंवार अनुकरणही करीत, ह्मणून शेवटीं कृष्णस्वरूपास मिळाल्या. ॥ ४० ॥ धर्मराजानें राजसूययज्ञ केला, तेवेळीं त्याच्याकडे पुष्कळ मुनि व मोठमोठाले राजे आले होते, पण त्यांच्या सर्वांत श्रीकृष्णाला अग्रपूजा प्राप्त झाली; - नुसती पूजा

मे रतिः अस्तु; इह यं निरीक्ष्य हताः (मरण पावलेले योद्धे) **सरूपं** (त्या कृष्णासारिख्या रूपाप्रत) **गताः.** ॥ ३९ ॥ **ललितगतिविलासवल्गुहासप्रणयनिरीक्षणकल्पितोरुमानाः** (उत्तम गति -चालणें -, विलास, सुंदर हास्य, व प्रेमपूर्वक अवलोकन यांच्या योगानें केला आहे मोठा मान ज्यांचा अशा) **कृतं** (चरित्राला) **अनुकृतवत्यः** (अनुकरण करणाऱ्या) **उन्मदांधाः** (गर्वानें अंध झालेल्या) **गोपवध्वः यस्य प्रकृतिं** (स्वरूपाला) **अगमन् किल.** ॥ ४० ॥ **मुनिगणनृपवर्यसंकुले** (मुनींचे समुदाय व श्रेष्ठ श्रेष्ठ राजे यांनीं व्याप्त अशा) **अंतःसदसि** (सभे-

ललितगतिविलासवल्गुहासप्रणयनिरीक्षणकल्पितोरुमानाः ॥ कृतमनुकृतवत्य उन्मदान्धाः प्रकृतिमगन्किल यस्य गोपवध्वः ॥ ४० ॥
मुनिगणनृपवर्यसङ्कुलेऽन्तःसदसि युधिष्ठिरराजसूय एषाम् ॥ अर्हणमुपपेद ईक्षणीयो मम दृशिगोचर एष आविरात्मा ॥ ४१ ॥
तमिममहमजं शरीरभाजां हृदिहृदि धिष्ठितमात्मकल्पितानाम् ॥ प्रतिदृशमिव नैकधा ऽर्कमेकं समधिगतो ऽस्मि विधूतभेदमोहः ॥ ४२ ॥
सूत उवाच । कृष्ण एवं भगवति मनोवाग्दृष्टिवृत्तिभिः ॥ आत्मन्यात्मानमावेश्य सो ऽन्तःश्वास उपारमत् ॥ ४३ ॥

मध्यें) **युधिष्ठिरराजसूये एषां ईक्षणीयः अर्हणं** (पूजेप्रत) **उपपेदे** (प्राप्त झाला); **एषः आत्मा मम दृशिगोचरः आविः** (स्पष्ट) [**अस्ति**]. ॥ ४१ ॥ **विधूतभेदमोहः** (नाहींसा झाला आहे भेदभाव व मोह ज्याचा असा) **अहं आत्मकल्पितानां** (स्वतः निर्माण केलेल्या) **शरीरभाजां** (प्राणिमात्रांच्या) **हृदिहृदि धिष्ठितं** (राहिलेल्या) **एकं, अर्कं प्रतिदृशं** (प्रत्येकाच्या दृष्टीस) **इव, नैकधा** [**भातं**] **अजं तं इमं समधिगतः** (ऐक्य पावलेला असा) **अस्मि.** ॥ ४२ ॥ **सूतः उवाच— सः एवं भगवति आत्मनि कृष्णे मनोवाग्दृष्टिवृत्तिभिः आत्मानं आवेश्य**

मिळाली एवढेंच नव्हे तर- ते सर्व मुनि व राजे त्याच्या स्वरूपाकडे आणि ऐश्वर्याकडे पाहून थक्क होऊन जात होते. तोच सर्व जगाचा अंतर्यामी कृष्ण प्रत्यक्ष पुढें दिसतो आहे, तेव्हां केवढें माझें भाग्य !! ॥ ४१ ॥ हाच कृष्ण स्वतः निर्माण केलेल्या प्रत्येक प्राण्याच्या हृदयांत राहतो, व जसा सूर्य एकच असतां प्रत्येकाचे दृष्टीस निरनिराळा दिसतो, तसा हाही निरनिराळा भासतो. आतां माझ्या मनांतील भेद व मोह अगदीं नाहींसा झाला ह्मणून मी त्या जन्मरहित परमेश्वराशीं ऐक्य पावलों असून कृतार्थ आहें." ॥ ४२ ॥ सूत ह्मणतातः– ऋषीहो, पूर्वी सांगितल्याप्रमाणें भीष्माचार्यांनीं त्या भगवान् सर्वांतर्यामी श्रीकृष्णाचे ठिकाणीं आपल्या मनाच्या, वाणीच्या व दृष्टीच्या वृत्ति लाविल्या. तिकडे मन स्थिर झालें

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

असतां ते हळूहळू विराम पावले; त्यांचा श्वास आंत लीन झाला. ॥४३॥ भीष्माचार्य निरुपाधि ब्रह्मरूपास प्राप्त होत आहेत, असें तेथील मंडळींनीं पाहिल्याबरोबर सर्वत्र शांतता पसरली (हालचाल गडबड सर्व बंद झाली). संध्याकाळचे वेळीं जसे पक्षी मुळींच शब्द करीत नाहींत, तशी सर्व मंडळी स्थिर झाली. ॥ ४४ ॥ त्या ठिकाणीं देव व मनुष्यें एकत्र जमलीं होतीं, त्यांनीं दुंदुभि वाजविल्या. तेथें पुष्कळ राजेही आले होते, त्यांत जे गुणग्राही होते, त्यांनीं भीष्माची स्तुति केली. आकाशांतून पुष्पवृष्टि झाली. ॥ ४५ ॥ शौनक

(लावून) **अंतःश्वासः** (आंतच श्वास - प्राण लीन झाला आहे ज्याचा असा) [**सन्**] **उपारमत्** (विराम पावला). ॥ ४३ ॥ **ते सर्वे निष्कले ब्रह्मणि भीष्मं संपद्यमानं** (प्राप्त होणाऱ्यास - मिळणाऱ्यास) **आज्ञाय** (जाणून - पाहून) **दिनात्यये** (संध्याकाळीं) **वयांसि** (पक्षी) **इव तूष्णीं** (स्तब्ध) **बभूवुः**. ॥ ४४ ॥ **देवमानववादिताः** (देव व मनुष्यें यांनीं वाजविलेल्या) **दुंदुभयः तत्र नेदुः, राज्ञां साधवः** (निर्मत्सर असे) **शशंसुः** (स्तुति करिते झाले), **खात्** (आकाशांतून) **पुष्पवृष्टयः पेतुः**. ॥ ४५ ॥ **हे भार्गव, युधिष्ठिरः संपरेतस्य** (उत्तम प्रकारें देहत्याग केलेल्याचीं - भीष्माचीं)

सम्पद्यमानमाज्ञाय भीष्मं ब्रह्मणि निष्कले ॥ सर्वे बभूवुस्ते तूष्णीं वयांसीव दिनात्यये ॥ ४४ ॥ तत्र दुन्दुभयो नेदुर्देवमानववादिताः ॥ शशंसुः साधवो राज्ञां खात्पेतुः पुष्पवृष्टयः ॥ ४५ ॥ तस्य निर्हरणादीनि सम्परेतस्य भार्गव ॥ युधिष्ठिरः कारयित्वा मुहूर्तं दुःखितोऽभवत् ॥ ४६ ॥ तुष्टुवुर्मुनयो हृष्टाः कृष्णं तद्गुह्यनामभिः ततस्ते कृष्णहृदयाः स्वाश्रमान्प्रययुः पुनः ॥ ४७ ॥ ततो युधिष्ठिरो गत्वा सहकृष्णो गजाह्वयम् ॥ पितरं सान्त्वयामास गान्धारीं च तपस्विनीम् ॥ ४८ ॥

तस्य निर्हरणादीनि (दाहसंस्कारादि कर्मे) **कारयित्वा मुहूर्तं** (कांहीं वेळ) **दुःखितः अभवत्**. ॥ ४६ ॥ **हृष्टाः मुनयः कृष्णं तद्गुह्यनामभिः** (त्याच्या—गुह्य वेदोक्त—नांवांनीं) **तुष्टुवुः; ततः कृष्णहृदयाः** (कृष्णच आहे हृदयांत ज्यांच्या असे) **ते पुनः स्वाश्रमान् प्रययुः**. ॥ ४७ ॥ **ततः सहकृष्णः युधिष्ठिरः गजाह्वयं गत्वा पितरं तपस्विनीं गान्धारीं च सांत्वयामास**

ऋषे, भीष्मांनीं देहत्याग केल्यावर, धर्मराजानें त्यांचा दाहसंस्कार इत्यादि केला. त्याला थोडा वेळ दुःखही वाटलें. ॥ ४६ ॥ सर्वकाळीं संतुष्ट असणाऱ्या मुनींनीं वेदोक्त नामें गाऊन भगवान् श्रीकृष्णाची स्तुति केली. व ते अंतःकरणांत श्रीकृष्णाचें ध्यान करीत आपआपल्या आश्रमास गेले. ॥ ४७॥ नंतर धर्मराजा श्रीकृष्णास बरोबर घेऊन हस्तिनापुरास गेला. तेथें धृतराष्ट्र व ती पुण्यशील किंवा दीन गांधारी - ह्या दोघांना भीष्मनिर्याणाची वार्ता समजल्यावर दुःख झालें. - पण कृष्णानें व धर्मानें त्यांचें सांत्वन केलें. ॥ ४८ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

राजा धर्म महासमर्थ होता; त्यानें धृतराष्ट्राचें मत घेऊन व कृष्णाच्या अनुमोदनानें आपल्या कुलपरंपरागत राज्याचा कारभार चालविला. ॥ ४९ ॥ इति नवमोऽध्यायः ॥ ९ ॥

शौनक ऋषि विचारतात :– सूता, महाधर्मज्ञ धर्मराजानें, दुर्योधनप्रभृति कौरव आततायी आपल्या (पांडवांच्या) संपत्तीविषयीं हेवा करतात, असें पाहून त्यांचा वध केला. मग अर्थातच त्याला राज्य मिळालें व सर्व प्रकारचे भोग मिळूं लागले. तेव्हां पुढें त्यानें, बंधूंसहवर्तमान, राज्य करण्यास कोणत्या रीतीनें प्रारंभ केला व पुढें काय केलें? ॥ १ ॥

सूत ह्मणतात :– कुरुवंशामध्येंच कलहरूपी वणवा उत्पन्न होऊन त्यांचें बहुतेक निर्मूलन संग्रामांतच झालें होतें - व थोडींशीं कांहीं मुलें अवशिष्ट होतीं, त्यांचाही अश्वत्थाम्याच्या (सांतवन करिता झाला). ॥ ४८ ॥ विभुः राजा पित्रा (पित्याकडून–धृतराष्ट्राकडून) अनुमतः वासुदेवानुमोदितः (कृष्णानें अनुमोदन दिलेला) धर्मेण पितृपैतामहं राज्यं चकार. ॥ ४९ ॥

॥ इति श्रीभागवतान्वये प्रथमस्कन्धे नवमो ऽध्यायः ॥ ९ ॥

शौनकः उवाच— धर्मभृतां वरिष्ठः युधिष्ठिरः आततायिनः स्वरिक्थस्पृधः (आपल्या संपत्तीविषयीं हेवा करणाऱ्यांस) हत्वा प्रत्यवरुद्धभोजनः (परत मिळविलीं उपभोगसाधनें ह्मणजे राज्य ज्यानें, असा) अनुजैः सह [राज्ये] कथं प्रवृत्तः, ततः किं अकारषीत् (करिता झाला)? ॥१॥ सूतः उवाच—ईश्वरः भवभावनः हरिः वंशदवाग्निनिर्हृतं (वंशरूपी अग्नीनें दग्ध झालेल्या)

पित्रा चानुमतो राजा वासुदेवानुमोदितः ॥ चकार राज्यं धर्मेण पितृपैतामहं विभुः ॥४९॥ इति श्रीभा०म०प्र०युधिष्ठिरराज्यप्रलम्भो नाम नवमो ऽध्यायः ॥९॥ शौनक उवाच। हत्वा स्वरिक्थस्पृध आततायिनो युधिष्ठिरो धर्मभृतां वरिष्ठः ॥ सहानुजैः प्रत्यवरुद्धभोजनः कथं प्रवृत्तः किमकारषीत्ततः ॥ १॥ सूत उवाच । वंशं कुरोर्वंशदवाग्निनिर्हृतं संरोहयित्वा भवभावनो हरिः ॥ निवेशयित्वा निजराज्य ईश्वरो युधिष्ठिरं प्रीतमना बभूव ह ॥२॥ निशम्य भीष्मोक्तमथाच्युतोक्तं प्रवृत्तविज्ञानविधूतविभ्रमः ॥ शशास गामिन्द्र इवाजिताश्रयः परिध्युपान्तामनुजानुवर्तितः ॥ ३ ॥

कुरोः वंशं संरोहयित्वा (अंकुरित करून - अंकुराचें रक्षण करून) युधिष्ठिरं निजराज्ये निवेशयित्वा प्रीतमनाः बभूव. ॥ २ ॥ [युधिष्ठिरः] भीष्मोक्तं अथ अच्युतोक्तं निशम्य, प्रवृत्तविज्ञानविधूतविभ्रमः (उत्पन्न झालेल्या ज्ञानानें नष्ट झाला आहे मोह ज्याचा असा) अजिताश्रयः (ईश्वर ह्म० कृष्णच आहे आश्रय ज्याचा असा) अनुजानुवर्तितः (बंधूंकडून सेविलेला) परिध्युपांतां (समुद्रपर्यंत - विस्तृत - अशा) गां (पृथ्वीला), इन्द्रः इव, शशास. ॥ ३ ॥

ब्रह्मास्त्रानें वध होऊन अगदींच निर्वंश होण्याची वेळ आली होती, पण त्यांतील उत्तरेच्या गर्भाचें रक्षण करून - जगच्चालककृष्णानें कुरुवंशाच्या अंकुराचें रक्षण केले व धर्मराजाला राज्यपदावर बसविलें; इतक्या गोष्टी झाल्या तेव्हां कृष्णाला संतोष झाला. ॥ २ ॥ धर्मराजानें, भीष्माचार्यांनीं केलेला धर्मोपदेश ऐकला होता, तसेंच श्रीकृष्णाचें भाषणही ऐकिलें होतें. त्या दोघांच्या उपदेशांपासून त्याच्या अंतःकरणांत ज्ञान उत्पन्न झालें, व त्या ज्ञानाच्या योगानें - 'मी ज्ञातिवध केला,' - हा मोह नष्ट झाला. नंतर त्यानें

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

श्रीकृष्णपरमात्म्याच्या आश्रयानें आपल्या बंधूंसह, इंद्राप्रमाणें, समुद्रवलयांकित पृथ्वीचें पालन केलें. ॥ ३ ॥ धर्मराजा राज्य करूं लागल्या दिवसापासून पर्जन्यवृष्टि पुष्कळ होउं लागली, पृथ्वी सर्व इच्छित अन्न व ओषधी प्रसवूं लागली. - व दूधाची इतकी विपुलता झाली कीं, - गाई आनंदानें आपल्या गोव्यांत दुधाचें सिंचन करीत. ॥ ४ ॥ तसेंच, त्याच्या राज्यांत नद्या, समुद्र, पर्वत, वनस्पति, वेली व सर्व ओषधि ऋतूऋतूंचे ठिकाणीं आपआपल्याजवळ देण्यास योग्य असणारे पदार्थ देऊं लागल्या. ॥ ५ ॥ धर्मराजाला कोणी शत्रु नव्हताच (त्याला जन्मापासून, अमुक प्राणी ह्मणून आपला शत्रु आहे, असें वाटतच नसे; ह्मणून त्याला ' अजातशत्रु ' असें ह्मणत असत). तो (राजा धर्म) राज्य

पर्जन्यः कामं (पुष्कळ) **ववर्ष** (वृष्टि करिता झाला), **मही सर्वकामदुघा [आसीत्], पयसा ऊधस्वतीः** (मोठाल्या कांसा ज्यांच्या -- पुष्कळ दूध देणाऱ्या अशा) **गावः व्रजान्** (गोव्यांना) **मुदा** (आनंदानें) **सिषिचुः स्म. ॥ ४ ॥ तस्य नद्यः समुद्राः गिरयः सवनस्पतिविरुधः** (वनस्पति व वेली ह्यांसहित) **सर्वाः ओषधयः अन्वृतु** (ऋतूऋतूंचे ठिकाणीं) **कामं फलंति वै. ॥ ५ ॥ अजातशत्रौ राज्ञि, जंतूनां कर्हिचित् आधयः न, व्याधयः न, दैवभूतात्महेतवः** (देव, भूतें—प्राणिमात्र—व आत्मा—शरीर—हीं कारण आहेत ज्यांस असे-अधिदैविक अधिभौतिक व

कामं ववर्ष पर्जन्यः सर्वकामदुघा मही ॥ सिषिचुः स्म व्रजान्गावः पयसोधस्वतीर्मुदा ॥ ४ ॥
नद्यः समुद्रा गिरयः सवनस्पतिविरुधः ॥ फलन्त्योषधयः सर्वाः काममन्वृतु तस्य वै ॥ ५ ॥
नाधयो व्याधयः क्लेशा दैवभूतात्महेतवः ॥ अजातशत्रावभवन् जंतूनां राज्ञि कर्हिचित् ॥ ६ ॥
उषित्वा हास्तिनपुरे मासान्कतिपयान्हरिः ॥ सुहृदां च विशोकाय स्वसुश्च प्रियकाम्यया ॥ ७ ॥
आमन्त्र्य चाभ्यनुज्ञातः परिष्वज्याभिवाद्य तम् ॥ आरुरोह रथं कैश्चित्परिष्वक्तोऽभिवादितः ॥८॥

अध्यात्मिक) **क्लेशाः च न अभवन्. ॥ ६ ॥ हरिः सुहृदां विशोकाय,** (शोक दूर करण्याकरितां) **स्वसुः** (बहिणीच्या) **प्रियकाम्यया च कतिपयान्** (कांहीं) **मासान् हास्तिनपुरे उषित्वा** (राहून), **॥ ७ ॥ आमंत्र्य** (विचारून) **अभ्यनुज्ञातः च तं परिष्वज्य,** (आलिंगन देऊन) **अभिवाद्य** (नमस्कार करून) **च, कैश्चित् परिष्वक्तः** (आलिंगिलेला) **अभिवादितः [सन्] रथं आरूरोह. ॥ ८ ॥**

करीत असतां प्राणिमात्रांना काळजी, शारीरव्याधि किंवा अध्यात्मिक, अधिभौतिक व अधिदैविक ह्या त्रिविध तापांपैकीं कोणताही कधींही नसे; प्रजा नेहमीं आनंदि व सुखी असे. ॥ ६ ॥ श्रीकृष्णानें हस्तिनापुरांत कांहीं दिवस रहावें, अशी त्याच्या बहिणीची (सुभद्रेची) इच्छा होती. ती पूर्ण करण्याकरितां व आपल्या मित्रांचा बंधुवधामुळें झालेला शोक दूर करण्यासाठीं, श्रीकृष्ण कांहीं महिने तेथें राहिले. ॥ ७ ॥ - पुढें कित्येक दिवस लोटल्यावर, श्रीकृष्णांनीं धर्मराजाजवळ जाण्याची गोष्ट काढली. - धर्मरा-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

जानेंही त्यांना अनुमोदन दिलें. निघतांना श्रीकृष्णांनीं धर्माला आलिंगन केलें, कित्येकांनीं (भीमार्जुनांनीं) श्रीकृष्णास आलिंगन केलें, आणि कित्येकांनीं (नकुलसहदेवांनीं) नमस्कार केला. कृष्ण रथांत बसले. ॥ ८ ॥ सुभद्रा, द्रौपदी, कुंती, उत्तरा तशीच गांधारी, धृतराष्ट्र, युयुत्सु, कृपाचार्य, नकुल, सहदेव, भीष्म, धौम्यऋषि व उत्तराप्रभृति स्त्रिया ह्या सर्वांना श्रीकृष्णाचा भावी विरह सहन होईना. त्यांना चुकल्याचुकल्यासारखें वाटूं लागले. ॥ ९ ॥ १० ॥ - पांडवांना कृष्णाचा विरह सहन झाला नाहीं यांत कांहीं आश्चर्य नाहीं; कारण, कृष्णाला सोडावें, असें कोणालाच वाटत नाहीं. - कोणत्याही पुरुषाला दैवयोगानें साधूंची संगति घडली म्हणजे त्या संगतीमुळें त्याची संसा-

सुभद्रा, द्रौपदी, कुंती, विराटतनया तथा गांधारी, मत्स्यसुतादयः (सत्यवती किंवा उत्तरा आदि ज्यांमध्यें अशा) **स्त्रियः, धृतराष्ट्रः, युयुत्सुः, गौतमः** (कृपाचार्य),**यमौ** (नकुल व सहदेव), **वृकोदरः, धौम्यः च विमुह्यंतः [पुरुषाः] शार्ङ्गधन्वनः विरहं न सेहिरे. ॥९॥१०॥ मुक्तदुःसंगः** (सुटली आहे दुष्टसंगति ज्याची असा) **बुधः सत्संगात् यस्य रोचनं** (गोड लागणारें)

सुभद्रा द्रौपदी कुन्ती विराटतनया तथा ॥ गान्धारी धृतराष्ट्रश्च युयुत्सुर्गौतमो यमौ ॥ ९ ॥
वृकोदरश्च धौम्यश्च स्त्रियो मत्स्यसुतादयः ॥ न सेहिरे विमुह्यन्तो विरहं शार्ङ्गधन्वनः ॥ १० ॥
सत्संगान्मुक्तदुःसंगो हातुं नोत्सहते बुधः ॥ कीर्त्यमानं यशो यस्य सकृदाकर्ण्य रोचनम् ॥ ११ ॥
तस्मिन्न्यस्तधियः पार्थाः सहेरन्विरहं कथम् ॥ दर्शनस्पर्शसंलापशयनासनभोजनैः ॥ १२ ॥
सर्वे ते ऽनिमिषैरक्षैस्तमनुद्रुतचेतसः ॥ वीक्षन्तः स्नेहसंबद्धा विचेलुस्तत्र तत्र ह ॥ १३ ॥

कीर्त्यमानं यशः सकृत् आकर्ण्य हातुं (सोडण्यास) **न उत्सहते. ॥ ११ ॥ तस्मिन् दर्शनस्पर्शसंलापशयनासनभोजनैः न्यस्तधियः** (लाविली आहे मनोवृत्ति ज्यांनीं असे) **पार्थाः** (पांडव) **विरहं कथं सहेरन् ? ॥ १२ ॥ स्नेहसंबद्धाः** (स्नेहानें बांधले गेलेले) **तं अनुद्रुतचेतसः** (त्याच्याचकडे लागलीं आहेत अंतःकरणें ज्यांचीं असे) **ते सर्वे अनिमिषैः** (न मिटणाऱ्या) **अक्षैः**

राचे ठिकाणची दुष्ट आसक्ति सुटते. ते साधु नेहमीं मधुर कृष्णकीर्तीचें गायन करीत असतात. ती कीर्ति एकवार जर पुरुषाचे कानावर पडली तर तो त्या साधूंचा समागम सोड-ण्यास कधींही धजत नाहीं. इतकी ज्या भगवताच्या कीर्तीमध्यें मधुरता आहे, ॥ ११ ॥ त्या श्रीकृष्णावरच पांडवांचीं अंतःकरणें नेहमीं जडून गेलीं होतीं; कारण त्यांना नेहमीं त्याचें दर्शन, त्याचा स्पर्श, त्याच्याबरोबरच बोलणें, निजणें, बसणें व भोजन घडावयाचें; कृष्ण सतत पुढें आहेच, तेव्हां पांडवांना कृष्णाचा विरह कसा बरें सहन करवेल ? ॥१२॥ त्या सर्वांचीं अंतःकरणें श्रीकृष्णाचे ठिकाणीं प्रेमानें बांधलीं गेल्यामुळें त्याच्याचकडे लागलीं होतीं; ते डोळे भरून कृष्णाचें स्वरूप पाहत होते, - व पूजासाहित्य वगैरे

१ कृष्णानें उत्तरेच्या गर्भाचें रक्षण केलें, म्हणून कृष्णविरहापासून उत्तरेला सर्वांपेक्षां अधिक दुःख होण्याचा संभव. करितां तिचें नांव दोन वेळां घातलें आहे.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आणावयाकरितां - हिकडून तिकडे फिरत होते. ॥ १३ ॥ द्रौपदीप्रभृति स्त्रियांचें कृष्णाच्या ठिकाणीं फारच प्रेम होतें. कृष्ण घरांतून बाहेर पडावयाचा, त्यावेळीं त्यांच्या नेत्रांत अश्रु येऊं लागले; - पण 'घरांतून कोणीही मनुष्य बाहेर जात असतां नेत्रांतून अश्रु जाणें हें अशुभ आहे,' - तें कृष्ण जाण्याच्या वेळेस न व्हावें, ह्मणून त्यांनीं आपले अश्रु - बाहेर पडूं दिले नाहींत, मनोनिग्रह केला व अश्रु आंतल्या आंत दाबले. ॥ १४॥ मृदंग, शंख, भेरी, नौबदी, वीणा, पणव, गोमुख, धुंधुरि, घंटा, दुंदुभि इत्यादि वाद्यें वाजूं लागलीं. ॥१५॥ मार्गांतून कृष्णाची स्वारी जात असतां, कौरवांच्या स्त्रिया कृष्णाचें दर्शन ध्यावें ह्मणून आपापल्या वाड्यांच्या गच्चयांवर उभ्या राहिल्या व सप्रेम, समर्याद, आणि हास्ययुक्त

[तं] **वीक्षंतः तत्र तत्र विचेलुः** (फिरत होते). ॥ १३ ॥ **बांधवस्त्रियः देवकीसुते अगारात्** (घरांतून) **निर्याति [सति] अभद्रं नो स्यात्, इति औत्कंठ्यात् उद्गलत्** (गळणाऱ्या) **बाष्पं** (अश्रूस) **न्यरुंधन्** (स्तंभन करित्या झाल्या). ॥ १४ ॥ **मृदंगशंखभेर्यः, वीणापणवगोमुखाः, धुंधुर्यानकघंटाद्याः** (धुंधुरि, आनक, घंटा इत्यादि वेगवेगळीं वाद्यें) **तथा दुंदुभयः नेदुः** ॥ १५ ॥ **दिदृक्षया** (दर्शनाच्या इच्छेनें) **प्रासादशिखरारूढाः कुरुनार्यः प्रेमव्रीडास्मितेक्षणाः** (प्रेम, मर्यादा आणि हास्य ह्यांनीं युक्त दृष्टि आहेत ज्यांच्या अशा) **[सत्यः] कृष्णे कुसुमैः**

न्यरुन्धन्नुद्गलद्बाष्पमौत्कण्ठ्याद्देवकीसुते ॥ निर्यात्यगारान्नो ऽभद्रमिति स्याद्बान्धवस्त्रियः ॥ १४ ॥ मृदङ्गशङ्खभेर्यश्च वीणापणवगोमुखाः ॥
धुन्धुर्यानकघण्टाद्या नेदुर्दुन्दुभयस्तथा ॥१५॥ प्रासादशिखरारूढाः कुरुनार्यो दिदृक्षया ॥ ववृषुः कुसुमैः कृष्णे प्रेमव्रीडास्मितेक्षणाः ॥१६॥
सितातपत्रं जग्राह मुक्तादामविभूषितम् ॥ रत्नदण्डं गुडाकेशः प्रियः प्रियतमस्य ह ॥ १७ ॥ उद्धवः सात्यकिश्चैव व्यजने परमाद्भुते ॥
विकीर्यमाणः कुसुमै रेजे मधुपतिः पथि॥१८॥ अश्रूयन्ताशिषः सत्यास्तत्र तत्र द्विजेरिताः ॥ नानुरूपानुरूपाश्च निर्गुणस्य गुणात्मनः ॥१९॥

(पुष्पांनीं) **ववृषुः** (वृष्टि करित्या झाल्या). ॥ १६ ॥ **प्रियः *गुडाकेशः** (निद्रेला जिंकिणारा–अर्जुन) **रत्नदण्डं मुक्तादामविभूषितं** (मोत्यांच्या हारांनीं विभूषित अशा) **प्रियतमस्य सितातपत्रं** (शुभ्र छत्राला) **जग्राह ह. ॥१७॥ उद्धवः, सात्यकिः च परमाद्भुते व्यजने** (दोन चंवऱ्यांस) **[जगृहतुः]; पथि कुसुमैः विकीर्यमाणः मधुपतिः** (मधुकुलाचें पालन करणारा ह्म० श्रीकृष्ण) **रेजे** (शोभता झाला). ॥ १८ ॥ **तत्र तत्र** (जागोजागीं) **द्विजेरिताः** (ब्राह्मणांनीं उच्चारिलेल्या) **निर्गुणस्य गुणात्मनः नानुरूपाः** (न योग्य असे) **अनुरूपाः च सत्याः आशिषः** (आशीर्वाद)

दृष्टीनें त्याच्याकडे पाहूं लागल्या; त्यांनीं कृष्णावर पुष्पवृष्टि केली. ॥ १६ ॥ पांडवांमध्यें श्रीकृष्णाचा विशेष प्रिय मित्र अर्जुन असे. त्यानें आपल्या परम मित्रावर (कृष्णावर) शुभ्र छत्र धरलें. छत्राला रत्नाची दांडी असून सभोवतीं मोत्यांचे सर लाविले होते. ॥१७॥ उद्धव आणि सात्यकी ह्या दोघांनीं श्रीकृष्णावर अतिसुंदर चंवऱ्या धरल्या होत्या. मार्गा-मध्यें कृष्णावर लोक पुष्पवृष्टि करीत, त्यामुळें ती कृष्णमूर्ति फारच शोभत होती. ॥१८॥ ब्राह्मण श्रीकृष्णाला कधीं निष्फल न होणारे आशीर्वाद देत, ते (आशीर्वचनशब्द)

१ अर्जुनाला ' गुडाकेश ' असें ह्मणत असत; कारण, गुडाका ह्मणजे झोंप त्याच्या स्वाधीन असे.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

जागोजागीं ऐकूं येत होते. - वस्तुतः कृष्णाच्या स्वरूपाचा विचार केला असतां - तो निर्गुण असल्यामुळें त्याला आशीर्वाद देण्याचें कारण नव्हतें, - पण त्याच्या मनुष्य अवतारा-
कडे लक्ष पुरवलें ह्मणजे - आशीर्वाद देणेंही योग्यच होतें. ॥ १९ ॥ श्रीकृष्णाची कीर्ति उत्तम असल्यामुळें कौरवस्त्रियांचीं अंतःकरणें त्याच्या ठिकाणीं बद्ध असत. - तो जाव-
यास निघाला, त्या वेळेस - त्यांचें परस्परांमध्यें भाषण चालू झालें, तें ऐकण्यास मधुर असल्यामुळें - पुढें दिलें आहे : - ॥ २० ॥ "सख्यांनो, श्रीकृष्णाचें स्वरूप अतिसुंदर आहे,
ह्याबद्दल आश्चर्य करणें नलगे : कारण, - कृष्ण प्रसिद्ध पुराण[1] पुरुष होय. तो ह्या त्रिगुणात्मक सृष्टीच्या पूर्वी, तसेंच प्रलयकालीं सर्व जीव परमेश्वरस्वरूपाचे ठिकाणीं लीन

अश्रूयन्त (ऐकूं येत होते). ॥ १९ ॥ **उत्तमश्लोकचेतसां कौरवेन्द्रपुरस्त्रीणां सर्वश्रुतिमनोहरः अन्योन्यं संजल्पः** (संभाषण) **आसीत्**. ॥ २० ॥ **यः एकः** (अद्वितीय) **गुणेभ्यः अग्रे** (तीन गुणांत क्षोभ होण्यापूर्वी) **निशि** (प्रलयाचे वेळीं) **जगदात्मनि ईश्वरे निमीलितात्मन्** (सर्व जीव ज्याच्या ठिकाणीं लीन झाले असा) **[सति] सुप्तशक्तिषु अविशेषे** (निष्प्रपंच अशा) **आत्मनि आसीत्, सः वै अयं पुरातनः पुरुषः किल.** ॥ २१ ॥ **शास्त्रकृत् अनामरूपात्मनि** (नाम व रूप यांनीं रहित अशा जीवाचे ठिकाणीं) **रूपनामनी विधि-**

अन्योन्यमासीत्सञ्जल्प उत्तमश्लोकचेतसाम् ॥ कौरवेन्द्रपुरस्त्रीणां सर्वश्रुतिमनोहरः ॥ २० ॥ स वै किलायं पुरुषः पुरातनो य एक आसीदविशेष आत्मनि ॥ अग्रे गुणेभ्यो जगदात्मनीश्वरे निमीलितात्मन्निशि सुप्तशक्तिषु ॥२१॥ स एव भूयो निजवीर्यचोदिताम् । स्वजीवमायां प्रकृतिं सिसृक्षतीम् ॥ अनामरूपात्मनि रूपनामनी । विधित्समानोऽनुससार शास्त्रकृत् ॥ २२ ॥ स वा अयं यत्पदमत्र सूरयो जितेन्द्रिया निर्जितमातरिश्वनः॥ पश्यन्ति भक्त्युत्कलितामलात्मना नन्वेष सत्त्वं परिमार्ष्टुमर्हति ॥ २३ ॥

त्समानः (करण्यास इच्छिणारा) **सः एव भूयः निजवीर्यचोदितां** (आपल्या - काल - शक्तीनें प्रेरित अशा) **स्वजीवमायां** (आपल्या अंशभूत जीवांस मोहित करणाऱ्या) **सिसृक्षतीं** (उत्पन्न कर-
ण्यास इच्छिणाऱ्या) **प्रकृतिं अनुससार.** ॥ २२ ॥ **जितेन्द्रियाः निर्जितमातरिश्वनः** (आकलन केलें आहे प्राणवायूचें ज्यांनीं असे—प्राणायाम करणारे) **सूरयः** (विद्वान् लोक) **यत्पदं भक्त्युत्क-**
झाले असतां व सर्व शक्ति स्वस्थ निद्रित झाल्या असतां, निष्प्रपंच निजस्वरूपाचे ठिकाणींच स्थिर होता. ॥ २१ ॥ कर्ममार्गप्रसाराकरितां वेदही त्याच परमेश्वरानें केले. - हा
सृष्टिक्रम तर अनादि चाललाच आहे; एका सृष्टीचा लय झाल्यावर व विश्रांतिही घेतल्यावर - पुन्हां त्या ईश्वराच्या मनांत ' जीवाच्या ठिकाणीं रूपें आणि नामें स्थापन करावीं, '
अशी इच्छा उत्पन्न होते व तो आपल्या वीर्यानें पूर्ण अशा मायारूप शक्तीला अनुसरतो. कारण, ती प्रकृतीच जीवांना मोहित करून सृष्टि चालविते. ॥ २२॥ सख्यांनो, मोठमोठे
विद्वान् लोक आपल्या इन्द्रियांचा निग्रह करून व प्राणायाम करून, भक्तीनें उत्कंठित झालेल्या निर्मळ अन्तःकरणानें ज्याचें अवलोकन करितात, तो ईश्वर व बुद्धीची शुद्धि

---

१ पुराण ह्मणजे जुना सर्वांच्या पूर्वी असणारा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

करण्यास खरा योग्य हाच होय. ॥ २३ ॥ गडे, वेदांमध्यें, आणि रहस्यज्ञानी पुरुषांनीं गुह्य आगमांमध्यें, ज्याच्या उत्तम कथा गायन केल्या आहेत, व जो परमेश्वर स्वतांच्या केवल लीलेनें सर्व जगाची उत्पति, पालन व लय करितो, पण त्या क्रिया स्वतः मी करितों असा अभिमान बाळगीत नाहीं, तोच हा होय. ॥ २४ ॥ ज्या वेळीं, राजांच्या

लितामलात्मना (भक्तांनें उत्कंठित झालेल्या निर्मळ अन्तःकरणानें) अत्र पश्यन्ति, सः अयं [अस्ति] वै. ननु एषः सत्त्वं (बुद्धीला) परिमार्ष्टुं (शुद्ध करण्यास)अर्हति. ॥ २३ ॥ हे सखि, वेदेषु गुह्येषु (गुह्य आगमांमध्यें) च गुह्यवादिभिः (रहस्य निरूपण करणाऱ्यांनीं) अनुगीतसत्कथः यः एकः ईशः आत्मलीलया जगत् सृजति, अवति (पालन करितो), अत्ति (लय करितो), तत्र

स वा अयं सख्यनुगीतसत्कथो वेदेषु गुह्येषु च गुह्यवादिभिः ॥ य एक ईशो जगदात्म-
लीलया सृजत्यवत्यत्ति न तत्र सज्जते ॥ २४ ॥ यदा ह्यधर्मेण तमोधियो नृपा जीवन्ति तत्रैष
हि सत्त्वतः किल ॥ धत्ते भगं सत्यमृतं दयां यशो भवाय रूपाणि दधद्युगे युगे ॥ २५ ॥

न सज्जते च, सः अयं वै. ॥ २४ ॥ यदा तमोधियः (अज्ञानानें व्याप्त अन्तःकरण आहे ज्यांचें असे) नृपाः अधर्मेण जीवन्ति, तत्र युगे युगे भवाय (संरक्षणाकरितां) रूपाणि दधत् एषः सत्त्वतः (विशुद्ध - सत्त्वानें) भगं (ऐश्वर्याला), सत्यं (सत्यप्रतिज्ञत्वाला), ऋतं (यथार्थ उपदेशकत्वाला), दयां, यशः च धत्ते. ॥ २५ ॥

बुद्धि अज्ञानानें गुंग होतात, व ते अधर्मानें स्वतांचें मात्र जीवन (पालन) करण्याकडे लक्ष देतात, प्रजेच्या रक्षणाकडे लक्ष पुरवीत नाहींत, तेव्हां हा परमेश्वर वेळोवेळीं आपलें ऐश्वर्य, प्रतिज्ञा[1] खरी करण्याचा निश्चय, यथार्थ उपदेश[2], भक्तांवर दया[3], अद्भुत लीला प्रकट करतो. अशीं स्वरूपें तो प्रत्येक युगाचे ठिकाणीं धारण करतो. ॥ २५ ॥

---

१ " यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत ॥ अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम् ॥
परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम् ॥ धर्मसंस्थापनार्थाय सम्भवामि युगे युगे ॥ " भगवद्गीता अ०४ श्लो० ७।८

" अर्जुना, जेव्हां जेव्हां धर्माचा ऱ्हास होत जातो व अधर्माचें प्राबल्य होतें, तेव्हां मी अवतार धारण करतों ॥ साधूंचें संरक्षण करणें, दुष्टांचा नाश करणें व धर्ममार्ग सुरळीत चालविणें—ह्या तीन कामांकरितां मी युगायुगांत अवतार घेत असतों. " ह्या व इतर अनेक ठिकाणीं केलेल्या प्रतिज्ञा.

२ गीता इत्यादिस्थळीं निरनिराळ्या भक्तांस केलेले उपदेश.

३ " अनन्याश्चिन्तयन्तो मां ये जनाः पर्युपासते ॥ तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम् ॥ " गीता अ०९श्लो०२२.

" जे लोक माझें ध्यान करून अनन्य भावानें माझीच उपासना करितात, त्यांचें योगक्षेम मी चालवितों, व मला तसें करणें भाग पडतें. कारण, त्यांची माझ्याठिकाणींच एक नित्य निष्ठा असते. "

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अहो ! यदुकुलाची जेवढी स्तुति करावी तेवढी थोडीच; तें सर्व स्तुतीस पूर्ण पात्र आहे; कारण, हा लक्ष्मीपति श्रीपुरुषोत्तम त्या कुलांत जन्म घेऊन त्याला शोभवीत आहे ! तसेंच, अहो! ती मथुरानगरीही फारच धन्य होय; कारण, तीमध्यें हा ईश्वर नेहमीं संचार करून तिला पवित्र करितो !! ॥ २६ ॥ अहो ! द्वारका नगरी पृथ्वीचें यश निर्मल करणारी व स्वर्गाच्या कीर्तीचादेखील पराभव करणारी आहे; कारण त्या नगरींतील सर्व प्रजा आपल्या पालकाचें (कृष्णाचें) नित्य दर्शन घेतात. तो ईश्वर नेहमीं त्यांच्यावर अनुग्रह करावा, एवढ्याकरितांच द्वारकेंत राहिला आहे; त्याचें मुख नेहमीं हास्यभरित असतें. ॥ २७ ॥ सखे, ह्याच्या पत्न्यांनीं व्रतें, स्नानें, होम इत्यादिकेंकरून देव चांगला

अहो, यदोः कुलं अलं (अतिशय) **श्लाघ्यतमं** (फारच स्तुत्य), **यत् एषः पुंसां ऋषभः** (श्रेष्ठ) **श्रियः** (लक्ष्मीचा) **प्रियः स्वजन्मना [तत्] अंचति** (सत्कार करितो—शोभवितो) ! **अहो, मधोः वनं** (मथुरा) **अलं पुण्यतमं, [यत् अयं] चंक्रमणेन** (संचारानें) **अंचति !! ॥ २६ ॥ अहो, बत कुशस्थली** (द्वारका) **भुवः** (पृथ्वीचें) **पुण्ययशस्करी** (यश निर्मल करणारी), **स्वर्यशसः** (स्वर्गाच्या कीर्तीला) **तिरस्करी [च अस्ति], यत् यत्प्रजाः नित्यं अनुग्रहेषितं** (अनुग्रह-करण्यास-इच्छिण्याच्या) **स्मितावलोकं** (हास्ययुक्त दृष्टि ज्याची अशा) **स्वपतिं**

अहो अलं श्लाघ्यतमं यदोः कुलमहो अलं पुण्यतमं मधोर्वनम् ॥ यदेष पुंसामृषभः श्रियः प्रियः स्वजन्मना चङ्क्रमणेन चाञ्चति ॥ २६ ॥ अहो बत स्वर्यशसस्तिरस्करी कुशस्थली पुण्ययशस्करी भुवः ॥ पश्यन्ति नित्यं यदनुग्रहेषितं स्मितावलोकं स्वपतिं स्म यत्प्रजाः॥२७॥नूनं व्रतस्नानहुतादिनेश्वरः समर्चितो ह्यस्य गृहीतपाणिभिः ॥ पिबन्ति याः सख्यधरामृतं मुहुर्व्रजस्त्रियः संमुमुहुर्यदाशयाः ॥ २८ ॥ या वीर्यशुल्केन हृताः स्वयंवरे प्रमथ्य चैद्यप्रमुखान् हि शुष्मिणः ॥ प्रद्युम्नसाम्बाम्बसुतादयो ऽपरा याश्चाहृता भौमवधे सहस्रशः ॥ २९ ॥

पश्यंति ! ॥ २७ ॥ नूनं, [हे सखि], अस्य गृहीतपाणिभिः (पाणिग्रहण केलें आहे ज्यांचें अशांनीं-पत्न्यांनीं) **व्रतस्नानहुतादिना** (व्रतें, स्नानें, होम इत्यादिकेंकरून) **ईश्वरः समर्चितः; हि यदाशयाः** (ज्याच्या-अधरामृताचे-ठिकाणीं चित्त आहे ज्यांचें, अशा) **व्रजस्त्रियः संमुमुहुः** (मोह पावल्या); **[तत्] अधरामृतं याः मुहुः पिबंति. ॥ २८ ॥ याः चैद्यप्रमुखान्** (चैद्यप्रभृतींस) **शुष्मिणः** (बलिष्ठांना) **प्रमथ्य** (जिंकून) **वीर्यशुल्केन** (वीर्यरूपी द्रव्यानें) **स्वयंवरे हृताः** (हरण करून आणिलेल्या) **प्रद्युम्नसाम्बाम्बसुतादयः** (प्रद्युम्न, सांब, अंब इत्यादि पुत्र झाले ज्यांस पुजला होता; कारण, जें कृष्णाचें अधरामृत प्राशन करावें, ही गोष्ट अंतःकरणांत घोळत असल्यामुळें गोपींना मोह होत असे - व कामें सुचत नसत, - तें अधरामृत ह्यांना वारंवार प्राशन करण्यास मिळतें. ॥ २८ ॥ ज्यांना पुढें प्रद्युम्न, सांब, अंब इत्यादि पुत्र झाले, त्या रुक्मिणी, जांबवती, नाग्नजिती प्रभृति स्त्रिया, कृष्णानें चैद्यादिक बलिष्ठ शत्रूंस जिंकून स्वयंवरांत वीर्यरूपी द्रव्याचे योगानें खरेदी (हरण) करून आणल्या तशाच आणखी हजारों स्त्रिया भौमासुराचा वध करून कृष्णानें

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आणिल्या. त्या सर्व धन्य होत. ॥ २९ ॥ स्त्रियांचें जन्म अपवित्र, व स्वातंत्र्य नसल्यामुळें वाईट खरें; परंतु कृष्णाच्या स्त्रियांची गोष्ट तशी नाहीं; ह्या, स्त्रियांच्या जन्माला खरोखर शोभवितात; कारण, ह्यांच्या घरीं साक्षात् कमललोचन श्रीकृष्ण, कामना परिपूर्ण करून, ह्यांच्या मनाला आनंदवीत असतो व ह्यांना सोडून कोठें जात देखील नाहीं." ॥ ३० ॥ पूर्वी सांगितल्याप्रमाणें हस्तिनापुरांतील स्त्रियांचा संवाद चालला असतां, श्रीकृष्णपरमात्म्यानें त्यांच्याकडे आनंदित मुद्रेनें अवलोकन केलें, व त्यांचें अभिनंदन करीत स्वारी पुढें

अशा) **अपराः याश्च भौमवधे सहस्रशः आहृताः,** ॥ २९ ॥ **एताः अपास्तपेशलं** (गेलें आहे स्वातंत्र्य ज्यापासून अशा) **निरस्तशौचं** (नाहींसें झालें आहे शुचित्व ज्यापासून अशा) **स्त्रीत्वं परं साधु कुर्वते बत, [यतः] आहृतिभिः** (विहारांनीं) **हृदि स्पृशन् पुष्करलोचनः पतिः यासां गृहात् जातु** (कधींही) **न अपैति** (सोडून जात नाहीं). ॥ ३० ॥ **सः हरिः गदंतीनां** (संवाद करणाऱ्या) **पुरयोषितां** (नगरांतील स्त्रियांच्या) **एवंविधाः गिरः** (भाषणांला) **सस्मितेन निरीक्षणेन अभिनंदन्** (सत्कार करणारा) **[सन्] ययौ.** ॥ ३१ ॥ **परेभ्यः** (शत्रूंपासून) **शंकितः अजातशत्रुः स्नेहात् मधुद्विषः** (कृष्णाच्या) **गोपीथाय** (रक्षणाकरितां) **चतुरंगिणीं पृतनां** (सेनेला) **प्रायुंक्त** (योजिता झाला — बरोबर देता झाला). ॥३२॥

एताः परं स्त्रीत्वमपास्तपेशलं निरस्तशौचं बत साधु कुर्वते ॥ यासां गृहात्पुष्करलोचनः पतिर्न जात्वपैत्याहृतिभिर्हृदि स्पृशन् ॥ ३० ॥ एवंविधा गदन्तीनां स गिरः पुरयोषिताम् ॥ निरीक्षणेनाभिनन्दन्सस्मितेन ययौ हरिः ॥ ३१ ॥ अजातशत्रुः पृतनां गोपीथाय मधुद्विषः ॥ परेभ्यः शंकितः स्नेहात्प्रायुंक्त चतुरंगिणीम् ॥ ३२ ॥ अथ दूरागतान्शौरिः कौरवान् विरहातुरान् ॥ सन्निवर्त्य दृढं स्निग्धान्प्रायात्स्वनगरीं प्रियैः ॥ ३३ ॥ कुरुजाङ्गलपाञ्चालाञ्शूरसेनान्सयामुनान् ॥ ब्रह्मावर्तं कुरुक्षेत्रं मत्स्यान्सारस्वतानथ ॥ ३४ ॥ मरुधन्वमतिक्रम्य सौवीराभीरयोः परान् ॥ आनर्तान्भार्गवोपागाच्छ्रान्तवाहो मनाग्विभुः ॥ ३५ ॥

अथ शौरिः (श्रीकृष्ण) **दूरागतान्** (लांबपर्यंत - पोंचवावयास - आलेल्या) **विरहातुरान् दृढं स्निग्धान् कौरवान्** (कुरु वंशांत उत्पन्न झालेल्यांस—पांडवांस) **सन्निवर्त्य** (परतवून) **प्रियैः [सह] स्वनगरीं प्रायात्.** ॥ ३३ ॥ **हे भार्गव, विभुः कुरुजांगलपांचालान् सयामुनान् शूरसेनान् ब्रह्मावर्तं कुरुक्षेत्रं मत्स्यान् अथ सारस्वतान् मरुधन्वं सौवीराभीरयोः परान् च अतिक्रम्य मनाक् श्रांतवाहः** (थोडेच थकले आहेत घोडे ज्याचे असा) **आनर्तान्** (द्वारकादेशांस) **उपागात्** (जवळ आला). ॥ ३४ ॥ ३५ ॥

चालली. ॥ ३१ ॥ धर्मराजाच्या मनांत, कृष्णाला शत्रु त्रास देतील, अशी भीति उत्पन्न झाली; करितां त्यानें स्नेहास्तव त्याच्या रक्षणासाठीं चतुरंग[1] सेना बरोबर दिली. ॥ ३२ ॥ पांडव श्रीकृष्णाला पोंचवावयास बरेच लांबपर्यंत आले होते; कारण, त्यांची कृष्णावर दृढ प्रीति होती; व त्याचा विरह होणार, यामुळें ते फार व्याकुळ झाले होते. पुढें श्रीकृष्णांनीं त्यांना परतविलें व उद्धवादि आपल्या मित्रांसह द्वारकेस गमन केलें. ॥३३॥ श्रीकृष्ण कुरु, जांगल, पांचाल, शूरसेन, यामुन, ब्रह्मावर्त, कुरुक्षेत्र, मत्स्य, सारस्वत, मरु,

१ हत्ती, घोडे, रथ, पायदळ हीं चार सैन्याचीं अंगें होत.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

धन्व, सौवीर, आभीर इत्यादि सर्व देश उल्लंघून द्वारकेजवळ गेले तरी त्यांचे घोडे फारसे थकले नाहींत. ॥ ३४ ॥ ३५ ॥ ज्या ज्या ठिकाणीं श्रीकृष्ण गेले, त्या त्या ठिकाणीं, लोकांनीं आदरातिथ्य पूर्वक त्यांची पूजा केली. नंतर संध्याकाळीं कृष्णांनीं पश्चिम दिशेची वाट धरिली व लागलाच सूर्यही अस्तास गेला. ॥३६॥ **इति दशमो ऽध्यायः ॥१०॥**

सूत ह्मणतातः— पुढें श्रीकृष्ण आपल्या आनर्त नांवाच्या देशांत आले. ते देश धनधान्यांनीं समृद्ध होते. - तेथें आल्याबरोबर, आपल्या देशांतील लोकांस आपण आलों असें कळावें - व आपल्या विरहामुळें झालेला त्यांचा खेद दूर व्हावा, ह्मणून श्रीकृष्णांनीं आपला पांचजन्यनामक शंख वाजविला. ॥ १ ॥ श्रीकृष्णाच्या त्या पांचजन्यनामक

तत्र तत्र तत्रत्यैः (त्या त्या ठिकाणच्या लोकांनीं) **प्रत्युद्यतार्हणः** (अर्पिली आहे पूजा ज्यास असा) **हरिः सायं पश्चात् दिशं** (पश्चिम दिशेस) **भेजे** (प्राप्त झाला ह्मणजे गेला), **तदा गविष्ठः** (आकाशांत असणारा ह्मणजे सूर्य) **गां** (उदकाला) **गतः ह ! ॥ ३६ ॥** **॥ इति श्रीभागवतान्वये प्रथमस्कन्धे दशमो ऽध्यायः ॥ १० ॥**

सूतः उवाच— सः स्वृद्धान् (समृद्ध) **स्वकान् जनपदान्** (देशांस) **आनर्तान् उपव्रज्य** (येऊन) **तेषां विषादं शमयन् इव दरवरं** (पांचजन्य नामक उत्तम शंखास) **दध्मौ** (वाजविता

तत्र तत्र ह तत्रत्यैर्हरिः प्रत्युद्यतार्हणः ॥ सायं भेजे दिशं पश्चाद्गविष्ठो गां गतस्तदा ॥ ३६ ॥ इति श्रीभा० म०प्र० दशमो ऽध्यायः ॥ १० ॥ सूत उवाच । आनर्तान्स उपव्रज्य स्वृद्धान्जनपदान्स्वकान् ॥ दध्मौ दरवरं तेषां विषादं शमयन्निव ॥ १ ॥ स उच्चकाशे धवलोदरो दरो ऽप्युरुक्रमस्याधरशोणशोणिमा ॥ दाध्मायमानः करकञ्जसम्पुटे यथा ऽब्जषण्डे कलहंस उत्स्वनः ॥ २ ॥ तमुपश्रुत्य निनदं जगद्भयभयावहम् ॥ प्रत्युद्ययुः प्रजाः सर्वा भर्तृदर्शनलालसाः ॥ ३ ॥

झाला). ॥ १ ॥ **यथा अब्जषण्डे** (तांबड्या कमलांच्या समुदायांत) **उत्स्वनः** (मोठा शब्द करणारा) **कलहंसः** (राजहंस), [**तथा**] **धवलोदरः** (पांढरें उदर आहे ज्याचें असा) **उरुक्रमस्य अधर-शोणशोणिमा** (आरक्त अधरोष्ठानें तांबूस दिसणारा) **सः दाध्मायमानः** (वाजविला जात असणारा) **दरः अपि करकञ्जसम्पुटे** (हस्तकमलांमध्यें) [**वर्तमानः**] **उच्चकाशे** (शोभत होता). ॥ २ ॥ **भर्तृदर्शनलालसाः** (प्रभूच्या दर्शनासाठीं उत्सुक अशा) **सर्वाः प्रजाः तं जगद्भयभयावहं** (जगाच्या भयाला भय दाखविणाऱ्या) **निनदं** (शब्दाला) **उपश्रुत्य प्रत्युद्ययुः** (सामोरे गेले). ॥ ३ ॥

शंखाला त्यावेळेस कलहंसाची उपमा बरोबर शोभत होती. - कलहंसाचा वर्ण बहुतेक पांढरा व थोडासा तांबडा असतो, - तसा शंख मूळचा पांढरा असून त्यावर कृष्णाच्या आरक्त अधरोष्ठाच्या छायेनें थोडा तांबूस वर्ण आला होता. हंस जसा शब्द करीत कमलसमुदायांत फिरतांना शोभतो त्याप्रमाणें शंखही भँभँम् वाजत असतां कृष्णाच्या हस्तक-मलांमध्यें शोभत होता. ॥ २ ॥ द्वारकेतील सर्व लोक आपल्या प्रभूची (कृष्णाची) भेट घेण्याविषयीं उत्सुक झाले होते. जगाच्या भयाला भीति दाखविणारा (जगाचें भय

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

दूर करणारा) तो पांचजन्य शंखाचा शब्द कानीं पडल्याबरोबर, श्रीकृष्णाची स्वारी आली असें जाणून, ते सर्व श्रीकृष्णाला सामोरे आले. ॥ ३ ॥ कृष्णाविषयीं प्रत्येकाचे मनांत पूज्य भाव होता. सर्व प्रजांनीं कृष्णाची आराधना करण्याकरितां पूजासामग्री आणिली होती. - श्रीकृष्णाला त्या पूज्यासाहित्याची अपेक्षा नव्हती; कारण - तो स्वस्वरूपाचे ठिकाणींच रममाण होता, व त्याच्या सर्व इच्छा तृप्त होत्या. परंतु, जसें तेजोराशि सूर्याची पूजा करितेवेळीं त्याला भक्तिपूर्वक दिवा ओंवाळतात, त्याप्रमाणें प्रजांनीं कृष्णाची पूजा करण्याकरितां साहित्य आणिलें होतें. सर्व मंडळीचीं मुखकमळें हर्षानें प्रफुल्लित झालीं होतीं. लहान मुलें जशीं आपला पिता बाहेरून आला असतां हर्षानें

आहृताः रवेः दीपं इव, तत्र उपनीतबलयः (आणिली आहे पूजासामग्री ज्यांनीं असे) प्रीत्युत्फुल्लमुखाः (प्रीतीनें प्रफुल्लित आहेत मुखें ज्यांचीं असे) नित्यदा निजलाभेन पूर्णकामं आत्मारामं, अर्भकाः (लहान मुलें) पितरं इव, सर्वसुहृदं अवितारं (रक्षण करणाऱ्यास) हर्षगद्गगया गिरा (वाणीनें) प्रोचुः- ॥ ४ ॥ ५ ॥ ' हे नाथ, इह क्षेमं इच्छतां परं परायणं विरिञ्चवैरिञ्च्यसुरेन्द्रवन्दितं (ब्रह्मदेव, सनत्कुमार व देवेंद्र यांनीं वंदिलेल्या) ते अंघ्रिपंकजं (चरणकमलाला) सदा नताः (नम्र) स्म; यत्र परप्रभुः (ब्रह्मादि - इतर देवांचा नियंता)

तत्रोपनीतबलयो रवेर्दीपमिवाहृताः ॥ आत्मारामं पूर्णकामं निजलाभेन नित्यदा ॥ ४ ॥ प्रीत्युत्फुल्लमुखाः प्रोचुर्हर्षगद्गदया गिरा ॥
पितरं सर्वसुहृदमवितारमिवार्भकाः ॥ ५ ॥ नताः स्म ते नाथ सदाङ्घ्रिपङ्कजं विरिञ्चवैरिञ्च्यसुरेन्द्रवन्दितम् ॥ परायणं
क्षेममिहेच्छतां परं न यत्र कालः प्रभवेत्परप्रभुः ॥ ६ ॥ भवाय नस्त्वं भव विश्वभावन त्वमेव माता ऽथ सुहृत्पतिः पिता ॥
त्वं सद्गुरुर्नः परमं च दैवतं यस्यानुवृत्त्या कृतिनो बभूविम ॥ ७ ॥

कालः न प्रभवेत्. ॥ ६ ॥ हे विश्वभावन (हे जगाची उत्पत्ति करणाऱ्या), त्वं नः भवाय (उत्कर्षाला) भव, त्वमेव माता, पिता, अथ सुहृत्, पतिः [असि], त्वं नः सद्गुरुः, नः परमं दैवतं च [असि], यस्य अनुवृत्त्या (सेवेनें) कृतिनः (कृत्यकृत्य) बभूविम. ॥ ७ ॥

त्याच्यापाशीं भाषण करितात, त्याप्रमाणें द्वारकेंतील प्रजा, सर्वांचा मित्र व रक्षक जो श्रीकृष्ण परमात्मा, त्याचेपाशीं सद्गदित वाणीनें बोलूं लागल्या :- ॥ ४ ॥ ५ ॥ "देवा, ज्या लोकांना आपलें कल्याण व्हावें अशी इच्छा असते, त्यांना तुझें चरणकमल हाच उत्तम आश्रय होय. त्याला ब्रह्मदेव, सनत्कुमार व देवेंद्र नमस्कार करितात. आम्हींही त्यापाशीं निरंतर लीन आहों. कालाचा प्रभाव ब्रह्मदेवादिक मोठ्या देवांपेक्षांदेखील अधिक आहे; पण त्याची शक्ति, देवा, तुजवर मुळींच चालत नाहीं. ॥ ६ ॥ देवा, तूंच सर्व जगाची उत्पत्ति करितोस. आमचे माता पिता तूंच होस, तसेंच आमचा सखा, मित्र, पालक, उपदेशकर्ता गुरु आणि परम देवता तूंच होस. तुझी सेवा केल्यानें आम्हीं कृत-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

कृत्य होऊन जाऊं. देवा, तूं आमचा उत्कर्ष (कल्याण) कर.॥७॥ देवा, तुझ्या स्वरूपाचें दर्शन स्वर्गस्थ देवांनादेखील दुर्लभ, पण तें आह्मांला सुलभ आहे. इतकेंच नाहीं. तर जेव्हां जेव्हां आह्मांला तुझें दर्शन होतें तेव्हां तुझ्या मुखावर सर्व ऐश्वर्य, प्रेम, हास्य, आणि स्नेह येतात, ह्यामुळें व तूं आमचा स्वामी असल्यामुळें आह्मी धन्य आहों. ॥ ८ ॥ हे कमलनयना परमेश्वरा, तुह्मी आपल्या मित्रांना भेटण्याकरितां कुरुदेशांत किंवा मथुरेस गेलां, तेव्हांपासून, हे अच्युता, जसा सूर्यदर्शनावांचून नेत्रांस आनंद वाटत नाहीं तर तो (सूर्यदर्शनरहित) वेळ फार जड जातो, तसा आह्मांला एक एक क्षण तुमच्या दर्शनावांचून कोटि वर्षांप्रमाणें वाटत असे. " ॥ ९ ॥ त्या भक्तवत्सल परमात्म्यानें, पूर्वी सांगितलेली

अहो, वयं भवता सनाथाः स्म, यत् त्रैविष्टपानां (देवांना) **अपि दूरदर्शनं** (दुर्लभ आहे दर्शन ज्याचें अशा) **प्रेमस्मितस्निग्धनिरीक्षणाननं** (प्रेमपूर्वक हास्य व स्नेहभाव यांनीं युक्त पाहणें आहे मुखावर ज्याच्या अशा) **सर्वसौभगं** (सर्व ऐश्वर्ययुक्त अशा) **तव रूपं पश्येम! ॥ ८ ॥ यर्हि, भो अम्बुजाक्ष, भवान् सुहृद्दिदृक्षया** (मित्रांस भेटण्याच्या इच्छेनें) **कुरून्, मधून्** (मथुरेस) **वा अपससार** (गेला), **तत्र हे अच्युत, रविं विना अक्ष्णोः इव, तव नः क्षणः अब्दकोटिप्रतिमः** (कोटि वर्षांसारिखा) **भवेत्.' ॥ ९ ॥ भक्तवत्सलः [सः] प्रजानां इति उदीरिताः**

अहो सनाथा भवता स्म यद्वयं त्रैविष्टपानामपि दूरदर्शनम् ॥ प्रेमस्मितस्निग्धनिरीक्षणाननं पश्येम रूपं तव सर्वसौभगम् ॥ ८ ॥
यर्ह्यम्बुजाक्षापससार भो भवान्कुरून्मधून्वाथ सुहृद्दिदृक्षया ॥ तत्राब्दकोटिप्रतिमः क्षणो भवेद्रविं विना ऽक्ष्णोरिव नस्तवाच्युत ॥ ९ ॥
इति चोदीरिता वाचः प्रजानां भक्तवत्सलः ॥ शृण्वानो ऽनुग्रहं दृष्ट्या वितन्वन्प्राविशत् पुरीम् ॥१०॥ मधुभोजदशार्हार्हकुकुरान्धकवृष्णिभिः ॥
आत्मतुल्यबलैर्गुप्तां नागैर्भोगवतीमिव ॥ ११ ॥ सर्वर्तुसर्वविभवपुण्यवृक्षलताश्रमैः ॥ उद्यानोपवनारामैर्वृतपद्माकरश्रियम् ॥ १२ ॥

(बोलिलेल्या) **वाचः शृण्वानः दृष्ट्या अनुग्रहं वितन्वन्** (करणारा) **पुरीं प्राविशत् . ॥१०॥ आत्मतुल्यबलैः मधुभोजदशार्हार्हकुकुरांधकवृष्णिभिः** (मधु, भोज, दशार्ह, अर्ह, कुकुर, अंधक आणि वृष्णि ह्या कुलांतील पुरुषांनीं) **भोगवतीं नागैः इव गुप्तां, ॥ ११ ॥ सर्वर्तुसर्वविभवपुण्यवृक्षलताश्रमैः** (सर्व ऋतूंमध्यें पुष्पादि सर्वसंपदा आहेत ज्यांस असे उत्तम वृक्ष व लतामण्डप यांहीं करून) **उद्यानोपवनारामैः** (फळबागा, फुलबागा व क्रीडाभुवनें यांहीं) **वृतपद्माकरश्रियम्** (वेष्टिलेल्या तळ्यांनीं शोभा आली आहे जिला अशा). ॥ १२ ॥

प्रजांचीं भाषणें श्रवण करीत व अनुग्रह दृष्टीनें त्यांच्याकडे पाहून द्वारकेंत प्रवेश केला. ॥ १० ॥ - त्या द्वारकेचें वर्णन पांच श्लोकांत केलें आहे :- जसें सर्व सर्प मिळून आपल्या भोगवती नगरीचें रक्षण करितात, तसें श्रीकृष्णासारखेच पराक्रमशाली मधु, भोज, दशार्ह, अर्ह, कुकुर, अंधक आणि वृष्णि ह्या कुलांतील पुरुष द्वारका नगरीचें रक्षण करीत असत. ॥ ११ ॥ त्या द्वारकेमध्यें जागोजाग पुष्कळ तलाव होते. त्यांच्या भोंवतालीं [1]उद्यानें [2]उपवनें व [3]आराम होते. त्या मध्यें नानाजातीचे वृक्ष व वेली होत्या. त्यांस

---

१ फळांचे बाग. २. फुलांचे बाग. ३ क्रीडाभुवनें.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

सर्व ऋतुंमध्यें पुष्पें व फळें येत असत. ॥ १२ ॥ - कृष्णाची स्वारी यावयाची त्या वेळीं - नगरद्वारांवर, घरोघर, व रस्तोरस्तीं कौतुकानें तोरणें लाविलीं होतीं, व जागोजाग चित्रविचित्ररंगांचे ध्वज आणि पताका लाविल्या असल्यामुळें नगरांतील उष्मा (सूर्यकिरण) पुष्कळ कमी झाला होता. ॥ १३ ॥ द्वारकेंतील मोठे व लहान रस्ते, बाजार, व घरचीं अंगणीं सर्व झाडून स्वच्छ केलीं असून त्यांवर गंधमिश्रित जलाचा सडा घातला होता; आणि वर जागोजाग फळें, पुष्पें, अक्षता व अंकुर ठेविले होते. ॥ १४ ॥ प्रत्येक घराच्या दाराजवळ दहीं, अक्षता, फळें, ऊंस, पूर्णकुंभ, बलि, धूप, दीप, ठेविले होते; त्यामुळें द्वारकानगरीला फारच शोभा आली होती. ॥ १५ ॥ द्वारकेंतील मंडळी – महात्मा **गोपुरद्वारमार्गेषु** (नगरद्वारांवर, गृहद्वारांवर व रस्त्यांवर) **कृतकौतुकतोरणां** (कौतुकानें तोरणें लाविलीं आहेत जींत अशा) **चित्रध्वजपताकाग्रैः अंतःप्रतिहतातपां** (आंतील ऊन नाहींसें झालें आहे जींत अशा), ॥ १३ ॥ **संमार्जितमहामार्गरथ्यापणकचत्वरां** (राजमार्ग, लहान रस्ते, बाजारचे रस्ते व घरचीं अंगणीं स्वच्छ केलीं आहेत जींत अशा) **गंधजलैः सिक्तां** (सडा घातलेल्या) **फलपुष्पाक्षतांकुरैः उक्षां** [व्याप्त अशा), ॥ १४ ॥ **गृहाणां द्वारि द्वारि दध्यक्षतफलेक्षुभिः** (दहीं अक्षता फळें व ऊंस यांनीं) **पूर्णकुंभैः बलिभिः धूपदीपकैः अलंकृतां.** ॥ १५ ॥ **प्रेष्ठं**

गोपुरद्वारमार्गेषु कृतकौतुकतोरणाम् ॥ चित्रध्वजपताकाग्रैरन्तःप्रतिहतातपाम् ॥ १३ ॥ संमार्जितमहामार्गरथ्यापणकचत्वराम् ॥ सिक्तां गन्धजलैरुक्षां फलपुष्पक्षतांकुरैः ॥ १४ ॥ द्वारि द्वारि गृहाणां च दध्यक्षतफलेक्षुभिः ॥ अलंकृतां पूर्णकुम्भैर्बलिभिर्धूपदीपकैः ॥ १५ ॥ निशम्य प्रेष्ठमायान्तं वसुदेवो महामनाः ॥ अक्रूरश्चोग्रसेनश्च रामश्चाद्भुतविक्रमः ॥ १६ ॥ प्रद्युम्नश्चारुदेष्णश्च साम्बो जाम्बवतीसुतः ॥ प्रहर्षवेगोच्छ्वसितशयनासनभोजनाः ॥ १७ ॥ वारणेन्द्रं पुरस्कृत्य ब्राह्मणैः ससुमंगलैः ॥ शंखतूर्यनिनादेन ब्रह्मघोषेण चाहृताः ॥ १८ ॥ प्रत्युज्जग्मू रथैर्हृष्टाः प्रणयागतसाध्वसाः ॥ वारमुख्याश्च शतशो यानैस्तद्दर्शनोत्सुकाः ॥ लसत्कुण्डलनिर्भातकपोलवदनश्रियः ॥ १९ ॥

(अतिशय प्रिय जो त्यास) **आयांतं निशम्य, महामनाः वसुदेवः, अक्रूरः, उग्रसेनः, अद्भुतविक्रमः रामः, प्रद्युम्नः, चारुदेष्णः, जांबवतीसुतः, सांबः च प्रहर्षवेगोच्छ्वसितशयनासनभोजनाः** (मोठ्या हर्षाच्या भरांत सोडिलीं शयनें, आसनें, व भोजनें ज्यांनीं असे)**[बभूवुः].**॥१६॥१७॥ **आहृताः [ते] वारणेंद्रं** (मोठ्या हत्तीला) **पुरस्कृत्य** (पुढें चालवून) **ससुमंगलैः** (पुष्पादि-मंगलकारक पदार्थांनीं युक्त अशा) **ब्राह्मणैः [सह] शंखतूर्यनिनादेन ब्रह्मघोषेण रथैः च प्रत्युज्जग्मुः; तद्दर्शनोत्सुकाः प्रणयागतसाध्वसाः** (स्नेहामुळें त्वरा झाली आहे ज्यास अशा) वसुदेव, अक्रूर, उग्रसेन, महापराक्रमी बलराम, प्रद्युम्न, चारुदेष्ण, जांबवतीचा पुत्र सांब, ह्यांना कृष्ण आल्याची बातमी समजली. - त्यांची त्यावेळची स्थिति काय विचारावी ! - त्या हर्षाच्या भरांत त्यांनीं शयन, आसन, भोजन, इत्यादिकांचा त्याग केला व ते कृष्णास सामोरे जावयास निघाले. ॥ १६ ॥ १७ ॥ मंगलसूचनेकरितां एक मोठा हत्ती पुढें चालविला; बरोबर ब्राह्मण घेतले; त्या ब्राह्मणांनींही आपल्या हस्तांमध्यें पुष्पें दूर्वा इत्यादि मंगलकारक पदार्थ घेतले व मंत्रघोष चालविले; शंख, तूर्य, इत्यादिकांचा शब्द चालला होता. अशा रीतीनें वसुदेवादि मंडळी रथांत बसून सामोरी चालली. त्यांच्याबरोबर, नृत्य करणाऱ्या शेंकडों मोठमोठ्या वारांगनाही वाहनांत

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

बसून निघाल्या. त्याही कृष्णदर्शनाविषयीं फार उत्सुक व हर्षयुक्त झाल्या होत्या. कृष्णावर प्रेम असल्यामुळें सामोऱ्या जाण्याविषयीं त्यांना फार त्वरा झाली होती. त्या वेश्यांनीं कानांमध्यें सुशोभित कुंडलें घातलीं होतीं; त्यांची कांति गलांवर पडल्यामुळें मुखकमलावर फार शोभा आली होती. ॥१८॥१९॥ नट, नर्तक, गंधर्व, सूत, मागध, इत्यादि लोक पुण्यकीर्ति कृष्णाचीं अद्भुत चरित्रें गात होते. ॥ २० ॥ श्रीकृष्णांनींही आपल्या बंधूंच्या, नगरवासी प्रजेच्या व आपल्या सेवकांच्या भेटी घेऊन योग्यतेप्रमाणें सर्वांचा सत्कार केला. - ॥ २१ ॥ कित्येकांस साष्टांग नमस्कार घातला, कित्येकांना नुसता तोंडानें शब्दोच्चारानें नमस्कार केला, कित्येकांना आलिंगन दिलें, कित्येकांना हस्तस्पर्श केला,

दृष्टाः लसत्कुंडलनिर्भातकपोलवदनश्रियः (चकचकीत कुंडलांनीं प्रकाशित जे गाल त्यांनीं मुखावर शोभा आली आहे ज्यांच्या अशा) **शतशः वारमुख्याः** (मोठमोठ्या वारांगना) **च यानैः** (रथांनीं - रथांत - बसून) [**प्रत्युज्जग्मुः**]. ॥१८॥ १९ ॥ **नटनर्तकगन्धर्वाः सूतमागधवंदिनः अद्भुतानि उत्तमश्लोकचरितानि गायंति च.** ॥ २० ॥ **तत्र भगवान् बंधूनां पौराणां अनुवर्तिनां** (सेवकांच्या) **यथाविधि उपसंगम्य** (भेटी घेऊन) **सर्वेषां मानं आदधे** (केला). ॥ २१ ॥ **विभुः प्रह्वाभिवादनाश्लेषकरस्पर्शस्मितेक्षणैः** (शिरसावन्दन, तोंडानें वन्दन ह्मणजे नमस्कार शब्द,

नटनर्तकगन्धर्वाः सूतमागधबान्दिनः ॥ गायन्ति चोत्तमश्लोकचरितान्यद्भुतानि च ॥ २० ॥
भगवांस्तत्र बन्धूनां पौराणामनुवर्तिनाम् ॥ यथाविध्युपसंगम्य सर्वेषां मानमादधे ॥ २१ ॥
प्रह्वाभिवादनाश्लेषकरस्पर्शस्मितेक्षणैः ॥ आश्वास्य चाश्वपाकेभ्यो वरैश्चाभिमतैर्विभुः ॥ २२ ॥
स्वयं च गुरुभिर्विप्रैः सदारैः स्थविरैरपि ॥ आशीर्भिर्युज्यमानो ऽन्यैर्बन्दिभिश्चाविशत्पुरम् ॥२३॥
राजमार्गं गते कृष्णे द्वारकायाः कुलस्त्रियः ॥ हर्म्याण्यारुरुहुर्विप्र तदीक्षणमहोत्सवाः ॥ २४ ॥

आलिङ्गन, हस्तस्पर्श व हास्यपूर्वक अवलोकन, यांहींकरून) **अभिमतैः** (इष्ट वस्तूंनीं) **वरैः च आश्वपाकेभ्यः** (चांडालांपर्यंत) **आश्वास्य** (आश्वासन देऊन), ॥ २२ ॥ **स्वयं च सदारैः** (स्त्रियांसह अशा) **गुरुभिः विप्रैश्च स्थविरैः** (वृद्ध पुरुषांनीं) **च अपि अन्यैः बन्दिभिः** (स्तुतिपाठकांनीं) **च आशीर्भिः युज्यमानः पुरं अविशत्.** ॥ २३ ॥ **हे विप्र, कृष्णे राजमार्गं गते, तदीक्षणमहोत्सवाः** (त्याच्या अवलोकनानें मोठा उत्सव आहे ज्यांस अशा) **द्वारकायाः कुलस्त्रियः हर्म्याणि** (वाड्यांस ह्मणजे वाड्यांवर) **आरुरुहुः** (चढल्या). ॥ २४ ॥

कित्येकांकडे हास्यपूर्वक अवलोकन केलें, कोणाला वर दिले, कित्येकांना त्यांच्या इच्छित वस्तु दिल्या, एकंदरींत चांडालापर्यंतदेखील सर्वांना आश्वासन - दिलें. इतकें करण्याची त्याच्या ठिकाणीं योग्यता होती; कारण, - तो ईश्वर विभु (व्यापक) होय. ॥ २२ ॥ स्वतां श्रीकृष्णालाही त्यांच्या गुरूंनीं, ब्राह्मणांनीं व कुलांतील वृद्ध स्त्रीपुरुषांनीं आशीर्वाद दिले, इतर स्तुतिपाठकांनींही आशीर्वाद उच्चारिले. ते ग्रहण करीत श्रीकृष्णांनीं द्वारकेंत प्रवेश केला. ॥ २३ ॥ शौनक ऋषे, श्रीकृष्णाची स्वारी द्वारकेंतील राजमार्गांत आल्या-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

बरोबर, तेथील कुलीन स्त्रिया त्याला अवलोकन करण्याविषयीं अतिशय उत्सुक होऊन आपापल्या वाड्यांवरून चढल्या; ॥२४॥ कारण, श्रीकृष्णाचें शरीर केवळ लक्ष्मीचें स्थानच असल्यामुळें, द्वारकेंतील लोक त्याचें प्रतिदिनीं दर्शन घेत, तरी त्यांच्या दृष्टि तृप्त झाल्या नव्हत्या. ॥ २५ ॥ त्या कृष्णाचें वक्षस्थळ हें लक्ष्मीचें वसतिस्थान असून, मुख दृष्टीचें केवळ पानपात्रच होतें (कितीही प्राशन (अवलोकन) केलें तरी तृप्ति होत नसे); तसेंच, कृष्णाचे बाहु लोकपालांचें स्थान होते; व त्याचें चरणकमल भक्तांचें निवासस्थान होतें. ॥ २६ ॥ कृष्ण रस्त्यांतून चालला असतां, त्याच्यावर शुभ्र छत्र व चामरें धरलीं होतीं, लोक पुष्पवृष्टि करीत होते; कृष्णानें पीतांबर परिधान केला होता, कंठांत वनें-

यत् (कारण), **श्रियः** (शोभेचें) **धाम** (स्थान) **अङ्गं अच्युतं नित्यं निरीक्षमाणानां अपि द्वारकौकसां** (द्वारका हेंच आहे घर ज्यांचें अशांच्या) **दृशः न वितृप्यन्ति [स्म]. ॥ २५ ॥ यस्य उरः श्रियः निवासः, मुखं दृशां पानपात्रं, बाहवः लोकपालानां [निवासः], पदाबुजं सारंगाणां* [निवासः]. ॥ २६ ॥ सितातपत्रव्यजनैः** (शुभ्र छत्र व चामरें यांनीं) **उपस्कृतः** (विभूषित) **पथि** (मार्गांत) **प्रसूनवर्षैः** (पुष्पांच्या वृष्टींनीं) **अभिवर्षितः पिशंगवासाः** (पिवळें वस्त्र ज्याचें, असा) **[कृष्णः] वनमालया** (पायांपर्यंत लोंबणाऱ्या मालेनें), **यथा**

नित्यं निरीक्षमाणानां यदपि द्वारकौकसाम् ॥ न वितृप्यन्ति हि दृशः श्रियो धामांगमच्युतम् ॥ २५ ॥ श्रियो निवासो यस्योरः पानपात्रं मुखं दृशाम् ॥ बाहवो लोकपालानां सारंगाणां पदाम्बुजम् ॥ २६ ॥ सितातपत्रव्यजनैरुपस्कृतः प्रसूनवर्षैरभिवर्षितः पथि ॥ पिशंगवासा वनमालया बभौ घनो यथा ऽर्कोडुपचापवैद्युतैः ॥ २७ ॥ प्रविष्टस्तु गृहं पित्रोः परिष्वक्तः स्वमातृभिः ववन्दे शिरसा सप्त देवकीप्रमुखा मुदा ॥ २८ ॥

घनः अर्कोडुपचापवैद्युतैः (सूर्य, नक्षत्रसहित चंद्र, इंद्रधनुष्य व विजेचें तेज यांनीं), **[तथा] बभौ. ॥ २७ ॥ पित्रोः गृहं प्रविष्टः स्वमातृभिः परिष्वक्तः** (आलिंगिलेला) **[कृष्णः] देव-कीप्रमुखाः सप्त [मातृः] मुदा** (आनंदानें) **शिरसा ववंदे. ॥ २८ ॥**

माला घातली होती, यामुळें त्यावेळीं तो फारच शोभायमान दिसत होता. त्या वेळच्या कृष्णाच्या स्वरूपाला, पुढें दिलेल्या वर्णनाप्रमाणें जर कधीं दिसेल तर (इतकीं साधनें एकत्र मिळावयाचीं नाहींतच, पण मिळतील असें घेऊन चाललें तर) त्या मेघाची उपमा बरोबर शोभेल. एखादेवेळीं मेघामध्यें सूर्य, चंद्र, नक्षत्रें, इंद्रधनुष्य, व वीज एवढे सर्व उपस्कार (साहित्यें) जमले असतां जसें त्या मेघाचें तेज दिसेल तसें कृष्णाचें तेज दिसत होतें. ॥ २७ ॥ नंतर श्रीकृष्ण वसुदेवदेवकीच्या गृहांत गेले. कृष्णानें देवकीप्रभृति

* **[सारंगाणाम्] सारं गायन्ति तेषां** । ह्या जगांत सर्वांमध्यें सार काय तें परमेश्वरच; त्या ' सारभूत ईश्वराचें गायन करणारे ' ते सारंग; अर्थात भगवद्भक्त.

१ पानपात्र ह्याचा शब्दशः अर्थ 'पिण्याचें भांडें ' असा आहे, पण हा शब्द मद्य पिण्याच्या भांड्यालाच विशेषेंकरून लावीत असतात. २ **आपादलम्बिनी माला वनमालेति गीयते ॥** कंठांत घातली असतां पायांपर्यंत पोंचणाऱ्या मालेला ' वनमाला ' असें ह्मणतात.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

सात वसुदेवाच्या पत्न्यांना शिरसा वंदन केलें; कारण, त्याही त्याला मातृतुल्यच होत्या. त्या मातांनीं त्याला आलिंगन दिलें. ॥ २८ ॥ श्रीकृष्णाला पाहिल्याबरोबर त्यांना फार हर्ष झाला; प्रेमामुळें त्यांच्या स्तनांतून पान्हा फुटला; व त्यांच्या नेत्रांतून गळणाऱ्या आनंदाश्रूंनीं श्रीकृष्णाला केवळ स्नानच झालें. ॥ २९ ॥ नंतर श्रीकृष्ण आपल्या वाड्यांत गेले. तो वाडा सर्व इच्छित वस्तूंनीं पूर्ण होता. त्याच्यापेक्षां चांगलें मंदिर पृथ्वीवर कधीं झालें नाहीं. त्यांत श्रीकृष्णाच्या पत्न्यांचे सोळा हजार माहल होते. ॥३०॥ प्रवास करून परत घरीं आलेल्या आपल्या पतीला दुरूनच पाहिल्याबरोबर कृष्णपत्न्यांच्या मनांला फार उत्साह वाटला. पति प्रवासाला गेला असतां स्त्रियांनीं पाळण्याचे

स्नेहस्नुतपयोधराः (प्रेमानें पान्हा फुटलेले स्तन ज्यांचे अशा) **ताः पुत्रं अङ्कं** (मांडीवर) **आरोप्य हर्षविह्वलितात्मानः नेत्रजैः** (नेत्रांतून गळणाऱ्या) **जलैः सिषिचुः. ॥ २९ ॥ अथ [कृष्णः] सर्वकामं** (सर्व इच्छित वस्तूंनीं पूर्ण अशा) **अनुत्तमं स्वभवनं अविशत्; यत्र पत्नीनां षोडश सहस्राणि प्रासादाः [आसन्]. ॥ ३० ॥ पत्न्यः प्रोष्य** (प्रवास करून) **गृहान् उपागतं पतिं आरात्** (दुरून) **विलोक्य सञ्जातमनोमहोत्सवाः** (मनाला मोठा उत्साह झाला आहे ज्यांच्या अशा) **व्रीडितलोचनाननाः** (लज्जायुक्त आहेत नेत्र व मुखें ज्यांचीं अशा) **[सत्यः] व्रतैः सार्कं**

ताः पुत्रमंकमारोप्य स्नेहस्नुतपयोधराः ॥ हर्षविह्वलितात्मानः सिषिचुर्नेत्रजैर्जलैः ॥२९॥ अथाविशत्स्वभवनं सर्वकाममनुत्तमम् ॥
प्रासादा यत्र पत्नीनां सहस्राणि च षोडश ॥ ३० ॥ पत्न्यः पतिं प्रोष्य गृहानुपागतं विलोक्य संजातमनोमहोत्सवाः ॥
उत्तस्थुरारात्सहसा ऽऽसनाशयात्साकं व्रतैर्व्रीडितलोचनाननाः ॥ ३१ ॥ तमात्मजैर्दृष्टिभिरन्तरात्मना दुरन्तभावाः परिरेभिरे
पतिम् ॥ निरुद्धमप्यास्रवदम्बु नेत्रयोर्विलज्जतीनां भृगुवर्य वैक्लवात् ॥ ३२ ॥

(सहित) **आसनाशयात्** (आसनावरून व अन्तःकरणापासून ह्मणजे देहानें व मनानें) **सहसा उत्तस्थुः** (उठल्या). ॥ ३१ ॥ **भृगुवर्य, निरुद्धं** (दाबून ठेविलेलें) **अपि अंबु** (अश्रु) **विलज्जतीनां [तासां] नेत्रयोः वैक्लवात्** (अनावर झाल्यामुळें) **आस्रवत्** (किंचित् खालीं पडलें); **दुरंतभावाः** (गंभीर अभिप्राय आहेत ज्यांचे अशा) **[ताः] पतिं तं अंतरात्मना** (अंतःकरणानें) **दृष्टिभिः च आत्मजैः** (शरीरांनीं) **परिरेभिरे** (आलिंगन करित्या झाल्या). ॥ ३२ ॥

जे नियम, ते कृष्णपत्न्यांनीं पाळले होते, पण कृष्ण आल्याबरोबर ते लागलेच सुटले. त्यांच्या नेत्रांत व मुखावर लज्जा दिसूं लागली. त्या, - जशा श्रीकृष्णाच्या स्वागताकरितां, - आसनावरून उठल्या; तशींच त्यांचीं अंतःकरणेंही श्रीकृष्णाच्या भेटीकरितां उठलीं. (उत्सुक झालीं). ॥३१॥ त्या कृष्णस्त्रियांचे भाव मोठे गंभीर असत. जो कालपर्यंत त्यांना पतिदर्शन नव्हतें, तों पर्यंत त्या त्याला (कृष्णाला) अंतःकरणांत आलिंगीत (त्याचें ध्यान करीत) होत्या; दर्शनाबरोबर त्यांनीं दृष्टीनें त्याला आलिंगिलें (पोटभर त्याच्या

---

१ क्रीडां शरीरसंस्कारं समाजोत्सवदर्शनं ॥ हास्यं परगृहे यानं त्यजेत् प्रोषितभर्तृका ॥ १ ॥ याज्ञवल्क्य.
ज्या स्त्रीचा पति प्रवासाला गेला असेल, तिनें खेळूं नये, शरीराला संस्कार (अभ्यंग, उटी लावणें इत्यादि) करूं नये, उत्सवादि पाहूं नये, हासूं नये, लोकांच्या घरीं जाऊं नये.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

स्वरूपाचें अवलोकन केलें), व अगदीं समीप आल्याबरोबर त्याला शरीरालिंगन दिलें. त्यावेळीं त्यांच्या आंगांवर हर्षानें रोमांच उभे राहिले. शौनक ऋषे! - एक चमत्कार ऐका कीं, - त्याचें दर्शन होतांच त्यांना आनंदाश्रु आले. ते बाहेर पडूं नयेत ह्मणून त्या पुष्कळ प्रकारांनीं दाबीत होत्या, पण शेवटीं अनावर होऊन ते किंचित् खालीं पडलेच; त्यामुळें त्यांना अंमळ लाज वाटली. ॥ ३२ ॥ जरी हा श्रीकृष्ण पार्श्वभागीं आहेसा वाटतो तथापि गूढच आहे. त्याचें चरणकमल क्षणोक्षणीं नवें नवेंच आहे (नवा पदार्थ असला ह्मणजे तो सेवन करण्याला कधींही कंटाळा येत नाहीं तसें श्रीकृष्णाच्या चरणकमलाची सेवा करणारालाही कधीं कंटाळा येत नाहीं). लक्ष्मी ह्म० प्रसिद्ध चंचल; पण ती देखील ज्यापासून कधींही हालत नाहीं. मग इतर कोणती स्त्री त्या चरणकमलाच्या सेवेपासून विरक्त होईल बरें? (कोणतीही होणार नाहीं). ॥ ३३ ॥ पृथ्वीवर **यद्यपि, असौ पार्श्वगतः** (समीप असलेला) **तथापि रहोगतः** (गूढ असलेला) **तस्य अंघ्रियुगं पदे पदे** (पावलोपावलीं, क्षणोक्षणीं) **नवं नवं, तत्पदात् का विरमेत** (विरक्त होईल-सोडून जाईल)? **चला अपि श्रीः कर्हिचित् यत् न जहाति** (सोडिते). ॥ ३३ ॥ **निरायुधः** (हातांत - शस्त्र न धरणारा) **एवं क्षितिभारजन्मनां** (पृथ्वीला भार होण्याकरितांच जन्म आहे ज्यांचें अशा) **अक्षौहिणीभिः परिवृत्ततेजसां** (सर्वत्र पसरला आहे प्रभाव ज्यांचा अशा) **नृपाणां वैरं, यथा श्वसनः** (वायु) **अनलं** (अग्नीला), [**तथा**] **विधाय मिथः** (परस्पर)

यद्यप्यसौ पार्श्वगतो रहोगतस्तथापि तस्यांघ्रियुगं नवं नवम् ॥ पदे पदे का विरमेत तत्पदाच्चला ऽपि यच्छ्रीर्न जहाति कर्हिचित् ॥ ३३ ॥
एवं नृपाणां क्षितिभारजन्मनामक्षौहिणीभिः परिवृत्ततेजसाम् ॥ विधाय वैरं श्वसनो यथा ऽनलं मिथो वधेनोपरतो निरायुधः ॥ ३४ ॥
स एष नरलोके ऽस्मिन्नवतीर्णः स्वमायया ॥ रेमे स्त्रीरत्नकूटस्थो भगवान्प्राकृतो यथा ॥ ३५ ॥ उद्दामभावपिशुनामलवल्गुहासव्रीडाऽवलोकनिहतो ऽमदनो ऽपि यासाम् ॥ संमुह्य चापमजहात्प्रमदोत्तमास्ता यस्येन्द्रियं विमथितुं कुहकैर्न शेकुः ॥ ३६ ॥

वधेन उपरतः (स्तब्ध झाला). ॥ ३४ ॥ **सः एषः भगवान् अस्मिन् नरलोके स्वमायया अवतीर्णः स्त्रीरत्नकूटस्थः** (उत्तम स्त्रियांच्या समुदायांत राहिलेला), **यथा प्राकृतः** (अज्ञानी जन), [**तथा**] **रेमे.** ॥ ३५ ॥ **यासां उद्दामभावपिशुनामलवल्गुहासव्रीडावलोकनिहतः** (गंभीर अभिप्राय सूचक, शुभ्र व मनोहर असें हास्य आणि लज्जायुक्त नेत्रकटाक्ष यांनीं पीडिलेला) **अमदनः** भारभूत राजे फार जन्मले होते, व त्यांच्या जवळ पुष्कळ अक्षौहिणी सैन्य असल्यामुळें ते फार बलाढ्य झाले होते; वायु जसा वेळूपासूनच उत्पन्न होतो, त्यामध्यें त्यांच्या घर्षणानें अग्नि उत्पन्न करून त्यांचा नाश करितो व आपणही शांत होतो, तसें श्रीकृष्णही स्वतां हस्तांत शस्त्र धारण केल्याशिवाय, त्या राजांमध्यें वैर उत्पन्न करून त्यांचा परस्परें वध करवून आपण स्वस्थ झाले. ॥ ३४ ॥ तोच भगवान्, या मनुष्यलोकामध्यें मायेच्या योगानें अवतार धारण करून व उत्तम स्त्रियांच्या समुदायांमध्यें राहून, अज्ञानी जनाप्रमाणें रममाण होत असे. ॥ ३५ ॥ - स्त्रियांचें बल एवढें आहे कीं, - त्यांनीं प्रत्यक्ष शंकराला, ह्मणजे ज्यानें मदनाला जाळिलें त्याला देखील, वेडा केलें. - व एवढें

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

करण्याला साधन त्यांचीं प्रबल शस्त्रें कोणती, - तर एक लज्जायुक्त नेत्रकटाक्ष व त्याच्या साह्याला दुसरे गंभीर, अभिप्रायसूचक, शुभ्र व मनोहर हास्य, तिसरें कांहीं नाहीं. पण एवढ्या शस्त्रांच्या साह्यानें त्यांनीं शंकराची अशी स्थिति केली कीं, शेवटीं त्यानें लज्जित होऊन आपल्या - पिनाक - धनुष्याचा त्याग केला; पण तशी उत्तम व एक सोडून सोळाहजार स्त्रिया, आपल्या सर्व विलासांच्या योगानें, कृष्णाचें मन क्षोभविण्यास समर्थ झाल्या नाहींत. ॥ ३६ ॥ कृष्ण वस्तुतः संगरहित असतांही, हे लोक त्याला आपल्याप्रमाणें हाही संसारांत आसक्त आहे, असें मानतात. - त्यांना तसें वाटण्यास कारण हें कीं, - सर्वांच्या अंतःकरणांत सर्वप्रकारच्या प्रेरणा करणारा हाच आहे. लोकांना ह्याचे वास्तवरूप ओळखूं न येण्यास कारण, केवळ त्यांचें अज्ञानच होय. ॥ ३७ ॥ ईश्वर सर्वसमर्थ आहे असें ह्मणावयाचें कारण, त्याचे ठिकाणीं असणारें अलौकिक सामर्थ्य,

(नाहींसा केला मदन ज्यानें म्ह० शंकर) **अपि संमुह्य चापं अजहात्, ताः प्रमदोत्तमाः** (उत्तम स्त्रिया) **यस्य इंद्रियं** (मनाला) **कुहकैः** (कपटांनीं - विलासांनीं) **विमथितुं** (क्षोभविण्यास) **न शेकुः** ! ॥३६॥ **अयं लोकः असंगं अपि तं आत्मौपम्येन सङ्गिनं व्यापृण्वानं** (संसार करणाऱ्याला, व्यापार करणाऱ्याला) **मनुजं मन्यते; यतः अबुधः**.॥३७॥ **ईशस्य ईशनं** (ऐश्वर्य प्रभाव) **एतत्**—[**यत्**]

तमयं मन्यते लोको ह्यसङ्गमपि सङ्गिनम् ॥ आत्मौपम्येन मनुजं व्यापृण्वानं यतो ऽबुधः ॥ ३७ ॥ एतदीशनमीशस्य प्रकृतिस्थो ऽपि तद्गुणैः ॥ न युज्यते ऽसदात्मस्थैर्यथा बुद्धिस्तदाश्रया ॥३८॥ तं मेनिरे ऽबला मूढाः स्त्रैणं चानुव्रतं रहः ॥ अप्रमाणविदो भर्तुरीश्वरं मतयो यथा ॥ ३९ ॥ इ०श्री०म०प्र०श्रीकृष्णद्वारकाप्रवेशो नामैकादशो ऽध्यायः ॥ ११ ॥

प्रकृतिस्थः अपि तद्गुणैः यथा असदात्मस्थैः (असत् आत्मा–जो देह–त्याच्या ठिकाणीं राहणाऱ्या) **तदाश्रया** (त्याच्या - देहाच्या - अनुषङ्गानें असणारी) **बुद्धिः** [**तथा**], **न युज्यते.** ॥ ३८ ॥ **भर्तुः अप्रमाणविदः** (महिमा न जाणणाऱ्या) **मूढाः, यथा** [**तासां**] **मतयः,** [**तथा**] **ईश्वरं अबलाः रहः अनुव्रतं** (अनुकूल अशा) **तं स्त्रैणं मेनिरे.** ॥३९॥ **इति एकादशो ऽध्यायः** ॥११॥

हें होय. त्या सामर्थ्याचे योगानें तो प्रकृतिस्थ[1] असतांही तिच्या सुखदुःखादि गुणांनीं युक्त होत नाहीं. - हें सामर्थ्य जगांत कोणालाच नाहीं, ह्मणून त्याला सारखा दृष्टांत मिळत नाहीं, तेव्हां उलटा दृष्टांत द्यावयाचा, तो हा कीं :– जसा जीव आणि बुद्धि ह्यांचा ह्या अनित्य देहाशीं निकट संबंध आहे ह्मणून देहाच्या अनुषङ्गानें असणारे ममतादिक धर्म जीवावर व बुद्धीवर मानले जातात, तसा मायेचा आणि ईश्वराचा संबंध असूनही ईश्वराला तिचे गुण सुखदुःखादि नाहींत, ॥ ३८ ॥ कृष्णाच्या स्त्रिया देखील त्याचें खरें रूप जाणत नव्हत्या : तर त्या मूर्ख स्त्रिया आपआपल्या बुद्धीप्रमाणें - जिला जसें वाटेल तसें - श्रीकृष्ण आपल्या स्वाधीन आहे, एकांतामध्यें आपल्याला अनुकूल असतो, असें मानीत. ॥३९॥

॥ इति श्रीभागवतार्थदर्शने प्रथमस्कंधे एकादशो ऽध्यायः ॥११॥

---

१ प्रकृति ह्मणजे माया. ईश्वर मायेचा प्रेरक असल्यामुळें त्याचा आणि मायेचा निकट संबंध आहे.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

शौनक ह्मणतात :— अश्वत्थाम्यानें - पांडवांवर - ब्रह्मास्त्र सोडलें, त्याचें तेज दुर्धर होतें. त्यामुळें उत्तरेच्या गर्भावर प्रहार झाला. पण श्रीकृष्णांनीं त्याला पुनः जीवंत केलें. - त्याचेंच पुढें परीक्षित असें नांव पडलें. - ॥ १ ॥ तो पुरुष मोठा गंभीर व अत्यंत बुद्धिवान् होता. त्याचें जन्म कसें झालें, त्यानें कर्में काय काय केलीं, त्याच्या मरणाला कारण काय झालें, तो देहत्याग करून कसा गेला, ॥ २ ॥ इत्यादि कथा, तुमच्या मनांत जर सांगावयाच्या असतील तर, ऐकाव्या अशी माझी इच्छा आहे. आह्मांला सांगा. आमचा तुमच्या भाषणावर विश्वास आहे. - त्याच्या चरित्रांचें श्रवण करण्याची इच्छा उत्पन्न व्हावयास मुख्य कारण हें कीं, - श्रीशुकाचार्यांनीं त्याला ज्ञान शिकविलें ! ॥ ३ ॥

शौनकः उवाच— अश्वत्थाम्ना उपसृष्टेन (सोडिलेल्या) **उरुतेजसा** (दुर्धरतेजस्वी अशा) **ब्रह्मशीर्ष्णा** (ब्रह्मास्त्रानें) **हतः उत्तरायाः गर्भः ईशेन पुनः आजीवितः** (जिवंत केला). ॥ १ ॥ **महात्मनः महाबुद्धेः तस्य जन्म, कर्माणि, निधनं** (मरण) **च यथा एव आसीत्, सः प्रेत्य** (देहत्याग करून) **यथा गतवान्** ; ॥ २ ॥ **तत् इदं श्रोतुं इच्छामि. यदि गदितुं** (सांगण्यास) **मन्यसे, [तर्हि] श्रद्दधानानां नः ब्रूहि, यस्य शुकः ज्ञानं अदात्.** ॥ ३ ॥ **सूतः उवाच— कृष्णपादानुसेवया सर्वकामेभ्यः निःस्पृहः धर्मराजः प्रजाः रंजयन् पितृवत् अपीपलत्**

शौनक उवाच । अश्वत्थाम्नोपसृष्टेन ब्रह्मशीर्ष्णोरुतेजसा ॥ उत्तराया हतो गर्भ ईशेनाजीवितः पुनः ॥ १ ॥ तस्य जन्म महाबुद्धेः कर्माणि च महात्मनः ॥ निधनं च यथैवासीत्स प्रेत्य गतवान्यथा ॥ २ ॥ तदिदं श्रोतुमिच्छामि गदितुं यदि मन्यसे ॥ ब्रूहि नः श्रद्दधानानां यस्य ज्ञानमदाच्छुकः ॥ ३ ॥ सूत उवाच । अपीपलद्धर्मराजः पितृवद्रञ्जयन्प्रजाः ॥ निस्पृहः सर्वकामेभ्यः कृष्ण-पादानुसेवया ॥ ४ ॥ सम्पदः क्रतवो लोका महिषी भ्रातरो मही ॥ जम्बूद्वीपाधिपत्यं च यशश्च त्रिदिवं गतम् ॥ ५ ॥ किं ते कामाः सुरस्पार्हा मुकुन्दमनसो द्विजाः ॥ अधिजह्रुर्मुदं राज्ञः क्षुधितस्य तथेतरे ॥ ६ ॥

(पालन करिता झाला). ॥ ४ ॥ **संपदः, क्रतवः** (यज्ञ), **लोकाः** (स्वर्गादिलोक), **महिषी** (राणी), **भ्रातरः, मही, जंबूद्वीपाधिपत्यं, त्रिदिवं** (स्वर्गाप्रत) **गतं यशः च.** ॥ ५ ॥ **हे द्विजाः, सुरस्पार्हाः** (देवांनींही आशा करण्यास योग्य असे) **ते कामाः मुकुंदमनसः** (कृष्णाचेच ठिकाणीं मन आहे ज्यांचें अशा) **राज्ञः, यथा क्षुधितस्य इतरे [तथा], मुदं अधिजह्रुः** (देते झाले) **किं ?** ॥ ६ ॥

धर्मराजा नित्य श्रीकृष्णाच्या चरणकमलाची सेवा करण्यांत तत्पर असल्यामुळें सर्व भोगेच्छांविषयीं निरपेक्ष होता; तो प्रजांस नित्य रंजवीत असे, व पिता जसा - पुत्राचें पालन करतो तसें - त्यांचें पालन करीत असे. ॥ ४ ॥ धर्मानें पुष्कळ यज्ञ केले होते, व त्यांच्या योगानें स्वर्गादि लोकप्राप्तीची योग्यताही त्यास आली होती. तसेंच संपत्ति, पत्नी, भ्राते, पृथ्वी, जंबूद्वीपाचें स्वामित्व—एवढ्या सर्व गोष्टी त्याला अनुकूल होत्या, त्याची कीर्तिही स्वर्गापर्यंत गेली होती. ॥ ५ ॥ शौनकादि ब्राह्मणहो, तसल्या संपत्तीची व अनुकूल गोष्टींची इंद्रादि देवांनींदेखील आशा धरून बसावें (त्यांनादेखील असें ऐश्वर्य मिळणें कठीण); असें असूनही धर्मराजाला त्यांपासून कांहीं तरी आनंद वाटला काय ? - नाहीं.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

कारण त्याचें तिकडे लक्ष्य असेल तर आनंद वाटेल. - धर्माचें अंतःकरण तर सर्वकाळ कृष्णाकडे लागलेलें होतें. जसें एखाद्या भुकेलेल्या पुरुषापुढें - शय्या, वस्त्र, चंदन इत्यादि उत्तम भोग्य पदार्थ नेऊन ठेविले तरी एका - अन्ना(कांहींतरी खाण्याचा पदार्थ) शिवाय त्या सर्व वस्तूंपासून त्याला किंचित्ही आनंद वाटावयाचा नाहीं, - तसें धर्माचें अंतःकरण नेहमीं कृष्णाकडे असल्यामुळें पूर्वी सांगितलेल्या सर्व ऐश्वर्यापासून त्याला अगदीं आनंद होत नसे. - ॥ ६ ॥ हे शौनक ऋषे, - अश्वत्थाम्यानें ब्रह्मास्त्र सोडलें, - त्यावेळेस वीर परीक्षितराजा आपल्या मातेच्या गर्भांत होता; तेथें अस्त्राच्या तेजानें दग्ध होऊं लागला असतां, कोणी एक पुरुष त्याच्या दृष्टीस पडला. ॥७॥ त्याला दिसलेल्या पुरुषाचा देह अंगुष्ठाएवढा होता; तो श्यामवर्ण असून स्वच्छ व निर्विकार होता; त्याच्या मस्तकावर चकचकीत सुवर्णाचा मुकुट होता; त्याचीं वस्त्रें विद्युल्लतेच्या

हे भृगुनन्दन, तदा मातुः गर्भगतः (गर्भांत असलेला) **अस्त्रतेजसा दह्यमानः** (दग्ध होणारा) **सः वीरः कंचित् पुरुषं ददर्श.** ॥ ७ ॥ **अंगुष्ठमात्रं श्यामं अमलं स्फुरत्पुरटमौलिनं** (चकचकीत सुवर्णाचा मुगुट आहे ज्यास अशा) **अपीच्यदर्शनं** (अति सुंदर रूप आहे ज्याचें अशा) **तडिद्वाससं** (विद्युल्लतेच्या वर्णासारखें वस्त्र आहें ज्याचें अशा) **अच्युतं.** ॥ ८ ॥

मातुर्गर्भगतो वीरः स तदा भृगुनन्दन ॥ ददर्श पुरुषं कञ्चिद्दह्यमानो ऽस्त्रतेजसा ॥ ७ ॥ अङ्गुष्ठमात्रममलं
स्फुरत्पुरटमौलिनम् ॥ अपीच्यदर्शनं श्यामं तडिद्वाससमच्युतम् ॥ ८ ॥ श्रीमद्दीर्घचतुर्बाहुं तप्तकाञ्चनकुण्डलम् ॥
क्षतजाक्षं गदापाणिमात्मनः सर्वतोदिशम् ॥ परिभ्रमन्तमुल्काभां भ्रामयन्तं गदां मुहुः ॥ ९ ॥ अस्त्रतेजः स्वगदया
नीहारमिव गोपतिः ॥ विधमन्तं सन्निकर्षे पर्यैक्षत क इत्यसौ ॥ १० ॥

श्रीमद्दीर्घचतुर्बाहुं (सुन्दर व लांब असे चार बाहु आहेत ज्यास अशा) **तप्तकांचनकुण्डलं क्षतजाक्षं** (रक्तवर्ण नेत्र आहेत ज्याचे अशा) **गदापाणिं आत्मनः सर्वतोदिशं परिभ्रमन्तं** (सभोंवतीं फिरणाऱ्या) **उल्काभां** (अग्निज्वालेसारखी कान्ति आहे जिची अशा) **गदां मुहुः भ्रामयन्तं** (फिरवीत असणाऱ्या). ॥ ९ ॥ **गोपतिः** (सूर्य) **नीहारं** (बर्फाला, धुक्याला) **इव स्वगदया अस्त्रतेजः** (अस्त्राच्या तेजाला) **विधमन्तं** (नाश करणाऱ्यास) **सन्निकर्षे** (जवळ) **ददर्श. असौ कः इति पर्यैक्षत** (विचार करीत होता). ॥ १० ॥

वर्णाचीं होतीं, त्या पुरुषाचें स्वरूप अति सुंदर होतें. ॥ ८ ॥ त्या स्वरूपाला सुंदर व दीर्घ असे चार बाहु होते. - नुकतेंच - तापविलेल्या सोन्यासारखीं कुंडलें कानांत होतीं - तो फार गडबडींत असल्यामुळें - त्याचे नेत्र आरक्त होते. त्याच्या हस्तांत एक गदा होती व ती अग्निज्वालेसारखी तेजस्वी गदा तो आपल्या (परीक्षितीच्या) सभोंवतीं फिरवीत आहे, - असें त्यानें पाहिलें. - ॥ ९ ॥ सूर्य उगवला ह्मणजे तो जसा धुकें, दहिंवर, इत्यादिकांचा सहज नाश करतो, तसा तो पुरुष आपल्या गदेच्या योगानें ब्रह्मास्त्राच्या तेजाला नाहींसें करीत होता. तो पुरुष आपल्या जवळच आहे असें परीक्षित् राजानें पाहून हा कोण असावा अशाबद्दल तो आपल्या मनांत विचार करीत होता.॥१०॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

श्रीकृष्ण परमात्मा धर्माचें रक्षण करणारे असून त्यांनीं सर्व जग व्यापिलें आहे. त्याचे स्वरूपाला इयत्ता नाहीं. त्या षड्गुणैश्वर्यसंपन्न भक्तरक्षक ईश्वरानें, हें गर्भातील दहा महिन्याचें बाळ पहात असतांना त्याच्या देखत त्या अस्त्रतेजाचा नाश केला, व तो त्याच ठिकाणीं गुप्त झाला. ॥ ११ ॥ नंतर चांगल्या वेळेवर - उत्तरेला - पुत्र झाला, तो पांडूच्या वंशाचा अंकुरच होय. (दुसरें कांहींच संतान नव्हतें). त्या मुलाचें तेज अगदीं पांडुराजा सारखें होतें. - व त्याला पाहिल्यावर लोकांना असा भास होत असे कीं, - हा पांडुराजाच पुनः जन्मास आला असावा. त्याच्या जन्मलग्नाचें फल असें होतें कीं, उत्तरोत्तर त्या पुरुषाचे गुण वृद्धिगत व्हावे. कारण, त्याच्या जन्माच्या वेळीं सर्व ग्रह अनुकूल

धर्मगुप् (धर्माचें रक्षण करणारा) **विभुः अमेयात्मा** (अवितर्क्य आहे रूप ज्याचें असा) **भगवान् हरिः दशमास्यस्य मिषतः** (दहा महिन्यांचें मूल पहात असतांना) **[सतः] तत् विधूय** (नाश करून) **तत्रैव अन्तर्दधे** (गुप्त झाला). ॥ ११ ॥ **ततः सर्वगुणोदर्के** (सर्व गुणांचें उत्तरोत्तर आधिक्य सुचविणाऱ्या) **सानुकूलग्रहोदये** (अनुकूल ग्रहांसहित शुभ ग्रहांचा उदय आहे ज्यांत अशा) **[लग्ने] पांडोः वंशधरः ओजसा** (तेजानें) **भूयः पांडुरिव जज्ञे.** ॥ १२ ॥ **प्रीतमनाः राजा धौम्यकृपादिभिः** (धौम्य कृपाचार्य इत्यादिक अशा) **विप्रैः मंगलं वाचयित्वा** (पुण्याहवाचन

विधूय तदमेयात्मा भगवान्धर्मगुब् विभुः ॥ मिषतो दशमास्यस्य तत्रैवान्तर्दधे हरिः ॥११॥ ततः सर्वगुणोदर्के सानुकूलग्रहोदये ॥
जज्ञे वंशधरः पाण्डोर्भूयः पाण्डुरिवौजसा ॥ १२ ॥ तस्य प्रीतमना राजा विप्रैर्धौम्यकृपादिभिः ॥ जातकं कारयामास वाचयित्वा
च मङ्गलम् ॥ १३ ॥ हिरण्यं गां महीं ग्रामान् हस्त्यश्वान्नृपतिर्वरान् ॥ प्रादात्स्वन्नं च विप्रेभ्यः प्रजातीर्थं स तीर्थवित् ॥ १४ ॥
तमूचुर्ब्राह्मणास्तुष्टा राजानं प्रश्रयान्वितम् ॥ एष ह्यस्मिन्प्रजातन्तौ कुरूणां पौरवर्षभ ॥ १५ ॥ दैवेनाप्रतिघातेन शुक्ले
संस्थामुपेयुषि ॥ रातो वो ऽनुग्रहार्थाय विष्णुना प्रभविष्णुना ॥ १६ ॥

करून) **तस्य जातकं कारयामास** (करविलें).॥ १३ ॥ **तीर्थवित् सः नृपतिः प्रजातीर्थे** (पुत्रप्राप्तिरूपी तीर्थाचे ठिकाणीं) **विप्रेभ्यः हिरण्यं गां महीं ग्रामान् वरान् हस्त्यश्वान् स्वन्नं** (चांगल्या अन्नातें) **च प्रादात्.** ॥ १४ ॥ **तुष्टाः ब्राह्मणाः प्रश्रयान्वितं** (नम्रतेनें युक्त अशा) **तं राजानं ऊचुः– 'हे पौरवर्षभ, कुरूणां अस्मिन् शुक्ले प्रजातंतौ अप्रतिघातेन** (अनिवार्य अशा) **दैवेन संस्थां** (नाशाप्रत) **उपेयुषि** (गेलें असतां) **वः अनुग्रहार्थाय प्रभविष्णुना** (महाप्रभावशाली अशा) **विष्णुना एषः रातः** (रक्षिलेला). ॥ १५ ॥ १६ ॥

होते. ॥ १२ ॥ धर्मराजाला मोठा आनंद झाला, त्यानें धौम्य कृपाचार्य इत्यादि महान् महान् ब्राह्मण बोलाविले, व त्यांच्याकडून पुण्याहवाचन करून त्या पुत्राचें जातक करविलें. ॥१३॥ पुत्रप्राप्ति हें एक तीर्थच आहे. धर्मराजा तीर्थांचें माहात्म्य जाणणारा होता. त्यानें ब्राह्मणांस सुवर्ण, गाई, पृथ्वी, ग्राम, उत्तम उत्तम हत्ती, घोडे, चांगलें अन्न, हीं दिलीं. ॥ १४ ॥ नंतर ब्राह्मण संतुष्ट होऊन स्वभावतः फार नम्र असणाऱ्या त्या धर्मराजाला बोलूं लागले :– "हे धर्मा, तूं कुरुकुलांत श्रेष्ठ आहेस. कौरवांचा वंश अति निर्दोष खरा

१ तीर्थास गेल्यावर तेथें दान केलें असतां जें पुण्य आहे तें पुण्य पुत्र जन्माचे वेळेस दान केलें असतां प्राप्त होतें.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

पण दैवांत लिहिलेलें कधींही चुकावयाचें नाहीं, त्या दैवगतीप्रमाणें त्या कुरुकुलाचा नाश झाला असतां महाप्रभावशाली श्रीकृष्णांनीं तुमच्यावर अनुग्रह करण्याकरितां ह्या मुलाचें (उत्तरेच्या गर्भाचें) रक्षण केलें. ॥ १५ ॥ १६॥ ह्या गोष्टीवरून हा मुलगा विष्णुरात ह्या नांवानें लोकांत प्रसिद्ध होईल, तसेंच हा मोठा गुणी व महान् भगवद्भक्त निपजेल, यांत संशय नाहीं." ॥ १७॥ ऋषींनीं -' हा मुलगा मोठा भगवद्भक्त होईल' असें सांगितल्यावरून आनंदित होऊन- धर्मराजानें ऋषींस प्रश्न केला:- "साधु ब्राह्मण हो, आमच्या वंशांत आजपर्यंत जे पुण्यकीर्तिमान् मोठमोठे राजर्षि होऊन गेले, त्यांप्रमाणेंच हा मुलगा उत्तम कीर्ति मिळवून त्यांच्यासारखाच वर्तन ठेवील काय ?"॥१८॥ ब्राह्मण ह्मणतातः—

तस्मात् विष्णुरातः इति नाम्ना लोके बृहच्छ्रवाः (मोठा कीर्तिमान्) **महान् महाभागवतः भविष्यति, न संदेहः.** ' ॥१७॥ **युधिष्ठिरः उवाच— ' हे सत्तमाः अपिस्वित् एषः वंश्यान् पुण्यश्लोकान् महात्मनः राजर्षीन् यशसा साधुवादेन** (सत्कीर्तीनें) **अनुवर्तिता ?'॥१८॥ब्राह्मणाः ऊचुः— ' पार्थ, [अयं] साक्षात् मानवः इक्ष्वाकुरिव प्रजावित** (प्रजांचें रक्षण करणारा), **यथा दाशरथिः रामः [तथा] ब्राह्मण्यः** (ब्राह्मणांचा हितकर्ता) **सत्यसंधश्च** (सत्य आहे प्रतिज्ञा ज्याची असा). ॥ १९ ॥ **यथा औशीनरः** (उशीनर देशांचा राजा) **शिबिः,**

तस्मान्नाम्ना विष्णुरात इति लोके बृहच्छ्रवाः ॥ भविष्यति न सन्देहो महाभागवतो महान् ॥ १७ ॥ युधिष्ठिर उवाच । अप्येष वंश्यान् राजर्षीन्पुण्यश्लोकान्महात्मनः ॥ अनुवर्तिता स्विद्यशसा साधुवादेन सत्तमाः ॥ १८ ॥ ब्राह्मणा ऊचुः । पार्थ प्रजाऽविता साक्षादिक्ष्वाकुरिव मानवः ॥ ब्राह्मण्यः सत्यसन्धश्च रामो दाशरथिर्यथा ॥ १९ ॥ एष दाता शरण्यश्च यथा ह्यौशीनरः शिबिः ॥ यशो वितनिता स्वानां दौष्यन्तिरिव यज्वनाम् ॥ २० ॥ धन्विनामग्रणीरेव तुल्यश्चार्जुनयोर्द्वयोः ॥ हुताश इव दुर्धर्षः समुद्र इव दुस्तरः ॥२१॥

[तथा] दाता शरण्यः (शरणांगतांचें भय दूर करणारा), **एषः च स्वानां यज्वनां** (यज्ञ करणाऱ्या पुरुषांचें) **यशः दौष्यंतिरिव वितनिता** (वृद्धिंगत करणारा). ॥ २० ॥ **एषः धन्विनां** (धनुर्धारी पुरुषांमध्यें) **अग्रणीः** (श्रेष्ठ), **द्वयोः अर्जुनयोः** (पार्थ व कार्त्तवीर्य या दोन अर्जुनांच्या) **तुल्यः, हुताशः** (अग्नि) **इव दुर्धर्षः** (दुःसह), **समुद्रः इव दुस्तरः [भविष्यति].** ॥ २१ ॥

" धमराजा, हा मुलगा प्रजांचें पालन करण्यांत मनूचा पुत्र साक्षात् इक्ष्वाकु राजाच कीं काय , असा निपजेल, तसेंच हा साक्षात् दाशरथि रामचंद्राप्रमाणें ब्राह्मणांचा हितकर्ता होईल. ॥ १९ ॥ जसा उशीनर देशांचा शिबि नामक राजा मोठा दाता व शरणागतांचें भय दूर करणारा होता, त्याप्रमाणेंच हाही होईल. व भरतराजाप्रमाणें हाही यज्ञ करणाऱ्या आपल्या कुलांतील पुरुषांचें यश - आणखी यज्ञ करून - वृद्धिंगत करील. ॥ २० ॥ हा धनुर्धारी पुरुषांत श्रेष्ठपणा मिळवील. पार्थ व कार्तवीर्य दोघेही अर्जुन जसे प्रख्यात योद्धे आहेत, तसाच त्यांच्या जोडीचा हा होईल, ह्याचा पराक्रम अग्नीप्रमाणें दुःसह होईल, व समुद्र तरून जाणें जसें कठीण आहे, तसेंच ह्यालाही जिंकणें अशक्य

१ विष्णूनें रात ह्म० दिलेला. ब्राह्मान्नानें दग्ध होत होताच पण श्रीकृष्णानें रक्षण करून पांडवांना दिला ह्मणून त्याचें नांव अन्वर्थच ठेविलें.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

होईल. ॥ २१ ॥ हा सिंहासारखा पराक्रमी होईल, हिमालयपर्वताप्रमाणें सर्व साधूंना आश्रय देईल, पृथ्वीसारखा सहनशील होईल, मातापिता जशीं - पुत्राचे अपराध सहन करतात - तसा हाही सर्वांचे अपराध सहन करील. ॥ २२ ॥ ब्रह्मदेव सर्वांचा पितामह असल्यामुळें त्याला सर्वच सारखे, हा प्रिय हा अप्रिय असा भाव त्याचे मनांत मुळींच नाहीं, त्याप्रमाणें ह्याची सर्वत्र समबुद्धि असेल. हा प्रसन्न होण्याविषयीं अगदीं शंकरतुल्य (शीघ्र प्रसन्न होणारा) व लक्ष्मीपति विष्णूप्रमाणें सर्व प्राणिमात्रांस आश्रय देणारा होईल, ॥ २३ ॥ श्रीकृष्णाच्या ठिकाणीं जसे सर्व गुण पूर्णपणें वास करितात, तसे संपूर्ण उत्तम उत्तम गुण ह्याचे ठिकाणींही राहतील. व हा रंतिदेवासारखा उदार, व

असौ मृगेंद्रः (सिंह) **इव विक्रांतः** (पराक्रमी), **हिमवान्** (हिमालय) **इव निषेव्यः** (आश्रय करण्यास योग्य), **वसुधा इव तितिक्षुः** (सहनशील), **पितरौ इव सहिष्णुः च, ॥ २२ ॥ साम्ये** (सम बुद्धित्वांत) **पितामहोपमः** (ब्रह्मदेवासारिखा) **प्रसादे गिरिशोपमः** (शंकरासारिखा), **यथा रमाश्रयः** (रमेचा आश्रय विष्णु) **देवः तथा सर्वभूतानां आश्रयः. ॥ २३ ॥ एषः सर्वसद्गुणमाहात्म्ये** (सर्व सद्गुणांनीं जें मोठेपण त्यांत) **कृष्णं अनुव्रतः, रंतिदेवः इव उदारः, ययातिः इव धार्मिकः. ॥ २४ ॥ धृत्या** (धैर्यानें) **बलिसमः, प्रह्लादः इव कृष्णे सद्ग्रहः** (चांगला ग्रह

मृगेन्द्र इव विक्रान्तो निषेव्यो हिमवानिव ॥ तितिक्षुर्वसुधेवासौ सहिष्णुः पितराविव ॥ २२ ॥ पितामहसमः साम्ये प्रसादे गिरिशोपमः ॥ आश्रयः सर्वभूतानां यथा देवो रमाश्रयः ॥ २३ ॥ सर्वसद्गुणमाहात्म्य एष कृष्णमनुव्रतः ॥ रन्तिदेव इवोदारो ययातिरिव धार्मिकः ॥ २४ ॥ धृत्या बलिसमः कृष्णे प्रह्लाद इव सद्ग्रहः ॥ आहर्तैषोऽश्वमेधानां वृद्धानां पर्युपासकः ॥ २५ ॥ राजर्षीणां जनयिता शास्ता चोत्पथगामिनाम् ॥ निग्रहीता कलेरेष भुवो धर्मस्य कारणात् ॥ २६ ॥ तक्षकादात्मनो मृत्युं द्विजपुत्रोपसर्जितात् ॥ प्रपत्स्यत उपश्रुत्य मुक्तसंगः पदं हरेः ॥ २७ ॥

आहे ज्याचा असा), **एषः अश्वमेधानां आहर्ता** (करणारा), **वृद्धानां पर्युपासकः, ॥ २५ ॥ राजर्षीणां जनयिता, उत्पथगामिनां** (कुमार्गानें चालणाऱ्यांचा) **च शास्ता, एषः भुवः धर्मस्य कारणात् कलेः निग्रहीता [भविष्यति], ॥२६॥ द्विजपुत्रोपसर्जितात्** (ब्राह्मणाच्या पुत्रानें पाठविलेल्या) **तक्षकात् आत्मनः मृत्युं उपश्रुत्य मुक्तसंगः हरेः पदं प्रपत्स्यते** (भजन करील).॥२७॥

ययातिराजासारखा धार्मिक होईल. ॥ २४ ॥ हा बलिराजासारखा धैर्यवान् होईल, प्रह्लादाप्रमाणें श्रीकृष्णाविषयीं चांगला ग्रह ठेवील, पुष्कळ अश्वमेध यज्ञ करील, व वृद्धांची सेवा करील; ॥ २५ ॥ ह्याचे पुत्र राजर्षि होतील, हा कुमार्गी पुरुषांचें शासन करील, व धर्म आणि पृथ्वी यांकरितां कलीचा निग्रह करील. ॥ २६ ॥ एका ब्राह्मणाच्या पुत्रानें प्रेरणा केल्यामुळें (शाप दिल्यामुळें) तक्षक येऊन आपल्याला चावणार व त्यामुळें आपणाला मृत्यु प्राप्त होणार असें समजल्याबरोबर सर्वसंगपरित्याग करून हा श्रीहरीच्या पदाचें

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

भजन करील. ॥ २७ ॥ राजा, व्यासपुत्र जे मुनि श्रीशुक त्यांजकडून ह्याला आत्म्याचें यथार्थ ज्ञान मिळेल. नंतर हा ह्या शरीराचा गंगेंत त्याग करून निर्भय अशा मोक्षपदास निश्चयें करून प्राप्त होईल. " ॥ २८ ॥ ते सर्व ब्राह्मण जातकज्ञानांत निष्णात होते. त्यांनीं पूर्वी सांगितल्याप्रमाणें मुलाचें जातक धर्मराजाला सांगितलें. धर्मराजानें त्यांची पूजा केली. ती ग्रहण करून ते ब्राह्मण आपआपल्या गृहांस गेले. ॥ २९ ॥ त्या मुलाचें नांव विष्णुरात असें असून ' परीक्षित् ' असें लोकांत प्रसिद्ध झालें, ह्याचें कारण एवढेंच कीं, (परि ह्मणजे सर्वांवर्ती ईक्षते ह्मणजे पाहातो तो परीक्षित्) त्यानें पूर्वी मातेच्या गर्भांत असतां जी कृष्णमूर्ति अवलोकन केली, ती त्याच्या मनांत नेहमीं घोळत असे व कोणीही

हे नृप, व्याससुतात् मुनेः जिज्ञासितात्मयाथात्म्यः (आत्म्याचें यथार्थ ज्ञान झालें आहे ज्याला असा) असौ इदं गंगायां हित्वा (टाकून) अद्धा (निश्चयेंकरून) अकुतोभयं (निर्भय अशा) यास्यति.'॥२८॥ जातककोविदाः (जातकज्ञानांत निष्णात) सर्वे विप्राः, इति राज्ञे उपादिश्य (सांगून), लब्धापचितयः (प्राप्त झाली आहे पूजा ज्यांना असे) [संतः] स्वकान् गृहान् प्रतिजग्मुः. ॥ २९ ॥ यत् प्रभुः गर्भदृष्टं (गर्भांत पाहिलेल्या - पुरुषास) अनुध्यायन् इह नरेषु परीक्षेत, [अतः] सः एषः परीक्षित् इति लोकविख्यातः. ॥ ३०॥ सः राजपुत्रः अन्वहं (उत्तरोत्तरदिनीं) काष्ठा-

जिज्ञासितात्मयाथात्म्यो मुनेर्व्याससुतादसौ ॥ हित्वेदं नृप गङ्गायां यास्यत्यद्धा ऽकुतोभयम् ॥ २८ ॥ इति राज्ञ उपादिश्य विप्रा जातककोविदाः ॥ लब्धाऽपचितयः सर्वे प्रतिजग्मुः स्वकान् गृहान् ॥ २९ ॥ स एष लोकविख्यातः परीक्षिदिति यत्प्रभुः ॥ गर्भदृष्टमनुध्यायन्परीक्षेत नरेष्विह ॥ ३० ॥ स राजपुत्रो ववृधे आशु शुक्ल इवोडुपः ॥ आपूर्यमाणः पितृभिः काष्ठाभिरिव सो ऽन्वहम् ॥ ३१ ॥ यक्ष्यमाणो ऽश्वमेधेन ज्ञातिद्रोहजिहासया ॥ राजा ऽलब्धधनो दध्यावन्यत्र करदण्डयोः ॥ ३२ ॥ तदभिप्रेतमालक्ष्य भ्रातरो ऽच्युतचोदिताः ॥ धनं प्रहीणमाजह्रुरुदीच्यां दिशि भूरिशः ॥ ३३ ॥

भिः (पंधरा कलांनीं) शुक्ले उडुपः (चन्द्र) इव पितृभिः आपूर्यमाणः (पालन पोषण केलें जात असणारा) ववृधे (वृद्धिंगत होत गेला). ॥३१॥ ज्ञातिद्रोहजिहासया (ज्ञातीच्या वधाच्या ह्म० त्या दोषाला क्षालन करण्याच्या इच्छेनें) अश्वमेधेन यक्ष्यमाणः अलब्धधनः(अप्राप्त आहे धन ज्यास असा) राजा करदण्डयोः अन्यत्र [धनप्राप्तिसाधनं] दध्यौ (विचार करीत होता). ॥३२॥ तदभिप्रेतं (इच्छेला) आलक्ष्य अच्युतचोदिताः (कृष्णाकडून प्रेरणा केलेले) भ्रातरः उदीच्यां दिशि भूरिशः (पुष्कळ) प्रहीणं (टाकिलेल्या—पुरलेल्या) धनं आजह्रुः (आणिते झाले). ॥ ३३ ॥

मनुष्य भेटला असतां तो ' गर्भांत दिसलेला पुरुष तर हा नसेल ना ' असा विचार करीत असे. ॥ ३० ॥ धर्मराजप्रभृति पांडव परीक्षिताचें लालन पालन करीत असत, जसा शुक्लपक्षांतील चंद्र एक एक कलेनें वृद्धिंगत होत जातो, तसा हा राजपुत्र परीक्षित्ही लवकरच उत्तरोत्तर वृद्धिंगत होत गेला, व चौसष्ट कलांमध्यें निपुण झाला. ॥ ३१ ॥ धर्मराजाच्या मनांत, आपल्या हातून घडलेल्या ज्ञातिवधरूपी दोषाच्या क्षालनाकरितां अश्वमेध यज्ञ करावा, असें होतें; पण, द्रव्य जवळ नव्हतें. प्रजांवर कर बसविणें किंवा त्यांपासून दंड घेणें त्याला इष्ट वाटेना. ह्मणून, इतर कोणत्या रीतीनें द्रव्य मिळेल, अशा विचारांत तो होता. ॥ ३२ ॥ त्याचा तो उद्देश भीम, अर्जुन, इत्यादि चौघा भावांना

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

कळला. तेव्हां कृष्णाच्या प्रेरणेवरून ते उत्तर दिशेकडे गेले, व तिकडे बहुत द्रव्य (सोन्याचीं पात्रें इत्यादि) पुरलेलें होतें, तें घेऊन आले. ॥ ३३ ॥ ज्ञातिवधरूप पापामुळें भ्यालेल्या राजानें ह्या आणलेल्या द्रव्याच्या योगें यज्ञसामग्री तयार करून तीन अश्वमेध यज्ञ केले व त्यांच्या योगानें हरीची आराधना केली. ॥ ३४ ॥ धर्मराजानें अश्वमेधाकरितां श्रीकृष्णाला बोलाविलें, त्याप्रमाणें ते आले; व त्यांनीं ब्राह्मणांकडून धर्मराजाच्या हातीं यज्ञ करविला. पुढें मित्रमंडळीच्या प्रेमास्तव कित्येक दिवसपर्यंत श्रीकृष्ण पांडवांकडे राहिले. ॥ ३५ ॥ ऋषीहो, नंतर धर्मराजा, द्रौपदी व पांडव या सर्वांनीं कृष्णाला जाण्यास अनुमोदन दिलें. त्याप्रमाणें आपल्या यादवमंडळीसह श्रीकृष्ण, बरोबर अर्जुन-

भीतः धर्मपुत्रः युधिष्ठिरः तेन संभृतसंभारः (संपादिली आहे यज्ञसामग्री ज्यानें असा) [सन्] त्रिभिः वाजिमेधैः (अश्वमेधांनीं) यज्ञैः हरिः समयजत्. ॥ ३४ ॥ राज्ञा आहूतः भगवान् द्विजैः नृपं याजयित्वा (यज्ञ करणारा) सुहृदां प्रियकाम्यया कतिचित् मासान् उवास. ॥ ३५ ॥ हे ब्रह्मन्, ततः बंधुभिः सह राज्ञा कृष्णया (द्रौपदीनें) च अभ्यनुज्ञातः सार्जुनः यदुभिः वृतः द्वारवतीं ययौ. ॥ ३६ ॥ ॥ इति श्रीभागवतान्वये प्रथमस्कंधे द्वादशो ऽध्यायः ॥ १२ ॥

तेन सम्भृतसम्भास्रो-धर्मपुत्रो युधिष्ठिरः ॥ वाजिमेधैस्त्रिभिर्भीतो यज्ञैः समयजद्धरिम् ॥ ३४ ॥ आहूतो भगवान् राज्ञा याजयित्वा द्विजैर्नृपम् ॥ उवास कतिचिन्मासान् सुहृदां प्रियकाम्यया ॥ ३५ ॥ ततो राज्ञा ऽभ्यनुज्ञातः कृष्णया सह बन्धुभिः ॥ ययौ द्वारवतीं ब्रह्मन्सार्जुनो यदुभिर्वृतः ॥ ३६ ॥ इ०श्री०म०प्र०परीक्षिज्जन्मायुत्कर्षो नाम द्वादशो ऽध्यायः ॥ १२ ॥ सूत उवाच ।
विदुरस्तीर्थयात्रायां मैत्रेयादात्मनो गतिम् ॥ ज्ञात्वा ऽगाद्धास्तिनपुरं तया ऽऽवासविवित्सितः ॥ १ ॥ यावतः कृतवान्प्रश्नान् क्षत्ता कौषारवाग्रतः ॥ जातैकभक्तिर्गोविन्दे तेभ्यश्चोपरराम ह ॥ २ ॥

सूतः उवाच—विदुरः तीर्थयात्रायां मैत्रेयात् आत्मनः (आत्मज्ञानाची) गतिं ज्ञात्वा तया अवासविवित्सितः (पूर्ण झाली आहे ज्ञानाची इच्छा ज्याची असा) हास्तिनपुरं अगात्. ॥१॥ क्षत्ता (विदुर) कौषारवाग्रतः (मैत्रेयापुढें) यावतः (जितक्या) प्रश्नान् कृतवान्, तेभ्यः गोविन्दे जातैकभक्तिः (उत्पन्न झाली आहे पूर्ण भक्ति ज्याची असा) [सन्] उपरराम (विराम नाला घेऊन, द्वारकेस गेले. ॥ २ ॥ ॥ इति श्रीमद्भागवतार्थदर्शने प्रथमस्कंधे द्वादशो ऽध्यायः ॥ १२ ॥

सूत ह्मणतातः— विदुर तीर्थयात्रेला गेला होता. तिकडे त्याची व मैत्रेयाची गांठ पडून मैत्रेयानें त्याला ' आत्मज्ञानाची गति - हरि होय ' अर्से - सांगितलें त्या योगें विदुराची जिज्ञासा (ज्ञानाची इच्छा) पूर्ण झाली व तो हस्तिनापुरास गेला. ॥ १ ॥ विदुरानें मैत्रेयाला कर्मयोग, व्रतें, इत्यादिकांबद्दल जितके प्रश्न विचारिले, - त्यापैकीं दोन चार प्रश्नांचीं उत्तरें मिळाल्या बरोबर - त्याची श्रीकृष्णावर पूर्ण भक्ति उत्पन्न झाली; व अवशिष्ट प्रश्नांपासून तो विराम पावला (पुढें त्या सर्व प्रश्नांचीं उत्तरें मिळालींच पाहि-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

जेत अशी त्याला इच्छा राहिली नाहीं. त्या दोन चार उत्तरांतच त्याच्या सर्व शंकांचें समाधान झालें). ॥ २ ॥ ऋषे, आपला बंधु विदुर आला ही गोष्ट कळली, तेव्हां धर्म, त्याचे चौघे बंधु, धृतराष्ट्र, युयुत्सु, कृपाचार्य, कुंती, गांधारी, द्रौपदी, सुभद्रा, उत्तरा, कृपी, पांडूच्या ज्ञातींतील स्त्रिया, व इतर स्त्रिया आपल्या मुलांसुद्धां मोठ्या हर्षानें त्याला सामोऱ्या गेल्या. - व त्यांच्यामध्यें इतकी चळवळ चालू झाली कीं, एखाद्या निश्चेष्टित शरीरामध्यें - प्राण आला असतां जसे अवयव क्रिया करूं लागतात, तसे -ते सर्व लोक आपआपल्या प्रकारें त्याच्या भेटीस जाण्याची तयारी करूं लागले. - त्या सर्वांनीं आपआपल्या योग्यतेप्रमाणें विदुराला नमस्कार

पावला) ह. ॥ २ ॥ हे ब्रह्मन्, तं बंधुं आगतं दृष्ट्वा, तन्वः आगतं प्राणं इव, सहानुजः (बंधूंशीं सहवर्तमान) धर्मपुत्रः, धृतराष्ट्रः, युयुत्सुः, सूतः (संजय), शारद्वतः (कृपाचार्य), पृथा (कुंती), गांधारी, द्रौपदी, सुभद्रा, उत्तरा, कृपी, पांडोः ज्ञातयः, अन्याः ससुताः जामयः (ज्ञातींतील स्त्रिया), स्त्रियः च प्रहर्षेण प्रत्युज्जग्मुः (सामोरे गेले). विधिवत् परिष्वंगाभिवादनैः (आलिंगन व नमस्कार यांनीं) अभिसंगम्य (भेटून). ॥ ३ ॥ ४ ॥ ५ ॥ विरहौत्कंठ्यकातराः (विरहामुळें झालेल्या उत्कंठेनें विह्वल असे) प्रेमबाष्पौघं (प्रेमाच्या अश्रूंच्या

तं बन्धुमागतं दृष्ट्वा धर्मपुत्रः सहानुजः ॥ धृतराष्ट्रो युयुत्सुश्च सूतः शारद्वतः पृथा ॥ ३ ॥ गान्धारी द्रौपदी ब्रह्मन्सुभद्रा चोत्तरा कृपी ॥ अन्याश्च जामयः पाण्डोर्ज्ञातयः ससुताः स्त्रियः ॥ ४ ॥ प्रत्युज्जग्मुः प्रहर्षेण प्राणं तन्व इवागतम् ॥ अभिसङ्गम्य विधिवत्परिष्वङ्गाभिवादनैः ॥ ५ ॥ मुमुचुः प्रेमबाष्पौघं विरहौत्कण्ठ्यकातराः ॥ राजा तमर्हयाञ्चक्रे कृतासनपरिग्रहम् ॥ ६ ॥ तं भुक्तवन्तमासीनं विश्रान्तं सुखमासने ॥ प्रश्रयावनतो राजा प्राह तेषां च शृण्वताम् ॥ ७ ॥ युधिष्ठिर उवाच । अपि स्मरथ नो युष्मत्पक्षच्छायासमेधितान् ॥ विपद्गणाद्विषाग्न्यादेर्मोचिता यत्समातृकाः ॥ ८ ॥

ओघास) मुमुचुः, राजा कृतासनपरिग्रहं तं अर्हयांचक्रे (पूजा करिता झाला). ॥ ६ ॥ प्रश्रयावनतः (आदरानें नम्र असा) राजा विश्रांतं भुक्तवंतं (भोजन केलेल्यास) आसने सुखं आसीनं तं तेषां शृण्वतां [सतां] प्राह- ॥ ७ ॥ युधिष्ठिरः उवाच—'युष्मत्पक्षच्छायासमेधितान् (तुमच्या पक्षाच्या छायेनें-आश्रयानें-वाढविलेल्या) नः अपि स्मरथ ? यत् समातृकाः आलिंगन इत्यादि करून त्याची भेट घेतली. ॥ ३ ॥ ४ ॥ ५ ॥ सर्वांना विदुराचा बरेच दिवस विरह घडल्यामुळें त्याच्या दर्शनाविषयीं फार उत्सुकता उत्पन्न होऊन, ते अगदीं विव्हल झाले होते; त्यांच्या डोळ्यांतून प्रेमाश्रूंच्या धारा चालल्या होत्या. धर्मराजानें विदुराला आसन दिलें, व त्यावर विदुर बसला असतां त्याची पूजा केली. ॥ ६ ॥ विदुरानें थोडासा विसांवा घेतला. पुढें भोजन आटोपून तो सुखासनावर बसला असतां, धर्मराजानें नम्रतापूर्वक, वर सांगितलेली सर्व मंडळी ऐकत असतां, त्याला प्रश्न केला :- ॥ ७ ॥ धर्मराजा ह्मणाला :- - " काका, जसे पक्षी आपल्या पिलांना, त्यांच्यावर आपल्या पंखांची छाया घालून वाढवितात, त्याप्रमाणें तुह्मीं आमचें पालन केलें, - आह्मीं

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तुमच्या आश्रयानेंच वाढलों आहों. तुह्मी आह्मांला व आमच्या आईला विष, अग्नि इत्यादि संकटांतून सोडवलें. आमचें आपणास कधीं स्मरण होतें काय ? ॥ ८ ॥ तुह्मीं पृथ्वीतलावर पर्यटन करीत असतां आपला निर्वाह कोणत्या रीतीनें केला ? या भूतलावर आपण कोणतीं कोणतीं मुख्य क्षेत्रें व तीर्थें अवलोकन केलीं ? ॥ ९ ॥ हे समर्था, तुमच्यासारखे भगवद्भक्त स्वतां तीर्थरूपीच आहेत. ते, पुष्कळ पापी लोकांना पवित्र करून मलिन झालेल्या तीर्थांना, पवित्र करूं शकतात; - कारण, त्यांच्याजवळ एक मोठें साधन असतें; तें हें कीं - भगवान् गदाधर विष्णु त्यांच्या हृदयांत वास करीत असतो. ॥१०॥ विदुरा, कृष्णदेवासह आमचें बांधव व मित्र यादव आपणांस भेटले होते काय ? किंवा

(आईसहवर्त्तमान) [वयं] विपद्गणात् (संकटसमुदायापासून) विषाग्न्यादे. मोचिताः. ॥ ८ ॥ क्षितिमंडलं (भूमिमंडलावर) चरद्भिः (फिरणाऱ्या तुह्मीं) वः कया वृत्त्या वर्तितं, इह भूतले [कानि] क्षेत्रमुख्यानि तीर्थानि सेवितानि ? ॥ ९ ॥ हे विभो, स्वयं तीर्थभूताः (तीर्थस्वरूपी असे) भवद्विधाः (आपल्यासारिखे) भागवताः स्वांतस्थेन (आपल्या अन्तःकरणांत असलेल्या) गदाभृता (गदाधरानें-भगवानानें) तीर्थानि तीर्थीकुर्वन्तिः ॥ १० ॥ हे तात, नः बान्धवाः सुहृदः, कृष्णदेवताः यदवः दृष्टाः श्रुताः वा? अपि [ते] स्वपुर्यां सुखं

कया वृत्त्या वर्तितं वश्चरद्भिः क्षितिमण्डलम् ॥ तीर्थानि क्षेत्रमुख्यानि सेवितानीह भूतले ॥ ९ ॥ भवद्विधा भागवतास्तीर्थभूताः स्वयं विभो ॥ तीर्थीकुर्वन्ति तीर्थानि स्वान्तस्थेन गदाभृता ॥ १० ॥ अपि नः सुहृदस्तात बान्धवाः कृष्णदेवताः दृष्टाः श्रुता वा यदवः स्वपुर्यां सुखमासते ॥ ११ ॥ इत्युक्तो धर्मराजेन सर्वं तत्समवर्णयत् ॥ यथाऽनुभूतं क्रमशो विना यदुकुलक्षयम् ॥ १२ ॥ नन्वप्रियं दुर्विषहं नृणां स्वयमुपस्थितम् ॥ नावेदयेत्सकरुणो दुःखितान्द्रष्टुमक्षमः ॥ १३ ॥ कञ्चित्कालमथावात्सी-त्सत्कृतो देववत्सुखम् ॥ भ्रातुर्ज्येष्ठस्य श्रेयस्कृत्सर्वेषां प्रीतिमावहन् ॥ १४ ॥

आसते ? ' ॥ ११ ॥ धर्मराजेन इति उक्तः [विदुरः] यथानुभूतं यदुकुलक्षयं विना तत् सर्वं क्रमशः समवर्णयत्. ॥ १२ ॥ ननु दुःखितान् द्रष्टुं अक्षमः सकरुणः [पुरुषः] नृणां दुर्विषहं (दुःसह अशा) उपस्थितं (प्रात झालेल्या) अप्रियं स्वयं न आवेदयेत्. (कळवूं नये). ॥ १३ ॥ अथ देववत् सत्कृतः ज्येष्ठस्य भ्रातुः श्रेयस्कृत् (तत्त्वज्ञानाचा उपदेश करणारा) सर्वेषां प्रीतिं आवहन् [विदुरः] किंचित् कालं सुखं अवात्सीत्. (राहिला). ॥ १४ ॥

त्यांच्याकडील कांहीं वर्तमान ऐकून तरी आपणांस माहीत आहे काय ? ते आपल्या नगरांत खुशाल आहेत ना ? " ॥ ११ ॥ धर्मराजानें पूर्वी सांगितल्याप्रमाणें विदुरास प्रश्न केला असतां, त्यानें सर्व वृत्तांत क्रमानें धर्माला सांगितला, ' यदुकुलाचा क्षय झाला ' ही गोष्ट मात्र कळविली नाहीं. ॥ १२ ॥ - ती न कळविण्याचें कारण पुढें सांगितलेला न्याय होय :- एखादी वाईट, दुःसह वार्ता कळविण्याची वेळ आली असतां, त्या मनुष्यांना ती कळल्यावर फार दुःख होईल व तें आपल्यास पाहवणार नाहीं, असें ज्याला वाटत असेल, त्या दयालु पुरुषानें ती (वार्ता) स्वतां कळवूं नये. ॥ १३ ॥ पुढें कांहीं दिवसपर्यंत विदुर तेथें स्वस्थ राहिला. सर्व मंडळी त्याचा देवाप्रमाणें सत्कार करीत असे.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तेथें राहत असतां विदुरानें आपल्या ज्येष्ठ बंधूला (धृतराष्ट्राला) तत्वज्ञानाचा उपदेश केला. इतर मंडळीलाही त्याच्या सहवासानें फार सुख झालें. ॥ १४ ॥ - विदुर शूद्र होता, ह्मणून तो उपदेश करण्यास अधिकारी नव्हता, अशी शंका येईल. पण विदुराच्या खऱ्या स्थितीकडे लक्ष दिलें असतां ती येण्याचें कारण नाहीं: - विदुर हा यमाचा अवतार होय. - मांडव्य ऋषीच्या - शापांस्तव यमाला शंभर वर्षें पर्यंत शूद्रत्व (विदुररूप) स्वीकारणें भाग पडलें. तिकडे स्वर्गांत यमाच्या बद्दल पापी लोकांस योग्य दंड करण्याचें काम अर्यम्याकडे होतें. ॥ १५ ॥ लोकपालांसारखी (लोकपालांसारखी प्रभा आहे ज्यांची अशा) भ्रातृभिः युतः लब्धराज्यः युधिष्ठिरः कुलंधरं (वंशधर-वंशाचा अंकुर - अशा) पौत्रं (नातवाला) दृष्ट्वा परया श्रिया मुमुदे. ॥ १६ ॥ एवं

अबिभ्रदर्यमा दण्डं यथावदघकारिषु ॥ यावद्दधार शूद्रत्वं शापाद्वर्षशतं यमः ॥ १५ ॥
युधिष्ठिरो लब्धराज्यो दृष्ट्वा पौत्रं कुलंधरम् ॥ भ्रातृभिर्लोकपालाभैर्मुमुदे परया श्रिया ॥ १६ ॥
एवं गृहेषु सक्तानां प्रमत्तानां तदीहया ॥ अत्यक्रामदविज्ञातः कालः परमदुस्तरः ॥ १७ ॥
विदुरस्तदभिप्रेत्य धृतराष्ट्रमभाषत ॥ राजन्निर्गम्यतां शीघ्रं पश्येदं भयमागतम् ॥ १८ ॥

गृहेषु सक्तानां तदीहया (त्याच्या - गृहसुखाच्या व्यापारानें) **प्रमत्तानां [सतां] अविज्ञातः** (लक्षांत न आलेला) **परमदुस्तरः कालः अत्यक्रामत्** (निघून गेला). ॥ १७ ॥ **विदुरः तत् अभिप्रेत्य** (जाणून) **धृतराष्ट्रं अभाषत—'राजन् शीघ्रं निर्गम्यतां** (बाहेर पडावें)! **इदं भयं आगतं पश्य!** ॥ १८ ॥

काम अर्यम्याकडे होतें. ॥ १५ ॥ लोकपालांसारख्या आपल्या चौघा बंधूंसहवर्तमान धर्मराजा राज्यैश्वर्याचा उपभोग घेत असतां, वंशाचा अंकुर जो आपला नातू परीक्षित, त्याच्याकडे पाहून व आपल्या राज्यश्रीकडे पाहून त्याला फार आनंद होत असे. ॥१६॥ अशा रीतीनें पांडव गृहसुखांत सक्त होऊन तत्संबंधी व्यापारांमध्यें गुंग असतां बराच काल निघून गेला. ही गोष्ट त्यांच्या लक्षांत आली नाहीं. ॥ १७ ॥ तीं गोष्ट विदुराच्या ध्यानांत आली. ह्मणून त्यानें धृतराष्ट्राला सांगितलें :— " राजा, ! लवकर बाहेर

---

१ एकदां कांहीं चोर चोरी करून मांडव्यऋषीच्या आश्रमांत येऊन लपून राहिले होते. राजाचे दूत त्यांचा शोध करीत असतां, ह्या आश्रमांत त्यांना चार सांपडले. त्यांना बांधून नेत असतां, दूतांनीं मांडव्यऋषीलाही बरोबर नेलें, व राजाच्या आज्ञेवरून चोरांना सुळावर दिलें त्याबरोबर ऋषीलाही चढविलें. पुढें कांहीं वेळानें ते चोर मरण पावले, पण हा ऋषि महायोगी असल्यामुळें सुळावरच स्वस्थपणें बसला होता. ही गोष्ट राजाला समजली तेव्हां त्यानें लागलेंच ऋषीला सुळाखालीं उतरवून त्याची प्रार्थना केली; व अज्ञानानें घडलेल्या अपराधाबद्दल क्षमा मागितली. पुढें मांडव्यमुनि रागावून यमाकडे गेले व त्यांनीं यमाला विचारलें कीं ' मला सुळावर कां दिलें ? ' यमानें सांगितलें :— 'आपण लहानपणीं खेळत असतां दर्भाचा सूऴ करून त्यावर एका टोळाला चढविलें होतें; त्या अपराधाबद्दल आपल्याला ही शिक्षा मिळाली. ' त्यावर मांडव्यऋषींनीं, बाल्यावस्थेंत क्षुद्र अपराध घडला असतांही त्याबद्दल, यमानें मोठा दंड केला ह्मणून यमाला शाप दिला कीं, ' तूं शंभरवर्षेपर्यंत शूद्र होशील. २०

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

पड ! पुढें भयाची वेळ आली आहे ! ॥ १८ ॥ राजा ! ज्या भयाचें निवारण करण्याला उपाय कधींही कोणत्याच प्रकारचा नाहीं, तोच भगवान् काल (मृत्यु) आपल्या सर्वांकडे आला आहे. ॥ १९ ॥ जगांत जनाला अतिप्रिय वस्तु काय ती एक प्राण. पण त्या कालाची धाड येऊन पडतांच, त्याला ते (प्राण) देखील तत्क्षणीं सोडावे लागतात ! मग द्रव्य, बायको, पोरें सोडावीं लागतील, यांत आश्चर्य काय ? ॥२०॥ - तुझी स्थिति काय चमत्कारिक आहे पहा. - बाप, भाऊ, स्नेही, पुत्र, हे सर्व मरून गेले ! तरुणपण गेलें ! म्हातारपण आलें ! शरीर जरेनें ग्रासलें ! पण अद्यापि दुसऱ्याच्या घरीं कालक्षेप करितो आहेस ! ! ॥ २१ ॥ प्राण्यांची जीविताशा (आपण अद्यापि वांचूं

हे प्रभो, यस्य इह कुतश्चित् (कोठूनही-कोणत्याही प्रकारानें) कर्हिचित् (केव्हांही) प्रतिक्रिया (निवारण) न [अस्ति], सः एव भगवान् कालः नः सर्वेषां समागतः ! ॥ १९ ॥ येन च अभिपन्नः (ग्रस्त झालेला) एव अयं जनः प्रियतमैः प्राणैः अपि सद्यः (तत्क्षणीं) वियुज्येत (वियोग केला जातो), अन्यैः धनादिभिः किमुत ? ॥ २०॥ ते पितृभ्रातृसुहृत्पुत्राः हताः, वयः विगतं च आत्मा (शरीर) जरया ग्रस्तः, [अद्यापि] परगेहं (दुसऱ्याच्या घराला) उपासेस. ॥२१॥ अहो जंतोः जीविताशा महीयसी; यया भवान् भीमेन आवर्जितं (दिलेल्या)

प्रतिक्रिया न यस्येह कुतश्चित्कर्हिचित्प्रभो ॥ स एव भगवान्कालः सर्वेषां नः समागतः ॥ १९ ॥ येन चैवाभिपन्नो ऽयं प्राणैः प्रियतमैरपि ॥ जनः सद्यो वियुज्येत किमुतान्यैर्धनादिभिः ॥ २० ॥ पितृभ्रातृसुहृत्पुत्रा हतास्ते विगतं वयः ॥ आत्मा च जरया ग्रस्तः परगेहमुपाससे ॥ २१ ॥ अहो महीयसी जन्तोर्जीविताशा यया भवान् ॥ भीमेनावर्जितं पिण्डमादत्ते गृहपालवत् ॥ २२ ॥ अग्निर्निसृष्टो दत्तश्च गरो दाराश्च दूषिताः ॥ हृतं क्षेत्रं धनं येषां तद्दत्तैरसुभिः कियत् ॥ २३ ॥ तस्यापि तव देहो ऽयं कृपणस्य जिजीविषोः ॥ परैत्यनिच्छतो जीर्णो जरया वाससी इव ॥ २४ ॥

पिंडं गृहपालवत् (कुत्र्यासारखा) आदत्ते (घेतो). ॥२२॥ अग्निः निसृष्टः (टाकिलेला ह्म० लाविलेला), गरः (विष) दत्तः, दाराः दूषिताः (अपमान केलेली), येषां क्षेत्रं (राज्य) धनं हृतं, तद्दत्तैः असुभिः कियत् (काय प्रयोजन)? ॥ २३ ॥ तस्यापि कृपणस्य (दीन अशा) जिजीविषोः (वांचण्याची इच्छा करणाऱ्या) अनिच्छतः तव अयं जीर्णः देहः वाससी (वस्त्रें) इव परैति

ही आशा) मोठी विलक्षण आहे. - उदाहरण व प्रमाण पहावयाला लांब जावयाला नको, पहा - त्या आशेवरच, धृतराष्ट्रा, तूं भीमानें दिलेला अन्नाचा गोळा खाऊन कुत्र्यासारखा येथें राहिला आहेस. ॥ २२ ॥ अरे, - तुम्हीं पांडवांच्या घाताकरितां किती तरी गोष्टी केल्या : - त्यांना लाक्षागृहांत घालून त्या गृहाला आग तर लाविली, विष तर घातलें, त्यांच्या पत्नीचा अपमानही केला, त्यांच्या राज्याचा व द्रव्याचा अपहार केला, इतकें असूनही, धृतराष्ट्रा, त्याच पांडवांनीं दिलेल्या अन्नोदकावर प्राण धारण करितोस ! इतक्या स्थितींत राहिलें पाहिजे कशाला ? कांहीं कारण नाहीं. खुशाल दे सर्व सोडून आणि चालता हो. ॥ २३ ॥ इतक्या प्रकारें दैन्याचा अनुभव आलेला असूनही तुला

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अद्यापि वांचण्याची इच्छा आहे ! ' आतां मरावें. पुरे वांचणें ' असें तुला अद्यापि वाटत नाहीं ! पण तुझा हा देह तुझी इच्छा नसतांही जीर्ण होऊन, जशीं वस्त्रें उत्तरोत्तर क्षीण होतात, तसा क्षीण होत चालला आहे. - अजून तरी शहाणा हो. - ॥ २४ ॥ 'शहाणा' असें त्याच पुरुषाला ह्मणतात कीं, जो 'आपल्याला आतां यशःप्राप्तीची किंवा धर्मार्जनाची आशा राहिली नाहीं, ' असें समजल्याबरोबर विरक्त होत्साता अहंता व ममता यांचा त्याग करून, कोठें गेला हें कोणाला न कळेल अशा रीतीनें निघून जातो व देहाचा त्याग करितो. ॥ २५ ॥ उत्तम मनुष्य तोच खरा कीं, जो आपलें शरीर क्षीण होण्या पूर्वीच लोकांच्या उपदेशावरून; किंवा, आपणच होऊन, विरक्त होत्साता इन्द्रियनिग्रह

(क्षय पावतो). ॥ २४ ॥ [**यः पुरुषः**] **मुक्तबंधनः** (टाकिला आहे अभिमान ज्यानें असा) **विरक्तः अविज्ञातगतिः** (न समजली आहे गति ज्याची असा) [**सन्**] **गतस्वार्थं** (यशःप्राप्ति, धर्मार्जन इत्यादिकांविषयीं आशारहित अशा) **इमं देहं जह्यात्** (सोडील); **सः धीरः** (शहाणा) **उदाहृतः** (ह्मटलेला) **वै.** ॥ २५ ॥ **यः स्वकात्** (स्वतःसिद्ध अशा–उपदेशानें) **परतः** (दुसऱ्याच्या उपदेशानें) **जातनिर्वेदः** (विरक्त झालेला) **आत्मवान्** (इंद्रियनिग्रह करणारा) **हरिं हृदि कृत्वा गेहात्** (घरापासून) **प्रव्रजेत्** (निघून जाईल); **सः नरोत्तमः.** ॥ २६ ॥ अथ

गतस्वार्थमिमं देहं विरक्तो मुक्तबन्धनः ॥ अविज्ञातगतिर्ज्ह्यात्स वै धीर उदाहृतः ॥२५॥ यः स्वकात्परतो वेह जातनिर्वेद आत्मवान् ॥ हृदि कृत्वा हरिं गेहात्प्रव्रजेत्स नरोत्तमः ॥ २६ ॥ अथोदीचीं दिशं यातु स्वैरज्ञातगतिर्भवान् ॥ इतो ऽर्वाक्प्रायशः कालः पुंसां गुणविकर्षणः ॥ २७ ॥ एवं राजा विदुरेणानुजेन प्रज्ञाचक्षुर्बोधितो ह्याजमीढः ॥ छित्त्वा स्वेषु स्नेहपाशान्द्रढिम्नो निश्चक्राम भ्रातृसन्दर्शिताध्वा ॥ २८ ॥

भवान् स्वैः (स्वकीयांकडून–बांधवांकडून) **अज्ञातगतिः उदीचीं दिशं यातु, इतः अर्वाक्** (ह्यापुढें येणारा) **प्रायशः पुंसां** (पुरुषांच्या) **गुणविकर्षणः** (गुणांचा नाश करणारा) **कालः.** ॥२७॥ **एवं अनुजेन** (धाकट्या भावानें) **विदुरेण बोधितः भ्रातृसंदर्शिताध्वा** (भावानें दाखविला आहे मार्ग ज्याला असा) **प्रज्ञाचक्षुः** (बुद्धि हीच ज्याचे डोळे असा–आंधळा) **राजा आजमीढः** (अजमीढ वंशांत उत्पन्न झालेला–धृतराष्ट्र) **स्वेषु** (स्वकीयांच्या ठिकाणीं) **द्रढिम्नः** (दृढ अशा) **स्नेहपाशान् छित्त्वा निश्चक्राम** (बाहेर पडला). ॥ २८ ॥

करून, हृदयांत हरीचें ध्यान करीत घरांतून निघून जातो. ॥ २६ ॥ आतां, तूं, कोणीं बन्धु इत्यादि पाहणार नाहींत अशा रीतीनें उत्तर दिशेस जा. कारण, पुढें असा काल येणार आहे कीं, त्या वेळीं पुरुषांच्या गुणांचा नाश होईल. " ॥ २७ ॥ अन्ध धृतराष्ट्र अजमीढ वंशांत उत्पन्न झाला होता. विदुर हा त्याचा धाकटा भाऊ. त्यानें धृतराष्ट्राला बोध केला व हिताचा मार्ग दाखविला. त्या उपदेशाप्रमाणें धृतराष्ट्रानेंही स्वकीय मंडळीच्या ठिकाणीं असलेले स्नेहपाश तोडून टाकले; व तो घरांतून बाहेर पडला. ॥२८॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

सुबल राजाची कन्या गांधारी प्रसिद्ध महापतिव्रता होती. आपला पति हिमालय पर्वताकडे जावयास निघाला - असें समजल्याबरोबर - तीही त्याचे मागून जावयाला निघाली. शूर पुरुषांना जसें मोठें युद्ध आनंदाचें साधन असतें, तसें हिमालय पर्वतही विरक्त लोकांच्या आनंदाचें स्थान होय. ॥ २९ ॥ धर्मराजा अजातशत्रु होता, ह्मणजे त्याच्या मनांत कोणाहीबद्दल कधींच शत्रुभाव उत्पन्न झाला नाहीं. अशा त्या राजानें - प्रातःकाळीं - सूर्योपासना केल्यावर नित्यहोम दिला; पुढें, ब्राह्मणांची पूजा करून त्यांना तिल, गाई, भूमि, सुवर्ण इत्यादि दानें दिलीं. नंतर गांधारी, धृतराष्ट्र व विदुर यांना नमस्कार करण्याकरितां तो त्यांच्या घरांत गेला; पण तेथें तीं तिघेंही त्याच्या दृष्टीस

साध्वी पतिव्रता सुबलस्य पुत्री, मनस्विनां (शूर पुरुषांना) **सत्संप्रहारः** (धर्मयुद्ध) **इव, न्यस्तदंडप्रहर्षं** (विरक्त लोकांस आनंद आहे ज्याठिकाणीं अशा) **हिमालयं प्रयांतं पतिं अनु-जगाम** (मागून गेली). ॥ २९ ॥ **कृतमैत्रः** (सूर्योपासना-संध्यावंदन-केली आहे ज्यानें असा) **हुताग्निः** (होम केला आहे ज्यानें असा) **तिलगोभूमिरुक्मैः** (तिल, गाई, भूमि व सुवर्ण यांहीं) **विप्रान् नत्वा** (वंदन करून) **गुरुवंदनाय** (वडिलांस वंदन करण्याकरितां) **गृहं प्रविष्टः अजातशत्रुः पितरौ** (धृतराष्ट्र व विदुर यांस) **सौबलीं** (गांधारीला) **च न अपश्यत्.** ॥ ३० ॥

पतिं प्रयान्तं सुबलस्य पुत्री पतिव्रता चानुजगाम साध्वी ॥ हिमालयं न्यस्तदण्डप्रहर्ष
मनस्विनामिव सत्संप्रहारः ॥ २९ ॥ अजातशत्रुः कृतमैत्रो हुताग्निर्विप्रान्नत्वा तिलगोभू-
मिरुक्मैः ॥ गृहं प्रविष्टो गुरुवन्दनाय न चापश्यत्पितरौ सौबलीं च ॥ ३० ॥ तत्र सञ्जय
मासीनं पप्रच्छोद्विग्नमानसः ॥ गावल्गणे क्व नस्तातो वृद्धो हीनश्च नेत्रयोः ॥ ३१ ॥
अम्बा च हतपुत्रार्ता पितृव्यः क्व गतः सुहृत् ॥ अपि मय्यकृतप्रज्ञे हतबन्धुः स भार्यया ॥
आशंसमानः शमलं गङ्गायां दुःखितो ऽपतत् ॥ ३२ ॥

उद्विग्नमानसः [सः] तत्र आसीनं (बसलेल्या) **संजयं पप्रच्छ- 'गावल्गणे** (हे गवल्गणाच्या पुत्रा - संजया), **वृद्धः नेत्रयोः हीनः च नः तातः क्व ? ॥ ३१ ॥ हतपुत्रा आर्ता अंबा [क्व गता], सुहृत् पितृव्यः च क्व गतः, अपि हतबंधुः** (मारिले आहेत आप्त ज्याचे असा) **दुःखितः अकृतप्रज्ञे** (पक्व नाहीं-मंद-बुद्धि ज्याची अशा) **मयि शमलं**

पडलीं नाहींत ! ॥ ३० ॥ त्या वेळीं धर्मराजाला फार वाईट वाटलें. त्यानें, संजय तेथें बसला होता त्याला विचारिलें कीं:- " हे गवल्गणपुत्रा संजया, वृद्ध व नेत्रहीन असे आमचे वडील (चुलते) धृतराष्ट्र कोठें गेले ? ॥ ३१ ॥ तसेंच, जिचे पुत्र - आह्मीं - मारले ह्मणून जिला फार दुःख होत आहे, ती आमची माता गांधारी कोठें गेली ? आमचे पितृव्य विदुरही - येथें दिसत नाहींत - ते कोठें गेले ? मींच त्यांचे पुत्रादि आप्त मारले त्यामुळें ते अगोदर दुःखी आहेत. मी अगदीं मंदबुद्धि आहें. माझ्यावर कांहीं अपराधाची

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

शंका घेऊन आपल्या भार्येसह त्यांनीं (धृतराष्ट्रानें) गंगेंत देहत्याग तर केला नाहीं ना ? ॥ ३२ ॥ आमचा पिता पांडुराजा परलोकवासी झाला त्या वेळीं आहीं सर्व लहान लहान बाळें होतों, त्या वेळीं त्या संकटांपासून ज्यांनीं आमचें रक्षण केलें, ते आमचे पितृव्य धृतराष्ट्र व विदुर कोठें गेले ? " ॥ ३३ ॥ सूत ह्मणतात, ऋषिहो, संजयाची धृतराष्ट्रावर फारच प्रीति होती. जेव्हां त्याचा धनी धृतराष्ट्र कोठें दिसेना, तेव्हां, तो कृपेनें व विरहानें व्याकुळ झाला व त्यामुळें त्याच्यानें धर्मास कांहीं उत्तर देववेना. ॥३४॥ -बोलावयास आरंभ करणार तों डोळ्यांतून - अश्रु येऊं लागले, पण त्यानें ते हातांनीं पुसून टाकिले, सदसद्विचारशक्तीच्या योगानें मनाला धीर दिला, व धृतराष्ट्राच्या चरणांचें

(अपराधातें) **आशंसमानः** (शंका घेणारा) **सः भार्यया [सह] गंगायां अपतत्.** ॥३२॥ **पितरि प डौ उपरते** (पिता परलोकवासी झाला असतां) **[सति यौ] सुहृदः** (आप्ताच्या) **शिशून् सर्वान् नः व्यसनतः** (संकटांपासून) **अरक्षतां, [तौ] पितृव्यौ इतः क्व गतौ ?'** ॥३३॥ **सूतः उवाच**—**आत्मेश्वरं** (आपल्या धन्याला) **अचक्षाणः** (न पाहणारा) **कृपया स्नेहवैक्लव्यात्** (प्रीतीच्या उद्रेकामुळें) **विरहकर्शितः** (विरहानें व्याकुळ झालेला) **अतिपीडितः सूतः न प्रत्याह.** ॥३४॥ **पाणिभ्यां** (हातांनीं) **अश्रूणि विमृज्य** (पुसून) **आत्मना** (विचारशक्तीच्या योगानें) **आत्मानं**

पितर्युपरते पाण्डौ सर्वान्नः सुहृदः शिशून् ॥ अरक्षतां व्यसनतः पितृव्यौ क्व गताविति: ॥ ३३ ॥ सूत
उवाच । कृपया स्नेहवैक्लव्यात्सूतो विरहकर्शितः ॥ आत्मेश्वरमचक्षाणो न प्रत्याहातिपीडितः ॥ ३४ ॥
विमृज्याश्रूणि पाणिभ्यां विष्टभ्यात्मानमात्मना ॥ अजातशत्रुं प्रत्यूचे प्रभोः पादावनुस्मरन् ॥३५॥ संजय
उवाच । नाहं वेद व्यवसितं पित्रोर्वः कुलनन्दन ॥ गान्धार्या वा महाबाहो मुषितो ऽस्मि महात्मभिः
॥ ३६ ॥ अथाजगाम भगवान्नारदः सहतुम्बुरुः ॥ प्रत्युत्थायाभिवाद्याह सानुजो ऽभ्यर्चयन्मिव ॥ ३७ ॥

(मनाला) **विष्टभ्य** (धीर देऊन) **प्रभोः पादौ अनुस्मरन् अजातशत्रुं** (धर्मराजाला) **प्रत्यूचे**- ॥ ३५ ॥ **संजयः उवाच**— **'हे कुलनंदन** (हे कुलाला आनंद देणाऱ्या) **हे महाबाहो, वः पित्रोः गांधार्याः वा व्यवसितं** (मनांतील निश्चयातें) **अहं न वेद, महात्मभिः** (थोर पुरुषांनीं) **मुषितः** (फसविलेला) **अस्मि.'** ॥ ३६ ॥ **अथ सहतुंबुरुः** (तुंबुरूसहवर्तमान) **भग-**

स्मरण करीत करीत तो धर्माशीं बोलूं लागला. ॥३५॥ संजय ह्मणतो :— "हे महापराक्रमी धर्मराजा, तूं कुलाला आनंद देणारा आहेस. विदुर व धृतराष्ट्र या दोन्ही तुझ्या चुल-त्यांच्या व गान्धारीच्याही मनांतील निश्चय मला कळला नव्हता. ते थोर पुरुष तर खरेच, पण त्यांनीं मला फसविलें. " ॥ ३६ ॥ इतक्यांत त्रिकालज्ञानी नारदमुनि, बरोबर तुम्बु-रूला घेऊन, तेथें प्राप्त झाले. बन्धूंसह धर्मराजानें त्यांना उत्थापन दिलें, नमस्कार केला, व त्यांची पूजा करण्याकरितांच तो बोलूं लागला (तो शोकग्रस्त असल्यामुळें त्याच्यानें

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

प्रत्यक्ष पूजा करवेना; ह्मणून, त्यानें भाषणद्वारेंच त्यांचें पूजन केलें):– ॥३७॥ धर्म ह्मणालाः– " महाराज, आमचे चुलते धृतराष्ट्र व विदुर कोणीकडे गेले, हें मला समजत नाहीं. ते कोठें गेले असावे बरें? तसेंच, पुत्र मरणपावल्यामुळें दुःखाकुल व दीन अशी आमची माता गान्धारी कोठें गेली बरें? ह्या अपार शोकसमुद्रामध्यें नावाड्यासारखे वाट दाखविणारे समर्थ व सर्वज्ञ आपणच आहां. " ॥ ३८ ॥ नंतर ते मुनिश्रेष्ठ ज्ञानी नारद बोलूं लागले :– "हे राजा, तूं कोणाबद्दलही शोक करूं नकोस; कारण, हें सर्व जग ईश्वराच्या अधीन आहे. ॥ ३९ ॥ हे सर्व पालक राजे व इन्द्रादि लोकपाल, त्या परमेश्वराला बलिदान करितात. तोच ह्या भूतांचा संयोग करितो व वियोगही तोच करितो. ॥ ४० ॥

वान् नारदः आजगाम, सानुजः (बंधूंसह असा) [धर्मः] अभ्यर्चयन् इव प्रत्युत्थाय (उत्थापन देऊन), अभिवाद्य (वंदन करून), आह– ॥ ३७ ॥ 'हे भगवन्, अहं पित्रोः गतिं न वेद, इतः क्व गतौ? हतपुत्रा आर्ता (दुःखाकुल अशी) तपस्विनी अंबा वा क्व गता? अपारे [शोकार्णवे] कर्णधारः इव (नावाड्यासारिखा) भगवान् पारदर्शकः (पलीकडची वाट दाखविणारा)." ॥ ३८ ॥ अथ मुनिसत्तमः भगवान् नारदः आबभाषे (बोलता झाला) – " राजन्, कंचन मा शुचः (शोक करूं नको); यत् जगत् ईश्वरवशं. ॥ ३९ ॥ इमे सपालाः लोकाः यस्य ईशितुः बलिं वहंति (नेतात); सः भूतानि (प्राणिमात्रांस) संयुनक्ति (संयोग करितो), सः एव वियुनक्ति च (वियोग करितो). ॥ ४० ॥ यथा नसि (नाकांत) प्रोताः (वेसण घातलेले) स्वदामभिः (आपल्या दांव्यांनीं) तंत्यां (दावणीच्या ठिकाणीं) बद्धाः गावः (बैल), [तथा] नामभिः (वर्णाश्रमरूपी–नांवांनीं) वाक्तंत्यां (वेदरूपी दावणीच्या ठिकाणीं) बद्धाः [जनाः] ईशितुः बलिं वहंति. ॥ ४१ ॥ यथा क्रीडितुः (खेळणाऱ्याच्या) इच्छया क्रीडोपस्कराणां (खेळण्यांचे क्रीडासाधनांचे) संयोगविगमौ (संयोग आणि वियोग) स्यातां, तथा एव इह ईशेच्छया नृणां [संयोगवियोगौ]. ॥ ४२ ॥

युधिष्ठिर उवाच । नाहं वेद गतिं पित्रोर्भगवन् क्व गतावितः ॥ अम्बा वा हतपुत्रार्ता क्व गता च तपस्विनी ॥ कर्णधार इवापारे भगवान्पारदर्शकः ॥ ३८ ॥ अथाबभाषे भगवान्नारदो मुनिसत्तमः ॥ मा कञ्चन शुचो राजन्यदीश्वरवशं जगत् ॥ ३९ ॥ लोकाः सपाला यस्येमे वहन्ति बलिमीशितुः ॥ स संयुनक्ति भूतानि स एव वियुनक्ति च ॥ ४० ॥ यथा गावो नसि प्रोतास्तन्त्यां बद्धाः स्वदामभिः ॥ वाक्तन्त्यां नामभिर्बद्धा वहन्ति बलिमीशितुः ॥४१॥ यथा क्रीडोपस्कराणां संयोगविगमाविह ॥ इच्छया क्रीडितुः स्यातां तथैवेशेच्छया नृणाम् ॥४२॥

ज्याप्रमाणें बैल नाकांमध्यें वेसणी घालून दावें लावून दावणीला बांधले ह्मणजे धन्याचें पाहिजे तें काम करितात, तसें वेदरूपी दावणीशीं - ब्राह्मण, क्षत्रिय, ब्रह्मचारी, गृहस्थ इत्यादि नामरूपी दांव्यांनीं हे लोक बांधले असल्यामुळें परमेश्वराला बलि अर्पण करितात. ॥ ४१ ॥ जसें - बुद्धिबळें, किंवा दुसरीं कांहीं खेळणीं, - जवळजवळच्या घरांत आणणें किंवा लांब लांब नेणें खेळणाऱ्याच्या इच्छेवर अवलंबून असतें, तसेंच मनुष्यांचे संयोग व वियोग केवळ ईश्वराच्या इच्छेवर अवलंबून असतात. ॥ ४२ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

जर तूं, ह्या सर्व लोकांना, (१)'जे जीवरूपी आहेत ते नश्वर नव्हत (नित्य आहेत, त्यांना नाश नाहीं)' असें मानीत असशील; (२) अथवा - 'ते देहरूपी असल्यामुळें - नश्वर आहेत' असें मानीत असशील; किंवा (३) 'सर्वच ब्रह्मस्वरूप असल्यामुळें त्याला ध्रुव किंवा अध्रुव' कांहींच ह्मणतां येत नाहीं; (४) 'जीव चेतन व देह जड ह्या रूपानें पाहतां दोन्ही संभव तात' असें ह्मणशील, तरी - या चारी पक्षांत पाहिलें असतांही - त्या पित्रादिकांचा शोक करणें अगदीं अयोग्य दिसतें. शोकाला कारण काय तो अज्ञान मूलक स्नेह मात्र होतो. ॥ ४३ ॥ ह्मणून, हे राजा, - तुझ्या मनामध्यें अज्ञानामुळें जो खेद उत्पन्न झाला आहे कीं, तीं बापडीं अनाथ आहेत, माझ्या वांचून कशीं वांचतील, तो सर्व आतां सोडून दे. ॥ ४४ ॥ एखाद्या पुरुषाला सर्प गिळीत आहे; व त्यानें ह्मटलें कीं 'मीं दुसऱ्याचें रक्षण करीन;' तर तो कधीं तरी लोकाचें रक्षण करूं शकेल काय? नाहीं. तसाच हा देह

यत् लोकं ध्रुवं (नित्य अशा), **अध्रुवं** (नश्वर अशा), **न च, उभयं वा मन्यसे, मोहजात्** (अज्ञानापासून झालेल्या) **स्नेहात् अन्यत्र** (स्नेहव्यतिरिक्त) **ते सर्वथा नहि शोच्याः** (शोक करण्यास योग्य असे). ॥ ४३ ॥ **तस्मात्, हे अंग, मां विना अनाथाः कृपणाः ते कथं वर्तेरन्** (राहतील -- वांचतील), **[इति] आत्मनः अज्ञानकृतं वैक्लव्यं** (व्याकुलतेला) **जहि** (सोड). ॥ ४४ ॥ **पांचभौतिकः** (पांच भूतांपासून उत्पन्न झालेला) **देहः कालकर्मगुणाधीनः [अस्ति], यथा सर्पग्रस्तः** (सर्पानें गिळिलेला) **परं, [तथा] अयं अन्यान् कथं गोपायेत्** (रक्षण करील)?

यन्मन्यसे ध्रुवं लोकमध्रुवं वा न चोभयम् ॥ सर्वथा नहि शोच्यास्ते स्नेहादन्यत्र मोहजात् ॥ ४३ ॥ तस्माज्जह्यङ्ग वैक्लव्यमज्ञान-
कृतमात्मनः ॥ कथं त्वनाथाः कृपणा वर्तेरंस्ते च मां विना ॥ ४४ ॥ कालकर्मगुणाधीनो देहो ऽयं पाञ्चभौतिकः ॥ कथमन्यांस्तु
गोपायेत्सर्पग्रस्तो यथा परम् ॥ ४५ ॥ अहस्तानि सहस्तानामपदानि चतुष्पदाम् ॥ फल्गूनि तत्र महतां जीवो जीवस्य जीवनम्
॥ ४६ ॥ तदिदं भगवान् राजन्नेक आत्मात्मनां स्वदृक् ॥ अन्तरो ऽनन्तरो भाति पश्य तं माययोरुधा ॥ ४७ ॥

॥ ४५ ॥ **अहस्तानि** (हस्तरहित असे--पशु) **सहस्तानां, अपदानि चतुष्पदां, तत्र महतां** (मोठ्या प्राण्यांचे) **फल्गूनि** (लहान प्राणी), **जीवः जीवस्य जीवनं** (उपजीविकासाधन ह्मणजे भक्ष्य). ॥ ४६ ॥ **हे राजन्, तत् इदं [जगत्] आत्मनां** (भोक्त्यांचा) **आत्मा स्वदृक्** (ज्ञानी) **अंतरः** (आंतील) **अनंतरः** (बाहेरील) **एकः भगवान् [एव, सः] मायया उरुधा** (बहुत प्रकारें) **भाति** (भासतो), **तं पश्य.** ॥ ४७ ॥

पांच भूतांपासून उत्पन्न झालेला असून गुणांना क्षोभविणारा काल, कर्म व गुण (शरीरा बरोबर असणारीं कारणद्रव्यें) ह्यांच्या अधीन आहे - तीं चार चोहींकडे झालीं तर हा देहच जाग्यावर राहण्याची पंचाईत! - तेव्हां तो दुसऱ्याचें रक्षण कसा करूं शकेल? ॥ ४५ ॥ - ईश्वरानें जी वृत्ति ज्याला लावून दिलेली असेल, ती सर्वांस सुलभच आहे, उदाहरण — हस्तसहित - जे लोक मनुष्य इत्यादि - त्यांचें भक्ष्य हस्तरहित - पशु हे - होत. पशूंना - गवत इत्यादि - पादरहित पदार्थ भक्ष्य होत. त्यांतही निःशक्त लहान लहान प्राणी बलवान् मोठ्या प्राण्यांचें भक्ष्य होत. एतावता सर्व जीव सर्वांचें भक्ष्य आहेत. ॥ ४६ ॥ तें हें - हस्तरहित व हस्तसहित - सर्व जग परमेश्वररूपच आहे, - त्या ईश्वराहून निराळें

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

नाहीं, - तो ईश्वर ज्ञानी व सर्व भोक्त्यांचा आत्मा आहे. तो सर्व जगाच्या अन्तर्बाह्यस्वरूपामध्यें भोक्ता आणि भोग्य या रूपानें राहतो व वस्तुतः एक असतां आपल्या मायेच्या साह्यानें नानाप्रकारचा भासतो. धर्मा, हें त्याचें खरें स्वरूप ओळखून ठेव. ॥ ४७ ॥ हे धर्मराजा, तोच कालस्वरूपी भगवान् सर्व भूतांचे उत्पत्ति, पालन व नाश करितो. सांप्रत कालीं, तोच हा ईश्वर दैत्यांच्या नाशाकरितां ह्या पृथ्वीवर अवतरला आहे. ॥४८॥त्यानें देवांचें कार्य - दैत्यवध - बहुतेक आटोपलें. कांहीं थोडें (पृथ्वीला भारभूत अशा यादवकुलाचा संहार) राहिलें आहे. तें पुरें करण्याची तो वाट पाहतो आहे. राजा, कृष्ण पृथ्वीवर जितका वेळ राहणार आहे, तितका वेळ तुम्ही वाट पहा - व तो गेला

हे महाराज, भूतभावनः कालरूपः सः अयं भगवान् अद्य सुरद्विषां (देवद्वेष्ट्यांच्या-असुरांच्या) अभवाय (नाशाकरितां) अस्यां [भूम्यां] (ह्या पृथ्वीवर) अवतीर्णः (अवतरलेला). ॥ ४८ ॥ देवकृत्यं निष्पादितं (केलेलें), अवशेषं प्रतीक्षते (वाट पहात आहे), ईश्वरः यावत् इह भवेत्, तावत् यूयं अवेक्षध्वं (तुम्ही वाट पहा). ॥ ४९॥ भ्रात्रा स्वभार्यया गांधार्या च सह धृतराष्ट्रः हिमवतः (हिमालय पर्वताच्या) दक्षिणेन ऋषीणां आश्रमं गतः ॥ ५० ॥ या स्वर्धुनी (स्वर्गातील नदी ह्म० गंगा) [सा यत्र आत्मानं] नाना सप्तभिः स्रोतोभिः (प्र-

सो ऽयमद्य महाराज भगवान्भूतभावनः ॥ कालरूपो ऽवतीर्णो ऽस्यामभवाय सुरद्विषाम् ॥ ४८ ॥ निष्पादितं देवकृत्यमवशेषं प्रतीक्षते ॥ तावद्यूयमवेक्षध्वं भवेद्यावदिहेश्वरः ॥ ४९ ॥ धृतराष्ट्रः सह भ्रात्रा गान्धार्या च स्वभार्यया ॥ दक्षिणेन हिमवत ऋषीणामाश्रमं गतः ॥ ५० ॥ स्रोतोभिः सप्तभिर्या वै स्वर्धुनी सप्तधा व्यधात् ॥ सप्तानां प्रीतये नाना सप्तस्रोतः प्रचक्षते ॥ ५१ ॥ स्नात्वा ऽनुसवनं तस्मिन्हुत्वा चाग्नीन्यथाविधि ॥ अब्भक्ष उपशान्तात्मा स आस्ते विगतैषणः ॥ ५२ ॥ जितासनो जितश्वासः प्रत्याहृतषडिन्द्रियः ॥ हरिभावनया ध्वस्तरजःसत्त्वतमोमलः ॥ ५३ ॥

वाह्यांनीं) सप्तानां (ऋषीणां) (सात ऋषींच्या) प्रीतये सप्तधा (सात प्रकारांनीं) व्यधात् (करिती झाली), [अत एव तत्] सप्तस्रोतः प्रचक्षते (म्हणतात). ॥ ५१ ॥ सः तस्मिन् अनुसवनं (वेळच्यावेळीं) स्नात्वा यथाविधि अग्नीन् हुत्वा उपशांतात्मा (शांत मन ठेविलें आहे ज्यानें असा) अब्भक्षः (उदक प्राशन करणारा) विगतैषणः (नाहींशा झाल्या आहेत इच्छा ज्याच्या असा) आस्ते. ॥ ५२ ॥ जितासनः (साध्य केलें आहे आसन ज्यानें असा) जितश्वासः प्रत्याहृतषडिंद्रियः (स्वाधीन ठेविलीं आहेत सहा इंद्रियें ज्यानें असा) हरिभावनया ध्वस्तरजःस-

ह्मणजे तुम्हीही जा. - ॥ ४९ ॥ तुझा पितृव्य धृतराष्ट्र, आपली पत्नी व विदुर यांसह, हिमालय पर्वताच्या दक्षिण दिशेकडून ऋषींच्या आश्रमास गेला आहे. ॥ ५० ॥ स्वर्गांतील नदी जी गंगा, तिनें ज्या ठिकाणीं सप्त ऋषींच्या प्रीतीकरितां आपल्या प्रवाहाचे पृथक् पृथक् सात भेद केले आहेत, व ह्मणूनच त्या ठिकाणाला ' सप्तस्रोतस् ' असें नांव आहे. ॥५१॥ त्या ठिकाणीं धृतराष्ट्र यथाविधि स्नान होम इत्यादि वेळच्या वेळीं करीत असतो, व मन शांत ठेवून, केवळ उदक पिऊन, सर्व इच्छांचा त्याग करून, राहिला आहे. ॥५२॥आसनविधि व प्राणायाम त्याला साध्य झाले आहेत; सहाही इंद्रियें त्याच्या स्वाधीन आहेत; हरीचे नित्य ध्यान करीत असल्यामुळें त्याच्या अंतःकरणांतील रजोगुण, सत्वगुण

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आणि तमोगुण, नाहींसे झाले आहेत. ॥ ९३ ॥ - त्यानें मन व अहंकार ह्या दोहींना आश्रयभूत - आत्म्याला - स्थूलदेहापासून सोडवून - बुद्धीच्या ठिकाणीं लाविलें, त्या बुद्धीला क्षेत्रज्ञाचे ठिकाणीं लावून, त्या क्षेत्रज्ञालाही आधारब्रह्माचे ठिकाणीं लाविलें; याला उदाहरण, जसें घटाकाशाला महाकाशांत लीन करावें तसें (आकाश ह्मणजे पोकळी. महाकाश ह्म० मोठी अपरिमित पोकळी. घटाकाश महाकाशांत लीन करणें ह्म० तो घडा फोडणें किंवा नाहीं असें मानणें. घट फुटल्यावर त्याच्या पोटांतल्या आकाशाचा आधार सुटतो. तो आधार नाहींसा झाल्यामुळें त्याच्या पोटांतील पोकळीही मोठ्या आकाशांत मिळते). ॥ ९४ ॥ मायागुणांचें शेवटचें फळ वासना; ती (वासना) धृतराष्ट्राची नष्ट झाली. त्यानें

त्वतमोमलः (रजोगुण तमोगुण व सत्वगुण हे मल नाहींसे झाले आहेत ज्याचे असा). ॥ ५३ ॥ **आत्मानं विज्ञानात्मनि** (बुद्धीच्या ठिकाणीं) **संयोज्य, तं क्षेत्रज्ञे प्रविलाप्य** (लावून - लीन करून) **[तं] आधारे ब्रह्मणि घटांबरं** (घटांतील आकाशाला) **अंबरे इव [प्रविलाप्य]. ॥५४॥ ध्वस्तमायागुणोदर्कः** (नष्ट झालें आहे मायागुणांचें शेवटचें फल ह्म० वासना ज्याचें असा) **निरुद्धकरणाशयः** (आवरून धरिलीं आहेत इंद्रियें व मन ज्यानें असा) **निवर्तिताखिलाहारः** (सर्व प्रकारचा आहार कमी केला आहे ज्यानें असा) **अचलः स्थाणुः इव** (पर्वतासारिखा, स्तंभासारिखा) **आस्ते. ॥ ५५ ॥ संन्यस्ताखिलकर्मणः** (त्याग केला आहे सर्व कर्मांचा ज्यानें असा) **तस्य अंतरायः** (विघ्न) **मा एव अभूः** (होऊं नको); **हे राजन् सः अद्यतनात्** (आजपासून) **परतः** (पुढें)

विज्ञानात्मनि संयोज्य क्षेत्रज्ञे प्रविलाप्य तम् ॥ ब्रह्मण्यात्मानमाधारे घटाम्बरमिवाम्बरे ॥५४॥ ध्वस्तमायागुणोदर्को निरुद्धकरणाशयः ॥ निवर्तिताखिलाहार आस्ते स्थाणुरिवाचलः ॥५५ ॥ तस्यान्तरायो मैवाभूः संन्यस्ताखिलकर्मणः ॥ स वा अद्यतनाद्राजन्परतः पञ्चमेहनि ॥ कलेवरं हास्यति स्वं तच्च भस्मीभविष्यति ॥ ५६ ॥ दह्यमाने ऽग्निभिर्देहे पत्युः पत्नीसहोटजे ॥ बहिः स्थिता पार्तं साध्वी तमग्निमनु वेक्ष्यति ॥ ५७ ॥ विदुरस्तु तदाश्चर्यं निशाम्य कुरुनन्दन ॥ हर्षशोकयुतस्तस्माद्गन्ता तीर्थनिषेवकः ॥ ५८ ॥

पंचमे अहनि स्वं कलेवरं हास्यति (त्याग करील), **तच्च भस्मीभविष्यति. ॥५६॥ सहोटजे** (आश्रमासहित असा) **पत्युः देहे अग्निभिः दह्यमाने बहिः स्थिता साध्वी पत्नी तं पतिं अनु** (पतीच्यामागून) **अग्निं वेक्ष्यति** (प्रवेश करील). **॥५७॥ हे कुरुनंदन, विदुरः तत् आश्चर्यं निशाम्य** (पाहून) **हर्षशोकयुतः तीर्थनिषेवकः** (तीर्थयात्रा करणारा) **तस्मात् गंता** (जाईल). ॥ ५८ ॥

मन व इंद्रियें आवरून धरिलीं आहेत, सर्व प्रकाराचा आहार कमी केला आहे; व पर्वताप्रमाणें तो स्थिर राहिला आहे. ॥ ९५ ॥ - ह्मणून, तूं तेथें जाऊन - त्याला विघ्न करूं नको. त्यानें सर्व कर्मांचा त्याग केला आहे. तो आजपासून पांचव्या दिवशीं देहत्याग करील, व तो देह भस्म होईल. ॥ ९६ ॥ तो देह आश्रमासुद्धां, अग्नींच्या योगानें दग्ध होऊं लागला असतां, आश्रमाच्या बाहेर असलेली त्याची पत्नी साध्वी गांधारी, आपल्या पतीच्या मागून त्याच अग्नींत प्रवेश करील. ॥ ९७ ॥ राजा, विदुराला तें आश्चर्य पाहिल्यावर - बंधुमरणावद्दल - किंचित् खेद वाटेल, - पण धृतराष्ट्रानें योग्य मार्ग स्वीकारल्यावर चांगल्या रीतिनें त्याचा देहपात झाला, हें पाहून त्याला - हर्षही

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

होईल, पुढें विदुर तीर्थयात्रा करण्याकरितां निघून जाईल." ॥ ९८ ॥ - सूत ह्मणतातः— ऋषिहो, - नारदानें, मागें सांगितल्याप्रमाणें - धर्मराजाला धृतराष्ट्रावद्दल वृत्तांत सांगितला, - थोडासा उपदेशही केला, - आणि तुंबुरूसहवर्तमान स्वर्गास गमन केलें. धर्मानेंही त्याचें वचन हृदयांत ठेविलें व पुढें शोक केला नाहीं. ॥ ९९ ॥ ॥ इति श्रीमहाभागवतार्थदर्शने प्रथमस्कन्धे त्रयोदशो ऽध्यायः ॥ १३ ॥ - पुढें कित्येक दिवसांनीं, - अर्जुन आपल्या बंधूंच्या भेटीकरितां व पुण्यकीर्ति कृष्णपरमा-

अथ नारदः इति उक्त्वा सहतुंबुरुः (तुंबुरूसहवर्त्तमान) स्वर्गं आरुहत् (आरोहण करिता झाला); युधिष्ठिरः तस्य वचः हृदि कृत्वा शुचः (शोकातें) अजहात् (टाकिता झाला). ॥५९॥ ॥ इति श्रीभागवतान्वये प्रथमस्कंधे त्रयोदशो ऽध्यायः ॥ १३ ॥ ॥ बंधुदिदृक्षया (बंधूंस भेटण्याच्या इच्छेनें) पुण्यश्लोकस्य कृष्णस्य विचेष्टितं ज्ञातुं च जिष्णौ (अर्जुन) द्वारकायां संप्रस्थिते [सति] (गेला असतां); ॥१॥ तदा कतिचित् (कांहीं) मासाः व्यतीताः (गेले), अर्जुनः ततः न आयात्; कुरूद्वहः (धर्मराजा) घोररूपाणि निमि-

इत्युक्त्वाथारुहत्स्वर्गं नारदः सहतुम्बुरुः ॥ युधिष्ठिरो वचस्तस्य हृदि कृत्वा ऽजहाच्छुचः ॥ ५९ ॥ इति श्रीभा० म० प्रथमस्कन्धे त्रयोदशो ऽध्यायः ॥ १३ ॥ सूत उवाच । संप्रस्थिते द्वारकायां जिष्णौ बन्धुदिदृक्षया ॥ ज्ञातुं च पुण्यश्लोकस्य कृष्णस्य च विचेष्टितम् ॥ १ ॥ व्यतीताः कतिचिन्मासास्तदा नायात्ततो ऽर्जुनः ॥ ददर्श घोररूपाणि निमित्तानि कुरूद्वहः ॥ २ ॥ कालस्य च गतिं रौद्रां विपर्यस्तर्तुधर्मिणः ॥ पापीयसीं नृणां वार्तां क्रोधलोभानृतात्मनाम् ॥ ३ ॥ जिह्मप्रायं व्यवहृतं शाठ्यमिश्रं च सौहृदम् ॥ पितृमातृसुहृद्भ्रातृदम्पतीनां च कल्कनम् ॥ ४ ॥

त्तानि (शकुनांस) ददर्श. ॥ २ ॥ विपर्यस्तर्तुधर्मिणः (बदलले आहेत ऋतूचे धर्म ज्याचे ठिकाणीं अशा) कालस्य रौद्रां (भयंकर अशा) गतिं क्रोधलोभानृतात्मनां (क्रोध लोभ व असत्य यांनीं युक्त आहे मन ज्यांचें अशा) नृणां पापीयसीं वार्तां (उपजीविकेला). ॥ ३ ॥ व्यवहृतं (व्यवहार) जिह्मप्रायं (कपटयुक्त), सौहृदं (मित्रत्व) शाठ्यमिश्रं (वंचन – फसव-

म्यांचें चरित्र पाहण्याकरितां द्वारकेला गेला. ॥१॥ ह्या गोष्टीला कित्येक महिने गेले; पण अर्जुन तिकडून परत आला नाहीं. - इकडे - धर्मराजाला भयंकर अपशकुन होऊं लागले. ॥ २ ॥ - प्रत्येक ऋतूंतील कालक्रमाचे धर्म निराळे ठरलेले आहेत. - पण पूर्वीची कालगति बदलून भयंकर झाल्यामुळें, त्या धर्मांचा निर्बंध राहिला नाहीं; लोक क्रोधी, लोभी, असत्यवादी झाले व पापकर्में करूनच उदरनिर्वाह करूं लागले; ॥ ३ ॥ सर्व व्यवहार कपटी बनून गेले; मित्रत्व कपटानें मिश्र झालें; आई, बाप, मित्र, भाऊ नवरा, बायको,

१ ज्याची कीर्ति पुण्यकारक आहे असा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

यांमध्यें कलह होऊं लागले; ॥ ४ ॥ हळूहळू कालक्रमण होत असतां भयंकर अरिष्टें व उत्पात दिसूं लागले; पुरुषांची लोभ इत्यादि अधर्माकडे प्रवृत्ति होऊं लागली; हें पाहिल्यावर धर्मानें आपल्या कनिष्ठ बंधूला (भीमाला) झटलें.— ॥ ५ ॥ धर्म झणाला :— " भीमा! आपण अर्जुनाला, बंधूंची (यादवांची) भेट घेण्याकरितां व त्या पुण्यकीर्त परमात्म्यांचें चरित्र जाणण्याकरितां द्वारकेस पाठविलें; ॥ ६ ॥ ह्या गोष्टीला सात महिने लोटले; तथापि, भीमसेना! अजून तुझा कनिष्ठ बन्धु (अर्जुन) परत येत नाहीं, ह्याचें वास्तविक कारण काय तें मला समजत नाहीं. ॥ ७ ॥ नारदानें पूर्वी आपल्याला सांगितलें होतें कीं, ' आतां श्रीकृष्णपरमात्मा आपलें क्रीडेकरितां धारण केलेलें हें शरीर लवकरच

णूक युक्त), **पितृमातृसुहृद्भ्रातृदंपतीनां कलकनं** (कलह). ॥ ४ ॥ **अनुगते काले** (कालक्रमण होत असतां) **अत्यरिष्टानि** (अत्यंत अशुभ अशा) **निमित्तानि, नृणां लोभाद्यधर्मप्रकृतिं** (लोभ इत्यादि अधर्माकडे होणाऱ्या प्रवृत्तीला) **दृष्ट्वा, नृपः अनुजं** (कनिष्ठ बंधूला - भीमाला) **उवाच**—॥ ५ ॥ **युधिष्ठिरः उवाच—बंधुदिदृक्षया, पुण्यश्लोकस्य कृष्णस्य विचेष्टितं ज्ञातुं च जिष्णुः द्वारकायां संप्रेषितः** (पाठविलेला). ॥६॥ **सप्त मासाः गताः, भीमसेन, तव अनुजः अधुना कस्य हेतोः नायाति, इदं अहं अंजसा** (वास्तविक रीतीनें) **न वेद** (समजत नाहीं). ॥७॥

निमित्तान्यत्यरिष्टानि काले त्वनुगते नृणाम् ॥ लोभाद्यधर्मप्रकृतिं दृष्ट्वोवाचानुजं नृपः ॥ ५ ॥ युधिष्ठिर उवाच । संप्रेषितो द्वारकायां जिष्णुर्बन्धुदिदृक्षया ॥ ज्ञातुं च पुण्यश्लोकस्य कृष्णस्य च विचेष्टितम् ॥ ६ ॥ गताः सप्ताधुना मासा भीमसेन तवानुजः ॥ नायाति कस्य वा हेतोर्नाहं वेदेदमञ्जसा ॥ ७ ॥ अपि देवर्षिणादिष्ट सकालो ऽयमुपस्थितः ॥ यदात्मनो ऽङ्गमाक्रीडं भगवानुत्सिसृक्षति ॥ ८ ॥ यस्मान्नः सम्पदो राज्यं दाराः प्राणाः कुलं प्रजाः ॥ आसन्सपत्नविजयो लोकाश्च यदनुग्रहात् ॥ ९ ॥ पश्योत्पातान्नरव्याघ्र दिव्यान्भौमान्सदैहिकान् ॥ दारुणान् शंसतो ऽदूराद्भयं नो बुद्धिमोहनम् ॥ १० ॥

अपि देवर्षिणा दिष्टः (सांगितलेला) **सः अयं कालः उपस्थितः** (प्राप्त झालेला ह्म० येऊन पोहोंचलेला); **यत् भगवान् आत्मनः आक्रीडं** (क्रीडेला साधन अशा) **अंगं उत्सिसृक्षति** (सोडण्यास इच्छितो). ॥ ८ ॥ **यस्मात् नः संपदः, राज्यं, दाराः, प्राणाः, कुलं, प्रजाः, सपत्नविजयः** (शत्रूंवर - मिळविलेला- जय) **लोकाः** (परलोकप्राप्तीला साधनभूत जे यज्ञ) **च यदनुग्रहात् आसन्.** ॥ ९ ॥ **हे नरव्याघ्र, दिव्यान्** (आकाशांत होणाऱ्या), **भौमान्** (भूमीवर होणाऱ्या) **सदैहिकान्** (देहसंबंधी होणाऱ्यांसहित) **नः अदूरात्** (लवकरच) **बुद्धिमोहनं भयं शंसतः**

टाकणार आहे,' ती तर वेळ जवळ येऊन पोंचली नाहींना? ॥ ८ ॥ त्या देवाच्या कृपेनें आह्मांला सम्पत्ति, राज्य, स्त्रिया, प्राण, कुल, संतति ह्या सर्व गोष्टी प्राप्त झाल्या. त्याच्या अनुग्रहानेंच आह्मीं शत्रूंस जिंकलें, व परलोकप्राप्तीला साधन यज्ञही केले. ॥ ९ ॥ हे नरश्रेष्ठा! पहा, आकाशांतून - विद्युत्पात होतो आहे! - तसेंच पृथ्वीवर - भूकंपादिक- व देहसंबंधी (डावा डोळा लावणें इत्यादि व पुढील श्लोकांत सांगितले आहेत ते) भयंकर उत्पाक होत आहेत! ते असें सूचवीत आहेत कीं, लवकरच आपल्या बुद्धीला

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

मोह पडणारें भय प्राप्त होणार आहे ! ॥ १० ॥ माझे - डावे - मांडी, डोळा, बाहु हे अवयव वारंवार स्फुरण पावतात, हृदयांत कंप उत्पन्न होत आहे, ह्यांचें मला लवकरच कांहीं तरी वाईट फल प्राप्त होणार ! ॥ ११ ॥ ही भालू तोंडांतून अग्नि ओकीतच - जणूं, - सूर्योदयाचे वेळीं सूर्याकडे तोंड करून रडत आहे ! तसा हा कुत्रा माझ्याकडे पाहून निःशंक ओरडत आहे, अमदीं भीत नाहीं ! ॥ १२ ॥ पवित्र पशु - गाई हरिणें इत्यादि - मला डावी घालून जातात; व दुसरे - गर्दभादि अपवित्र पशु - मला उजवी

(सुचविणाऱ्या) **दारुणान् उत्पातान् पश्य !** ॥ १० ॥ **अंग, मह्यं ऊर्वक्षिबाहवः** (मांडी डोळा व बाहु) **पुनः पुनः स्फुरंति, हृदये वेपथुः** (कंप) **च अपि, आरात्** (समीप) **विप्रियं** (अनिष्ट फलाला) **दास्यन्ति.** ॥ ११ ॥ **अनलानना** (अग्निमुखी ह्मणजे तोंडांतून अग्नि टाकणारी) **एषा शिवा** (भालू) **उद्यन्तं** (उगवणाऱ्या) **आदित्यं अभिरौति** (रडते)! **हे अङ्ग, अयं सारमेयः** (कुत्रा) **अभीरुवत्** (निःशंक ह्मणजे धिट्टासारिखा) **मां अभिरौति** (मोठ्यानें ओरडतो)! ॥ १२ ॥ **शस्ताः** (पवित्र) **पशवः मां सव्यं कुर्वन्ति** (डावी घालून जातात), **अपरे** (इतर म्हणजे

ऊर्वक्षिबाहवो मह्यं स्फुरन्त्यंग पुनः पुनः ॥ वेपथुश्चापि हृदय आराद्दास्यन्ति विप्रियम् ॥ ११॥
शिवैषोद्यन्तमादित्यमभिरौत्यनलानना ॥ मामंग सारमेयोऽयमभिरौति ह्यभीरुवत् ॥ १२ ॥
शस्ताः कुर्वन्ति यां सव्यं दक्षिणं पशवोऽपरे ॥ वाहांश्च पुरुषव्याघ्र लक्षये रुदतो मम ॥ १३॥
मृत्युदूतः कपोतोऽयमुलूकः कम्पयन्मनः ॥ प्रत्युलूकश्च कुह्वानैरनिद्रौ शून्यमिच्छतः ॥ १४ ॥
धूम्रा दिशः परिधयः कम्पते भूः सहाद्रिभिः ॥ निर्घातश्च महानासीत्साकं च स्तनयित्नुभिः॥१५॥

अपवित्र पशू) **दक्षिणं [कुर्वन्ति]. हे पुरुषव्याघ्र, मम वाहान्** (घोडयांस) **रुदतः लक्षये** (मी पाहतों)! ॥ १३ ॥ **अयं मृत्युदूतः कपोतः, मनः कम्पयन् उलूकः** (घुबड), **प्रत्युलूकः** (त्याचा प्रतिपक्षी ह्म० दूचा घुबड ह्म० कावळा) **च अनिद्रौ कुह्वानैः** (कुशब्दांनीं) **शून्यं [कर्त्तुं]** (नाहींसें करण्यास) **इच्छतः** (इच्छितात). ॥ १४ ॥ **दिशः धूम्राः** (धुंद), **परिधयः** (सूर्यचन्द्रांना खर्डी), **सहाद्रिभिः** (पर्वतांसह) **भूः कम्पते, स्तनयित्नुभिः साकं** (गर्जनेसहित) **महान् निर्घातः** (निरभ्र वज्रपात) **च आसीत्** . ॥ १५ ॥

बोलीत आहेत, तसेंच, हे पुरुषश्रेष्ठा, हे माझे घोडे रडत आहेत, असें मला दिसून येतें ! ॥ १३ ॥ हा कपोत पक्षी साक्षात् मृत्यूनें - आपणासर्वांना बोलावून आणण्यास पाठविलेला - दूतच वाटतो ! तसेंच हीं दोन घुबडें अहोरात्र जागरण करून वाईट शब्द काढून जग नाहींसें व्हावें असें इच्छीत आहेत, असें वाटतें, व त्यामुळें माझ्या मनाला भीति उत्पन्न होते ! ॥ १४ ॥ दिशा धूंद दिसतात, - सूर्यचंद्रांना - खळीं पडलेलीं दिसून येतात, पर्वतांसह पृथ्वी कंपायमान होत आहेशी दिसते; अभ्रें नसतांही मेघगर्जना व मोठा

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

वज्रपात झाला ! ॥ १५ ॥ वाऱ्याचा स्पर्श शरीराला फार कठीण लागतो व त्या वाऱ्यांतून धूळ उडाल्यामुळें सर्वत्र अंधकार पडतो, मेघ जिकडे तिकडे बीभत्सपणें रक्ताची वृष्टि करितात; ॥ १६ ॥ सूर्याचें तेज कमी झालें आहे, आकाशांत परस्पर ग्रहांचें युद्ध चाललें आहे, रुद्रगण व इतरही प्राणी ह्यांनीं द्यावापृथ्वी व्याप्त केल्या आहेत, पहा ! ॥ १७ ॥ नद्या, नद, सरोवरें व सर्वांचीं अंतःकरणें क्षुब्ध झालेलीं दिसतात ! घृताच्या योगें अग्नि प्रदीप्त होत नाहीं ! तेव्हां असा हा काल पुढें करणार तरी काय ? ॥ १८ ॥ वत्स दुग्ध प्राशन करीत नाहींत व त्यांच्या माताही दूध देत नाहींत ! गोकुलांतील गाई डोळ्यांतून अश्रु गाळितात व रुदन करितात; त्याप्रमाणें वृषभही आनंदित दिसत नाहींत !

खरस्पर्शः (कठिण आहे स्पर्श ज्याचा असा) **रजसा** (धुळीनें) **तमः विसृजन्** (विशेष पसरणारा) **वायुः वाति** (वाहतो), **सर्वतः बीभत्सं इव** (बीभत्सपणें) **जलदाः** (मेघ) **असृक्** (रक्त) **वर्षन्ति** (वृष्टि करितात). ॥ १६ ॥ **हतप्रभं** (कमी झालें आहे तेज ज्याचें अशा) **सूर्य, दिवि** (आकाशांत) **मिथः** (परस्पर) **ग्रहमर्दं** (ग्रहांच्या युद्धाला), **ससंकुलैः** (नानाप्रकारच्या मिश्र झालेल्या प्राण्यांसहित) **भूतगणैः रोदसी** (आकाश आणि पृथ्वी यांस) **ज्वलिते इव** (पेटल्यासारिख्या) **पश्य !** ॥१७॥ **नद्यः नदाः च क्षुभिताः, सरांसि** (सरोवरें) **मनांसि च [क्षुभितानि], अग्निः आज्येन**

वायुर्वाति खरस्पर्शो रजसा विसृजंस्तमः ॥ असृग्वर्षन्ति जलदा बीभत्समिव सर्वतः ॥ १६ ॥ सूर्य हतप्रभं पश्य ग्रहमर्दं मिथो दिवि ॥ ससंकुलैर्भूतगणैर्ज्वलिते इव रोदसी ॥ १७ ॥ नद्यो नदाश्च क्षुभिताः सरांसि च मनांसि च ॥ न ज्वलत्यग्निराज्येन कालो ऽयं किं विधास्यति ॥ १८ ॥ न पिबन्ति स्तनं वत्सा न दुह्यन्ति च मातरः ॥ रुदन्त्यश्रुमुखा गावो न हृष्यन्त्यृषभा व्रजे ॥ १९ ॥ दैवतानि रुदन्तीव स्विद्यन्ति ह्युच्चलन्ति च ॥ इमे जनपदा ग्रामाः पुरोद्यानाकराश्रमाः ॥ भ्रष्टश्रियो निरानन्दाः किमघं दर्शयन्ति नः ॥ २० ॥ मन्य एतैर्महोत्पातैर्नूनं भगवतः पदैः ॥ अनन्यपुरुषश्रीभिर्हीना भूर्हतसौभगा ॥ २१ ॥

(घृतानें) **न ज्वलति, अयं कालः किं विधास्यति** (करील) ! ॥ १८॥ **वत्साः स्तनं न पिबंति. मातरः च न दुह्यन्ति** (दूध देत नाहींत), **व्रजे गावः अश्रुमुखाः**[सत्यः]**रुदन्ति, ऋषभाः** (वृषभ) **न हृष्यन्ति.** ॥१९॥ **दैवतानि** (देवस्थानें-प्रतिमा) **रुदन्ति इव स्विद्यन्ति** (घामाघूम होतात), **उच्चलंति** (चलन पावतात) **च ! इमे भ्रष्टश्रियः** (नष्ट झाल्या आहेत शोभा ज्यांच्या असे) **निरानंदाः जनपदाः,** (देश) **ग्रामाः, पुरोद्यानाकराश्रमाः** (नगरें बागा खाणी आश्रम) **किं अघं** (दुःखातें) **नः दर्शयंति !** ॥ २० ॥ **भूः अनन्यपुरुषश्रीभिः** (अन्य पुरुषांचे ठिकाणीं शोभा नसते ज्यांची अशा) ॥ १९ ॥ देवस्थानें जशीं रडत आहेत कीं काय असें वाटतें ! त्यांना घाम येतो व कांहीं कांहीं तर कंपित होतात व चलन पावतात; तसेच हे देश, गांव, नगरें, बागा, खाणी, आश्रम, ह्या सर्वांच्या शोभा व आनंद नाहींसे झाले आहेत. हीं आह्मांला कोणतें संकट दाखवीत आहेत ? (मग ह्यावरून आमच्यावर कोणतें संकट येणार कोण जाणे !) ॥२०॥ ह्या महाभयंकर उत्पातांवरून मला निश्चयानें असें वाटतें कीं, ही पृथ्वी भगवंताच्या चरणांनीं रहित झाली (भगवान् कृष्ण पृथ्वीला सोडून गेले) व त्यामुळें ही पृथ्वी हत-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

भाग्य झाली. - जोंपर्यंत ते येथें होते तोंपर्यंत कांहीं वाईट झालें नव्हतें - व व्हावयाचेंच नाहीं, कारण, त्यांचें ऐश्वर्यच तसें आहेः – त्या देवाच्या चरणांची शोभा दुसऱ्या कोणत्याही पुरुषाला यावयाची नाहीं. " ॥ २१ ॥ ऋषे ! मागें सांगितल्याप्रमाणें धर्मराजाला ते उत्पात दिसून आले, व तो मनांत विचार करीत होता. इतक्यांत, अर्जुन द्वारकेहून परत आला. ॥ २२ ॥ - अर्जुन आल्याबरोबर धर्मराजाच्या - पायां पडला. धर्मानें त्याच्याकडे पाहिलें तों, तो नेहमींप्रमाणें न दिसतां भयभीत दिसला; त्यानें खालीं तोंड घातलें होतें; व तो नेत्रकमलांतून अश्रु गाळीत होता; त्याचें तेज अगदीं नाहींसें झालें होतें. असे अर्जुनाचें स्वरूप पाहिल्याबरोबर धर्मराजाला भय वाटलें व नारदाच्या बोलण्याचें

भगवतः पदैः हीना [अत एव] हतसौभगा, [इति] एतैः महोत्पातैः नूनं मन्ये (मला वाटतें).' ॥ २१ ॥ **हे ब्रह्मन्, तस्य राज्ञः दृष्टारिष्टेन** (पाहिलीं आहेत अरिष्टें ज्यानें अशा) **चेतसा इति चिन्तयतः [सतः] कपिध्वजः** (कपि–मारुति–आहे ध्वजावर ज्याच्या असा–अर्जुन) **यदुपुर्याः** (द्वारकेहून) **प्रत्यागमत्** (परत आला). ॥ २२ ॥ **तं अनुजं पादयोः निपतितं अयथापूर्वं आतुरं** (भयभीत अशा) **अधोवदनं** (खालीं तोंड घातलें आहे ज्यानें अशा) **नयनाब्जयोः अम्बिंदून्** (अश्रूंतें) **मुञ्चन्तं** (गाळणाऱ्या) **विच्छायं** (नष्ट झालें आहे तेज ज्याचें अशा)

इति चिन्तयतस्तस्य दृष्टारिष्टेन चेतसा ॥ राज्ञः प्रत्यागमद्ब्रह्मन्यदुपुर्याः कपिध्वजः ॥२२॥ तं पादयोर्निपतितमयथापूर्वमातुरम् ॥ अधोवदनमब्बिन्दून्मुञ्चन्तं नयनाब्जयोः ॥ २३ ॥ विलोक्योद्विग्नहृदयो विच्छायमनुजं नृपः ॥ पृच्छति स्म सुहृन्मध्ये संस्मरन्नारदेरितम् ॥ २४ ॥ युधिष्ठिर उवाच । कच्चिदानर्तपुर्यां नः स्वजनाः सुखमासते ॥ मधुभोजदशार्हार्हाः सात्वतान्धकवृष्णयः ॥ २५ ॥ शूरो मातामहः कच्चित्स्वस्त्यास्ते वाऽथ मारिषः ॥ मातुलः सानुजः कच्चित्कुशल्यानकदुन्दुभिः ॥ २६॥ सप्त स्वसारस्तत्पत्न्यो मातुलान्यः सहात्मजाः ॥ आसते सस्नुषाः क्षेमं देवकीप्रमुखाः स्वयम् ॥ २७ ॥ कच्चिद्राजा ऽऽहुको जीवत्यसत्पुत्रो ऽस्य चानुजः ॥ हृदीकः ससुतो ऽक्रूरो जयन्तगदसारणाः ॥ २८ ॥ आसते कुशलं कच्चिद्ये च शत्रुजिदादयः ॥ कच्चिदास्ते सुखं रामो भगवान्सात्वतां प्रभुः ॥ २९ ॥

विलोक्य उद्विग्नहृदयः नृपः नारदेरितं (नारदानें सांगितलेल्यास) **संस्मरन् सुहृन्मध्ये** (मित्रमंडळींत) **पृच्छति स्म**—॥ २३ ॥ २४ ॥ **युधिष्ठिरः उवाच**— ' **आनर्तपुर्यां** (द्वारकेंत) **नः स्वजनाः मधुभोजदशार्हार्हाः, सात्त्वतांधकवृष्णयः सुखं आसते** (आहेत) **कच्चित्** ? ॥ २५ ॥ **अथ मारिषः** (मान्य—पूज्य) **शूरः मातामहः स्वस्ति आस्ते कच्चित्** ? **सानुजः मातुलः आनकदुन्दुभिः** (वसुदेव) **कुशली कच्चित्** ? ॥ २६ ॥ **देवकीप्रमुखाः तत्पत्न्यः सप्तस्वसारः** (सात बहिणी) **[नः] मातुलान्यः** (मामाच्या स्त्रिया) **सहात्मजाः** स्मरण झालें. तेव्हां त्यानें त्या मंडळीमध्येंच अर्जुनाला पुढील प्रश्न केलेः–॥२३॥२४॥ धर्म म्हणाला :–"अर्जुना! द्वारकेमध्यें आपले इष्ट सोयरे मधु, भोज, दशार्ह, अर्ह, सात्वत, अंधक, वृष्णि इत्यादि कुलांतील लोक सुखरूप आहेतना? ॥ २५ ॥ पूज्य असे आमचे शूरनामक आजोबा खुशाल आहेतना? तसेच, आमचे वसुदेवमामा आपल्या बंधूसह कुशलआ हेतना? ॥ २६ ॥ देवकीप्रभृति वसुदेवाच्या सात पत्न्या परस्पर बहिणी आहेत; त्या आमच्या मातुलस्त्रिया आपलीं मुलेंबाळें, सुना, यांसुद्धां स्वतां कुशल आहेतना? राजा उग्रसेन जीवंत

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आहेना? त्याला पुत्र नाहींच - मग त्याबद्दल आणखी दुसरें काय विचारावयाचें! - तसेंच, त्याचा भाऊ देवक, हृदीक, त्याचा पुत्र कृतवर्मा, अक्रूर, जयंत, गद, सारण, शत्रुजित् इत्यादि मंडळी खुशाल आहेना? तसेंच भगवान् यादवांचा पति बलराम सुखी आहेना? ॥ २७ ॥ २८ ॥ २९ ॥ सर्व यादवांमध्यें महारथ (महाशूर) प्रद्युम्न कुशल आहेना? तसेंच युद्धांमध्यें महान् पराक्रम करणारा अनिरुद्ध आनंदांत आहेना? ॥ ३० ॥ सुषेण, चारुदेष्ण, जाम्बवतीचा पुत्र सांब, तसेंच दुसरेही श्रेष्ठ कृष्णपुत्र ऋषभप्रभृति सर्व, आपल्या अपत्यांसह - खुशाल आहेतना? - ॥ ३१ ॥ तसेंच, श्रुतदेव, उद्धव, व सुनन्द नन्द इत्यादि कृष्णाचे अनुचर, तसेंच, आणखी इतरही यादववीर - खुशाल (मुलांसहित अशा) सस्नुषाः (सुनांसहवर्तमान अशा) स्वयं क्षेमं आसते [किं]? असत्पुत्रः (निपुत्रिक) राजा आहुकः (उग्रसेन) जीवति (जिवंत आहे), अस्य अनुजः, ससुतः हृदीकः, अक्रूरः, जयन्तगदसारणाः, ये च शत्रुजिदादयः [ते] कुशलं आसते कच्चित्? सात्वतां (यादवांचा) प्रभुः भगवान् रामः (बलराम) सुखं आस्ते कच्चित्? ॥२७ ॥ २८ ॥ २९ ॥ सर्ववृष्णीनां [मध्ये] महारथः प्रद्युम्नः सुखं आस्ते [किं]? गम्भीररयः (युद्धांत– मोठा पराक्रम आहे ज्याचा असा) भगवान् अनिरुद्धः वर्धते (आनंदांत आहे) उत? ॥ ३० ॥ सुषेणः, चारुदेष्णः, जाम्बवतीसुतः सांबः, अन्ये च ऋषभादयः सपुत्राः कार्ष्णिप्रवराः (कृष्णपुत्रांत श्रेष्ठ असे), ॥ ३१ ॥ तथैव श्रुतदेवोद्धवादयः शौरेः (कृष्णाचे) अनुचराः,

प्रद्युम्नः सर्ववृष्णीनां सुखमास्ते महारथः ॥ गम्भीररयो ऽनिरुद्धो वर्धते भगवानुत ॥ ३० ॥ सुषेणश्चारुदेष्णश्च साम्बो जाम्बवतीसुतः ॥ अन्ये च कार्ष्णिप्रवराः सपुत्रा ऋषभादयः ॥ ३१ ॥ तथैवानुचराः शौरेः श्रुतदेवोद्धवादयः सुनन्दनन्दशीर्ष्ण्या ये चान्ये सात्वतर्षभाः ॥ ३२॥ अपि स्वस्त्यासते सर्वे रामकृष्णभुजाश्रयाः ॥ अपि स्मरन्ति कुशलमस्माकं बद्धसौहृदाः ॥ ३३ ॥ भगवानपि गोविन्दो ब्रह्मण्यो भक्तवत्सलः ॥ कच्चित्पुरे सुधर्मायां सुखमास्ते सुहृद्वृतः ॥ ३४ ॥ मङ्गलाय च लोकानां क्षेमाय च भवाय च ॥ आस्ते यदुकुलाम्भोधावाद्यो ऽनन्तसखः पुमान् ॥ ३५ ॥

सुनन्दनन्दशीर्षण्याः अन्ये च सात्वतर्षभाः, ॥ ३२ ॥ रामकृष्णभुजाश्रयाः (बलराम व कृष्ण यांच्या भुजांचा आश्रय आहे ज्यांस असे) सर्वे अपि स्वास्ति आसते? बद्धसौहृदाः (ठेविली आहे प्रीति ज्यांचें ठिकाणीं असे) अस्माकं कुशलं अपि स्मरन्ति? ॥ ३३ ॥ भगवान् सुहृद्वृतः (मित्रमण्डळीसह) भक्तवत्सलः ब्रह्मण्यः (ब्राह्मणांचा हितकर्ता) गोविन्दः अपि पुरे सुधर्मायां सुखं आस्ते कच्चित्? ॥३४॥ आद्यः अनंतसखः पुमान् लोकानां मंगलाय क्षेमाय (प्राप्त झालेल्या वस्तूंच्या रक्षणाकरितां) भवाय (उत्कर्षाकरितां) च यदुकुलाम्भोधौ आस्ते. ॥३५ ॥

आहेतना? - ॥ ३२॥ ही सर्व मंडळी खुशाल आहेना? त्यांना श्रीरामकृष्णांच्या भुजांचा आश्रय आहे - तेव्हां ते खुशाल असतीलच; - पण, आह्मीं त्यांच्यावर प्रीति ठेवीत असतों, त्याबद्दल ते आमची कुशल वार्ता विचारितात काय? ॥ ३३ ॥ भगवान् श्रीकृष्ण, जो भक्तांविषयीं दयालु व ब्राह्मणांचा हितकर्ता आहे, तो आपल्या नगरांत सुधर्मानामक सभेमध्यें मित्रमंडळीसह खुशाल आहेना? ॥ ३४ ॥ - श्रीकृष्णाच्या स्वरूपाचें ज्ञान मला आहे - तो बलरामाचा सखा सर्वांचा आदिपुरुष होय. लोकांचें कल्याण व्हावें, त्यांना

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

सुख व्हावें व त्यांचा उत्कर्ष व्हावा, एवढ्याकरितां तो यादवकुलसमुद्रांत अवतरला आहे. ॥ ३५ ॥ कृष्णाच्या भुजदण्डांनीं रक्षिलेल्या द्वारकेमध्यें - त्याच्याच आश्रयावर - यादव, वैकुंठांतील कृष्णाच्या अनुचरांप्रमाणें, मोठ्या आनंदानें क्रीडा करितात, व सर्व लोक त्यांना (यादवांना) मान देतात. ॥ ३६ ॥ सत्यभामाप्रभृति त्या कृष्णाच्या सोळा हजार स्त्रिया युद्धामध्यें देवांना जिंकून, इन्द्राणीला योग्य - असे पारिजात वृक्षासारखे देवांचे - उपभोग्य पदार्थ हरण करून आणतात. - देवांना जिंकण्यास उपाय तपश्चर्या इत्यादि दुसरा कांहीं त्यांनीं केला नाहीं, - कृष्णाच्या चरणाची सेवा करणें हेंच त्यांचें मुख्य कर्तव्य. पण तेवढ्यानेंच त्या स्त्रिया मोठमोठीं कामें करितात! ॥ ३७ ॥

यदवः अर्चिताः (पूजिलेले) **[सन्तः] यद्बाहुदण्डगुप्तायां** (ज्याच्या बाहुदंडानें रक्षिलेल्या) **स्वपुर्यां महापौरुषिकाः इव** (विष्णूच्या--वैकुंठांतील--पार्षदगणांसारिखें) **परमानन्दं क्रीडन्ति.** ॥ ३६ ॥ **सत्यादयः** (सत्यभामा आदिकरून - स्त्रिया) **द्व्यष्टसहस्रयोषितः** (सोळा सहस्र स्त्रिया) **यत्पादशुश्रूषणमुख्यकर्मणा संख्ये** (युद्धांत) **त्रिदशान्** (देवांना) **निर्जित्य** (जिंकून) **वज्रायुधवल्लभोचिताः** (वज्र आहे आयुध ज्याचें अशाच्या--इंद्राच्या स्त्रीला--इंद्राणीला--योग्य अशा) **तदाशिषः** (त्यांना--देवांना--भोगावयास योग्य अशा) **हरन्ति.** ॥ ३७ ॥ **यद्बाहुदण्डाभ्युद-**

यद्बाहुदण्डगुप्तायां स्वपुर्यां यदवो ऽर्चिताः ॥ क्रीडन्ति परमानन्दं महापौरुषिका इव ॥ ३६ ॥ यत्पादशुश्रूषणमुख्यकर्मणा
सत्यादयो द्व्यष्टसहस्रयोषितः ॥ निर्जित्य संख्ये त्रिदशांस्तदाशिषो हरन्ति वज्रायुधवल्लभोचिताः ॥ ३७ ॥
यद्बाहुदण्डाभ्युदयानुजीविनो यदुप्रवीरा ह्यकुतोभया मुहुः ॥ अधिक्रमन्त्यंघ्रिभिराहृतां बलात् सभां सुधर्मां सुरसत्तमोचिताम्
॥ ३८ ॥ कच्चित्ते ऽनामयं तात भ्रष्टतेजा विभासि मे ॥ अलब्धमानो ऽवज्ञातः किं वा तात चिरोषितः ॥ ३९ ॥

यानुजीविनः (ज्याच्या-कृष्णाच्या--बाहुदंडाच्या प्रभावानें उपजीविका करणारे) **[अतः एव] अकुतोभयाः** (निर्भय असे) **यदुप्रवीराः** (यादववीर) **[सन्तः] सुरसत्तमोचितां बलात् आहृतां** (आणिलेल्या) **सुधर्मां सभां मुहुः** (वारंवार) **अंघ्रिभिः** (चरणांनीं) **अधिक्रमंति** (पादाक्रांत करितात). ॥ ३८ ॥ **तात, कच्चित् ते अनामयं** (आरोग्य)? **मे भ्रष्टतेजाः**

'सुधर्मा' नांवाची सभा स्वर्गांतील इंद्राच्या दरबारालाच योग्य खरी, परंतु कृष्णानें आपल्या बलानें ती द्वारकेंत आणली आहे; तेव्हां यादववीर तिला नेहमीं पादाक्रांत करितात. (तेथें नेहमीं नेहमीं त्यांच्या सभा होतात.) - पण तें सामर्थ्य यादवांच्या अंगीं येण्याला तरी कारण श्रीकृष्णच, - त्याच्यामुळेंच ते निर्भय आहेत; आणि त्याच्या (कृष्णाच्या) बाहुबलाच्या उत्कर्षामुळेंच ते उपजीविका व अशीं महत्कृत्यें करतात. ॥ ३८ ॥ बा अर्जुना, तुझी शरीरप्रकृति स्वस्थ आहेना? मला तुझें तेज कमी झालेंसें दिसतें! बाळा, फार दिवस यादवांकडे राहिलास, ह्मणून तुझ्या मानपानांत किंवा आदरसत्कारांत कमीपणा आला नाहींना? त्यांनीं तुझा अपमान केला कीं काय? ॥ ३९ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

किंवा प्रेमशून्य व कठोर अशा शब्दांनीं तर तुला कोणीं प्रहार केले नाहींतना? अथवा एखाद्या वस्तूवर याचकाची आशा गेलेली पाहून 'ती तुला दिली' असें कबूल केल्या-वर तुझ्या हातून ती वस्तू देणें घडलें नाहीं कीं काय? ॥ ४० ॥ शरण आलेल्याचें रक्षण करणें हें तुझें व्रत आहे; ब्राह्मण, बालक, धेनु, वृद्ध, रोगी, किंवा स्त्री, ह्यांपैकीं एखादा प्राणी तुला शरण आला असतां त्याचा त्याग (उपेक्षा) तुझ्या हातून घडला नाहींना? ॥ ४१ ॥ तूं एखाद्या निंद्य स्त्रीपाशीं तर गमन केलें नाहींना? किंवा एखाद्या गमन करण्यास योग्य स्त्रीजवळ तिचा सत्कार न करितां गमन केलें नाहींसना? - त्यामुळें वाईट वाटण्याचा संभव आहे. - किंवा वाटेमध्यें, सारख्या योग्यतेच्या लोकांनीं अथवा

विभासि (भासतोस)! **तात, किंवा चिरोषितः** (फार दिवस राहिलेला) [**अत एव**] **अलब्धमानः** (मान न मिळालेला) **अवज्ञातः** (तिरस्कार केलेला)? ॥ ३९ ॥ **अमंगलैः** (कठोर अशा) **अभावैः** (प्रेमशून्य अशा) **शब्दादिभिः न अभिहतः** (प्रहार केलेला) **कच्चित्? आशया यत् प्रतिश्रुतं** (वचन दिलेलें–कबूल केलेलें) **उक्तं अर्थिभ्यः न दत्तं** [**किम्**]? ॥४०॥ **शरणप्रदः** (रक्षण-आश्रय देणारा) **त्वं शरणोपसृतं** (शरणागतांला) **सत्त्वं, ब्राह्मणं, बालं, गां, वृद्धं, रोगिणं, स्त्रियं** [**वा**] **न अत्याक्षीः** (त्याग-उपेक्षा–केला नाहींस) **कच्चित्?** ॥ ४१ ॥ **कच्चित् त्वं अगम्यां** (गमन करण्यास अयोग्य अशा) **वा असत्कृतां गम्यां स्त्रियं नागमः** (गेला नाहींस)? **अथ पथि** (मार्गात) **भवान् नोत्तमैः** (श्रेष्ठ नव्हे अशा ह्म० तुझ्या सारख्याच योग्य-

कच्चिन्नाभिहतो ऽभावैः शब्दादिभिरमंगलैः ॥ न दत्तमुक्तमर्थिभ्य आशया यत्प्रतिश्रुतम् ॥ ४० ॥ कच्चित्त्वं ब्राह्मणं बालं गां वृद्धं रोगिणं स्त्रियम् ॥ शरणोपसृतं सत्त्वं नात्याक्षीः शरणप्रदः ॥ ४१॥ कच्चित्त्वं नागमो ऽगम्यां गम्यां वा ऽसत्कृतां स्त्रियम् ॥ पराजितो वा ऽथ भवान्नोत्तमैर्नासमैः पथि ॥ ४२ ॥ अपिस्वित्पर्यभुंक्थास्त्वं संभोज्यान्वृद्धबालकान् ॥ जुगुप्सितं कर्म किंचित्कृतवान्न यदक्षमम् ॥ ४३ ॥ कच्चित्प्रेष्ठतमेनाथ हृदयेनात्मबन्धुना ॥ शून्यो ऽस्मि रहितो नित्यं मन्यसे ते ऽन्यथा न रुक् ॥ ४४ ॥ इति श्री०म०प्र० युधिष्ठिरवितर्को नाम चतुर्दशो ऽध्यायः ॥ १४ ॥

तेच्या पुरुषांनीं) **नासमैः** (नीच पुरुषांनीं) **पराजितः वा?** ॥ ४२ ॥ **अपिस्वित् त्वं सम्भोज्यान्** (प्रथम भोजन घालण्यास योग्य अशा) **वृद्धबालकान् पर्यभुंक्थाः** (टाकून ह्मणजे भोजन न देतां तूं जेवलास)? **यत् अक्षमं** (अयोग्य) **तत् जुगुप्सितं** (निंद्य अशा) **कर्म न कृतवान् कचित्?** ॥ ४३ ॥ **अथ कचित् प्रेष्ठतमेन** (अति प्रिय अशा) **आत्मबन्धुना हृदयेन रहितः शून्यः अस्मि** [**इति**] **नित्यं मन्यसे? अन्यथा ते न रुक्** (मनाला पीडा)!' ॥ ४४ ॥ ॥ **इति श्रीभागवतान्वये प्रथमस्कन्धे चतुर्दशो ऽध्यायः** ॥ १४ ॥

नीच पुरुषांनीं तुझा पराभव केला नाहींना? ॥ ४२ ॥ वृद्ध व बालक ह्यांना प्रथम भोजन घालून (त्यांच्या भोजनाची तजवीज करून) नंतर आपण भोजन करावें, असें शास्त्र आहे. तेव्हां तूं तसल्या लोकांचा त्याग करून (त्यांच्या भोजनांची व्यवस्था केल्याशिवाय) भोजन केलें नाहींना? अथवा एखादें आचरण करण्यास अयोग्य असें निंद्य कर्म केलें नाहींना? ॥ ४३ ॥ अथवा सर्वांपेक्षां अतिप्रिय अंतर्यामी जो श्रीकृष्णपरमात्मा त्याच्या विरहामुळें तूं स्वतांला नित्य शून्य मानीत आहेस कीं काय? ('माझा

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

प्रिय मित्र कृष्ण गेला, तेव्हां आतां मी असून नसून सारखाच, ' असें तुला एकसारखें वाटत आहे कीं काय ?) इतर रीतीनें तुझ्या मनाला पीडा होण्यास कोणत्याही प्रकारचें कांहीं कारण दिसत नाहीं." ॥ ४४ ॥ ॥ इति श्रीमद्भागवतार्थदर्शने प्रथमस्कन्धे चतुर्दशो ऽध्यायः ॥ १४ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥

अर्जुन श्रीकृष्णाचा परम मित्र असल्यामुळें त्याच्या (कृष्णाच्या) विरहामुळें फार कृश झाला होता; व त्याच्या रूपाकडे पाहिलें असतां पाहणाराला निरनिराळ्या प्रकारच्या शंका येत. धर्मराजानें तें अर्जुनाचें रूप पाहिल्याबरोबर त्याबद्दल - मागील अध्यायांत सांगितल्याप्रमाणें - विकल्प काढिले. ॥ १ ॥ - कृष्णाच्या विरहास्तव - शोक

कृष्णविश्लेषकर्शितः (कृष्णाच्या विरहानें कृश झालेला) कृष्णसखः कृष्णः (अर्जुन) भ्रात्रा राज्ञा, नानाशंकास्पदं (नानाप्रकारच्या शंका येण्याला योग्य अशा) रूपं [आलक्ष्य], एवं विकल्पितः. ॥ १ ॥ शोकेन शुष्यद्वदनहृत्सरोजः (सुकून गेलीं आहेत मुखकमल आणि हृदयकमल हीं ज्याचीं अशा) हतप्रभः तमेव विभुं अनुध्यायन् [सः] प्रतिभाषितुं (प्रत्युत्तर देण्यास) न अशक्नोत्. ॥ २ ॥ कृच्छ्रेण (कष्टानें) शुचः संस्तभ्य (आवरून), नेत्रयोः पाणिना (हातानें) आमृज्य (पुसून), परोक्षेण (पुनः दर्शन न होणाऱ्या श्रीकृष्णाच्या योगानें) समुन्नद्ध-

सूत उवाच । एवं कृष्णसखः कृष्णो भ्रात्रा राज्ञा विकल्पितः ॥ नानाशंकास्पदं रूपं कृष्णविश्लेषकर्शितः ॥ १ ॥
शोकेन शुष्यद्वदनहृत्सरोजो हतप्रभः ॥ विभुं तमेवानुध्यायन्नाशक्नोत्प्रतिभाषितुम् ॥ २ ॥ कृच्छ्रेण संस्तभ्य शुचः
पाणिना ऽऽमृज्य नेत्रयोः ॥ परोक्षेण समुन्नद्धप्रणयौत्कण्ठ्यकातरः ॥ ३ ॥ सख्यं मैत्रीं सौहृदं च सारथ्यादिषु
संस्मरन् ॥ नृपमग्रजमित्याह बाष्पगद्गदया गिरा ॥ ४ ॥

प्रणयौत्कण्ठ्यकातरः (फार प्रेमाच्या उत्कंठतेनें व्याकुल असा) [बभूव]. ॥ ३ ॥ कृष्णस्य सख्यं, सारथ्यादिषु मैत्रीं, सौहृदं च संस्मरन् अग्रजं (वडील अशा) नृपं बाष्पगद्गदया (अश्रूंनीं सद्गदित झालेल्या) गिरा (वाणीनें) इति आहः—॥ ४ ॥

रूपी - अग्नि उत्पन्न होऊन - त्यामुळें अर्जुनाचें मुख आणि हृदय हीं दोन्ही कमलें अगदीं सुकून गेलीं होतीं; कृष्णच मनांत घोळत असल्यामुळें अर्जुनाच्यानें कांहीं बोलवेना. ॥ २ ॥ त्यानें मोठ्या कष्टानें आपला शोक आवरून धरिला, व हातांनीं डोळे पुसले; श्रीकृष्णाचे ठिकाणीं त्याचें फार प्रेम असल्यामुळें, त्याचें दर्शन पुन्हां व्हावयाचें नाहीं असें मनांत आल्याबरोबर अर्जुनाला फार उद्विग्नता उत्पन्न झाली, व तो फार व्याकुळ झाला. ॥ ३ ॥ कृष्णाची स्वतःविषयींची हितबुद्धि, सारथ्यादिकांचे वेळीं त्यानें केलेले उपकार व मित्रत्व, ह्या सर्वांची अर्जुनाला स्मृति झाली; व अश्रु आल्यामुळें कंठावरोध होऊन त्याची वाणी सद्गदित झाली. अशा स्थितींतच त्यानें आपल्या वडील बंधूस

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

(धर्मराजाला) वृत्तांत सांगण्यास प्रारंभ केला. ॥ ४ ॥ अर्जुन ह्मणाला :– "धर्मराजा, कृष्ण आपला बंधु हितकर्ता खरा, पण त्यानें मला फसविलें! माझ्या ठिकाणीं देवांनींही आश्चर्य करण्याजोगें जें सामर्थ्य होतें तें त्यानें हरण केलें! ॥ ५ ॥ - आपल्या पित्याचा कां देह असेना, पण - त्यांतून प्राण निघून गेला कीं त्याला 'शव' असें नांव येतें, व तो वाईट दिसूं लागतो, तसें त्या ईश्वराचा क्षणमात्र वियोग झाल्याबरोबर हे संपूर्ण लोक फार वाईट दिसूं लागले. ॥ ६ ॥ द्रौपदीच्या स्वयंवरप्रसंगीं द्रुपदराजाच्या घरीं पुष्कळ राजे आले होते व ते सर्व कामानें उन्मत्त झाले होते; पण श्रीकृष्णाच्या आश्रयानें मी त्या सर्व राजांचें तेज हरण केलें, धनुष्य सज्ज करून मत्स्याचा वेध केला

अर्जुनः उवाच—'महाराज, बंधुरूपिणा हरिणा अहं वंचितः (फसविलेला); **येन मे देवविस्मापनं** (देवांसही विस्मित करणारें) **महत् तेजः अपहृतं.** ॥ ५ ॥ **यथा उक्थेन** (प्राणानें) **रहितः एषः मृतकः प्रोच्यते, [तथा] यस्य क्षणवियोगेन** (क्षणमात्र वियोगानें) **लोकः अप्रियदर्शनः.** ॥६॥ **यत्संश्रयात्** (ज्याच्या आश्रयानें) **मया स्वयंवरमुखे द्रुपदगेहं** (द्रुपदराजाच्या घरीं) **उपागतानां** (आलेल्या) **स्मरदुर्मदानां** (कामानें अति मत्त झालेल्या) **राज्ञां तेजः हृतं खलु, सज्जीकृतेन धनुषा मत्स्यः अभिहतः** (वेध केलेला), **कृष्णा** (द्रौपदी) **च अधिगता**

अर्जुन उवाच । वञ्चितो ऽहं महाराज हरिणा बन्धुरूपिणा ॥ येन मे ऽपहृतं तेजो देवविस्मापनं महत् ॥ ५ ॥ यस्य क्षणवियोगेन लोको ह्यप्रियदर्शनः ॥ उक्थेन रहितो ह्येष मृतकः प्रोच्यते यथा ॥ ६ ॥ यत्संश्रयाद् द्रुपदगेहमुपागतानां राज्ञां स्वयंवरमुखे स्मरदुर्मदानाम् ॥ तेजो हृतंखलु मया ऽभिहतश्च मत्स्यः सज्जीकृतेन धनुषा ऽधिगता च कृष्णा ॥ ७ ॥ यत्सन्निधावहमु खाण्डवमग्नये ऽदामिन्द्रं च सामरगणं तरसा विजित्य ॥ लब्धा सभा मयकृता ऽद्भुतशिल्पमाया दिग्भ्यो ऽहरन्नृपतयो बलिमध्वरे ते ॥ ८ ॥ यत्तेजसा नृपशिरोंऽघ्रि-महन्मखार्थे आर्यो ऽनुजस्तव गजायुतसत्त्ववीर्यः ॥ तेनाहृता प्रमथनाथमखाय भूपा यन्मोचितास्तदनयन्बालिमध्वरे ते ॥ ९ ॥

(प्राप्त झालेली). ॥ ७॥ **उ यत्सन्निधौ अहं सामरगणं** (देवगणांसहवर्तमान अशा) **इन्द्रं तरसा** (आवेशानें) **विजित्य खाण्डवं अग्नये अदां** (देता झालों), **मयकृता अद्भुतशिल्पमाया** (अद्भुत कौशल्य व माया आहे जीमध्यें अशी) **सभा लब्धा, ते अध्वरे** (यज्ञांत) **नृपतयः दिग्भ्यः** (सर्व दिशांकडून) **बलिं** (करभारांतें) **अहरन्.** ॥ ८ ॥ **यत्तेजसा आर्यः गजायुतसत्ववीर्यः** (दहा सहस्र हत्तींच्याप्रमाणें उत्साह व बल आहे ज्यास असा) **तव अनुजः** (कनिष्ठ बंधु) **नृपशिरोंघ्रि** (राजांच्या मस्तकांवर पाय दिला आहे ज्यानें अशाला) **मखार्थे अहन्; यत् तेन प्रमथनाथमखाय**

व द्रौपदी प्राप्त करून घेतली. ॥ ७ ॥ तो भगवान् जवळच होता, ह्मणूनच मी युद्धामध्यें इंद्राला व त्याच्या सर्व देवगणांना मोठ्या आवेशानें जिंकिलें, अग्नीला खांडववन दिलें, आणि मयासुराला संतुष्ट करून त्याकडून नानाप्रकारच्या कौशल्यांनीं व आश्चर्यांनीं भरलेलें तें प्रसिद्ध सभागृह मिळविलें; तसेंच, त्याच्या सांन्निध्यामुळेंच तुझ्या राजसूययज्ञांत सर्व दिशांकडून राजांनीं करभार आणून दिले. ॥ ८ ॥ तुझा कनिष्ठ बंधु जो आर्य भीम –ज्याला दहा सहस्र हत्तींच्या प्रमाणें उत्साह व बल आहे,–त्यानें तरी त्या कृष्णाच्या

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

प्रभावावरच, यज्ञाकरितां, सर्व राजांना पादाक्रांत करणाऱ्या जरासन्धाला मारिलें, व त्या जरासन्धानें महाभैरवाच्या पूजाप्रसंगीं बलि देण्याकरितां आणून - कोंडून ठेवलेले - राजे सोडविले, ह्मणूनच त्या राजांनीं तुझ्या यज्ञामध्यें करभार आणून दिले. ॥ ९॥ तसेंच, त्या दुष्टांनीं (कौरवांनीं) द्रौपदीला सभेंत आणलें, - त्या वेळची तिची स्थिति फार दया येण्यासारखी होती :- तिच्या मुखावरून आंसवांचे प्रवाह येऊन पायांवर पडत होते, तिच्या केशपाशावर यज्ञामध्यें महाभिषेक झालेला, पण तिच्या त्या वेळच्या स्थितीकडे किंवा केशांच्या महत्त्वाकडे कांहीं लक्ष्य न देतां त्या कपटी दुःशासनप्रभृति मंडळींनीं त्यांना (केशांना) स्पर्श केला; ह्मणून - भीमानें कृष्णाच्या आधारावर - त्यांचा वध

(महाभैरवाच्या पूजेसाठीं) **आहताः भूपाः** (राजे) **मोचिताः** (सोडविलेले), **तत् ते अध्वरे बलिं अनयन्.** ॥ ९ ॥ **यैः कितवैः** (दुष्टांनीं) **पदयोः पतिताश्रुमुख्याः** (गळले आहेत अश्रु जिच्या मुखावरून अशा) **तव पत्न्याः अधिमखकॢप्तमहाभिषेकश्लाघिष्ठचारुकबरं** (राजसूय—यज्ञाचे प्रसंगीं केलेल्या महाभिषेकानें—झालेल्या अतिशय महत्त्वाच्या व फार रम्य अशा केशपाशाला) **विकीर्य** (सोडून) **सभायां स्पृष्टं, तत्स्त्रियः हतेशविमुक्तकेशाः** (भ्रतारांचा वध झाल्यामुळें मोकळे झाले आहेत केश ज्यांचे अशा) **अकृत** (करिता झाला). ॥ १० ॥ **यः अयुताग्रभुक्** (दहासहस्रांच्या-

पत्न्यास्तवाधिमखकॢप्तमहाभिषेकश्लाघिष्ठचारुकबरं कितवैः सभायाम् ॥ स्पृष्टं विकीर्य पदयोः पतिताश्रुमुख्या
यैस्तत्स्त्रियो कृतहतेशविमुक्तकेशाः ॥ १० ॥ यो नो जुगोप वनमेत्य दुरन्तकृच्छ्राद्दुर्वाससो ऽरिविहितादयुताग्र-
भुग्यः ॥ शाकान्नशिष्टमुपयुज्य यतस्त्रिलोकीं तृप्तामममंस्त सलिले विनिमग्नसंघः ॥ ११ ॥

शिष्यांच्या--अग्रभागीं पंक्तीस जेवणारा) [**आसीत्**], **तस्मात् दुर्वाससः अरिविहितात्** (शत्रूनें पाठविलेल्या) **दुरंतकृच्छ्रात्**, (महासंकटापासून), **यः वनं एत्य** (येऊन) **शाकान्नशिष्टं** (भाजीचें पान ह्या राहिलेल्या अन्नातें) **उपयुज्य** (खाऊन) **नः** (आह्मांस) **जुगोप** (रक्षिता झाला); **यतः** (ज्याच्या योगानें) **सलिले** (उदकांत) **विनिमग्नसंघः** (स्नान करीत असलेला--ऋषींचा समुदाय) **त्रिलोकीं तृप्तां अमंस्त** (मानिता झाला). ॥ ११ ॥

करून त्यांच्या स्त्रियांचे केश मोकळे केले. (त्यांच्या स्त्रियांना वैधव्य आणिलें.) ॥ १०॥ दुर्वास ऋषीचें भोजन ह्मणजे त्याच्या पंक्तीला दहाहजार ऋषि असावयाचे. जेव्हां आपण वनवासांत होतों तेव्हां आपल्या शत्रूनें (दुर्योधनानें) त्या ऋषीला आपणाकडे पाठविलें. - त्यावेळीं आपल्यापाशीं आदरातिथ्याची सामग्री नसल्यामुळें त्यापासून शाप मिळावयाचाच- हें एक मोठें संकटच प्राप्त झालें होतें. पण कृष्णानें तेथें येऊन आमचें रक्षण केलें. - कृष्णानें प्रथम पात्राला चिकटून - राहिलेलें भाजीचें पान खाल्लें; त्यामुळें - झाला काय चमत्कार, कीं भोजन करण्यापूर्वी - ऋषींचा समुदाय उदकांत स्नान करीत असतां, त्यांना वाटलें कीं, संपूर्ण त्रैलोक्य तृप्त झालें आहे, - आतां भोजनाची अपेक्षा नाहीं. - ॥११॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

त्या कृष्णाच्या तेजामुळेंच, मीं भगवान् शंकराला युद्धांत आश्चर्यचकित केलें, व त्यामुळें पार्वतीसह शंकरानें - प्रसन्न होऊन - मला आपलें पाशुपतास्त्र दिलें; तसेंच, इतर लोकपालांनीं देखील आपआपलीं आयुधें दिलीं; मीं ह्या मनुष्य शरीरानें इंद्रलोकांत जाऊन त्या महान् इंद्राचें अर्धें आसन मिळविलें. ॥ १२ ॥ धर्मराजा, मी तेथें स्वर्गामध्येंच विहार करीत राहिलों होतों. त्या ठिकाणीं इंद्रादिक देवही आपल्या शत्रूंच्या नाशाकरितां माझ्या भुजदण्डाचा आश्रय करीत असत, - व त्यांचीं संकटें मी दूर करीत असें. कारण, - माझ्या बाहूंमध्यें श्रीकृष्णानें तसें सामर्थ्य ठेविलें होतें व गांडीव धनुष्यही माझ्या जवळ होतें, - दोन्ही प्रकारांनीं माझ्या ठिकाणीं तेज असल्यामुळें तशा गोष्टी माझ्या

यत्तेजसा सगिरिजः (पार्वतीसहवर्तमान) **भगवान् शूलपाणिः** (त्रिशूल आहे हातांत ज्याच्या असा--शंकर) **युधि विस्मापितः [सन्] मे निजं** (स्वतःच्या) **अस्त्रं अदात्, अन्ये अपि [लोकपालाः निजानि अस्त्राणि अदुः], अहं अमुना** (ह्या) **एव कलेवरेण** (देहानें) **महेन्द्रभवने महदासनार्धं** (इंद्राच्या अर्ध्या आसनाला) **प्राप्तम्. ॥ १२ ॥ हे आजमीढ, सेंद्राः देवाः तत्रैव विरहतः** (क्रीडा करणाऱ्या) **मे गांडीवलक्षणं यदनुभावितं** (ज्यानें प्रभावयुक्त केलेलें) **भुजदण्डयुग्मं अरातिवधाय** (शत्रूंच्या-दैत्यांच्या-वधाकरितां)

यत्तेजसा ऽथ भगवान्युधि शूलपाणिर्विस्मापितः सगिरिजो ऽस्त्रमदान्निजं मे ॥ अन्ये ऽपि चाहममुनैव कलेवरेण प्राप्तं महेन्द्रभवने महदासनार्धम् ॥ १२ ॥ तत्रैव मे विहरतो भुजदण्डयुग्मं गाण्डीवलक्षणमरातिवधाय देवाः ॥ सेन्द्राः श्रिता यदनुभावितमाजमीढ तेनाहमद्य मुषितः पुरुषेण भूम्ना ॥ १३ ॥ यद्बान्धवः कुरुबलाब्धिमनन्तपारमेको रथेन ततरे ऽहमतीर्यसत्त्वम् ॥ प्रत्याहृतं बहुधनं च मया परेषां तेजास्पदं मणिमयं च हृतं शिरोभ्यः ॥ १४ ॥ यो भीष्मकर्णगुरुशल्यचमूष्वदभ्रराजन्यवर्यरथमण्डलमण्डितासु ॥ अग्रेचरो मम विभो रथयूथपानामायुर्मनांसि च दृशा सह ओज आर्छत् ॥ १५ ॥

श्रिताः, तेन भूम्ना पुरुषेण अद्य (आज) **अहं मुषितः** (लुटलेला-फसविलेला) ! ॥ १३ ॥ **यद्बांधवः** (ज्याचा--श्रीकृष्णाचा आश्रय आहे ज्याला असा) **एकः अहं अनंतपारं** (अंत व पार नाहीं ज्याला अशा) **अतीर्यसत्वं** (दुस्तर जलचर आहेत ज्यांत अशा) **कुरुबलाब्धिं** (कौरवसैन्यरूपी समुद्राला) **रथेन ततरे** (तरून गेलों), **मया बहुधनं च प्रत्याहृतं, परेषां शिरोभ्यः तेजास्पदं** (तेजाचें स्थान अशा) **मणिमयं [धनं] च हृतं. ॥ १४ ॥ हे विभो, यः मम अग्रेचरः** (अग्रभागीं राहणारा) **[सन्] अदभ्रराजन्यवर्यरथमंडलमंडितासु** (पुष्कळ मोठमोठ्या क्षत्रि-

हातून घडल्या. - पण आतां त्या कृष्णानें मला फसविलें - व तो स्वस्वरूपाला गेला. - ॥ १३ ॥ - युद्धाच्या वेळेस, - मी एकाकी असतांही, तो अफाट कौरवसैन्य-समुद्र रथाच्या योगानें तरून गेलों. - तो समुद्र सामान्य नव्हे, तर त्यामध्यें भीष्मासारखे महावीररूपी भयंकर - जलचर असल्यामुळें, तरून जाण्यास कठीण होता. पण कृष्णाच्या आश्रयावर मी त्यांतून पार पडलों, तसेंच शत्रूनें हरण केलेलें गोधन पुन्हां परत आणिलें, व शत्रूंवर मोहनास्त्र टाकून त्यांच्या तेजाचीं स्थानें अशीं शिरस्त्राणें रत्नें मुकुट इत्यादि पुष्कळ हरण केलीं. ॥ १४ ॥ हे समर्था धर्मराजा, - युद्धप्रसंगीं - भीष्म, कर्ण, द्रोणाचार्य व शल्य यांचीं सैन्यें, मोठमोठ्या क्षत्रियांच्या रथसमुदायानें शोभत

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

होतीं (भयंकर दिसत होतीं). पण त्या कृष्णानें अशा सैन्यांत - सारथिरूपानें - माझ्या अग्रभागीं राहून आपल्या दृष्टीच्या योगानें त्यांच्या रथरक्षकांचीं व सैन्यरक्षकांचीं आयुष्यें, उत्साहशक्ति, बल व शस्त्रकौशल्य हीं सर्व हरण केलीं. ॥ १५ ॥ तसेंच, द्रोण, भीष्म, कर्ण, अश्वत्थामा, त्रिगर्त देशांचा राजा सुशर्मा, शल्य, सिंधुदेशांचा राजा जयद्रथ, बाल्हीक इत्यादि वीरांनीं - माझ्यावर - पुष्कळ अस्त्रें सोडिलीं; - तीं देखील सामान्य नव्हेत, तर - त्यांचें सामर्थ्य कधींही फुकट जावयाचें नाहीं अशीं होतीं; पण, जसें पूर्वी नृहरीच्या सेवकावर (प्रल्हादावर) हिरण्यकशिपुप्रभृति दैत्यांनीं पुष्कळ अस्त्रें सोडिलीं तरी त्यांपासून प्रल्हादाला कांहीं अपाय घडला नाहीं, तसें मीं त्या ईश्वराच्या

यांच्या रथसमुदायानें शोभणाऱ्या) **भीष्मकर्णगुरुशल्यचमूषु रथयूथपानां** (रथरक्षक व सैन्यरक्षक यांच्या) **आयुः, मनांसि** (उत्साहशक्तीला), **सहः** (बलाला), **ओजः** (अस्त्रादि कौशल्याला) **दृशा आर्छत्** (हरण करिता झाला). ॥ १५ ॥ **गुरुभीष्मकर्णद्रौणित्रिगर्तशलसैंधवबाल्हिकाद्यैः** (द्रोण, भीष्म, कर्ण, अश्वत्थामा, त्रिगर्तदेशांचा राजा सुशर्मा, शल्य, सिंधुदेशांचा राजा जयद्रथ, बाल्हीक इत्यादि--वीरांनीं) **निरूपितानि** (सोडलेलीं) **अमोघमहिमानि** (फुकट न जाणारें आहे सामर्थ्य ज्यांचें अशीं) **अस्त्राणि, आसुराणि नृहरिदासमिव** (नृहरिसेवकाच्या -प्रल्हादाच्याप्रमाणें), **यद्दोःषु** (ज्याच्या भुजदंडांवर--दंडांच्या आश्रयांवर) **प्रणिहितं** (अवलंबून असणाऱ्या) **मा** (मला) **नो पस्पृशुः** (स्पर्श करिती झालीं नाहींत). ॥ १६ ॥ **यदनुभावनिरस्तचित्ताः**

यद्दोःषु मा प्रणिहितं गुरुभीष्मकर्णद्रौणित्रिगर्तशलसैन्धवबाह्लिकाद्यैः ॥ अस्त्राण्यमोघमहिमानि निरूपितानि नो पस्पृशुर्नृ-हरिदासमिवासुराणि ॥ १६ ॥ सौत्ये वृतः कुमतिना ऽऽत्मद ईश्वरो मे यत्पादपद्ममभवाय भजन्ति भव्याः ॥ मां श्रान्तवाहमरयो रथिनो भुविष्ठं न प्राहरन्यदनुभावनिरस्तचित्ताः ॥ १७ ॥ नर्माण्युदाररुचिरस्मितशोभितानि हे पार्थ हे ऽर्जुन सखे कुरुनन्दनेति ॥ संजल्पितानि नरदेव हृदिस्पृशानि स्मर्तुर्लुठन्ति हृदयं मम माधवस्य ॥ १८ ॥

(ज्याच्या प्रभावानें फिरविलीं आहेत अंतःकरणें ज्यांचीं असे) **रथिनः अरयः** (शत्रु) **श्रान्तवाहं** (थकले आहेत घोडे ज्याचे अशा) **भुविष्ठं** (भूमीवर उतरलेल्या) **मां न प्राहरन्, भव्याः** (श्रेष्ठ--साधु) **यत्पादपद्मं अभवाय** (मोक्षाकरितां) **भजंति, [सः] आत्मदः** (आत्मपद--मोक्ष देणारा) **ईश्वरः कुमतिना मे सौत्ये** (सारथ्याच्या कामीं) **वृतः** (योजिलेला). ॥ १७ ॥ **हे नरदेव, माधवस्य उदाररुचिरस्मितशोभितानि** (गंभीर व सुंदर हास्यानें शोभणाऱ्या) **नर्माणि** (थट्टेच्या भाषणांस), **[तथा] हे पार्थ, हे अर्जुन, हे सखे, हे कुरुनन्दन, इति**

भुजदंडांच्या आश्रयावर अवलंबून होतों, म्हणून मला त्या अस्त्रांनीं स्पर्श देखील केला नाहीं. ॥ १६ ॥ - जयद्रथवधाच्या दिवशीं उदक न मिळाल्यामुळें - माझ्या रथाचे घोडे थकले : - व मी बाणांनीं पृथ्वी विदारण करून घोड्यांकरितां पाणी काढावें म्हणून - भूमीवर उतरलों होतों:- ती वेळ शत्रूंनीं मला मारण्यास फार चांगली होती, - पण कृष्णानें आपल्या प्रभावानें सर्व शत्रूंचीं अंतःकरणें फिरविलीं, म्हणून कोणालाही मला मारण्याची बुद्धि झाली नाहीं. श्रेष्ठ साधु आपल्याला पुनर्जन्म नसावें म्हणून त्याच्या चरणकमलाचें भजन करितात, असें ज्याचें सामर्थ्य त्या ईश्वराला मी सारथ्याच्या कामीं लावलें, किती तरी माझी हीं दुष्ट बुद्धि ! ॥ १७ ॥ हे राजा त्या माधवानें केलेलीं

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

गंभीर व सुंदर हास्यानें शोभणारीं थट्टेचीं भाषणें व प्रसंगविशेषीं दिलेली 'हे पार्था, हे अर्जुना, हे मित्रा, हे कुरुनंदना (कौरवकुलास आनंदविणाऱ्या)' अशीं मनोवेधक संबोधनें मला अद्यापि आठवतात! व त्यामुळें अंतःकरण कसें क्षुब्ध होऊन जातें! ॥ १८ ॥ आमचें उभयतांचें (कृष्णार्जुनांचें) निजणें बसणें उठणें, फिरणें बढाया मारणें, भोजन इत्यादि एकत्र असल्यामुळें, त्यानें केलेली एखादी कपटाची गोष्ट झालेली पाहिली असतां-'तुम्हीं आमचे स्नेही, मोठे सत्यवक्ते,' अशा भाषणांनीं मी त्याचा धिक्कार करावा. पण वास्तविक मोठाच तो, त्यानें आपल्या मोठेपणानें, जसे मित्रानें मित्राचे अपराध सहन करावे, अथवा पित्यानें पुत्राचे सोसावे, तसे माझे सर्व अपराध सहन केले.

हृदिस्पृशानि (मनाला वेधणाऱ्या) **संजल्पितानि** (भाषणांस) **स्मर्तुः मम हृदयं लुठन्ति** (क्षुब्ध करितात). ॥ १८ ॥ **शय्यासनाटनविकत्थनभोजनादिषु** (निजणें, बसणें, उठणें, फिरणें, बढाया मारणें, भोजन इत्यादि स्थलीं) **ऐक्यात् 'वयस्य, ऋतवान्** (मोठा सत्यवक्ता)' **इति विप्रलब्धः** (तिरस्कार केलेला) **महान्** [**सः**], **सख्युः सखा इव, तनयस्य** (मुलाच्या) **पितृवत्, कुमतेः**

शय्यासनाटनविकत्थनभोजनादिष्वैक्याद्वयस्य ऋतवानिति विप्रलब्धः ॥ सख्युः सखेव पितृवत्तनयस्य
सर्वं सेहे महान्महितया कुमतेरघं मे ॥ १९ ॥ सो ऽहं नृपेन्द्र रहितः पुरुषोत्तमेन सख्या प्रियेण सुहृदा
हृदयेन शून्यः ॥ अध्वन्युरुक्रमपरिग्रहमंग रक्षन् गोपैरसद्भिरबलेव विनिर्जितो ऽस्मि ॥ २० ॥

मे सर्वं अघं (अपराधाला) **महितया** (मोठेपणानें) **सेहे** (सहन करिता झाला)! ॥ १९ ॥ **अंग नृपेंद्र, सख्या प्रियेण सुहृदा पुरुषोत्तमेन रहितः** [**अतः**] **हृदयेन शून्यः सः अहं अध्वनि** (मार्गांत) **उरुक्रमपरिग्रहं** (कृष्णाच्या स्त्रीरूप परिवाराला) **रक्षन् असद्भिः** (नीच अशा) **गोपैः, अबला इव** (बायकांप्रमाणें), **विनिर्जितः** (पराभव केला गेलेला) **अस्मि.** ॥ २० ॥

॥१९॥ हे राजा युधिष्ठिरा, - तुझ्या मनांत माझा (अर्जुनाचा) नीचांनीं पराभव केला असावा अशी शंका आली होती, तीही खरी आहे: - कृष्ण माझा सखा परम प्रिय मित्र होता - ही गोष्ट प्रसिद्ध आहे; - त्यानें मला सोडिलें, तेव्हां अर्थात माझें हृदयच नाहींसें झालें झटलें तरी चालेल (पूर्वीची सर्व अस्त्रविद्या व मंत्र मला आतां मुळींच आठवत नाहींत). - त्यामुळें असें झालें कीं, मी समुद्रावरून येतांना - वाटेंत श्रीकृष्णाच्या सोळा हजार स्त्रियारूप परिवाराचें रक्षण करीत असतां माझ्यापेक्षां नीच अशा गवळ्यांनीं माझा, एखाद्या

---

१ हा दोष आहे खरा; पण मित्रांचा परस्पर संवाद चालला असतां त्यामधें 'स्वगुणश्लाघा' हा एक प्रकारचा अलंकार आहे, हें मार्मिक वाचकांच्या लक्षांत असेलच.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

बायकोप्रमाणें, पराभव केला! ॥ २० ॥ राजे लोक ज्याला शिरसावन्दन करीत, तेंच धनुष्य, तेच बाण, तोच रथ, तेच घोडे, तोच मी रथी, पण ह्या सर्व वस्तु श्रीकृष्णरहित झाल्यामुळें कोणतेंही काम करण्यास समर्थ राहिल्या नाहींत. जसें, भस्मामध्यें केलेला होम, गारोड्यासारख्या मायाव्यापासून मिळविलेल्या वस्तु, किंवा ऊखर भूमींत पेरलेलें धान्य निरुपयोगी असतें, तसें माझें सर्व साहित्य व बल फुकट गेलें. ॥ २१ ॥ राजा, आपले मित्र यादव यांच्या नगरींतील कित्येक आप्तांच्या कुशल क्षेमाबद्दल तूं प्रश्न केलास, पण **यतः नृपतयः आनमंति** (नमस्कार करितात) **तत् वै धनुः, ते इषवः** (बाण), **सः रथः, ते हयाः** (घोडे), **सः अहं रथी, [यथा] भस्मन् हुतं** (भस्मामध्यें केलेलें हवन), **कुहकराद्धं** (मायाव्यापासून—गारुड्यापासून मिळविलेल्या वस्तु) **ऊष्यां** (ऊखर—क्षारयुक्त भूमींत) **उप्तं** (पेरलेलें बीज) **इव, [वा तथा] ईशरिक्तं** (श्रीकृष्णरहित झालेलें) **तत् सर्वं क्षणेन असत्** (व्यर्थ असें) **अभूत्!** ॥ २१ ॥ **राजन्, त्वया सुहृत्पुरे अभिपृष्टानां नः सुहृदां विप्रशापविमूढानां** (ब्राह्मणांच्या शापानें मूढ झालेल्या) **वारुणीं मदिरां** (मद्याला) **पीत्वा मदोन्मथितचे-**

तद्वै धनुस्त इषवः स रथो हयास्ते सो ऽहं रथी नृपतयो यत आनमन्ति ॥ सर्वं क्षणेन तदभूदसदीशरिक्तं
भस्मन्हुतं कुहकराद्धमिवोप्तमूष्याम् ॥ २१ ॥ राजंस्त्वया ऽभिपृष्टानां सुहृदां नः सुहृत्पुरे ॥ विप्रशापविमूढानां
निघ्नतां मुष्टिभिर्मिथः ॥ २२ ॥ वारुणीं मदिरां पीत्वा मदोन्मथितचेतसाम् ॥ अजानतामिवान्योन्यं चतुष्पञ्चावशे-
षिताः ॥ २३ ॥ प्रायेणैतद्भगवत ईश्वरस्य विचेष्टितम् ॥ मिथो निघ्नन्ति भूतानि भावयन्ति च यन्मिथः ॥ २४ ॥

तसां (मदानें धुंद झालीं आहेत अंतःकरणें ज्यांचीं अशा) **अन्योन्यं अजानतां** (न जाणणाऱ्या) **मुष्टिभिः मिथः** (परस्पर) **निघ्नतां** (मारणाऱ्या) **[सतां] चतुःपंच** (चार किंवा पांच) **अवशेषिताः** (शिल्लक राहिलेले). ॥ २२ ॥ २३ ॥ **यत् भूतानि मिथः निघ्नंति, मिथः भावयंति** (पालन करितात) **च, तत् प्रायेण भगवतः ईश्वरस्य विचेष्टितम्.** ॥ २४ ॥

ते सर्व यादव ब्राह्मणांच्या शापामुळें मूढ होऊन गेले होते व वारुणीनामक मद्य प्राशन केल्यामुळें त्यांचीं अंतःकरणें मदानें (कैफानें) धुंद झालीं होतीं, अशा स्थितींत त्यांनीं परस्परांस मुष्टींनीं असे निष्ठुर प्रहार केले कीं, जशी काय त्यांची परस्पर ओळख मुळींच नव्हती. असे प्रहार करितां करितां त्यांचा परिणाम असा झाला कीं, ह्या मंडळीपैकीं चार किंवा पांच अवशिष्ट राहिले आहेत, बाकीच्यांचा अंत झाला!! ॥ २२ ॥ २३ ॥ कर्ता करविता तोच ईश्वर. प्राणी परस्परांचा घात करितात व एकमेकांचें पालन करितात,

१ ज्या जमिनींत क्षार असल्यामुळें धान्य उत्पन्न होत नाहीं ती 'ऊखर' भूमि होय. २ यादवांच्या मुलांनीं कृष्णाच्या सांब नांवाच्या मुलाला गरोदर स्त्रीचें सोंग दिलें; आणि ऋषींची फजिती करण्याच्या इराद्यानें पिंडारक क्षेत्रांत जाऊन त्यांना विचारलें कीं 'हिला काय मूल होईल?' ऋषींनीं तें कपट ओळखून रागावून शाप दिला कीं, 'हिच्या पोटीं तुमच्या कुलाचा क्षय करणारें मुसळ निपजेल.'

भा० स्कंध ११ अ० १.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

हें बहुतकरून त्या ईश्वराचेंच चरित्र असावें. ॥ २४ ॥ राजा, जसे उदकामध्यें मोठमोठे जलचर प्राणी (देवमाशासारखे) लहान लहान प्राण्यांना खातात, जसे बलवान् दुर्बलांना मारितात, व सारख्या बलाचे प्राणी एकमेकांस मारितात, ॥२५॥ तसें - आह्मां पांडवांची -योग्यता व बल अधिक होतें ह्मणून त्या व्यापक प्रभूनें (कृष्णानें) आह्मांकडून जरासंधादिकांचा आणि यादवांच्या हस्तें इतर शाल्वादिकांचा नाश करविला, व यादवांचा नाश दुसरें कोणी करणारें नव्हतेंच ह्मणून-परस्परांकडून त्यांचा नाश करवून पृथ्वीचा भार नाहींसा केला ॥२६॥ श्रीकृष्णानें देश आणि काल पाहून वेळोवेळीं माझ्यापाशीं केलेलीं अंतःकरणाचा ताप शमविणारीं योग्य भाषणें मला आठवतात व माझ्या चित्ताला हरण करितात (माझ्या

राजन्, यद्वत् जले जलौकसां (जलचर प्राण्यांपैकीं) **महान्तः अणीयसः** (लहानांस), **बलिनः दुर्बलान्, महान्तः बलिनः मिथः अदन्ति** (खातात). ॥२५॥ **एवं विभुः बलिष्ठैः महद्भिः यदुभिः इतरान् [निहत्य], यदुभिः अन्योन्यं यदून् [निहत्य] भूभारान् संजहार** (नाहींसा करिता झाला). ॥२६॥ **देशकालार्थयुक्तानि** (देश आणि काल यांना योग्य अशा अर्थांनीं युक्त अशा) **हृत्तापोपशमानि** (अंतःकरणाचा ताप शमविणाऱ्या) **च गोविंदाभिहितानि** (श्रीकृष्णाच्या भाषणांस) **स्मरतः मे चित्तं हरन्ति.'** ॥ २७ ॥ **एवं अतिगाढेन** (अतिशय दृढ अशा)

जलौकसां जले यद्वन्महान्तो ऽदन्त्यणीयसः ॥ दुर्बलान्बलिनो राजन्महान्तो बलिनो मिथः ॥ २५ ॥ एवं बलिष्ठैर्यदुभिर्महद्भिरितरान्विभुः ॥ यदून्यदुभिरन्योन्यं भूभारान्संजहार ह ॥ २६ ॥ देशकालार्थयुक्तानि हृत्तापोपशमानि च ॥ हरन्ति स्मरतश्चित्तं गोविन्दाभिहितानि मे ॥ २७ ॥ एवं चिन्तयतो जिष्णोः कृष्णपादसरोरुहम् ॥ सौहार्देनातिगाढेन शान्ता ऽऽसीद्विमला मतिः ॥ २८ ॥ वासुदेवांघ्र्यनुध्यानपरिबृंहितरंहसा ॥ भक्त्या निर्मथिताशेषकषायधिषणो ऽर्जुनः ॥ २९ ॥ गीतं भगवता ज्ञानं यत्तत्संग्राममूर्धनि ॥ कालकर्मतमोरुद्धं पुनरध्यगमद्विभुः ॥ ३० ॥

सौहार्देन (प्रेमानें) **कृष्णपादसरोरुहं** (श्रीकृष्णाच्या चरणकमलाला) **चिन्तयतः जिष्णोः** (अर्जुनाची) **मतिः शान्ता** (शोकरहित) **विमला** (विरक्त) **आसीत्.** ॥ २८ ॥ **अर्जुनः वासुदेवांघ्र्यनुध्यानपरिबृंहितरंहसा** (वासुदेवाच्या चरणाच्या निरंतर ध्यानानें वाढला आहे वेग जिचा अशा) **भक्त्या निर्मथिताशेषकषायधिषणः** (नाहींसे झाले आहेत सर्व - कामादि विकार- ज्याच्या बुद्धींतून असा) **[बभूव].** ॥ २९ ॥ **यत् ज्ञानं संग्राममूर्धनि** (युद्धाच्या आरंभीं) **भगवता गीतं कालकर्मतमोरुद्धं** (कालेंकरून कर्मेंकरून व भोगांच्या आसक्तीनें मंद झालेल्या) **तत्**

मनांत नेहमीं घोळत असतात)." ॥२७॥ मागें सांगितल्याप्रमाणें अर्जुन अतिशय दृढ प्रेमानें श्रीकृष्णाच्या चरणकमलाचें ध्यान करीत असल्यामुळें, त्याच्या बुद्धीचा शोक नाहींसा झाला, व ती विरक्त झाली. ॥ २८ ॥ अर्जुनाची श्रीकृष्णावर भक्ति पहिल्यापासून होतीच, पण त्याच्या चरणांचेंच निरंतर ध्यान करीत गेल्यामुळें त्या भक्तीचा वेग उत्तरोत्तर वाढत गेला व त्या भक्तीच्या योगानेंच अर्जुनाच्या बुद्धींतील कामादि विकार नाहींसे झाले. ॥ २९ ॥ युद्धाच्या प्रारंभीं जें ज्ञान (गीता) श्रीकृष्णानें अर्जुनाला सांगितलें

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तें, कालक्रमामुळें व आजपर्यंत अर्जुनाची भोगांवर आसक्ति असल्यामुळें, मंद झालें होतें; पण त्याची आतां अर्जुनाला पुनः स्फूर्ति झाली. ॥ ३० ॥ त्या ज्ञानापासून फल असें झालें कीं, अर्जुनाला 'मी ब्रह्म आहें' असें ज्ञान झालें. - प्रकृतीचे तीन गुण, त्या गुणांपासून लिंग (सूक्ष्म) देह व त्यापासून स्थूल देह होतो, देहाला सुख दुःख हें द्वय लागू आहे. ही जोडी आली कीं, शोक ठेवलेलाच: - अर्जुनाला ब्रह्मज्ञान झाल्यामुळें त्याच्या अंतःकरणांतील अविद्या समूळ नाहींशी झाली; अर्थात तिचे गुण, त्यांचें कार्य सूक्ष्म शरीर सर्व नाहींसें झालें; त्यामुळें त्याच्या मनांतील द्वैतमूल संशय तुटून गेला, मग अर्थात त्याचा शोक गेलाच. ॥ ३१ ॥ धर्मराजानें भगवंतांनीं स्वीकारलेल्या मार्गाबद्दल व यदुकुलाच्या संहाराबद्दल अर्जुनानें सांगितलेला सर्व वृत्तांत निश्चल अंतःकरणानें ऐकून घेतला आणि मग आपणही स्वर्गाचा मार्ग धरण्याचा विचार केला. ॥ ३२ ॥ कुंतीनेंही अर्जुनानें

विभुः पुनः अध्यगमत् (स्मरता झाला). ॥ ३० ॥ **ब्रह्मसंपत्त्या विशोकः संछिन्नद्वैतसंशयः** (तुटून गेला आहे द्वैतमूल संशय ज्याचा असा) **लीनप्रकृतिनैर्गुण्यात्** (अविद्या लीन झाली म्हणून तिचे गुणही नाहींसे झाल्यामुळें) **अलिंगत्वात्** (सूक्ष्म शरीराच्या नाशामुळें) **असंभवः** (स्थूल देहरहित असा). ॥ ३१ ॥ **निभृतात्मा** (निश्चल आहे चित्त ज्याचें असा) **युधिष्ठिरः भगवन्मार्गं यदुकुलस्य संस्थां** (नाशातें) **च निशम्य स्वःपथाय** (स्वर्गमार्गाला) **मतिं चक्रे.** ॥ ३२ ॥ **पृथा अपि** (कुन्तीही) **धनञ्जयोदितं** (अर्जुनानें सांगितलेल्या वृत्तांतास), **यदूनां नाशं, तां भग-**

विशोको ब्रह्मसम्पत्त्या सञ्छिन्नद्वैतसंशयः ॥ लीनप्रकृतिनैर्गुण्यादलिङ्गत्वादसम्भवः ॥ ३१ ॥ निशम्य भगवन्मार्गं संस्थां यदुकुलस्य च ॥ स्वःपथाय मतिं चक्रे निभृतात्मा युधिष्ठिरः ॥ ३२ ॥ पृथा ऽप्यनुश्रुत्य धनञ्जयोदितं नाशं यदूनां भगवद्गतिं च ताम् ॥ एकान्तभक्त्या भगवत्यधोक्षजे निवेशितात्मोपरराम संसृतेः ॥ ३३ ॥ यथा ऽहरद्भुवो भारं तां तनूं विजहावजः ॥ कण्टकं कण्टकेनेव द्वयं चापीशितुः समम् ॥ ३४ ॥ यथा मत्स्यादिरूपाणि धत्ते जह्याद्यथा नटः ॥ भूभारः क्षपितो येन जहौ तच्च कलेवरम् ॥ ३५ ॥

वद्गतिं च अनुश्रुत्य भगवति अधोक्षजे एकांतभक्त्या निवेशितात्मा (अर्पण केलें आहे अन्तःकरण जिनें अशी) **[सती] संसृतेः** (संसारापासून) **उपरराम** (पराङ्मुख झाली). ॥ ३३ ॥ **अजः यया [तन्वा], कण्टकेन** (कांट्यानें) **कण्टकं इव, भुवः भारं अहरत्, तां तनूं विजहौ, ईशितुः द्वयमपि समं.** ॥ ३४ ॥ **[ईश्वरः] यथा मत्स्यादिरूपाणि धत्ते, जह्यात्,**

सांगितलेलें, यादवांचा नाश व श्रीकृष्णाचें स्वर्गलोकगमन, हें सर्व वृत्त ऐकून घतलें आणि त्या भगवान् अधोक्षजाचे ठिकाणीं अनन्यभक्तीनें आपलें मन अर्पण करून ती ह्या संसारापासून पराङ्मुख झाली. ॥ ३३ ॥ श्रीकृष्ण वस्तुतः जन्मरहित आहेत. जसें आपण आपल्या पायांत कांटा मोडला असतां दुसरा कांटा घेऊन त्यानें तो पायांतला कांटा काढितों व नंतर दोन्ही कांटे टाकून देतों, त्या रीतीनें, श्रीकृष्णानें ज्या सर्व यादवरूपी शरीराच्या योगानें पृथ्वीचा भार हरण केला त्याही शरीराचा त्याग केला (यादवांचा परस्पर क्षय करविला). कारण इतर राजे काय आणि यादव काय, पृथ्वीला दोहोंचाही भार सारखाच असल्यामुळें, परमेश्वराला नाहींसें करण्यास दोन्ही सारख्याच योग्यतेचे होते. ॥ ३४ ॥ जसा बहुरूपी निरनिराळीं रूपें घेतो, तसा ईश्वर मत्स्यादिक रूपें धारण करितो व सोडितो, तसेंच ईश्वरानें ज्या रूपाच्या योगानें पृथ्वीचा भार दूर केला, तें श्रीकृष्णस्वरूपही

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

गुप्त केलें. ॥ ३५ ॥ त्या भगवंताच्या कथा चांगल्या असून श्रवण करण्यास योग्य आहेत. श्रीकृष्णानें ज्या दिवशीं ह्या पृथ्वीचा त्याग केला त्या दिवशींच अविवेकी पुरुषांना अधर्माकडे प्रवृत्त करणारा कलि सुरू झाला. ॥ ३६ ॥ धर्मराजा मोठा ज्ञाता होता; जिकडे तिकडे राज्य, गृह, नगर सर्व कलिस्वरूप होऊन गेलें आहे व कलीचा सर्वत्र संचार असल्यामुळें लोभ, असत्य, वक्रता, हिंसा इत्यादि अधर्मचक्राचा प्रसार झाला आहे, हें पाहिल्याबरोबर लागलाच त्यानें गमन करण्याचा निश्चय केला. ॥ ३७ ॥

यथा नटः [रूपांतरं धत्ते, तथा] येन भूभागः क्षपितः (नाहींसा केलेला) **तत् कलेवरं जहौ** (सोडिता झाला). ॥३५॥ **यदा भगवान् श्रवणीयसत्कथः** (श्रवणकरण्यास योग्य आहेत चांगल्या कथा ज्याच्या असा)**मुकुन्दः स्वतन्वा इमां महीं जहौ, तदाहः एव** (त्याच दिवशीं) **अप्रतिबुद्धचेतसां** (अविवेकी मनें ज्यांचीं, अशा पुरुषांचा) **अधर्महेतुः** (अधर्माच्या प्रवृत्तीला कारण) **कलिः अन्ववर्तत** (सुरू झाला). ॥ ३६ ॥ **बुधः युधिष्ठिरः तदात्मनि राष्ट्रे, पुरे, गृहे च लोभानृतजिह्महिंसनाद्यधर्मचक्रं** (लोभ असत्य वक्रता हिंसा इत्यादि अधर्मचक्राला) **तत्परिसर्पणं** (त्याच्या–कलीच्या–प्र-

यदा मुकुन्दो भगवानिमां महीं जहौ स्वतन्वा श्रवणीयसत्कथः ॥ तदाहरेवाप्रतिबुद्धचेतसा-
मधर्महेतुः कलिरन्ववर्तत ॥ ३६ ॥ युधिष्ठिरस्तत्परिसर्पणं बुधः पुरे च राष्ट्रे च गृहे तदात्मनि ॥
विभाव्य लोभानृतजिह्महिंसनाद्यधर्मचक्रं गमनाय पर्यधात् ॥३७॥ स्वराट् पौत्रं विनयिनमात्मनः
सुसमं गुणैः ॥ तोयनीव्याः पतिं भूमेरभ्यषिञ्चद्गजाह्वये ॥ ३८ ॥ मथुरायां तथा वज्रं शूरसेनपतिं
ततः ॥ प्राजापत्यां निरूप्येष्टिमग्नीनपिबदीश्वरः ॥३९॥ विसृज्य तत्र तत्सर्वं दुकूलवलयादिकम् ॥
निर्ममो निरहंकारः सञ्छिन्नाशेषबन्धनः ॥ ४० ॥

साराला) **विभाव्य** (पाहून) **गमनाय पर्यधात्** (निश्चय करिता झाला). ॥ ३७ ॥ **स्वराट्** (सार्वभौम राजा) **आत्मनः गुणैः सुसमं** (अगदीं सारख्या) **विनयिनं** (नम्र अशा) **पौत्रं** (नातवाला) **गजाह्वये तोयनीव्याः** (समुद्राचें - उदकाचें आहे परिधानीय वस्त्र जिचें अशा) **भूमेः पतिः अभ्यषिञ्चत्.** ॥ ३८ ॥ **तथा मथुरायां शूरसेनपतिं वज्रं अभ्यषिंचत्, ततः ईश्वरः** (समर्थ असा) **प्राजापत्यां इष्टिं निरूप्य** (अनुष्ठान करून) **अग्नीन् अपिबत्** (प्याला). ॥ ३९ ॥ **तत्र तत् सर्वं दुकूलवलयादिकं** (रेशमी वस्त्रें कंकणें इत्यादिकांस) **विसृज्य निर्ममः, निर-**

धर्मराजानें आपल्या नातवाला हस्तिनापुरामध्यें समुद्रवलयांकित पृथ्वीच्या राज्यासनावर स्थापन केलें. तो स्वभावानें नम्र असून धर्मराजाप्रमाणेंच सद्गुणांनींही पूर्ण होता. ॥ ३८ ॥ तसेंच, त्या समर्थ धर्मानें मथुरा नगरीमध्यें शूरसेनदेशांवर अनिरुद्धाच्या वज्रनामक पुत्राला स्थापिलें, व प्राजापत्य नांवाची इष्टि करून अग्नि आत्म्याच्या ठिकाणीं गुप्त केले. ॥ ३९ ॥ त्या ठिकाणीं त्यानें शरीरावरील सर्व दुकूल (रेशमी वस्त्रें) कंकणें इत्यादिक वस्तु ठेवून दिल्या, ममता टाकिली, अहंकार सोडून दिला, व सर्व बंधनेंही

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तोडून टाकिलीं. ॥ ४० ॥ त्यानें आपली वाणी मनांमध्यें लीन केली, तें मन प्राणाचे ठिकाणीं व त्या प्राणाला अपानामध्यें लीन केलें, त्या अपानाला मृत्यूच्या देवतेमध्यें लीन केलें, व मृत्यूची देहाचे ठिकाणीं भावना केली (देहाला मृत्यु आहे, आत्म्याला नाहीं असें ठरविलें). ॥४१॥ नंतर त्यानें पंचभूतांपासून उत्पन्न झालेल्या ह्या देहाचा सत्व, रज, तम, ह्या तीन गुणांत लय केला, त्या तीन गुणांचा अविद्येमध्यें लय केला, व त्या अविद्येचा जीवामध्यें लय करून त्या शुद्ध त्वंपदार्थाच्य जीवाला निर्विकार परब्रह्मस्वरूपीं लीन केलें.

हंकारः, सञ्छिन्नाशेषबन्धनः (तोडून टाकिलीं आहेत सर्व बंधनें ज्यानें असा) **[सन्]**, ॥ ४० ॥ **वाचं मनसि, तत् प्राणे, तं च इतरे,** (दुसऱ्यांत-अपानामध्यें) **सोत्सर्गं** (उत्सर्ग—टाकण्याचा व्यापार - त्याशीं सहवर्तमान अशा) **अपानं मृत्यौ, तं पञ्चत्वे** (देहाचे ठिकाणीं) **अजोहवीत्** (हवन केलें-भावना केली). ॥ ४१ ॥ **मुनिः त्रित्वे** (त्रिगुणांच्या ठिकाणीं) **पंचत्वं हुत्वा, तत् एकत्वे** (अविद्येमध्यें) **अजुहोत्, सर्वं आत्मनि** (जीवाच्या ठिकाणीं) **[अजुहोत्], आत्मानं अव्यये ब्रह्मणि अजुहवीत्.** ॥ ४२ ॥ **चीरवासाः** (चिंध्या पांघरलेला) **निराहारः बद्धवाक्**

वाचं जुहाव मनसि तत्प्राण इतरे च तम् ॥ मृत्यावपानं सोत्सर्गं तं पञ्चत्वे ह्यजोहवीत् ॥ ४१ ॥ त्रित्वे हुत्वा
ऽथ पञ्चत्वं तच्चैकत्वे ऽजुहोन्मुनिः ॥ सर्वमात्मन्यजुहवीद्ब्रह्मण्यात्मानमव्यये ॥ ४२ ॥ चीरवासा निराहारो बद्धवाङ्
मुक्तमूर्धजः ॥ दर्शयन्नात्मनो रूपं जडोन्मत्तपिशाचवत् ॥ ४३ ॥ अनवेक्षमाणो निरगादशृण्वन्बधिरो यथा ॥
उदीचीं प्रविवेशाशां गतपूर्वां महात्मभिः ॥ हृदि ब्रह्म परं ध्यायन्नावर्तेत यतो गतः ॥ ४४ ॥ सर्वे तमनु निर्ज-
ग्मुर्भ्रातरः कृतनिश्चयाः ॥ कलिना ऽधर्ममित्रेण दृष्ट्वा स्पृष्टाः प्रजा भुवि ॥ ४५ ॥

(नियमन केलें आहे वाणीचें ज्यानें असा--मौनी) **मुक्तमूर्धजः** (मोकळे सोडिले आहेत केश ज्यानें असा) **आत्मनः रूपं जडोन्मत्तपिशाचवत् दर्शयन् [बभूव].** ॥ ४३ ॥ **यथा बधिरः** (बहिरा) **[तथा] अनवेक्षमाणः** (न पाहणारा), **अशृण्वन्** (न ऐकणारा), **निरगात्, परं ब्रह्म हृदि ध्यायन् महात्मभिः गतपूर्वां** (पूर्वीचे—महात्मे ज्या ठिकाणीं गेले अशा) **उदीचीं आशां** (दिशेप्रत) **प्रविवेश; यतः** (ज्यादिशेस) **गतः न आवर्तेत** (परत येणार नाहीं). ॥ ४४ ॥ **कृतनिश्चयाः सर्वे भ्रातरः, अधर्ममित्रेण कलिना भुवि प्रजाः स्पृष्टाः दृष्ट्वा, तं अनु निर्जग्मुः**

॥४२॥ तो रस्त्यामध्यें पडलेल्या चिंध्या पांघरीत असे. त्यानें आहार मुळींच वर्ज केला, बोलणें सोडून दिलें, व केश मोकळे सोडले होते. तो आपलें रूप जड, उन्मत्त किंवा पिशाच ह्यांप्रमाणें लोकांना दाखवीत असे. ॥ ४३ ॥ जसा एखादा बहिरा असतो, त्याप्रमाणें तो कोणीकडे न पाहतां व कांहीं न ऐकतां, जिकडे पूर्वीचे पुष्कळ महात्मे गेले, त्या उत्तर दिशेला निघून गेला. त्या दिशेला गेलेला पुरुष पुन्हां परत येत नाहीं. ॥ ४४ ॥ अर्जुन, भीम इत्यादि चौघांही भावांनीं पाहिलें कीं, पृथ्वीवर सर्व प्रजा कलीनें वेढिल्या व तो

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

कलि अधर्माचा केवळ बंधु होय. आतां आपणही - जगांत राहूं नये - धर्माच्या मागून जावें, असा निश्चय करून तेही निघून गेले. ॥ ४५ ॥ त्या पांच जणांनींही आपले धर्मादि चारी पुरुषार्थ उत्तम रीतीनें साधिले होते. त्यांना असें समजलें कीं, आतां आपणास श्रीकृष्णाचें चरणकमल हीच काय ती गति आहे, - त्या शिवाय दुसरी कांहीं गति नाहीं. - ह्मणून तें चरणकमल त्यांनीं अंतःकरणांत धारण केलें. ॥ ४६ ॥ श्रीकृष्णाचें चरणकमल निष्कलंक (शुद्ध) अंतःकरणाचें निवासस्थान आहे. त्या शुद्ध पदाचे ठिकाणीं त्यांची भक्ति अतिशय वाढली. तिच्या योगानेंच त्यांची बुद्धि अशी निश्चित झाल्यामुळें विषयी व अज्ञानी लोकांना प्राप्त न होणारी गति त्यांस मिळाली. व निर्मल

(निघून गेले). ॥४५॥ **साधुकृतसर्वार्थाः** (उत्तम रीतीनें साधिले आहत–धर्मादि–सर्व अर्थ ज्यांनीं असे) **ते वैकुण्ठचरणाम्बुजं आत्मनः आत्यन्तिकं ज्ञात्वा मनसा धारयामासुः** (धारण करिते झाले). ॥ ४६ ॥ **तद्ध्यानोद्रिक्तया** (त्याच्या ह्म० ईश्वराच्या ध्यानानें वाढलेल्या) **भक्त्या विशुद्धधिषणाः** (शुद्ध झाली आहे बुद्धि ज्यांची असे) **ते, विधूतकल्मषास्थानं** (धुऊन गेला आहे कलंक ज्यांचा अशांचें निवासस्थान) **[यत् पदं], तस्मिन् पुरे नारायणपदे एकान्तमतयः विषयात्मभिः** (विषयासक्त लोकांकडून– लोकांस) **असद्भिः** (अज्ञान्यांकडून–अज्ञान्यांस) **दुरवापां** (प्राप्त होण्यास कठीण

ते साधुकृतसर्वार्था ज्ञात्वा ऽऽत्यन्तिकमात्मनः ॥ मनसा धारयामासुर्वैकुण्ठचरणाम्बुजम् ॥ ४६ ॥
तद्ध्यानोद्रिक्तया भक्त्या विशुद्धधिषणाः परे ॥ तस्मिन्नारायणपद एकान्तमतयो गतिम् ॥ ४७॥
अवापुर्दुरवापां ते असद्भिर्विषयात्मभिः ॥ विधूतकल्मषास्थानं विरजेनात्मनैव हि ॥ ४८ ॥ विदुरो
ऽपि परित्यज्य प्रभासे देहमात्मवान् ॥ कृष्णावेशेन तच्चित्तः पितृभिः स्वक्षयं ययौ ॥ ४९ ॥
द्रौपदी च तदाज्ञाय पतीनामनपेक्षताम् ॥ वासुदेवे भगवति ह्येकान्तमतिरापतम् ॥ ५० ॥

अशा ह्म० न प्राप्त होणाऱ्या) **गतिं विरजेन** (गुणकार्यरहित अशा - निर्मल अशा) **आत्मना एव अवापुः** (प्राप्त झाले). ॥ ४७ ॥ ४८ ॥ **आत्मवान्** (आत्मज्ञानी) **विदुरः अपि प्रभासे देहं परित्यज्य कृष्णावेशेन** (कृष्णाच्या ठिकाणीं दृढ भक्ति असल्यामुळें) **तच्चित्तः पितृभिः स्वक्षयं** (आपल्या अधिकारस्थानाला) **ययौ** (गेला). ॥ ४९ ॥ **तदा द्रौपदी अपि पतीनां अनपेक्षतां**

ह्मणजे गुणकार्यरहित अशा शुद्ध आत्म्याच्या योगानें ते उत्तम पदाला गेले. ॥४७॥४८॥ विदुर मोठा आत्मज्ञानी होता. त्यानें प्रभासक्षेत्रीं देहत्याग केला. त्याची श्रीकृष्णाचे ठिकाणीं दृढ भक्ति असल्यामुळें त्याचें अंतःकरणही कृष्णरूप झालें होतें. तो विदुर पितरांसह आपल्या पूर्वीच्या अधिकारास प्राप्त झाला (यमरूपाला गेला). ॥ ४९ ॥ त्यावेळेस द्रौपदीनेंही पाहिलें कीं, आतां पतींना आपली गरज राहिली नाहीं, ह्मणून तिनेंही भगवान् वासुदेवाच्या ठिकाणीं एक निश्चयानें मन लाविलें. व ती त्या ईश्वराच्या

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

स्वरूपाला प्राप्त झाली. ॥ ५० ॥ हें पांडवांचें गमनकथानक पूर्ण कल्याणकारक असून पवित्र आहे. जो पुरुष ह्या भगवद्भक्त पांडवांची ही प्रयाणकथा श्रद्धेनें श्रवण करितो, त्याची ईश्वरावर भक्ति जडते, व त्याला सिद्धि प्राप्त होते. ॥५१॥ **इति पञ्चदशो ऽध्यायः॥१५॥** सूत ह्मणाले :— ऋषे, राजा परीक्षित् मोठा भगवद्भक्त असून सद्गुणांनीं पूर्ण होता. त्याच्या जन्मकालीं, जातक वर्तविणाऱ्या विद्वानांनीं - 'हा चांगल्या रीतीनें राज्य करील' असें वर्तविलें होतें. - त्याप्रमाणें ब्राह्मणांच्या आज्ञेनुसार त्यानें पृथ्वीचें पालन केलें. ॥१॥

(निरपेक्ष स्थितीला) **आज्ञाय** (जाणून) **वासुदेवे भगवति एकान्तमतिः [सती] तं आप** (प्राप्त झाली). ॥ ५० ॥ **यः भगवत्प्रियाणां पांडोः सुतानां अलं** (अतिशयेंकरून) **स्वस्त्ययनं** (कल्याणकारक अशा) **पवित्रं इति एतत् संप्रयाणं श्रद्धया शृणोति, [सः] हरौ भक्तिं लब्ध्वा सिद्धिं उपैति. ॥५१॥ इति श्रीभागवतान्वये प्रथमस्कन्धे पञ्चदशो ऽध्यायः॥१५॥ सूतः उवाच—हे विप्र, ततः महाभागवतः महद्गुणः परीक्षित्, यथा सूत्यां** (जन्मकालीं) **अभिजातकोविदाः** (जातक वर्त्तविणारे विद्वान्) **समादिशन्** (वर्तविते झाले), **तथा, द्विज-वर्यशिक्षया** (श्रेष्ठ ब्राह्मणांच्या आज्ञेनें) **महीं शशास** (राज्य करिता झाला). ॥ १ ॥ **सः उत्तरस्य तनयां** (कन्येस) **इरावतीं उपयेमे** (वरिता झाला), **तस्यां जनमेजयादीन् चतुरः सुतान्**

यः श्रद्धयैतद्भगवत्प्रियाणां पाण्डोः सुतानामिति सम्प्रयाणम् ॥ शृणोत्यलं स्वस्त्ययनं पवित्रं लब्ध्वा हरौ भक्तिमुपैति सिद्धिम् ॥५१॥ इ०श्री०म०प्र० पाण्डवस्वर्गारोहणं नाम पञ्चदशो ऽध्यायः ॥१५॥ सूत उवाच । ततः परीक्षिद्द्विजवर्यशिक्षया महीं महाभागवतः शशास ह ॥ यथा हि सूत्यामभिजातकोविदाः समादिशन्विप्र महद्गुणस्तथा ॥१॥ स उत्तरस्य तनयामुपयेम इरावतीम् ॥ जनमेजयादींश्चतुरस्तस्यामुत्पादयत्सुतान् ॥२॥ आजहाराश्वमेधांस्त्रीन् गङ्गायां भूरिदक्षिणान् ॥ शारद्वतं गुरुं कृत्वा देवा यत्राक्षगोचराः॥३॥निजग्राहौजसा वीरः कलिं दिग्विजये क्वचित्॥नृपलिङ्गधरं शूद्रं घ्नन्तं गोमिथुनं पदा॥४॥

उत्पादयत् (उत्पन्न करिता झाला) **[च]**. ॥ २ ॥ **[सः] शारद्वतं** (कृपाचार्यास) **गुरुं कृत्वा, गंगायां त्रीन् भूरिदक्षिणान्** (पुष्कळ दक्षिणा दिल्या आहेत ज्यांत अशा) **अश्वमेधान् आज-हार** (करिता झाला), **यत्र देवाः अक्षगोचराः** (दृष्टिगोचर) **!** ॥ ३ ॥ **वीरः, क्वचित् दिग्विजये, पदा** (पायानें--लाथेनें) **गोमिथुनं घ्नन्तं** (मारणाऱ्या) **नृपलिंगधरं** (राजचिन्हें धारण करणाऱ्या) **शूद्रं कलिं ओजसा** (पराक्रमानें) **निजग्राह** (बंदोबस्त करिता झाला). ॥ ४ ॥

त्यानें उत्तरराजाच्या इरावतीनामक कन्येशीं विवाह केला. तिचे ठिकाणीं त्याला जनमेजयादि चार पुत्र झाले. ॥ २ ॥ त्यानें कृपाचार्यांना पुरोहित करून, गंगेच्या तीरावर तीन अश्वमेध केले. त्यांत पुष्कळ दक्षिणा दिल्या. त्या यज्ञांत सर्व देवता - आपआपले हविर्भाग घेण्याकरितां - प्रत्यक्ष आल्या होत्या. ॥ ३ ॥ तो पराक्रमी राजा दिग्विजय

१ उग्रसेन, जनमेजय, भीमसेन, श्रुतसेन.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

करीत चालला असतां, एकदां - त्याची व कलीची गांठ पडली. - कलीचें स्वरूप शूद्रासारखें दिसत असून त्यानें शरीरावर राजचिन्हें धारण केलीं होतीं; व तो गाईच्या जोड्याला (बैल व गाय ह्या दोघांना) लत्ताप्रहार करीत होता. परीक्षित् राजानें तें पाहिल्याबरोबर कलीचा आपल्या पराक्रमानें निग्रह (बंदोबस्त) केला. ॥ ४ ॥ शौनक ऋषि ह्मणालेः— सूता, राजा दिग्विजयाला गेला होता, - त्यावेळीं कलि भेटला असतां - त्याचा त्यानें निग्रह मात्र केला - असें तूं सांगतोस. पण - तसें राजानें कां केलें? (त्या दुष्ट कलीचा वधच कां केला नाहीं?) कारण, तो शूद्र कलि किती अधम होता पहा. अगोदर शूद्रानें राजाचें चिन्ह धारण करणें ही एक गोष्ट नित्य आहे; ती करून शिवाय त्या अधमानें गाईला लत्ताप्रहार केला!! ॥ ५ ॥ हे भाग्यवन्ता, ह्या गोष्टी कृष्णकथेच्या उत्पत्तीला जर कारण असतील (त्यापासून कृष्णासंबंधीं कांहीं तरी

शौनकः उवाच– नृपः दिग्विजये कलिं कस्य हेतोः (काय कारणास्तव) **[केवलं] निजग्राह? यः गां पदा अहनत्- असौ नृदेवचिन्हधृक् शूद्रः *कः? ॥ ५ ॥ हे महाभाग, यदि कृष्णकथाश्रयं अथवा अस्य पदाम्भोजमकरन्दलिहां** (चरणकमलसंबंधीं मकरंदाचें सेवन करणाऱ्या) **सतां [कथाश्रयं अस्ति], तत् कथ्यताम्. ॥ ६ ॥ यत् आयुषः असद्व्ययः** (वाईट

शौनक उवाच । कस्य हेतोर्निजग्राह कलिं दिग्विजये नृपः ॥ नृदेवचिह्नधृक् शूद्रः को ऽसौ गां यः पदा
ऽहनत् ॥५॥ तत्कथ्यतां महाभाग यदि कृष्णकथाश्रयम् ॥ अथवा ऽस्य पदाम्भोजमकरन्दलिहां सताम्
॥ ६ ॥ किमन्यैरसदालापैरायुषो यदसद्व्ययः ॥ क्षुद्रायुषां नृणामङ्ग मर्त्यानामृतमिच्छताम् ॥ ७ ॥
इहोपहूतो भगवान्मृत्युः शामित्रकर्मणि ॥ न कश्चिन्म्रियते तावद्यावदास्त इहान्तकः ॥ ८ ॥ एतदर्थं
हि भगवानाहूतः परमर्षिभिः ॥ अहो नृलोके पीयेत हरिलीलाऽमृतं वचः ॥ ९ ॥

व्यय), [तैः] अन्यैः असदालापैः (मिथ्या भाषणांनीं) **किं? हे अंग, ऋतं** (मोक्षाला) **इच्छतां क्षुद्रायुषां** (अल्पायुषी अशा) **मर्त्यानां नृणां यः मृत्युः, सः भगवान् इह शामित्रकर्मणि** (शामित्र नामक कर्मांत) **उपहूतः** (बोलावून आणिलेला); **इह अंतकः यावत् आस्ते, तावत् कश्चित् न म्रियते. ॥ ७ ॥ ८ ॥ अहो नृलोके हरिलीलामृतं वचः पीयेत** (प्यालें जातें), कथा निघण्यासारख्या असल्या तर), किंवा त्या कृष्णाच्या चरणकमलासंबंधी मकरन्दाचें सेवन करणाऱ्या साधु पुरुषांच्या कथांना आश्रय असतील तर, सांग. ॥ ६ ॥ इतर दुर्भाषणांनीं अमोल आयुष्याचा केवळ वाईट व्यय होतो. तसल्या मिथ्या गोष्टी बोलून काय करावयाचें आहे? - ह्या जगांत असे कित्येक लोक आहेत कीं, त्यांना मोक्षाची इच्छा असते, पण त्यांचीं आयुष्यें थोडीं, तेव्हां अर्थात ते लवकरच मृत्यूच्या मुखीं पडावयाचे. परंतु ह्या ठिकाणीं ती भीति नाहीं.—कारण सर्व प्राण्यांचा जो मृत्यु त्याला आह्मीं ह्या सत्रांत शामित्रनामक (पशु मारणें) कर्माकरितां बोलावून आणिलें आहे. तो मृत्यु येथें आहे, तोंपर्यंत ह्या सत्रांत कोणीही मरावयाचें नाहीं. ॥ ७ ॥ ८ ॥ ह्या भूतलावर

* ह्या ठिकाणीं कः ह्मणजे अधम नीच प्राणी; हें प्रश्नार्थक सर्वनाम नव्हे.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

लोकांनीं हरिलीलारूपी अमृताचें प्राशन करावें, एवढ्याकरितां मोठ्या साधु पुरुषांनीं भगवान् मृत्यूला बोलावून येथें आणिलें आहे. ॥ ९ ॥ - अगोदरच मनुष्याचें आयुष्यमान कमी झालें आहे. त्यांत तो आळशी, व मंदबुद्धि असला ह्मणजे त्याच्या आयुष्याची व्यवस्था पुढें सांगितल्याप्रमाणें होते. - अर्धें रात्रीं झोंपेंत फुकट जातें, व अर्धें दिवसाचें व्यर्थ कामांत फुकट जातें. त्या थोड्याच आयुष्यांत त्यानें आपलें हित करून घेतलें, तर घेण्यासारखें असतें, पण तसें कोणींही करून घेत नाहीं ! ॥ १० ॥ सूत ह्मणाले :— परीक्षित् राजा कुरु जांगल देशांत राहत असे. त्याला ज्या वेळेस ही बातमी कळली कीं, आपलें सैन्य देशाचें रक्षण करीत असतांही त्यामध्यें कलीचा प्रवेश झाला, तेव्हां

एतदर्थं भगवान् परमर्षिभिः आहूतः. ॥९॥ मन्दस्य मन्दप्रज्ञस्य मन्दायुषः च वयः नक्तं (रात्रीं) **निद्रया, दिवा व्यर्थकर्मभिः ह्रियते. ॥ १० ॥ सूतः उवाच—कुरुजांगले वसन् परीक्षित् यदा निजचक्रवर्त्तिते** (आपल्या सैन्यानें रक्षिलेल्या-ठिकाणीं) **कलिं प्रविष्टं [शुश्राव], ततः अनतिप्रियां वार्तां निशम्य, संयुगशौंडिः** (युद्धांत निपुण) **[सः] शरासनं** (धनुष्यास) **आददे** (घेता झाला). **॥११॥ स्वलंकृतं श्यामतुरंगयोजितं** (काळे घोडे जोडलेल्या) **मृगेंद्रध्वजं** (सिंह आहे ध्वजावर ज्याच्या अशा) **रथं आश्रितः रथाश्वद्विपपत्तियुक्तया** (रथ घोडे हत्ती

मन्दस्य मन्दप्रज्ञस्य वयो मन्दायुषश्च वै ॥ निद्रया ह्रियते नक्तं दिवा च व्यर्थकर्मभिः ॥ १० ॥ सूत उवाच । यदा परीक्षित्कुरुजाङ्गले वसन् कलिं प्रविष्टं निजचक्रवर्तिते ॥ निशम्य वार्तामनतिप्रियां ततः शरासनं संयुगशौण्डिराददे ॥ ११ ॥ स्वलङ्कृतं श्यामतुरङ्गयोजितं रथं मृगेन्द्रध्वजमाश्रितः पुरात् ॥ वृतो रथाश्वद्विपपत्तियुक्तया स्वसेनया दिग्विजयाय निर्गतः ॥ १२ ॥ भद्राश्वं केतुमालं च भारतं चोत्तरान्कुरून् ॥ किंपुरुषादीनि वर्षाणि विजित्य जगृहे बलिम् ॥१३ ॥ तत्र तत्रोपशृण्वानः स्वपूर्वेषां महात्मनाम् ॥ प्रगीयमानं च यशः कृष्णमाहात्म्यसूचकम् ॥ १४ ॥ आत्मानं च परित्रातमश्वत्थाम्नो ऽस्त्रतेजसः ॥ स्नेहं च वृष्णिपार्थानां तेषां भक्तिं च केशवे ॥ १५ ॥

पायदळ यांनीं युक्त अशा) **स्वसेनया वृतः [सः] दिग्विजयाय पुरात् निर्गतः. ॥ १२ ॥ भद्राश्वं, केतुमालं, भारतं, उत्तरान् कुरून्, किंपुरुषादीनि वर्षाणि** (खंडांस) **च विजित्य बलिं** (करांतें) **जगृहे** (घेता झाला). **॥ १३ ॥ तत्र तत्र** (जेथें तेथें) **प्रगीयमानं महात्मनां स्वपूर्वेषां कृष्णमाहात्म्यसूचकं यशः, अश्वत्थाम्नः अस्त्रतेजसः परित्रातं आत्मानं** त्याला वाईट तर वाटलेंच; पण युद्धकला पूर्ण अवगत असल्यामुळें जरा आनंदही झाला. त्यानें हातांत धनुष्य घेतलें. ॥ ११ ॥ त्यानें आपला रथ अलंकारांनीं सुशोभित करवून त्याला श्यामवर्ण घोडे जोडविले, त्याच्या ध्वजावर 'सिंह' हें चिन्ह असे. अशा रथांत राजा परीक्षित् बसला व बरोबर रथ, घोडे, हत्ती, पायदळ हें सैन्य घेऊन दिग्विजयाकरितां नगरांतून निघाला. ॥ १२ ॥ त्यानें भद्राश्व, केतुमाल, भारत, उत्तरकुरु, किंपुरुषादिक सर्व वर्षें (खंडें) जिंकून त्या त्या ठिकाणच्या राजांपासून कर घेतले. ॥ १३ ॥ तो जेथें जेथें जाई, तेथें तेथें लोक त्याच्या महाप्रसिद्ध पूर्वजांचीं (पांडवांची) कीर्ति गात असत; त्या वर्णनामध्यें ठिकठिकाणीं श्रीकृष्णाच्या महात्म्याचें सूचक होत असे (त्यांत

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

कृष्णाची थोरवी वर्णिलेली असे). तसेंच, कृष्णानें आपलें स्वतांचें (परीक्षितांचें) अश्वत्थाम्यानें सोडलेल्या ब्रह्मास्त्रापासून रक्षण केलें ही गोष्ट, पांडवांचा आणि यादवांचा स्नेह, त्या दोघांचीही कृष्णावर भक्ति, इत्यादि गोष्टी त्याला लोकांकडून ऐकूं येत. ॥ १४ ॥ ॥ १५ ॥ परीक्षित् मोठा उदार असे. - श्रीकृष्णाची व आपल्या पूर्वजांची कीर्ति ऐकून - त्याला फार संतोष होई. - हें त्याच्या आकारावरून स्पष्ट दिसे. - कारण त्याचे नेत्र प्रीतीमुळें व आनंदानें प्रफुल्लित होत असत. नंतर तो त्या कीर्ति सांगणाऱ्या पुरुषांना महा- मोल वस्त्रें व अलंकार देई. ॥ १६ ॥ - लोक राजाला असें सांगत कीं, - ज्याला सर्व जग वंदन करितें, त्या विष्णूच्या ठिकाणीं पांडवांचें प्रेम होतें, व त्या प्रेमामुळें कृष्णानें

वृष्णिपार्थानां स्नेहं, तेषां केशवे भक्तिं च उपश्रृण्वानः (ऐकणारा). ॥ १४ ॥ १५ ॥ **महामनाः परमसंतुष्टः प्रीत्युज्जृंभितलोचनः** (प्रीतीनें प्रफुल्लित आहेत नेत्र ज्याचे असा) [**सः**] **तेभ्यः महाधनानि** (फार मौल्यवान अशा) **वासांसि** (वस्त्रांत) **हारान्** [**च**] **ददौ.** ॥१६॥ **नृपतिः स्निग्धेषु पांडुषु सारथ्यपारषदसेवनसख्यदौत्यवीरासनानुगमनस्तवनप्रणामं** (सारथ्य, पारषद ह्म० सभेंत प्रमुखपणाचा स्वीकार, ह्म० त्यांच्या मनाप्रमाणें वागणें, सेवा, सख्य, दूतपणा, वीरासन म्ह० हातांत तलवार घेऊन रात्रीचें जागत बसणें, स्तुति, व प्रणाम यांना) **विष्णोः जगत्प्रणतिं**

तेभ्यो परमसन्तुष्टः प्रीत्युज्जृम्भितलोचनः ॥ महाधनानि वासांसि ददौ हारान्महामनाः ॥ १६ ॥ सारथ्यपारषदसे-
वनसख्यदौत्यवीरासनानुगमनस्तवनप्रणामम् ॥ स्निग्धेषु पाण्डुषु जगत्प्रणतिं च विष्णोर्भक्तिं करोति नृपतिश्चरणारविन्दे
॥ १७ ॥ तस्यैवं वर्तमानस्य पूर्वेषां वृत्तिमन्वहम् ॥ नातिदूरे किलाश्चर्यं यदासीत्तन्निबोध मे ॥ १८ ॥ धर्मः पदैकेन
चरन्विच्छायामुपलभ्य गाम् ॥ पृच्छति स्माश्रुवदनां विवत्सामिव मातरम् ॥ १९ ॥

(जगाचें–जगानें केलेलें–वंदन जें त्याला) **च श्रृण्वन् चरणारविंदे भक्तिं करोति स्म.** ॥ १७ ॥ **एवं तस्य अन्वहं** (दिवसानुदिवस) **पूर्वेषां वृत्तिं** (आचरणास) **वर्त्तमानस्य** [**सतः**] (वर्त्तन करीत असतां) **नातिदूरे यत् आश्चर्यं आसीत्, तत् मे निबोध** (जाण). ॥ १८ ॥ **एकेन पदा धर्मः** (आचारमार्ग) **चरन्** (फिरणारा) **विवत्सां** (नाहींसें झालें आहे लेंकरूं जिचें अशा) **मातरमिव विच्छायां** (नष्ट झाली आहे कांति जिची अशा) **अश्रुवदनां** (अश्रुयुक्त आहे मुख जिचें अशा) **गां उपलभ्य** (पाहून) **पृच्छति स्म.** ॥ १९ ॥

त्यांच्या घरीं सारथ्य केलें. त्यांच्या सभेमध्यें प्रमुखपणाचा स्वीकार, त्यांच्या मनाप्रमाणें वागणें, सेवा, सख्य, दूतपणा, वीरासन, स्तुति, प्रणाम सुद्धां तो करीत असे. ह्या गोष्टी ऐकून परीक्षितराजा त्यांच्या चरणकमलांची अधिक अधिक भक्ति करूं लागला. ॥१७ ॥ मागें सांगितल्याप्रमाणें हळू हळू तो परीक्षित राजा आपल्या पूर्वजांच्या वृत्तीप्रमाणेंच वर्त्तन करीत असतां, लवकरच एक आश्चर्यकारक गोष्ट घडून आली; ती मी सांगतों ऐक :– ॥ १८ ॥ धर्म - वृषभाच्या (बैलाच्या) रूपानें एकाच पायानें फिरत असतां, गाईचें

१ **धरति सः धर्मः** । धर्म ह्म० धरणारा; जगाला आवरून धरणारा; वाईट रस्त्याकडे जाऊं न देणारा, जातिपरत्वें वेदादि ग्रंथांत सांगितलेला आचारमार्ग; पांडवांपैकीं ज्येष्ठ बंधु धर्मराजा असा अर्थ येथें नव्हे.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

रूप धारण करणारी पृथ्वी त्याला भेटली. तिची पूर्वीची कांति अगदीं नाहींशी झाली होती; व जसें एखाद्या आईचें लेंकरूं नाहींसें झालें असतां ती शोक करते, त्याप्रमाणें ती गोरूप पृथ्वीही शोक करीत होती; तिच्या मुखावरून अश्रुधारा चाललया होत्या. तिला भेटल्यावर धर्मानें (वृषभानें) ती तिची अवस्था पाहून तिला प्रश्न केला :– ॥१९॥ धर्म म्हणाला :– " हे कल्याणकारिणी, तुझी शरीरप्रकृति बरी आहेना? तुझ्या मनाला कांहीं पीडा असावी असें मला वाटतें. कारण, तुझें तेज नष्ट झालें असें दिसत आहे, मुख किंचित् म्लान दिसतें. एखाद्या दूर गेलेल्या बन्धूबद्दल तूं शोक करितेस कीं काय? ॥२०॥किंवा माझे तीनें[२] पाय नाहींसे झाले, मी एकाच पायावर आहे, ह्या साठीं तूं शोक करि-

धर्मः उवाच—' हे भद्रे कच्चित् ते आत्मनः अनामयं (स्वास्थ्य)? ईषत् (किंचित्) म्लायता (म्लान होणाऱ्या) मुखेन विच्छाया असि! भवतीं अन्तरार्धिं (मानसिक पीडा आहे जिला अशा) आलक्षये (मी पाहतों)! अम्ब, कञ्चन दूरे बन्धुं शोचसि? ॥ २० ॥ पादैः न्यूनं एकपादं मा शोचसि, वा वृषलैः (शूद्रांकडून) भोक्ष्यमाणं (उपभुक्त होणाऱ्या) आत्मानं

धर्म उवाच । कच्चिद्भद्रे ऽनामयमात्मनस्ते विच्छाया ऽसि म्लायतेषन्मुखेन ॥ आलक्षये
भवतीमन्तरार्धिं दूरे बन्धुं शोचसि कंचनाम्ब ॥ २० ॥ पादैर्न्यूनं शोचसि मैकपादमात्मानं
वा वृषलैर्भोक्ष्यमाणम् ॥ आहो सुरादीन् हृतयज्ञभागान् प्रजा उतस्विन्मघवत्यवर्षति ॥ २१ ॥
अरक्ष्यमाणाः स्त्रिय उर्वि बालान् शोचस्यथो पुरुषादैरिवार्तान् ॥ वाचं देवीं ब्रह्मकुले कुकर्म-
ण्यब्रह्मण्ये राजकुले कुलाग्र्यान् ॥ २२ ॥

शोचसि, आहोस्वित् हृतयज्ञभागान् (नाहींसे झाले आहेत यज्ञभाग ज्यांचे अशा) सुरादीन्, उत मघवति अवर्षति (इन्द्र पर्जन्यवृष्टि करीत नाहीं म्हणून) प्रजाः [शोचसि], ॥ २१ ॥ उर्वि (हे पृथ्वी), अरक्ष्यमाणाः स्त्रियः, अथो पुरुषादैः (मनुष्यभक्षकांकडून) इव आर्तान् बालान्, कुकर्मणि (दुराचारी अशा) ब्रह्मकुले स्थितां वाचं देवीं शोचसि, [वा] अब्र-

तेस; अथवा तुला स्वतःबद्दलच ' शूद्रलोक आतां आपला उपभोग घेणार ' म्हणून वाईट वाटत आहे; किंवा देवादिकांना त्यांचे यज्ञभाग मिळत नाहींत व इन्द्र पर्जन्यवृष्टि करीत नाहीं. तेव्हां प्रजांचें कसें होईल, म्हणून शोक करित्येस? ॥ २१ ॥ हे पृथ्वि, पति आपल्या स्त्रियांचें रक्षण करीत नाहींत, म्हणून त्यांबद्दल शोक करित्येस कीं काय? किंवा - कित्येक मातापितरें - बालकांचें रक्षण करीत नाहींत, तर उलट मनुष्यभक्षक राक्षसांप्रमाणें त्यांना क्लेश देतात, त्या बालकांबद्दल शोक करितेस? अथवा दुराचारी ब्राह्मणांच्या घरीं सरस्वती असलेली पाहून त्याबद्दल तुला वाईट वाटतें किंवा ब्राह्मणांचा द्वेष करणाऱ्या राजांच्या पदरीं उत्तम कुलीन ब्राह्मण राहतात म्हणून त्याब-

२ धर्माचे चार पाय ' तप, शुद्धता, दया, आणि सत्य ' हे होत. त्यांपैकीं तप, दया आणि शुद्धता हे तीन चरण तर गेलेच, सत्य हा चरण मात्र उरला आहे त्यावरच धर्म चालत आहे.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

द्दल तूं खेद करितेस? ॥ २२॥ किंवा कलीच्या दोषांनीं भ्रष्ट झालेल्या क्षत्रियाधमांबद्दल अथवा त्यांनीं उच्छिन्न केलेल्या राष्ट्रांबद्दल शोक करितेस? किंवा जिकडे तिकडे सर्व जीव खाणें, पिणें, वस्त्र, स्नान व मैथुन एवढ्याविषयीं मात्र दक्ष झाले आहेत, - ईश्वराकडे कोणाचेंच लक्ष्य नाहीं, - ह्मणून तुला वाईट वाटतें? ॥ २३ ॥ किंवा, माते पृथ्वि, कृष्णानें, तुझ्यावर दुष्ट लोकांचा पुष्कळ भार झाला होता, तो उतरण्याकरितां अवतार घेतला; पण - तें काम झाल्यावर - तो आतां अंतर्धान पावला; व त्यानें तुझा त्याग केला त्यामुळें

ह्मण्ये राजकुले कुलाढ्यान् (उत्तम कुलीन ब्राह्मणांस) [शोचसि]. ॥ २२ ॥ कलिना उपसृष्टान् (व्याप्त अशा--भ्रष्ट अशा) क्षत्रबंधून् वा, तैः अवरोपितानि (उच्छिन्न केलेल्या) राष्ट्राणि वा, अशनपानवासःस्नानव्यवायोन्मुखजीवलोकं (खाणें पिणें वस्त्र स्नान व मैथुन यांविषयीं दक्ष अशा जीवलोकाला--लोकांस), वा [शोचसि] किं? ॥ २३ ॥ अंब धरित्रि, यद्वा ते भूरिभरावतारकृतावतारस्य (मोठा भार उतरण्याकरितां - अवतार घेतलेल्या) अंतर्हितस्य (अंतर्धान पावलेल्या) हरेः निर्वाणविडंबितानि (मोक्षाचाही उपहास करणाऱ्या) कर्माणि

किं क्षत्रबन्धून्कलिनोपसृष्टान् राष्ट्राणि वा तैरवरोपितानि ॥ इतस्ततो वा ऽशनपानवासःस्नानव्यवायोन्मुखजीवलोकम् ॥ २३ ॥
यद्वा ऽम्ब ते भूरिभरावतारकृतावतारस्य हरेर्धरित्रि ॥ अन्तर्हितस्य स्मरती विसृष्टा कर्माणि निर्वाणविडम्बितानि ॥ २४ ॥
इदं ममाचक्ष्व तवाधिमूलं वसुन्धरे येन विकर्शिता ऽसि ॥ कालेन वा ते बलिनां बलीयसा सुरार्चितं किं हृतमम्ब सौभगम् ॥२५॥
धरण्युवाच । भवान्हि वेद तत्सर्वं यन्मां धर्मानुपृच्छसि ॥ चतुर्भिर्वर्तसे येन पादैर्लोकसुखावहैः ॥ २६ ॥

स्मरती विसृष्टा (त्याग केलेली) [शोचसि]. ॥ २४ ॥ हे अंब, बलिनां बलीयसा कालेन ते सुरार्चितं (देवांकडून अर्चित--पूज्य असें) सौभगं, हृतं किं? [हे] वसुंधरे येन विकर्शिता (कृश झालेली) असि, इदं तव आधिमूलं (मानसिक दुःखाच्या कारणास) मम आचक्ष्व (सांग).' ॥ २५ ॥ धरण्युवाच—' हे धर्म, त्वं यत् मां अनुपृच्छसि, तत् सर्वं

मोक्षप्राप्ति करून देणारीं किंवा मुक्तीपेक्षांही देखील अधिक सुखावह अशीं त्याचीं चरित्रें तुला आठवतात, ह्मणून तुला दुःख होत आहे? ॥ २४ ॥ हे माते, तुझ्या ऐश्वर्याची देव देखील वाहवा करीत असत. पण काल ह्मणजे सर्व बलवान् लोकांत बलिष्ठ आहे, त्यानें तुझें तें सौभाग्य हरण केलें कीं काय? हे पृथ्वी, ज्या काळजीनें तुला इतकी कृशता प्राप्त झाली आहे, ती मला सांग." ॥ २५ ॥ " हे धर्मा, जें तूं मला विचारतोस, तें सर्व तुला माहीत आहेच - तथापि आणखी तें मी तुला सांगतें: - तुझ्या चार पायांवर

---

१ मूळांत निर्वाणविलंबितानि। असा एक पाठ आहे. त्या पाठाचा हा अर्थ होय:— निर्वाणं विलंबितं येषु। मोक्ष ज्यावर अवलंबून आहे अशीं. २। निर्वाणं विडंबितं यैः। ज्यांनीं मोक्षाचा देखील उपहास (थट्टा, चेष्टा) केला आहे अशीं : लोकाचा उपहास करण्याला स्वतांमध्यें अधिक गुण असावे लागतातच.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

लोकांचीं सुखें अवलंबून आहेत. पण ज्या परमेश्वराच्या आश्रयामुळें तूं आपल्या चार चरणांवर राहिला आहेस, (ह्या श्लोकाचा व पुढील श्लोकांचाही अन्वय 'एते चान्ये' ह्या एकतिसाव्या श्लोकाशीं आहे). ॥ २६ ॥ (१) खरें बोलणें, (२) शुद्धपणा अथवा स्वच्छता, (३) दुसऱ्याचें दुःख पाहून द्रवणें, (४) क्रोध आला असतां मन स्वाधीन ठेवणें, (५) याचकांना द्रव्य देण्याविषयीं हात ढिला असणें, (६) संतोष - तृप्ति, (७) सरळपणा, (८) मन स्थिर ठेवणें, (९) बाह्येंद्रियें स्वाधीन ठेवणें, (१०) आपल्या धर्माप्रमाणें आचरण करणें (११) शत्रुबुद्धि व मित्रत्व नसणें, (१२) दुसऱ्यांचे अपराध सहन करणें, (१३) लाभ झाला असतां उदासीन असणें, (१४) शास्त्रांचा विचार

भवान् वेद, येन लोकसुखावहैः (लोकांस सुख देणाऱ्या) चतुर्भिः पादैः वर्तसे. ॥ २६ ॥ (१) सत्यं, (२) शौचं, (३) दया, (४) क्षांतिः, (५) त्यागः, (६) संतोषः, (७) आर्जवं, (८) शमः, (९) दमः, (१०) तपः, (११) साम्यं, (१२) तितिक्षा, (१३) उपरतिः, (१४) श्रुतं. ॥ २७ ॥ (१) ज्ञानं, (२) विरक्तिः, (३) ऐश्वर्यं,

सत्यं शौचं दया क्षान्तिस्त्यागः सन्तोष आर्जवम् ॥ शमो दमस्तपः साम्यं तितिक्षोपरतिः श्रुतम् ॥२७॥
ज्ञानं विरक्तिरैश्वर्य शौर्यं तेजो बलं स्मृतिः ॥ स्वातन्त्र्यं कौशलं कान्तिर्धैर्यं मार्दवमेव च ॥ २८ ॥
प्रागल्भ्यं प्रश्रयः शीलं सह ओजो बलं भगः ॥ गाम्भीर्यं स्थैर्यमास्तिक्यं कीर्तिर्मानो ऽनहंकृतिः ॥२९॥

(४) शौर्यं, (५) तेजः, (६) बलं, (७) स्मृतिः, (८) स्वातंत्र्यं, (९) कौशलं, (१०) कान्तिः, (११) धैर्यं, (१२) मार्दवं, एव च. ॥ २८ ॥ (१) प्रागल्भ्यं, (२) प्रश्रयः, (३) शीलं (४) सहः, (५) ओजः, (६) बलं (७) भगः (८) गाम्भीर्यं (९) स्थैर्यं (१०) आस्तिक्यं, (११) कीर्तिः, (१२) मानः (१३) अनहंकृतिः, ॥२९॥

करणें, ॥२७॥ (१) स्वस्वरूपाचें ज्ञान, (२) वैराग्य, (३) कर्तृत्व, (४) युद्धाविषयीं उत्साह, (५) सामर्थ्य – वजन , (६) तत्परता, (७) स्मरणशक्ति, (८) स्वातंत्र्य, (९) काम करण्याचें कौशल्य, (१०) सौंदर्य, (११) धैर्य, (१२) अंतःकरणाची मृदुता, ॥ २८ ॥ (१) प्रौढपणा, (२) नम्रता, (३) चांगला स्वभाव, (४) मनाची शक्ति, (५) ज्ञानेंद्रियांचें सामर्थ्य, (६) कर्मेंद्रियांचें बल, (७) उपभोगाचें सामर्थ्य, (८) चित्त क्षुब्ध होऊं न देणें, (९) स्थिरपणा, (१०) श्रद्धा,

१ गुरूच्या बोलण्यावर व वेदांवर विश्वास; परलोक, ईश्वर, पुण्यवंताला उत्तम गति मिळणें, व पापी मनुष्याला वाईट गति मिळणें इत्यादि गोष्टींवर विश्वास.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

(११) कीर्ति, (१२) पूज्यता, (१३) गर्व नसणें, ॥ २९ ॥ हे समर्था, हे व मोठेपणा इच्छिणाऱ्यांनीं ज्यांची प्रार्थना (हे आपल्या ठिकाणीं असावे अशी इच्छा) करावी असे, आणखी दुसरेही उत्तम व कधीं नष्ट न होणारे गुण ज्यापासून कधींही नाहींसे होत नाहींत, ॥ ३० ॥ अशा त्या सर्वगुणपात्र लक्ष्मीपतीनें (कृष्णानें) सांप्रत ह्या लोकांला सोडिलें व पापरूपी कलीची दृष्टि ह्यांच्यावर पडली. ह्मणून मला वाईट वाटतें. ॥ ३१॥ आणखी मला स्वतःबद्दल, तुझ्याबद्दल तसेंच देवेंद्र, देव, पितर, ऋषि, साधु, सर्व वर्ण व

हे भगवन्, एते अन्ये च महत्त्वं इच्छद्भिः प्रार्थ्याः (प्रार्थना करण्यास—जवळ असण्याविषयीं इच्छा करण्यास—योग्य असे) महागुणाः यत्र नित्याः [संतः] कर्हिचित् न वियन्ति. (क्षय पावत नाहींत). ॥ ३० ॥ तेन गुणपात्रेण श्रीनिवासेन (लक्ष्मीचें राहण्याचें स्थान जो त्यानें—लक्ष्मीपतीनें) साम्प्रतं रहितं पाप्मना कलिना ईक्षितं (पाहिलेल्या) लोकं [अहं] शोचामि. ॥ ३१ ॥ [अहं] आत्मानं, भवन्तं, अमरोत्तमं, (देवांत श्रेष्ठ अशाला—इन्द्राला) देवान्, पितॄन्, ऋषीन्, साधून्, सर्वान् वर्णान्, तथा आश्रमान् अनुशोचामि. ॥ ३२ ॥ यदपांगमोक्षकामाः

एते चान्ये च भगवन्नित्या यत्र महागुणाः ॥ प्रार्थ्या महत्त्वमिच्छद्भिर्न वियन्ति स्म कर्हिचित् ॥ ३० ॥ तेनायं गुणपात्रेण श्रीनिवासेन साम्प्रतम् ॥ शोचामि रहितं लोकं पाप्मना कलिनेक्षितम् ॥ ३१ ॥ आत्मानं चानुशोचामि भवन्तं चामरोत्तमम् ॥ देवान्पितॄनृषीन्साधून्सर्वान्वर्णांस्तथा ऽऽश्रमान् ॥ ३२ ॥ ब्रह्मादयो बहुतिथं यदपाङ्गमोक्षकामास्तपः समचरन्भगवत्प्रपन्ना ॥ सा श्रीः स्ववासमरविन्दवनं विहाय यत्पादसौभगमलं भजते ऽनुरक्ता ॥ ३३ ॥ तस्याहमब्जकुलिशाङ्कुशकेतुकेतैः श्रीमत्पदैर्भगवतः समलंकृताङ्घ्री ॥ त्रीनत्यरोच उपलभ्य ततो विभूतिं लोकान् स मां व्यसृजदुत्स्मयतीं तदन्ते ॥ ३४ ॥

(जिच्या दृष्टिपातातें—कृपावलोकनातें—इच्छिणारे) ब्रह्मादयः बहुतिथं (बहुत काल पर्यंत) तपः समचरन्, सा भगवत्प्रपन्ना (मोठ्यांनीं जिचा आश्रय केला आहे अशी) श्रीः अनुरक्ता [सती] अरविन्दवनं (कमलवनाला) स्ववासं (आपल्या निवासस्थानाला) विहाय, यत्पादसौभगं (ज्याच्या पादलावण्याला) अलं भजते, ॥ ३३ ॥ तस्य भगवतः अब्जकुलिशाङ्कुशकेतुकेतैः (कमल, वज्र, अंकुश ध्वज हीं चिन्हें आहेत ज्यांचीं अशा) श्रीमत्पदैः समलंकृताङ्घ्री (सुशोभित आहे अङ्घ्र जिचें अशी) अहं ततः विभूतिं (ऐश्वर्याला) उपलभ्य त्रीन् लोकान् अत्यरोचे

आश्रम यांबद्दल वाईट वाटतें. ॥ ३२ ॥ जिचा कृपाकटाक्ष आपणावर पडावा ह्मणून ब्रह्मदेवासारख्यांनींही मोठी तपश्चर्या केली, त्या लक्ष्मीनें ज्याच्या चरणांचें प्रेमपूर्वक भजन करण्याकरितां आपलें राहण्याचें स्थान जें कमलवन त्याचाही त्याग केला, व ती ज्या देवाच्या चरणाला शरण येऊन त्याच्या ऐश्वर्याचें सेवन करीत आहे, ॥ ३३ ॥ त्या कृष्णाचीं कमल, वज्र, अंकुश, ध्वज इत्यादि चिन्हांनीं युक्त व शोभणारीं अशीं पावलें माझ्यावर उमटल्यामुळें माझें शरीर शोभायमान झालें होतें, व त्या कृष्णा-

१ ब्रह्मा । बृंहति सः ब्रह्मा ॥ बृंहति म्ह० वाढवितो. जो प्रजा उत्पन्न करून जगाची वृद्धि करतो, तो ' ब्रह्मा ' होय.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

पासूनच मला ऐश्वर्य प्राप्त झालें होतें, ह्मणून मी तिन्ही लोकांमध्यें अधिक शोभत असें. त्या ऐश्वर्याचा नाशकाल आला तेव्हां मला गर्व झाला होता; ह्मणून त्यानें माझा त्याग केला. ॥ ३४ ॥ तो ईश्वर नेहमीं स्वतन्त्र आहे; माझ्या पाठीवर दैत्यवंशांतील शेंकडों अक्षौहिणी सैन्याचा अतिशय भार झाला होता, तो त्यानें दूर केला. व, धर्मा, तीन पाय कमी झाल्यामुळें तुझी स्थिति फार वाईट झाली होती; तिला युक्तीनें व प्रयत्नानें सुधारावी, एवढ्याकरितां त्यानें यादवकुलामध्यें सुन्दर शरीर धारण केलें. ॥ ३५ ॥

(अधिक शोभत होत्यें); **सः तदन्ते** (त्याचा—ऐश्वर्याचा—नाशकाल प्राप्त झाला असतां) **उत्स्मयन्तीं** (गर्व करणाऱ्या) **मां व्यसृजत्** (त्याग करिता झाला). ॥ ३४ ॥ **आत्मतन्त्रः** (स्वतन्त्र) **यः मम अतिभरं आसुरवंशराज्ञां** (दैत्यवंशांतील राजांच्या) **अक्षौहिणीशतं अपानुदत्** (दूर करिता झाला), **ऊनपदं** (कमी झाले आहेत पाय ज्याचे अशा) **दुःस्थं** (वाईट स्थितींत असलेल्या) **त्वां पौरुषेण** (प्रयत्नानें) **आत्मनि संपादयन् यदुषु रम्यं अङ्गं अबिभ्रत्**, (धारण करिता झाला). ॥३५॥ [**यः**] **प्रेमावलोकरुचिरस्मितवल्गुजल्पैः** (प्रेमपूर्वक अवलोकन, सुन्दर हास्य, व मनोहर भाषण

यो वै ममातिभरमासुरवंशराज्ञामक्षौहिणीशतमपानुददात्मतन्त्रः ॥ त्वां दुःस्थमूनपदमात्मनि पौरुषेण सम्पादयन्यदुषु रम्यमबिभ्रदङ्गम् ॥ ३५ ॥ का वा सहेत विरहं पुरुषोत्तमस्य प्रेमावलोकरुचिरस्मितवल्गुजल्पैः ॥ स्थैर्यं समानमहरन्मधुमानिनीनां रोमोत्सवो मम यदंघ्रिविटङ्कितायाः ॥ ३६ ॥ तयोरेवं कथयतोः पृथिवीधर्मयोस्तदा ॥ परीक्षिन्नाम राजर्षिः प्राप्तः प्राचीं सरस्वतीम् ॥ ३७ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे पारमहंस्यां संहितायां प्रथमस्कन्धे पृथ्वीधर्मसंवादो नाम षोडशोऽध्यायः ॥ १६ ॥

यांहीं करून) **मधुमानिनीनां** (मधुकुलांतील सत्यभामा इत्यादि स्त्रियांच्या) **समानं** (गर्वसहित अशा) **स्थैर्यं** (स्तब्धत्वाला) **अहरत्**, **यदंघ्रिविटङ्कितायाः** (ज्याच्या चरणानें अलंकृत अशा) **मम रोमोत्सवः**, [**तस्य**] **पुरुषोत्तमस्य विरहं का वा सहेत ?**' ॥३६॥ **तयोः पृथिवीधर्मयोः एवं कथयतोः** [**सतोः**] (असें बोलत असतां), **परीक्षित् नाम राजर्षिः तदा प्राचीं** (पूर्ववाहिनी अशा) **सरस्वतीं प्राप्तः**. ॥ ३७ ॥ **इति श्रीभागवतान्वये षोडशो ऽध्यायः** ॥ १६ ॥

ज्यानें आपल्या प्रेमपूर्वक अवलोकनानें, सुंदर हास्यानें व मनोहर अशा भाषणानें सत्यभामादि स्त्रियांचा गर्व दूर केला, व ज्याचीं पावलें माझ्या धुळीवर उठल्याकारणानें माझ्यावर रोमांच उभे राहतात (धान्यादिकांची उत्पत्ति होते), त्या पुरुषोत्तमाचा विरह कोणाला बरें सहन होईल ? " ॥ ३६ ॥ हा त्या दोघांचा संवाद - कुरु क्षेत्रांत - ज्या ठिकाणीं सरस्वती पूर्ववाहिनी आहे, त्या ठिकाणीं झाला. तीं दोघें पृथ्वी व धर्म (गाय बैल) बोलत असतां, परीक्षित् राजा तेथें येऊन पोंचला. ॥३७॥ इति षोडशो ऽध्यायः॥१६॥

१ **पृथ्वी । प्रथते सा.** विस्तृत असणारी, मोठी विस्तीर्ण.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

सूत म्हणाले :– त्या ठिकाणीं राजाच्या (परीक्षिताच्या) असें दृष्टीस पडलें कीं, एक गाय व बैल अनाथ प्राण्याप्रमाणें उगीच मार खात आहेत. - तो मारणारा पुरुष - एक शूद्र असून त्यानें आगांवर राजचिन्हें धारण केलीं आहेत; व त्याच्या हातांत एक दंड (काठी) आहे. ॥ १ ॥ तो बैल कमलाच्या गाभ्याप्रमाणें पांढरा असून भीतिमुळें मुतत व थरथर कांपत होता. त्याला एकच पाय असून, शूद्र मारीत असल्यामुळें फार पीडा होत होती. ॥ २ ॥ ती (पृथ्वीरूप) गाय तरी दूध (होमद्रव्यें) देणारी खरी, पण अत्यंत दीन झालो होती; तो शूद्र तिला लत्ताप्रहार करीतच होता; तिच्या वत्सांचा (धान्यादिकांचा) उत्तरोत्तर क्षय होत चालला असून मुखावर अश्रु आले होते; भक्ष्य

सूतः उवाच— तत्र राजा अनाथवत् हन्यमानं गोमिथुनं, दण्डहस्तं (दण्ड आहे हातांत ज्याच्या अशा) **नृपलांच्छनं** (राजचिन्हें आहेत ज्याला अशा) **वृषलम्** (शूद्राला) **च ददृशे. ॥१॥ *मृणालधवलं** (कमलाच्या गाभ्याप्रमाणें पांढऱ्या अशा) **मेहन्तं** (मूत्रोत्सर्ग करणाऱ्या) **इव बिभ्यतं** (भयभीत अशा) **वेपमानं** (कांपणाऱ्या) **एकेन पदा सीदन्तं** (क्लेश पावणाऱ्या) **शूद्रताडितं वृषं [दृष्ट्वा], ॥ २ ॥ गां च धर्मदुघां** (होमद्रव्यें प्रसवणाऱ्या) **भृशं** (फार) **दीनां शूद्रपदाहतां विवत्सां** (क्षय होत आहे वत्सांचा–धान्यादिकांचा–जिच्या अशा) **साश्रुवदनां क्षामां** (कृश

सूत उवाच । तत्र गोमिथुनं राजा हन्यमानमनाथवत् ॥ दण्डहस्तं च वृषलं ददृशे नृपलाञ्छनम् ॥१॥
वृषं मृणालधवलं मेहन्तमिव बिभ्यतम् ॥ वेपमानं पदैकेन सीदन्तं शूद्रताडितम् ॥ २ ॥ गां च धर्मदुघां
दीनां भृशं शूद्रपदाहताम् ॥ विवत्सां साश्रुवदनां क्षामां यवसमिच्छतीम् ॥ ३ ॥ पप्रच्छ रथमारूढः
कार्तस्वरपरिच्छदम् ॥ मेघगम्भीरया वाचा समारोपितकार्मुकः ॥ ४ ॥ कस्त्वं मच्छरणे लोके बलाद्धं-
स्यबलान् बली ॥ नरदेवो ऽसि वेषेण नटवत्कर्मणा ऽद्विजः ॥ ५ ॥

अशा) **यवसं** (गवताला—हविर्भागाला) **इच्छतीं [दृष्ट्वा], ॥ ३ ॥ कार्त्तस्वरपरिच्छदं** (सुवर्णाचें कवच आच्छादन आहे ज्याला अशा—सोन्यानें मढविलेल्या) **रथं आरुढः समारोपितकार्मुकः** (सज्ज केलें आहे धनुष्य ज्यानें अशा) **मेघगम्भीरया वाचा पप्रच्छ— ॥ ४ ॥ 'मच्छरणे** (माझा आश्रय आहे ज्याला अशा) **लोके, अबलान् बलात् हंसि, [एतादृशः] बली त्वं कः ? वेषेण** (यज्ञ इत्यादि) मिळत नसल्यामुळें ती कृश झाली असून, गवत (हविर्भाग) प्राप्त व्हावे, अशी इच्छा करीत होती. ॥ ३ ॥ राजा परीक्षित् त्यावेळीं सुवर्णाच्या साहित्यानें भरलेल्या रथांत बसला होता. त्यानें धनुष्य सज्ज केलें; व मेघगर्जनेसारख्या गंभीर वाणीनें - त्या शूद्ररूपी कलीला विचारिलें:– ॥ ४ ॥ " ह्या सर्व देशाला माझा आश्रय असतां, त्यामध्यें गरीब प्राण्यांना बलात्कारानें गांजणारा असा बलवान् तूं कोण आहेस ? तुझा वेष तर एखाद्या नटाप्रमाणें राजासारखा दिसतो, पण आचरण तर शूद्राप्रमाणें

* ह्या दोन श्लोकाचा अन्वय चवथ्या ' पप्रच्छ ' श्लोकांशीं आहे १ ह्या दोन श्लोकांत धर्माच्या व पृथ्वीच्या स्थितीचें रूपक आहे. धर्मीचें स्वरूप निर्मल आहे. मूळचे त्याला ' तप, सत्य, दया आणि शौच (शुद्धता)' हे चार पाय असून आतां त्यांतील ' सत्य ' अवशिष्ट राहिला आहे, व तो भयानें मुतत आहे (हळूहळू कमी होत आहे).

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आहे! ॥ ९ ॥ त्या प्रसिद्ध गांडीव धनुष्य धारण करणाऱ्या अर्जुनासह श्रीकृष्ण दूर (स्वर्गलोकीं) गेले असतां, तूं - निर्भयपणें - एकांतांत गुप्तरीतीनें निरपराधी प्राण्यांना त्रास देतोस, तेव्हां तूं अपराधी आहेस; म्हणून तुझा वध करणें योग्य होय. तर असा तूं अपराधी आहेस तरी कोण? ॥ ६ ॥ (राजा त्या वृषभाला म्हणतो :—) तूं वृषरूपानें कोणी देव येथें आला आहेस कीं काय? तुझें शरीर कमलगर्भाप्रमाणें शुभ्र दिसत आहे; तीन पाय नाहींसे झाले असून तूं केवळ एका पायानेंच फिरत आहेस, ही तुझी स्थिति पाहिली कीं आम्हांला वाईट वाटतें! ॥ ७ ॥ पौरवकुलांतील राजे आपल्या बाहुबलानें ह्या पृथ्वीतलाचें संरक्षण करीत असल्यामुळें त्यावर शोक म्हणजे काय वस्तु आहे तें

नटवत् नरदेवः (राजा) **असि, कर्मणा [तु] अद्विजः** (शूद्र)! ॥ ५ ॥ **गाण्डीवधन्वना सह कृष्णे दूरं गते [सति], रहसि अशोच्यान्** (निरपराध्यांस) **प्रहरन् त्वं वधं अर्हसि; कः शोच्यः** (अपराधी) **असि ?** ॥ ६ ॥ **मृणालधवलः पादैः न्यूनः पदा चरन् नः** (आम्हांला) **खेदयन्** (खेद उत्पन्न करणारा) **वृषरूपेण त्वं किं कश्चित् देवः ?** ॥ ७ ॥ **पौरवेन्द्राणां** (पौरव कुलांतील राजांच्या) **दोर्दण्डपरिरम्भिते** (भुजदण्डांनीं पोटाशीं धरल्याप्रमाणें संरक्षण केलेल्या) **अस्मिन् भूतले ते विना प्राणिनां शुचः** (अश्रु) **जातु न अनुपतन्ति.** ॥८॥

कस्त्वं कृष्णे गते दूरं सह गाण्डीवधन्वना ॥ शोच्यो ऽस्यशोच्यान् रहसि प्रहरन्वधमर्हसि ॥ ६ ॥ त्वं वा मृणालधवलः
पादैर्न्यूनः पदा चरन् ॥ वृषरूपेण किं कश्चिद्देवो नः परिखेदयन् ॥ ७ ॥ न जातु पौरवेन्द्राणां दोर्दण्डपरिरम्भिते ॥
भूतले ऽनुपतन्त्यस्मिन्विना ते प्राणिनां शुचः ॥ ८ ॥ मा सौरभेयानुशुचो व्येतु ते वृषलाद्भयम् ॥ मा रोदीरम्ब भद्रं
ते खलानां मयि शास्तरि ॥ ९ ॥ यस्य राष्ट्रे प्रजाः सर्वास्त्रस्यन्ते साध्व्यसाधुभिः ॥ तस्य मत्तस्य नश्यन्ति कीर्तिरायुर्भगो
गतिः ॥ १० ॥ एष राज्ञां परो धर्मो ह्यार्तानामार्तिनिग्रहः ॥ अत एनं वधिष्यामि भूतद्रुहमसत्तमम् ॥ ११ ॥

हे सौरभेय (हे कामधेनूच्या पुत्रा), **मा शुचः, ते वृषलात् भयं व्येतु** (दूर होवो); **हे अम्ब, मयि खलानां शास्तरि [सति], ते भद्रं** (कल्याण) **[स्यात्; अतः] मा रोदीः** (रडूं नको). ॥ ९ ॥ **हे साध्वि, यस्य राष्ट्रे सर्वाः प्रजाः असाधुभिः** (दुष्टांकडून) **त्रस्यन्ते, मत्तस्य तस्य कीर्तिः, आयुः, भगः** (ऐश्वर्य), **गतिः** (परलोक), **नश्यन्ति.** ॥ १० ॥ **आर्त्तानां** (दुःखितांचा) **आर्तिनिग्रहः** (पीडा दूर करणें) **एषः राज्ञां परः धर्मः; अतः भूतद्रुहं** (प्राण्यांस पीडा देणाऱ्या) **असत्तमं** (दुष्ट शिरोमणी अशा) **एनं वधिष्यामि.** ॥ ११ ॥

कोणाला कधींही माहीत नाहीं. त्यांत शोकी असा तूंच एक दिसत आहेस; तर बाबा! तूं आहेस कोण? ॥ ८ ॥ हे कामधेनूच्या पुत्रा, तूं शोक करूं नकोस. शूद्रापासून तुला प्राप्त झालेलें भय दूर होवो. (राजा गाईला म्हणतो :—) माते मी दुष्टांस शासन करून तुझें कल्याणच करीन. आतां रडूं नकोस. ॥ ९ ॥ हे साध्वि, ज्या राजाच्या राज्यांत दुष्ट लोक सर्व प्रजांना त्रास देतात; त्या दुष्टाची कीर्ति, आयुष्य, ऐश्वर्य आणि परलोक हीं सर्व नाहींशीं होतात. ॥ १० ॥ दुःखी जनांची पीडा दूर करणें, हा राजांचा खरा धर्म होय. म्हणून प्राण्यांस पीडा देणाऱ्या ह्या दुष्टाचा मी वध करीन. ॥ ११ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

हे कामधेनूच्या पुत्रा, तुला पूर्वी चार पाय होते; - त्यांपैकीं सांप्रत एकच पाय शिल्लक राहिला आहे तर - ते तीन पाय तोडले कोणी? - माझ्यासारख्या - कृष्णाची सेवा करणाऱ्या राजांच्या राष्ट्रामध्यें तुझ्यासारखे दुःखी प्राणी नसावेत. ॥ १२ ॥ हे वृषभा, तुझ्यासारख्या निरपराधी साधूंचें कल्याण असो. तुझ्या स्वरूपाचें विरूप करणारा व पांडवांच्या कीर्तीला दूषण लावणारा असा पुरुष कोणता, तें मला सांग. ॥ १३ ॥ जो मनुष्य निरापराधी लोकांना त्रास देतो, त्याला सर्व ठिकाणीं माझ्यापासून भय आहे- च. - कारण, साधूंचें रक्षण हें आमचें कर्त्तव्यः - दुष्ट पुरुषांचा निग्रह केला असतां साधूंचें सर्वप्रकारें कल्याणच होईल. ॥ १४ ॥ एखादा प्राणी निर्भयपणें निर-

हे **चतुष्पद सौरभेय, तव त्रीन् पादान् कः अवृश्चत्** (तोडिता झाला) ? **कृष्णानुवर्तिनां राज्ञां राष्ट्रे त्वादृशाः** (तुझ्यासारिखे—दुःखी) **मा भूवन्** (नसावेत). ॥ १२ ॥ हे वृष, **अकृतागसां** (निरपराधी अशा) **साधूनां वः भद्रं [अस्तु]. आत्मवैरूप्यकर्त्तारं** (तुझ्या-स्वरूपाची विरूपता करणारे) **पार्थानां** (पाण्डवांच्या) **कीर्तिदूषणं [पुरुषं] आख्याहि** (सांग). ॥ १३ ॥ **[यः जनः] अनागसि** (निरपराधी अशा) **जने अघं** (त्रासाला) **युञ्जन्** (देणारा) **[भवति], अस्य सर्वतः मद्भयं एव** (माझ्यापासून भय) **भवति. असाधुदमने कृते** (दुष्टांचा निग्रह केला असतां) **साधूनां**

को ऽवृश्चत्तव पादांस्त्रीन्सौरभेय चतुष्पद ॥ मा भूवंस्त्वादृशा राष्ट्रे राज्ञां कृष्णानुवर्तिनाम् ॥ १२ ॥ आख्याहि वृष भद्रं वः साधूनामकृतागसाम् ॥ आत्मवैरूप्यकर्तारं पार्थानां कीर्तिदूषणम् ॥ १३ ॥ जने ऽनागस्यघं युञ्जन्सर्वतो ऽस्य च मद्भयम् ॥ साधूनां भद्रमेव स्यादसाधुदमने कृते ॥ १४ ॥ अनागःस्विह भूतेषु य आगस्कृन्निरङ्कुशः ॥ आहर्तास्मि भुजं साक्षादमर्त्यस्यापि साङ्गदम् ॥ १५ ॥ राज्ञो हि परमो धर्मः स्वधर्मस्थानुपालनम् ॥ शासतो ऽन्यान्यथाशास्त्रमनापद्युत्पथानिह ॥१६॥ धर्म उवाच । एतद्वः पाण्डवेयानां युक्तमार्ताभयं वचः ॥ येषां गुणगणैः कृष्णो दौत्यादौ भगवान्कृतः ॥१७॥

[सर्वत्र] भद्रं एव स्यात् . ॥ १४ ॥ **यः निरंकुशः [सन्] इह अनागःसु भूतेषु आगस्कृत्** (अपराध-इजा-करणारा) **[भवति, तस्य] साक्षात् अमर्त्यस्य** (देवाचा) **अपि साङ्गदं** (बाहुभूषणांसहित अशा) **भुजं** (हाताला) **आहर्त्तास्मि** (उपटून टाकीन). ॥ १५ ॥ **इह अनापदि** (संकट नसतांना) **उत्पथान्** (धर्ममार्गाचें उल्लंघन करणाऱ्या अशा) **अन्यान् यथाशास्त्रं शासतः राज्ञः स्वधर्मस्थानुपालनं** (आपल्या धर्माप्रमाणें वागणाऱ्यांचें पालन करणें) **परमः धर्मः.'** ॥१६॥ **धर्मः उवाच—'पाण्डवेयानां वः एतत् आर्त्ताभयं** (भयभीतांना अभय आहे ज्यापासून असें)

पराधी प्राण्यांना व्यर्थ इजा देत असेल तर, तो साक्षात् देव कां असेना, त्याचा देखील हात त्यावरच्या भूषणांसुद्धां मी उपटून आणीन. ॥१५॥ - संकटांमध्यें कोणी स्व- धर्मत्याग केला, तरी त्याचा त्याला कांहीं दोष नसतो. पण - कोणत्याही प्रकारची आपत्ति नसतांना जर कोणी धर्ममार्गाचें उल्लंघन करीत असेल, तर त्यास योग्य शासन करून धर्माप्रमाणें जे वागत असतील त्यांचें पालन करणें, हा राजाचा मुख्य धर्म होय." ॥१६॥ वृषरूपी धर्म म्हणाला :— " परीक्षित् राजा, भयभीत लोकांचें भय निवारण करणारें हें भाषण तुला योग्यच आहे; कारण, ज्यांनीं (पांडवांनीं) आपल्या अनेक गुणांच्या योगानें षड्गुणैश्वर्यसंपन्न कृष्णालादेखील दूतत्व करावयास लाविलें, - त्या प्रसिद्ध - पांडवां-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

चाच वंशज तूं आहेस. ॥ १७ ॥ हे पुरुषश्रेष्ठा, क्लेशाला कारणें कोणापासून उत्पन्न होतात, त्या पुरुषाची आह्मांला माहिती नाहीं; कारण, आह्मी नानाप्रकारच्या मतवादी लोकांच्या निरनिराळ्या वादांनीं मोहित झालों आहों. ॥ १८ ॥ - वाक्यभेद ह्मः असे कीं, - कित्येक योगी किंवा नास्तिक लोक ह्मणतात, आत्म्याला सुख किंवा दुःख प्राप्त करून देणारा स्वतः आत्माच; दुसरे (दैवज्ञ) ह्मणतात कीं, दैव हेंच सुखदुःख देतें; कांहीं (मीमांसक) ह्मणतात कर्मच सुखदुःख देतें; आणखी दुसरें (चार्वाक—देहाला-

वचः युक्तं; येषां गुणगणैः भगवान् कृष्णः दौत्यादौ (दूतत्वादिकांत) **कृतः. ॥ १७ ॥ हे पुरुषर्षभ** (हे पुरुषश्रेष्ठा), **वाक्यभेदविमोहिताः** (मतवाद्यांच्या—भिन्न भिन्न वादांनीं मोहित झालेले) **वयं, यतः क्लेशबीजानि** (दुःखाचीं कारणें) **स्युः, तं पुरुषं न विजानीमः. ॥ १८ ॥ विकल्पवसनाः** (कुतर्कांनीं आच्छादिलेले—भरलेले) **केचित् आत्मानं आत्मनः प्रभुं** (सुखदुःख देण्यास समर्थ) **आहुः; अन्ये दैवं; परे कर्म; अपरे स्वभावं [प्रभुं आहुः]. ॥ १९ ॥ केषु अपि अप्रतर्क्यात्** (ज्याविषयीं तर्क करितां येत नाहीं अशापासून) **अनिर्देश्यात्** (ज्याच्याबद्दल वाणीला

न वयं क्लेशबीजानि यतः स्युः पुरुषर्षभ ॥ पुरुषं तं विजानीमो वाक्यभेदविमोहिताः ॥१८॥ केचिद्विकल्पवसना आहुरात्मानमात्मनः ॥
दैवमन्ये परे कर्म स्वभावमपरे प्रभुम् ॥ १९ ॥ अप्रतर्क्यादनिर्देश्यादिति केष्वपि निश्चयः ॥ अत्रानुरूपं राजर्षे विमृश स्वमनीषया
॥ २० ॥ एवं धर्मे प्रवदति स सम्राड् द्विजसत्तम ॥ समाहितेन मनसा विखेदः पर्यचष्ट तम् ॥ २१ ॥

बोलतां येत नाहीं अशापासून) **[सर्वं भवति] इति निश्चयः, हे राजर्षे, अत्र अनुरूपं** (जें योग्यअसेल तें) **स्वमनीषया** (बुद्धीनें) **विमृश** (विचार कर).' ॥ २० ॥ **हे द्विजसत्तम, धर्मे एवं प्रवदति [सति], सः *सम्राट्** (सार्वभौम राजा) **विखेदः** (गेला आहे मोह ज्याचा असा) **[सन्] समाहितेन** (समाधानयुक्त अशा) **मनसा तं पर्यचष्ट.** (ओळखिता झाला). ॥ २१ ॥

च आत्मा ह्मणणारे) असें ह्मणतात कीं, स्वभाव हाच पाहिजे तें करण्यास समर्थ आहे. ॥ १९ ॥ कित्येक ह्मणतात कीं, ज्याबद्दल मनाला तर्क करितां येत नाहीं व वाणीला बोलतां येत नाहीं, अशा कोणापासून तरी उत्पत्ति होते व तोच निश्चय होय. राजर्षे, ह्याविषयीं जें योग्य असेल त्याचा (ज्यापासून मला सुख किंवा दुःख प्राप्त होतें त्याचा) तूं आपल्या बुद्धीनें लक्षपूर्वक विचार कर. " ॥ २० ॥ (सूत ह्मणतात :–) ऋषीहो, तो वृषभरूपी धर्म असें बोलला व त्यामुळें सार्वभौम परीक्षिताचा मोह दूर झाला, नंतर त्यानें

---

१ ह्याचें ह्मणणें । **आत्मैव ह्यात्मनो बंधुरात्मैव रिपुरात्मनः** । गीता अ. ६ श्लो. ५। आत्म्याचा हितकर्ता व शत्रु दोन्ही स्वतः तोच होय. २ हे ह्मणतात :- देवता सुख दुःख देतात ह्मणावें, तर त्या स्वतंत्र रीतीनें देऊं शकत नाहींत, जशीं कर्मे असतील तशीं फळें त्या देतात; बरें कर्मच सुखदुःख देतें म्हणावें तर, तें कर्म आपोआप कांहीं उत्पन्न होऊं शकत नाहीं तें आपल्या स्वाधीन. तेव्हां आत्माच स्वतांला सुख किंवा दुःख प्राप्त करून घेतो असें ह्मणावें. *सम्राट् । **सम्यक् राजते सः** । जो चांगल्या प्रकारें शोभतो तो ॥ सम्राट् ही पदवी, जो राजा राजसूय यज्ञ करितो व सर्व राजांमध्यें मुख्य असून त्यांच्यावर अम्मल चालवूं शकतो, त्यालाच मुख्यत्वेंकरून असते. राजसूय यज्ञ केला नसला तरी नुसत्या सार्वभौम राजालासुद्धां कोठें कोठें हें विशेषण लावितात.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

समाधानयुक्त अंतःकरणानें वृषभाचें खरें स्वरूप ओळखिलें. ॥ २१ ॥ राजा ह्मणाला :— " हे धर्मज्ञात्या, तूं धर्म सांगत आहेस, - तेव्हां मी समजलों कीं - तूं वृषभरूप धारण करणारा धर्म आहेस. - आतां, मी ' तुला निष्कारण दुःख देणारा कोण आहे ' असें विचारिलें असतांही तूं त्याचें उत्तर दिलें नाहींस, ह्याचेंही कारण मला समजलें कीं, - पाप करणाराला जी गति मिळते, तीच ' अमुक मनुष्य पाप करितो ' असें सांगणारालाही होते. - हा धर्म तूं जाणत आहेस. - (ती गति मिळूं नये ह्मणून ' मला दुःख देणारा अमुक ' असें तूं सांगितलें नाहींस). ॥ २२ ॥ अथवा, ईश्वराच्या मायेची गति प्राण्यांच्या अंतःकरणाला समजत नाहीं व वाणीलाही अर्थांतच बोलून दाखवितां येण्यासारखी नसते,

राजा उवाच— ' हे धर्मज्ञ, धर्मं ब्रवीषि, वृषरूपधृक् धर्मः असि, यत् अधर्मकृतः (अधर्म करणाराला) स्थानं, तत् सूचकस्यापि भवेत्. ॥ २२ ॥ अथवा, नूनं देवमायायाः गतिः भूतानां चेतसः (अन्तःकरणाला), वचसः (वाणीला) च अपि अगोचरा (समजण्याला कठीण अशी) इति निश्चयः. ॥ २३ ॥ तपः, शौचं, दया, सत्यं इति [तव] पादाः प्रकी-

राजोवाच । धर्मं ब्रवीषि धर्मज्ञ धर्मो ऽसि वृषरूपधृक् ॥ यदधर्मकृतः स्थानं सूचकस्यापि तद्भवेत् ॥ २२ ॥ अथवा देवमायाया नूनं गतिरगोचरा ॥ चेतसो वचसश्चापि भूतानामिति निश्चयः ॥ २३ ॥ तपः शौचं दया सत्यमिति पादाः प्रकीर्तिताः ॥ अधर्माशैस्त्रयो भग्नाः स्मयसङ्गमदैस्तव ॥ २४ ॥ इदानीं धर्म पादस्ते सत्यं निर्वर्तयेद्यतः ॥ तं जिघृक्षत्यधर्मो ऽयमनृतेनैधितः कलिः ॥ २५ ॥ इयं च भूर्भगवता न्यासितोरुभरा सती ॥ श्रीमद्भिस्तत्पद-न्यासैः सर्वतः कृतकौतुका ॥ २६ ॥ शोचत्यश्रुकला साध्वी दुर्भगेवोज्झिता ऽधुना ॥

र्तिताः (सांगितलेले); तत्र त्रयः अधर्माशैः स्मयसङ्गमदैः (विस्मय संग व उन्मत्तपणा यांनीं) भग्नाः. ॥ २४ ॥ हे धर्म, इदानीं ते पादः सत्यं, यतः भवान् निर्वर्तयेत् (धारण करील— अवलम्बून राहील), तं अनृतेन एधितः (वाढलेला) अयं अधर्मः कलिः जिघृक्षति (धरण्यास इच्छितो). ॥ २५ ॥ इयं च भगवता न्यासितोरुभरा (उतरला आहे पुष्कळ भार जिचा अशी)

हा निश्चय आहे. - ह्मणून 'अमक्यानेंच अपराध केला' असें खात्रीनें समजावयाचेंच नाहीं. मग उगीच बोलून कसें दाखवावें? अशा आशयानें देखील तूं 'मला दुःख देणारा अमुक' असें सांगत नसशील. असो. - ॥ २३ ॥ हे धर्मा! तपश्चर्या, शुद्धपणा, दया आणि सत्य, हे चार तुझे चरण आहेत, असें ह्मणतात. त्यांपैकीं तीन चरण विस्मय,[1] संङ्ग, व उन्मत्तपणा,[2] ह्या तिघांनीं मोडिले. हे तिघेही तुझ्या शत्रूचे (अधर्माचे) अंश होत. ॥२४॥ हे धर्मा, हल्लीं तुझा एक सत्य नांवाचा पाद मात्र अवशिष्ट आहे व त्याच्यावर तूं सध्यां अवलंबून आहेस पण त्या चवथ्या पादालाही हा असत्यानें वाढलेला साक्षात् अधर्मरूपी कलि धरण्यास इच्छीत आहे! ॥ २५ ॥ (गाईकडे बोट दाखवून राजा ह्मणतो :—)

१ विस्मय, ह्म बुद्धिला गुंग करून टाकणारा आहे; त्यानें तपरूपी पाय मोडला. २ स्त्रीसंग, ह्यानें शुद्धतारूपी दुसरा पाय मोडला. ३ उन्मत्तपणा, ह्यानें दयारूपी तिसरा पाय मोडला. २७

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ही पृथ्वी, हिचा पुष्कळ भार श्रीकृष्णानें उतरला, व तेव्हांच त्याच्या चरणांवरील वज्र, अंकुश, ध्वज, कमल इत्यादि चिन्हें जागोजाग उमटलीं असल्यामुळें, हिला शोभा आली होती! अशी ही पृथ्वी नुकतीच पूर्वी भाग्यवती असतां, हल्लीं परमेश्वरानें तिचा त्याग केला असल्यामुळें, भाग्यहीन झाली आहे, व आतां 'शूद्र लोक राजांचा वेष घेऊन आपला उपभोग घेतील व ब्राह्मणांचा छळ करितील' म्हणून डोळ्यांत आंसवें आणून शोक करीत आहे!" ॥ २६ ॥ २७ ॥ त्या महापराक्रमी परीक्षित् राजानें पूर्वी सांगितल्याप्रमाणें धर्माचें व पृथ्वीचें सांत्वन करून अधर्माचा प्रसार करणाऱ्या त्या कलीच्या वधाकरितां तीक्ष्ण खड्ग उचलिलें. ॥ २८ ॥ कलीनें पाहिलें कीं, परीक्षिताच्या मनांत

श्रीमद्भिः सर्वतः तत्पदन्यासैः (त्याच्या चरणाच्या न्यासांनीं–ठेवण्यानें) कृतकौतुका (केलेली आहे–आली आहे शोभा जिला अशी), सती साध्वी अधुना उज्झिता (सोडिलेली) दुर्भगेव भूः 'अब्रह्मण्याः नृपव्याजाः (राजांचें सोंग घेणारे) शूद्राः मां भोक्ष्यन्ति' इति अश्रुकला (अश्रूंचे ओघळ-मुखावर-जिच्या अशी) शोचति!' ॥ २६ ॥ २७ ॥ महारथः इति धर्मं महीं च सान्त्वयित्वा, अधर्महेतवे कलये निशातं (तीक्ष्ण अशा) खड्गं आददे. ॥ २८ ॥ [कलिः] तं जिघांसुं (मारण्यास इच्छिणाऱ्या) अभिप्रेत्य (जाणून)

अब्रह्मण्या नृपव्याजाः शूद्रा भोक्ष्यन्ति मामिति ॥ २७ ॥ इति धर्मं महीं चैव सान्त्वयित्वा महारथः ॥
निशातमाददे खड्गं कलये ऽधर्महेतवे ॥ २८ ॥ तं जिघांसुमभिप्रेत्य विहाय नृपलाञ्छनम् ॥ तत्पादमूलं
शिरसा समगाद्भयविह्वलः ॥ २९ ॥ पतितं पादयोर्वीक्ष्य कृपया दीनवत्सलः ॥ शरण्यो नावधीच्छ्लोक्य
आह चेदं हसन्निव ॥ ३० ॥ राजोवाच । न ते गुडाकेशयशोधराणां बद्धाञ्जलेर्वै भयमस्ति किंचित् ॥
न वर्तितव्यं भवता कथंचन क्षेत्रे मदीये त्वमधर्मबन्धुः ॥ ३१ ॥

भयविव्हलः नृपलाञ्छनं विहाय शिरसा तत्पादमूलं समगात्. ॥ २९ ॥ दीनवत्सलः शरण्यः (शरणागतांचें रक्षण करणारा) श्लोक्यः (पुण्यकारक कीर्ति आहे ज्याची असा) [राजा] पादयोः पतितं वीक्ष्य कृपया न अवधीत् (मारिता झाला), हसन्निव इदं आह– ॥ ३० ॥ राजा उवाच—'गुडाकेशयशोधराणां (अर्जुनाचें यश धारण करणाऱ्यांच्या--अर्जुनाच्या वंशजांच्या) बद्धाञ्जलेः ते किंचित् भयं न अस्ति वै; त्वं अधर्मबन्धुः (अधर्म आहे प्रिय ज्याला असा) [असि]; अतः मदीये क्षेत्रे (राज्यांत) भवता कथंचन न

आपल्याला मारावें असें आहे. तें समजल्याबरोबर तो भयानें व्याकुळ झाला, व राजचिन्हें टाकून देऊन त्या राजाच्या चरणावर नम्रतेनें त्यानें आपलें मस्तक ठेविलें. ॥ २९ ॥ तो राजा परीक्षित् दीनांवर दया करीत असे. त्याची कीर्ति पुण्यकारक असून तो शरण आलेल्या पुरुषांचें रक्षण करीत असे. कलि आपल्या पायां पडत आहे असें पाहिल्याबरोबर, त्याला दया आली व त्याचा वध न करितां तो हंसत हंसत बोलूं लागला. ॥३०॥ राजा म्हणाला :– "हे कळे, आमचे अजोबा अर्जुन महाराज, - त्यांचा नेम असा असे कीं,

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आपल्या पुढें ज्यांनीं हात जोडले त्यांना अभय द्यावयाचें व सर्व प्रकारें त्यांचें रक्षण करावयाचें. - त्यांचेच वंशज आह्मीं. ह्मणून मलाही त्यांच्या कीर्तीप्रमाणें वागलें पाहिजे. सध्यां माझ्या पुढें तूं हात जोडिलेस त्यामुळें तुला किंचित् देखील भय उरलें नाहीं. आतां तूं ह्या माझ्या राज्यांत मात्र कधींही राहूं नकोस. कारण, अधर्म तुला प्रिय आहे. - तूं जेथें राहशील तेथें अधर्म उत्पन्न करशीलच. पण माझ्या राज्यांत अधर्म झालेला मला सहन होणार नाहीं. - ॥३१॥ असत्य, चौर्य, अप्रतिष्ठित आचरण, पाप, लक्ष्मीची वडील बहीण, कपट, कलह, ढोंग हा अधर्मसमुदाय सुरू झाला. ॥ ३२ ॥ हे कले, अधर्म सदोदित तुला प्रिय आहे. व ब्रह्मावर्तांत - माझ्या राज्यामध्यें - धर्मानें आणि सत्यानें वर्तन ठेवलें पाहिजे. ह्या ठिकाणीं यज्ञवेत्ते लोक यज्ञपति परमेश्वराची यज्ञाच्या योगानें पूजा करितात - तेव्हां तुझें तेथें राहणें मला व माझ्या प्रजांना मानवणार नाहीं, ह्मणून -

वर्तितव्यं. ॥ ३१ ॥ लोभः, अनृतं, चौर्यं, अनार्यं (अप्रतिष्ठित आचरण), **अंहः** (पाप), **ज्येष्ठा, माया, कलहः, दंभ, अयं अधर्मपूगः** (अधर्मसमुदाय) **नरदेवदेहेषु वर्तमानं त्वां अनुप्रवृत्तः. ॥ ३२ ॥ हे अधर्मबन्धो, तत् धर्मेण सत्येन च वर्तितव्ये** (वर्तन ठेवण्यास योग्य अशा) **ब्रह्मावर्ते [त्वया] न वर्तितव्यं, यत्र यज्ञवितानविज्ञाः** (यज्ञाच्या विस्तारांत निपुण असे) **यज्ञेश्वरं** (यज्ञपतीला--परमेश्वराला) **यज्ञैः यजन्ति. ॥ ३३ ॥ यस्मिन् इज्यमानः भगवान् इज्यामूर्तिः** (याग हीच मूर्ति आहे ज्याची असा) **स्थिरजंगमानां**

त्वां वर्तमानं नरदेवदेहेष्वनु प्रवृत्तो ऽयमधर्मपूगः ॥ लोभो ऽनृतं चौर्यमनार्यमंहो ज्येष्ठा च माया कलहश्च दम्भः ॥ ३२ ॥ न वर्तितव्यं तदधर्मबन्धो धर्मेण सत्येन च वर्तितव्ये ॥ ब्रह्मावर्ते यत्र यजन्ति यज्ञैर्यज्ञेश्वरं यज्ञवितानविज्ञाः ॥ ३३ ॥ यस्मिन्ह-रिर्भगवानिज्यमान इज्यामूर्तिर्यजतां शं तनोति ॥ कामानमोघान् स्थिरजङ्गमानामन्तर्बहिर्वायुरिवैष आत्मा ॥३४॥ सूत उवाच । परीक्षितैवमादिष्टः स कलिर्जातवेपथुः ॥ तमुद्यतासिमाहेदं दण्डपाणिमिवोद्यतम् ॥ ३५ ॥

अन्तर्बहिः वायुरिव एषः आत्मा हरिः यजतां शं (क्षेमाला), **कामान् अमोघान्** (निष्फल न होणाऱ्या - सफल अशा) **[च] तनोति.' ॥ ३४ ॥ सूतः उवाच – परीक्षिता एवं आदिष्टः जातवेपथुः** (उत्पन्न झाला आहे कंप ज्याला असा) **सः कलिः दण्डपाणिं इव उद्यतासिं** (उचलिला आहे खड्ग ज्यानें, अशा) **उद्यतं** (सिद्ध) **तं इदं आह— ॥ ३५ ॥**

येथें तूं राहूं नकोस. ॥ ३३ ॥ ह्या क्षेत्रामध्यें लोक यज्ञरूपी षड्गुणैश्वर्यसंपन्न ईश्वराची पूजा करितात; तो ईश्वर वायूप्रमाणें स्थावरजंगमात्मक जगाच्या आंत व बाहेर संचार करणारा सर्वांचा आत्मा होय; तोच भक्तांची दुःखें हरण करून आपली पूजा करणारांचें कल्याण करतो व त्यांच्या इच्छा निष्फल होऊं देत नाहीं, पूर्ण करितो." ॥ ३४ ॥ सूत ह्मणाले :– ह्याप्रमाणें परीक्षितानें कलीला सांगितलें. राजाच्या हातामध्यें नग्न तरवार असल्यामुळें, तो दंडपाणी(यम, कालभैरव)प्रमाणें दिसत होता. त्याला पाहिल्याबरोबर कलीच्या शरीराला कंप सुटला; व तो राजाला पुढें लिहिल्याप्रमाणें ह्मणाला :– ॥ ३५ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

कलि ह्मणाला :– " हे सार्वभौम राजा, तुझ्या आज्ञेप्रमाणें सांगशील तेथें मी राहीन, पण जेथें जेथें मी जातों तेथें तेथें तुझी ही धनुष्यबाण धारण करणारी – भयंकर – मूर्ति माझ्यापुढें उभी राहते! ॥ ३६ ॥ ह्मणून हे धार्मिक राजा, मला आपण असें एक स्थान दाखवून द्या कीं, ज्या ठिकाणीं तुमच्या आज्ञेप्रमाणें मी निश्चळ (निर्भय) राहीन. आपण धर्म जाणतच आहां. तेव्हां असें करणें आपल्याला उचित होय. " ॥ ३७ ॥ सूत ह्मणाले :– ऋषीहो, कलीनें राजाची अशी प्रार्थना केली, तेव्हां राजानें जुगार, मद्यपान, स्त्रीसंग, हिंसा असा चार प्रकारचा अधर्म जेथें आहे तीं तीं स्थानें कलीला राहावयास दिलीं. ॥ ३८ ॥ – पण कलि तेवढ्या स्थानांवर संतुष्ट झाला नाहीं, – त्यानें

कलिः उवाच—'**हे सार्वभौम, तव आज्ञया यत्र क्वचन वत्स्यामि** (राहीन), **तत्र तत्रापि आत्तेषुशरासनं** (घेतलीं बाण व धनुष्य हीं ज्यानें अशा) **त्वां लक्ष्यये** (पाहतों). ॥ ३६ ॥ **हे धर्मभृतां श्रेष्ठ, ते शासनं आतिष्ठन्** (प्रमाणें वागणारा) **अहं नियतः यत्रैव वत्स्ये** (राहीन), **तत् स्थानं मे निर्देष्टुं** (दाखविण्यास) **अर्हसि.**' ॥ ३७ ॥ **सूतः उवाच**—**अभ्यर्थितः** (प्रार्थिलेला) [**सः**] **तदा तस्मै कलये द्यूतं, पानं, स्त्रियः, सूनाः** (हिंसा), **यत्र चतुर्विधः अधर्मः, [तानि] स्थानानि ददौ.** ॥ ३८ ॥ **पुनः याचमानाय** (मागणाराला) **प्रभुः जातरूपं**

कलिरुवाच । यत्र क्वचन वत्स्यामि सार्वभौम तवाऽऽज्ञया ॥ लक्षये तत्र तत्रापि त्वामात्तेषुशरासनम् ॥ ३६ ॥ तन्मे धर्मभृतां श्रेष्ठ स्थानं निर्देष्टुमर्हसि ॥ यत्रैव नियतो वत्स्य आतिष्ठंस्ते ऽनुशासनम् ॥ ३७॥ सूत उवाच । अभ्यर्थितस्तदा तस्मै स्थानानि कलये ददौ ॥ द्यूतं पानं स्त्रियः सूना यत्राधर्मश्चतुर्विधः ॥३८॥ पुनश्च याचमानाय जातरूपमदात्प्रभुः ॥ ततो ऽनृतं मदं कामं रजो वैरं च पञ्चमम् ॥ ३९ ॥ अमूनि पञ्च स्थानानि ह्यधर्मप्रभवः कलिः ॥ औत्तरेयेण दत्तानि न्यवसत्तन्निदेशकृत् ॥ ४० ॥ अथैतानि न सेवेत बुभूषुः पुरुषः क्वचित् ॥ विशेषतो धर्मशीलो राजा लोकपतिर्गुरुः ॥ ४१ ॥

(सुवर्ण), **ततः अनृतं, मदं, कामं, रजः, पंचमं वैरं च अदात्.** ॥ ३९ ॥ **अधर्मप्रभवः तन्निदेशकृत्** (त्याच्या आज्ञेप्रमाणें वागणारा) **कलिः औत्तरेयेण** (उत्तरेच्या पुत्रानें –परीक्षितानें) **दत्तानि अमूनि पञ्च स्थानानि न्यवसत्** (राहिला). ॥ ४० ॥ **अथ बुभूषुः** (आपला उत्कर्ष व्हावा असें इच्छिणारा) **पुरुषः, विशेषतः धर्मशीलः राजा, लोकपतिः गुरुः,** आणखी कांहीं जागा मागितली; त्यावरून राजानें कलीला सुवर्ण हें स्थान दिलें; तें दिल्याबरोबर असत्य, मद, काम, हिंसा आणि वैर हीं पांच स्थानें त्या सुवर्णाच्या आश्रयावरच असल्यामुळें त्याला मिळालींच. ॥ ३९ ॥ कलीची उत्पत्ति अधर्मापासूनच होय. तो (कलि) उत्तरेच्या पुत्रानें (परीक्षितानें) दिलेल्या ह्या पांच स्थानांवर त्याच्या आज्ञेवरून राहूं लागला. ॥ ४० ॥ ह्मणून ज्या पुरुषाच्या मनांत आपला उत्कर्ष व्हावा असें असेल त्यानें, तसेंच विशेषेंकरून धर्मशील राजानें, व लोकरक्षक गुरूनें ह्या कलीच्या

१ आपण चांगल्या रीतीनें वागून लोकांना शिक्षण लावून देणारानें.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

वसतिस्थानांचें कधींही सेवन करूं नये. ॥ ४१ ॥ नंतर राजानें, वृषभाचे नाहींसे झालेले; तप, शुद्धपणा, आणि दया हे तीन चरण पुन्हां त्याला जोडिले, व पृथ्वीलाही आश्वासन देऊन तिची वृद्धि केली. ॥ ४२ ॥ परीक्षित् राजाचा पितामह राजा धर्म ज्यावेळीं सर्व सोडून देऊन अरण्यांत जाऊं लागला, तेव्हां त्यानें आपलें राजयोग्य आसन ह्याला (परीक्षिताला) दिलें व सांप्रत तो परीक्षित् त्या आसनावर विराजमान आहे. ॥ ४३ ॥ कौरवराजाच्या संपत्तीनें तो सार्वभौम राजा शोभत असून त्याची कीर्तिही पुण्यकारक

एतानि क्वचित् न सेवेत. ॥ ४१ ॥ [राजा] वृषस्य नष्टान् तपः, शौचं, दयां इति त्रीन् पादान् प्रतिसंदधे, (जोडिता झाला); **महीं च आश्वास्य** (आश्वासन देऊन) **समवर्धयत्** (वृद्धि करिता झाला). ॥ ४२ ॥ **एतर्हि** (आतां) **सः एषः अरण्यं विविक्षता** (प्रवेश करण्यास इच्छिणाऱ्या) **पितामहेन** (आज्यानें-धर्मानें) **राज्ञा उपन्यस्तं** (दिलेल्या) **पार्थिवोचितं** (राजाला योग्य अशा) **आसनं अध्यास्ते** (वसतो--विराजमान होतो). ॥ ४३ ॥ **कौरवेन्द्रश्रिया उल्लसन्** (शोभणारा) **चक्रवर्ती बृहच्छ्रवाः** (पुण्यकारक आहे कीर्ति ज्याची

वृषस्य नष्टांस्त्रीन्पादांस्तपः शौचं दयामिति ॥ प्रतिसन्दध आश्वास्य महीं च समवर्धयत् ॥ ४२॥
स एष एतर्ह्यध्यास्त आसनं पार्थिवोचितम् ॥ पितामहेनोपन्यस्तं राज्ञा ऽरण्यं विविक्षता ॥ ४३॥
आस्ते ऽधुना स राजर्षिः कौरवेन्द्रश्रियोल्लसन् ॥ गजाह्वये महाभागश्चक्रवर्ती बृहच्छ्रवाः ॥ ४४॥
इत्थंभूतानुभावोयमभिमन्युसुतो नृपः ॥ यस्य पालयतः क्षोणीं यूयं सत्राय दीक्षिताः ॥ ४५ ॥
॥ इ० भा० प्र० कलिनिग्रहो नाम सप्तदशो ऽध्यायः ॥ १७ ॥ सूत उवाच । यो वै द्रौण्यस्त्र-
विप्लुष्टो न मातुरुदरे मृतः ॥ अनुग्रहाद्भगवतः कृष्णस्याद्भुतकर्मणः ॥ १ ॥

असा) **महाभागः सः राजर्षिः अधुना गजाह्वये आस्ते. ॥ ४४ ॥ अयं अभिमन्युसुतः नृपः इत्थंभूतानुभावः** (अशा प्रकारचा आहे प्रभाव ज्याचा असा) **[अस्ति], यस्य क्षोणीं** (पृथ्वीला) **पालयतः [सतः] यूयं सत्राय दीक्षिताः [स्थ]. ॥४५॥ इति सप्तदशो ऽध्यायः ॥ १७॥ सूतः उवाच—द्रौण्यस्त्रविप्लुष्टः** (द्रोणाच्या पुत्राच्या - अश्वत्थाम्याच्या--ब्रह्मास्त्रानें दग्ध झालेला) होती. असा तो भाग्यशाली राजर्षि हल्लीं नुकताच हस्तिनापुरामध्यें राहत होता. ॥ ४४ ॥ ऋषिहो, जो राजा राज्य करीत असतां तुम्ही सत्र करण्याची दीक्षा घेऊन बसलां आहां, त्या अभिमन्युपुत्र परीक्षितीचा प्रभाव असा आहे. ॥४५॥ **इति सप्तदशो ऽध्यायः॥१७॥** सूत ह्मणाले :-- ऋषिहो! तो राजा परीक्षित् आपल्या मातेच्या उदरांत होता, तेव्हां अश्वत्थाम्याच्या ब्रह्मास्त्रानें दग्ध झाला असतांही मरण पावला नाहीं; कारण, त्याच्यावर श्रीकृष्णाचा अनुग्रह होता. श्रीकृष्ण षड्गुणैश्वर्यसंपन्न असल्यामुळें अद्भुत कर्मे कर-

१ ३८ । ३९ श्लोकांत सांगितलीं आहेत त्यांचे. २ पृथ्वीवर तपश्चर्या, शुद्धपणा, आणि दया हीं पुन्हां चालू केलीं. ३ पृथ्वीवर भक्तिमार्ग सुरू केला, पाखंड मतें नाहींशीं केलीं व शेतकी इत्यादिकांना उत्तेजन दिलें.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ण्यास समर्थ होय, - त्यानें त्याचें रक्षण केलें. - ॥ १ ॥ - कांहीं कारणानें एका - ब्राह्मणाला कोप येऊन त्यानें परीक्षित् राजाला मारण्याकरितां तक्षकनामक सर्पाला पाठविलें; तें प्राणांवर संकट आलें खरें; पण, तेव्हां देखील राजाला फार वाईट वाटलें नाहीं, किंवा मोहही पडला नाहीं; - कारण, भय वाटावयाचें कोणाला? मनाला. – तें मनच त्यानें श्रीकृष्णाकडे लाविल्यामुळें - जाग्यावर नव्हतें, मग भय कसें वाटणार? - ॥ २ ॥ पुढें त्या राजानें स्वतः व्यासांच्या पुत्राचा (शुकाचार्यांचा) शिष्य होऊन त्यांपासून श्रीकृष्णाविषयीं सर्व ज्ञान संपादन करून घेतलें, व सर्वसंगपरित्याग करून गंगेमध्यें आपल्या शरीराचा त्याग केला. ॥ ३ ॥ - 'अंतकाळीं एवढा विवेक त्याला कसा झाला!' असें

यः मातुः उदरे भगवतः अद्भुतकर्मणः कृष्णस्य अनुग्रहात् न मृतः, ॥ १ ॥ भगवति अर्पिताशयः (समर्पित आहे अंतःकरण ज्यानें असा) यः ब्रह्मकोपोत्थितात् तक्षकात् प्राणविप्लवात् (प्राणनाशापासून) उरुभयात् न संमुमोह. ॥ २ ॥ विज्ञाताजितसंस्थितिः (जाणिलें आहे ईश्वराचें तत्व ज्यानें असा) वैयासकेः शिष्यः सर्वतः सङ्गं उत्सृज्य गङ्गायां स्वं कलेवरं जहौ. ॥ ३ ॥ उत्तमश्लोकवार्तानां तत्कथामृतं जुषतां (सेवन करणाऱ्यांचा—ना) तत्पदाम्बुजं स्मरतां अन्तकाले अपि सम्भ्रमः न स्यात्. ॥ ४ ॥ यावत् ईशः महान् आभिमन्यवः

ब्रह्मकोपोत्थिताद्यस्तु तक्षकात्प्राणविप्लवात् ॥ न सम्मुमोहोरुभयाद्भगवत्यर्पिताशयः ॥ २ ॥ उत्सृज्य सर्वतः सङ्गं विज्ञाताजितसंस्थितिः ॥ वैयासकेर्जहौ शिष्यो गङ्गायां स्वं कलेवरम् ॥ ३ ॥ नोत्तमश्लोकवार्तानां जुषतां तत्कथामृतम् ॥ स्यात्सम्भ्रमो ऽन्तकालेऽपि स्मरतां तत्पदाम्बुजम् ॥ ४ ॥ तावत्कलिर्न प्रभवेत्प्रविष्टो ऽपीह सर्वतः ॥ यावदीशो महानुर्व्यामाभिमन्यव एकराट् ॥ ५ ॥ यस्मिन्नहनि यर्ह्येव भगवानुत्ससर्ज गाम् ॥ तदैवेहानुवृत्तो ऽसावधर्मप्रभवः कलिः ॥ ६ ॥

(अभिमन्यूचा पुत्र) इह उर्व्यां (पृथ्वीवर) एकराट्, तावत् सर्वतः प्रविष्टः अपि कलिः न प्रभवेत्. ॥ ५ ॥ यस्मिन् अहनि यर्हि (ज्यावेळीं) एव भगवान् गां (पृथ्वीला) उत्ससर्ज, अधर्मप्रभवः असौ कलिः तदैव इह अनुवृत्तः (संचार करूं लागलेला). ॥ ६ ॥

आश्चर्य वाटणें नलगे; कारण - श्रीकृष्णाच्या भक्तांना अंतकाळीं कधींही भ्रम उत्पन्न होत नाहीं - भक्त म्हणून तेच कीं - जे नेहमीं श्रीकृष्णाच्या कथांबद्दल संवाद करितात, त्यांचें कथामृत नेहमीं - कर्णद्वारा - प्राशन करितात (ऐकतात), व त्याच्या चरणकमलांचेंच स्मरण करितात. ॥ ४ ॥ कलि सर्व ठिकाणीं प्रविष्ट झाला आहे खरा, - व सर्व लोकांना मोहित करून अधर्माकडे त्यांची प्रवृत्ति करणें हें त्याचें कर्तव्यही खरें, - पण जेवढा वेळपर्यंत महासमर्थ अभिमन्यूचा पुत्र परीक्षित् ह्या पृथ्वीवर चक्रवर्ती (सार्वभौमराजा) होता तेवढा वेळपर्यंत तो कलि आपला अंमल चालवूं शकला नाहीं. ॥ ५ ॥ - तो कलि पृथ्वीवर नसेलच असें मात्र म्हणतां येणार नाहीं, कारण - ज्या दिवशीं व

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ज्यावेळीं श्रीकृष्णानें पृथ्वीचा त्याग करून स्वलोकीं गमन केलें, त्या वेळेसच हा अधर्माची वृद्धि करणारा कलि पृथ्वीवर संचार करूं लागला. ॥ ६ ॥ - आतां परीक्षित् राजा लोकांचें नेहमीं कल्याण करीत असे. त्याला लोकांवर उपकार करण्याची अमूल्य संधि आली होती कीं, जो कलि लोकांत अधर्म उत्पन्न करून त्यांचें अकल्याण करतो, तो राजाच्या हातांत सांपडला होता, तेव्हां त्यानें कलीचा वध केला असता तर लोकांवर पुष्कळ उपकार झाले असते. पण असें असूनही त्यानें कलीचा वध केला नाहीं ह्याचें कारण निराळें आहे : - जसा भ्रमर, - पुष्कळ निरनिराळ्या फुलांत फिरतो. त्याला थोडा रस देणारीं, पुष्कळ देणारीं व मुळींच न देणारीं अशीं सर्व प्रकारचीं फुलें आढळतात. पण तो, चांगलीं तेवढीं फुलें राखून ठेवावयाचीं व थोडा रस देणारीं असतील तीं तोडून फाडून टाकावयाचीं, असें करीत नाहीं तर - त्या प्रत्येकांत कांहीं तरी भोग्य सार सांपडतेंच ह्मणून सर्वांना राखून ठेवितो. हा सार्वभौम राजा परीक्षित् तसाच होता. कलीमध्यें एक अमोल गुण आहे, तो पाहिल्यामुळें राजानें त्याचा द्वेष केला नाहीं. तो गुण एवढाच कीं, ह्या

सारंगः (भ्रमर) **इव सारभुक्** (सार ग्रहण करणारा) **सम्राट् कलिं न अनुद्वेष्टि, यत् कुशलानि आशु** (सत्वर) **सिध्यन्ति, इतराणि न, कृतान्येव [तानि सिध्यन्ति]. ॥ ७ ॥ बालेषु** (अज्ञानी लोकांत) **धीरभीरुणा** (ज्ञान्यांस भिणाऱ्या) **कलिना किंनु ? यः वृकः** (लांडगा) **अप्रमत्तः** (सावध) **प्रमत्तेषु** (बेसावध अशा) **नृषु वर्तते. ॥ ८ ॥ [हे ऋषयः], यत्**

नानुद्वेष्टि कलिं सम्राट् सारङ्ग इव सारभुक् ॥ कुशलान्याशु सिध्यन्ति नेतराणि कृतानि यत् ॥ ७ ॥
किं नु बालेषु शूरेण कलिना धीरभीरुणा ॥ अप्रमत्तः प्रमत्तेषु वृको यो नृषु वर्तते ॥ ८ ॥ उपव-
र्णितमेतद्वः पुण्यं पारीक्षितं मया ॥ वासुदेवकथोपेतमाख्यानं यदपृच्छत ॥ ९ ॥ या याः कथा
भगवतः कथनीयोरुकर्मणः ॥ गुणकर्माश्रयाः पुम्भिः संसेव्यास्ता बुभूषुभिः ॥ १० ॥

अपृच्छत; [तत्] वासुदेवकथोपेतं (वासुदेवाच्या कथांनीं युक्त अशा) **पुण्यं एतत् पारीक्षितं आख्यानं मया वः उपवर्णितं. ॥ ९ ॥ कथनीयोरुकर्मणः** (कीर्तन करण्यास योग्य आहेत

युगांत पुण्यकर्म करण्याबद्दल नुसता संकल्प जरी केला असला तरी त्याबद्दल फल प्राप्त होतें; पापाबद्दल मात्र तसें नाहीं. तीं जेव्हां प्रत्यक्ष करावीं तेव्हां फळ मिळतें. - असा गुण आहे ह्मणून त्याला राजानें मारिलें नाहीं. - ॥ ७ ॥ (आणखी एका विचारामुळेंही राजानें कलीचा वध केला नाहीं. तो हा कीं) कलि ज्ञानी लोकांना फार भितो; त्याचें शौर्य कायतें अज्ञानी लोकांपुढेंच चालावयाचें. तेव्हां त्याच्या हातून होणार काय ? एखाद्या लांडग्याप्रमाणें स्वतः सावध राहून बेसावध प्राण्यांवर हल्ला करावा एवढेंच कायतें ॥८॥ ऋषिहो, तुह्मी मला जें विचारलें तें हें परीक्षित् राजाचें पवित्र आख्यान श्रीकृष्ण चरित्रासह मी तुह्मांला सांगितलें. ॥ ९ ॥ त्या ईश्वराचीं पुष्कळ चरित्रें कीर्तन करण्यास योग्य आहेत. त्यानें नानाप्रकारचे गुण व कामें पृथ्वीवर केलीं आहेत; ज्या पुरुषांना ' आपण योग्यतेस चढावें ' अशी इच्छा असेल त्यांनीं भगवंताच्या कथा श्रवण करीत.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

असावें. ॥ १० ॥ ऋषि ह्मणाले:- हे शांत पुरुषा सूता! ज्या लोकांस मृत्यु प्राप्त व्हावयाचा, त्यांना 'मर्त्य' ह्मणतात; त्यांतलेच आह्मी. अमृत मृत्यूची निवृत्ति करितें. तूं आह्मांला श्रीकृष्णाचें शुद्ध चरित्ररूपी अमृत पाजीत (सांगत) आहेस ह्मणून चिरायु हो (तुला पुष्कळ आयुष्य असो). ॥ ११ ॥ कर्मापासून फल मिळेलच असा निश्चय सांगतां येत नाहीं; - कारण, कर्ममार्गांत वैगुण्य आहें असतां फल प्राप्त होत नाहीं. व वैगुण्य येण्याचा संभव फार असतो. - ह्या ठिकाणीं आमचीं शरीरें धूम्रानें धुरकट व व्याकुळ झालीं आहेत; अशा स्थितींत तूं आह्मांला श्रीकृष्णकमलाचें आंसव (मधुर रस) अर्पण करीत आहेस - त्यामुळें व्याकुळ झालेल्या आमच्या शरीरास पुन्हां उत्तेजन येतें. -

पुष्कळ चरितें ज्याचीं अशा) **भगवतः याः याः कथाः गुणकर्माश्रयाः [संतिः], ताः बुभूषुभिः** (उत्कर्षाची इच्छा करणाऱ्यांनीं) **पुंभिः संसेव्याः.** ॥ १० ॥ **ऋषयः ऊचुः**-हे सौम्य सूत, **शाश्वतीः समाः** (पुष्कळ वर्षेंपर्यंत) **जीव; यः त्वं मर्त्यानां नः अमृतं कृष्णस्य विशदं** (शुद्ध अशा) **यशः शंससि.** ॥ ११ ॥ **भवान् अस्मिन् अनाश्वासे** (अविश्वसनीय अशा) **कर्मणि धूमधूम्रात्मनां** (धूमानें धुरकट झालीं आहेत शरीरें ज्यांचीं अशा) **नः गोविंदपादपद्मासवं** (श्रीकृष्णाच्या पादकमलाचा मकरंद हें) **मधु आपाययति** (पाजितो). ॥ १२ ॥ **[वयं] भगवत्संगि-**

ऋषय ऊचुः । सूत जीव समाः सौम्य शाश्वतीर्विशदं यशः ॥ यस्त्वं शंससि कृष्णस्य मर्त्यानाममृतं हि नः ॥ ११ ॥
कर्मण्यस्मिन्ननाश्वासे धूमधूम्रात्मनां भवान् ॥ आपाययति गोविन्दपादपद्मासवं मधु ॥ १२ ॥ तुलयाम लवेनापि न
स्वर्गं नापुनर्भवम् ॥ भगवत्सङ्गिसङ्गस्य मर्त्यानां किमुताशिषः ॥ १३ ॥ को नाम तृप्येद्रसवित्कथायां महत्तमैकान्त
परायणस्य ॥ नान्तं गुणानामगुणस्य जग्मुर्योगेश्वरा ये भवपाद्ममुख्याः ॥ १४ ॥

संगस्य (भगवद्भक्तांच्या संगतीच्या) **लवेन** (अति अल्पकालाशीं) **अपि स्वर्गं न तुलयाम, अपुनर्भवं** (मोक्षाला) **न [तुलयाम], उत मर्त्यानां आशिषः** (भोगांना) **न [तुलयाम इति] किं [वक्तव्यं]?** ॥ १३ ॥ **ये भवपाद्ममुख्याः** (शंकर व ब्रह्मदेव हे मुख्य आहेत ज्यांमध्यें असे) **योगेश्वराः, [ते अपि] अगुणस्य महत्तमैकान्तपरायणस्य** (अतिशय मोठ्यांचा ह्म० योग्यांचा

॥ १२ ॥ आह्मीं श्रीकृष्णाच्या भक्तांच्या क्षणमात्र संगतीशींही स्वर्गाची तुलना लावीत नाहीं; किंबहुना मोक्षाची देखील नाहीं. मग मनुष्यांच्या भोगाची तुलना करावयाचे नाहीं हें निराळें सांगणें पाहिजे कशाला? (स्वर्ग व मोक्ष यांपेक्षांही भक्तांची संगती अधिक चांगली). ॥ १३ ॥ परमेश्वराच्या ठिकाणीं सत्व रज आणि तम हे गुण नाहींत. ह्या जगांत जे जे कोणी अतिशय मोठे आहेत, त्यांचादेखील मुख्य आश्रय तोच होय. शंकर, ब्रह्मदेव यांसारख्या, महान् महान् योग्यांनाही परमेश्वराच्या गुणांचा अंत नाहीं; तेव्हां त्याच्या कथा ऐकण्याबद्दल कोणत्या पुरुषाला तृप्ति वाटेल बरें? मात्र तो (पुरुष) रस जाणणारा पाहिजे (ह्मणजे कोणालाही तृप्ति वाटावयाची नाहीं). ॥ १४ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

सूता, तूं ज्ञाता आहेस, व तुझी आराध्य देवता श्रीकृष्णच आहे, तो ईश्वर मोठमोठ्यांचा मुख्य आश्रय होय; त्याचीं उत्कृष्ट व निर्मल चरित्रें आह्मांला विस्तरानें सांग. तीं ऐकण्याविषयीं आह्मी फार उत्सुक आहों. ॥१५॥ परीक्षित् राजा मोठा बुद्धिवान् व भगवद्भक्त होता. त्याला व्यासपुत्र शुकाचार्यांनीं ज्ञान सांगितलें व त्यामुळें तो गरुडध्वज विष्णूच्या चरणकमलाजवळ प्राप्त झाला. विष्णूच्या चरणकमलालाच 'मोक्ष' असें ह्मणतात. ॥१६॥ सूता, परीक्षित् राजाचें आख्यान फार पुण्यकारक असून त्याचें पर्यवसान अत्याश्चर्यकारक

मुख्य आश्रय अशा) **यस्य गुणानां अन्तं न जग्मुः, [तस्य] कथायां को नाम रसवित् तृप्येत! ॥ १४ ॥ हे विद्वन्, तत् नः भगवत्प्रधानः** (भगवान् ह्म० श्रीकृष्ण आहे मुख्य - आराध्य दैवत - ज्याचें असा) **भवान् महत्तमैकान्तपरायणस्य हरेः उदारं विशुद्धं चरितं शुश्रूषतां** (ऐकण्याविषयीं उत्सुक अशा) **नः वितनोतु** (विस्तार करो). ॥ १५ ॥ **अदभ्रबुद्धिः** (महाबुद्धिमान्) **सः महाभागवतः परीक्षित् वैयासकिशब्दितेन** (श्रीशुकाचार्यांनीं सांगितलेल्या) **येन ज्ञानेन अपवर्गाख्यं खगेन्द्रध्वजपादमूलं** (गरुडध्वजाच्या ह्म० विष्णूच्या चरणमूलाप्रत) **भेजे. ॥१६॥**

तन्नो भवान्वै भगवत्प्रधानो महत्तमैकान्तपरायणस्य ॥ हरेरुदारं चरितं विशुद्धं शुश्रूषतां नो वितनोतु विद्वन् ॥ १५ ॥ स वै महाभागवतः परीक्षिद्येनापवर्गाख्यमदभ्रबुद्धिः ॥ ज्ञानेन वैयासकिशब्दितेन भेजे खगेन्द्रध्वजपादमूलम् ॥१६॥ तन्नः परं पुण्यमसंवृतार्थमाख्यानमत्यद्भुतयोगनिष्ठम् ॥ आख्याह्यनन्ताचरितोपपन्नं पारीक्षितं भागवताभिरामम् ॥ १७ ॥ सूत उवाच । अहो वयं जन्मभृतो ऽद्य हास्म वृद्धानुवृत्त्यापि विलोमजाताः ॥ दौष्कुल्यमाधिं विधुनोति शीघ्रं महत्तमानामभिधानयोगः ॥ १८ ॥

तत् परं पुण्यं असंवृतार्थं (गुप्त न ठेविला आहे अर्थ ज्याचा—स्पष्टार्थ अशा) **अत्यद्भुतयोगनिष्ठं** (अति आश्चर्यकारक आहे पर्यवसान ज्याचें अशा) **अनन्ताचरितोपपन्नं** (भगवन्ताच्या लीलांनीं युक्त अशा) **भागवताभिरामं** (भगवद्भक्तांस प्रिय अशा) **पारीक्षितं आख्यानं नः आख्याहि. ॥ १७ ॥ सूतः उवाच—अहो अद्य, विलोमजाताः** (विलोमस्थितींत उत्पन्न झालेले) **अपि वयं वृद्धानुवृत्त्या** (वृद्धपुरुषांच्या सेवेनें–आदरानें) **जन्मभृतः** (सफलजन्म असे) **आस्म ह. महत्तमानां अभिधानयोगः** (लौकिक संभाषणप्रसंग) **शीघ्रं दौष्कुल्यं** (निंद्यकुलसंबंधी अशा) **आधिं** आहे व त्यामध्यें भगवद्गुणानुवाद फार असल्यामुळें तें चरित्र भगवद्भक्तांस प्रिय असतें. शिवाय, शुकाचार्यांनीं परीक्षिताला जें भागवतरूपी ज्ञान सांगितलें, तें ह्या चरित्रामध्यें असल्यामुळें तर ह्याला सर्व प्रकारांनीं फारच शोभा आली आहे. ह्मणून, तें (आख्यान) गुप्त न ठेवितां स्पष्टपणें आह्मांला सांग. ॥ १७ ॥ सूत ह्मणतात :– अहो, मी जरी विलोम[1] स्थितींत उत्पन्न झालों आहें, तरी माझें जन्म आज सफळ झालें. कारण, वृद्ध[2] पुरुषांची मला सेवा घडली. - त्या सेवेचें माहात्म्य फार विलक्षण असतें : पहा :- निंद्य

---

१ उच्च वर्णाच्या स्त्रीच्या पोटीं हलक्या वर्णाच्या पुरुषापासून झालेल्या प्रजेला विलोम ह्मणतात, सूत विलोम होता. कारण, सूत ह्मणजे ब्राह्मणजातीच्या स्त्रीच्या ठिकाणीं क्षत्रियापासून झालेला मुलगा. २ ज्ञानवृद्ध शुकाचार्यांची सेवा; किंवा, अनुवृत्ति ह्मणजे आदर अथवा कृपा; वयोवृद्ध, तपोवृद्ध, कुलवृद्ध, ज्ञानवृद्ध, अशा आपण ऋषींनीं माझा आदर केला व माझ्यावर कृपा केली.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

कुळांमध्यें जन्म झालें ह्मणजे मनाला एक प्रकारचें वाईट वाटत असतें : पण साधूंपाशीं लौकिक भाषणप्रसंग झाला, तरी तो देखील मनांतील पीडा सत्वर दूर करतो. ॥ १८ ॥ मग, अशा मोठमोठ्या साधूंचा देखील जो मुख्य आश्रय, तो परमेश्वर आपलें नाम ग्रहण करणाऱ्या (उच्चारणाऱ्या) पुरुषाच्या मनांतील पीडा नाहींशा करितो हें काय सांगावयास पाहिजे? त्या परमेश्वराच्या स्वरूपाचा अंत नाहीं व त्याचे गुणही मोठे आहेत ह्मणूनच त्याला 'अनंत' असें ह्मणतात. ॥ १९ ॥ कोणत्याही पुरुषाला आपल्या गुणांनीं ईश्वराची बरोबरी देखील करितां यावयाची नाहीं, मग उल्लंघन (वर तान) करितां येणार नाहीं - हें सांगावयाला पाहिजे कशाला? शिवाय ही गोष्ट पुढील प्रमाणावरून दृढही होते : पहा, - लक्ष्मी - ह्मणजे पूर्ण चंचल हें प्रसिद्ध आहे. - ती आपल्यास प्राप्त व्हावी, ह्मणून ब्रह्मदेवासारखे देखील पुष्कळ लोक तिची प्रार्थना करीत होते; पण त्या सर्वांना सोडून

(मनाच्या पीडेला) **विधुनोति** (नाहींशी करितो). ॥ १८ ॥ **महत्तमैकान्तपरायणस्य तस्य नाम गृणतः** (उच्चार करणाऱ्या-पुरुषाच्या) [**आर्धिं विधुनोति इति**] **कुतः पुनः** [**वक्तव्यं**]? **यः भगवान् अनन्तशक्तिः अनन्तः महद्गुणत्वात् यं अनन्तं आहुः.** ॥ १९ ॥ **ननु असाम्यानतिशायनस्य** (नाहीं साम्य किंवा-आधिक्य-उल्लंघन ज्याचें अशाच्या) **गुणैः एतावता सूचितेन अलं**

कुतः पुनर्गृणतो नाम तस्य महत्तमैकान्तपरायणस्य ॥ यो ऽनन्तशक्तिर्भगवाननन्तो महद्गुण-
त्वाद्यमनन्तमाहुः ॥ १९ ॥ एतावतालं ननु सूचितेन गुणैरसाम्यानतिशायनस्य ॥ हित्वे-
तरान्प्रार्थयतो विभूतिर्यस्यांघ्रिरेणुं जुषते ऽनभीप्सोः ॥ २० ॥ अथापि यत्पादनखावसृष्टं जग-
द्विरिञ्चोपहृतार्हणाम्भः ॥ सेशं पुनात्यन्यतमो मुकुन्दात् को नाम लोके भगवत्पदार्थः ॥ २१ ॥

(पुरे); **विभूतिः** (लक्ष्मी) **प्रार्थयतः** (प्रार्थना करणाऱ्या) **इतरान् हित्वा** (सोडून), **अनभीप्सोः** (न इच्छिणाऱ्या) **यस्य अंघ्रिरेणुं जुषते!** ॥ २० ॥ **अथापि यत्पादनखावसृष्टं** (ज्याच्या याच्या नखापासून उत्पन्न झालेलें) **विरिंचोपहृतार्हणांभः** (ब्रह्मदेवानें अर्पण केलेलें अर्घोदक) **सेशं** (शंकरासह अशा) **जगत् पुनाति; लोके मुकुन्दात् अन्यतमः भगवत्पदार्थः को नाम?**

ती ह्याच्या चरणधूलीचें अजून निश्चलपणें सेवन करीत आहे. - ह्यानें इतरांप्रमाणें तिची प्रार्थना केली असेल, तर तसेंही नाहीं; - ह्याला तिची अगदीं इच्छा नाहीं. ॥ २० ॥ तसेंच आणखी, गंगा त्याच्या पायाच्या नखापासून उत्पन्न झाली व तिचें ब्रह्मदेवानें त्याच्याच पूजेला अर्पण केलें. पुढें तेथें निघालेलें तें उदक (गंगा) शंकरासह सर्व जगाला पवित्र करीत आहे, - तेव्हां शंकर व ब्रह्मदेव हे त्याचे उपासक, होते, हें सिद्धच आहे :- असें ज्याचें माहात्म्य त्या मोक्षदात्या परमेश्वराशिवाय ह्या जगांत दुसरा भगवान् (षड्गुणैश्वर्यसंपन्न) पदार्थ कोणता आहे बरें? ॥ २१ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

विचारसंपन्न (साधु) पुरुष त्याचे ठिकाणींच प्रेम ठेवून व देहादिकांचे ठिकाणीं जडलेला संग अगदीं सोडून देऊन एकाएकीं शेवटली (परमहंस) स्थिति स्वीकारितात. अहिंसा व शांति हेच त्या अवस्थेंतील उत्तम धर्म होत. ॥२२॥ ऋषिहो, जें तुह्मीं मला विचारिलें, तें मला अवगत असेल तेवढें सांगतों. जसे पक्षी आपआपल्या शक्तीप्रमाणें आकाशांत उड्डाण करितात, - लहान असेल त्याला फार उंच उडतां येत नाहीं व मोठा असतो तो पुष्कळ उंच जातो, - त्याप्रमाणें विद्वान् लोकही आपल्या शक्त्यनुसार विष्णूच्या लीला वर्णन करितात. ॥ २३ ॥ एकदां राजा परीक्षित् धनुष्य सज्ज करून अरण्यांत मृगयेकरितां पशूंचा पाठलाग करीत फिरत असतां अगदीं थकून गेला; त्याला

॥ २१ ॥ **यत्र अनुरक्ताः धीराः देहादिषु ऊढं** (जडलेल्या) **सङ्गं व्यपोह्य** (सोडून) **सहसैव अन्त्यं** (शेवटल्या) **तत् पारमहंस्यं व्रजन्ति; यस्मिन् अहिंसोपशमः** (अहिंसा व शांति) **स्वधर्मः. ॥ २२ ॥ हे *अर्यमणः** (हे सूर्यांनो—हे ज्ञान्यांनो), **भवद्भिः पृष्टः अहं यावान् अत्र आत्मावगमः** (माझें ज्ञान) **[तावत्] आचक्षे. पतत्रिणः** (पक्षी) **[यथा] आत्मसमं**

यत्रानुरक्ताः सहसैव धीरा व्यपोह्य देहादिषु सङ्गमूढम् ॥ व्रजन्ति तत्पारमहंस्यमन्त्यं यस्मिन्नहिंसोपशमः स्वधर्मः ॥ २२ ॥ अहं हि पृष्टो ऽर्यमणो भवद्भिराचक्ष आत्मावगमो ऽत्र यावान् ॥ नभः पतन्त्यात्मसमं पतत्रिणस्तथासमं विष्णुगतिं विपश्चितः ॥ २३ ॥ एकदा धनुरुद्यम्य विचरन्मृगयां वने ॥ मृगाननुगतः श्रान्तः क्षुधितस्तृषितो भृशम् ॥ २४ ॥ जलाशयमचक्षाणः प्रविवेश तमाश्रमम् ॥ ददर्श मुनिमासीनं शान्तं मीलितलोचनम् ॥२५॥ प्रतिरुद्धेन्द्रियप्राणमनोबुद्धिमुपारतं ॥ स्थानत्रयात्परं प्राप्तं ब्रह्मभूतमविक्रियम् ॥ २६ ॥

(स्वशक्त्यनुरूप) **नभः पतन्ति, तथा विपश्चितः विष्णुगतिं समं [वदन्ति]. ॥ २३ ॥ एकदा धनुः उद्यम्य** (सज्ज करून) **वने मृगयां विचरन् मृगान् अनुगतः श्रान्तः भृशं तृषितः क्षुधितः, ॥ २४ ॥ जलाशयं अचक्षाणः** (न पाहणारा) **तं आश्रमं प्रविवेश; [तत्र] शान्तं मीलितलोचनं आसीनं मुनिं ददर्श. ॥२५॥ प्रतिरुद्धेन्द्रियप्राणमनोबुद्धि** (आवरून घेतली

अतिशय तहान आणि भूक लागली. ॥ २४ ॥ त्यानें पाण्याचा शोध केला पण कोठें सांपडलें नाहीं. जवळच एक आश्रम होता. त्यामध्यें तो शिरला असतां, तेथें डोळे मिटून आसनावर बसलेला एक शांत ऋषि त्याच्या दृष्टीस पडला. ॥ २५ ॥ त्यानें आपलीं सर्व इंद्रियें, प्राण, मन व बुद्धि, ह्या सर्वांचे व्यापार बंद केले होते; तो ऐहिक विषयांपासून विराम पावला होता, व जाग्रत्,[3] स्वप्न,[4] सुषुप्ति,[5] या तीन अवस्थांहून पर (तुरीय[6]) अशा अवस्थेला (आत्मस्वरूपाला) प्राप्त झाला असून ब्रह्मस्वरूपीं मिळाल्या-

---

* अर्यमा ह्मणजे सूर्य; त्या सारखे तेजस्वी केवळ प्रतिसूर्यच असे; वेदमूर्ति; ज्ञानी. १ ब्रह्मचारी, गृहस्थ, वानप्रस्थ, आणि संन्यास हे चार आश्रम; ह्यांपैकीं शेवटली स्थिति संन्यास. २ जागें असणें ३ स्वप्नांत असणें. ४ झोंप. ५ तुरीय ह्म० चवथी; पूर्वी सांगितलेल्या तीन अवस्थांच्या पुढली. ह्या अवस्थेला उन्मनी अशी संज्ञा आहे. हीच आत्मस्वरूपज्ञानाची स्थिति होय.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

मुळें सुखदुःखादि सर्व विकाररहित झाला होता. ॥ २६ ॥ त्याच्या जटा पसरल्या गेल्यामुळें व आंगावर कृष्णाजिनें[1] पांघरलें असल्यामुळें त्याचें स्वरूप आच्छादित झालें होतें. इकडे राजाचा कंठ व तालु तहानेनें सुकून गेलीं होतीं; तेव्हां त्यानें समाधिस्थ ऋषीपाशींच उदक मागितलें. ॥ २७ ॥ - पण तो ऋषि मुळींच देहभानावर नसल्यामुळें - राजाला बसावयास तृणासन, निदान भूमीवर इत्यादि बसावयास सांगावयाचासुद्धां आदर मिळाला नाहीं. तसेंच, अर्घ्य किंवा मधुर भाषण त्याला कांहीं प्राप्त झालें नाहीं. त्यावरून 'ऋषीनें आपली अवज्ञा केली' असें वाटून राजाला क्रोध आला. ॥ २८ ॥ सूत ह्मणालेः— ऋषीहो, त्या राजाला कधींही मत्सर किंवा

आहेत इन्द्रियें प्राण, मन व बुद्धि हीं ज्यानें असा) **उपारतं** (विराम पावलेल्या) **स्थानत्रयात्** (जाग्रत् स्वप्न व सुषुप्ति ह्या—तीन स्थानांहून) **परं प्राप्तं ब्रह्मभूतं अविक्रियं.** ॥ २६ ॥ **विप्रकीर्णजटाच्छन्नं** (पसरलेल्या जटांनीं आच्छादिलेल्या) **रौरवेण** (रुरु नामक—हरिणसंबंधी अशा) **अजिनेन** (कातड्यानें) **च [आच्छन्नं तं दृष्ट्वा], विशुष्यत्तालुः** (अगदीं सुकून जात आहे तालु ज्याची असा) **तथाभूतं [मुनिं] उदकं अयाचत.** ॥ २७॥ **अलब्धतृणभूम्यादिः** (न मिळालें आहे तृणासन, भूमि-भूमीवरील आसन—इत्यादि आदरसत्कार ज्याला असा) **असंप्राप्तार्घसूनृतः** (न प्राप्त झालें आहे अर्घ्य किंवा मधुर भाषण ज्याला असा) **आत्मानं अवज्ञातं** (अपमान केलेल्या) **इव मन्यमानः चुकोप ह.** ॥ २८ ॥ **हे ब्रह्मन्, क्षुत्तृड्भ्यां** (क्षुधा व तृषा यांनीं) **अर्दितात्मनः** (व्याकुल झालें आहे

विप्रकीर्णजटाच्छन्नं रौरवेणाजिनेन च ॥ विशुष्यत्तालुरुदकं तथाभूतमयाचत ॥ २७ ॥ अलब्धतृणभूम्यादिरसंप्राप्तार्घसूनृतः ॥
अवज्ञातमिवात्मानं मन्यमानश्चुकोप ह ॥ २८ ॥ अभूतपूर्वः सहसा क्षुत्तृड्भ्यामर्दितात्मनः ॥ ब्राह्मणं प्रत्यभूद्ब्रह्मन्मत्सरो मन्युरेव
च ॥ २९ ॥ स तु ब्रह्मऋषेरंसे गतासुमुरगं रुषा ॥ विनिर्गच्छन्धनुष्कोट्या निधाय पुरमागमत् ॥३०॥ एष किं निभृताशेषकरणो
मीलितेक्षणः ॥ मृषा समाधिराहोस्विदिति नु स्यात्क्षत्रबन्धुभिः ॥ ३१ ॥

मन ज्याचें अशाच्या) **अभूतपूर्वः** (पूर्वी कधीं न झालेला) **मत्सरः च मन्युः** (क्रोध) **एव सहसा ब्राह्मणं प्रत्यभूत्.** ॥ २९ ॥ **विनिर्गच्छन् सः तु रुषा** (क्रोधानें) **ब्रह्मऋषेः अंसे** (खांद्यावर) **गतासुं** (गतप्राण अशा-मेलेल्या) **उरगं** (सर्पाला) **धनुष्कोट्या** (धनुष्याच्या अग्रानें) **निधाय पुरं आगमत्.** ॥ ३० ॥ **[सर्पनिधाने राज्ञः अभिप्रायः—] एषः किं निभृताशेषकरणः** (आकलन केलीं आहेत सर्व इंद्रियें ज्यानें असा) **मीलितेक्षणः** (मिटले आहेत डोळे ज्यानें असा), **आहोस्वित् क्षत्रबन्धुभिः [आगतैः] किंनु स्यात्? [इति] मृषा** (खोटा) **समाधिः?** ॥३१ ॥

क्रोध नव्हताच; पण क्षुधेनें व तृषेनें तो अतिशय व्याकुळ झाला होता, ह्मणून एकाएकीं ब्राह्मणाविषयीं त्याच्या मनांत दोन्ही विकार उत्पन्न झाले. ॥ २९ ॥ व जातां जातां त्यानें एक सर्पाचें प्रेत धनुष्याच्या अग्रानें उचलून आणून रागानें त्या ब्रह्मऋषीच्या खांद्यावर टाकिलें व तो आपल्या नगरास निघून गेला. ॥ ३० ॥ - सर्प गळ्यांत घातला त्यावेळीं राजाचा अभिप्राय असा होता कीं, - ह्या ऋषीनें वास्तविकच आपलीं सर्व इंद्रियें विषयांपासून पराङ्मुख करून (आटोपून) घेऊन डोळे मिटले आहेत

[1] कृष्णसार ह्म० काळवीट त्याचें अजिन ह्म० कातडें; हरणाचें कातडें.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

(हा समाधि खरा आहे), किंवा ' येईनात क्षत्रियें (तुच्छपणा दर्शविण्याकरितां मुद्दाम लिंग फिरविलें आहे) ह्यांनीं काय करावयाचें आहे व त्यांच्या हातून होणार काय ? ' ह्मणून खोटा समाधि लाविला आहे. ॥ ३१ ॥ - मागें सांगितल्या अभिप्रायानें ऋषीच्या गळ्यांत सर्प घालून राजा निघून गेला. इकडे - त्या ऋषीचा शृंगीनामक मुलगा लहानच पण अतितेजस्वी होता. तो तेथेंच मुलांमध्यें खेळत होता. राजानें आपल्या बापाची आगळीक केली ही गोष्ट त्यानें ऐकिली मात्र. त्याबरोबर त्याच्या तोंडांतून पुढील उद्गार निघाले. :— ॥ ३२ ॥ " अहो, हे राजे ह्मणजे कावळ्यांसारखे व कुत्र्यांसारखे - फुकटचें यथेच्छ खाऊन - माजले आहेत ! देवडीवरच्या चाकरानें धन्याचा अपमान करणें केवढा

तस्य पुत्रः अतितेजस्वी बालकः अर्भकैः (मुलांबरोबर) **विहरन् राज्ञा तातं अघं** (आगळिकेला) **प्रापितं श्रुत्वा, तत्र इदं अब्रवीत्—** ॥ ३२ ॥ **' अहो बलिभुजां इव** (कावळ्यांच्या प्रमाणें), **शुनां इव** (कुत्र्यांप्रमाणें), **च पीव्नां** (पुष्ट अशा) **पालानां** (राजांचा–राजांनीं केलेला) **अधर्मः; यत् द्वारपानां दासानां स्वामिनि अघं** (अपमान). ॥ ३३ ॥ **ब्राह्मणैः क्षत्रबन्धुः**

तस्य पुत्रो ऽतितेजस्वी विहरन्बालको ऽर्भकैः ॥ राज्ञा ऽघं प्रापितं तातं श्रुत्वा तत्रेदमब्रवीत् ॥ ३२ ॥
अहो अधर्मः पालानां पीव्नां बलिभुजामिव ॥ स्वामिन्यघं यद्दासानां द्वारपानां शुनामिव ॥ ३३ ॥
ब्राह्मणैः क्षत्रबन्धुर्हि द्वारपालो निरूपितः ॥ स कथं तद्गृहे द्वास्थः सभाण्डं भोक्तुमर्हति ॥ ३४ ॥
कृष्णे गते भगवति शास्तर्युत्पथगामिनाम् ॥ तद्भिन्नसेतूनद्याहं शास्मि पश्यत मे बलम् ॥ ३५ ॥
इत्युक्त्वा रोषताम्राक्षो वयस्यानृषिबालकान् ॥ कौशिक्या ऽप उपस्पृश्य वाग्वज्रं विससर्ज ह ॥ ३६ ॥

द्वारपालः निरूपितः; द्वास्थः (दारावर असणारा) **सः तद्गृहे सभाण्डं** (भाड्यासहित अशा— आधारा सहित अशा) **भोक्तुं कथं अर्हति ?** ॥ ३४ ॥ **उत्पथगामिनां शास्तरि भगवति कृष्णे गते [सति] अद्य अहं तद्भिन्नसेतून्** (त्या मर्यादा उल्लंघन करणाऱ्यांस) **शास्मि. मे बलं पश्यत.'** ॥ ३५ ॥ **रोषताम्राक्षः** (क्रोधानें डोळे लाल झाले आहेत ज्याचे असा) **[सः] वयस्यान्**

हा अधर्म !! ॥ ३३ ॥ क्षत्रियाला ब्राह्मणांनीं द्वारपालासारखा रक्षणांकरितां केवढा अधिकार देऊन ठेविला आहे. त्यानें द्वारपालासारखें रहावें; तें सोडून घरांतील आधारालासुद्धां तो खायला पाहणार हें काय ? ॥ ३४ ॥ श्रीकृष्णपरमात्मा धर्ममर्यादेचें उल्लंघन करणाऱ्यांचें शासन करीत असे; तो गेला तेव्हां - आतां शासन करण्यास कोणी राहिलें नाहीं. - पण आज मी त्या मर्यादा उल्लंघन करणाऱ्यांस शिक्षा करितों. माझा पराक्रम पहा. " ॥ ३५ ॥ असें तो आपल्या स्नेहांना बोलला. त्याचे स्नेही ह्मणजे त्या आश्रमांतले ऋषींचे बालक. त्याचे डोळे क्रोधानें लाल झाले होते. नंतर त्यानें कौशिकी नदीच्या पाण्यानें आचमन करून पुढें सांगितल्याप्रमाणें वाणीरूपी वज्र सोडिलें (शाप दिला):— ॥ ३६ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

" अशी ज्यानें आपली मर्यादा सोडिली, व माझ्या बापाचा छळ केला, त्या कुलांगाराला आजपासून सातव्या दिवशीं माझ्या प्रेरणेवरून तक्षक दंश करील. " ॥ ३७ ॥ नंतर तो मुलगा नदीवरून परत आश्रमांत आला; व पाहतो तों पित्याच्या गळ्यांत सर्पाचें शव आहेच. तें पाहिल्याबरोबर त्याला फार दुःख झालें व तो मोठा दीर्घ गळा (स्वर) काढून रडूं लागला. ॥ ३८ ॥ (सूत ह्मणतात :— ऋषीहो,) मुलाचें रडणें अंगिरा ऋषीनें ऐकिलें व हळूहळू डोळे उघडून पाहिलें तों त्यांना स्वतांच्या खांद्यावर एक सर्पाचें प्रेत दिसलें; तें पाहिल्याबरोबर त्यांनीं टाकून दिलें व मुलाला विचारिलें कीं, " बाळा कां रडतोस ? तुझी कोणीं खोडी केली ? " असा प्रश्न विचारिला असतां, पुत्रानें झालेली

(मिळांस) **ऋषिबालकान् इति उक्त्वा कौशिक्यापः** (कौशिकी नदीच्या उदकाचें) **उपस्पृश्य** (आचमन करून) **वाग्वज्रं विससर्ज ह. — ॥ ३६ ॥ 'इति लंघितमर्यादं कुलांगारं** (आपल्या--कुलाला अग्नि लावणाऱ्या) **ततद्रुहं** (ताताचा-बापाचा छळ करणाऱ्या) **मे चोदितः** (प्रेरणा केलेला) **तक्षकः सप्तमे अहनि दक्ष्यंति** (दंश करील). ' ॥ ३७ ॥ **बालः ततः आश्रमं अभ्येत्य पितरं गलेसर्पकलेवरं वीक्ष्य दुःखार्तः मुक्तकण्ठः** (दीर्घ गळा-स्वर-काढणारा) **[सन्] रुरोद. ॥ ३८ ॥ ब्रह्मन्, सः आंगिरसः सुतविलापनं श्रुत्वा शनकैः** (हळू हळू)

इति लंघितमर्यादं तक्षकः सप्तमे ऽहनि ॥ दंक्ष्यति स्म कुलाङ्गारं चोदितो मे ततद्रुहम् ॥३७॥ ततो ऽभ्येत्याश्रमं बालो गलेसर्पकलेवरम् ॥ पितरं वीक्ष्य दुःखार्तो मुक्तकण्ठो रुरोद ह ॥ ३८ ॥ स वा आङ्गिरसो ब्रह्मन् श्रुत्वा सुतविलापनम् ॥ उन्मील्य शनकैर्नेत्रे दृष्ट्वा स्वांसे मृतोरगम् ॥ ३९ ॥ विसृज्य पुत्रं पप्रच्छ वत्स कस्माद्धि रोदिषि ॥ केन वा ते प्रतिकृतमित्युक्तः स न्यवेदयत् ॥ ४० ॥ निशम्य शप्तमतदर्हं नरेन्द्रं स ब्राह्मणो नात्मजमभ्यनन्दत् ॥ अहो बतांहो महदज्ञ ते कृतमल्पीयसि द्रोह उरुर्दमो धृतः ॥ ४१ ॥ न वै नृभिर्नरदेवं पराख्यं सम्मातुमर्हस्यविपक्वबुद्धे ॥ यत्तेजसा दुर्विषहेण गुप्ता विन्दन्ति भद्राण्यकुतोभयाः प्रजाः ॥ ४२ ॥

नेत्रे उन्मील्य (उघडून) **स्वांसे मृतोरगं दृष्ट्वा, विसृज्य** (टाकून), **पुत्रं पप्रच्छ—'वत्स कस्मात् रोदिषि ? केन वा ते प्रतिकृतं ? 'इत्युक्तः सः न्यवेदयत्** (सांगता झाला). ॥३९॥४०॥ **सः ब्राह्मणः अतदर्हं** (त्याला--शाप देण्याला--अयोग्य अशा) **नरेन्द्रं शप्तं निशम्य, आत्मजं** (पुत्राला) **न अभ्यनन्दत्—'अहो बत अज्ञ, ते महत् अंहः** (वाईट आचरण) **कृतं, अल्पीयसि द्रोहे** (अपराधाबद्दल) **उरुः** (मोठा) **दमः** (दंड) **धृतः** (योजिलेला)! ॥ ४१ ॥ **हे अविपक्वबुद्धे, पराख्यं** (मोठी योग्यता ज्याची अशा) **नरदेवं** (राजाला) **नृभिः संमातुं**

हकीकत त्यांला सांगितली. ॥ ३९ ॥ ४० ॥ आपल्या मुलानें राजाला शाप दिला ही गोष्ट ऋषीनें ऐकिली; - पण त्याबद्दल त्याला कांहीं बरें वाटलें नाहीं; - कारण, तो राजा शाप देण्यास योग्य नव्हता. त्यानें मुलालाही त्या कृत्याबद्दल 'बरें' ह्मटलें नाहीं इतकेंच नव्हे तर उलट तो त्याला रागें भरून ह्मणाला:—"तूं अगदीं मूर्ख आहेस; यःकश्चित् अपराधाकरितां अतिशय दंड केलास, हें तुझ्या हातून मोठें वाईट आचरण घडलें. ॥४१॥ मुला, तुझी बुद्धि अद्यापि पूर्ण दशेस आली नाहीं. राजांची योग्यता फार मोठी आहे. त्यांची तुलना

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तूं इतर मनुष्यांबरोबर करूं नकोस. त्यांचें तेज फार दुर्धर असतें व त्या तेजाच्या योगानें ते लोकांचें रक्षण करितात. ह्मणूनच सर्व प्रजा निर्भय व सुखरूप राहतात. ॥ ४२ ॥ मुला, राजा ह्मणजे साक्षात् चक्रपाणि विष्णुच होय. तो जर पृथ्वीवर नसेल तर ह्या लोकांत जिकडे तिकडे पुंडाई माजेल; - व धनगर जाग्यावर नसला ह्मणजे - शेळ्यांच्या कळपाचा नाश होण्यास जसा उशीर लागत नाहीं, तसें ह्या लोकांचा रक्षणकर्ता नाहींसा झाला असतां, ह्यांचा एका क्षणांत नाश होईल. ॥ ४३ ॥ एखाद्या द्रव्याच्या धन्याचा नाश झाला ह्मणजे लोक त्याचें द्रव्य व मालमत्ता लुबाडून नेतात, आणि अर्थातच तो अधर्म घडतो; त्यामध्यें आपला वस्तुतः कांहीं संबंध नसतांना तसलें पाप आपणांला लागेल.

(तुलना करण्यास) **न अर्हसि; दुर्विषहेण** (दुर्धर अशा) **यत्तेजसा गुप्ताः** (रक्षिलेल्या) **अकुतोभयाः प्रजाः भद्राणि विंदंति. ॥ ४२ ॥ हे अङ्ग, नरदेवनाम्नि** (राजा हें नांव ज्याचें असा) **रथाङ्गपाणौ अलक्ष्यमाणे [सति]** (चक्रपाणि विष्णु अदृश्य झाला असतां), **तदा अयं चोरप्रचुरः** (चोर पुष्कळ आहेत ज्यांत असा) **अरक्ष्यमाणः लोकः अविवरूथवत्** (मेंढ्याच्या कळपाप्रमाणें) **क्षणात् विनंक्ष्यति. ॥ ४३ ॥ नष्टनाथस्य** (नष्ट झाला आहे धनी ज्याचा अशा) **वसोः** (द्रव्याचा) **विलुम्पकात्** (अपहार करणाऱ्यापासून) **यत् अनन्वयं** (संबंध नसलेलें) **पापं, तत् अद्य नः**

अलक्ष्यमाणे नरदेवनाम्नि रथाङ्गपाणावयमङ्ग लोकः ॥ तदा हि चोरप्रचुरो विनंक्ष्यत्यरक्ष्यमाणो ऽविवरूथवत्क्षणात् ॥ ४३ ॥
तदद्य नः पापमुपैत्यनन्वयं यन्नष्टनाथस्य वसोर्विलुम्पकात् ॥ परस्परं घ्नन्ति शपन्ति वृञ्जते पशून् स्त्रियो ऽर्थान्पुरुदस्यवो
जनाः ॥ ४४ ॥ तदार्यधर्मश्च विलीयते नृणां वर्णाश्रमाचारयुतस्त्रयीमयः ॥ ततो ऽर्थकामाभिनिवेशितात्मनां शुनां कपीना-
मिव वर्णसङ्करः ॥ ४५ ॥ धर्मपालो नरपतिः स तु सम्राड् बृहच्छ्रवाः ॥ साक्षान्महाभागवतो राजर्षिर्हयमेधयाट् ॥
क्षुत्तृट्श्रमयुतो दीनो नैवास्मच्छापमर्हति ॥ ४६ ॥

उपैति. पुरुदस्यवः (पुष्कळ चोर ज्यांत असे) **ऊचुः परस्परं शपन्ति, घ्नन्ति, पशून्, स्त्रियः, अर्थान् वृञ्जते** (अपहार करितात). ॥ ४४ ॥ **तदा वर्णाश्रमाचारयुतः त्रयीमयः** (वेदोक्त) **आर्यधर्मः विलीयते** (नाहींसा होतो); **ततः अर्थकामाभिनिवेशितात्मनां** (द्रव्य आणि भोग संपादण्यांत गढून गेलें आहे मन ज्यांचें अशा) **नृणां शुनां कपीनामिव वर्णसंकरः [भवति].** ॥ ४५॥ **धर्मपालः** (धर्माचें पालन करणारा) **नरपतिः सः तु सम्राट् बृहच्छ्रवाः साक्षात् महाभागवतः राजर्षिः हयमेधयाट्** (अश्वमेध यज्ञ केला आहे ज्यानें असा) **क्षुत्तृट्श्रमयुतः दीनः** लोकांमध्यें चोराई माजली ह्मणजे ते एकमेकांला शिव्या देतात, खून करतात, दुसऱ्याच्या बायका, द्रव्य, हरण करितात व असलें हें पाप आतां आपल्याला लागणार! ॥ ४४ ॥ राजा नाहींसा झाला ह्मणजे वर्ण, आश्रम आणि आचार ह्यांनीं युक्त हा वेदोक्त आर्यधर्म नाहींसा होईल. आचार नाहींसे झाले कीं, ह्या लोकांचीं अंतःकरणें अर्थ (द्रव्यार्जन) आणि काम इत्यादि गोष्टींमध्यें गढून जावयाचींच; मग माकडांकुत्र्यांप्रमाणें त्यांच्यांत वर्णसंकर (मिसळ) होऊं लागेल. ॥ ४५ ॥ त्यांतून तो राजा धर्मानें पालन करणारा सार्वभौम आहे; ह्याची कीर्ति फार मोठी आहे; तो महाभगवद्भक्त आहे, राजर्षि आहे; त्यानें अश्वमेध यज्ञ केला आहे, - आतां ह्या ठिकाणीं त्याच्याकडून अपराध घडला, पण

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तसें घडावयास निराळें कारण झालें, - तो क्षुधा, तृषा आणि श्रम ह्यांनीं व्याकुळ असल्यामुळें दीन झाला होता. ह्मणून त्याला शाप देणें आपल्याला योग्य नाहीं. ॥ ४६ ॥ भगवान् सर्वांतर्यामी असल्यामुळें - त्याला सर्व समजत आहेच तेव्हां - ह्या अल्पबुद्धि मुलानें आपल्या (ईश्वराच्या) निरपराधी भक्तांचा छळ केला ह्या पापाची त्यानें क्षमा करावी. ॥ ४७ ॥ त्या ईश्वराच्या भक्तांचा कोणी तिरस्कार केला, त्यांना फसवलें, शाप दिला, निंदा केली, किंवा कोणी मारलें तरी, आंगांत त्याचा निग्रह करण्याचें सामर्थ्य असूनही ते प्रतिकार करीत नाहींत. " ॥ ४८ ॥ तो अंगिरा ऋषि महाश्रेष्ठ होता. परीक्षित् राजानें त्याचा स्वतांचा अपराध केला असतांही त्यानें तिकडे लक्ष्य दिलें नाहीं

अस्मच्छापं नैव अर्हति. ॥ ४६ ॥ सर्वात्मा भगवान् अपक्वबुद्धिना बालेन अपापेषु (निरपराधी अशा) स्वभृत्येषु कृतं तत् पापं क्षन्तुं अर्हति. ॥ ४७ ॥ तिरस्कृताः विप्रलब्धाः (फसविलेले) शप्ताः क्षिप्ताः (निंदिलेले) वा हताः अपि तद्भक्ताः प्रभवः अपि (समर्थ असणारेही) अस्य तत् न प्रतिकुर्वन्ति (प्रतिकार करीत नाहींत). ' ॥ ४८ ॥ सः महामुनिः पुत्रकृता अघेन इति अनुतप्तः (खेद पावलेला) स्वयं राज्ञा विप्रकृतः अपि तत् अघं नैव आचिन्तयत्. ॥ ४९ ॥ प्रायशः लोके साधवः द्वन्द्वेषु (सुखदुःखादिकांचे ठिकाणीं) परैः योजिताः [अपि]

अपापेषु स्वभृत्येषु बालेनापक्वबुद्धिना ॥ पापं कृतं तद्भगवान्सर्वात्मा क्षन्तुमर्हति ॥ ४७ ॥ तिरस्कृता विप्रलब्धाः शप्ताः क्षिप्ता हता ऽपि वा ॥ नास्य तत्प्रतिकुर्वन्ति तद्भक्ताः प्रभवो ऽपि हि ॥ ४८ ॥ इति पुत्रकृता ऽघेन सो ऽनुतप्तो महामुनिः ॥ स्वयं विप्रकृतो राज्ञा नैवाघं तदचिन्तयत् ॥ ४९ ॥ प्रायशः साधवो लोके परैर्द्वन्द्वेषु योजिताः ॥ न व्यथन्ति न हृष्यन्ति यत आत्मा ऽगुणाश्रयः ॥ ५० ॥ इ०भा०म०प्र०विप्रशापोपलम्भनं नामाष्टादशो ऽध्यायः ॥ १८ ॥ सूत उवाच । महीपतिस्त्वथ तत्कर्म गर्ह्यं विचिन्तयन्नात्मकृतं सुदुर्मनाः ॥ अहो मया नीचमनार्यवत्कृतं निरागसि ब्रह्मणि गूढतेजसि ॥ १ ॥

न व्यथन्ति (शोक करीत नाहींत), न हृष्यन्ति; यतः आत्मा अगुणाश्रयः [अस्ति]. ॥५०॥ ॥ इति श्रीमद्भागवतान्वये प्रथमस्कन्धे अष्टादशो ऽध्यायः ॥ १८ ॥
सूतः उवाच— अथ महीपतिः तु आत्मकृतं तत् गर्ह्यं कर्म विचिन्तयन् 'अहो मया अनार्यवत् (नीचाप्रमाणें) निरागसि (निरपराधी अशा) गूढतेजसि ब्रह्मणि नीचं कृतं' [इति]

व मुलानें केलेल्या अपराधाबद्दल मात्र त्याला खेद झाला. ॥ ४९ ॥ बहुधा लोकांमध्यें जे जे साधु आहेत त्यांच्यावर कोणी सुखाचा अथवा दुःखाचा, जयाचा अथवा अपजयाचा, कसला जरी प्रसंग आणिला तरी त्यापासून त्यांना (साधूंना) हर्ष अथवा शोक कांहींच उत्पन्न होत नाहीं : कारण, ते पूर्णपणें ओळखून असतात कीं, आत्म्यावर कोणच्याच प्रकारें सुखदुःखादि गुण नाहींत. ॥ ५० ॥ इति अष्टादशो ऽध्यायः ॥ १८ ॥ सूत ह्मणतातः— परीक्षित् राजानें तें (ऋषीच्या गळ्यांत सर्प घालणें) कर्म केलें खरें,

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

- पण, वाईट कर्म केल्यावर व करतांनाही करणाराच्या मनाला खात असतें, रागाच्या आवेशांत मनुष्य एखादें वाईट कृत्य करितो, पण तो आवेश थंड झाल्यावर मग सदसद्विचारशक्ति जागृत होऊन कृतकर्माबद्दल त्याला पश्चात्ताप होऊं लागतो : त्याप्रमाणें - आपण केलेल्या निंद्य कर्माबद्दल आपल्याशींच विचार करीत असतां राजाला फार वाईट वाटलें (आपल्याला ब्राह्मणानें शाप दिला असें त्याला कळलें नव्हतें); - आणि तो आपल्याशींच ह्मणूं लागला : 'मी क्षुद्र मनुष्याप्रमाणें निरपराधी ब्राह्मणाजवळ नीच कृत्य आचरण केलें ! ब्राह्मणाचें तेज गूढ असतें,- ह्या गोष्टीचें मला भान राहिलें नाहीं. - ॥१॥ ब्राह्मणाची हेलना ह्मणजे ईश्वराचीच अवज्ञा होय. ती माझ्याकडून घडल्यामुळें, लवकरच माझ्यावर दुर्धर प्रसंग येऊन गुदरणार, यांत संशय नाहीं. पण तो प्रसंग प्रत्यक्ष माझ्यावरच यावा - अशींच माझी इच्छा आहे. - कारण, त्यामुळें मला पापाबद्दल प्रायश्चित्त

सुदुर्मनाः [जातः]. ॥ १ ॥ ध्रुवं ततः कृतदेवहेलनात् (ईश्वराच्या केलेल्या हेलनेमुळें) मे नातिदीर्घात् दुरत्ययं (दुर्घट) व्यसनं (संकट) [स्यात्]; यथा पुनः एवं न कुर्यां, [तथा] अद्धा (साक्षात्) मे अघनिष्कृताय (पापाच्या प्रायश्चित्ताकरितां) तत् कामं (पूर्णपणें) अस्तु. ॥ २ ॥ प्रकोपितब्रह्मकुलानलः (अतिशय क्रुद्ध झालेलें ब्राह्मणाचें कुल हाच कोणी अग्नि)

ध्रुवं ततो मे कृतदेवहेलनाद्दुरत्ययं व्यसनं नातिदीर्घात् ॥ तदस्तु कामं त्वघनिष्कृताय मे यथा न कुर्यां पुनरेवमद्धा ॥ २ ॥ अद्यैव राज्यं बलमृद्धकोशं प्रकोपितब्रह्मकुलानलो मे ॥ दहत्वभद्रस्य पुनर्न मेऽभूत्पापीयसी धीर्द्विजदेवगोभ्यः ॥ ३ ॥ स चिन्तयन्नित्थमथाशृणोद्यथा मुनेः सुतोक्तो निर्ऋतिस्तक्षकाख्यः ॥ स साधु मेने नचिरेण तक्षकानलं प्रसक्तस्य विरक्तिकारणम् ॥ ४ ॥

अद्यैव मे राज्यं बलं (सैन्याला) ऋद्धकोशं (पूर्ण भरलेल्या खजिन्याला) दहतु; अभद्रस्य मे पुनः द्विजदेवगोभ्यः पापीयसी धीः न अभूत् (न होईल). ॥ ३ ॥ अथ इत्थं चिन्तयन् सः, यथा मुनेः सुतोक्तः तक्षकाख्यः [सप्तमे अहनि] निर्ऋतिः (मृत्यु), [तथा शमीकशिष्यात्] अशृणोत्, सः प्रसक्तस्य विरक्तिकारणं नचिरेण तक्षकानलं साधु मेने. ॥४॥

घडेल - व पुन्हां मी असें कधींही करणार नाहीं, अशी शिक्षा मिळेल. ॥ २ ॥ हें ब्राह्मणाचें कुल अतिशय क्रुद्ध झालें आहे. आतां त्या क्रोधाग्नीनें माझें राज्य, सैन्य व द्रव्यानें भरलेलें भांडार, हें सर्व आजच दग्ध करून टाकावें (माझ्यापासून नाहींसें करावें), ह्मणजे पुन्हां ब्राह्मण, देव व गाई ह्यांच्याबद्दल माझ्या--अधमाच्या--अंतःकरणांत वाईट (त्यांना अपकार करण्याची किंवा त्रास देण्याची) बुद्धि कधींही उत्पन्न होणार नाहीं. ' ॥ ३ ॥ राजाच्या मनांत मागें सांगितल्याप्रमाणें विचार चालले असतां, शमीक ऋषीचा एक शिष्य येऊन त्यानें राजास सांगितलें कीं, ' आजपासून सातवे दिवशीं तक्षकापासून आपल्यास मृत्यु येईल, असा ऋषीच्या (शमीकाच्या) पुत्रानें

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आपणांस शाप दिला आहे.' ही गोष्ट राजानें ऐकिली, - पण त्याबरोबर त्याला वाईट असें मुळींच वाटलें नाहीं. उलट - तो असें मानूं लागला कीं, आपल्यावर लवकरच तक्षक-रूपीं अग्नि येणार; बरें झालें; मी ह्या संसारांत अगदीं गुंग झालों आहें; आतां ह्या कारणानें तरी वैराग्य उत्पन्न होईल. ॥ ४ ॥ - पुढें त्यानें स्वर्गादि परलोकाची प्राप्ति करून घ्यावयाचा उद्योग करावा, पण तसें कांहीं केलें नाहीं; कारण, त्यानें राज्योपभोग सर्व अनुभविले होतेच; व त्याचें मन सर्व प्रकारें तृप्त झालें होतें; कोणत्याही प्रकारचे भोग भोगण्याबद्दल त्याची इच्छा राहिली नव्हती; - हा लोक आणि परलोक दोन्ही त्याज्य (अभिलाष करण्यास अयोग्य) आहेत असा विचार त्याच्या मनांत पूर्वीच दृढ झाला होता; तेव्हां, आतां श्रीकृष्णचरणाची सेवा करणें हेंच काय तें मुख्य कर्तव्य, अशा दृढ निश्चयानें तो राजा देवनदीच्या (गंगेच्या) तीरीं प्रायो-

अथो पुरस्तात् हेयतया (टाकण्यास योग्य अशा भावानें) **विमर्शितौ** (मानलेले) **इमं अमुं च लोकं विहाय कृष्णांघ्रिसेवां अधि** (अधिक) **मन्यमानः अमर्त्यनद्यां** (देवनदीवर—गंगेवर) **प्रायं** (अनशनाला—उपोषणाला) **उपाविशत्** . ॥ ५ ॥ **या वै लसच्छ्रीतुलसीविमिश्रकृष्णांघ्रिरेण्वभ्यधिकाम्बुनेत्री** (उत्तम शोभणाऱ्या तुलसीनें मिश्रित अशा कृष्णाच्या चरणरेणूंनीं सर्वोत्कृष्ट अशा उदकाला वाहणारी) **उभयत्र** (आंतून व बाहेरून) **सेशान्** (लोकपालांसह अशा) **लोकान् पुनाति, मरिष्यमाणः** (मरणोन्मुख असा) **कः तां न सेवेत?** ॥ ६ ॥ **सः पांडवेयः विष्णुपद्यां**

अथो विहायेममुं च लोकं विमर्शितौ हेयतया पुरस्तात् ॥ कृष्णांघ्रिसेवामधिमन्यमान उपाविशत्प्रायममर्त्यनद्याम् ॥ ५ ॥
या वै लसच्छ्रीतुलसीविमिश्रकृष्णांघ्रिरेण्वभ्यधिकाम्बुनेत्री ॥ पुनाति लोकानुभयत्र सेशान् कस्तां न सेवेत मरिष्यमाणः ॥ ६ ॥
इति व्यवच्छिद्य स पाण्डवेयः प्रायोपवेशं प्रति विष्णुपद्याम् ॥ दध्यौ मुकुन्दांघ्रिमनन्यभावो मुनिव्रतो मुक्तसमस्तसङ्गः ॥ ७ ॥

(गंगेवर—गंगेच्या तीरीं) **इति प्रायोपवेशं प्रति व्यवच्छिद्य** (निश्चय करून) **मुक्तसमस्तसंगः मुनिव्रतः** (मुनींसारिखें व्रत धारण करणारा—शांत झालेला) **अनन्यभावः [सन्] मुकुन्दांघ्रिं दध्यौ** (ध्यान करिता झाला). ॥ ७ ॥

पवेश करून बसला. ॥ ५ ॥ - त्या गंगेचें माहात्म्य काय सांगावें! - तिच्या उदकांत श्रीकृष्णाची पायधूळ व सुंदर तुलशीचीं पानें पडल्यामुळें तें उदक सर्वांपेक्षां अत्युत्कृष्ट झालें आहे. अशा उदकाच्या प्रवाहरूपानें तिन्ही लोकांमध्यें फिरून ती नदी लोकपालांसह सर्व लोकांस आंतून बाहेरून शुद्ध करिते. त्या गंगेची कोणता मुमूर्षु (मरणोन्मुख) पुरुष सेवा करणार नाहीं बरें? ॥ ६ ॥ तो पांडववंशज परीक्षित् राजा गंगेच्या तीरीं असा प्रायोपवेशाचा संकल्प करून बसला, व सर्वसंगपरित्याग करून, मुनींसारखें व्रत धारण करून (शांत होऊन) अनन्यभावानें (श्रीकृष्णाशिवाय मला दुसरा कोणाचाही आश्रय नाहीं अशा बुद्धीनें) श्रीकृष्णचरणाचें ध्यान करीत राहिला. ॥ ७ ॥

१ मागें अध्याय तिसरा, श्लोक बेचाळीस, टीप पहा.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

त्या ठिकाणीं महाप्रभावशाली मुनि आपल्या शिष्यांसह आले. मुनि हे त्रिभुवनास पवित्र करण्यास समर्थ आहेत; ते तीर्थास येतात ते स्वतां पवित्र होण्याकरितां नव्हे; तर ह्या मिषानें ते बहुधा त्या तीर्थांसच पवित्र करितात. ॥ ८ ॥ अत्रि, वसिष्ठ, च्यवन, शरद्वान् अरिष्टनेमि, भृगु, अंगिरा, पराशर, विश्वामित्र, परशुराम, उतथ्य, इंद्रप्रमद, इध्मवाह ॥ मेधातिथि, देवल, आर्ष्टिषेण भारद्वाज गौतम, पिप्पलाद, मैत्रेय, और्व, कवष, अगस्त्य, व्यास, भगवान् नारद, ॥ इतरही सोठमोठे देवर्षि, ब्रह्मर्षि, राजर्षि अरुणादिक ऋषि,

तत्र भुवनं पुनानाः (पवित्र करणारे) महानुभावाः (महाप्रभावशाली) सशिष्याः मुनयः उपजग्मुः, हि सन्तः प्रायेण तीर्थाभिगमापदेशैः (तीर्थास जाण्याच्या निमित्तांनीं) स्वयं तीर्थानि पुनंति. ॥ ८ ॥ अत्रिः, वसिष्ठः, च्यवनः, शरद्वान्, अरिष्टनेमिः, भृगुः, अंगिराः, पराशरः, गाधिसुतः (विश्वामित्र), रामः (परशुराम), उतथ्यः, इंद्रप्रमदेध्मवाहौ, मेधातिथिः, देवलः, आर्ष्टिषेणः, भारद्वाजः, गौतमः, पिप्पलादः, मैत्रेयः, और्वः, कवषः, कुम्भयोनिः (अगस्त्य), द्वैपायनः (व्यास), भगवान् नारदः, अन्ये च

तत्रोपजग्मुर्भुवनं पुनाना महानुभावो मुनयः सशिष्याः ॥ प्रायेण तीर्थाभिगमापदेशैः स्वयं हि तीर्थानि पुनन्ति सन्तः ॥ ८ ॥ अत्रिर्वसिष्ठश्च्यवनः शरद्वानरिष्टनेमिर्भृगुरंगिराश्च ॥ पराशरो गाधिसुतो ऽथ राम उतथ्य इन्द्रप्रमदेध्मवाहौ ॥ ९ ॥ मेधातिथिर्देवल आर्ष्टिषेणो भारद्वाजो गौतमः पिप्पलादः ॥ मैत्रेय और्वः कवषः कुम्भयोनिर्द्वैपायनो भगवान्नारदश्च ॥ १० ॥ अन्ये च देवर्षिब्रह्मर्षिवर्या राजर्षिवर्या अरुणादयश्च ॥ नानार्षेयप्रवरान्समेतानभ्यर्च्य राजा शिरसा ववन्दे ॥ ११ ॥ सुखोपविष्टेष्वथ तेषु भूयः कृतप्रणामः स्वचिकीर्षितं यत् ॥ विज्ञापयामास विविक्तचेता उपस्थितो ऽग्रे ऽभिगृहीतपाणिः ॥ १२ ॥

देवर्षिब्रह्मर्षिवर्याः, राजर्षिवर्याः, च अरुणादयः, उपजग्मुः, राजा, समेतान् नानार्षेयप्रवरान् (इतर ऋषिवंशांतील श्रेष्ठ अशा —ऋषींस) अभ्यर्च्य शिरसा ववंदे. ॥ ९ ॥ १० ॥ ११ ॥ अथ तेषु सुखोपविष्टेषु (ते स्वस्थ बसले असतां) भूयः कृतप्रणामः विविक्तचेताः (शुद्ध आहे अंतःकरण ज्याचें असा) अग्रे (पुढें) उपस्थितः अभिगृहीतपाणिः (जोडले आहेत हात ज्यानें असा)

तसे इतरही ऋषिवंशांतील मुख्यमुख्य पुरुष तेथें आले. ते एकत्र जमले असतां, राजानें त्यांचो पूजा केली व त्यांना शिरसाष्टांग नमस्कार केला. ॥ ९ ॥ १० ॥ ११ ॥ कांहीं वेळानें ते ऋषि स्वस्थ बसले असतां; राजानें, - कांहीं प्रार्थना करण्याकरितां, - त्यांना पुन्हां नमस्कार केला; त्याचें अंतःकरण कडकडीत वैराग्यामुळें अगदीं शुद्ध झालेलें होतें.

१ पुष्कळ पापी लोकांस शुद्ध करून करून तीर्थे स्वतां दोषी होतात; सत्पुरुष तीर्थावर गेले ह्मणजे ते आपल्या समागमानें त्या दोषी तीर्थास पवित्र करितात; सत्पुरुषांना शुद्ध करणारा व लोकांस शुद्ध करण्याची योग्यता त्यांना देणारा परमेश्वर त्यांच्या हृदयांत नेहमीं जागरूक असतो.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तो त्यांच्यापुढें उभा राहिला व हात जोडून, स्वतांच्या मनांत जी गोष्ट करावयाची होती तीबद्दल, विज्ञापना करूं लागला :– ॥ १२ ॥ राजा ह्मणाला :– " अहो! आमच्यासारख्या नीच कर्म करणाऱ्या राजांचें कुल ब्राह्मणांचें पायधुण्याचें पाणी टाकण्याच्या जाग्याच्यादेखील पलिकडे टाकिलेलें आहे (आमच्यासारख्या नीचांना ब्राह्मणांच्या पायधुळीशीं उभें राहण्याचीदेखील योग्यता नाहीं); असें असूनहो, ऋषिहो! आपल्यासारख्या थोर पुरुषांनीं आमच्यावर अनुग्रह केला (आह्मांला दर्शन दिलें) व अशा अनुग्रहाला आमचें वर्तन पात्र झालें ह्यामुळें आह्मी स्वतांला सर्व राजांमध्यें अतिशय धन्य लेखितों. ॥ १३ ॥ मी ब्राह्मणाची हेलना करणारा व नेहमीं संसारांत गढून गेलेला

[सन्] यत् स्वचिकीर्षितं (आपल्या मनांतील कर्त्तव्य) [तत्] विज्ञापयामास (विज्ञापना करिता झाला). –॥ १२ ॥ राजा उवाच— ' अहो, महत्तमानुग्रहणीयशीलाः (थोर पुरुषांनीं अनुग्रह करण्यास योग्य आहे वर्त्तन ज्यांचे असे) वयं नृपाणां धन्यतमाः ! गर्ह्यकर्म (निंद्य आहे कर्म ज्याचें असें) राज्ञां कुलं ब्राह्मणपादशौचात् (ब्राह्मणांच्या पाय धुण्याहून–पाय धुण्याचें पाणी टाक-

राजोवाच । अहो वयं धन्यतमा नृपाणां महत्तमानुग्रहणीयशीलाः ॥ राज्ञां कुलं ब्राह्मणपादशौचा-
दूराद्विसृष्टं बत गर्ह्यकर्म ॥ १३ ॥ तस्यैव मे ऽघस्य परावरेशो व्यासक्तचित्तस्य गृहेष्वभीक्ष्णम् ॥
निर्वेदमूलो द्विजशापरूपो यत्र प्रसक्तो भयमाशु धत्ते ॥ १४ ॥ तं मोपयातं प्रतियन्तु विप्रा गङ्गा
च देवी धृतचित्तमीशे ॥ द्विजोपसृष्टः कुहकस्तक्षको वा दशत्वलं गायत विष्णुगाथाः ॥ १५ ॥

ण्याच्या जागेहून) दूरात् विसृष्टं बत ! ॥१३॥निर्वेदमूलः (वैराग्य आहे प्राप्तीला साधन ज्यांत असा) द्विजशापरूपः परावरेशः (स्थावरजंगमांचा नियामक) अभीक्ष्णं(वारंवार) गृहेषु व्यासक्तचित्तस्य तस्यैव अघस्य (पापी अशा) मे [बभूव], यत्र [सति] प्रसक्तः आशु भयं धत्ते. ॥ १४ ॥ विप्राः, गंगा देवी च ईशे धृतचित्तं तं मा उपयातं (शरणांगतास) प्रतियन्तु (समजोत);

प्रसिद्ध पापी आहें! मला ब्राह्मणांचा शाप झाला, पण मला वाटतें, हा शाप नव्हे, तर प्रत्यक्ष स्थावरजंगमांचा नियामक परमेश्वरच मला भेटला. कारण, त्या शापामुळें मला परमेश्वराच्या प्राप्तीला मुख्य साधन जें वैराग्य, तें तत्काळ उत्पन्न होत आहे; व संसारांत राहण्याचें फार भय वाटत आहे. ॥ १४ ॥ मी आपलें अंतःकरण ईश्वराच्या ठिकाणीं लाविलें आहे. ह्या सर्व ब्राह्मणांना व गंगादेवीला - उभयतांनाही विदित असावें कीं, - ' मी त्यांना शरण आलों आहे. ' आपण सर्वांनीं देवाच्या कथांचें गायन करावें. आतां ब्राह्मणानें दिलेल्या शापानें माझा नाश होवो किंवा तक्षक कोणत्याही वेषानें येऊन मला दंश करो. त्यानें दंश न करावा, ह्याबद्दल मी कोणताही उपाय करणार नाहीं.॥ १५॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

पुन्हां ज्या ज्या जन्मास मी जाईन, तेथें त्या अनंत परमेश्वराच्या ठिकाणीं माझी प्रीति जडावी, त्या भगवंताच्या आश्रितांशीं माझा निरंतर समागम घडावा, महतांशीं मैत्री जडावी व ब्राह्मणांस निरंतर नमन घडावें.'' ॥ १६ ॥ त्या गंभीर परीक्षित् राजानें आपल्या पुत्रावर (जनमेजयावर) राज्यकारभार सोंपविला; व मागें सांगितल्याप्रमाणें निश्चय करून, समुद्राच्या पत्नीच्या (गंगेच्या) दक्षिण तीरावर, पूर्वाग्र (ज्यांचीं टोंकें पूर्वेस आहेत असे) दर्भ पसरून आणि स्वतांचें मुख उत्तरेकडे करून तो त्या दर्भासनावर बसला. ॥ १७ ॥ राजा परीक्षित् सर्व राजांमध्यें श्रेष्ठ (सार्वभौम) होता. तो पूर्वी सांगितल्याप्रमाणें प्रायोपवेशाचा संकल्प करून बसला; त्यावेळीं स्वर्गामध्यें देवांनीं

विष्णुगाथाः गायत; द्विजोपसृष्टः (ब्राह्मणानें दिलेला) **कुहकः** (शाप), **तक्षकः वा अलं दशतु.** ॥ १५ ॥ **यां यां सृष्टिं उपयामि, [तत्र] सर्वत्र पुनश्च भगवति अनन्ते रतिः, तदाश्रयेषु प्रसङ्गश्च भूयात्, महत्सु मैत्री, द्विजेभ्यः नमः अस्तु.'** ॥ १६ ॥ **स्वसुतन्यस्तभारः** (आपल्या पुत्रावर सोंपविला आहे राज्यकारभार ज्यानें असा) **इति अध्यवसाययुक्तः** (निश्चयानें युक्त असा) **धीरः राजा समुद्रपत्न्याः दक्षिणकूले** (दक्षिण तीरावर) **उदङ्मुखः प्राचीनमूलेषु** (पूर्वेकडे अग्रें आहेत ज्यांचीं अशा) **कुशेषु आस्ते स्म** (बसला). ॥ १७ ॥

पुनश्च भूयाद्भगवत्यनन्ते रतिः प्रसङ्गश्च तदाश्रयेषु ॥ महत्सु यां यामुपयामि सृष्टिं मैत्र्यस्तु सर्वत्र नमो
द्विजेभ्यः ॥ १६ ॥ इति स्म राजा ऽध्यवसाययुक्तः प्राचीनमूलेषु कुशेषु धीरः ॥ उदङ्मुखो दक्षिणकूल
आस्ते समुद्रपत्न्याः स्वसुतन्यस्तभारः ॥ १७ ॥ एवं च तस्मिन्नरदेवदेवे प्रायोपविष्टे दिवि देवसंघाः ॥
प्रशस्य भूमौ व्यकिरन्प्रसूनैर्मुदा मुहुर्दुन्दुभयश्च नेदुः ॥ १८ ॥ महर्षयो वै समुपागता ये प्रशस्य
साध्वित्यनुमोदमानाः ॥ ऊचुः प्रजानुग्रहशीलसारा यदूत्तमश्लोकगुणाभिरूपम् ॥ १९ ॥

तस्मिन् नरदेवदेवे एवं प्रायोपविष्टे [सति] दिवि (स्वर्गात) **देवसंघाः** (देवांचे समुदाय) **प्रशस्य भूमौ प्रसूनैः** (पुष्पांनीं) **मुदा** (आनंदानें) **व्यकिरन्** (वृष्टि करिते झाले), **मुहुः दुन्दुभयः नेदुः** (वाजले) **च.** ॥ १८ ॥ **ये प्रजानुग्रहशीलसाराः** (लोकांवर अनुग्रह करण्याकडेसच स्वभाव—स्वभावाची प्रवृत्ति—व शक्ति आहे ज्यांची असे) **महर्षयः समुपागताः, [ते] प्रशस्य साधु**

त्याची प्रशंसा व पृथ्वीवर पुष्पवृष्टि केली; आणि दुंदुभि वाजूं लागले. ॥ १८ ॥ त्यांमध्यें महान् महान् ऋषि आले होते. त्यांनीं ह्या कृत्याबद्दल राजाची प्रशंसा केली व ' अशा वेळीं ही गोष्ट करणें योग्यच आहे ' असें म्हणून त्याला अनुमोदन दिलें. त्या ऋषींच्या स्वभावाची प्रवृत्ति नेहमीं लोकांवर अनुग्रह करण्याकडे असे व ते आपल्या शक्तीचाही उपयोग तिकडेच करीत असत. त्यांनीं पुढें जें भाषण केलें, तें मधून मधून श्रीकृष्णकीर्तीनें भरलेलें असल्यामुळें फारच रमणीय आहे. तें येणेंप्रमाणेंः— ॥ १९ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

" हे राजर्षिश्रेष्ठा परीक्षिता ! तूं प्रायोपवेशन करून श्रीकृष्णाचें ध्यान करीत बसलास, हें कांहीं आश्चर्य नाहीं. - कारण, तुझ्या वंशांतील सर्व पुरुष नेहमीं कृष्णाच्या ठिकाणींच रत असतात. तुझे आजे धर्मप्रभृति पांडव, - श्रीकृष्णाच्या पार्श्वभागीं स्थान मिळावें, एवढेंच काय तें इच्छीत होते व त्याकरितां त्यांनीं आपल्या राजमुकुटयुक्त सिंहासनाचादेखील त्याग केला ! ॥ २० ॥ (ऋषि आपसांत विचार ठरवितातः–) हा महाभगवद्भक्त प्रसिद्ध राजा परीक्षित्, शरीराचा त्याग करून, अज्ञानरहित व शोकशून्य अशा उत्तम गुणसंपन्न लोकास जाईपर्यंत आपण सर्व मंडळी आतां येथेंच राहूं. " ॥ २१ ॥ परीक्षिताला श्रीविष्णूचीं चरित्रें ऐकण्याची इच्छा होती. त्यानें ऋषिमंडळीचें तें भाषण ऐकिलें.

इति अनुमोदमानाः [सन्तः] यदूत्तमश्लोकगुणाभिरूपं (अभिरूप ह्म० सुंदर असें) ऊचुः— ॥ १९ ॥ ' हे राजर्षिवर्य, कृष्णं समनुव्रतेषु (रत झालेल्या) भवत्सु इदं न वै चित्रं, भगवत्पार्श्वकामाः (ईश्वराच्या जवळ जाण्याची इच्छा करणारे) ये राजकिरीटजुष्टं (राजमुकुटयुक्त अशा) अध्यासनं (सिंहासनाला) सद्यः जहुः ! ॥ २० ॥ यावत् असौ भागवतप्रधानः अयं कलेवरं विहाय विरजस्कं (अज्ञानरहित अशा) विशोकं परं लोकं यास्यति, तावत् अद्य सर्वे वयं इह आस्महे. ' ॥ २१ ॥ विष्णोः चरितानि शुश्रूषमाणः परीक्षित् तत् समं (पक्षपात

न वा इदं राजर्षिवर्य चित्रं भवत्सु कृष्णं समनुव्रतेषु ॥ ये ऽध्यासनं राजकिरीटजुष्टं सद्यो
जहुर्भगवत्पार्श्वकामाः ॥ २० ॥ सर्वे वयं तावदिहास्महे ऽद्य कलेवरं यावदसौ विहाय ॥
लोकं परं विरजस्कं विशोकं यास्यत्ययं भागवतप्रधानः ॥ २१ ॥ आश्रुत्य तद्ऋषिगणवचः परीक्षित्
समं मधुच्युद्गुरु चाव्यलीकम् ॥ अभाषतैतानभिनन्द्य युक्तं शुश्रूषमाणश्चरितानि विष्णोः ॥ २२ ॥
समागताः सर्वत एव सर्वे वेदा यथा मूर्तिधरास्त्रिपृष्ठे ॥ नेहाथवा ऽमुत्र न कश्चनार्थ
ऋते परानुग्रहमात्मशीलम् ॥ २३ ॥

रहित अशा) अव्यलीकं (सत्य अशा) मधुच्युत् (अमृतस्राव करणाऱ्या) गुरु (गंभीर अशा) ऋषिगणवचः आश्रुत्य, एतान् अभिनन्द्य युक्तं अभाषत— ॥ २२ ॥ ' यथा त्रिपृष्ठे (तीन्ही लोकांच्या वर) मूर्तिधराः वेदाः, [तथा] सर्वतः एव सर्वे समागताः परानुग्रहं आत्मशीलं ऋते (वांचून) इह अथवा अमुत्र कश्चन अर्थः न. ॥ २३ ॥

त्यांत पक्षपात, किंवा असत्य मुळींच नसून तें इतकें मधुर होतें कीं जणूं त्यांतून अमृतच पाझरत आहे; इतकें असून प्रौढी व गांभीर्य हे गुण त्यांत भरलेले होते. तें ऐकल्याबरोबर राजानें ऋषींचें अभिनंदन करून त्याप्रसंगीं योग्य असें भाषण करण्यास प्रारंभ केलाः– ॥ २२ ॥ " ऋषीहो, ह्या तीन्ही (स्वर्ग, मृत्यु, पाताल) लोकांचा पृष्ठभाग जो सत्यलोक, त्यामध्यें जसे मूर्तिमान् वेद आहेत, तसे आपण सर्व आहां. - माझ्यावर अनुग्रह करावा ह्मणूनच - ह्या ठिकाणीं आपण प्राप्त झालां; कारण, निरनिराळ्या रीतीनें लोकां-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

वर अनुग्रह करणें हें आपलें शीलच आहे; त्याशिवाय आपला इहलोकीं अथवा परलोकीं दुसरा कर्तव्यभाग कांहींच उरला नाहीं. ॥ २३ ॥ ब्राह्मणहो, ह्मणून आपल्यावर माझा दृढ विश्वास आहे; तेव्हां, 'मनुष्याचें कर्तव्य काय?' ह्याबद्दल प्रश्न करावे असें मला वाटतें, तें तुह्मांला मी विचारितों. प्रत्येक अवस्थेमध्यें शुद्ध वर्तन कसें ठेवावें? व ज्याचें मरण सन्निध आलें त्यानें काय करावें? ह्याबद्दल विचार - मला सांगावा." - ॥ २४ ॥ - राजानें प्रश्न केल्यावर 'यज्ञयागादि क्रिया, योग, तपश्चर्या, दान, ह्यांमध्यें कोणता उपाय उत्तम' ह्याबद्दल ऋषींमध्यें शास्त्रार्थ सुरू झाले. - इतक्यांत तेथें व्यासपुत्र श्रीशुकमहाराजांची स्वारी अवधूताच्या वेषानें सहज

हे **विप्राः, ततः विश्रभ्य** (विश्वास ठेवून) **इतिकृत्यतायां इमं पृच्छयं** (विचार करण्यास योग्य अशा) **वः विपृच्छे**-हे*अभियुक्ताः, **सर्वात्मना** (सर्व अवस्थांमध्यें) **च म्रियमाणैः च शुद्धं कृत्यं आ**-मृशत (विचार करून सांगा)." ॥ २४ ॥ **तत्र यदृच्छया गां** (पृथ्वीवर) **अटमानः स्त्रिबालैः वृतः** (वेष्टिलेला) **अनपेक्षः** (अपेक्षारहित असा) **अलक्ष्यलिंगः** (ओळखितां येत नाहीं-

ततश्च वः पृच्छ्यमिमं विपृच्छे विश्रभ्य विप्रा इतिकृत्यतायाम्॥ सर्वात्मना म्रियमाणैश्च कृत्यं शुद्धं
च तत्राऽऽमृशताभियुक्ताः ॥ २४ ॥ तत्राभवद्भगवान्व्यासपुत्रो यदृच्छया गामटमानोऽनपेक्षः ॥
अलक्ष्यलिङ्गो निजलाभतुष्टो वृतः स्त्रिबालैरवधूतवेषः ॥ २५ ॥ तं द्व्यष्टवर्षं सुकुमारपाद-
करोरुबाह्वंसकपोलगात्रम् ॥ चार्वायताक्षोन्नसतुल्यकर्णसुभ्रवाननं कम्बुसुजातकण्ठम् ॥ २६ ॥

आश्रमादि-चिन्ह ज्याचें असा) **निजलाभतुष्टः** (स्वस्वरूपप्राप्तीच्या लाभानें संतुष्ट असा) **अवधूतवेषः भगवान् व्यासपुत्रः अभवत्.** ॥ २५ ॥ **तं द्व्यष्टवर्षं** (सोळावर्षाच्या अशा) **सुकु**-**मारपादकरोरुबाह्वंसकपोलगात्रम्** (सुकुमार आहेत पाय, हात, मांड्या, दंड, स्कंध, गाल, सर्वशरीर ज्याचें अशा) **चार्वायताक्षोन्नसतुल्यकर्णसुभ्राननं** (डोळे सुंदर व विस्तृत,

पृथ्वीवर फिरत फिरत प्राप्त झाली. भोंवतालीं कांहीं बायका, मुलें ह्यांचा मेळा होता (चेष्टा करण्याकरितां). फिरण्यांत त्यांचा उद्देश कांहीं नव्हता. स्वरूपावरून त्यांचीं वर्ण, आश्रम इत्यादि चिन्हें कोणास ओळखूं येत नसत; ते नेहमीं आत्मप्राप्तीच्या लाभांत निमग्न असत. ॥ २५ ॥ त्यांचें वय सोळा वर्षांचें होतें; पाय, हात, मांड्या, दंड, स्कंध, गाल, एकंदरींत सर्व शरीर कोमल दिसत होतें; त्यांचे डोळे सुंदर व विस्तृत होते, नाक उंच होतें (बसकें नव्हतें), कर्ण तोकडे किंवा फार लांब नसून चेहऱ्यास शो-

१ अवधूत ह्मणजे टाकलेला. लोकांनीं अवज्ञा किंवा तिरस्कार करून समाजांतून टाकून दिलेला, अशा मनुष्याचा वेष घेऊन; किंवा अपमानास्पद वेषानें; वेष पाहिल्याबरोबरच लोकांनीं तिरस्कार करावा अशा स्थितींत.

* अभियुक्त ह्म० आप्त=यथार्थ उपदेश करणारे; मग तो ऐकणाराच्या मनाला गोड वाटो अथवा न वाटो.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अशा प्रकारची त्यांची मुखशोभा होती. व शंखाच्या पोटांत जशा तीन रेषा असतात तशा त्यांच्या कंठाला तीन वळ्या होत्या. भणारे होते व भिवयाही सुरेख होत्या. ॥ २६ ॥ त्यांचें जत्रु (गर्दन) मांसामध्यें गदीं गढून गेलें होतें, तसेंच, छाती रुंद असून वर आलेली होती; आणि नाभि पाण्यांतील भोंवऱ्याप्रमाणें होती. उदरावर वळ्या असल्यामुळें तेंही सुशोभित दिसे. दिशा हेंच त्यांचें वस्त्र (ते नग्न होते); त्यांचे केश कुरळे असून पसरलेले होते, बाहु दीर्घ (लांब) होते, व देवांमध्यें श्रेष्ठ जो विष्णु त्याच्याप्रमाणें त्यांचें दिव्य तेज दिसत असे. ॥ २७ ॥ त्यांची अंगकांति कृष्णवर्ण असे. ते नित्य उत्तम यौवनावस्थेंत असल्यामुळें आणि त्यांची कांतिही उत्तम व सुंदर असल्या-

मुखशोभा त्याची अशा) **कंबुसुजातकंठम्** (शंखासारिखा ह्मणजे तीनरेषांनीं अंकित असा सुरेख कंठ ज्याचा अशा) ॥ २६ ॥ **निगू-**
त्याचें अशा) **पृथुतुङ्गवक्षसं** (विस्तीर्ण व उन्नत आहे वक्षस्थल ज्याचें अशा) **आवर्त्तनाभिं** (पाण्यांतील भोंवऱ्याप्रमाणें आहे नाभि ज्याची अशा)
अशा) **च दिगम्बरं वक्रविकीर्णकेशं** (कुरळे व पसरले आहेत केश ज्याचे अशा) **प्रलम्बबाहुं स्वमरोत्तमाभम्** (श्रेष्ठ देवांत उत्तम—जो विष्णु—

नाक उंच, कर्ण चेहऱ्यास योग्य, भिवया सुरेख–अशी
ढजत्रुं (मांसांत—गढून—गेलें आहे जत्रु ह्म०गर्दन ज
वलिवल्गूदरं (वळ्यांनीं सुशोभित आहे उदर ज्याचें

ङ्गवक्षसमावर्तनाभिं वलिवल्गूदरं च ॥ दिगम्बरं वक्रविकीर्णकेशं प्रलम्बबाहुं
निगूढजत्रुं पृथुतु ॥ २७ ॥ श्यामं सदा ऽपीच्यवयोऽङ्गलक्ष्म्या स्त्रीणां मनोज्ञं रुचिरस्मितेन ॥
स्वमरोत्तमाभम् ॥ः स्वासनेभ्यस्तल्लक्षणज्ञा अपि गूढवर्चसम् ॥ २८ ॥ स विष्णुरातो ऽतिथ्य आगताय
प्रत्युत्थितास्ते मुनयो जहार ॥ ततो निवृत्ता ह्यबुधाः स्त्रियो ऽर्भका महासने सोपविवेश पूजितः ॥ २९ ॥
तस्मै सपर्यां ॥

॥ **श्यामं सदा अपीच्यवयोङ्गलक्ष्म्या** (अत्युत्तम यौवनानें—शोभणाऱ्या—देहाच्या कांतीनें) **रुचिरस्मितेन च स्त्रीणां मनोज्ञं गूढवर्चसं** (गूढ आहे
त्याच्यासारखी आहे कांति ज्याची अशा) ॥ २
: मुनयः स्वासनेभ्यः प्रत्युत्थिताः. ॥ २८ ॥ **सः विष्णुरातः आगताय अतिथये तस्मै शिरसा सपर्यां** (पूजेला) **जहार, ततः अबुधाः**
प्रभाव ज्याचा अशा) **अपि तं तल्लक्षणज्ञ** **पूजितः सः महासने उपविवेश.** ॥ २९ ॥
(अज्ञानी), **स्त्रियः, अर्भकाः निवृत्ताः**

युक्त असल्यामुळें त्यांना पाहिल्याबरोबर स्त्रियांचें मन हरण होत असे. त्यांचा प्रभाव जरी गूढ होता तरी ऋषि त्याला ओळखत होते, मुळें, तसेंच, त्यांचें मुख किंचित् हा आपआपल्या आसनावरून उभे राहिले. ॥ २८ ॥ नंतर परीक्षितानें त्या आलेल्या अतिथीची (शुकाची) मस्तकेंकरून पूजा केली, (महा- ॥ ९० ॥
ह्मणून ते आल्याबरोबर सर्व ऋषि असें ह्मणून त्यांच्या पायांवर मस्तक ठेविलें) असा शुकांचा आदरसत्कार झालेला पाहिल्याबरोबर - त्यांच्या सभोंवतीं जमलेली ती अज्ञानी
राज, मी आपल्याला शरण आहें

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

[OrderDescription]
,CREATED=24.12.19 15:37
,TRANSFERRED=2019/12/24 at 16:05:31
,PAGES=179
,TYPE=STD
,NAME=S0002389
,Book Name=M-2385A-SHRIMADBHAGWARTARTH DARSHAN
,ORDER_TEXT=
,[PAGELIST]
,FILE1=00000001.TIF
,FILE2=00000002.TIF
,FILE3=00000003.TIF
,FILE4=00000004.TIF
,FILE5=00000005.TIF
,FILE6=00000006.TIF
,FILE7=00000007.TIF
,FILE8=00000008.TIF
,FILE9=00000009.TIF
,FILE10=00000010.TIF
,FILE11=00000011.TIF
,FILE12=00000012.TIF
,FILE13=00000013.TIF
,FILE14=00000014.TIF

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

FILE15=00000015.TIF
,FILE16=00000016.TIF
,FILE17=00000017.TIF
,FILE18=00000018.TIF
,FILE19=00000019.TIF
,FILE20=00000020.TIF
,FILE21=00000021.TIF
,FILE22=00000022.TIF
,FILE23=00000023.TIF
,FILE24=00000024.TIF
,FILE25=00000025.TIF
,FILE26=00000026.TIF
,FILE27=00000027.TIF
,FILE28=00000028.TIF
,FILE29=00000029.TIF
,FILE30=00000030.TIF
,FILE31=00000031.TIF
,FILE32=00000032.TIF
,FILE33=00000033.TIF
,FILE34=00000034.TIF
,FILE35=00000035.TIF
,FILE36=00000036.TIF
,FILE37=00000037.TIF

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

FILE38=00000038.TIF
,FILE39=00000039.TIF
,FILE40=00000040.TIF
,FILE41=00000041.TIF
,FILE42=00000042.TIF
,FILE43=00000043.TIF
,FILE44=00000044.TIF
,FILE45=00000045.TIF
,FILE46=00000046.TIF
,FILE47=00000047.TIF
,FILE48=00000048.TIF
,FILE49=00000049.TIF
,FILE50=00000050.TIF
,FILE51=00000051.TIF
,FILE52=00000052.TIF
,FILE53=00000053.TIF
,FILE54=00000054.TIF
,FILE55=00000055.TIF
,FILE56=00000056.TIF
,FILE57=00000057.TIF
,FILE58=00000058.TIF
,FILE59=00000059.TIF
,FILE60=00000060.TIF

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

FILE61=00000061.TIF
,FILE62=00000062.TIF
,FILE63=00000063.TIF
,FILE64=00000064.TIF
,FILE65=00000065.TIF
,FILE66=00000066.TIF
,FILE67=00000067.TIF
,FILE68=00000068.TIF
,FILE69=00000069.TIF
,FILE70=00000070.TIF
,FILE71=00000071.TIF
,FILE72=00000072.TIF
,FILE73=00000073.TIF
,FILE74=00000074.TIF
,FILE75=00000075.TIF
,FILE76=00000076.TIF
,FILE77=00000077.TIF
,FILE78=00000078.TIF
,FILE79=00000079.TIF
,FILE80=00000080.TIF
,FILE81=00000081.TIF
,FILE82=00000082.TIF
,FILE83=00000083.TIF

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

FILE84=00000084.TIF
,FILE85=00000085.TIF
,FILE86=00000086.TIF
,FILE87=00000087.TIF
,FILE88=00000088.TIF
,FILE89=00000089.TIF
,FILE90=00000090.TIF
,FILE91=00000091.TIF
,FILE92=00000092.TIF
,FILE93=00000093.TIF
,FILE94=00000094.TIF
,FILE95=00000095.TIF
,FILE96=00000096.TIF
,FILE97=00000097.TIF
,FILE98=00000098.TIF
,FILE99=00000099.TIF
,FILE100=00000100.TIF
,FILE101=00000101.TIF
,FILE102=00000102.TIF
,FILE103=00000103.TIF
,FILE104=00000104.TIF
,FILE105=00000105.TIF
,FILE106=00000106.TIF

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

FILE107=00000107.TIF
,FILE108=00000108.TIF
,FILE109=00000109.TIF
,FILE110=00000110.TIF
,FILE111=00000111.TIF
,FILE112=00000112.TIF
,FILE113=00000113.TIF
,FILE114=00000114.TIF
,FILE115=00000115.TIF
,FILE116=00000116.TIF
,FILE117=00000117.TIF
,FILE118=00000118.TIF
,FILE119=00000119.TIF
,FILE120=00000120.TIF
,FILE121=00000121.TIF
,FILE122=00000122.TIF
,FILE123=00000123.TIF
,FILE124=00000124.TIF
,FILE125=00000125.TIF
,FILE126=00000126.TIF
,FILE127=00000127.TIF
,FILE128=00000128.TIF
,FILE129=00000129.TIF

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

FILE130=00000130.TIF
,FILE131=00000131.TIF
,FILE132=00000132.TIF
,FILE133=00000133.TIF
,FILE134=00000134.TIF
,FILE135=00000135.TIF
,FILE136=00000136.TIF
,FILE137=00000137.TIF
,FILE138=00000138.TIF
,FILE139=00000139.TIF
,FILE140=00000140.TIF
,FILE141=00000141.TIF
,FILE142=00000142.TIF
,FILE143=00000143.TIF
,FILE144=00000144.TIF
,FILE145=00000145.TIF
,FILE146=00000146.TIF
,FILE147=00000147.TIF
,FILE148=00000148.TIF
,FILE149=00000149.TIF
,FILE150=00000150.TIF
,FILE151=00000151.TIF
,FILE152=00000152.TIF

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

FILE153=00000153.TIF
,FILE154=00000154.TIF
,FILE155=00000155.TIF
,FILE156=00000156.TIF
,FILE157=00000157.TIF
,FILE158=00000158.TIF
,FILE159=00000159.TIF
,FILE160=00000160.TIF
,FILE161=00000161.TIF
,FILE162=00000162.TIF
,FILE163=00000163.TIF
,FILE164=00000164.TIF
,FILE165=00000165.TIF
,FILE166=00000166.TIF
,FILE167=00000167.TIF
,FILE168=00000168.TIF
,FILE169=00000169.TIF
,FILE170=00000170.TIF
,FILE171=00000171.TIF
,FILE172=00000172.TIF
,FILE173=00000173.TIF
,FILE174=00000174.TIF
,FILE175=00000175.TIF

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

FILE176=00000176.TIF
,FILE177=00000177.TIF
,FILE178=00000178.TIF
,FILE179=00000179.TIF
,

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection